
स. ठाणे
य ...चरित्र...
सं. क्र. : ११४८



# वाळवंटांतील पाउलें

REFBK-0013173

का. न. केळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३३१७३
... शाखा

# वाळवंटांतलि पाउलें

काशिनाथ नरसिंह केळकर,
ॲडव्होकेट

REFBK-0013173

किंमत सात रुपये

© अरविंद काशिनाथ केळकर

प्रकाशक : ग. ल. ठोकळ, ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणें २

मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, ‘ शिव-पार्वती ’, टिळक रोड, पुणें २


प्रथमावृत्ति : सप्टेंबर १९६३

माझ्या सहधर्मचारिणीस–

## ' गतगोष्टी 'तील अप्रसिद्ध उतारा.

" ' आतां कोणाची मतें प्रकट न झाली म्हणून तो अप्रामाणिक असतोच असें नाहीं. मतें प्रामाणिक असतात, व तीं प्रकट करण्याचें धैर्यहि त्याला असते. परंतु तीं प्रकट करण्याला त्याला योग्य संधि मिळत नाहीं. किंवा तीं मिळाली तरी तो संकोची वृत्तीचा, अबोलपणाच्या आवडीचा असेल तर मनांत म्हणेल कीं ' जाऊं दे कीं, विनाकारण मतें प्रगट करा कशाला ? त्यावांचून काय अडलें आहे ? तीं प्रकट न झाल्यानें कोणाचें त्यांत अनहित आहे ? किंवा तीं प्रगट करावीं असें काय जोखीम किंवा जबाबदारी मजवर आहे ? परंतु यावर असें म्हणतां येतें कीं, जीवनासारख्या तात्विक विषयावरची कोणाचीहि मतें ही त्याची खाजगी मिळकत नाहीं. ती सार्व-जनिक मालकीची मिळकत आहे. आणि ती त्यानें समाजाला केव्हां तरी देऊन टाकलीच पाहिजे. कारण ती अप्रकट राहिल्यानें त्याच्या व्यक्तीसंबंधानें इतरांची गैरसमजूत होण्याचा संभव असतो. शिवाय त्याच्या मतप्रकटीकरणाने समाजाला शिक्षण मिळण्या-सारखे असेल तर तें बुडतें. म्हणून आपलीं मतें सर्व जन्मभरांत केव्हां प्रकट न झाली तरी, ती मृत्युपत्रानें तरी प्रकट करावी. ती मिळकत बरोबर घेऊन जाण्याचा कोणालाहि हक्क नाहीं. ' मृत्युपत्रानें मागें ठेवलेल्या या मताना त्यानें मागें ठेवलेल्या पैशापेक्षांहि कदाचित् किंमत येईल. "

न. चिं. केळकर



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. हस्तलिखित
अनुक्रमांक ........ वि: चरित्र.
क्रमांक ...११४... नों: दि: ९।१।८

## प्रस्तावना

'वाळवंटांतील पाउलें' हें माझें आत्मचरित्र आज पुरें करून हातावेगळें करितांना मनाला फार समाधान वाटतें. तें कदाचित पुरेंहि झालें नसतें, पण तें निर्विघ्नपणें शेवटास गेलें याबद्दल खरोखरच ईश्वराचे आभार मानले पाहिजेत !

या आत्मकथेची पहिली तीनचार प्रकरणें मी १९४५ सालीं लिहिलीं; पुढील चार-पांच प्रकरणें १९४८ सालीं लिहिलीं. त्यानंतर सोळा वर्षांनीं १९६३ सालीं कांहीं आठवणी लिहिल्या. दोनशे पानें लिहिण्याला अठरा वर्षें लागावीं यावरून ही आत्मकथा लिहिण्याला माझ्या लेखणीनें किती संकोच दर्शविला असेल, किती खळखळ केली असेल, हें वाचकांचे लक्षांत येईल ! पण त्याहि गोष्टीला मर्यादा आहे. आयुष्य सरत आलें आहे. ६४ वर्षें संपून मला आतां ६५ वें वर्ष लागणार; आयुष्याच्या झरणींतील शाई संपून टोंकाशी आली आहे, याची मनोमन जाणीव असल्यामुळें हें आत्मचरित्र मी कसेंबसें पुरें केलें आहे.

माझी जीवनकथा मी लिहिलीच पाहिजे काय ? ती मुळींच न लिहिली तरी चालण्यासारखी नाहीं काय ? असा विचार माझ्या मनांत निदान शंभर वेळां येऊन गेला असेल. माझी हकीगत मी सोडून देऊं शकेन. त्यांत सांगण्यासारखें कांहीं नाहींहि. पण तात्यांचे आयुष्याशीं माझें आयुष्य जन्मभर निगडित होतें त्याचें काय ? तीहि हकीगत मी सोडून देऊन त्यावर पडदा टाकावयाचा कीं काय ? असें मनांत येऊन हें आत्मचरित्र लिहिण्याचें मी ठरविलें. दुसरें असें कीं, ती. तात्यांचे आत्मचरित्रांतील एक अप्रसिद्ध कागद एखाद्या आदेशासारखा माझे नजरेसमोर होता. तो नसता तर माझ्या या आत्मचरित्रांतील एक ओळदेखील मी लिहिली नसती. तात्यांचे ते बहुमोल शब्द सर्वांना सर्वकाळ उपयोगी पडण्यासारखे आहेत, म्हणून या प्रस्तावनेशेजारीं दिले आहेत.

माझ्या लेखणीनें ती. तात्यांचे शिवाय दुसरा कोणताहि गुरु मानला नाहीं. यामुळें, औचित्यबुद्धीनें काय व किती लिहावयाचें हें मला कोणी सांगण्याचें कारण नाहीं. किंबहुना या आत्मचरित्रांतील प्रत्येक ओळ ती. तात्यांना मनोमन साक्ष ठेवूनच मी लिहिली आहे, असें वाचकांनीं खुशाल समजावें. आयुष्यांत बऱ्यावाईट अनेक गोष्टी मी पाहिल्या आहेत. पण प्रसन्न मनानें जितकें सांगतां येईल तितकेंच सांगावें, बाकीचें सर्व सोडून द्यावें, असें या लिखाणांत मी केलें आहे.

या जगांत आपण अनेक 'ऋणें' घेऊन जन्माला आलों आहों. आणि समाजांत जगतो तेहि अनेकांच्या सदिच्छेच्या ऋणावरच, याची जाणीव असली पाहिजे. हें आत्मचरित्र लिहून हातावेगळें करितानां, त्या ऋणांतून आपण मुक्त झालों आहों अशी माझी नम्र भावना आहे.

भाद्रपद वद्य १४
शके १८८५

का. न. केळकर

याच ग्रंथकर्त्यांचीं
इतर पुस्तकें

हिंदु-व्यवहार धर्मशास्त्र
रामायणावरील कांहीं विचार
नव्या स्मृतीची आवश्यकता
नेपोलियन व हिटलर
शमीपूजन
शंभर वर्षांपूर्वी
दोन घटका मनोरंजन

## अनुक्रमणिका

### पूर्वार्ध


| | | |
|---|---|---|
| १ | हृद्‌गत | १ |
| २ | लहानपण दे गा देवा | ४ |
| ३ | शाळा कॉलेजांतील विश्व | ८ |
| ४ | मी, पाहिलेली रंगभूमि | १५ |
| ५ | कांही जुन्या हकीगती | २१ |
| ६ | सार्वजनिक जीवनाचे पडसाद | ३१ |
| ७ | तात्यांची विलायत–यात्रा | ४६ |
| ८ | उदयास्त | ५४ |
| ९ | माझी वकिलीची परीक्षा | ६२ |
| १० | टिळक चरित्रांतील माझी उमेदवारी | ७१ |
| ११ | जुन्या पुण्यांतील नमुनेदार व्यक्ति | ७७ |
| १२ | मी पाहिलेले लोकमान्य टिळक | ८९ |
| १३ | कांही निवडक पत्रें | ९८ |


### उत्तरार्ध


| | | |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक जीवनाचा ओनामा | ११३ |
| २ | वकिली धंद्यांतील अनुभव | १२५ |
| ३ | शारदा–बिल व इतर चळवळी | १४३ |
| ४ | प्रभात पत्राचें संपादकत्व | १६४ |
| ५ | माझे मुंबईचें वास्तव्य | १७४ |
| ६ | ‘ अंधेरां ’तील प्रकाशमय जीवन | १८२ |
| ७ | भवितव्यतेची लीला | १९६ |
| ८ | परिपूर्ति | २११ |
| ९ | उपसंहार | २२९ |
| १० | कांही निवडक पत्रें | २३५ |

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...३२२१५... वि: ...चारित्र...
क्रमांक ...२२४१... नों दि ...१/१९६४...
93903

# १

# हृद्गत

माझ्या आयुष्यांत पाहिलेल्या कांहीं गोष्टी पुढें सांगणार आहें. मात्र हें माझें 'आत्मचरित्र' नव्हे, एवढें वाचकांनीं कृपा करून लक्षांत ठेवावें. हे स्मृतितरंग म्हणजे वाळवंटांतील पावलें आहेत. करमणुकीखातर या गोष्टी ऐकायच्या, आणि पुसून टाकायच्या! माझ्या स्वतःच्या आयुष्यांत दुसऱ्याला सांगण्यासारखें कांहीं नाहीं. रेल्वेमध्यें प्रवास करणारे गांवढळ प्रवासी गप्पागोष्टी मारतांना एकमेकांना चार अनुभवाच्या हकीगती सांगतात तसेंच मी करणार आहें. मी साक्षर आहें म्हणून जें बोलायचें तेंच टांकानें लिहितों इतकेंच. तथापि आत्मचरित्राबद्दल म्हणाल तर माझें असें मत आहे कीं, सामान्य मनुष्यानेंहि कांहींतरी आत्मचरित्रपर लिहावें. मोठ्या मनुष्याचें आत्मचरित्र हजार पृष्ठांचें झालें तर सामान्य मनुष्याचें, मी म्हणतों दहा शब्दांत आवरेल. पण शंभर मनुष्यांच्या आयुष्यांतील दहा दहाच शब्द जमा केले तर त्याला वाङ्मयदृष्टीनें कांहींच किंमत नाहीं का?

बागायतीचा धंदा करणारे शेंबेकर

एकदां सहज म्हणाले, "माझा असा विश्वास आहे कीं, ज्या मनुष्याच्या आयुष्याला कांहीं हिशेब आहे तो मनुष्य निश्चयानें जगांत पुढें आलाच पाहिजे. आत्मचरित्र लिहिणें सोपें नाहीं. आत्मचरित्र म्हणजे गत आयुष्याचा हिशेब देणें होय. तुम्ही निरक्षर असा कीं विद्वान् असा, तुमच्या 'अनुभवाच्या बोला' ला सहजच वाङ्मयाचें रूप येतें. कारण अगदीं अर्ध्या ओळीच्या अनुभवाच्या बोलांत अनेक वर्षांचा स्वानुभव सामावलेला असतो. मग अशा अनुभवाच्या गोष्टी मौलिक कां ठरूं नयेत ?

शिकारीच्या सुरस गोष्टी लिहिणारे माझे मित्र श्री. रा. वि. फडतरे मला एकदां बोलतांना विनयानें म्हणाले, "मी कांहीं लेखक नाहीं ! सामान्य शेतकरी मनुष्य. आमचें कसलें लिहिणें ?" त्यावर मी त्यांना खऱ्या मनानें म्हटलें, "तुमची शिकारीची एकेक गोष्ट म्हणजे सुंदर आत्मचरित्रच आहे. वाघाशीं उघड्या मैदानांत सामना देणारे लेखक तरी किती ? म्हणून गोष्टीरूपानें लिहिलेलें तुमचें हें आत्मचरित्र लोकविलक्षण ठरेल ! अचूक निशाण मारणाऱ्या तुमच्या बंदुकीच्या गोळीला जसें अन्यथा भाषण माहीत नाहीं, त्याप्रमाणें तुमचे शिकारीचे अनुभव वाङ्मयदृष्टीनेंहि फार मनोवेधक आहेत यांत शंका नाहीं."

दुसरें असेंच पुस्तक मीं पाहिलें तें म्हणजे दादासाहेब ओंकार यांचें आत्मचरित्र. त्याला त्यांनीं 'कर्मफल' असें नांव दिलें असून, जगांत आलेले बरे-वाईट अनुभव त्यांत दिले आहेत. कोणाला वाटेल कीं, ऑनररी मॅजिस्ट्रेट होऊन पुढें पेन्शनर झालेल्या माणसाच्या चरित्रांत किरकोळ गोष्टींखेरीज काय असणार ? पण त्यांनीं सच्चेपणानें ज्या हकीगती त्यांत सांगितल्या त्या खचित मनोरंजक आहेत. ज्याला थोडाहि प्रामाणिकपणा नाहीं असा कोणचाहि मनुष्य आत्मचरित्रपर लिहिण्याची उठाठेव करणार नाहीं.

'अनुभवाचा बोल' ही कांहीं वेगळीच चीज आहे. जणूं कांहीं चटकदार रीतीनें सांगितलेली 'सत्यकथा' म्हणाना ! हे अनुभवाचे बोल घरोघरीं पसरलेले आहेत. मात्र स्वतःच्या मोठेपणाचा खोटा अहंकार सोडून जगांत मिसळण्याची कला आपणाला ठाऊक पाहिजे. माझा एक मित्र सध्यां रेशन-इन्स्पेक्टर आहे. बोलतांना तो एकदां मला म्हणाला, "माझें सध्यांचें काम मोठें मजेचें आहे. घरोघरीं जायचें आणि आणि इन्स्पेक्टर या नात्यानें चौकशा करावयाच्या. नानाप्रकारच्या माणसांशीं बोलावें लागतें. त्यामुळें ज्या जगाची आजवर कधीं ओळख नव्हती असें 'नवें जग' आपण पाहत आहों असें मनांत येतें. पुस्तकांत शिकलेलें आपलें ज्ञान किती थोडें आहें, अपुरें आहे याची जगांत मिसळलें म्हणजे जितकी कल्पना येते तितकी दुसरी कशानेंहि येत नाहीं. एका बुकांत फार तर एका मनुष्याचा अनुभव आपणांस सांपडेल. पण जग हें खरें जिवंत पुस्तक आहे. त्यांत सहस्त्रावधि माणसें. आणि त्यांचे अनुभव पाहिले तर किती नानाविध, सहस्त्रावधि !

" आपण बुकें वाचून केवळ कल्पनांचे गुलाम होतों. पुस्तक लिहिणारा स्वतःच्या कल्पनेचा बंदिवान्. तीं पुस्तकें वाचणारे आपण हेहि बौद्धिक गुलामच. कमरेला सांखळी बांधलेल्या वानराप्रमाणें ठराविक चाकोरीच्या बाहेर आपण जाऊंच शकत नाहीं. याच कारणाकरितां मी हल्लीं वर्तमानपत्रेंहि वाचीत नाहीं. कारण त्यांत फक्त मतप्रचार असतो. आपली बौद्धिक गुलामगिरी संपावी अशी ज्याला इच्छा असेल त्यानें वर्तमानपत्रें कधीं वाचूं नयेत, जगांत मिसळावें. जग ही खरी शाळा आहे. त्यांत जें शहाणपण मिळेल तें कोठल्याहि पुस्तकांत आढळणार नाहीं ! "

हे विचार ऐकून मला शरमिंदे झाल्यासारखें झालें. कारण विद्वत्तेचा हव्यास धरून गेलीं पंचवीस वर्षें माझ्या लेखणीला आणि वाचकांनाहि मीं जे श्रम दिले त्याचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभें राहिलें. दिवा मालवून टाकून झोंप घेण्याचा यत्न केला. पण झोंप येईना. कारण विचारांना गति मिळाली होती. त्या रात्रीं विचार करतांना महंमद पैगंबरासंबंधीं वाचलेल्या एका गोष्टीचा मनांत आपोआप उलगडा झाला ! महंमद हा कांहीं पुस्तकी विद्वान् नव्हता. तरुणपणीं त्याचा उद्योग म्हणजे डोंगरावर हिंडून शेळ्यामेंढ्या चारण्याचा. शेळ्यांच्या कळपाला स्वैर रीतीनें चरणीला सोडून तो पुष्कळ वेळ डोंगरावर फिरण्यांत घालवीत असे. आपला धर्म, राज्य, राहणी व समाजव्यवस्था यांपैकीं चांगलें काय, वाईट काय, अशा पुष्कळ विचारांचें मनन त्यानें डोंगरावरच केलें. पण अनुभवाचें जग पाहिलेल्या या पंडिताच्या शब्दाला जी किंमत पुढें आली ती एखाद्या विद्वान् कायदेपंडिताच्या शब्दाला कांहीं कोणीं दिली नसती ! असो.

मी स्वतःला लहान मानीत नाहीं, मोठाहि समजत नाहीं ! घटकाभर बोलण्यांत लहानमोठेंपण कसलें ? सुदैवानें ज्या घरांत मी जन्मलों आणि वाढलों तें अधिष्ठानच असें होतें कीं, शेंकडों गोष्टी डोळ्यांनीं पाहून व्हाव्यात व त्यांचा माझ्यावर परिणाम व्हावा. अनेक लहानमोठ्या व्यक्ति कीं, ज्या एरवीं जवळून पाहावयास मिळणार नाहींत त्या मला सहज पाहावयास मिळाल्या. मीं 'साक्षीभूत' होऊन पाहिलेला असा अनेकविध अनुभव टाकून कां द्यावा ? इतरांचें मनोरंजन करण्याकरितां तो कां लिहूं नये ? इतकींच हें लिखाण करण्यांत माझी प्रांजल भूमिका आहे. यांत माझ्यापेक्षां इतरांच्या हकीगती सांगण्याकडेच माझी दृष्टि अधिक राहील. कारण मी प्रथमच सांगितल्याप्रमाणें माझ्या स्वतःच्या आयुष्यांत दुसऱ्याला सांगण्याजोगें कांहीं नाहीं. अनेक अनुभवांचा हा 'मधुसंभार' माझ्या स्मृतिसंपुटांत मीं आजवर जतन केला होता, तो मजपासून ग्रहण करितांना वाचकांनीं इतकीच दृष्टि ठेवावी कीं, या हकीगतींच्या 'साक्षी'ला महत्त्व आहे, 'साक्षीदारा'ला नाहीं !

## २

# ‘ लहानपण दे गा देवा ’

वयाच्या साठीची हद्द ओलांडल्यानंतर अलीकडे मला पुष्कळदां माझें बालपण आठवतें. आयुष्याचा प्रवास करतांना बाल-पणाचें पहिलें टोंक सोडून दुसऱ्या टोंकाच्या मी जवळपास आलों आहे! आयुष्य हें एक रिंगण आहे. आणि आत्मा हा त्या रिंगणात फिरणारा घोडा किंवा प्रवासी आहे. रिंगणाची फेरी पुरी होत आली की पुनः चिरपरिचित देखावे दिसूं लागतात. असेंच आयुष्याचेंहि आहे. माझें बालपण मला आठवूं लागलें याचा अर्थ आयु-ष्याच्या प्रवासाचें रिंगण पुरें होत आलें, असा तर नसेल ना? त्यांतहि भीति वाटत नाहीं. बालपणच्या आठवणींमुळें मनुष्याचें वार्धक्यहि सुखाचें जातें.

माझीं नातवंडें माझ्याशीं येऊन खेळतात तेव्हां त्यांच्या निरागस आनंदी चेहेऱ्याकडे पाहून हर्षानें माझें देहभान हरपतें. आणि मी स्वतःला विसरून त्यांच्या इतकाच लहान होतो. त्यांच्या रूपांत मी माझेंच रूप पाहतो! मी लहान होतों तेव्हां या मुलांप्रमाणेंच माझेंहि रूप सुंदर होतें.

ताई म्हणत असे कीं, लहानपणी बापूला फार चांगलें बाळसे होतें. सर्वांना त्याला घ्यावासा वाट असें. ज्यांनीं ज्यानीं लहानपणी मला खाद्यांकडेवर घेतलें त्या सर्वांची मला आठवण आहे.

वयाच्या तिसऱ्या वर्षांपासून सर्व गोष्टी मला आठवतात. तें माझें बालपण किती सुखाचें होतें व त्या वेळच्या कल्पना मनांत काय होत्या याचें शब्दांनीं मी कसें वर्णन करूं ? त्या शैशवाच्या काळांत जिकडे तिकडे सूर्यप्रकाश पसरलेला होता; दुःख हा शब्दहि माहीत नव्हता आणि यक्षसृष्टीनें भारल्याप्रमाणें सर्वत्र रमणीयता पसर-लेली होती. हूड कवीची I Remember, I Remember ही कविता माझ्या स्मरणांत आहे. मी जर कवि असतों तर म्हटलें असतें कीं, "त्या रम्य शैशवांत पिंजऱ्यांतल्या राघूमैनाच काय, पण भिंतीवर टांगलेलीं चित्रेंहि बोलत असत ! पदार्थ-मात्राला वजन नव्हतें; फुलपांखरांच्या रथांत बसून चंद्रलोकावर जाऊन येतां येत असे ! चंद्र त्या वेळीं रुप्याच्या ताटाइतका मोठा दिसे. डोळे मिटले कीं, दूरच्या ध्वनिलहरी ऐकावयाला येत. वासाला सौंदर्य होतें, आणि स्वराला सुवास होता ! प्रणयांत निराशा नव्हती. मायेच्या शब्दांतून अमृत स्रवत असें. आणि मित्रमैत्रिणींच्या हास्यांत सारं-गीची लय प्रतीत होई !" असें जर मी बालपणचें वर्णन केलें तर तें अगदींच काल्प-निक आहे असें म्हणतां येणार नाहीं. मी तें अनुभवलें आहे. इतकेंच काय, वात्सल्य आणि प्रेम यांच्या प्रवाहांत लहानपणीं मी मनसोक्त डुंबलों आहे. "लहानपण दे गा देवा" असें तुकोबांनीं उगाच म्हटलें नाहीं ! 'व्हावें लहानाहूनी लहान' ही कल्पना मला इतकीं प्रिय आहे कीं, तात्या व ताई दोघेंहि नाहींशी होईपर्यंत मनानें मी मला लहानच समजत असे. मला मोठेपण असें कधीं आलेंच नाहीं. ताईच्या मृत्यूनंतर मात्र वाटलें कीं, आपलें लहानपण संपलें ! पण तें संपलें नव्हतें; माझ्या मुलींचीं लग्नें करतांना आपण मोठे आहो अशी क्षणभर कल्पना मनांत आली. पण त्यानंतर नातवंडें घरांत खेळूं लागलेलीं पाहतांच परकाया प्रवेशाप्रमाणें माझ्या बालपणाचा पुनः मला साक्षात्कार झाला. बालपणाची किमया अशी आहे ! तो 'कल्पवृक्ष'च आहे म्हणाना !

मी जन्मलों तेव्हां सदाशिव पेठेंतील हौदासमोरील राहुरकरांच्या घरांत आम्ही राहात होतों. तेव्हांची मला कोणतीच आठवण नाहीं. नंतर दोन–तीन वर्षांतच आम्ही नारायण पेठेंतील गोळ्यांच्या वाड्यांत राहावयास आलों. हे गोळे म्हणजे प्रिन्सिपॉल गोळे "हिंदुधर्म आणि सुधारणा" या पुस्तकाचे कर्ते असावेत. गोळ्यांचे घर चांगलें प्रशस्त तीन मजली उंच असून त्याच्या शेजारींच माणकेश्वराच्या विष्णूचें देवालय आहे. हें देवालय नीटनेटकें असून आंत पाण्याचा चोपडा म्हणजे हौद होता; त्याचें पाणी पाचूसारखें चमकें. आमच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावर दक्षिणेकडच्या अंगच्या खोलींत मी झोंपत असे. सकाळीं झोंपेंतून जागा झालों कीं देवळाच्या त्या उंच शिख-राचें प्रथम दर्शन होई. एक दिवस संध्याकाळीं फार मौज झाली. घरीं येतांना अंगा-

वर बसलेला काजवा हातरुमालांत घालून तात्यांनीं आणला, आणि निजण्याच्या खोलींत टेबलाच्या खुराला बांधून ठेवला. अंधारांत रात्रभर तो चमचम प्रकाशत होता. त्याची फार गंमत वाटली.

सकाळीं तात्या हिराबाग क्लबांत बिलीयर्ड खेळायला जात. केव्हां केव्हां आम्हां लहान मुलांना ते बरोबर नेत. पहांटे धुकें पडलेले असे आणि भिकारदासचा मारुती ओलांडला कीं, दुतर्फा पेरू वगैरे फळझाडाच्या बागा असत. त्यांतलीं फुलें व दवणा यांचा घमघमाट सुटलेला असे. तात्या हिराबाग क्लबचे सभासद असल्यानें घरीं स्ट्रँड पिअरसन वगैरे मासिकें येत. त्यांत उत्तमोत्तम चित्रें असत.

ज्या घरांत आम्ही राहात होतों तें घर अगदीं प्रशस्त असून घरांत माणसेंहि पुष्कळ होतीं. आजोबा आजी असत. थोरले चुलते नाना व दुसरे चुलते अप्पासाहेब सहकुटुंब येत. भूगोलकर्ते कै. रामभाऊ गोखले यांचा संसार समाईकीनें तात्यांच्याच संसारांत होता, यामुळें ते आप्त वाटत. प्रि. गंगाधर निळकंठ गोखले यांची व माझी लहानपणापासून ओळख. आमच्या घराशीं त्यांचा ऋणानुबंध त्या वेळीं जडला तो अखेरपर्यंत. त्यांना आम्ही 'गोखले तात्या' म्हणत असूं. तात्या केसरी ऑफिसांत असल्यामुळें शेंकडों माणसांची घरांत ये–जा असे. आणि घर नेहमीं गजबजलेलें होतें. तात्यांचें हें 'सार्वजनिकत्व' माझ्या आठवणीच्या पहिल्या दिवसापासून तों त्यांच्या मृत्यूपर्यंत मी अखंड पाहिलेलें आहे. त्या वेळेपासून माझी त्यांचेवर भक्ति जडली. त्यांच्याजवळ बसणें उठणें मला आवडे.

ताई पुष्कळदां म्हणे "बापू तात्यांचा आवडता आहे." तें कदाचित खरें असेल. लहानपणीं मी चांगला स्वच्छ व बाळसेदार होतो. व माडीवर तात्यांचेकडे जातांना ताई-कडून मुद्दाम नाकतोंड स्वच्छ पुसून घेऊन जात असें. तात्यांची बैठक तिसऱ्या मजल्यावर होती. आणि जिन्याच्या पायऱ्या माझ्या वयाला थोड्या उंच होत्या. त्या एकेक चढत मी दुसऱ्या मजल्यावर आलों कीं तात्यांना हांक मारी. मला येतांना पाहून जिन्याचे वरच्या तिठ्यावर ते उभे राहात. मग माझी स्वारी जिना चढून त्यांचे खोलींत जाई. खोलींत तात्यांचेकडे आलेली मंडळी बोलत बसलेली असत. मीहि तेथें जाऊन तात्यांचे जवळ बसत असें.

एका रात्रीं घडलेला प्रसंग आठवतो. खोलींत रामभाऊ गोखले, टिळक पक्षांतील गांधी वकील व आणखी कोणी एक गृहस्थ यांचे तात्यांशीं बोलणें होत होतें. तात्यांना खोटें भाषण किंवा आचरण अगदीं आवडत नसे. तात्यांच्या तें चटकन् लक्षांत येई. कशासंबंधीं बोलणें चाललें होते तें मला कळलें नाहीं. मी तें लक्षपूर्वक ऐकत होतो. थोड्याच वेळांत तात्यांचा स्वर चढला, आणि कठोर मुद्रेनें जिन्याकडे हात करून "तुम्ही चालते व्हा!" असें स्पष्ट शब्दांनीं त्या गृहस्थाला त्यांनीं सुनावलें. नंतर एक क्षणभरच गेला असेल; तो गृहस्थ आंवढा गिळून मुकाट्यानें जिना उतरून

चालता झाला. तात्या निस्पृह असल्यामुळें त्यांचा शब्द तरवारीच्या धारेसारखा असे. त्यांचा स्वर चढला कीं, त्यांच्या पुढें बोलण्याची किंवा उभें राहण्याची कोणाचीहि प्राज्ञा नव्हती !

आणखी एका गोष्टीचा उल्लेख करतों. कारण ती गोष्ट सांगितल्याशिवाय लक्षांत येणार नाहीं. माझा जन्म झाला तेव्हां तात्या २८ वर्षांचे होते. आणि जेथून मला आठवण आहे त्यावेळीं ते एकतीस किंवा बत्तीस वर्षांचे असतील. ताई सुमारें २७ वर्षांची म्हणजे तरुणच. त्या दोघांचे तरुणपणचें रूप माझ्या स्मरणांत भरून राहिलें आहे ! अनेकांनीं त्यांना पुढें पाहिले असेल. पण मीं त्यांचे ज्वानीमधलें रूप पाहिलें आहे. लवलवित पट्ट्याच्या पात्याप्रमाणें तात्यांच्या हालचाली दिसत व चेहऱ्यावर उमदेपणा होता. ताई साक्षात् लक्ष्मीप्रमाणें दिसे, आणि तिच्या डोळ्यांत नेहमीं नंदादीपाप्रमाणें स्निग्ध तेज स्रवत असल्याचा भास होई.

प्रि. गोळ्यांचे घरांत आम्ही राहावयास येण्यापूर्वीं ना. गोखले तेथें राहात असें ऐकिवांत होतें. आमच्या शेजारीं त्याच वाड्यांत प्रोफेसर वासुदेवराव पटवर्धन बिऱ्हाडानें राहात असत. त्यांची मुलगी दुर्गा ही खेळण्यांत माझी बालमैत्रीण होती. ना. गोखले व प्रो. पटवर्धन दोघेहि नेमस्त. पण जहाल व नेमस्त हे वाद त्या वेळीं विकोपाला गेलेले नव्हते. यामुळें उभय पक्षांत कित्येकांचे खाजगी स्नेहसंबंधहि असत. तात्यांची नोकरी टिळकांच्या केसरी ऑफिसांत, पण राहणें किंवा शेजार नेमस्तांत, हा एक प्रवाद दोनतीन वर्षें तात्यांच्या मागें होता. १९०८ सालच्या टिळकांचे खटल्यानंतर तात्या केसरीचे जाहीर संपादक झाले त्या वेळेपासून पुढें हा प्रवाद नाहींसा झाला.

१९०६ सालीं गोळ्याचें घर सोडून आम्ही सर्वजण गायआळींत सत्तेच्या घरांत राहावयास गेलों; मीही पुढें शाळेंत व नंतर कॉलेजांत जाऊं लागलों. पण त्या हकिगती यथाक्रम पुढें सांगेन.

# ३

# शाळा कॉलेजांतील विश्व

माझ्या लहानपणची आठवण मनांत आली कीं, अनेक सुखमय लहरी मनांत उत्पन्न होतात व कांहीं काळ त्यांच्या सुवासानें मन भरून जातें. आमच्या घरीं एक पारिजातकाचें झाड होतें. श्रावणाच्या महिन्यांत अगदीं पहांटे त्या झाडाखालीं गेलें म्हणजे मोठी गंमत दिसे. झाडाचीं पानें आणि फुलें तर पावसाच्या पाण्यानें ओलीं होऊन निथळतच असत; पण एकेक फूल जणूं कांहीं क्रमानें टप टप असें हलक्या गतीनें खालीं पडतांना दिसे. काय त्या फुलांचा सुवास आणि नाजुकपणा! त्या दरवळणाऱ्या सुवासानें मन अगदीं भरून जाई. लहानपणची आठवण त्या पारिजातक कुसुमाच्या सुवासाइतकीच मला सुखमय वाटते. त्यांत गुलाबाचें ऐश्वर्य नव्हतें, पण पारिजातकाचा पवित्रपणा त्या गरीब जीवनांत खचित होता.

माझ्या सर्व आयुष्यांत दुःख असें मीं भोगलेंच नाहीं. मातापितरांचें छत्र ज्यांना दीर्घकाळ लाभतें अशा थोड्या भाग्यवान माणसांपैकीं मीहि एक आहें. ऊन, वारा,

पाऊस, वादळें या सर्वांचा भर त्या छत्रावर पडतो. पण त्याखालीं असणाराला मात्र सुखाची सावली लाभते. या एका गोष्टीची किंमत किती मोठी आहे तें मी शब्दांनीं सांगूं इच्छित नाहीं. पुष्कळांना तें मनानें कळण्यासारखें आहे! आम्हीं मध्यम स्थितीं-तील माणसें आहों. 'मध्यम स्थितींतील' म्हणजे ज्यांची गरिबीची आठवण विसरली नाहीं आणि श्रीमंतीची कोणतीहि संवय ज्यांना लागली नाहीं अशी! सुख पुष्कळदां मनावर, म्हणजे मानण्यावर अवलंबून असतें. १८९६ पासून १९१६ साला-पर्यंत ती. तात्यांना अवघा शंभर रुपये पगार होता. श्री. खाडिलकर, शिवरामपंत परांजपे, भोपटकर, दामले हीं जीं वृत्तव्यवसायांत पुढें मोठें नांव झालेलीं माणसें, त्यांचीं सांपत्तिक स्थिति त्या वेळीं जवळपास अशीच म्हणजे गरिबीची होती असें म्हटलें तरी चालेल. पण याचा वचपा कीर्तीनें व सार्वजनिक लोकप्रियतेनें भरून निघाला होता. लो. टिळकांच्या वर्तमानपत्राशीं म्हणजे केसरीशीं आमच्या घराचा माझ्या जन्मापूर्वी-पासून ऋणानुबंध जडला होता; त्याचा जो लौकिक बाहेर कानांवर येई तीच आमची श्रीमंती होती. सुख हें मनावर आहे, मानण्यावर अवलंबून आहे हें जें मीं वर म्हटलें तें याच अर्थानें. ती. तात्यांची आई (तिला आम्ही सर्व आईच म्हणत होतों) तर समाधानाचें मूर्तिमंत प्रतीकच होती. देवासमोर उजळून ठेवलेलें नीरांजनच म्हणाना! तिच्या थोर चारित्र्याचा आणि तात्यांच्या साधेपणाचा आमच्या घरांतील सर्वांवर इतका ठसा उमटला आहे कीं, संपत्तीनें सुखी होणारें मानसिक जीवन कोणांत उत्पन्नच झालें नाहीं. अनृणी राहून आयुष्य घालविणें ही श्रीमंतीपेक्षांहि अधिक मौल्यवान् संपत्ति आहे ही गोष्ट कांहींना कळेल, सर्वांनाच कळणार नाहीं. अशा घरांत मी वाढल्या-मुळें माझ्यावर हा संस्कार आपोआप झाला.

मी शाळा–कॉलेजांत असतां मला जी शिक्षक मंडळी भेटली त्यांपैकीं कांहींचें अजून मला स्मरण होतें. कारण केवळ व्यवसायापेक्षां त्यांनीं आपलें अंतःकरणहि त्या शिक्षणांत ओतलें होतें. पैकीं मराठी शाळेंत आनंदकर्ते वासुदेव गोविंद आपटे. यांचा मुलांबद्दल जिव्हाळा फार होता. आनंद मासिकांत माझा पहिला लेख प्रसिद्ध करून त्यांनीं मला उत्तेजन दिलें. — "आपल्या देशाचा जर आपणांला उद्धार करावयाचा असेल तर तरुण पिढीचें, बालकांचें शिक्षण आपण प्रथम हातीं घ्यावयास पाहिजे" असें 'दुःखा-अंतीं सुख' या कादंबरींत जें एक वाक्य आहे तें त्यांचें ठाम मत होतें. व तेंच त्यांनीं ध्येय किंवा जीवितकार्य मानलें. आनंद मासिक त्याच उद्देशानें काढलें होतें. त्यांच्याइतकी सोपी, शुद्ध बालबोध मराठी भाषा लिहिणारा लेखक मीं पाहिला नाहीं. बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्यांचें भाषांतर त्यांनीं इतकें सुंदर व साक्षेपीपणानें केलें आहे कीं, त्यांतला एक शब्दहि इकडचा तिकडे करतां येणार नाहीं. या कादंबऱ्यांमध्यें जें अपूर्व सौंदर्य माझ्या दृष्टीस पडलें त्यानें मी अगदीं मोहित झालों. बंकिमचंद्रांच्या चारहि खंडांचीं मीं जवळ-जवळ तीसपस्तीस वेळां पुनः पुनः वाचून पारायणें केलीं आहेत. आयुष्याच्या

अखेरीस केव्हां तरी रस्त्यांत त्यांची माझी गांठ पडली, तेव्हां ही गोष्ट मीं त्यांना मुद्दाम सांगितली, तेव्हां त्यांना फार समाधान वाटलें !

गडकरी मास्तर ( गोविंदाग्रज ) आमचे घरीं नित्य येत. त्यांना माझें कौतुक वाटत असे. त्यांनींच माझी शाळा बदलून न्यू इंग्लिश स्कूलमध्यें जाण्याची मला प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांत ते फार प्रिय असत. चंद्राभोंवतीं जसें तारांगण तसें त्यांच्याभोंवतीं विद्यार्थ्यांचें कडें सदैव असे. आपण शिक्षक, हीं मुलें, हा भेदच त्यांच्यापाशीं नसे; इतके मुलांशीं थट्टा-विनोद करतांना ते समरस होऊन जात. इतकें उमदें अंतःकरण असणारा मनुष्य लोकप्रिय कां होणार नाहीं ? एकदां एका गॅदरिंगमध्यें त्यांनीं पाहिलें कीं, मी बन्याबापू कमतनूरकर यांचेशीं बोलत नाहीं. मला जवळ घेऊन त्यांनीं कारण विचारलें, तेव्हां मी म्हटलें, "मी नाहीं त्यांच्याशीं बोलणार ! त्यांना दुसऱ्याची टवाळी करावयास हवी असते !" तेव्हां गडकरी यांनीं माझी समजूत करून म्हटलें -- "अरे, तुझा बाप देशांतल्या समेटाकरितां इतकी खटपट करितो तर तुम्ही दोघे असें भांडतां काय ?"

गडकरी स्वतः सुधारक पक्षाचे होते, पण लो. टिळकांबद्दल त्यांना नुसता आदरच नव्हे तर अभिमान वाटे. एकदां मी त्यांच्या घरीं गेलों असतां त्यांनीं केलेली विनोदी कोटी मला आठवते. गोष्टी अशा निघाल्या कीं, टिळकांना सरकारनें मंडालेच्या तुरुंगांत घातल्यावर राजकीय जीवनांत शुकशुकाट झाला आणि पुणें अगदीं शून्य दिसूं लागलें ! गडकरी यावर म्हणाले, "ज्याला पाहून रस्त्यानें चालतांना हातांतली जळती विडी टाकून द्यावी असें वाटावें असा पुण्यांत आतां एक देखील मनुष्य राहिला नाहीं !" गडकरी जगते तर बायरन किंवा ऑस्कर वाईल्डप्रमाणें त्यांनीं वाङ्मयांत अमोलिक भर घातली असती. पण दुर्दैवानें त्यांचें आयुष्यहि ऑस्कर वाइल्डच्याच वळणावर गेलें. "जोंपर्यंत जगण्यासारखें अंगीं कांहीं आहे तोंपर्यंतच मरण्यांत मौज आहे" असे ते म्हणत, व तें त्यांच्या अकालीं मरणानें खरें झालें. गडकरी ही एक लक्षांत राहण्यासारखी व्यक्ति होऊन गेली यांत संशय नाहीं.

लो. टिळक १९०८ सालीं तुरुंगांत गेले त्या वेळीं माझें वय सारें ७/८ वर्षांचें असेल. पण भोंवतालच्या कितीतरी गोष्टींचा मनावर परिणाम होत होता. 'शिक्षण' हा फक्त तीन अक्षरी शब्द आहे, पण शाळेव्यतिरिक्त घरांत, समाजांत, व्याख्यानांत, वर्तमानपत्रांत, मित्रपरिवारांत मनुष्याचें शिक्षण सतत चालू असतें. निरनिराळे संस्कार मनावर होत असतात. सुरतेच्या काँग्रेसमध्यें नेमस्त-जहाल हा तंटा विकोपाला गेला होता, आणि टिळकांना राजद्रोहाबद्दल शिक्षा झाली तेव्हां साऱ्या देशावर अशनिपात घडल्याप्रमाणें आघात झाला. गायकवाडवाड्यांत गणपत्युत्सवांत मेळे होत. त्यांत सन्मित्र-समाज मेळ्याचें "बाळ लाडका, तुम्हीं पाहिलांत का ?" हें पद बहुजनसमाजाचें दुःख बरोबर व्यक्त करणारें होतें. पण मेळ्याचीं पदें हें बोलून चालून अशिक्षित लोकसमाजाचें वाङ्मय.

त्यांत ना. गोखल्यांची निंदानालस्तीहि असे. हिंदुपंच हें त्या वेळीं संदेशाच्या थाटाचें वर्तमानपत्र होतें. त्यांत ना गोखल्यांसंबंधानें व्यंगचित्रें आणि चुरचुरीत टीका प्रसिद्ध होई. अखेर गोखल्यांनीं जेव्हां ' हिंदुपंचा 'वर बदनामीची फिर्याद केली तेव्हां या व्यक्तिनिंदेला आळा पडला !

या वादाचे पडसाद आम्हां मुलांच्या जीवनांतहि न येणें अशक्य होतें. हल्लीं ज्याप्रमाणें टिळक मोठे कीं महात्मा गांधी मोठे हा वाद कांहींजण करतात, त्याप्रमाणें टिळक मोठे कीं गोखले मोठे हा वाद आम्हा मुलांत त्या वेळीं कसून होत असे. टिळक म्हणजे हायकोर्टांत निर्भय रीतीनें बोलणारे आणि देशाकरितां तुरुंगांत जाणारे. याचे उलट गोखले म्हणजे कोणत्या झाडाचा पाला ! हें आमच्यांतलें उत्तर ठरलेलेंच असे; पण निर्णय होत नसे. आमची पोरबुद्धि ती केवढी, त्यांत टिळक–गोखल्यांच्या वादाचा निर्णय कसा लागेल ? आमचा वाद एखादेवेळ जातां येतां तात्यांच्या कानांवर जात असे. ते हंसून पुढें जात पण त्यांत आपण होऊन भाग घेत नसत. एक दिवस मुद्दाम ठरवून हा प्रश्न मीं त्यांना विचारला तेव्हां ते म्हणाले, " नुसत्या टिळक मोठे कीं गोखले मोठे या प्रश्नाचें काय उत्तर द्यावें ? टिळक किंवा गोखले हे दुसऱ्यापेक्षां कोणत्या बाबतींत मोठे ? असा प्रश्न विचारला पाहिजे. विद्वत्तेंत मोठे, कीं देशभक्तींत मोठे, कीं स्वार्थत्यागात मोठे, अशा एकेरी गुणाबद्दल प्रश्न केला तर कांहींतरी उत्तर देतां येईल ! " या उत्तरानें मी कुंठित झालों. कारण ना. गोखल्यांसंबंधीं मला काहीं माहितीच नव्हती. तेव्हां तेच आपण होऊन म्हणाले " असा वाद करूं नये. आपणाला जें समजेल किंवा घेतां येईल त्या दृष्टीनें मनुष्याकडे पाहावें. नुसता अभ्यास ही एक गोष्ट घेतली तर ना. गोखल्यांनीं आपल्या विषयाचा इतका सशास्त्र व सांगोपांग अभ्यास केला होता कीं, तितका अभ्यास करण्याला सामान्य मनुष्याला एक जन्म कांहीं पुरणार नाहीं ! " असें एखादेंच पण विचारी मनुष्याला वळणावर आणणारें वाक्य ते बोलत.

कांहीं दिवसांपूर्वीं मुंबईच्या एका साप्ताहिकांत वाचकांच्या उत्तरासाठीं एक प्रश्न असा दिला होता कीं, " समजा, एका नावेंत रवींद्रनाथ टागोर, सुभाषचंद्र बोस, रामन्, सैगल, देविकाराणी, व शांता आपटे या आहेत. आणि ही नांव आतां दुर्दैवानें बुडावयाची आहे. तर यांपैकीं तुम्ही कोणाला वर उचलून घ्याल ? " वर्तमानपत्राचे वाचक किंवा सुबुद्ध म्हणविणारे लेखक आणि लहानपणीं टिळक–गोखल्यांचा वाद करणारीं आम्हीं मुलें यांत फारसें अंतर नाहीं हें यावरून वाचकांना दिसेलच.

बुद्धीचा हा अप्रबुद्धपणा सोडला तरी, जें उत्कट, भव्य, क्रांतिकारक तें तरुण वयांत भावनेला आवडत असे. यांत गैर कांहीं नाहीं. तरुणपणीं सर्वजण असेच असतात. कालांतरानें त्यांचेमधील अविचार निघून जातो, पण त्यांची देशभक्ति पुढें राष्ट्राच्या उपयोगी पडावयाची असते, म्हणून तरुण फिदीबर आपण प्रेमच केलें

पाहिजे. ही भावना ज्या अध्यापकांच्या हृदयांत वागत होती अशीं कित्येक उदारचरित माणसें मला शाळा–कॉलेजच्या आवारांत भेटली. कीर्ति, संपत्ति किंवा प्रसिद्धि यांपैकीं कांहीं एक लाभण्यासारखें नसतांना केवळ कर्तव्यबुद्धीनें या शिक्षकांनीं काम केलें हा त्यांचा मी विशेष गुण मानतों. न्यू इंग्लिश स्कुलांतील, तसेंच फर्ग्युसन कॉलेजांतील अनेक अध्यापकांच्या चरित्र्याचा व विचारांचा माझ्यावर संस्कार झाला आहे; आणि माझ्या मनांत आज जर कांहीं सुविचार असला तर, ज्या अनेक शिक्षकांनीं एखादें शेत नांगरावें त्याप्रमाणें कष्ट करून आम्हां विद्यार्थ्यांची मनोभूमि उलथी पालथी करून ती सुपीक केली त्यानांच त्याचें श्रेय दिलें पाहिजे.

आमच्या वेळीं कै. प्रोफेसर नाईक शाळेचे सुपरिंटेंडेंट होते. त्यांच्याइतका विद्याविनयसंपन्न आणि गोडव्या स्वभावाचा मनुष्य दत्तोपंत आपटे यांचेखेरीज मीं पाहिलाच नाहीं. त्यांच्या स्वभावांत शिस्तीचा करडेपणा बिलकूल नव्हता. पण एकाहि विद्यार्थ्यानें त्यांची कधीं अवज्ञा वा अवमान केला असें घडलें नाहीं. उलट त्यांचीं कांहीं विलक्षण छाप सर्व विद्यार्थीवर्गावर असे. त्यांचा आवाज बारीक पण अत्यंत सुस्वर असल्यानें मोठ्या सभांतून त्यांचें भाषण ऐकण्यालाहि पंचाईत पडत नसे. त्यांच्या सुस्वर आवाजांत गायकाच्या कंठाचेंच नादमाधुर्य होतें ! नामदार गोखले वारले त्या वेळी नानावाड्याच्या चौकांत सर्व विद्यार्थ्यांपुढें त्यांनीं भाषण केलें. तो प्रसंग मला अजूनहि आठवतो. शेंकडो विद्यार्थ्यांनीं चौक व वरील गॅलऱ्या गजबजलेल्या असतां, प्रोफेसर नाइकांच्या भाषणाच्या वेळी इतकी विलक्षण शांतता होती कीं, कोठें एखादी टांचणी पडली तरी तिचा आवाज ऐकूं येईल! त्या सभेंत त्यांनीं गोखल्यांच्या कामगिरीचें आणि त्यांच्या मृत्यूमुळें झालेल्या हानीचें जड व गहिंवरलेल्या अंतःकरणानें समर्पक वर्णन केलें. त्या वेळीं गोखल्यांचें मोठेपण कळण्याजोगें आमचें वय नव्हतें व आम्ही त्यांना विशेष पाहिलेलेंहि नव्हतें. पण त्या प्रसंगामुळें अप्रत्यक्ष रीतीनें गोखल्यांचें मोठेंपण माझ्या मनावर चांगलें बिंबलें.

दुसरा असाच प्रसंग सरोजिनी नायडू यांच्या व्याख्यानाचा. न्यू इंग्लिश स्कुलांत एक आणि फर्ग्युसन कॉलेजांत एक अशीं त्यांचीं दोन व्याख्यानें झालीं. त्यावेळींहि बाईनीं गोखल्यांचें वर्णन अतिशय तन्मयतेनें व काव्यमय भाषेनें केलें. हजारों श्रोत्यांनीं थिएटर अगदीं चिकार भरलें होतें. आणि बाईची नादवती वाणी, तरुण वय आणि चेहेऱ्यावरचा सच्चेपणा यांनीं सर्वांना मंत्रमुग्ध केलें होतें. प्रो. वासुदेवराव पटवर्धन तर कानावर एक हात ठेवून तन्मयतेनें तें व्याख्यान ऐकत अगदीं नागासारखे डोलत होते. वक्तृत्व म्हणजे काय हें त्या दिवशीं आमच्या प्रत्ययाला आलें !

शाळेंतल्या शिक्षकांपैकीं कृष्णाजीपंत किनरे मास्तर मराठी चांगलें शिकवीत. कै. ओक मास्तरांची संस्कृत शिकविण्याची पद्धति मोठी रसाळ होती. त्यांचा गोड आवाज मला अजून आठवतो. सहज शिकवितांना ते संस्कृत कविताहि करीत. प्रा. माटे हे

इंग्रजी शिकवीत. पण त्याबरोबर किती तरी विद्यार्थ्यांना त्यांनीं चारित्र्य व देशाभिमान स्वतःच्या उदाहरणानें शिकविला असेल. अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीचा कॉंग्रेस-मध्यें उदयहि झाला नव्हता अशा वेळी स्वतः पदरमोड करून अस्पृश्यांच्या चाळीस शाळा त्यांनीं चालविल्या होत्या, व त्याहि सर्व विद्यार्थी स्वयंसेवकांच्या बळावर. त्यांचें शिकविणेंहि असें मार्मिक असें कीं, एकाद्याचे मनावर त्याचा जन्मभर परिणाम व्हावा.

याचें एकच उदाहरण सांगतों. १९१९ सालीं पहिलें जर्मनयुद्ध झालें त्यासंबंधींचें एक पुस्तक आमच्या वेळीं मॅट्रिकच्या परीक्षेस होतें. जागतिक युद्धाच्या हालचाली व वर्णनें माटे अत्यंत मनोवेधक रीतीनें सांगत. कांहीं विद्यार्थ्यांचें लक्ष परीक्षेला विशेष कोणते प्रश्न येतील यावर असे. पण माटे यांनीं सांगितलें कीं, " अभ्यास करण्याची ही रीतच नव्हे. जें पुस्तक तुम्हांला नेमलें आहे तें सर्व रीतींनीं अगदीं अथपासून इतिपर्यंत तुम्हांला माहीत पाहिजे. परीक्षकानें त्यांतलें काय विचारावें याची कधीं तुम्हाला चिंताच वाटूं नये. परीक्षकांनें विद्यार्थ्याला हवा तो प्रश्न खुशाल विचारावा, इतकी छातीठोक ज्याची तयारी असेल त्याचा अभ्यास खरा ! याबद्दल जर्मन सेनापति व्हॉन हिंडेनबर्ग याची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. १८७० च्या युद्धाच्या वेळीं हिंडेन-बर्ग जर्मन लष्करांत होता. पुढें यथाक्रम तो सेवानिवृत्त झाला. पण रिकाम्या वेळेचा उद्योग म्हणून त्यानें जर्मनी व पोलंड यांचेमधील दलदलीच्या सर्व प्रदेशाचा युद्धशास्त्र-दृष्ट्या सूक्ष्म अभ्यास केला होता. इतका कीं, या सर्व प्रदेशांतील प्रत्येक तसूनतसू जागाहि त्याच्या स्पष्ट डोळ्यांसमोर होती. कोणीं त्याला विचारलें कीं, पेन्शन घेतल्याबर आतां हा उद्योग कशाला करतां ? यावर हिंडेनबर्ग हंसून म्हणे कीं, " मनुष्यानें नेहमीं कसला करी अभ्यास करीत असावें. कोणताहि अभ्यास कधीं फुकट जात नाहीं. आप-ल्याला नाहीं तरी दुसऱ्याला त्याचा कदाचित् उपयोग होईल. " आणि खरोखरच त्याप्रमाणें घडून येऊन १९१४ सालचें पहिलें जर्मनयुद्ध सुरू झालें. त्यांत रशियाविरुद्ध सेनापतिपद कैसरनें हिंडेनबर्गलाच दिलें. हिंडेनबर्गला त्याचा वरील अभ्यास या वेळीं फार उपयोगी पडला, आणि पायाखालची जमीन पूर्ण माहीत असल्यामुळें, हिंडेनबर्ग यानें टॅनेनबर्गच्या लढाईत रशियन सेनापतीचा धुव्वा उडविला. ही गोष्ट सांगून प्रा. माटे यांनीं मोठ्या अभिनानानें आम्हांला सांगितलें—

" These are German methods of study " अभ्यास असा करा ! तो जन्मभर उपयोगी पडेल ! या गोष्टीचें तात्पर्य माझ्या मनावर इतकें उत्तम बिंबलें कीं, पुढील आयुष्यांतील माझ्या सर्व अभ्यासाला मीं मुद्दामच तें वळण दिलें. अभ्यासाची ही रीत माझ्या आजवर फार उपयोगी पडली आहे. एखाद्या लहानशाहि गोष्टीनें मनुष्य दुसऱ्याचा जन्मभर गुरु होतो तो असा !

मॅट्रिकनंतर मी कॉलेजांत प्रविष्ट झालों. आयुष्याच्या उंबरठ्यावर भावी जीवनाचीं

सुखस्वप्नें आणि महत्वाकांक्षा यांचा मनांत उदय झाल्यावर कॉलेजमधील विद्यार्थ्यांस काय वाटत असतें याचा अनुभव प्रत्येक विद्यार्थ्यांस आहेच, म्हणून माझ्या कॉलेज-मधील जीवनाचें मी विशेष वर्णन करीत नाहीं. थोडक्यांत इतकेंच सांगतों कीं, रेसि-डेन्सीमधील सुखमय जीवन, डिबेटिंगमधील व बाहेरच्या वातावरणांतील राजकीय वाद, प्रोफेसरांचीं लेक्चरें, ऐश्वर्याच्या ऐन शिखरावर असलेली त्या वेळची बालगंधर्वांची रंगभूमि, कॉलेजांत सहशिक्षण घेणाऱ्या त्या विद्यार्थिनी आणि त्यामुळें विद्यार्थ्यांवर पडणारी रोमान्सची छाया, या सर्व गोष्टी इतक्या रम्य व सुखकारक होत्या कीं, कोणा-सहि आज वाटावें कीं, आमच्या आयुष्यांतील सर्वांत सुखाचा काळ तोच होता! त्याहि वेळेला विद्यार्थी आणि कॉलेजचे अधिकारी यांचेमध्यें राजकीय मताचे वाद होते. पण प्रिन्सिपॉल परांजपे हे नेमस्त असूनहि त्यांच्या योग्यतेबद्दल विद्यार्थ्यांस इतका आदर आणि वचक होता कीं, केवळ नेमस्त मतांकरितां परांजपे यांचा कोणी अपमान केला असें घडलें नाहीं. विद्यार्थ्यांना ते इतके प्रिय असत कीं अनेक क्लब त्यांना जेवणांचें आमंत्रण देत. त्यांत कांहीं विद्यार्थी श्लोक म्हणून थट्टेनें शेवटीं "सीताकांतस्मरण जय-जय राम" असेंहि म्हणत! रँगलर परांजपे खऱ्या शिक्षणप्रेमानें प्रिन्सिपॉल झाले आणि १९२३ सालीं मुंबई कौन्सिलची दिवाणगिरी त्यांनीं घेतली तरी ती सोडल्यावर पुन: तें प्रिन्सिपॉल झाले! न्या. रानडे व गोखले यांच्या परंपरेंत शोभणारे ते खरे 'लिबरल' होते असें मी स्वानुभवावरून म्हणतो.

प्रिन्सिपॉल परांजपे हे अगदी उघड्या मनोवृत्तीचे. दोन द्यावेत, दोन घ्यावेत अशा स्वभावाचे होते. त्यांत कपट म्हणून नव्हतें. एकदां जवाहरलाल यांचे वडील पंडित मोतीलाल नेहरू कॉलेजमध्यें व्याख्यानाकरितां आले असतां अध्यक्ष प्रि. परांजपे होते. पाहुणा म्हणून बोलाविलेल्या व्यक्तीनें कॉलेजच्या प्रिन्सिपॉलवरच टीका कर-ण्याची काय जरूरी होती? पण सहज जाताना थोडें आडवाटेंत शिरून पंडितजी म्हणाले कीं, कांहीं व्यक्तीना आज प्रिन्सिपॉल तर उद्यां शिक्षणमंत्री, परवां पुन: कॉलेजचे प्रिन्सिपॉल, अशी आयुष्यांत स्थित्यंतरें करतांना कांहींच वाटत नाहीं! यावर अप्पा-साहेब परांजपे यांनीं पंडितजींचा अहेर त्यांना परत करून म्हटलें कीं, मलाहि दुसऱ्या अशा व्यक्तींचीं उदाहरणें माहीत आहेत कीं, अमृतसर कॉंग्रेसपूर्वी ते नेमस्तपक्षांत होते, लगेच दुसऱ्या टोंकाला जाऊन ते कौन्सिलबहिष्कारवादी झाले; आणि फिरून पावलें फिरवून त्यांनीं कौन्सिलें काबीज केलीं! माझें आयुष्य बदललें असलें तरी मीं निदान मतें तरी बदललीं नाहींत!! असो. अशा आठवणी अनेकांना अनेक सांगतां येतील म्हणून मी त्या अधिक वाढवीत नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ......३६२१५...... वि: ......चारेग......
क्रमांक ......२२७८...... नों: दि: ..९/५/६४..

## ४

# मी पाहिलेली रंगभूमी !

माझ्या आयुष्यांत लहानपणीं मीं भोगलेल्या सुखांत, मीं पाहिलेली रंगभूमि आणि ऐकलेलें गायन यांना मी पहिलें स्थान देईन. मग सुखाची माझी व्याख्या 'काव्यात्म' आहे असें वाटल्यास म्हणा. निःशब्द भावनेला सजीव करणारें, आणि अंतरात्म्याचा ठाव घेणारें संगीतावांचून दुसरें काय असू शकेल? मनुष्याचें मन ही एक सारंगी आहे. कोठेंहि दूर सुस्वर आलाप निघाला कीं त्या वीणेंत तत्काल संवादी अनुरणन झाल्याशिवाय राहणार नाहीं. मात्र कल्पकतेनें ती सारंगी नीट लावतां आली पाहिजे. काव्य, नाट्य, गायन, शिल्पकला यांनीं मनुष्यजीवनाला सौंदर्यदृष्टि प्राप्त होते. उज्ज्वल देशभक्तीकरितां केलेला स्वार्थत्याग हेंहि एक सौंदर्यच आहे. पण त्याबद्दल दुसऱ्या एखाद्या वेळीं लिहीन.

किर्लोस्करांचें 'शाकुंतल' हें मीं पहिलें नाटक पाहिलें, तेव्हां मी सहासात वर्षांचा असेन. तेव्हांपासून पुढें पंचवीस वर्षांत जीं नाटकें मीं पाहिलीं त्यावरून मराठी रंगभूमीचा ऐन उत्कर्षाचा काळ मीं

पाहिला असें म्हणतां येईल. १९०६ सालीं किर्लोस्कर मंडळीनें पुण्यांत स्वतःचें भव्य नाटकगृह नुकतेंच बांधलें होतें, त्याचा अनावरणसमारंभ 'मूकनायक' नाटकानें मोठ्या थाटांत झाला. मीं पाहिलेलें 'शाकुंतल' दुसऱ्याच दिवशीं होतें. स्टेजच्या थोडें वर कै. अण्णासाहेब किर्लोस्करांचें तैलचित्र हार घालून ठेवलें होतें. चित्राखालीं आळित्यासारख्या सुरेख लाल शाईनें एक संस्कृत श्लोक लिहिला होता—

प्रज्ञाविघृष्ट प्रतिभा—
मणिदीपप्रकाशितं ।
संसारालेख्य भांडारं
पश्येदं रंगमंदिरम् ॥

ती. तात्यासाहेबांनीं स्वतः हा श्लोक रचलेला होता. किर्लोस्कर नाटकगृहाच्या डोक्यावर हा श्लोक आजहि विराजमान आहे हें सांगितलें म्हणजे, किर्लोस्कर नाटक-मंडळीचे व आमच्या घराचे ऋणानुबंध कसे काय होते हें वेगळें सांगावयाचें कारण नाहीं.

मीं 'शाकुंतल' नाटक पाहिलें तेव्हां बालगंधर्वांचें वय सारें १८।१९ असेल. त्या कोंवळ्या पोरसवदा वयाला स्त्रीपार्ट फारच शोभून दिसे. अंगकांति गौर, गळा सुरेल व आर्जवी, रूपाबद्दल प्रश्नच नाहीं, अभिनयांत सहजपणा व गातांना अंगविक्षेपाची खोड मुळींच नाहीं, इत्यादि अनेक गुणविशेषांमुळें या पहिल्याच प्रयोगांत बालगंधर्वांची जी छाप पुणेंकरांवर पडली ती कायमची. 'शाकुंतला'च्या पांचव्या अंकांत दुष्यंत विस्मरणानें 'शकुंतले'चा अव्हेर करितो त्या वेळीं, दुःख, लज्जा व संताप व्यक्त करितांना आरक्त झालेला चेहेरा, लोकापवादाच्या भीतीनें स्त्रीच्या तोंडावर येणारें काहूर आणि वाटणारा त्वेष हीं गंधर्वानें इतकीं सुरेख व्यक्त केलीं कीं, हा एक उत्तम जन्मसिद्ध नट आहे, याबद्दल त्यानें लोकांची खात्रीच पटविली. त्या वेळचा शकुंतलेचा तो आरक्त चेहेरा मला आजहि आठवतो !

तीस वर्षांपूर्वी नाट्यसंस्था उत्तम जोमांत होती. अनेक नाटक मंडळ्यांचे चालक, नट व नाटककार यांचा ती. तात्यांशीं ऋणानुबंध फार चांगल्या प्रकारचा होता. 'केसरी' 'ज्ञानप्रकाश' यांतून त्या वेळीं नाटकांची जितकीं मार्मिक परीक्षणें होत तितकीं आतांहि होत नाहींत. त्या वेळीं राजकारणच देशांत थोडें होतें म्हणून वाङ्मयविषयाला साहजिक अधिक अवसर मिळे. टिळकांना स्वतःला ललितकलेची आवड फारशी नव्हती, पण भिन्न रुचींच्या आणि भिन्न प्रकृतींच्या अनेक लोकांचें नाट्य हेंच एक मनोरंजनाचें साधन आहे हें 'लोकमान्य' टिळकांना अवगत कसें नसेल? अण्णासाहेब किर्लोस्करांनीं किर्लोस्कर कंपनी काढली तिच्या अगदीं पहिल्या प्रसिद्धीपत्रकावर आगरकरांप्रमाणें लो. टिळकांनींहि सही केली होती, आणि अनेक वेळेला सल्लामसलतीनें, हजर राहून किंवा वेळीं पैशाचीहि मदत करून नाट्यकलेला त्यांनीं सहाय्य केलें. भाऊराव कोल्हटकरांच्या मृत्यूनंतर, नारायणराव जोगळेकर आणि बालगंधर्व हें टिळकांच्याच

प्रेरणेनें किर्लोस्कर कंपनींत आले. टिळकांनीं ठेवलेला हा सक्रिय ऋणानुबंध सहजच तात्या 'केसरी' चे संपादक असतां पुढे चालू राहिला. मला आठवतें कीं, लहानपणीं किर्लोस्कर कंपनी पुण्यांत असतां वर्षांतून एखादे वेळ सर्व नट, मालक, चालक वगैरेंना आमच्या घरीं जेवणाचें आमंत्रण असे. नंतर गप्पागोष्टी, हास्यविनोद, गाणें वगैरेहि होई. कोल्हटकर किंवा गडकरी या घरगुती कार्यक्रमास कित्येकदां हजर असल्यामुळें फार मौज येत असे. असा हा ऋणानुबंध किर्लोस्कर मंडळीच्या अखेरपर्यंत टिकला. "तात्यासाहेब हे आमच्या कंपनीचे सूत्रचालक आहेत" असें कै. शंकरराव मुजूमदार अभिमानानें म्हणत. अखेर जेव्हां कंपनी मोडली तेव्हां तडजोडीची शेवटची बैठक आमच्या घरींच झाली होती.

भारत नाटक मंडळी, चित्ताकर्षक, लोकमान्य, बलवंत, राजापुरकर, ललितकलादर्श या पांच कंपन्या तात्यांनीं लिहिलेलीं नाटकें करीत. 'तोतयाच्या बंडा' मध्यें पोतनीस पार्वतीबाईची भूमिका आणि नानबा गोखले हे नाना फडणिसाचें काम अप्रतिम करीत. इतर नाटकेंहि चांगलीं होत.

तात्यांच्या सहा नाटकांत 'तोतयाचें बंड' व 'कृष्णार्जुन-युद्ध' हींच रंगभूमीवर टिकलीं. एक शोकान्त व दुसरें आनंदपर्यवसायी असलें तरी दोन्ही नाटकांत भावनेपेक्षां बुद्धिप्रधानता अधिक. पार्वतीबाई व अमला दोघी दुःखीकष्टी; पण आपणांभोंवतीं जो समाज आहे त्याची सदैव जाणीव ठेवून आपला मार्ग काढला पाहिजे हें विवेकानें ओळखणाऱ्या म्हणजे बुद्धिप्रधानच. संसारांतल्या या अतिशय नाजूक परिस्थितींत हरघडी मोठ्या दक्षतेनें वागून, पेशव्यांच्या घराण्याच्या अब्रूचें संरक्षण करीत असतां, नाना फडणिसांच्या बुद्धिवर दहा वर्षें केवढा ताण पडला असेल त्याची कल्पनाच केली पाहिजे! 'नानावर संकट आलें आहे' अशी हें नाटक लिहितांना तात्यांचे मनांत भावना वावरत होती. 'कृष्णार्जुन युद्धां'त श्रीकृष्ण व अर्जुन हे दोघेहि चित्ररथाचे बाबतींत परस्परविरोधी प्रतिज्ञा केल्यामुळें संकटांत येतात. अर्जुनाशीं लढावें तर मित्रप्रेम आडवें येतें. न लढावें तर क्षत्रियाचे पदरीं प्रतिज्ञाभंगाचा दोष येतो, असा पेंचप्रसंग दाखवून त्यांतूनच मित्रामित्रांचें भांडण, नवरा बायकोचें भांडण, नणंदाजावेचें भांडण अशीं द्वंद्वें निर्माण केलीं आहेत. अर्थात् मित्राला जें मित्रप्रेम वाटतें तें मित्राकरितां नव्हें; तर तो मित्र स्वतःला प्रिय असतो म्हणून, (आत्मनस्तु कामाय) असें या वादाचें तात्त्विक उत्तर नारदाचे तोंडून दिलें आहे. बुद्धिप्रधान खेळकर विनोदाची या सर्व नाटकांत फार मौज आहे. न्या. जयकरांनीं हें नाटक पाहिलें तेव्हां ते फार खूष होऊन गेले.

१९१० ते १९३० या काळांत किती तरी नव्या कंपन्या निघून नवे नट उदयाला आले व त्यांनीं रंगभूमीचा संसार समृद्ध केला. वरेरकरांनीं आपल्या पुस्तकांत त्याचें सुरेख वर्णन केलें आहे. होमरूलच्या चळवळीच्या दिवसांत लोकजीवनाला भरती येत होती व तिनें जणूं कांहीं नाट्यकलेच्या क्षेत्रांतहि प्रवेश केला होता. या काळांत बाल-

गंधर्व, केशवराव भोसले, सरनाईक, टेंबे, तसेंच गणपतराव जोशी, नानबा गोखले, चिंतामणराव कोल्हटकर, दीनानाथ, कामण्णा वगैरे नट-मंडळी विशेष उदयाला आली. याच काळांत विष्णु दिगंबर पलुस्कर यांनीं हिंदुस्थानांत दौरे करून महाराष्ट्र गायकांचें नांव केलें; आणि भास्करबुवा बखले यांनीं कल्पकतेनें उत्तम चिजा व चाली नाट्यसंगीतांत आणून संगीत रंगभूमींत क्रांति केली. केशवराव भोसले, विष्णु दिगंबर पलुस्कर, नारायणराव बालगंधर्व हीं मंडळी सार्वजनिक दानतीनेंहि फार श्रेष्ठ होतीं. अनेक सार्वजनिक कामांना त्यांनीं मदत केली. गंधर्व नाटक मंडळीला नेहमींच कर्ज असे. गंधर्वांच्या चाहत्यांनीं १९१९ सालीं तें कर्ज फेडण्याकरितां दीड लक्षांची पर्स देण्याचें योजलें होतें. पण नारायणरावांनीं ती देणगी घेतली नाहीं आणि कर्ज स्वतःच्या बळावरच फेडण्याचें ठरविलें, ही गोष्ट अनेकांना माहीत आहे.

एकदां लो. टिळक मंडालेहून सुटल्यावर गायकवाडवाड्यांत गणपतिउत्सव होता; त्यांत भास्करबुवा बखले, कृष्णा-मास्तर व नारायणराव बालगंधर्व यांची गाण्याची मैफल झाली होती, ती पुष्कळांच्या स्मरणांत असेल. प्रारंभींचीं तीन-चार पद्यें झाल्यावर, रात्रीं दीडचे सुमारास गंधर्वांनीं बागेश्रीला सुरवात केली, व त्यांतहि पद निवडलें तें अत्यंत लोकप्रिय जुन्या 'शारदा' नाटकांतील. "जो लोककल्याण साधावया जाण। वेई करी प्राण त्या सौख्य कैचें" हें ध्रुपद म्हणतांक्षणींच साऱ्या जनतेनें 'वाहवा' म्हणून आनंदानें मान डोलविली; आणि पुढें जेव्हां त्या पदांतील —

निंदा जनीं त्रास, अपमान उपहास।
अर्थी विपर्यास, हे भोग त्याचे ॥

हा अंतरा त्यांनीं म्हटला, तेव्हां त्या पद्यांतील बहारीची समर्पकता आणि गायकाची समुचितबुद्धि यांचा मेळ पडून सर्वांना फार कौतुक वाटलें. गाणारे पुष्कळ असतात, पण गंधर्वांत जो विशेष गुण होता तो हा !

गद्य नाटकांपेक्षांहि संगीत नाटकांकडेच माझा ओढा अधिक. कारण भावना अमर करणारें असें संगीतच. "पिया ऽ के मिलने ऽऽ की आस" या जोगीच्या आर्त आलापांत जी तीव्र दुःखमिश्रित संवेदना आंहे ती शब्दांनीं कशी व्यक्त होईल? मेघमल्हाराचे सूर ऐकले कीं, आकाश मेघाक्रांत झालें असून सारे सृष्टिजात व वृक्षवेलीहि पल्लवांच्या रूपानें आपलीं मुखें उत्कंठित करून मेघाकडे पाहात आहेत असा भास होतो. मनुष्याच्या मनांत अशा वेळीं कांहीं तरी अनिर्वचनीय उत्कंठा किंवा हुरहुर साद घालते. ती उत्कंठा कोणत्या शब्दांनीं कोण सांगू शकेल? कांहीं सौंदर्य रूपांत प्रतीत होतें, तर कांहीं सुस्वर आलापांत असतें. वाङ्मयालाहि त्याचें निराळें सौंदर्य आहेच. पण या तिहींचा जो त्रिवेणीसंगम संगीत नाटकांत साधतो त्यामुळें संगीत नाटकें मला अधिक आवडत. 'मूकनायक' 'सौभद्र' 'स्वयंवर' 'विद्याहरण' 'भावबंधन' 'एकच प्याला' इत्यादि नाटकें लोकांना इतकीं आवडत कीं, हजारों प्रेक्षकांनीं तीं

पुनःपुनः पाहिलीं असतील. खाडिलकरांच्या नाटकांत ' विद्याहरण ' व ' स्वयंवर ' मला विशेष आवडे. श्री. खाडिलकर हे चेहेऱ्यावरून कांहींसे रुक्ष दिसत असले तरी त्यांनीं आपल्या नाटकांमधून निर्माण केलेली स्त्रीसृष्टि मनानें इतकी थोर व मनोहर आहे कीं, स्त्रीहृदयाच्या सूक्ष्म भावनांची खाडिलकर यांना कल्पना नाहीं, असें कोणींच म्हणूं शकणार नाहीं ! यमुनातटाकावर उभे राहून " होय, मीच ती राधा ! " असें प्रेमाच्या एकरूपतेनें किंवा सविकल्पक मनःसमाधीमध्यें स्वतःचें वर्णन करणारी स्वयंवरांतील रुक्मिणी, अगर

जननी चलाचला
प्रीती जीवकला ॥
लोल लोका सूत्र असे
अचला प्रीती लीला ॥

असें प्रेमाचें उदात्त व स्वर्गीय वर्णन करणारी देवयानी, हीं पात्रें इतकीं अव्याज सुंदर वठलीं आहेत कीं, कण्वाच्या शकुंतलेप्रमाणेच त्यांचें कौतुक करावेंसें वाटतें. वेदाभ्यासजड अशा कण्वाच्या आश्रमांत शकुंतलेला पाहून, तिच्या पित्याबद्दल दुष्यंताला जें नवल वाटलें, तसेंच नवल व कौतुक खाडिलकरांच्या या मानसकन्यांना पाहून वाटतें ! जितक्या नाजुक हातानें महर्षि कण्वानें शकुंतलेचें लालन केलें असेल, तितक्याच नाजुक हातानें रुक्मिणी, देवयानी या मानसकन्या निर्माण करून श्री. खाडिलकरांनीं त्यांच्या भावनांचें चित्रण केलें आहे.

त्यांचेंहि सुदैव असें कीं, या भूमिकांतील भावसौंदर्य रंगभूमीवर वठविण्यास गंधर्वांसारखा विख्यात नट, –' नटसम्राट – ' त्यांना लाभला ! जवळ जवळ पंचवीस वर्षें महाराष्ट्रजनतेवर गंधर्वांनीं आपली छाप कायम ठेवली होती. स्त्रीभूमिका करणाऱ्या स्त्रीनटांपेक्षांहि बालगंधर्वांची भूमिका अधिक सरस होई. ऑर्गनच्या साथीला स्वर लावून त्याच्या पहिल्या पदाला सुरवात झाली कीं, साक्षात रंगदेवताच रंगभूमीवर अवतरल्याचा भास होई ! सौंदर्याप्रमाणें त्याच्या आवाजांत अभिजातपणा आणि विलक्षण मोहकता होती; इतकी कीं, नाटक संपवून घरीं परत येऊन झोंपल्यावरदेखील डोक्यांत त्या गायनाचे सुस्वर आलाप किती तरी वेळ भरून राहिलेले असत. तेंहि दिव्य गायन आतां ' अगात् स्मृतिपथं ' म्हणावयाचें ! तथापि एका गोष्टीचें मोठें नवल वाटतें; गेल्या पंधरा वर्षांत गंधर्वांचें नाटक मीं पाहिलें नाहीं, गाणेंहि ऐकलें नाहीं. पण अद्यापि एकादे वेळीं पहांटे अर्धवट झोंपेंत असतां असा अनुभव येतो कीं, ऑर्गनची साथ सुरू असून गंधर्वांच्या आलाप–लहरींनीं वातावरण अगदीं भरून गेलें आहे. तें गायन म्हणजे आभास नव्हे; किती तरी वेळ तें गायन मी ऐकत असतें. ते क्षण इतके सुखाचे असतात कीं, झोंपेंतून जागे झाल्यावर वाईट वाटतें. बालगंधर्वांच्या गाण्याला मी जें " स्वर्गीय " हें विशेषण लावतों तें याकरितां. माझ्या पुष्कळदां मनांत येतें कीं, या नश्वर जगांत संगीत हेंच अमर असेल काय ?

मी कांहीं स्वतःला मोठा कलावन्त, गायक किंवा रसिक मानीत नाहीं. मी फक्त एक सामान्य मनुष्य या नात्यानें माझा येथें अनुभव सांगितला. मला वाटतें कीं, गायन ही एक 'संजीवनी '–विद्याच असावी. 'विद्याहरण' नाटकांत देवयानीनें म्हटलें आहे कीं, पहांटेच्या प्रशांत समयीं मन सहज रीतीनें योगारूढ अवस्थेंत गेलें म्हणजे, बाबांच्या हृदयांत त्या संजीवनी विद्येचा उदय आपोआप होईल, त्याकरितां मुद्दाम प्रयत्न कशाला करायला हवा !" गाण्याच्या बाबतींत तरी या वाक्याचा मला साक्षात् अनुभव आला आहे. गाण्यानें हृदयांतील गूढस्थ कुंडलिनी जागृत व्हावी अशीही कदाचित माझी प्रकृति असेल. मनुष्याच्या मनावर संगीतानें कांहीं नैतिक परिणाम अवश्य घडतो अशी माझी समजूत आहे. कित्येक लेखक 'नीति आणि कला' यांचे वाङ्मयविषयक वाद करीत असतात. हे वाद तात्त्विक रीतीनें करावयाचे नसतात; त्याचें उत्तर जगांत दुसरीकडे कोठें तरी शोधावयाचें असतें. ज्यांनी वीस वर्षांपूर्वीची रंगभूमि व त्यांतील बालगंधर्वांची भूमिका नीट पाहिली असेल त्यांना 'नीति आणि कला' यांच्या अभिजात मर्यादा काय याचें उत्तर आपोआप मिळालें असेल !

## ५

# काही जुन्या हकीगती

माझ्या वयाला सत्तेचाळीस वर्षें होऊन गेलीं. अर्धें अधिक आयुष्य कालसागराला मिळालें. आतां थोडें उरलें तेंहि धडपणें शेवटाला जाईल अशी आशा वाटते. इतकीं वर्षें ती. तात्यांच्यासारख्या वडिलांचें छत्र उपभोगावयास सांपडलें हें मी सुदैव समजतों. इतर मोठ्या माणसांच्या मुलांप्रमाणेंच मीहि एक सामान्य मनुष्य आहे, त्याबद्दल मला दुःख वाटत नाहीं; पण मला धन्यता इतकीच वाटते कीं, तात्यांचें सारें मोठेपण मी अगदी जवळून सुबुद्धपणानें पाहिलें. हिंदुस्थानांत नांवाजलेलीं शेंकडों माणसें केवळ मी या घरांत जन्मलों म्हणून मला अगदीं जवळून पहातां आलीं. कोणाचें खरें मोठेपण किती याबद्दल मला कधीं भ्रम पडला नाहीं! पुष्कळदां माझ्या मनांत येई कीं, आपण पाहिलेला हा अनेकविध अनुभव लिहून काढावा व पूर्वीं तशी कांहीं सुरुवात केलीहि होती. पण माझ्या या आठवणींत तात्यांचा संबंध ठिकठिकाणीं येणार! एकाच घरांत असतां या आठवणी मी कशा लिहिणार? त्या लिहून प्रसिद्ध

करण्याला साहजिक संकोच वाटे म्हणून हें काम मी सहेतुक मागें टाकलें. आता मात्र अशी वेळ आली आहे कीं, त्या साऱ्या आठवणी जागृत होऊन गत आयुष्याचें सारें चित्र आज माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें आहे !

तात्यांच्या सहवासांत असतां मनावर काय संस्कार झाले हें सांगण्याकरितां अगदीं लहानपणच्या एक दोन हकीकतीपासून सुरुवात करतों. मी जन्मलों तेव्हां आम्ही सदाशिव पेठेच्या हौदासमोर राहुरकरांच्या वाड्यांत राहात होतों. तेव्हांची मला कांहींच आठवण नाहीं. घरची त्या वेळीं गरिबी होती आणि दुसऱ्याच्या घरांत ' भाडेकरी ' म्हणून राहावयाचें तर कसें राहावें लागतें याचा अनेकांना अनुभव आहेच. दुसऱ्याचा शब्द ऐकण्याची पाळी येऊं नये म्हणून भिंतीला कधी एक खिळाहि मारल्याचें मला आठवत नाहीं, असें पुढें तात्या एकदां म्हणाल्याचें मला स्मरतें.

नंतर एक-दोन वर्षांतच आम्ही नारायण पेठेंतील गोळ्यांच्या घरांत राहावयास आलों. तें घर प्रशस्त असून शेजारीं माणकेश्वराच्या विष्णूचें देवालय होतें. त्याच वाड्यांत फर्ग्युसनमधील प्रोफेसर कै. वासुदेवराव पटवर्धन राहात. सांगलीच्या इंजिनिअरिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल गंगाधर नीळकंठ गोखले हे त्या वेळेपासून आमच्याकडे येत. असा त्यांचा व आमचा ऋणानुबंध आज चाळीस वर्षें अबाधित टिकला आहे. त्या वेळीं आमच्या घरांत आजोबा व आजी असत. तात्यांचे थोरले बंधू नारायणराव ऊर्फ नाना हे वारल्यावर मी तीन-चार वर्षांचा असतांना सर्वांनीं काशीयात्रा केली. त्या वेळीं काशी, प्रयाग, मथुरा येथील देवळांचीं गोपुरें, विस्तीर्ण घाट, तेव्हां मुबलक मिळणारी मेवामिठाई, झेंडूच्या फुलांच्या माळा, वगैरे गोष्टी चांगल्या आठवतात. प्रयागला आम्ही नावेंत बसून मध्यभागीं गेलों होतों. तेव्हा गंगास्नान घडण्याकरितां तात्यांनीं मला धरून गंगेंत बुचकळून काढलें होतें. आजोबांना आम्ही ' दादा ' म्हणत असूं ; ते परमधार्मिक व रामभक्त होते. त्यांची रामोपासना तात्यांनीं घरांत अखेरपर्यंत चालविली.

इ. स. १९०६ सालीं तात्यांनीं गायआळींतलें घर विकत घेतलें व पुढें पंचवीस वर्षें स्वतःच्या सत्तेच्या घरांत आम्हीं राहिलों. हें घर प्रथम अगदींच चंद्रमौळी होतें ; पण त्यांत अंगण प्रशस्त असून, घरांत एक मोठा पिंपळ व सुरेख पाण्याची विहीर होती. घरांत नारळी-पोफळीचीं झाडें होतीं, त्यांना संध्याकाळीं दादा नळाला जोडलेल्या पन्हाळानें पाणी लावीत बसत; आणि संध्याकाळीं देवदर्शन करून आल्यावर, हातांत चिपळ्या घेऊन ' राम ध्यावा, राम ध्यावा ' असें भजन करीत. स्वतःच्या सत्तेच्या घरांत राहणें यांत काय सुख आहे तें सांगून समजणार नाहीं. तात्यांच्या चेहेऱ्यावर तें अगदीं उघड दिसें. मिरज, सातारा, पुणें इत्यादि ठिकाणीं कसे कष्टाचे दिवस गेले याच्या अनेक आठवणी आई ( आजी ) सांगे; आणि आतां आपण सत्तेच्या घरांत आलों हें केवढें सुख आहे अशा गोष्टी तिच्या बोलण्यांत येत. तेव्हा तात्यांना मनांतून किती धन्यता वाटत असेल हें, ज्याच्या हातून मातापितरांकरितां अशी गोष्ट घडली असेल

त्यालाच कळेल. इतरांना त्याची कल्पना येणार नाहीं.

दादा लवकरच १९०७ सालीं वारले. अखेरच्या प्रसंगीं सगळ्या नातवंडांना जवळ बोलावून त्यांच्या पाठीवर त्यांनीं हात फिरविला होता. वडिलांचें छत्र गळून पडण्याचा माझ्यावर जेव्हां प्रसंग आला, तेव्हां दादा गेल्यावर तात्याहि किती दुःखी होते याची मला आठवण झाली. मग त्यांना फक्त आईच उरली, व तिचें छत्र सुदैवानें पुढें त्यांना वीस वर्षें लाभलें. तात्यांचा सारा भाग्योदय व कीर्ति तिनें डोळ्यांनीं पाहिली तेव्हां तिला अगदीं धन्यता वाटली असेल यांत शंकाच नाहीं. तात्यांना पुढें शेंकडों प्रसंगीं बाहेर गांवीं जाण्याचे प्रसंग येत, तेव्हा जातांना इतक्या दिवसांनी येईन असें न विसरतां ते तिला सांगून जात. आईच्या तोंडावर समाधानाचें तेज इतकें मूर्तिमंत दिसे कीं, देवापुढें उजळून ठेविलेल्या नीरांजनाचीच उपमा तिला शोभेल. जगांत महत्पद मिळविलेलीं सारीं माणसें मातृभक्त होतीं असें आढळेल. ती मातृभक्ति तात्यांच्या अंगीं मूर्तिमंत वास करीत होती. आई ( आजी ) सतत कांहींना कांहीं तरी काम करतांना आढळे. आरोग्य तिच्या अंगीं चांगलें होतें. वृद्धावस्थेंतहि हातपाय चालू आहेत तोंपर्यंत मनुष्यानें सतत काम करीत असावें, असें ती म्हणे. हा तिचा गुण तात्यांनीं अक्षरशः उचलला होता.

आई होती तेव्हां कोंकणच्या व मिरजेच्या जुन्या हकीकती केव्हां केव्हां कारणपरत्वें सांगत असे. कोंकणांतलें वानिवड्याचें आमचें मूळ ठिकाण आम्हांस फक्त ऐकून माहीत होतें. तात्यांना कोंकणांत जाण्याची हौस फार; पण १९३५ सालीं त्यांनीं केसरींतून अंग काढून घेईपर्यंत त्यांना फुरसत अशी कधींहि मिळाली नाहीं. १९३५ सालीं मात्र त्यांनीं निश्चय करून देवगडचा दौरा केला. तेथें एक लहानशी वाडी विकत घेतली. वानिवडयास पूर्वीं दादा राहात तें घर अगदीं पडलें होतें, व तेथल्या जुन्या देव्हाऱ्यांतील देव जीर्णोद्धाराची वाट पहात होते. तात्यांनीं सुतार-गवंडी लावून ती जागा साफसूफ केली. आणि मुंबईहून खिडक्या–दरवाजे आणविण्याचा दीर्घोद्योग करून, त्या जुन्या जागेचा जीर्णोद्धार केला. खुद्द देवगड हें कोल्हापूरपासून ९० मैलांवर आहे. वानिवडयास जावयाचें म्हणजे खाडीचा फाटा आंत येतो, त्यांत मैल--दीड मैल होडीनें ओलांडून आडवाटेला जावयाचें. अशा स्थितींत नुसत्या पाहुणचारालादेखील कोणी जाण्याला नाखुष असणार. आम्ही सारे कोंकणांत गेलों ते तात्यांचेखातर. म्हणजे, " तुम्ही कोणी येणार नसला तरी मीं कोंकणांत जाणार " असें त्यांनीं निक्षून सांगितल्यावर ! केवळ एकदांच नव्हे तर तीन खेपा त्यांनीं कोकणांत केल्या; अलीकडे गेल्या सात–आठ वर्षांत त्यांना प्रवास करणें अशक्य झालें तेव्हां, देवगडच्या घराकडे आमच्यापैकीं कोणी पाहाणार नाहीं अशी त्यांना खात्री असल्यामुळें तें घर त्यांनी काढून टाकलें. तात्पर्य, आम्हीहि कोंकण पाहिलें आहे, असें शपथेवर दुसऱ्याला सांगण्याला आम्ही मोकळें झालों ! असो.

यानंतर १९०७ सालची सुरतेची कॉंग्रेस, १९०८ सालचा टिळकांवरील खटला, त्याच्याच पाठोपाठ झालेला तात्यांचे वरील खटला व तुरुंगवास या वेळीं मीं केवळ आठ नऊ वर्षांचा होतों. पण घरांतलें सचिंत वातावरण पाहून आम्ही काहींशा संकटाच्या परिस्थितींतून जात आहों, एवढी आम्हां मुलांना जाणीव होती. १९१० सालीं तात्या केसरीचे संपादक झाले. त्याच सालीं नाशिकला जॅक्सनचा खून होऊन महाराष्ट्रांतलें राजकीय वातावरण दडपशाहीमुळें खालवर ढवळून निघालें. अशा नाजूक परिस्थितींत तात्या केसरीचे जबाबदार संपादक असल्यामुळें त्यांच्याकडे लोक फार आदरानें पहात. त्या वेळीं केसरीचे संपादक होणें म्हणजे एक प्रकारें महाराष्ट्राचें पुढारीपणच पत्करण्यासारखें होतें. स्वतःचें अवसान पूर्ण ओळखून ती गोष्ट त्यांनीं त्या वेळीं धीटपणानें केली. तात्यांच्या मतांबद्दल मतभेद आजवर पुष्कळांनीं दाखविला असेल, पण तेव्हांपासून आजतागायत तात्या हे महाराष्ट्राचे पुढारी होते ही गोष्ट कोणीं नाकबूल केलेली मी कधींहि पाहिली नाहीं !

एकीकडे मवाळ लोक व दुसरींकडे क्रांतिकारक मार्गाकडे जाणारे तरुण लोक या दोहोंतून तात्यांना मार्ग काढावयाचा होता. राजकारणांतलें जें त्यांचें "मध्यमक्रमाचें तत्त्वज्ञान" तें हेंच. गेल्या पन्नास वर्षांतल्या राजकारणांतील अनेक उदाहरणें देऊन लॉर्ड मोर्ले यांच्या 'कॉम्प्रोमाईज' (Compromise) या ग्रंथाप्रमाणें व्यावहारिक राजकारणाच्या तत्त्वज्ञानासंबंधीं ते एक पुस्तकच लिहिणार होते. पण दुर्दैवानें तें घडून आलें नाहीं. मवाळ लोक राष्ट्रीय पक्षाच्या लोकांशीं खाजगी स्नेहसंबंध देखील ठेवण्यास भीत. ही बूज काढून टाकण्याकरितांच, केसरीचे संपादक असतां तात्यांनीं इंदूर व बडोदें येथें १९०९।१० सालीं साहित्य संमेलनाकरितां जाऊन भाषणें केलीं. कारण त्या वेळीं साहित्यपरिषद ही सोवळ्या नेमस्त रावबहादुर लोकांच्या हातीं होती. केसरी राजकीय असला तरी मराठी भाषेचा अभिमानी होता. शारदेच्या दरबारांत राजकीय बहिष्कार कसला ? मला आठवतें, १९१० सालच्या बडोदें येथील संमेलनाला खाडिलकर हेहि आले होते. याप्रसंगानें बडोद्याला दसऱ्याच्या स्वारीची जी थाटांत मिरवणूक निघते तीहि मला पाहावयास मिळाली.

त्या वेळीं नेमस्त लोक केसरीवर जहालपणाचा आरोप करीत, तर क्रांतिकारक लोकांना केसरी अगदींच नेमस्त वाटे ! एकाच वेळीं दोन परस्परविरुद्ध टोंकांकडून आपणांवर आक्षेप येऊं लागले कीं आपण बरोबर योग्य मध्यबिंदूवर उभे आहों असें बेलाशक समजावें, असें तात्या नेहमीं म्हणत असत. उदाहरण म्हणून इ. स. १९०९ सालचीच गोष्ट सांगण्यासारखी आहे. त्या वेळीं तात्या कौन्सिलकरितां उमेदवार म्हणून उभे राहिले असतां सरकारनें वटहुकूम काढून उमेदवारीला त्यांना अपात्र ठरविलें. ही गोष्ट ना. गोखल्यांना पसंत नव्हती, म्हणून त्यांनीं टाईम्समध्यें जाहीर पत्र लिहून सरकारचा निषेध केला. आतां असें पाहा कीं, कौन्सिलकरितां उभें राहणें हें जर क्रांतिकारकांच्या

दृष्टीनें नेमस्तपणाचें होतें, तर सरकारला त्यांच्या उमेदवारीचें एवढें वावडें वाटण्याचें काय कारण होतें ? इतर नेमस्तांप्रमाणें कौन्सिलांत ते असलेले सरकारला चालू नयेत काय ? पण चालले नाहींत याचाच अर्थ, इतर नेमस्तांपेक्षां तात्यांना सरकार वेगळें समजत होतें, असा नव्हे काय ? याचेंच नांव वर्तनाचा ‘ मध्यमक्रम ’ म्हणजे मधला मार्ग, आणि तो ज्याला कळतो त्यानें त्या मार्गाचें आचरण दुसऱ्याच्या टीकेची पर्वा न करतां बेलाशक करावें !

१९१० ते १९१४ या वर्षांत लो. टिळक तुरुंगांत असल्यामुळें बाहेर सार्वजनिक चळवळ कांहींच नव्हती. राष्ट्रीय सभेला ओहोटी लागली होती, किंबहुना साऱ्या सार्वजनिक जीवनाचा झराच आटून गेला होता. खाडिलकर केसरी ऑफिस सोडून गेले होते व शिवरामपंत परांजपे १९०९ सालीं सुटून आले त्यांनींहि टिळक सुटून येईपर्यंत तोंडाला कुलूप घातलें होतें. गांवांत कोणी नाटक मंडळ्या नाटकें करीत. तो एक करमणुकीचा विषय होता. आणि उन्हाळ्यांत ‘ वसंत व्याख्यान माला ’ महिनाभर चाले, त्यांत कांहीं गंमत पाहावयास मिळे. त्या वेळचीं विद्वान मंडळीं म्हणजे चिंतामणराव वैद्य, महादेव मल्हार जोशी, पांगारकर इत्यादिकांच्या भाषणांची मनावर छाप पडे. दक्षिण आफ्रिकेंत गांधींच्या बरोबर काम केलेले पोलकसाहेब यांचें भाषण झालेलें आठवतें. काशीताई कानिटकर यांचे यजमान रावसाहेब कानिटकर हे बहुधा दर दिवशी व्याख्यात्याच्या नंतर उपवक्ते म्हणून बोलत. त्यांत रावसाहेब न्या. रानडे यांचा उल्लेख हटकून येत असे ! ना. गोखले यांचें व्याख्यान वसंत-व्याख्यान-मालेंत झालेले मात्र कधीच आठवत नाही. तथापि त्यांचे गुरु कै. गणेश व्यंकटेश जोशी हे एकदां अध्यक्ष असल्याचें स्मरतें. राजकारण व अर्थशास्त्र हा त्यांचा आवडता विषय असून आंकडेशास्त्रांत त्यांचा अगदीं हातखंडा होता. कौन्सिलांत भाषणें तयार करतांना रा. ब. जोशी यांची ना. गोखल्यांना अमूल्य मदत होत असे. केसरींत त्यांचा मृत्युलेख आला तेव्हां आम्हांला कळलें कीं एक फार मोठा विद्वान मनुष्य गेला ! डोक्यावरील केसांच्या जटा वाढलेल्या, भुवया वानराप्रमाणें पिंजारलेल्या आणि डोक्यावर तांबडी पगडी असा त्यांचा बावळा वेष पाहून मुलांना हंसू येत असे. आमचे नातेवाईक सातारचे वाग्भट देशपांडे पुष्कळदां आमच्या घरीं येत व जेवतांना गोखले, चंदावरकर, गणेश व्यंकटेश जोशी यांच्यासंबंधीं गमतीदार गोष्टी त्यांच्या तोंडून ऐकावयास सांपडत व अनेकदां हीं संभाषणें फार रंगत. तत्कालीन सार्वजनिक व्यक्तींचा ठसा माझ्या तरी मनावर अशा आठवणींनीच अधिक उमटलेला असल्यामुळें त्या संभाषणांतील कांहीं गोष्टी पुढें देतोः—

ना. गोखले व नारायणराय चंदावरकर दोघेहि नेमस्त असले तरी चंदावरकरांच्या पुष्कळ गोष्टी व मतें गोखल्यांना पसंत नसत. चंदावरकर राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झाले त्या वेळीं हिंदी लोक वरिष्ठ नोकऱ्यांकरितां पूर्णपणे पात्र आहेत असें त्यांचें मत होतें. पण

रॉयल कमिशनपुढे साक्ष देतांना त्यानीं पगडी फिरवून हिंदी लोकांच्या अंगीं ती पात्रता नाही असें साफ मत दिलें, याचा ना. गोखल्यांना अचंबा वाटला ! ! उलटतपासणींत गोखल्यांनी त्यांना विचारलें, " चंदावरकर ! अमुक सालीं तुम्ही राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होता त्या वेळीं असें तुमचें मत नव्हतें ! " यावर चंदावरकरांनीं उत्तर दिलें, " तेव्हापासून मी वाढलों आहे ! " ( Since Thent I have grown ) केसरीने या प्रश्नोत्तरांवर टीका करतांना थट्टेने म्हटलें होतें की, पूर्वी चंदावरकर फक्त साधे 'मिस्टर' चंदावरकर होते. आता ते 'सर' झाले; तेव्हा त्यांचें शहाणपण वाढलें हें खरेंच आहे.

अशाच बाबतींत ना. जेंकिन्स यांना जाहीर सभेंत ना. गोखल्यांनी कसें निरुत्तर केलें याची हकीगत वाग्भट अभिमानाने सांगत. कोठल्याशा एका जुन्या राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं ना. जेंकिन्स हजर होते. त्यांत सिव्हिल सर्विसला हिंदी लोक पात्र आहेत असा ठराव असतां ना. जेंकिन्स यांनी त्याला विरोध केला. ना. गोखले यांना हें आवडलें नाही. त्यांनी उठून जेंकिन्स यांना विचारलें, " कशाच्या आधारावर आपण हें विधान करतां ? आजपर्यंत किती लोक सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पास झाले ? " जेंकिन्स यांनी उत्तर दिलें, " मला तें माहीत नाही ! " हातांतील सिव्हिल लिस्ट जेंकिन्स यांच्यापुढे करून गोखले म्हणाले, " ही यादी पाहा आणि सांगा. पहिलें नांव कोणाचें आहे ? " जेंकिन्स म्हणाले, " सर रोमेशचंद्र दत्त. "

" त्यांच्या विरुद्ध तुम्हांला कांही म्हणावयाचें आहे ? "

" कांही नाही ! "

" बरें दुसरें नांव कोणाचें आहे ? "

" सुरेंद्रनाथ बानर्जी "

" यांच्याबद्दल तुम्हांला काय म्हणावयाचें आहे ? "

जेंकिन्स म्हणाले– " कांही नाही. "

" पुढे तिसरें नांव कोणाचें आहे ? " गोखल्यांनी विचारलें.

" अमुक–चतर्जी "

" त्यांच्याबद्दल तुम्हांला काय म्हणावयाचें आहे ? "

" कांहीच नाही, " असे जेंकिन्स यांनी घुटमळत उद्गार काढतांच साऱ्या सभागृहांत टाळ्यांचा कडकडाट झाला; आणि जेंकिन्ससाहेब अगदी निरुत्तर होऊन खाली बसले !

चंदावरकर हे टिळकांचे साहाध्यायी; ते विद्वान्, हुशार असून इंग्रजी उत्तम लिहीत बोलत, याबद्दल वादच नाहीं ; पण या इंग्रजी पंडिताच्या हातून मराठी भाषेची विटंबना व वेळीं स्वतःची फजितीदेखील कशी होत असे, याबद्दल हंसण्यासारखी गोष्ट तात्यांनी सहज जेवतांना सांगितली. मुंबईत एका व्याख्यानाच्या प्रसंगीं चंदावरकर अध्यक्ष होते. इंग्रजी वक्ते बोलावयास उठले म्हणजे 'लेडीज् ॲण्ड जंटलमेन्' हें

त्यांचें पहिलें संबोधन असावयाचेंच ; त्याप्रमाणे मराठींत सुरुवात झाली. " सभ्य स्त्री-पुरुषहो ! आजच्या या सभेच्या दिवाणखान्यांत ( हॉल ) आपण कां जमलों आहों तें तुम्हांस माहीत आहेच, " असें चंदावरकरांना पुढे म्हणावयाचें होतें; पण या 'सभा-गृहांत ' किंवा ' दिवाणखान्यांत ' असें न म्हणतां, " आज या 'रंगमहालांत' आपण का जमलों आहों " असें चंदावरकरांनी म्हटल्यावर सभागृहांत केवढा हशा पिकला असेल याची कल्पना करावी !

कै. गणेश व्यंकटेश जोशी यांच्या स्मारकासंबंधाने केसरींत लेख आला होता. त्या सुमारास एकदा सदाशिवराव बापट आमच्या घरीं आले होते. आम्ही सर्वजण जेवत होतों. त्यांच्या बोलण्यावरून जोशीबुवांसंबंधाने गोष्टी निघाल्या. जोशीबुवा सदैव कामांत व्यग्र असत. केव्हा तरी उठून खाली घरांत येत, तेव्हां सुना ताबडतोब उठून उभ्या राहात. जोशीबुवा त्यांना म्हणत, तुम्ही अशा मला भिता काय ? मी काय एखादा वानर वगैरे आहे की काय ! बापटांनी ही गोष्ट तात्यांना सांगितली तेव्हा त्यांना हसूंच लोटलें. तें म्हणाले, " जोशीबुवांना म्हणावें, तुम्ही एकदा स्वतःचें रूप आरशांत पाहा म्हणजे कळेल ! "

जोशीबुवा अगदी तुकारामाचे अवतार होते. हा लहान, तो मोठा हा भेद त्यांच्या-पाशीं काडीमात्र नव्हता. गडी-माणसांना देखील ते ' अहो ' ' जाहो ' असें संबोधीत. सातार्‍यास ते हायस्कुलाचे हेडमास्तर असतां कित्येकदा बाजारांतून भाजी आणीत. एकदा एका माळणीला चुकून त्यांनी सहा पैसे जास्त दिले. गडबडींत तिच्या तें लक्षांत आलें नाहीं व जोशीबुवांनाहि कळलें नाहीं. पांचच मिनिटांत जोशीबुवांच्या पाठीमागे ती माळीण धांवत आली आणि चुकून दिलेले सहा पैसे तिने परत केले. तेव्हा जोशी-बुवा तिला म्हणाले, " बाई ! तुम्ही किती हो चांगल्या आहां. हा घ्या तुम्हांला रुपया ! " जोशीबुवांनी असें म्हणून तिला रुपया बक्षीस दिला !

गरीब बायांना दर महिन्याला तीन–चार रुपयांचीं पाच लुगडीं दान करण्याची त्यांची वहिवाट असे. एक दिवस एक भिकारीण अर्धें शरीर त्यांना उघडें दाखवून लुगडें मागूं लागली. धर्मादायांतलें लुगडें शिल्लक नव्हतें, तेव्हा जोशीबुवा तिला म्हणाले, " तूं जा. माझें ' बजेट ' संपलें आहे ; आता लुगडें शिल्लक नाही. " त्या बाईला हा 'बजेट 'चा विनोद कोठचा कळावयाला ? तिने आणखी गयावया करावला सुरवात केली. तेव्हा जोशीबुवा माजघरांत आले आणि दांडीवरचें लुगडें ओढून त्यांनी तें तिला देऊन टाकलें ! याच वेळेला त्यांची बायको स्नान करण्याकरिता स्नानगृहांत गेली होती. नंतर बाहेर येऊन दांडीवर पाहते तों काय ? असे जोशीबुवा म्हणजे तुकारामाचे अवतार होते.

त्यांची बनारसच्या कॉंग्रेसच्या वेळची गोष्ट जेव्हा वाग्भटांनी सांगितली तेव्हा मला तर हसूंच कोसळलें. ना. गोखले हे त्या वेळेला अध्यक्ष होणार म्हणून जोशीबुवांना

केवढा आनंद ! कारण त्यांनी हा शिष्य पढवून तयार केला होता. जोशीबुवा बनारसला जाणार तेव्हा आयतें विश्वेश्वराचें दर्शन घडेल अशी त्यांच्या पत्नीने इच्छा दर्शविली व त्यांनीहि संमति दिली. ठरल्या वेळीं टांगा दाराशीं आला. स्वतःचें सामान, बायकोची ट्रंक घेऊन जोशीबुवाहि टांग्यांत येऊन बसले. पण यात्रा सुखरूप व्हावी अशी स्त्रियांच्या स्वभावाप्रमाणें इच्छा होऊन, बायको देवाला नमस्कार करण्याकरिता पुनः घरांत गेली. तिला पांचच मिनिटें उशीर झाला. आपण कॉंग्रेसला निघालों तेव्हा बायकोने पांच मिनिटांचा उशीर करणें म्हणजे गोष्ट काय ? असें वाटून जोशीबुवांनी सरळ बायकोची ट्रंक उचलून दारांत ठेवली आणि टांगा स्टेशनावर चालू केला ! बिचारी बायको, विश्वेश्वराचें दर्शन घडावें अशी तिची इच्छा होती; पण तशी विश्वेश्वराची नव्हती, त्याला काय करणार ?

बुद्धिमान माणसांचें संसारांत लक्ष फारसें नसतें अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतील; पण जोशीबुवांच्या बाबतींत त्याचा वचपा इतर रीतीने निघाला होता. जोशीबुवांची विद्वत्ता इतकी मोठी होती की, खरोखर दहा हजारांत एखाद्यालाच त्याची किंमत कळेल; पण असें असलें तरी तिचा गुण कांहीं नाहीसा होत नाही. गोखल्यांनी जोशीबुवांच्या अर्थशास्त्रीय लेखांचें पुस्तक प्रकाशित केलें, त्यावर केसरींत तात्यांनी अग्रलेखच लिहिला होता. त्यांत नेव्हिनसन साहेबाने जोशीबुवांचें जें अत्यंत विनोदी मार्मिक वर्णन केलें होतें त्यांतला एक उताराच अग्रलेखाच्या शेवटीं दिला होता. असो.

या अनेक उदाहरणांचा ऐकून कां होईना, पण माझ्यावर असा परिणाम झाला होता की, विद्वत्ता ही कांही वेगळीच चीज आहे. हीं सारीं माणसें देशभक्त आहेत. पण विद्वानहि आहेत. तारुण्यांत कोणाला विद्वत्तेपेक्षा क्रांतिकारक मार्गाचें आकर्षण अधिक वाटो, पण देशभक्त असणाऱ्या मनुष्याने प्रथम स्वावलंबी बनलें पाहिजे यावर तात्यांचा फार कटाक्ष असें. तरुणांना कोणीहि हवा तो उपदेश करावा व स्वार्थत्यागाच्या भरीला घालावें, असें त्यांचें मत नव्हतें. मुलांनी विद्याभ्यासाचें आपलें कर्तव्य सोडून प्रत्यक्ष राजकारणांत पडावें असें त्यांना वाटत नसे. विद्यार्थीवर्गापुढे व्याख्यानांत बोलत असतां, या कोवळ्या मुलांचें सारें जीवित आपल्या उपदेशावर हेलकावे खाणार आहे या जाणीवेने ते कळकळीने बोलत. विद्वत्ता हा साऱ्या जगांत उपयोगी पडणारा एकच पासपोर्ट आहे; अविद्वानाच्या स्वार्थत्यागाला जग काडीचीदेखील किंमत देत नाही. म्हणून प्रथम विद्वान व्हा; व नंतर देशकार्यांत पडा, अशासारखीं त्यांचीं किती तरी सुभाषितें काढून दाखवितां येतील. पुढे असहकारितेच्या चळवळींत ज्या ज्या विद्यार्थ्यांनी तात्यांचीं भाषणें ऐकलीं त्यांच्या मनावर त्याचा कसा कायमचा परिणाम झाला, ही गोष्ट मी समक्ष डोळ्यांनी पाहिलीं आहे. पण तात्यांच्या शिकवणुकीचा शिवरामपंत परांजपे, सावरकर यांच्यापेक्षा वेगळा व कायमचा परिणाम ज्यांच्या मनावर घडला असें त्या जुन्या काळांतलें एक उदाहरण मला माहीत आहे. ती व्यक्ति म्हणजे लो. टिळकांच्या आठवणी

लिहिणारे गृहस्थ श्री. सदाशिवराव बापट होत. बापट तात्यांचें लिहिण्याचें काम करीत व तात्यांसंबंधी पुष्कळ गोष्टी तेच आम्हांला सांगत. नवल असें की, नैमित्तिक क्रांतिकारक मार्गाकडे वळण्याचा त्यांचा हेतु असतां, तात्यांच्या उदाहरणाने देशभक्तीचा नित्य मार्ग हाच अधिक श्रेयस्कर ही गोष्ट त्यांना पटली होती. त्यामुळे त्यांच्या स्वानुभवाच्या गोष्टीच आम्हाला ऐकावयाला मिळत असल्याने बापटांची माझी मैत्रीच जमली आणि एकीकडे जरी मी माझा शाळेंतला अभ्यास करीत होतों तरी, तात्यांच्या सार्वजनिक जीवनाचा आमच्या अपरोक्ष घडणारा तपशील आम्ही बापटांना इत्थंभूत विचारून घेत होतों.

बापटांच्यासुद्धां मनावर तात्यांच्या शिकवणुकीची छाप पडण्याचें कारण असें की, जो स्वार्थत्याग आपण स्वतः करूं शकणार नाहीं तो करण्याचा इतरांना उपदेश तात्यांनीं कधींहि केला नाहीं. पुढच्या असहकारितेच्या चळवळीप्रमाणेंच पूर्वीच्या स्वदेशी चळवळींत आग ओकणारे किंवा स्वतः नामानिराळे राहून आग लावूं इच्छिणारे वक्ते व्याख्याते कांहीं थोडे नव्हते! पण असें लिहिणें, बोलणें हें प्रामाणिकपणाचें नव्हें असें तात्यांना निक्षून वाटे. सार्वजनिक आयुष्यांतील हा सच्चेपणाचा गुण दुर्मिळ आहे असें बापटांना दिसून आलें. नाशिकच्या 'अभिनव भारत'मधील कांहीं मंडळी इतकी बहकलेली होती कीं, एकदोघानीं ना. गोपाळराव गोखल्यांचा खून करण्याचें ठरविलें होतें! कारण त्यांच्या दृष्टीनें न्या. दावर, जॅकसन व गोपाळराव गोखले सारखेच होते!! खुद्द टिळकांना ही मंडळी तुच्छ समजत. मग तात्या त्यांच्या दृष्टीनें अगदी 'नेमस्त' ठरावेत यांत आश्चर्य कसलें?

पण नाशिकच्या कटांत सरकारनें दडपशाहीचा नांगर खोल घालून जेव्हां तरुणांना भरडून काढण्यास सुरवात केली तेव्हां, व्याख्यानांत जहाल भाषणें करणारांनीं आपल्या तोंडाला कुलूप घातलें. इतकेंच नव्हे तर, शिक्षा भोगून सुटून आलेल्यांना साधी सहानुभूतीहि दाखविली नाहीं; मग मदत करणें दूरच. त्यावेळीं राजकीय कैद भोगून आलेल्यांच्या मागें गुप्त पोलीसांचा ससेमिरा इतका असे कीं, कोठें त्याला नोकरी मिळण्याची भ्रांत असे, कीं कोठें भाड्यानें जागा मिळवण्याची मुष्कील असे! अशा परिस्थितींत एकीकडे नित्य सनदशीर राजकारणावर केसरींत लेख लिहित असतां, दुसरीकडे क्रांतिकारक व राजद्रोहाखालीं भरडून निघणाऱ्या लोकांना शक्य ती सहानुभूति व मदत केसरीने दिली, ही धैर्याचीच गोष्ट होती. टिळक तुरुंगांत असतां श्रीयुत पां. म. बापट, श्री. वामन मल्हार जोशी ही मंडळी तात्यांनीं केसरी कचेरींत घेतली. टिळक सुटण्याच्या आगेंमागें नाशिक कटांत शिक्षा भोगलेले विष्णुपंत भट हेहि केसरी ऑफिसांत आले. तात्पर्य, केसरीचें राजकीय मत क्रांतिकारक पक्षाप्रमाणें नसलें तरी, क्रांतिकारक लोक हेहि देशभक्तच आहेत, जो तो आपल्या कृत्याबद्दल कायदेशीर-रीतीने जबाबदार असला तरी अशा लोकांशीं एरवी सामाजिक संबंध ठेवण्यास कोणी कां

आडकाठी घ्यावी ? आणि सरकारनें ती घेतली तरी लोकांनीं ती काय म्हणून मानावी ? असें नुसतें मत नव्हे तर तात्यांचा आग्रह आचरणांत दिसे. मनुष्याच्या निर्भयपणाची खरी परीक्षा सभेंत किंवा व्याख्यानांत तो काय बोलतो एवढ्यावरच होत नाहीं. कठिण प्रसंगी तो कसें काय वागतो यावरच मनुष्याच्या स्वत्त्वाची परीक्षा होते ! केसरी चालविणें हेंहि त्यावेळीं सरकारच्या दृष्टीनें राजद्रोहीच होतें. फक्त केसरी बुडवायला कायदेशीर निमित्त सरकार शोधीत होतें. सामान्य सभा-व्याख्यानांना देखील सरकारी रिपोर्टर असत; आणि खासगी रेल्वेंतील प्रवासांतहि पोलिसांची ब्याद पाठीमागें इतकी असे कीं, कित्येकदां त्याच्याशीं स्वाभिमानाखातर हमरीतुमरी करण्याचे तात्यांच्यावर प्रसंग आले, ही गोष्ट मी समक्ष पाहिली आहे. अशा कठीण प्रसंगी तात्यांनीं केसरी टिकविला याबद्दल पुढे टिळकांनीं धन्यतेचे उद्‌गार काढले तें प्रसिद्धच आहेत.

तथापि कर्तव्याचा चरक एखादे वेळीं किती खडतर व सत्त्वपरीक्षा घेणारा असतो, याबद्दल एक प्रसंग येथें सांगण्यासारखा आहे. १९१२ सालीं एक रॉयल कमिशन हिंदुस्थानांत आलें होतें, त्यावर रॅम्से मॅक्डोनाल्ड, ना. गोखले वगैरे सभासद होते. सिडेनहॅमची कारकीर्द चालू असल्यामुळे केसरीवर सरकारी रोष व राजकीय बहिष्कार होता; पण ना. गोखले, हे तात्यांचे स्नेही असल्यामुळे त्यांनी तात्यांची राष्ट्रीय पक्षाचे एक पुढारी म्हणून साक्ष घेण्याचें ठरविलें. अर्थात् या वेळीं तात्या केसरीचे संपादक असल्यामुळें या साक्षीचा प्रसंग केसरीच्या दृष्टीनें महत्त्वाचा होता; पण योगायोग असा कीं, माझे मेहुणे अर्थात् तात्यांचे जांवई हे याच वेळीं सरदारगृहांत अत्यवस्थ होते. सरतेशेवटीं खडतर वेळ अशी आली कीं, एकीकडे साक्षीला निघावयाची वेळ आणि दुसरीकडे जामातांच्या अखेरच्या क्षणांची वेळ जवळजवळ एकच आली ! तेव्हां अत्यंत जड अंतःकरणानें तात्यांनीं तेथून पाय काढला आणि साक्षीकरितां प्रयाण केलें. साक्षहि त्यांनीं उत्तम दिली; पण कोणत्या परिस्थितींत ते साक्षीकरितां आले होते हें जेव्हां नंतर गोपाळराव गोखल्यांना कळलें, तेव्हां त्यांच्या मनावरहि परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्या वेळीं घरच्या मंडळीना एकदोन पत्रें लिहून त्यांत बाबुराव ( माझे मेहुणे ) यांच्याबद्दल ओझरता मजकूर तात्यांनीं लिहिला होता. पण ज्या वेळीं मुंबईहून ते पुण्याला यावयास निघाले, तेव्हां मात्र अंतःकरण अतिशय जड होऊन तात्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले ! कारण घरीं जाऊन मुलीचें सांत्वन तरी कसें करावयाचें ! तेव्हां नाइलाजाने स्वतःचें दुःख आवरून त्यांनीं याहि प्रसंगाला तोंड दिलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३२२१५ वि: चारित्र
क्रमांक २१४९ नों. दि. ३/४/६४

## ६

# सार्वजनिक जीवनाचे पडसाद

१९१४ सालीं टिळक मंडालेच्या तुरुंगांतून सुटले, तेव्हां मी त्यांना प्रथम पाहिलें. मध्यरात्रीं त्यांना आणून वाड्याशीं सोडलें, पण पहांटेच ही बातमी गांवभर पसरली व जो तो त्यांच्या दर्शनास येऊं लागला. अंगांत साधा मलमलीचा सदरा व डोक्यांवर टोपी असा त्यांचा वेष होता. अनेकांनीं त्या सावळ्या परब्रह्माचें दर्शन घेतलें व कित्येकांनीं आनंदाश्रू ढाळले. हद्दपारीहून परत आलेल्या पुष्कळांची स्थिति रिप व्हॅन् विंकलप्रमाणें होते. जेथें उद्यान होतें तेथें वाळवंट, आणि घर उभें होतें तेथें स्मशान झालेलें पाहण्याचा प्रसंग पुष्कळांवर येतो. टिळकांची स्थिति कांहीं अंशीं तशी झाल्याचें दुसऱ्या दिवशींच्या भाषणांत त्यांनी बोलूनहि दाखविलें. पण तशाहि परिस्थितींत तात्यांनीं केसरी जिवंत ठेवला याचें महत्व टिळक ओळखून होते. "तात्या होते म्हणून आज येथें उभे तरी रहावयाला जागा सांपडली," असे कृतज्ञतेचे उद्गार टिळकांनी अनेकांजवळ काढले. प्रत्यक्ष

शब्द नसले तरी या साऱ्या भावनांचे पडसाद हस्तें परहस्तें अगदी बिनचूक कानावर येत असत. दुसरे दिवशीं टिळकांचे गायकवाडवाड्यांत व्याख्यान झालें. मी त्यांचे ऐकलेलें तें पहिलें भाषण. त्यांचा मेघासारखा अमोघ गंभीर शब्द ऐकून लोकसागरावर क्षोभाच्या उत्तुंग लाटा उठविण्याचें सामर्थ्य असलेला हा लोकग्रणी आहे याबद्दल माझी मनोमन खात्री पटली. " आय केम, आय सॉ, आय कॉंकर्ड " हें सीझरचें वाक्य पुढाऱ्याला तंतोतंत लागू पडतें. लोकांना युक्तिवाद कळत नाहीं; पण आपला पुढारी कोण हें अगदीं बिनचूक कळतें ! पुढारीपणाची कांहीं तरी ' किमया ' असावी; कारण त्या-वेळीं गोखले, फिरोजशहा मेहता, सप्रू, चिंतामणी वगैरे विद्वान किंवा देशभक्त मंडळी थोडी नव्हती. पण बहुजनसमाजाने वरलेला असा पुढारी साऱ्या हिंदुस्थानांत एकच होता. त्यानेंच लोकांच्या मनांत स्वराज्याची भावना फुलविली होती; टिळकांपेक्षाहि कित्येक वर्षें अगोदर ' स्वातंत्र्य ' हा शब्द आम्ही उच्चारला, असा ' दावा ' आज कोणींहि सांगोत ! पण त्यांनाहि स्वार्थत्यागाची अमूर्त रीतीनें स्फूर्ति देणारे टिळकच होते ही गोष्ट ( कोणी वादाचीच वेळ आणल्यास ) कागदोपत्री पुराव्याने शाबीत करितां येईल ! असो.

दुःखाप्रमाणें आनंदाचे प्रसंगहि लागोपाठ येतात असें दिसतें. वर्षभरांतच ताई-महाराज खटल्याचा निकाल प्रीव्ही कौन्सिलने टिळकांच्या बाजूने दिला. तात्या या वेळीं आजारांतून उठून हवापालट करण्याकरिता सिंहगडावर गेले होते. आम्ही घरांतील मुलें सिंहगडावर गेलो तेव्हां बाबा विद्वांस यांनीं पेढे मुद्दाम बरोबर दिले होते. पुणें दरवाजापाशीं तात्या आम्हाला भेटल्यावर खटल्याच्या निकालाची गोष्ट त्यांना आम्ही सांगितली. तेव्हां त्याना अत्यंत आनंद व समाधान झालें ! इतकें कीं, बंगल्याशी पोहोंचेपर्यंत पांच-सात वेळां, " वा, फार चांगलें झालें. चौदा वर्षांच्या श्रमाचे पांग फिटले ! " असे उद्गार स्वतःशीच काढीत ते चालले होते. लहान असल्यामुळें या उत्कट आनंदाचें कारण त्या वेळीं माझ्या तितकेसें लक्षांत आलें नाहीं. पण पुढें टिळक चरित्राचा मदतनीस म्हणून काम करितांना, जेव्हां कोर्टांतील जबान्या व हकी-कती यांचीं छापील पुस्तके मी चाळलीं, तेव्हां पाचपन्नास वेळा कोर्टांत टिळकांतर्फे वकील म्हणून हजर राहून तात्यांनीं काम केल्याचे दाखले त्यांत सांपडले ! कारण कित्येकदां कांहीं वकील पैशाकरितां अडत, तर दुसरे कांहीं राजकीय संबंधाच्या निमि-त्ताने आयत्या वेळीं दगा देत ! पण तात्या हें टिळकांना सर्वतोपरी विश्वासाचें कुळ लाभलें होतें. त्यांचें कोठेहि बाहेर राजकीय काम असो, केसरी मराठ्यांत लेख लिहा-वयाचा असो, कोर्टात टिळकांतर्फे वकीलपत्र दाखल करून काम चालवावयाचें असो, किंवा इतर कसलेंहि काम असो, या साऱ्या कामांत तात्यांची मदत होती. ताई-महाराज प्रकरांतलें आशा निराशेचे सारे चढउतार त्यांनी टिळकांबरोबर सहन केले होते. यामुळें त्यांना या बातमीनें अगदीं परमानंद झाला. " या चौदा वर्षांच्या काळांत

बहुधा एकहि दिवस असा नसेल कीं, ज्या दिवशीं या प्रकरणाची कांहीं काळजी टिळकांना वाहावी लागली नाहीं, किंवा कांही काम करावें लागलें नाही" असें टिळक चरित्रांत त्यांनीं लिहिलें आहे. पण टिळकांबाबत हें म्हणणें जितकें खरें आहे, तितकेंच तात्यांच्या बाबतींतहि खरें आहे. या साऱ्या श्रमांची आठवण किंवा निदान ऋणानुबंध या जगांत नंतर कोण स्मरत असतील ते असोत; पण अशा बाबतींत कर्तव्य केल्याचें समाधान हेंच खरें बक्षीस असतें. ताईमहाराज प्रकरणावर केसरींत "प्रयत्नांतीं परमेश्वर" हा अग्रलेख लिहिल्यावर तात्यांनीं एकदां माझ्याशीं असा तात्त्विक युक्तिवाद केल्याचें स्मरतें कीं, टिळकांनी या बाबतींत जो स्वार्थत्याग केला तो केवळ दुसऱ्यावर परोपकाराकरितां नव्हे तर स्वतःच्या शब्दाकरिता ! बाबामहाराजांना मरतांना टिळकांनी जेव्हां वचन दिलें तेव्हां तो परोपकार होता, पण ट्रस्टीचें कर्तव्य एकदा गळ्यांत पडल्यावर टिळकांनीं पुढें जें जें केलें, तें तें अपरिहार्य म्हणून त्यांना करणेंच होतें ! मनुष्य प्रतिज्ञा करतो तेव्हां तें पुण्य असलें तरी, नंतर स्वतःचा शब्द खरा करण्याच्या सात्त्विक अहंकारानें मनुष्य जेव्हा दीर्घ उद्योग करतो, तेव्हां तो उद्योग हा परोपकारच आहे असें कां म्हणावयाचें ? कृष्णार्जुन–युद्धांतील 'आत्मनस्तु कामाय' हें नारदाच्या तोंडचें वाक्य तात्यांना ओघानें मजकडून वदवावयाचें होतें ! पण त्या वेळीं माझ्या तें लक्षांत आलें नाहीं.

टिळक सुटल्यानंतर अवघ्या चार महिन्यांतच महायुद्धाला सुरुवात झाली. टिळकांच्या सुटकेच्या अगोदर दोन महिने हें महायुद्ध उद्भवतें तर, सहा वर्षांची शिक्षा भोगूनहि सरकार टिळकांना सोडत नव्हतें यांत शंकाच नको ! 'युद्धकालांतील परिस्थितीच्या मिषानें वटहुकूम काढून सरकारनें टिळकांना कदाचित जन्मभर तुरुंगांत डांबून ठेवलें असतें ! पण सर्वांच्या व टिळकांच्याहि सुदैवानें 'दैवाचा फांसा' या वेळीं तरी टिळकांना अनुकूल पडला व ती गोष्ट टळली. कोणीं नाहीं म्हटलें तरी अशा वेळीं सर्वंकष नियतिसत्ता कबूल करून प्रारब्धवाद मान्यच करावा लागतो. यानंतर त्यांनीं कॉंग्रेसमध्यें शिरण्याकरितां समेटाचे प्रयत्न केले, पण ते निरर्थक ठरले. याच वेळीं ना. गोखल्यांना मृत्यु आला. पुण्यांत त्यांची अपूर्व स्मशानयात्रा निघाली. गुलाबाच्या फुलांनीं सर्वत्र त्यांचा देह आच्छादला होता. गोखल्यांना मी प्रथम पाहिलें तें या स्मशानयात्रेच्या वेळींच ! त्यांचें भव्य कपाळ पाहून हा एक वंदनीय देशभक्त होऊन गेला असें मला मनोमन वाटलें !

यानंतर टिळकांनीं पुण्यास प्रांतिक परिषद भरविली. त्याला राष्ट्रीय पक्षाचे सारे लोक हजर होते. अध्यक्ष बॅप्टिस्टा होते व टेबलाच्या एका बाजूला लो. टिळक व दुसऱ्या बाजूला सभेचे सर चिटणीस म्हणून सभेचें तांत्रिक काम तात्या करीत होते. त्या सभेला खाडिलकर, शिवरामपंत परांजपे, वासुकाका जोशी, वि. का. राजवाडे, चिंतामणराव वैद्य, साताराचे दादासाहेब करंदीकर, वऱ्हाडचे वीर वामनराव जोशी,

बाबासाहेब परांजपे वगैरे पांचपन्नास पुढारी मंडळीं हजर होती. यावरून सुरतेस गाजलेला टिळक-पक्ष कसा होता हें आम्हाला डोळ्यानीं पहावयास मिळालें. हाताचीं पांच बोटें जशीं सर्व सारखीं नसतात, त्याप्रमाणें टिळकपक्षांतहि शिवरामपंत परांजपे, खाडिलकर, तात्या व इतर कार्यकर्ते यांमध्यें स्वभावभेद नव्हते असें नाहीं. पण टिळकांचें थोरपण अतें कीं, या त्रिविध किंवा अनेकविध अशा कार्यकर्त्यांना राष्ट्रकार्याला जुंपून, त्यांनीं जेशभक्तीचा मळा शिंपून घेतला ! आज स्वराज्य प्रत्यक्ष अवतरलें असलें तरी, अवघ्या तीस वर्षांपूर्वीं होमरूल लीग स्थापून व राजद्रोहाचे खटले अंगावर ओढवून घेऊन टिळकांनीं स्वराज्याचा उपक्रम कसा केला, हें डोळ्यांनीं पाहिलेलीं व अंतःकरणानें स्मरणारीं माणसें आज देशांत किती तरी आहेत ! वसंत ऋतूंत पळस जागच्या जागीं फुलून जशीं रुक्ष पर्वत शिखरें लाल करून सोडतात त्याप्रमाणें, टिळकांनीं स्वराज्याच्या दौऱ्यांना सुरवात केल्यावर सारी जनता जागृत झाली आणि लोकसमाजाचा सागर प्रचंड लाटांनीं हेलावूं लागला !

स्वराज्याच्या चळवळीची भरती समाज-जीवनाच्या सर्व शाखा-उपशाखांत पसरली व त्या जोमानें काम करूं लागल्या. पूर्वीची वसंत व्याख्यानमाला, शिवाजी उत्सव, वाङ्मय, इतिहास-संशोधन, पैसाफंड, गायन-संस्था व नाट्य-संमेलनें यांचे सध्याचे कार्यक्रम व पूर्वीचे कार्यक्रम यांत जमीन-अस्मानाची तफावत दिसूं लागली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सतेजपणा व उल्हास दिसे. 'स्वराज्य' म्हणजे कुंकुमतिलक आहे हें खरेंच आहे. त्यानेंच हें सारे स्थित्यंतर घडलें. पूर्वीच्या राष्ट्रीय सभेच्या मागण्या म्हणजे स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, वरिष्ठ नोकऱ्या अशा किरकोळ होत्या. या कोणत्याच मागणीची दाद लागेना म्हणून ऐनजिनसी स्वराज्यच द्या अशी एकमुखी मागणी पुढें आली. आयरिश होमरूलच्या धर्तीवर पण 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य' अशी होमरूल लीगनें प्रचाराची दिशा आखल्यामुळें राजद्रोहाची भीति नाहीशी होण्याला व चळवळ पुढें रेटण्याला पुष्कळ वाव मिळाला. लोकांत जो सर्वसामान्य उत्साह व सहानुभूति होती तितकी टिळकांना पुरे होती. उठून तुरुंगात जा, असें त्यानीं व्याख्यानांत सांगितलें नाहीं; वेळ आली तर तयार असा इतकेंच ते सांगत !

या वेळीं मी इंग्रजी सहाव्या इयत्तेंत असेन. व्याख्यानांची मला हौस फार. सर्व व्याख्यान अगदीं शेवटपर्यंत ऐकून उशीरा मी घरीं येत असे. दोन-चार वेळा त्यावेळीं घरीं तात्यांच्याकडे आलेल्या गडकरी मास्तरांची गांठ दारांतच पडली. कुठं गेला होतास ? म्हणून विचारल्यावर 'व्याख्यानाला' असें मी सांगितलें. तेव्हा 'तूं विद्वान होणार' असें त्यांनीं कौतुकानें म्हटलें. शाळेंतल्या तरुण विद्यार्थीवर्गांत ते फार प्रिय असत. विद्यार्थ्यांना ते नेहमीं उत्तेजन देत. याच तरुण पिढीमुळे देशाचा उद्धार होणार आहे अशी त्यांची भावना होती. विद्यार्थ्यांच्या रीतीप्रमाणें त्या वेळीं आमचेहि क्लब व चळवळी होत्या. त्या वेळची देशभक्ति आजहि टिकली आहे अशा दोनच व्यक्ति

मला दिसतात. त्यांचे स्वभाव आजतागायत जसे त्या वेळीं होते तसेच राहिले आहेत, हें मनांत येऊन गंमत वाटते. मनुष्याची परिस्थिति बदलेल, ज्ञान वाढेल, पण स्वभाव मात्र बदलत नाहीं, ही गोष्ट तीस वर्षांच्या अनुभवानें खरी आहे असें मी म्हणतों. त्या वेळीं आमच्या क्लबांत गोपाळ आबाजी देशपांडे व अनंतराव सहस्रबुद्धे हीं दोन समवयस्क माणसें होतीं. देशहिताची त्यांची तळमळ काहीं विशेष होती. पण पुढेंहि त्यांनीं तें व्रत संसारसुखावर पाणी सोडून, अविवाहित राहून जन्मभर पाळलें. त्या वेळचे गोपाळ देशपांडे, आज 'तात्यासाहेब देशपांडे', महाराष्ट्र प्रांतिक कॉं. कमिटीचे चिटणीस आहेत आणि अनंतराव सहस्रबुद्धे यांना आप्पा किंवा आण्णासाहेब सहस्रबुद्धे म्हणतात. ९ ऑगस्ट १९४२ च्या चळवळींत हातावर शीर घेतलेल्या ज्या शूर लोकांनीं भूमिगत होऊन सरकारशीं लढा दिला त्यांत ते होते. सेनापति बापटा-प्रमाणेंच ते अत्यंत साधे व प्रसिद्धिपराङ्मुख आहेत. आयुष्यातील माझे व त्यांचे मार्ग वेगळे असल्यामुळें वीस वर्षांत आम्ही पांच सातदाहि भेटलों नसूं. पण अवचित कोठें रस्त्यात गाठ पडली तरी विद्यार्थिदशेंतील मैत्रीचा तो जुना जिव्हाळा आठवल्या-खेरीज राहात नाही !

लहान वयांत संगति चांगली लाभणें ही आयुष्यातील किती महत्त्वाची बाब आहे हें सांगून कळणार नाहीं. सत्संगाचा महिमा संतश्रेष्ठानीं देखील गाइला आहे. मूळचा अंकुर चांगला असला तरी हीन व्यसनी संगतीनें तो करपून गेल्याचीं उदाहारणें आहेत. मूळचा अंकुर वाईट असला तर मनुष्य थोर विभूतीच्या घरांत जन्म घेऊन तरी उपयोग काय ? कारण मूळ प्रवृत्ति किंवा प्रकृति हीच बलवत्तर ठरते. चांगला अंकुर मूळ चांगली मनःप्रवृत्ति असेल तर हिऱ्याला कोंदण असावें, असें शोभेल. मनुष्य सर्वकाळ कांहीं शिकत नाहीं. जितका तो प्रौढ होतो तितका तो हट्टी म्हणजे 'नाफेर' होतो. म्हणूनच संस्कारक्षम असें बालवय तेंच शिक्षणाकरिता सर्व दृष्टीनें योग्य असें मानलें गेलें असावें. याच सुमारास महात्मा गांधींची एक गोष्ट मी वाचलेली मला आठवते. गांधींचा एक मुलगा लहानपणीं वाईट चालीच्या मुलांत मिसळत असे, म्हणून कोणी हितचिंतकानें ही गोष्ट महात्मा गांधींच्या कानावर घातली. मुलाबाबत गाधींनी काय करायचें तें केलेंच असेल; पण माहिती देणाराला उद्देशून उत्तर केलें कीं, "जोपर्यंत माझ्या मुलाला असें माहीत आहे कीं, बापानें आपणावर विश्वास टेवला आहे, तोंपर्यंत तो कोठे कुणाच्याहि संगतींत असला तरी तो बिघडेल अशी मला भीति नाही !" गांधी दक्षिण आफ्रिकेंतून हिंदुस्थानात आल्याला दोन-तीन वर्षेंच झालीं होतीं. ते अत्यंत उत्तम इंग्रजी भाषा लिहीत. त्यांच्या या वाक्यानें माझें मन वेधलें यांत शंका नाहीं. मुलाला आपण जन्म देतों हें खरें, पण नंतर तो घरांत किंवा बाहेर हिंडू फिरूं लागला म्हणजे चोवीस तास का त्याची पाठराखण करतों ? त्याच्या मनातील मूळ प्रवृत्तीचा अंकुर आणि वर सर्वसाक्षी परमेश्वर हींच त्याच्याजवळ असतात.

आणखी एक गोष्ट असते, ती म्हणजे बापानें आपल्यावर सर्वस्वी विश्वास टाकल्याची जाणीव. पण याची आठवण तो मुलगा मनांत बाळगील तितकीच. महात्मा गांधींनीं वर उद्‌गार काढल्याप्रमाणें कोणताहि बाप याहून मुलाच्या बाबतींत काय करूं शकणार आहे ?

माझ्या सुदैवाने मला आजपर्यंत तरी भिकार संगत जडली नाही; गांधींचे उद्गार मनांत आठवून मला नेहेमी वाटे की, आपण जरी एकटे असलों तरी, तात्यांनी माझ्या सदसद्विवेकबुद्धीवर सर्वस्वी विश्वास टाकला आहे आहे असेंच नव्हे का ? त्या विश्वासाचा भंग झाला तर ती फार अनुचित गोष्ट होईल ! या एका विचाराने आजवर माझें संरक्षण केलेलें आहे. रामदास-तुकारामांइतका मी संत सज्जन नसेन. पण दुराचरणीहि झालों नाही. तात्यांचा सतत सहवास हेंच त्याचें कारण. महात्मा गांधींचें वरील वाक्य अर्थात् हा विचार मनांत येण्याला निमित्त झालें इतकेंच.

शाळेंत किंवा कॉलेजात असतां लोक माझ्याकडे बोट दाखवून म्हणत, " हा केळकरांचा मुलगा. " मी चाळीस वर्षांचा झालों तरी मला " केळकरांचे चिरंजीव " असेंच लोक ओळखीत. मी मुंबईला अलीकडे माटुंग्यासारख्या सरमिसळ वस्तींत बारा वर्षे राहिलों तरी " मिस्टर केळकर्स सन् " हें माझेमागील उपपद कधी सुटलें नाही. मला नवल वाटे की, माझ्या स्वतःचें असें व्यक्तित्व कांही नाहीच का ? मी वकील झालों, संपादक झालों, घरंदाज होऊन पुण्याहून शंभर मैल दूर राहूं लागलों, तरीहि लोकांनी मला स्वतःच्या नांवाने ओळखूं नये आणि जें ओळखावें तें केवळ वडिलांच्या नांवावरून, अमक्याचा अमुक म्हणून, ही गोष्ट मला अन्यायाची वाटे. त्याने माझा कोंडमारा होई. माझा जीव तो केवढासा; पण हें नांवाच्या प्रतिष्ठेचें दडपण बाजवीहून अधिक वाटे. ' केळकरांचा मुलगा ' म्हणून जर त्यांच्यांतील थोडीहि योग्यता माझ्या अंगीं येण्याचा संभव नसला, तर तें उपपद त्या मुलाला लावून त्याच्याकडून भलती अपेक्षा करणें हें अन्यायाचेंच नाही का ? पण इतका विचार कोण करतो ? माझ्या बरोबरीच्या कांही लेखकांनी बापाचें नांवच गाळून टाकून फक्त स्वतःचें नांव व आडनांव लिहिण्याची प्रथा पाडली ! मला तेंहि कधीं रुचलें नाही. माझ्यांत जें कांहीं चांगलें आहे तें सर्वस्वी तात्यांचें आहे, म्हणून त्यांचें नांव माझ्या नांवापुढे लिहितांना मला अभिमानच वाटेल. आणि हें खरें म्हणूनच लोक माझा असा उल्लेख करतात याची मी फिकीर करावयाचें सोडून दिलें. एकदोनदा तर मी असें ठांसून उत्तर दिलें की, " होय ! मी केळकरांचा मुलगा आहें, म्हणूनच तुमच्यापेक्षा अधिक भाग्यवान आहे ! "

तें कसेंहि असो; तरुण विद्यार्थीदशेंत माझ्याकडे अनेकांचें लक्ष होतें खरें. मी मोठ्यांचा मुलगा, अर्थात् पुढे मोठा होणार, म्हणून भोंगळपणाच्या वेड्यावाकड्या सवयी मला जडूं नयेत म्हणून चार-पांच व्यक्तींनी तरी योग्य वेळीं माझ्या चुका दर्शवून मला जन्माचें ऋणी केलें आहे. क्षुल्लक गोष्ट म्हणून आता ती सांगितली तर त्यांना आठवणार नाही, कदाचित आवडणार देखील नाही; पण माझ्या आयुष्यभर

जर ती गोष्ट मला उपयोगी पडली आहे तर तिची आठवण मी कां व कसा विसरेन ? अशा गोष्टीचा उपयोग इतरांना कदाचित होईल, इतक्याच बुद्धीने मी पुढील गोष्टीचा उल्लेख करतों :–

लहानपणीं आम्ही पुण्याच्या आसपासचे कांही डोंगरी किल्ले पाहण्याकरिता सहली केल्या. त्या किल्ल्याच्या माथ्यावर पाय देऊन भोंवताली नजर टाकल्यावर, पूर्वी आमच्या पराक्रमाने स्वराज्य मिळालें होतें व हल्ली तें नाही ही भावना प्रादुर्भूत होऊन इंग्रजांबद्दल द्वेष उत्पन्न होत असे हें सांगावयास नकोच. पण त्या वेळीं आम्ही मुलें कुठे रेल्वेमधल्या कांचा फोड किंवा बिनतिकिटाने प्रवास कर याशिवाय सरकारचें नुकसान काय करणार ? म्हणून एकदा असाच आम्ही दडपून बिनतिकिटाने पुण्यापासून सासवडपर्यंत प्रवास केला; पण शेवटीं तें न जमून भुर्दंड द्यावा लागला. नंतर कांही दिवसांनी ही गोष्ट मी सेनापति पां. म. बापट यांच्याजवळ बोललों. ते हसले नाहीत किंवा असेंच करण्याबद्दल त्यांनी भरहि दिली नाही. किंचित नापसंतीच तोंडावर दर्शवून ते मला म्हणाले, "ज्याला पुढे मोठ्या भांडणांत (राजकारणांत) पडावयाचें आहे त्याने अशा लहान भांडणांत पडूं नये !" बापटाचे शब्द बरोबर होते हें नंतर विचारांतीं माझ्या लक्षांत आलें. तुम्ही मोठ्या देशभक्तीच्या हेतूने करतांना गोष्ट केली खरी, पण कृत्य केलें ते अप्रामाणिकपणे चोरी फसवणुकीचेंच ना ? खासगी जीवनांत 'सभ्य गृहस्थ' या नात्याने ज्याला निरपवाद वागतां येत नाही त्याच्यावर, देशभक्तीचा त्याने पेहेराव चढविला म्हणून लोकांनी कां विश्वास ठेवावा ?

महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांच्याबद्दल सदाशिवराव बापटांच्या तोंडून मी अशीच गोष्ट ऐकली. आण्णासाहेबांच्याकडे एक इसम पाहुणा आला असतां त्याने रेल्वेचें तिकीट न काढतांच प्रवास केल्याची गोष्ट त्यांना सहज बोलतांना सांगितली. त्या वेळी अण्णासाहेब कांही बोलले नाहीत; नंतर एक–दोन तासांनी दुसऱ्या एका इसमास त्यांनी रेल्वेचें तिकीट काढून आणण्याकरिता सांगितलें व त्याने तें आणल्यावर त्या पाहुण्याच्या देखत स्वतःच्या हातांनी फाडून टाकलें. पाहुण्याला आपली चूक लक्षांत आली तेव्हा ते म्हणाले, "परमेश्वराच्या घरीं या गोष्टी मंजूर नाहीत ! त्या करूं नयेत ! "

किरकोळ उसनवारी करण्याची सवय लहान वयांत लागते, पण ती परत करण्याची आठवण राहात नाही. अवगुण सहज जडतो, त्याला प्रयत्न करावा लागत नाही. पण तो घालवून त्याच्या जागीं गुणाची स्थापना करावयाची त्याला विचार लागतो; तो दुसऱ्या कोणी लक्षांत आणल्याशिवाय येत नाही. माझे मित्र सदाशिवराव बापट व मी एकत्र असूं. एक दिवस रस्त्यांत कांही कारण लागलें म्हणून त्यांच्यापासून चार आणे मागितले व त्यांनी ते तात्काळ दिलेहि. आणखी आठ-पंधरा दिवस गेले व पुनः बापट व मी फिरत फिरत गायकवाडवाड्यापाशीं आलों. आम्ही अगदी विश्वासानें

गप्पागोष्टी करणारे स्नेही होतों, तेव्हा बापटांनी म्हटलें, "बापुराव, आज मी तुम्हांला एक गोष्ट सांगणार आहें, पण त्यापूर्वी तुमचें वचन मला पाहिजे की मी जें बोलेन तें तुम्ही मानाल." लहानपणीं उदारपणाहि तितकाच अंगीं असल्यामुळे एका अक्षराने त्यांना प्रश्न न करितां मी तात्काळ त्यांच्या हातावर वचन दिलें. नंतर बापटांनी मला म्हटलें की, "आठपंधरा दिवसांखालीं रस्त्यांत तुम्ही मला एकदा चार आणे मागितले होते ती गोष्ट तुमच्या लक्षांत आहे का तें सांगा!" मला ती गोष्ट आठवली व ओशाळा होऊन मी खिशांत हात घालून चार आणे काढले व त्यांना देऊं लागलों. त्याबरोबर बापटांनी माझा हात पकडला व म्हटलें की, ही गोष्ट तुम्ही कराल म्हणूनच आता ती न करण्याबद्दल मी तुमच्यापासून वचन घेतलें व तें तुम्हीहि मला दिलें आहे! या उत्तराने मी अगदी कुंठीत झालों. तें पाहून बापट म्हणाले, "तुम्ही चार आणे परत द्यावेत या हेतूने त्या गोष्टीची मी तुम्हांला आठवण करून दिली नाहीं. ती अगदी किर-कोळ गोष्ट आहे. परंतु व्यवहारांत उसनवारी करणें हा अवगुण आहे; आणि ती परत करण्याचें स्मरण न राहणें हा मोठा दोष आहे. तुम्ही मोठ्यांचे चिरंजीव, तुम्हीहि यापुढे मोठे होणार. अशा दोषांबद्दल वेळींच तुम्हांस सावध करावें या हेतूनें मी बोललों, त्याबद्दल माफ करा!" या प्रांजल खुलाशांने ती गोष्ट माझ्या मनांत इतकी उत्तम ठसली की, त्यानंतर गेल्या तीस वर्षांत माझ्या हातून पुनः चुकून देखील असें घडल्याचें मला आठवत नाही.

सार्वजनिक संस्थांमध्ये कांही 'हिशेब' असतो व त्या संस्थांशी संबंध ठेवणाऱ्यांनी कसें दक्षतेने वागलें पाहिजे, हें तात्यांशीं संबंध आल्यानें असेंच एकदा लक्षांत आलें. आमच्या घरीं विनायक ××× या नांवाचा मुलगा तात्यांच्या कोणा स्नेह्याने आणून ठेवला होता. तो कॉलेजांत असतां अभ्यासाच्या नांवाने शून्य होता, पण राज-कारणांत निष्कारण लुडबूड करीत असे. आज ॲनी बेझंटचें व्याख्यान ठरव, उद्यां अरुंडेलचा सन्मान कर, परवा जमनादास द्वारकादास याला भेटावयाला जा, हे त्याचे कार्यक्रम असत! यामुळे आम्ही त्याला थट्टेने 'जमनादास द्वारकादास' म्हणत होतों. मी त्याच्यापेक्षा चार वर्षांनी लहान होतों. तेव्हा त्याने मला सहज मी केसरी ऑफिसांत गेल्यावर होमरूल लीगची एक पुस्तिका घेऊन येण्यास सांगितलें. प्रसाराकरिताच हीं पत्रकें छापलीं असून त्यांची किंमत कोठे चार पैसे दोन पैसे अशी असे. यामुळे मला विशेषसें वाटलें नाही. केसरी ऑफिसांत गेलों तों डाव्याच अंगास स्वराज्य-संघाची कचेरी होती. आंत टेबलाशीं कारकून होता व खोलींत बाबुराव गोखले, बाबासाहेब परांजपे, तात्या इत्यादि मंडळी कांही तरी बोलत होतीं. मी दारांत आलेला पाहून तात्यांनी 'काय पाहिजे?' म्हणून प्रश्नार्थक नजरेने माझ्याकडे पाहिलें. तेव्हा मीं घुट-मळत सांगितलें की, विनायक×× ने मला स्वराज्यसंघाचें पॅंफलेट घेऊन येण्यास सांगि-तलें. तात्या इतक्या मंडळींत मला कांही बोलले नाहीत. पण किंचित् नापसंतीदर्शक

न्चर्या करून त्यांनी खिशांत हात घालून दोन आणे काढले आणि कारकुनापुढे टाकून त्याला सांगितलें की, " एक पत्रक याला द्या. " या गोष्टीने सार्वजनिक संस्थांमधून कसें वागावयाचें ही गोष्ट मला इतकी उत्तम समजली की, पुनः तेथून कांहीहि न आणण्याबद्दल मी अगदी खडा लावून घेतला ! असो.

पुण्यांतील त्या वेळच्या विद्वान माणसांत टिळक सोडून खाली यावयाचें तर तरुण पिढीवर खाडिलकर व शिवरामपंत परांजपे यांची छाप होती. सावरकर तुरुंगांत होते. पण विष्णुपंत भट व पी. एम्. बापट यांनी क्रांतिकारक जीवनांत केलेल्या स्वार्थत्यागाबद्दल लोकांना कौतुक वाटे. खाडिलकर हें बरेंच जाडें प्रस्थ होतें. ' नमवी पहा भूमि ह्या चालतांना ' असें कदाचित त्यांचें यथार्थ वर्णन होईल. सामान्य लोक त्यांना भीत असत. टिळक १८९७ सालीं कैदेंतून सुटून आल्यावर त्यांनी जसा ब्रह्मदेशांत प्रवास केला व तो त्यांना अनेक दृष्टींनी हितकर वाटला, तशीच संधि खाडिलकर यांना देण्याकरितां त्यांनी त्यांना नेपाळांत फिरून येण्याला सांगितलें व त्याप्रमाणे ते नेपाळांत कांही दिवस राहूनहि आले. विशेषतः वर्तमानपत्रांशीं संबंध असलेल्या माणसांनी प्रवास जरूर करावा. आपल्या डोक्यांत शक्याशक्यतेच्या पुष्कळदा अयथार्थ कल्पना असतात त्या आपोआप प्रवासाने दुरुस्त होतात व कांही नवी दृष्टि येते, असाहि हें सांगण्यांत टिळकांचा हेतू होता. त्याप्रमाणे खाडिलकरांनी नेपाळ पाहिलें व त्याबद्दल विशेषसा कांहीच गाजावाजा न करतां ते पुनः केसरींत नित्यक्रमाला लागले. चित्रमय जगतांत ते महायुद्धासंबंधी लेख लिहीत, ते आम्हांला कळत नसत. पण खाडिलकरांचीं एक-दोन व्याख्यानें मला आवडलीं. एकदा एका नाट्यसंमेलनांत त्यांनी शाकुंतलाच्या चौथ्या अंकाचें फार मार्मिक विवरण केलें. आणि दुसऱ्या एका प्रसंगीं त्यांनी सार्वजनिक सभेंत इंग्रजींत भाषण केलें तें तात्यांनाहि आवडलें. घरीं आल्यावर जेवतांना त्यांच्या व माझ्या मनांत तो व्याख्यानाचा विषय कांही वेळ होता. मला उद्देशून ते म्हणाले, ' खाडिलकरांची बुद्धि कशी आहे पहा ! ' ( ते मनावर घेतील तर इंग्रजींतहि मुद्देसूद भाषण करतात. ) पुष्कळ राजकीय पुढारी सार्वजनिक नसले तरी खासगी बैठकींत आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांची निंदा करतात. पण ' गतगोष्टी ' या पुस्तकांत लिहिलेलें वस्तुवर्णन सोडून गेल्या तीस वर्षांत खासगी रीतीनेहि त्यांनी खाडिलकरांसंबंधी कधीं अनुदार उद्गार काढला किंवा टीका केली अशी गोष्ट एकदाहि घडलेली मी पाहिली नाही.

शिवरामपंतांचें व्यक्तिमत्त्व कांही और व खाडिलकरांच्यापेक्षा वेगळें होतें. त्यांच्यासारखा प्रभावी वक्ता अद्याप झाला नाही. टिळक, चिपळूणकर किंवा तात्या यांच्या भाषाशैलीचें अनुकरण करता येईल, पण शिवरामपंतांची भाषाशैली इतकी असामान्य होती की, ती त्यांच्याखेरीज कोणाला साधली नाही; आणि आज तो भाषेचा नमुना कालाच्या उदरांत त्यांच्याबरोबर लुप्त झाला. त्यांच्या लेखनाची आणि

वक्तृत्वाची १९०८ सालापर्यंत अगदी शीग पोचली. पुढे सरकारने 'काळ' पत्र बंद पाडून त्यांचें सर्व वाङ्मय जप्त केलें, त्यामुळे त्यांच्या जीवनावर निराशा पसरली; आणि मस्तकांतील मणि हिरावून घेतलेल्या अश्वत्थाम्याप्रमाणे सूडाचे निश्वास टाकीत ते निष्क्रियतेने वावरत आहेत असें वाटे.

त्यांच्या वतृक्त्वाचा स्फुल्लिंग कसा दाहक व दीप्तिमान असे हें मी एकदा वसंत व्याख्यानमालेंत पाहिलें. १९१७ सालीं 'मराठेशाहीचा शतसांवत्सरिक दिवस' या विषयावर तात्यांचें व्याख्यान झालें. 'मराठे व इंग्रज' हें पुस्तक लिहिण्याकरिता त्यांनी जी माहिती जमविली होती, तिचाच पुष्कळसा उपयोग केल्यामुळे हें व्याख्यान किती मनोरंजक व माहितीने ओथंबलेलें झालें असेल हें सांगावयास नकोच. याच व्याख्यानांत बाळाजीपंत नातू याने शनिवारवाड्यावर आपल्या हाताने झेंडा लावला व नंतर उद्विग्नता व उपरती वाटून त्याने काशीयात्रा केली असा उल्लेख आला होता. व्याख्यान दोन सव्वा-दोन तास रंगल्यावर नंतर शिवरामपंतांचें भाषण झालें. तात्यांनी आपल्या भाषणांत प्रो. सीली याचा आधार घेऊन, 'मराठेशाही कशाने बुडाली' याची जी मीमांसा केली त्या विषयाला शिवरामपंतांनी स्पर्शच केला नाही; पण दुसरी कांही सुरवात करून पांचच मिनिटांत ते बाळाजीपंत नातूच्या उल्लेखाशी आले! क्रोधावेशाने त्यांचा आवाज थरथर कांपत होता. "ज्या देशद्रोही मनुष्याने आपल्या हाताने शनिवारवाड्यावर निशाण लावलें त्या हाताचें पातक धुवून काढण्याला कोणतें तीर्थ आहे? देशद्रोहाचें पातक नाहीसें करील असे फक्त एकच तीर्थ या जगांत आहे. तें म्हणजे धारातीर्थ होय!!" झालें. या शब्दांनी श्रोत्यांच्या भावनांचा प्रकर्ष त्यांनी इतका वर खेचीत नेला की, टाळ्यांचा कडकडाट झाला! तात्यांनी दोन तास भाषण करून जी आपल्या विद्वत्तेची छाप पाडली ती शिवरामपंतांनी अवघ्या दहा मिनिटांत केवळ वक्तृत्वाने पुसून टाकली! मनांतून तात्यांना या गोष्टीचें साहजिक वैषम्य वाटलें व पुढे एका शिव-राज्याभिषेकोत्सवाच्या वेळीं, तात्या अध्यक्ष व शिवरामपंत वक्ते असा प्रसंग आला तेव्हा त्यांनीहि शिवरामपंतांवर बाजू उलटवून मागच्या या प्रसंगाचें उसनें फेडून घेतलें! यांत स्पर्धा उघडच दिसली. पण ती असली तरी, बोलून चालून ती विद्वत्तेच्या क्षेत्रांतील, उघड्या मैदानांतली स्पर्धा होती. त्यांत व्यक्तिद्वेष नव्हता. पुण्यांतल्या या बौद्धिक स्पर्धा म्हणजे मेजवानी होती.

स्वराज्य संघाच्या चळवळीच्या प्रसाराकरिता तात्यांनी पांच-सहा पुस्तकें लिहिलीं त्यांत 'केस् फॉर इंडिअन होमरूल' या पुस्तकाचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. किर्लोस्कर थिएटरांत बॅप्टिस्टा यांच्या अध्यक्षतेखालीं त्याचें 'होमरूल' वर व्याख्यान झालें, त्यांत आयरिश इतिहासांतील त्यांनी अनेक दाखले देऊन आपलें म्हणणें समर्पक रीतीने उत्तम वकिलाला शोभेल असें मांडलें होतें. बॅप्टिस्टा हे स्वतः बॅरिस्टरच असल्यामुळे त्या व्याख्यानाने खूष झाले. "केळकरांच्यासारखीं शंभर

माणसें मला द्या. मी तुम्हांला स्वराज्य मिळवून दाखवितों " असे त्यांनी उद्गार काढले ! मॉंटेग्यु हिंदुस्थानांत आल्यावर त्यांच्या हातीं स्वराज्याची लेखी कैफियत देतां यावी अशा उद्देशाने पाल बाबू यांना तें पुस्तक लिहिण्याकरितां बोलावण्याचा टिळकांचा उद्देश होता; पण अवघ्या तीन आठवडयांत विष्णुपंत भट यांना हाताशीं घेऊन तात्यांनी हें पुस्तक झपाट्याने लिहून पुरें केलें. या पुस्तकांत इतके राजकारणविषयक आंकडे माहिती व उतारे खचून भरलेले आहेत की, " राजकारणावरील एखादें पाठ्यपुस्तक किंवा उत्तम संदर्भ ग्रंथ म्हणून हिंदी राजकारणाच्या विद्यार्थीस त्याचा सदैव उपयोग होण्यासारखा आहे, असे उद्गार मद्रासचे पट्टाभि सितारामय्या यांनी काढले. हें पुस्तक पाहिल्यावर टिळक फार संतुष्ट झाले. पालबाबू यांना हें पुस्तक लिहिण्याकरिता आपण बोलावणार होतो याचा तात्यांना राग आला होता. याकरिता त्यांना ते मोकळ्या मनाने म्हणाले, " तुम्ही इंग्रजी भाषा फार सुरेख लिहितां ! " तात्या त्यावर हसत म्हणाले, " तुमच्याकडून जर माझ्या इंग्रजी भाषेला सर्टिफिकेट मिळत असेल तर मराठी भाषेबद्दल महाराष्ट्र सर्टिफिकेट देण्याला तयार आहे. ! "

१९१६ सालीं टिळकांचा एकसष्टावा वाढदिवस साजरा झाला. त्या वेळीं तात्यांनी एक लक्ष रुपयांची पर्स टिळकांना अर्पण करण्याची कल्पना काढून, अवघ्या दोन तीन आठवड्यांत सिद्धीस नेली. त्यांत त्यांनी स्वतः हजार रुपये दिले होते. टिळक चरित्रांत यासंबंधाने जें वर्णन आहे, त्यांत " एका गृहस्थाने टिळकांना एक लक्ष रुपयांची पर्स देण्याची कल्पना काढली " असा स्वतःचा नामोच्चार न करतां अगदी तिऱ्हाइतासारखा कसा उल्लेख केला आहे तो अवश्य काढून पहावा! एखाद्या सार्वजनिक 'निधी'ला केवळ तो जमविण्याची मेहनत आपण करतों इतक्याकरिता स्वतःचेंच नांव देण्याचा कित्येकांना अलीकडे मोह होतो. त्यांना वरील उदाहरणापासून कांही थोडें शिकण्यासारखेंहि असेल ! ज्या दिवशीं अहेर अर्पण व्हावयाचा त्या दिवशीं अठ्याण्णव हजार रुपये व वर कांही असे प्रत्यक्ष हातांत आले होतें व कांही आश्वासनांचे पैसे वाट चालत होते. अर्थात हे जमा धरतां एक लक्ष पुरे झाले असें तात्यांना जाहीर करतां आलें असतें; पण त्यांची वास्तववादी सत्यभावना इतकी तीक्ष्ण होती की, इतर कोणाचाहि आग्रह किंवा भीड यांना बळी न पडतां, जी रक्कम प्रत्यक्ष जमा झाली तोच आंकडा त्यांनी जाहीर केला. एक लाख रुपये जमा झाले असें म्हटलें नाही ! याचेंच नांव 'केळकर'. तात्यांचे गुण आज मुक्तकंठाने वर्णन करणारांनी तात्यांच्या या खऱ्या गुणापैकी अंशमात्र जरी उचलला तरी अधिक कार्य होणार नाही काय ?

१९१७ सालीं मी ऐन मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळीं नवज्वराने आजारी पडलों. दुखणें विकोपाला जाऊन पुढे वात झाला व शेवटच्या दिवशीं डॉक्टरांनी माझी आशा जवळ जवळ सोडली होती. योगायोग असा की, ज्वराच्या नवव्या दिवशीं सकाळीं महर्षि आण्णासाहेब पटवर्धन वारले. त्या दिवशीं सोमवार होता व दुसऱ्या दिवशीं 'केसरी'

ही एक अडचण होती. तेव्हा दर पंधरा मिनिटांनी आत येऊन माझी नाडी पाहात आणि लगेच बाहेरच्या खोलींत जाऊन आण्णासाहेब पटवर्धनांचा मृत्युलेख तात्या तोंडाने सांगत होते. या दोन्ही गोष्टी ते एकाच वेळीं कशा करूं शकत हें खरोखर नवल आहे. आण्णासाहेब पटवर्धन यांचा केसरींतील मृत्युलेख इतका उत्कृष्ट वठला आहे की, लेखकाचा स्वतःचा मुलगा मृत्युशय्येवर असतां हा लेख लिहिला गेला आहे हें सांगूनदेखील खरें वाटणार नाही ! माझ्या आजाराची बातमी गावांत पुष्कळ पसरली होती, यामुळे तात्यांनी हा लेख कोणत्या परिस्थितींत लिहिला ही गोष्ट अनेकांनी पाहिली आहे ! जुन्या प्लेगच्या दिवसांत टिळकांचा मुलगा मृत्युशय्येवर असतां टिळक निर्विकार मनाने केसरीचीं प्रुफें पाहून देत होते, अशी गोष्ट मी ऐकली होती. तात्यांच्या आयुष्यांत तशीच तंतोतंत ही गोष्ट घडली.

१९१८ सालीं प्लेग व इन्फ्लुएन्झा या दोन सांथी सख्ख्या बहिणींप्रमाणे हातांत हात घालून आल्या. प्लेग जुनाच असल्याने लोकांना माहीत होता; पण इन्फ्लुएन्झाने हजारो लोक मेले त्यामुळें पुण्यावर अवकळा आली. शेतांत उभे पीक असतां टोळधाडीने तें अकस्मात नाहीसें व्हावें असें सगळीकडे उजाड झालें. रस्ते शून्य दिसत आणि प्रेतांची अशी रांग लागली होती की, चित्रशाळेजवळ एखाद्या घरीं बसून दर दहा मिनिटांनी प्रेतें मोजावीत. कांही घरे अशीं होतीं की, त्यांतलीं सहासात माणसें नाहीशी झाल्यामुळें घरच बसलें. त्यांतून एकस्या दुकस्या मागे राहणाराची स्थिति कशी वेडावल्यासारखी झाली असेल याचें कोण वर्णन करूं शकेल ! स्मशानभूमींत प्रेतें नेण्याला माणसे मिळेनात तेव्हा श्री. पां. म. बापट यांनी स्मशान फंड उभारून तें काम केलें. खाली मान घालून व तोंडावरून उपरणें घेऊन त्यांनी कितीतरी प्रेतांना खांदा दिलेला मी पाहिला आहे. " राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बांधवः " ही ओळ मला आठवे. पैकी राजद्वारांत बांधव पुष्कळ मिळतात, स्मशानांतच कोणी मिळत नाहीत ! सेनापति बापटांचें असें अलौकिक अबोल चरित्र मी पाहिलें !

या प्लेगच्या सांथींत आम्ही आमराई कँपांतल्या झोपडींत राहावयास गेलों. दुसरी सोय नसल्यामुळे दत्तोपंत आपटे हेहि तेथेंच निजावयास येत. त्यांचा स्वभाव पराकाष्ठेचा भिडस्त होता, हें पहिल्याच दिवशीं आमच्या प्रत्ययाला आलें. त्या वेळीं शहरांत वीज आलेली नव्हती व हरीकेन कंदिलावर भागवावें लागत असे. विशेष चिरगुटें, पांघरुणें, गाद्या याहि झोपडींत नेलेल्या नव्हत्या, म्हणून खाली एक जाजम पसरून मी, आण्णा, विठ्ठल व दत्तोपंत आपटे झोपी गेलों. कंदील मालवला होता व काड्याची पेटी माझ्या उशागती होती. थंडी असल्यामुळें पहाटे दत्तोपंतांना लघ्वीला जावयाचें होतें. पण बाहेर अंधेर व दिवा नाही. ते विडी वगैरे ओढीत नसल्याने जवळ आगपेटी नाही. बरें आण्णा किंवा मी शेजारींच होतों, अंगाला हात लावून जागें करावें की नाही ? पण त्या भिडस्त ब्राह्मणाला तें धैर्य होईना. तेव्हा आण्णाला

उद्देशून " जागे आहांत काय ? " अशी हांक मारण्याला त्यांनी सुरुवात केली. " जागे आहांत काय ? " अशा दोन तीन हांका ऐकल्या, तेव्हा दत्तोपंतांचा आवाज ओळखून मी उठून कंदील लावला. तेव्हा दिसलें की हा गरीब ब्राह्मण आण्णाच्या शेजारी अंधारांत उभा राहून त्याला हांका मारीत आहे ! आम्ही सारीं मुलें लहान सोळा वर्षांचीच होतों. पण दुसऱ्याच्या अंगाला स्पर्श कसा करावयाचा इतकी भीड ! लहान वयांत थट्टखोरीहि अंगात मुबलक असते, तेव्हा दत्तोपंतांचें नांव आम्ही "–जागे आहांत काय –? " असें ठेवून दिलें व त्यांच्या सारखा आवाज काढून त्यांची नक्कलहि करीत होतो ! याच प्लेगच्या दिवसांत तात्यांनी ' मराठे व इंग्रज ' हें पुस्तक लिहून पुरें केलें तेव्हा ऐतिहासिक चर्चा व टिपणें करून दत्तोपंत तात्यांना मदत करीत. त्यावरून हा एक निगर्वी पण विद्वान मनुष्य आहे हेंहि आम्हांला कळून आलें. दत्तोपंत आपटे यांची व माझी पुढे चांगली ओळख झाली. महात्मा गांधींना सत्याच्या प्रयोगांत सत्य आणि अहिंसा यांचा अखेर पत्तामुद्दा लागला किंवा नाही या गोष्टीशीं मला कर्तव्य नाही. पण दत्तोपंतांकडे पाहून मी तरी असें खात्रीने म्हणूं शकेन की, निर्धनता हेंच परमसुख मानून त्यांनी आजन्म विद्येची आराधना केली व एखाद्या योग्याप्रमाणें संसारांत ते अगदी निरिच्छ मनाने राहिले होते. अहिंसा, सत्य व अस्तेय हे गुण त्यांच्या अंगीं मूर्तिमंत वास करीत होते !

१९१८ सालीं तात्या म्युनिसिपालिटीचे पहिले लोकनियुक्त ' अध्यक्ष ' निवडून आले. यापूर्वी अध्यक्षाची जागा ही सरकारी सभासदाची मिरास असे. पुढे ती हरिभाऊ आपट्यांसारख्या नेमस्त लोकांकडे गेली. तरी नेमणूक सरकारीच होती. पण नवे नियम झाल्यामुळे सरकारी सभासद विरुद्ध राष्ट्रीय पक्षाचा सभासद असा चुरशीचा सामना झाला. मतमोजणी झाली तेव्हा निकाल कळण्याकरिता रे मार्केटच्या वरच्या हॉलमध्ये गर्दी उडाली होती. निकाल लागून जेव्हा हरिभाऊ आपटे व तात्या यांनी खुर्च्यांची अदलाबदल केली तेव्हा टाळ्यांचा गजर झाला. लोकांनी पेढे वाटले व आमच्या घरींहि आणून दिले. त्या वेळच्या म्यु. निवडणुकी आतापेक्षा मतदारीचें क्षेत्र लहान असल्यामुळे इतक्या खर्चाच्या नसत. तात्यांची लोकप्रियता चांगली असल्यामुळे त्यांची निवडणूक बिनखर्ची होई. पण अगदी कांही नाही म्हटलें तरी शेंदोनशें रुपये त्या दिवशी खर्च होत. तो खर्च सार्वजनिक कामाकरिता म्हणून केसरी कचेरीतर्फे होत असे. म्युनिसिपालिटीशी संबंध असलेल्या त्या वेळच्या सार्वजनिक कार्यकर्त्यांत शंकरराव लवाटे हे अगदीच निर्द्रव्य होते. आपल्या नांवाचीं हँडबिलेंदेखील छापण्याइतका त्याचेजवळ पैसा नसे. तात्या विनोदाने म्हणत, " ज्या दिवशीं लवाटे पुण्याच्या नगरपालिकेचे अध्यक्ष होतील त्या दिवशीं लोकशाही मूर्तिमंत आली असें मी म्हणेन ! "

मी कॉलेजांत जाऊं लागलों तेव्हा वाढत्या शिक्षणामुळे घरगुती खर्चाचें प्रमाणहि

वाढलें होतें. आमची सांपत्तिक स्थिति सामान्य म्हणजे गरिबीचीच होती. १८९६ पासून १९१८ सालापर्यंत तात्यांना केसरी ऑफिसकडून अवघा शंभर रुपये पगार मिळे. तेवढ्यांत भागत नसे म्हणून संसाराच्या खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरिता तात्यांनी चार पांच नाटकें लिहिलीं. १८९७ सालपर्यंत केसरीची आर्थिक स्थिति अशी होती की टिळकांनाच लॉक्लासवर जादा उत्पन्न करावें लागे. टिळक तुरुंगांतून आल्यावर ताई महाराज प्रकरण सुरू झालें. त्यांत टिळक आकंठ कर्जांत होते. १९०८ ते १९१४ या सहा वर्षांत एकीकडे टिळक तुरुंगांत असतां केसरी कसा वांचतो याचीच काळजी होती. महायुद्धाच्या काळांत केसरीची सांपत्तिक स्थिति सुधारली; पण टिळक इतके मोठे उद्योग काढीत की, शिलकी सर्व पैसा जवळ जवळ खलास होई. रवींद्रनाथ टागोर ज्या वेळीं परदेशांत जावयास निघाले त्या वेळीं टिळकांनी एक रकमेने त्यांना पन्नास हजार रुपये पाठवून दिले ! आणि इतर चळवळींतहि टिळक उदार मनाने खर्च करीत; मागे शिल्लक काय रहात असेल याची फिकीर फारशी करीत नसत ! या खर्चाची तजवीज करतांना बाबा विद्वांस अगदी मेटाकुटीला येत, पण टिळकांची कीर्ति हेंच त्यांनीं आपलेंहि वैभव मानलें होतें. बाबांच्याप्रमाणे तात्यांनीहि तशीच भावना ठेवून आपणांला पगार कमी पडतो याबद्दल तक्रार केली नाही किंवा विषाद मानला नाहीं. तथापि त्या दोघांत एक फरक असा होता की, बाबांचें राहणें व संसारहि टिळकांच्या संसारांतच होता, वेगळा नव्हता. तात्यांची गोष्ट वेगळी होती. पगार पुरला नाही तर खर्चाला जास्त पैसे खातीं मांडून मिळत व असे खातीं मांडलेले पैसे टिळकांनी कधी परत मागितले नाहीत, सोडून दिले हें खरें, पण ही जेमतेम हातातोंडाशींच गांठ होतीं. तात्पर्य १८९६ पासून १९१८ पर्यंत वीस बावीस वर्षे त्यांनी अवघ्या शंभर रुपयांवर राहून केसरीची सेवा आणि सरस्वतीची उपासना निष्कांचन परिस्थितींत केली यांत काडीमात्र अतिशयोक्ति नाही. निर्धनता हें निस्पृह माणसाचें दूषण नव्हे, भूषण आहे.

या स्थितींत अगदी अनपेक्षित रीतीने बदल घडून आला. टिळक विलायतेला जाण्याच्या एखादें वर्ष आधीची ही गोष्ट असावी. स्वराज्यसंघाची कांही पुढारी मंडळी बसून चर्चा करींत असतां त्यांच्यांतच अशी कल्पना निघाली की, तात्यांनी होमरूल लीगचें काम कायम चिटणीस म्हणून करावें. केसरी व मराठा दोन्ही पत्रें त्यांच्याकडे असतां पुनः हेंहि काम त्यांच्याच अंगावर विनावेतन टाकावें हें बरें नाही असें त्यांचें त्यांनाच वाटलें, म्हणून होमरूल लीगने त्यांना दोनशें रुपये पगार द्यावा व केसरीकडून शंभर मिळावे अशीहि गोष्ट जवळ जवळ सर्वसंमत झाली. या संभाषणांत तात्या किंवा टिळक दोघेहि हजर नव्हते. पण नंतर त्या मंडळीपैकीच कोणी तरी ही गोष्ट टिळकांच्या कानावर घातली. त्यांना ही गोष्ट कदाचित आवडली असेल अगर नसेलहि; पण ते इतकेच म्हणाले की, तात्याच तुम्हांला होमरूल लीगचे चिटणीस हवे आहेत याचा अर्थ त्यांचें काम तुम्हांला मनापासून पसंत आहे. ते हें काम कायम पत्करतीलहि. पण

त्यांचा चिटणिसाच्या कामाचा पगार होमरूल लीगने देण्याचें कारण नाही; मीच पुढल्या महिन्यापासून त्यांना तीनशें रुपये देत जाईन म्हणजे झालें! आणि याप्रमाणे पुढल्या महिन्यापासून त्यांना शंभराऐवजी तीनशें रुपये मिळूं लागले! तात्पर्य, त्यांचें हें स्वार्थत्यागी जीवन इतकें उघड होतें की तें कोणाहि जवळच्या माणसांना दिसावें. या साऱ्या बिनबोलक्या स्वार्थत्यागाच्या गोष्टी आहेत. त्याचा चुकून एकदाहि स्वतः उच्चार केला तरी सारें स्वारस्य नाहीसें होतें, म्हणून उभ्या जन्मांत तात्यांनी या गोष्टीचा कधीहि उच्चार केला नाही. उलट 'माझ्या सुदैवाने मला टिळकांच्यासारख्या थोर मनुष्याचें सान्निध्य लाभलें म्हणून मी उर्जितावस्थेला आलों' असेच त्यांनी कृतज्ञतेने टिळकांच्या संबंधीं पुढे वेळोवेळीं उद्गार काढले. मीहि या गोष्टीचा उल्लेख टाळला असता. पण ही गोष्ट कळल्याशिवाय त्यांच्या स्वार्थत्यागाचें स्वरूप वाचकांच्या एरवी लक्षांतच येणार नाही, यामुळे निरुपायाने हा उल्लेख केला आहे इतकेंच!

# ७

# तात्यांची विलायत-यात्रा

१९१८ सालीं मॉंटेग्यू हिंदुस्थानांत येऊन गेले. त्यामुळें स्वराज्याच्या मागणीला तेज चढलें. लखनौ-करार होऊन हिंदु-मुसलमानांचें ऐक्य झालें होतें; तसेंच स्वराज्य मिळावयाचें तें पार्लमेंटच्या बिलाच्या द्वारे हीहि गोष्ट सर्वमान्य असल्याने सनदशीर राजकारणाला तेज चढलें होतें. मॉंटेग्यूसाहेबांनी तेथे कांही पुढाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या; पण विलायतेस शिष्टमंडळें धाडून पार्लमेंटरी कमिटीपुढेच साक्षी द्याव्या असें ठरलें. चिरोल कमिशनचें मुंबईचें काम आवरलें होतें व पुढे खटल्याकरिता टिळकांना विलायतेस जावयाचेंच होतें म्हणून त्यांनी विलायतेचा आपला बेत ताबडतोब मुक्रर केला. होमरूल-लीगचे शिष्टमंडळ नंतर जावयाचें होतें.

टिळक विलायतेला निघाले त्या वेळची एक गोष्ट आठवून मला हसूं येतें! गायकवाड वाड्यांतून ते निघण्यापूर्वी त्यांना निरोप देण्याकरिता आम्ही सर्व घरगुती माणसें ताई सुद्धा त्यांना नमस्कार करण्याकरिता त्यांच्या घरीं गेलों होतों. आम्ही

मुलांनी त्यांना नमस्कार केला. पण ताईने नमस्कार करतेवेळीं टिळकांनी ताईला ओळखलेंहि नाही, याचें मला अतिशय नवल वाटलें! बाबा विद्वांस तेथेंच होते. त्यांनी सांगितलें की, 'ही केळकरांच्या घरांतील मंडळी!' टिळक उभ्याउभ्याच संकोचाने म्हणाले–"यांना मी कधी पाहिलें नव्हतें!" आणि खरें सांगावयाचें तर टिळकांच्या घरीं जाण्याइतका जुन्या चालीच्या राहणीमुळे ताईचा घरगुती संबंधहि कधी येत नव्हता. तात्यांचा आणि टिळकांचा काय असेल तो सगळा 'सार्वजनिक' संबंध. हे संबंध केवळ 'व्यक्तिगत' म्हणजे त्या त्या व्यक्तीपुरतेच मर्यादित असतात. इतकें कशाला? टिळकांच्या दोघांहि चिरंजिवांचा व माझा आजवर कधीहि संबंध आला नाही. धाकटे चिरंजीव भेटले तर क्वचित एखादा दुसरा शब्द बोलत. पण थोरले चिरंजीव रामभाऊ यांच्याशी अद्याप जन्मांत एकदाहि बोलण्याचा प्रसंग आला नाही. आणि पुढे येईल असें वाटत नाही!

टिळक विलायतेस रवाना झाल्यावर इकडून तिकडे शिष्टमंडळाकरिता योग्य माणसें निवडून त्यांना विलायतेस पाठविण्याचें काम तात्या करीत होते. पुढेमागे आपणांलाहि जावें लागेल या अंदाजाने त्यांनीं केसरीचें संपादकत्व सोडून खाडिलकरांच्या हवालीं केलें. याच अवधींत एक चहाच्या पेल्यांतील वादळ उद्भवलें. ना. विठ्ठलभाई पटेल यांनी मुंबई कौन्सिलांत असें बिल आणलें होतें की, कांही गुजराती पोटजाती या अत्यंत लहान असल्यामुळे त्यांना वर मिळण्यास पंचाईत पडते. यास्तव 'हिंदुधर्मांत केलेला कोणताहि विवाह हा आंतरजातीय असला तरी निषिद्ध ठरूं नये!' या बिलामुळे पुण्यांतील सनातनी समाजांत बॉंबगोळा पडला. कायद्याने हिंदुधर्मांत संकर विवाह होणार म्हणजे काय गोष्ट आहे! सुप्रसिद्ध क्रीडाभुवनांतले दंगे, ग्रामण्य प्रकरण, तसेंच कॉंग्रेसचा मंडप जाळण्याची मसलत पुण्यांतच झाली नव्हती काय? यामुळें सनातनी लोक चवताळून गेले. हें बिल कोणावर सक्ती करणार नव्हतें, केवळ अनुज्ञापक होतें, इतक्याकरिताच तात्यांनी त्याला संमति दिली होती. पण किर्लोस्कर थिएटरांत जेव्हा सभा भरली तेव्हा 'शेम शेम' अशा शब्दांचा वर्षाव करून लोकांनी तात्यांना बोलूं दिलें नाही व सभा उधळून लावली. वामनराव जोशांसारख्या कित्येकांनी मार खाल्ला. तेव्हा ईर्षेला पेटून बिलाबद्दल अनुकूल मत असलेल्यांनी पुनः किर्लोस्कर थिएटरांतच सभा करण्याचें ठरविलें. त्यांत अर्थात् नेमस्त व ब्राह्मणेत्तर पक्ष यांचा पुढाकार अधिक होता. तात्यांनीं या सभेला जावें की न जावें याबद्दल आमच्या घरांतच दुमत झालें. या सभेला रँगलर परांजपे, काळे, कामत वगैरे नेमस्त लोक, तसेच अण्णासाहेब भोपटकर वगैरे राष्ट्रीय पक्षाचे कांही लोक हिरीरीने येणार होते. पण या सभेला जावयाचें नाही असें तात्यांनी ठरविलें. किंबहुना आक्काशीं व माझ्याशीं त्यांनी असा युक्तिवाद केला की, "या सभेला जाऊनच मला या विषयावरील माझें मत प्रदर्शित करतां येतें असें नाही. माझें मत मला हव्या त्या इतर मार्गांने व्यक्त करतां येण्यासारखें आहे! ही

सभा विशेषतः नेमस्त लोकांनी भरविलेली आहे. ती कांही राष्ट्रीय पक्षाने भरविलेली सभा नाही. ज्या लोकांशीं माझें मत पंचाण्णव टक्के जमतें, फक्त पांच टक्के जमत नाही, त्यांना नाराज करून मी प्रतिपक्ष्याशीं काय म्हणून सहकार्य करूं? कोणी मला मनोधैर्य नाही असें म्हटलें तरी त्याने फसून मी माझा पक्ष सोडण्यास तयार नाही!" मला तात्यांचें म्हणणें त्या वेळीं पटलें नाही, पण त्या वेळीं त्यांच्या वागण्यांत खरोखरच व्यावहारिक शहाणपण होतें हें नंतर लक्षांत आलें. हें लोकमतांतील आगांतुक वादळ जसें आकस्मिक उद्भवलें तसेंच आपोआप शमलें!

एक दिवस चिरोल केसचा निकाल टिळकांच्या विरुद्ध लागल्याची तार आली! इतकेंच नव्हे तर विरुद्ध पक्षाचा खर्च देण्याची पाळी येऊन तीन लक्षांचा भुर्दंड अंगावर बसला! जातांनाच त्यांनी राहता गायकवाड वाडा गहाण टाकून त्यावर कर्ज काढलें होतें. पण हें कर्ज फेडावयाचें तर राहतें घरदार विकून वर केसरी छापखानाहि भरीला घालण्याची वेळ आली होती! हें संकट टाळण्याकरिता इतरांच्या मदतीने तात्यांनी तीन लक्ष रुपयांचा पर्सफंड जमविला व टिळकांना ते पैसे तारेने रवाना केले. हा दावा टिळकांनी खाजगी लावला असला तरी वस्तुतः त्याचें स्वरूप सार्वजनिक होतें, म्हणून राष्ट्रीय पक्षांतल्या लोकांनी तें स्वतःचेंच ऋण समजून तत्परतेने मदत केली. याबाबत घरचेंच एक उदाहरण सांगतों. बापटांना या वेळीं सार्वजनिक सभेचे कारकून म्हणून अवघा तीस रुपये पगार होता. पण त्यांनी एकदम पांचशें रुपये पर्स-फंडाला देऊन टाकले! केसरी ऑफिसमधील कित्येकांचा आंकडा याहून कमी होता! म्हणून तुम्ही आपल्या शक्तीबाहेर इतका स्वार्थत्याग कां केला, असें मी बापटांना नंतर विचारलें. ते इतकेच म्हणाले की, "कांही देशभक्ति हातून व्हावी म्हणून प्रथम मी अविवाहित राहिलों. पण पुढें देशभक्तीचा जो मार्ग मी योजला होता तो अशक्य असल्यामुळे अखेर नोकरी करून मामुली नित्य मार्गाला लागलों. आमच्या हातून आता विशेष काय होणार? म्हणून जीं माणसें देशकार्य रेटीत आहेत त्यांच्याकरिताच आपण जीव गहाण टाकावा असें ठरविलें! घरांत लग्नकार्य निघालें म्हणजे वेळप्रसंगीं आपण कर्जहि काढतों व तें नंतर फेडतों ना? मला नाही संसार की बायकामुलें. म्हणून हेंच कर्ज असें समजून नंतर दोन-तीन वर्षें फेडत बसायचें, त्याला काय उपाय?" बापटांचे हे शब्द ऐकून मला कांहीसें गहिंवरून आलें. या प्रसंगाने लक्षांत आलें की, लोकमान्य टिळकांनी व तात्यांनी जीं माणसें जोडलीं तीं अशीं होतीं! ओघालाच आलें म्हणून सांगतों, ती. तात्यांशीं बापटांचा चाळीस वर्षांचा ऋणानुबंध होता; पण आमच्या घरांतून अडीअडचणीलाहि त्यांनी आर्थिक मदत घेतली असें आजवर कधी घडलें नाही! तात्यांचेबद्दलची त्यांची निष्ठा अगदी निरपेक्ष होती आणि शेवटपर्यंत त्यांनी ती तशीच राखली!

चिरोल-प्रकरण संपल्यावर दुसरेच दिवसापासून टिळकांनी विलायतेंतील चळवळीला सुरुवात केली. बॅप्टिस्टा इकडे आले व टिळकांना कोणीच मदतनीस राहिला नव्हता. इतर माणसें इकडून तिकडे जात, त्यांचा टिळकांना विशेष उपयोग नव्हता. म्हणून तात्यांना त्यांनी आग्रहाने लिहिलें की तुम्ही इकडे याच! तुम्हांवाचून माझें सर्व काम अडून राहिलें आहे. इतकीं निकडीचीं पत्रें आल्यामुळे तात्या निघाले. जातांना त्यांनी ( वुइल ) व्यवस्थापत्र केलें. लिहून ठेवण्यासारखी संपत्ति कांही नव्हतीच. ऑफिसमधून जो पगार येईल त्यांत काटकसरीने राहावें, आईने ( आजी ) यात्रेकरिता खर्चाला मागितल्यास 'नाही' म्हणूं नये. सदाशिवराव बापट कोणाला न मागणारे म्हणून त्यांचाहि उल्लेख त्यांत असून, त्यांना कांही अडचण लागली तर मदत करावी. घरांतील वडील मुलगा म्हणून बापूने, तसेच सर्वांनी दक्षतेने वागावें. तसेच कोणाचेंहि एक पै देखील ऋण काढूं नये; आणि 'ही पित्राज्ञा समजावी' असें खाली रेघ ओढून लिहिलें होतें. काय असेल तें असो, या शेवटच्या वाक्याचा माझ्यावर इतका परिणाम झाला की, माझ्या साऱ्या आयुष्याला पुढे तें एक वळणच लागलें. तात्यांचें मोठेपण माझ्या अंगीं नाही, पण गेल्या तीस वर्षांत मी कोणाचेंहि एका पैचें देखील ऋण काढलें नाही, ही गोष्ट मी शपथेवर सांगू शकेन. व्यवहारांत पुष्कळदां अडचणी येतात, पण 'ऋण' या शब्दालाहि स्पर्श न करतां मी आतापर्यंत तरी माझें आयुष्य निग्रहाने घालविलें आहे. या नियमामुळे माझ्या आयुष्याचें अतिशय कल्याण झालें आहे, म्हणून ही गोष्ट नमूद करावीशी वाटते.

तात्या विलायतेंत अववे आठ महिने होते. जातांना तसेंच येतांनाहि प्रथम ज्या बोटीने ते येणार होते त्या दोन्ही बोटी सुरुंगाने बुडाल्या. यावरून, देव तारी त्याला कोण मारी ? असें म्हणावेसें वाटतें. विलायतेंत असतां शिष्टमंडळाची हकीकत इकडे कळविण्याकरितां ते केसरींत 'विलायतचें बातमीपत्र' लिहीत. तें इतकें सुरेख असे की, सारा केसरी एकीकडे आणि तें बातमीपत्र एकीकडे असें वाचकांना वाटे. वार्ताहराचें राजकारणाचें ज्ञान जितकें गाढ तितकें बातमीपत्र मार्मिक व खुमासदार होतें हें उघडच आहे. सर व्हॅलेंटाइन चिरोल, नेव्हिनसन यांना विलायतेंतील वृत्तपत्रांनी असेंच हिंदुस्थानांत पाठविलें होतें. परराष्ट्रीय वकील आणि वार्ताहर यांचें कार्यक्षेत्र जवळजवळ सारखेंच आहे असें तात्या म्हणत. एका प्रवासवर्णनाच्या पत्रांत जिब्रॉल्टरच्या पुढे गेल्यावर एका डोंगरावर बर्फ पडलें होतें त्याला त्यांनी वांगी-भातावर घातलेल्या खोबऱ्याच्या किसाची सुंदर उपमा दिली होती.

विलायतेंहून तात्या आम्हांला खासगी पत्रें थोडीं लिहीत. कारण तितका वेळ नसे. तथापि त्यांचें आम्हां सर्वांवर लक्ष असे. पक्षी आकाशांत भराऱ्या मारीत कितीहि दूरवर गेला तरी त्याचें आपल्या घरट्याकडे सदैव लक्ष असतेंच ना ? बाबा विद्वांस येथे असल्यामुळे पैशाची गैरसोय किंवा इतर कोणतीहि अडचण भासणार नाही, हें

त्यांना माहीत होतें. पण आजार-पाजार किंवा इतर कांही गोष्टी असतच. एकदा घरांतील आम्ही सगळीं माणसें एन्फ्लुएंझाने आजारी पडलों असें बाबांच्या पत्रांतून त्यांना परस्पर कळलें. तेव्हा त्यांनी लिहिलें कीं, सगळा गांवच जेथे आजारी आहे तेथे मी येथून तुमची काळजी करून काय होणार ? अप्रबुद्ध वय असल्यामुळे आम्हां भावंडांतहि किरकोळ हेवेदावे होत व तक्रार 'हायकोर्टा'त जाई. याबद्दल एका पत्रांत त्यांनी गृहराज्य आणि ब्रिटिश साम्राज्यांतील खातेविभागणी यांची गमतीखातर तुलना करून लिहिलें होतें की, "आपल्याहि गृहराज्यांत अशीच अधिकारविभागणी आहे. कुटुंबांतील मुख्य प्रमुख म्हणून मी अर्थात् ' चॅन्सेलर ऑफ दि एक्सचेकर ' आहें. आर्चबिशपचें धर्मखातें ताईकडे आहे. बाहेरचे व्यवहार पाहाण्याकरिता तुझ्याकडे परराष्ट्रीय खातें दिलें आहे. विठ्ठल घरांत लक्ष घालतो, म्हणून तो 'होममेंबर' म्हणावयाचा. अण्णा कवि आहे; पण अशी खातें-विभागणी असली तरी, हीं सारीं खातीं परस्परावलंबी आहेत, हेंहि विसरून उपयोगी नाही ! "

सहा महिन्यांनी लो. टिळकांच्या बरोबर तात्या विलायतेहून परत आले, तेव्हा आम्ही घरांतील सर्व माणसें बंदरावर गेलों होतों. खरोखर काय तो आनंद आणि उत्साह ! सारें शहर त्या आनंदाने दुमदुमलें होतें ! मात्र त्यांत एक व्यक्ति दुर्मुखलेली व व्यक्तिद्वेषाने पिचत असलेली होती. ती म्हणजे 'संदेश'कार अच्युतराव कोल्हटकर ही होय. टिळकांच्या व तात्यांच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन दर एक अंकांत संदेशकारांनी इतकी स्वैर लेखणी सोडली होती की, असा एकहि अपशब्द किंवा विशेषण नसेल की जें त्यांनी तात्यांना लावलें नाही ! शिवरामपंत परांजपे, खाडिलकर, यशवंतराव नेने यांच्यावरहि संदेशमधून अभद्र टीका येत असे. आणि अखेर संदेशकारांनी धाडस करून खुद्द टिळकांसंबंधानेच टीकेचे अपशब्द लिहिण्याला सुरवात केली, तेव्हा तर संदेशकारासंबंधी ज्या कोणा खाजगी मित्रमंडळींना थोडी सहानुभूति वाटत असेल तीहि नाहीशी होऊन, त्यांची सर्व पुण्याई खलास झाली ! टिळक मुंबईत आल्यावर त्यांचे अनेक ठिकाणीं सभांतून जाहीर सत्कार झाले. दुसऱ्याच दिवशीं रात्रीं सरदारगृहांत स्वराज्यसंघाच्या मंडळींची बैठक होती. संदेशाचा निषेध करण्याकरितां या साऱ्या मंडळींनी असें ठरविलें होतें की, पर्स फंडासंबंधाने संदेशने केलेलीं सारीं विधानें खोटीं व खोडसाळपणाचीं आहेत व या फंडाचे चिटणीस, खजिनदार इत्यादि जे पदाधिकारी आहेत ते जनतेच्या विश्वासाला पूर्णपणे पात्र आहेत, असें स्वतः टिळकांच्या सहीने जाहीर करावें ! विशेषतः हा आग्रह यशवंतराव नेने यांनी धरला होता. त्याप्रमाणे रात्रीं सभा झाली; पण त्यांत तात्यांनी सांगितलें की, " माझें समर्थन किंवा पाठपुरावा करण्याला टिळकांच्या सहीची आवश्यकता मला वाटत नाही, " म्हणून त्या वेळीं तो विषय तितकाच राहिला. आणि या प्रश्नाचा सर्व विचार होमरूल लीगची वार्षिक सभा चार महिन्यांनी होईल, त्यांत करावा असें ठरलें. हा निर्णय दुसरे दिवशीं मला कळला

तेव्हा फार वाईट वाटलें व मी अगदी नाउमेद झालों. सरदारगृहांत तात्या थोडे एकटे सांपडले तेव्हा मी त्यांना विचारलें की, संदेशला उत्तर म्हणून परस्पर इतर लोक टिळकांची सही घेऊन तुमचें समर्थन करीत होते तर तुम्हीं नको का म्हणालांत ? यावर तात्यांनी माझी समजूत करण्याच्या उद्देशानें म्हटलें की, " माझें संरक्षण करण्याला टिळकांच्या सहीची आवश्यकता मला वाटत नाही ! कोणी कितीहि टीका केली तरी, काम करणारा मनुष्य सार्वजनिक आयुष्यांतून केवळ त्या टीकेच्या योगाने उठला किंवा नाहीसा झाला असें कधी होत नाही. मनुष्य नेहमी आपल्या 'जनरल रेप्युटेशन' वर जगतो. तो काम करण्याचें थांबवील तेव्हाच नाहीसा होईल ! कर्व्यांनी कोठल्या टीकेला कधी उत्तर दिलें ? " या उत्तराने मी कुंठित झालों पण मला तें उत्तर त्या वेळीं पटलें नाही. मला असेंच वाटे की, एक मनुष्य हातांत निखारे घेऊन दुसऱ्याच्या जिवावर उठला असून निंदा, अपशब्द आणि सूड यांचें गरळ सारखें ओतीत आहे. त्याचा प्रतिकार प्रतिटीकेशिवाय कसा होईल ? प्रचार हेंच वर्तमानपत्राचें बळ ना ? पण तात्यांना वृत्तपत्रव्यवसायांतील अनुभव, लोकमताचें निदान आणि स्वतःच्या शस्त्रास्त्रांविषयी आत्मविश्वास हीं माझ्यापेक्षा सहस्रपटीने अधिक होतीं. संदेशकारांवर त्यांनाहि बाजू उलटवावयाची होती. पण टीकेला प्रतिटीका करून नव्हे ! त्यांच्या शस्त्रागारांत 'उपेक्षा' हें जे एक दुसरें अस्त्र होतें, त्याचें बळ केवढें अमोघ होतें हें त्या वेळीं माझ्या नीटसें लक्षांत आलें नाही, पण पुढे जेव्हा प्रत्यक्ष तसा अनुभव आला तेव्हा मी अगदी चकित झालों ! तात्यांनी केसरी हातीं घेतल्यावरहि एका अक्षराने कधी संदेशला उत्तर दिलें नाही. त्यांनी संदेशचें नांवच सोडलें ! इतकेंच नव्हे तर त्या माणसाचें या जन्मांत मुखावलोकन देखील करावयाचें नाही असें ठरविलें. संदेशने टिळकांच्या मृत्यूनंतर देखील दहा वर्षेपर्यंत तात्यांची वर्तमानपत्रांतून निंदा करण्याचें सोडलें नव्हतें ! खरोखर कोण हा छळ, आणि तो सोसण्याला केवढा मनःसंयम लागत असेल ? लोकांचें मन किंवा सदसद्विवेकबुद्धि बोलकी करण्याचे मार्ग आहेत; मात्र त्याला मानसशास्त्र बिनचूक माहिती असावें लागतें. एक मनुष्य वर्तमानपत्रांतून दुसऱ्याची हवी तशी अभद्र निंदा व बदनामी करतो व ती दुसरी व्यक्ति एका अक्षराने त्याला उत्तर न देतां आपलें देशकार्याचें व्रत अखंड चालू ठेवते, हें पाहून या वागण्यांत कांही तरी अर्थ असावा असें लोकांना नंतर साहजिकच वाटूं लागलें. कालांतराने लोकांनाहि समजलें की, संदेशची टीका केवळ व्यक्तिद्वेषामुळे केलेली आहे. त्यांत एकहि गोष्ट खरी नाही ! ही प्रतिक्रिया झाल्यावर सूडाचें अस्त्र स्वतः संदेशकारांवरच उलटलें आणि त्यांत त्यांचा सर्वस्वी अधःपात होऊन त्यांना अखेर हीन दशेंत मरण आलें. तात्या पुढे केसरी संस्थेचे ट्रस्टी, टिळकांच्या मृत्युपत्राचे विश्वस्त व नंतर अखिल भारतीय पुढारी, अशी त्यांच्या लोकप्रियतेची व मान्यतेची चढती कमान होती. संदेशकारच काय पण तात्यांचें शत्रुत्व करणाऱ्या कितीतरी व्यक्ति आजवर झाल्या. पण त्यांची निंदा किंव शत्रुत्व यांनी तात्यासाहेबांच्या कीर्तीला टांचणीइतकीहि इजा होऊं शकली नाही. हें

अपूर्व दृश्य ज्यांनी पाहिलें त्यांच्या मनांत, सत्याचा महिमा खरोखरच अगाध आहे, असा विचार येऊन गेल्याशिवाय राहिला नसेल !

टिळक पुण्यांत परत आल्यावर पुण्याच्या म्युनिसिपालिटीने त्यांना मानपत्र दिलें. टिळकांच्या या मानपत्राला रँग्लर परांजपे यांनी व ब्राह्मणेतर पक्षाने कसा विरोध केला ती गोष्ट महशूर आहे; कोणाहि ब्राह्मणेतर पुढाऱ्याला सभेंत येऊन विरोध करण्याचें धैर्य झालें नाही व अखेर तें काम एका पोरसवदा मुलावर पडलें ! आणि त्याने जेव्हा आपल्या भाषणांत "टिळक ब्राह्मणेतरांच्या बरोबर सहभोजन करावयास तयार नाहीत" असें म्हटलें तेव्हा टिळकांना इतकें हसूं कोसळलें की, त्या भरांत टिळकांनी तात्यांच्या हातावर टाळी दिली. टिळकांच्या भाषणानंतर तात्यांनी आपल्या भाषणांत सांगितलें की, टिळकांच्या मानपत्राला विरोध करणारी एक व्यक्ती तरी निघाली. माझेंहि मानपत्र बिनविरोध आहे असें समजूं नका ! माझ्या या मानपत्राचा निषेध मीच करतों. येथे खाडिलकर, शिवरामपंत परांजपे इत्यादि मंडळी आहेत; त्यांची योग्यता व देशसेवा माझ्याइतकीच आहे. ते येथे असतांना मलाच एकट्याला मानपत्र देणें बरोबर नाही ! टिळकांचा उजवा हात असें मला संबोधण्यांत आलें. पण टिळक 'अनंतहस्त' आहेत व ते हात त्यांची कामगिरी करीत आहेत." तात्यांचें सौजन्य आणि शालीनता यांना धरून त्यांनी हे उद्‌गार काढले होते.

टिळकांच्या मानपत्रावरून झालेला वाद पुष्कळ दिवस लोकांच्या स्मरणांत होता. आज तीस वर्षांनंतर त्याची आठवण झाली म्हणजे केवळ हसूं येतें. नेमस्त म्हणत, टिळकांनी सामाजिक सुधारणा काय केली ? मग त्यांना कशाकरिता हें मानपत्र द्यावयाचें ? टिळक म्हणत, माझ्या राजकीय कामगिरीकरिता हें मानपत्र आहे; तें सामाजिक सुधारणेकरिता आहे असें तुम्हांला कोणी सांगितलें ? तुम्हीच काय, पण कोणत्या नेमस्ताने कोणती सामाजिक सुधारणा केली हें तरी सांगावें ! टिळकांच्या ह्या आव्हानाला नेमस्तांचेजवळ उत्तरच नव्हतें. गोखल्यांनी 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया' सोसायटी काढली, पण तिच्या उद्देशपत्रिकेंत 'सामाजिक सुधारणा' हें नांव देखील सांपडणार नाही ! किंबहुना कोणत्याहि सामाजिक सुधारणेच्या सभेचें अध्यक्षपदहि घेण्याचें ना. गोखले हे सहेतुकपणे कसें टाळीत, याबद्दल वाग्भट देशपांडे यांनी एक-दोन गोष्टीहि मला सांगितल्या होत्या. या अनेक उलट सुलट गोष्टी जर खऱ्या तर असें नवल वाटे की, मग हे वाद कां होतात ? आणि ते निरपेक्ष रीतीने होण्यापेक्षा व्यक्ति-द्वेषाचें व वितंडवादाचें रूप घेऊन चव्हाट्यावर कां भांडले जातात ? मला वाटतें, याला उत्तर एकच; व तें हेंच की, मोठें भांडण आणि लहान भांडण यांचें शास्त्र किंवा व्याकरण वेगळें नाही. तें एकच आहे. मोठ्या भांडणांत मत, राजकारण, पक्षभेद हे शब्द ऐकूं येतात, लहान भांडणांत ते येत नाहीत इतकेंच; पण व्यक्तिगत अप्रियता सारखीच असते. मग व्यक्तीला वाईट म्हणण्यापेक्षा तुम्ही वाटल्यास राजकारणालाच

दोष द्या. माझे विचार ऐकून वाग्भट देशपांडे म. गांधींचें उदाहरण देत. आचार विचार व उच्चार यांच्या नेमस्तपणांत म. गांधी हे गोखल्यांहून सरस होते हें मीहि कबूल करीन. राजकारणाला त्यांनी उन्नत करून पुष्कळ सोज्ज्वळ रूप दिलें; पण पक्षभेद त्यांनाहि टाळतां आला नाहीच ! या सुमाराला साऱ्या हिंदुस्थानचें लक्ष आकर्षित करील अशी टिळकांच्या खालोखाल म. गांधी ही व्यक्ति राजकारणाच्या क्षितिजावर उदय पावत होती. यामुळे स्थानिक नेमस्तांचे किरकोळ वाद पुढे लोक विसरून गेले.

८

# उदयास्त

म. गांधींचा उल्लेख मी गेल्या लेखाच्या शेवटीं केला त्यावरून सहज आठवण झाली. ज्यांना राजकारणांत फार थोडें कळतें असे कांही लोक समजतात की, म. गांधी आणि तात्यासाहेब केळकर यांच्यामध्ये हर-एक बाबतींत तीव्र मतभेद होता. दुसऱ्या कित्येकांना वाटतें की, म. गांधी हे अमृतसरच्या कॉंग्रेसपासून उदयाला आले, त्यापूर्वी ते हिंदी राजकारणांत लोकांना माहीत नव्हते. पण या दोन्ही गोष्टी खऱ्या नाहीत. म. गांधी व तात्या यांच्या वयांत फक्त दोन-तीन वर्षांचेंच अंतर होतें. दोघांच्या सार्वजनिक आयुष्याला १८९६ सालापासून सुरवात झाली. दोघांनीहि धंदा म्हणून वकिली सारखीच केली; म्हणजे जवळजवळ मुळींच केली नाही! दैववशात् गांधींनी दक्षिण आफ्रिका हें प्रथम आपलें कार्यक्षेत्र केलें. तात्यांनी १८९६ च्या सुरवातीलाच केसरीकडे येऊन सार्वजनिक जीवनाला सुरवात केली. १८९६ सालीं दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाला पुण्यांत एखादी सभा करवून पाठिंबा मिळविण्या-

करिता गांधीजी टिळकांची गांठ घेण्याला आले होते. त्यावेळीं तात्यांनी त्यानां पाहिलेंहि होतें. त्यावेळीं नेमस्त आणि जहाल यांचे मतभेद विकोपाला गेले होते; मग पुण्यांत सभा कशी होणार? अशी शंका वाटत होती. पण टिळकांनी भांडारकरांना अध्यक्ष करून दोन्ही पक्षांची सभा हां हां म्हणतां घडवून आणली आणि गांधींना हंसतमुखाने रवाना केलें. कारण असल्या कामांत मतभेदाला जागाच नसते! टिळक-गोखल्यांच्या मध्ये कांही व्यक्तिशः शत्रुत्व नव्हतें, म्हणून वेळप्रसंगीं हीं माणसें ताबडतोब एक होत.

टिळक-गोखल्यांच्या या पहिल्या भेटीचें गांधींनी आपल्या आत्मचरित्रांत फार मनोरम वर्णन केलें आहे. "लोकमान्य टिळक हे मला हिमालयाप्रमाणे भासले आणि गोखले मला गंगाजलाप्रमाणे वाटले. हिमालय किती तरी मोठा. एखाद्या वटुवामनाने त्यावर आरोहण करणेंहि कठीण. पण गंगास्रोतांत कोणीहि मनमुराद स्नान करावें!" हा उल्लेखच काय पण गांधीजींनी सारें आत्मचरित्रच फार आल्हादकारक लिहिलें आहे. मनुष्याला आयुष्यांत नाना प्रकारचे बरेवाईट अनुभव येतात. त्यांतले कांही दुःसहहि असू शकतात. स्वतःला मनाने देखील त्यांची आठवण नकोशी वाटते. मग दुसऱ्याला सांगण्याकरिता लेखणीने कोण लिहील! गांधीजींच्या साऱ्या आत्मचरित्रांत संयम हा गुण फार मोठा आहे. कित्येक ठिकाणीं नुसत्या ओझरत्या उल्लेखावर त्यांनी भागविलें आहे. कांही गोष्टींना मुळींच महत्त्व न देता त्यांचा उल्लेखहि केला नाही; व थोडेंफार सांगितलें आहे तेंहि असें हंसत खेळत की वाचणाऱ्या सर्वांची हटकून करमणूक व्हावी; मात्र उद्वेग कोणालाच वाटू नये! असें लिहितां येणें ही फार कठीण गोष्ट आहे; ती वाटते तितकी सोपी नाही. आत्मचरित्र ही एक 'कलाकृति' आहे. ज्याला कलावन्ताचा हात असेल त्यालाच ती जमेल!

दक्षिण आफ्रिकेंतल्या सत्याग्रहाचें काम गांधीजींना चांगलें बाराचौदा वर्षेपर्यंत पुरलें. हिंदुस्थानची ही त्या वेळची परराष्ट्रीय चळवळच म्हणा ना? हिंदी लोकांना हिंदुस्थानांत मान नाही, तर परदेशांत तो कोण देणार? पण असें आहे म्हणून गप्प बसून कसें चालेल? अर्ज, विनंत्या वगैरे सनदशीर मार्गाने, किंवा वेळीं सत्याग्रहहि करून या प्रश्नाला तोंड फोडलेंच पाहिजे. एका अर्थाने दक्षिण आफ्रिकेंतली चळवळ खुद्द हिंदुस्थानांतील चळवळीपेक्षाहि बिकट होती. येथे कोणावर खटला होऊन त्याला तुरुंगवास घडला तर त्याकरिता हळहळणारीं माणसेंहि येथेच असतात. वर्तमानपत्रांत त्या गोष्टीची चर्चा होते. पण परदेशांत केवळ देशभक्तीने प्रेरित होऊन कोणी कितीहि छळ सोसला तरी त्याचें इकडे कोणाला काय वाटणार? आणि एका सर्वसाक्षी परमेश्वराशिवाय तें कोणाला कळणार? अशा लोकांच्या अबोल देशभक्तीचें कौतुक करण्याला व्यापक सहानुभूति व सहृदयताच अंगीं लागते. आजच्या पिढीला ही गोष्ट कदाचित् माहीत नसेल, पण तात्यांनी केसरी—मराठ्यांतून गांधींच्या या चळवळीला वर्षानुवर्ष पाठिंबा दिला होता. १९१२ सालीं तात्यांनी केसरीतर्फे फंड उभारून पांच हजार रुपये गांधींना

पाठवून दिले. त्या वेळीं सरकारने देशांत कोणतीच म्हणजे सनदशीर चळवळहि जाग्यावर उरूं दिली नव्हती. अशा वेळीं केसरीने पाठविलेले पांच हजार रुपये हे पांच लाखांच्या जागीं होते असेंच म्हटलें पाहिजे ! गोखल्यांनीहि 'सर्व्हंट् ऑफ इंडिया' तर्फे फंड उभारला होता. मी स्वतः या वेळीं स्वयंसेवक म्हणून घरोघर जाऊन पैसे जमविले होते. माझें हें पहिलें सार्वजनिक काम ! आणि त्याला निमित्त म. गांधी झाले हाहि एक योगायोगच नव्हे काय ?

कांही वर्षामागे तात्यांच्या लेखांचे पुनर्मुद्रण करण्याचा प्रसंग होता. त्यांत या दक्षिण आफ्रिकेंतील गांधींच्या सत्याग्रहासंबंधी कितीतरी लेख होते. मला आठवतात त्यापैकी कांहींचीं नांवेंच येथे देतों. 'दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह', 'भाऊ पण निवळ भातखाऊ' 'आफ्रिकन वसाहतवाल्यांचे अत्याचार' 'फाटे फुटोत पण बुंधा न तुटो' 'साम्राज्याच्या अब्रूचें वस्त्रहरण' इत्यादि. पण पुस्तकाच्या पृष्ठमर्यादेकडे लक्ष देऊन तात्यांनी त्यांतला फक्त एक लेख ठेवला आणि बाकीचे सर्व गाळून टाकले. कारण छापावयाचे तरी किती आणि काय काय ? ओघालाच आलें म्हणून सांगतों की, त्यांचें असें न छापलेलें राजकीय लिखाण, त्यांच्या पुस्तकांत छापलेल्या लेखांपेक्षा दस-पट अधिक भरेल. त्यांच्या केसरींतील लेखांची एक वेगळी ट्रंकच मी भरून विषयवारी करून ठेवली होती. त्यांनी त्यांतले दहा लेख टाकून द्यावे व 'निशाणी' म्हणून एक घ्यावा असें करून तें काम कसेंबसें संपविलें !

म. गांधी प्रथम आमच्या घरीं असे उतरले होते ते १९१९ सालीं. त्यांच्याबरोबर सरलादेवी चौधराणी होत्या. टिळकांना भेटावयाला गांधी सिंहगडावर जाणार होते. घरीं बरीच मंडळी त्यांना भेटावयास आलीं होती. त्यांत चर्चा व विनोदहि पुष्कळ चालत होता. जालियनवालाबाग कमिटीवर म. गांधी सभासद असल्याने सहज त्याच गोष्टी निघाल्या. त्यावर गांधी म्हणाले 'या प्रकरणासंबंधी नीट विचार केल्यावर इंग्रजांविरुद्ध सशस्त्र प्रतिकारांचा मार्ग अशक्य आहे अशी माझी बालंबाल खात्री झाली; कारण एका इंग्रज माणसाच्या रक्ताकरिता 'बदला' म्हणून पांचशें माणसांचें रक्त इंग्रजांनी सांडलें आहे ! याला आम्ही कोठवर पुरे पडूं ? अर्थात आत्मिक बळ किंवा इतर कांही उपाय यावांचून दुसरें गत्यंतर काय ?" यानंतर सिंहगडावर जाण्यासंबंधाने त्यांनीं चौकशी केली. तेव्हा केसरी ऑफिसमधील विष्णुपंत भट त्यांना विनोदाने म्हणाले, "सिंहगडचा चढ बराच अवघड आहे. पायी जाण्यापेक्षा, महात्माजी, तुम्ही आपले डोली करून वर जा. तेथे कांही आत्मिक बळ उपयोगी पडणार नाही !" या प्रसंगोपात्त विनोदावर म. गांधीनीहि उलट कांही विनोद केला. ज्यूलियस सीझरपासून तों अलीकडे म. गांधींपर्यंत जीं जीं माणसें लोकधुरीण झालीं, त्या सर्वांत एक गोष्ट समान आढळते. ती म्हणजे त्यांचा विनोद. बहुजनसमाजावर हमखास छाप पाडण्याला विनोद ही फार प्रभावी शक्ति आहे.

यानंतर अमृतसरची कॉंग्रेस झाली. नंतर सोलापूरची परिषद झाली; आणि निवडणुकीचे जाहीरनामे निघाल्यामुळे प्रचाराला फार नेट लागला. अमृतसर येथील राजकीय सुधारणांच्या ठरावाला लो. टिळक, म. गांधी, व बॅ. दास या तिघांचा हात लागून राजकीय सुधारणा राबवाव्या असें ठरलें होतें. व त्याप्रमाणे राष्ट्रीय पक्षाने आपले उमेदवार उभे केले होते. तात्या कौन्सिलाकरिता उभे होतेच, पण खाडिलकरहि उभे होते हें सांगितलें म्हणजे त्यांत सर्व आलें ! पण याच वेळेला म. गांधी यांनी असहकारिता उर्फ सत्याग्रह हा नवा कार्यक्रम काढला होता व त्याची सुरवात ता. १ ऑगस्ट रोजींच व्हावयाची होती. कौन्सिलें हा जर ' घुशीचा सांपळा ' आहे तर सुधारणा या अजीबात न राबविलेल्याच बऱ्या असेंहि गांधी म्हणत होते. अर्थात् ही वादग्रस्त गोष्ट असल्यामुळें या वादाचा पद्धतशीर उपन्यास केसरींत झाला होता, इतकेंच नव्हे तर, या बाबतींत आपलें स्वतःचें म्हणणें काय हें तात्यांनी अत्यंत तर्कशुद्ध रीतीने केसरींत खुलासेवार मांडलें होतें. पण याच वेळीं दुर्दैवाने लो. टिळक सरदारगृहांत आजारी पडले व तें दुखणें विकोपाला जाऊन त्यांतच त्यांचा अंत झाला.

टिळकांच्या आजाराची बातमी कळतांच आम्ही घरांतील सर्वजण मुंबईस गेलों. तेथे तमाम राष्ट्रीय पक्षाची मंडळी जमा झाली होती. आणि प्रत्येकाला जणु कांही घरचेंच आपलें मनुष्य आजारी आहे इतकी काळजी वाटत होती. गुरुवारींच कठीण वेळ आली होती, पण चंद्रबळ अनुकूल असल्यामुळे वेळ टळली. शनिवारीं तापांत चढउतार होता, पण घसा वाजूं लागला आणि श्वासोश्वासाला त्रास होऊं लागला. ३१ जुलैच्या मध्यरात्रीनंतर दुखण्याने उलट खाल्ली व कठीण प्रसंग आला. तेव्हा बाहेरच्या खोलींत दादासाहेब खापर्डे, अणे, मुंजे, गंगाधरराव देशपांडे, वासूकाका जोशी, खाडीलकर, तात्या इत्यादि मंडळी निराश होऊन सचिंत बसली होती. मी तात्यांच्याकडे पाहिलें तों त्यांचा चेहरा दुःखाने आरक्त होऊन डोळे पाण्याने भरून आले होते ! तेथून उठून मी आंतल्या खोलींतील टिळकांच्या बिछान्यापाशीं गेलों. डॉक्टर शेवटचें इंजेक्शन देत होते. त्यांनी शरीरांतून सुई काढली मात्र, तोंच टिळकांच्या शरीरांतील चैतन्य निघून गेलें ! आजवर मी प्रत्यक्ष मृत्यु असा पाहिला नव्हता पण जो पाहिला तोच टिळकांएवढ्या थोर विभूतीचा. याने मला असें होऊन गेलें की, नंतर एक महिनापर्यंत मला अन्न गोड लागलें नाही, की स्वस्थ झोप लागली नाही. ज्या टिळकांना सारी महाराष्ट्र–जनता जीव की प्राण समजत होती तें रत्न काळाने हिरावून नेलें ! त्या रात्रीं आषाढ महिना असूनहि स्वच्छ चांदणें पडलें होतें. त्या शीतल चंद्रकिरणांनी अंतःकरणांतील वेदना कमी तर झाल्या नाहीतच, पण मनांतील शोकसमुद्राला अगदी कांठोकांठ भरती आली.

टिळकांच्या मृत्यूची बातमी ताबडतोब टेलिफोनने मुंबई शहरांत पसरली. थिएटरांतील नाटकें व सिनेमा एकदम थांबले व थोड्याच वेळांत जो तो सरदारगृहाकडे येऊं लागला. म. गांधी अर्ध्या तासांतच दाखल झाले. यावेळीं सर्व मंडळी वरून

खालच्या मजल्यावर दिवाणखान्यांत जमली व पुढच्या अंत्य संस्काराविषयी बोलणीं सुरू झालीं. इतक्यांत म. गांधी येऊन मंडळींत येऊन बसले. तात्याहि त्यांच्यासमोरच बसले होते. दोघांनीहि खाली मान घातली होती. अंतःकरणांत दुःख अगदी कांठोकांठ भरून आल्यामुळे दोन चार मिनिटें दोघे अगदी निःस्तब्ध होते. असें तें परम कारुणिक दृश्य डोळ्यांना पाहवत नव्हतें, आणि पाहतांना डोळ्याचें पाणीहि खळत नव्हतें. कांही वेळाने गांधी उठून गेले आणि इतर मंडळी जड अंतःकरणाने पुढील तजविजीस लागली. तो उजाडता रविवार असल्यानें केसरी वेळेवर कसा निघावयाचा हा विचार तात्यांच्या मनांत आला. याकरिता इतरांना आपलीं अडचण सांगून सरदारगृहाच्या एका खोलींत जाऊन केसरीचा कांही मजकूर लिहिण्याला त्यांनी सुरुवात केली. आणि दुसरे दिवशीं सकाळच्या गाडीने ते तडक पुण्याला आले. टिळकांच्या स्मशान-यात्रेला हजर राहणें हेंहि कर्तव्य आणि मंगळवारी केसरी काढणें हेंहि कर्तव्यच. दोन्ही कांही साधत नाहीत. मग कोणतें करावयाचें ? अशी शृंगापत्ति येऊन पडली. टिळकांच्या मृत्यूमुळे तात्यांना जें अनिवार दुःख झालें तें इतर कोणापेक्षाहि अधिक होतें. पण संकटहि एखादे वेळीं अगदी सत्त्वपरीक्षाच घ्यावयाला उभें राहतें. म्हणून त्यांनी केसरीच्या कर्तव्यालाच अधिक मान दिला. टिळक म्हणत असत की, "आमच्या हयातींतच काय, पण आम्ही मेल्यानंतर चौदा दिवसपर्यंत केसरी मंगळवारच्या मंगळवारींच निघाला पाहिजे. मग पुढे काय वाटेल तें होवो ! " याबाबत तात्यांनी ही परीक्षा तिसऱ्यांदा दिली.

पुण्याच्या स्टेशनावर हजारों लोकांची गर्दी झाली होती. कदाचित टिळकांचें शव घेऊनच तात्या पुण्याला आले असतील अशा अपेक्षेने 'लो. टिळक महाराज की जय' असा लोकांनी घोष केला. तो परिचित सिंहनाद ऐकून यावेळीं कोणाचेंहि हृदय दुभंग झालें असतें. पण टिळकांचें शव पुण्याला आणतां येणें अशक्य होतें. यामुळे दुःखाने वेडावलेल्या टिळकांच्या अनुयायांची समजूत करतांना तात्यांच्या अगदी नाकी नव आले. 'मी केसरीच्या कामाकरिता मुद्दाम पुण्याला आलों आहें, काय वाटेल तें झालें तरी मी परत जाणार नाही' असें त्यांनी निक्षून सांगितलें तेव्हा त्यांची सुटका झाली. मग घरीं आल्यावर थोडी विश्रांति घेऊन रविवार संध्याकाळ आणि संबंध सोमवार अशी बारा चौदा तास बैठक मारून केसरीचा संबंध वीस कॉलम मजकूर त्यानी एक टांकी लिहून काढला, व केसरी वेळच्या वेळी प्रसिद्ध केला ! केसरीचा संपादक होणें ही केवढी बिकट गोष्ट आहे हें या वेळी मला जितकें जाणवलें तितकें साऱ्या जन्मांत कधीहि जाणवलें नसेल, असे उद्‌गार त्यांनी आत्मचरित्रांत काढले आहेत ते अक्षरशः खरे आहेत.

एक दोन दिवसांनीं टिळकांच्या अस्थि मुंबईहून आल्या. त्या चंदनी करंडकांत ठेवल्या असून प्रचंड मिरवणूक निघाली होती व स्मशानयात्रेप्रमाणे त्यांत हजारों लोक सामील झाले होते. दाटी व गर्दी इतकी होती की अक्षरशः मुंगीच्या पावलाने चालावें

लागत होतें. टिळकांच्या जागत्या अस्तित्वानें दुमदुमलेल्या पुण्यांत आजवर अनेक मिरवणुकी निघाल्या, पण या मिरवणुकींतला निःशब्द गंभीरपणा विशेष होता. याहि मिरवणुकींत टिळक होते, पण त्यांनीं अंगुष्ठमात्र देह धारण केला असून चिताभस्माचें रूप घेतलें होतें, आणि शाश्वत मौन स्वीकारलें होतें. मुंबईस जातांना त्यांनी टिळकपूर्ण असें पुणें सोडलें, आज त्यांनी टिळकशून्य पुण्यांत प्रवेश केला !

दहाव्या दिवशीं अनेकांनी ओंकारेश्वरावर जाऊन तिलतर्पण केलें आणि शून्य मनाने जो तो नित्यक्रमाला लागला. कोणी कितीहि मोठा असला तरी त्याच्या मरणाने जग कसें थांबणार ? जगाची राहाटी चालूच आहे. मृत्यूमुळे संसारविषयी वैराग्य उत्पन्न होतें, पण आपण मेल्यावर आपणांमागे जगहि बुडावें अशी मृताचीहि इच्छा नसणार. याकरिता दुःख आवरून, संसार व व्यवहाराला मनुष्याने पुनः सुरुवात करावी. टिळकांच्या मृत्यूनंतर "अतो न रोदितव्यं हि, क्रियाः कार्याः स्वशक्तितः" असा याज्ञवल्क्याच्या शब्दांत दुःखमूढ झालेल्या लोकांना तात्यांनी केसरींत सांत्वनपर उपदेश करून पुनः कर्मप्रवण होण्यास सुचविलें. कसा योगायोग आहे पाहा. तात्या गेल्यावर मनाच्या दुःखमूढ अवस्थेंत आकाशवाणीप्रमाणे हे त्यांचेच शब्द मला आठवले ! जणुं कांही स्वर्गाला जात असतां अंतरिक्षांतून आमच्याकडे पाहत या शब्दांनी ते आमचें सांत्वन करीत होते !

लो. टिळकांसंबंधी केसरींतील मृत्युलेख लोकांना फार आवडला आणि अनेकांचीं तशीं तात्यांना पत्रेंहि आलीं. केसरी उघडल्यावर संबंध दोन पानें भरून दहा कॉलम अग्रलेख आलेला पाहून केसरी आपल्या कर्तव्याला जागला, असेंच लोकांनी उद्गार काढले. आणि अनेकांनी एकीकडे डोळ्यांचे पाणी पुशीत सारा दिवसभर केसरीचा तो अंक वाचून काढला. साऱ्या देशभर लोकांना दुःख झालें. जणु कांहीं टिळकांच्या आत्म्याने परिमित अंगुष्ठमात्र देह सोडून व्यापक रूप घेतलें आणि साऱ्या देशभर पसरून लोकांच्या अंतःकरणाला आपला जीवन-संदेश सांगितला. या दृष्टीने पाहिलें म्हणजे मृत्यु हा 'मृत्यु' नव्हे, मृत्यु हें 'जीवन' आहे असेंच म्हणावें लागतें.

टिळकांच्या मृत्यूसंबंधी हजारों पत्रें व दुखवट्याचे संदेश येत होते. त्यांना केसरीतर्फे उत्तरेंहि जात होतीं. केसरीचीं अनेक ऋणासंबंधी माणसें तसेंच परप्रांतीय पुढारीहि भेटून गेले. त्यांत म. गांधीं सरोजिनी नायडू यांच्यासह समाचाराला मुद्दाम आले होते. मी अनेक पुढारी पाहिले, पण महात्माजींचा विनय आणि सौजन्य ज्याच्या अंगीं आहे असा मनुष्य पाहिला नाही. कुठे ते घमेंडखोर गर्विष्ठ नेमस्त पुढारी आणि कुठे महात्मा गांधी ! नेमस्त लोक टिळकांना शिवीशिवाय बोलत नसत. 'लोकमान्य' हे शब्द उच्चारण्यालाहि ते कोण खळखळ करीत ! म. गांधींचा प्रकार याच्या अगदी उलट होता. टिळकांचें मोठेपण गांधींनी कधी अमान्य केलें नाही. त्यांच्याबद्दल ते अगदी निःसीम आदराने लिहीत व बोलत. टिळक 'स्वदेशी वापरा'

इतकेंच सांगत, तर गांधीजींची साधेपणाची वागणूक त्याहि पलीकडे गेली होती. असा अंतर्बाह्य शुद्ध व खणखणीत देशभक्तीचा पुढारी आपणाला मिळाला याबद्दल लोकांना फार बरें वाटलें. राष्ट्रीय पक्षांतील त्या वेळच्या कांही पुढाऱ्यांना गांधीजींचे मार्ग कांहींसे नवीन व अव्यवहार्यहि वाटत. पण गांधीजींचें अखिल भारतीय पुढारीपण त्यावेळीं महाराष्ट्र-पक्षांतल्या कोणालाहि अमान्य नव्हतें.

टिळकांच्या मृत्यूमुळे केसरीच्या प्रतिस्पर्ध्यांवर काय परिणाम झाला, याचीं एकदोन उदाहरणें सांगण्यासारखीं आहेत. पैकी सरकार व टाइम्स हे टिळकांच्या शत्रुत्वांत प्रमुख. सरकारला जें बोलावयाचें तें नेहमी टाइम्सच्या मुखांतून बाहेर येणार. पण टाईम्सला देखील टिळकांच्या खऱ्या गुणांची स्तुति केल्याशिवाय राहवलें नाहीं. " टिळकांच्या राजकीय मोहिमेचा दरारा मोठा कठीण. कोणत्याहि राष्ट्राच्या राजकीय घडामोडींच्या इतिहासांत त्याला तोड सांपडणार नाहीं " असें टाइम्सने लिहिलें होतें. ' हिंदवी प्रक्षोभाचा आद्यजनक ' अशी पदवी चिरोलने टिळकांना दिली होती. पण ही पदवी मिळणें म्हणजे टिळकांना त्यांच्या कट्ट्या शत्रूकडून स्तुतीचा अत्यंत उंची दागिना अगर बहुमानाचें पदक दिल्याप्रमाणेच होतें. सरकारकडून अशी निंदा करून घेण्याचें भाग्य शतकानुशतकांत एखाद्यालाच लाभतें !

कोल्हापूरचे कै. शाहू छत्रपति यांचे व टिळकांचे संबंध आजन्म कसे काय होते हें सुप्रसिद्धच आहे. पण शाहू छत्रपति हे प्रतिस्पर्धी असले तरी स्वतः बुद्धिमान् असल्यामुळे टिळकांची खरी योग्यता मनांतून जाणणारे होते. टिळकांच्या मृत्यूची बातमी ऐकून त्यांचें मन अगदीं अस्वस्थ होऊन डोळ्यांतून टपटप अश्रु गळूं लागले. त्या दिवशीं कोठे तरी शिकारीचा बेत असल्यामुळे महाराज बाहेर होते, पण तो सारा बेत रद्द करून कांही वेळ ते शून्यमनस्क होऊन बसले. परिवारांतील एकाने त्यांना विचारलेंहि की, सर्व जन्म तुम्ही टिळकांना विरोध करून, आता ते मेल्यावर मात्र अश्रु गाळतां हें कसें काय ? यावर महाराजांनी उत्तर केलें कीं, " मी रडतों आणि तुम्ही सामान्य माणसें रडतां यांत फार अंतर आहे. टिळक कोण होते हें सरकार कांहीं तुम्हांसारख्या पोरासोरांपुढे सांगत नाही. त्यांचे ते उद्गार आमच्या सारख्यांच्या कानांतच ऐकावयास मिळतात. टिळक असेपर्यंत सरकारावर मोठा दाब होता. तो आता नाहीसा झाला, याचें वाईट वाटतें. टिळकांचें मोठेपण तुम्हांलाच कळतें आणि आम्हांला कळत नाही असें नाही. पण आमच्या हातून इतक्या गोष्टी घडल्या आहेत की मनांत आणलें तरी आता मागें जातां येत नाही ! आम्ही चाललों त्याच मार्गाने आता पुढे गेलें पाहिजे. त्याला काय उपाय ? " वैराग्याच्या क्षणांत मनुष्य कसें बोलतो, याचे निदर्शक हे उद्गार आहेत. ज्या गृहस्थाशीं हें संभाषण झालें त्याच्याच तोंडून पुढे कांही वर्षांनी प्रस्तुत लेखकाला ही गोष्ट ऐकण्यास मिळाली, म्हणूनच येथे तिचा उल्लेख केला आहे.

नेमस्त पक्षांतील सप्रू, ना. शास्त्री, चिंतामणी यांनी लोकरीतीप्रमाणे दुःखप्रदर्शन केलें. पुण्यांत जो एक नेमस्त गट होता त्याला मात्र टिळकांच्या मरणाने अगदी हायसें वाटलें. पण एकाचें आयुष्य सरलें तरी त्यामुळे दुसऱ्याचें वाढणार कसें ? टिळकांना अखिल भारतीय कीर्ति मिळाली याचें फर्ग्युसन कॉलेजांतील कांही प्रोफेसरांना वैषम्य वाटत असे. टिळकांना इतकें मोठें म्हणावयाचें तें काय म्हणून ? काल परवापर्यंत या फर्ग्युसन कॉलेजांतच ते प्रोफेसर होते ना ? त्यांचा राजीनामादेखील सोसायटीच्या दप्तरांत धूळ खात पडला असेल ! मग टिळकांच्या अंगीं जें अतिमानुष मोठेपण चिकटविलें जातें तें कशाकरिता ? ज्यूलियस सीझर नाटकामध्ये असाच एक प्रसंग आहे. मत्सराग्नीमुळें केशियस सिन्ना यास म्हणतो की, "हा सीझर इतका मोठा कशाने झाला ? काल परवापर्यंत तो आमच्यांतलाच होता ना ?" फर्ग्युसनमधील कांही प्रोफेसरांची ठेवण थेट या मासल्याची होती. स्वतः त्यांच्या अंगीं विद्वत्ता काडीचीहि नव्हती. पण वर्गांत शिकवितांना ते असा आव आणीत कीं, आपण पार्लमेंटच्या सभागृहांतच भाषण करीत आहों ! बोलतांना ते इंग्रजीची अशी ऐट आणीत कीं जणुं कांही हॅरो, ईटन, केंब्रिज किंवा ऑक्सफर्ड येथेंच त्यांचा जन्म झाला आहे ! मराठींत त्यांना धड चार वाक्यें बोलतां येत नसत ! त्यांना स्वतःची विद्वत्ता एक वेळ नसो, पण दुसऱ्याच्या विद्वत्तेचा गुण घेण्याची शालीनता किंवा विनय देखील त्यांच्यांत नव्हता. मग अशा लोकांचें विद्यार्थ्यांत हसें झाल्याशिवाय कसें राहील ? टिळकांच्या स्मारकाकरिता फर्ग्युसनमधील विद्यार्थ्यांनी एक पुतळा करून कॉलेजला नजर करावयाचें ठरविलें. पण अशा दुराराध्य प्रोफेसरांशीं गांठ असल्यामुळे तें भांडण मला पांच वर्षें पुरलें ! मीच त्या स्मारक–कमिटीचा चिटणीस होतों. या प्रकरणांत आशानिराशेचे चढउतार व मानापमानाचेहि प्रसंग अनुभवावे लागले, त्याची हकीगत पुढें सांगेन. पण अखेर हा पुतळा फर्ग्युसन कॉलेजला स्वीकारावाच लागला इतकें मात्र मी अभिमानाने सांगतों. आज पंचवीस वर्षांनंतर केवढें स्थित्यंतर झालें आहे पाहा ! परवा फर्ग्युसन कॉलेजच्या हीरक-महोत्सवाला मी गेलों होतों, त्यांत सर सप्रू यांनी टिळकांचा उल्लेख किती तरी गौरवाने व आदराने केला. आज फर्ग्युसनच्या वाडिया लायब्ररींत गेल्यावर जो कोणी टिळक-गोखल्यांचे भव्य पुतळे समोरासमोर पाहील, त्याला आता तीं जुनीं भांडणें लक्षांत येणार नाहीत; तर त्यांची अलोट विद्वत्ता व देशसेवा यांचीच आठवण होईल ! या पुतळा-प्रकरणांत तात्यांची मला सर्वतोपरी मदत होती हें सांगावयास नकोच.

१

# माझी वकीलीची परीक्षा

लो. टिळकांच्या मृत्यूनंतर दुसऱ्याच दिवशी असहकारितेच्या चळवळीला सुरवात झाली, त्यांत शिक्षणावरील बहिष्काराचें एक कलम होतें. त्या चळवळींत तात्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून जीं भाषणें केलीं त्यांचा ठसा माझ्या मनावर उमटलेला आहे, तो कधीहि पुसून जाणार नाही. पुष्कळांना वाटतें की विद्यार्थ्यांच्या पुढे बोलावयाचें त्यांत विशेष तरी काय ? तुम्हीं विद्यार्थी म्हणजे राष्ट्राचे आधारस्तंभ आहां ! राष्ट्राचें स्वातंत्र्य तुमच्या स्वार्थत्यागाकडे डोळे लावून आशेने याट पाहात बसलें आहे, अशी त्यांची खुशामत केली की झालें ! पुष्कळजण असें करीतहि. पण असला बेजबाबदार उपदेश करून, स्वार्थत्यागाकरिता तरुण वर्गाला तात्यांनी कधीहि आवाहन केलें नाही. होय. 'तरुण पिढी ही राष्ट्राचा भावी आधारस्तंभ आहे' ही गोष्ट खरीच आहे. पण म्हणून त्यांच्यापुढे बोलणाराने फार जबाबदारीने बोललें पाहिजे ! केवळ तीं मुलें तरुण, अप्रबुद्ध व भावनाप्रधान आहेत याचा फायदा घेऊन त्यांना

भरीला घालणें ही गोष्ट बरोबर नाही. असा उपदेश त्यांनीं कधीहि कोणाला केला नाही आणि इतर कट्टर चळवळखोरांच्या अप्रियतेला भीक घातली नाही. त्यांचीं व्याख्यानें विद्यार्थिदशेंत ऐकलेले हजारो तरुण आज प्रौढ होऊन संसार करीत असतील तेच या गोष्टीच्या सत्यतेची मनोमन साक्ष देतील.

विद्यार्थिदशेंत विद्याभ्यासाचें आपलें कर्तव्य सोडून 'देशकार्या' ची चिवडाचिवड करणारा विद्यार्थी त्यांना दिसला तर ते कपाळाला आठीच घालीत! तरुण वयांत उत्तम विद्याभ्यास पदरांत पाडून घेऊन स्वावलंबी होणें ही देशकार्याची पहिली अट आहे. विद्वत्ता ही कांही शिवी नाही, भूषण आहे. अविद्वानाच्या स्वार्थत्यागाला जग काडीचीहि किंमत देत नाही. विद्वत्ता हा सगळ्या जगांत उपयोगी पडणारा एकच पास-पोर्ट आहे. एखाद्या विषयांत तुमचें डोकें चाललें नाही तरी हरकत नाही; दुसऱ्यांत प्रयत्न करा. हिंदुस्थानांत आज जीं अनेक माणसें पुढे आलीं आहेत तीं केवळ राज-कारणांतच पुढे आलीं आहेत असें नाही, असा ते कळकळीने उपदेश करीत.

आणि हा उपदेश निदान माझ्या तरी मनांत इतका उत्तम ठसला होता की, माझ्या विद्याभ्यासांत मी कधीहि अंगचोरपणा किंवा कुचराई केलेली मला आठवत नाही. कलकत्त्याच्या कॉंग्रेसमध्ये १९२० सालीं शाळा–कॉलेजांवर बहिष्कार घालण्याचा ठराव झाला तेव्हा मात्र थोडी पंचाईत उभी राहिली. कारण मी या वेळीं इंटरच्या दुसऱ्या टर्ममध्ये असून चारच महिन्यांवर परीक्षा आली होती; पण राष्ट्रीय सभेचा झालेला ठराव मनांतून नापसंत असून उपयोग काय? तो पाळणें आलें. याकरिता तात्यांच्या सूचनेवरून मी, अण्णा व विठ्ठल तिघेहि कॉलेजांतून नांव काढून घरीं बसलों. त्याचा कोठे गाजावाजा केला नाही; किंवा इतर पुढाऱ्यांचीं मुलें काय काय करतात, याचीहि चौकशी केली नाही. आगींतच ज्याला उडी घालावयाची त्यानें, इतरांना बरोबर घेऊन मी घालीन असें म्हणण्यांत अर्थ काय? म्हणून काय काय होतें याची गंमत पाहात बसलों होतों.

एक वर्षांत स्वराज्य मिळावयाचें होतें, मग बहिष्काराच्या चळवळीला काय तोटा? जो तो पुढारीपणाच्या आवेशाने उठून विद्यार्थ्यांना बहिष्काराचा उपदेश करूं लागला. प्रा. फडके व प्रा. घारपुरे ही दुक्कल त्या वेळीं या प्रचारांत अग्रगण्य होती. त्यांचें पुढे काय झालें देव जाणे! या लोकांचा तात्यांच्यावर असा आक्षेप होता की ते जीव तोडून बहिष्काराचा उपदेश करीत नाहीत! पण स्वार्थत्याग करणाराला दुसऱ्याच्या उपदेशाची जरूर काय? स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून जो स्वार्थत्याग करील त्याचाच स्वार्थत्याग खरा. इतरांनी रडतराव म्हणून घोड्यावर बसविण्यांत काय अर्थ? एका स्पार्टन शिपायाला तरवार मिळाली ती इतरांपेक्षा एक वीतभर कमी लांब होती, म्हणून तो वरिष्ठांकडे तक्रार करूं लागला. तेव्हां अधिकाऱ्याने त्या शिपायाला उत्तर दिलें की, 'अरे! तुझी तरवार वीतभर कमी लांब आहे तर, इतरांपेक्षां तूं

वीतभर पुढे पाऊल टाक म्हणजे झालें ! ' हाच दाखला एका भाषणांत देऊन ते म्हणाले, " तुमच्या अपेक्षेपेक्षां माझा उपदेश कमी पडतो, अशी तुमची तक्रार असेल तर, तुम्ही एक वीतभर पाऊल पुढे टाका म्हणजे झालें ! "

दुसऱ्या एका व्याख्यानांत रूपक म्हणून त्यांनी प्राचीन ग्रीक इतिहासांतील गोष्ट सांगितली. आणि प्रस्तुत परिस्थितीला अनुलक्षून तें रूपक त्यांनी इतकें उत्तम सजवून फुलवून सांगितलें कीं, ती गोष्ट येथें देण्याचा मोह आवरत नाहीः—

एकदा ग्रीसमध्ये एक मोठा धरणीकंप होऊन शहराच्या मध्यभागींच एक मोठा खोल खड्डा पडला. इतका की, वरून पाहिलें तर त्याच्या तळापर्यंत नजरहि पोंचत नसे. अर्थातच हा अनर्थ ईश्वराचा कोप झाला म्हणून उद्भवला असें लोकानी मानलें. आता परमेश्वराच्या कोपाची शान्ति ही केलीच पाहिजे. ती कशाने होईल म्हणून सध्याच्या काळीं पुढाऱ्याचा सल्ला घेतात त्याप्रमाणे त्या वेळीं देवाला कौल मागितला. तेव्हा अशी आकाशवाणी झाली की, आपणाला जें प्रिय त्याचा या वेळीं कोणीं बळी दिला तरच देवतांचा हा कोप शांत होईल व खड्डा भरून येईल. त्याप्रमाणे जो तो विचारपूस करूं लागला. नंतर सर्व लोक त्या खड्ड्याजवळ जमले. त्यांत कोणी व्यापारी होते. त्यापैकी एक शेटजी विचार करूं लागले की, आपण काय केलें असता हा खड्डा भरून येईल ? त्याचा मुनीम जवळ होता तो म्हणाला, आपल्या येथे असलेली ती धर्मदायाची पेटी नव्हे काय ? त्यांत बराच धर्मादायाचा पैसा साचून राहिला असेल. फार तर त्या रकमेचें व्याज काढून घेऊन आपण हीं पेटी आत टाकून देऊं म्हणजे कदाचित हा खड्डा भरून येईल. शेटजींनाहि हा सल्ला पसंत पडला व त्यानी मुनीमाकडून पेटी आंत टाकवली. पण खड्डा जशाचा तसाच कायमचा राहिला !

कांठावरच्या गर्दींत काही स्त्रियाहि जमल्या होत्या. एकीनें विचार केला कीं आपण कोठली प्रिय वस्तु टाकली तर हा खड्डा भरून येईल बरें ? तिची दुसरी मैत्रीण शेजारीच होती. ती म्हणाली, स्त्रियांना अत्यंत प्रिय वस्तु म्हणजे त्यांचें मुखकमल. पण मुखकमलच कसें टाकून देणार ? तेव्हा पहिलीनें विचार केला, मुखकमला खालोखाल स्त्रियांना त्यांचे कुरळ कुंतल फार आवडतात. तेव्हा बाजूकडेचा एक कुंतल तोडून टाकून दिला म्हणजे झालें ! हा विचार पटून तिने आपला एक केस खड्ड्यांत टाकला. पण खड्डा कायमच राहिला !

हा प्रकार होत आहे तों त्यांत एक वर्तमानपत्राचे संपादक होते. त्यांनाहि त्यावेळीं स्वार्थत्याग करण्याची बुद्धि झाली. पण वर्तमानपत्राचा संपादक मॅनेजराचा सल्ला घेतल्याशिवाय काय करणार ? संपादक म्हणाले, काढा तुमच्या खतावण्या. त्यांतील जाहिरातींचीं बिलें येतच नाहींत. पैसे येतील तेव्हा ना या बिलांच्या कागदांना किंमत ? तेव्हा त्या खतावण्या व हीं बिलें हींच स्वार्थत्याग म्हणून खड्ड्यांत सोडून द्यावीं. मॅनेजर म्हणाले, अहो ! खतावण्या टाकून मी वर्तमानपत्र काय चालवूं ?

त्यापेक्षा फुकट रद्दी म्हणून ते सहाशें अंकांचे बांधलेले गठ्ठे आहेत ते का टाकाना? संपादक म्हणाले, अंकाची किंमत एक एक आणा आहे; म्हणजे हे अंक टाकण्यांत आपले सहाशें आणे गेलेच की! तेव्हां उभयतांच्या सल्ल्यानें हाच विचार कायम होऊन गठ्ठे खड्ड्यांत टाकण्यांत आले. पण खड्डा कांही भरून आला नाही!

सदर संपादकाचे कोणी एक स्नेही वकील शेजारींच होते. त्यांनी गठ्ठे टाकलेले पाहून संपादकास विचारलें. संपादक म्हणजे सर्वज्ञ सल्लागार! त्यांनी आपला अभिप्राय दिला की वकीलवर्गाने आपल्या प्रिय वस्तूचा त्याग केल्याशिवाय हें राष्ट्रीय संकट टळणार नाही. तेव्हा खड्डा भरून येण्यास वकीलवर्गानें पुढें झालें पाहिजे. वकिलाने आपल्या कारकुनास विचारलें. कारकून स्वतः वकिलालाच काय सल्ला देणार? वकिली सोडण्याची आजची कल्पना त्याला त्यावेळीं आठवली नाही. तेव्हा वकिलालाच कल्पना सुचून, अशिलाचे जे अनामत पैसे त्याजकडे होते त्याची एक लहानशी पिशवी त्यानें खड्ड्यांत टाकून दिली. पण खड्डा भरून आला नाही!

याप्रमाणे तेथे जे जे वर्ग हजर होते त्यांपैकीं सर्वांनी आपापल्या बुद्धीनुसार स्वतःचें म्हणून कांही कांही त्या खड्ड्यांत टाकून पाहिलें. परंतु खड्डा जशाचा तसाच इतकें होत आहे तों लांबून एक घोडेस्वार भरधांव तेथे आला; व आजूबाजूस न पाहतां त्याने निःशंकपणाने घोड्यासकट त्या खड्ड्यांत डडी घेतली! त्याबरोबर चमत्कार होऊन खड्डा एकदम भरून गेला!

या गोष्टीचें तात्पर्य आपल्या लक्षांत आलेंच असेल. हा सर्व स्वार्थत्यागाचा मामला आहे. म्हणून ज्याला स्वार्थत्याग करावयाचा त्याने तो स्वतःच्या हिंमतीवर करावा; परिणामाचे धनी आपण या बुद्धीने करावा. अशा बाबतींत कोणीं कोणास सल्ला देऊं नये, कोणास कोणीं काय करूं म्हणून विचारण्यास जाऊं नये. स्वार्थत्याग हा ज्याचा त्याने करावयाचा असतो. जें करावयाचें तें ज्याचें त्याने आपल्या जबाबदारीवर आजूबाजूस न पाहातां, पुढील परिणामाबद्दल कुरकूर न करतां, आणि तें सुद्धा स्वतःला वाटलें म्हणून करावें. लोकांनी सांगितला म्हणून स्वार्थत्याग करू नये. अशा रीतीने स्वार्थत्याग करणाऱ्याला एकान्तात असतांना स्वतःच्या समाधानाचें तरी सुख मिळेल!"

बहिष्कारबद्दल सार्वत्रिक चर्चा चालू असल्यामुळे बरींच मुलें शाळा-कॉलेजांतून बाहेर पडलीं. याच वेळीं लो. टिळकांच्या अखिल भारतीय स्मारकाकरिता पैसे जमत होते. त्यांत पुणें जिल्ह्याचेच जवळ जवळ चाळीस हजार रुपये होते. टिळकांचें स्मारक शैक्षणिकच असावें असा तात्यांनी आग्रह धरून बहिष्कारवादी विद्यार्थ्यांकरिता कॉलेज काढावें असा ठराव स्मारक कमिटीकडून करवून घेतला. याप्रमाणे 'टिळक महाविद्यालय' निघालें व पुढे एका वर्षाने 'टिळक-महाराष्ट्र-विद्यापीठ' हि निघून निदान दोनशें विद्यार्थ्यांनी तरी या राष्ट्रीय विद्यापीठाची पदवी घेतली. त्यांत मीहि एक होतों.

हल्लीच्या टिळक स्मारक मंदिराच्या आवारांत एका जुजबी इमारतींत या कॉलेजचे वर्ग भरत; त्या वेळीं तेथे टिळक–स्मारक मंदिर नव्हतें किंवा परशरामभाऊ कॉलेजहि झालेलें नव्हतें. टिळकरोड देखील त्या वेळीं झाला नसल्याने, गढीच्या आवती-भोवती सर्व ओसाड पडीत जमीन होती, आणि पावसाळ्यांत त्या शेतांतून ढोपरभर चिखल तुडवीत जावें लागत असे. तात्या म्युनिसिपालिटीचे १९२४ सालीं अध्यक्ष होते. त्यांच्या कारकीर्दींत टिळकरोड होऊन, लकडीपुलापासून तों स्वारगेटापर्यंत दुतर्फा वसाहत झाली. या टापूंतली आजची गजबजलेली नवसृष्टि ही गेल्या तीस वर्षांतली कमाई आहे !

कारण कांहीहि असो, आज तें टिळक महाविद्यालय व टिळक-महाराष्ट्र विद्यापीठ यांची मला आठवण देखील करावीशी वाटत नाही. १९३७ सालीं पहिलें राष्ट्रीय मंत्रिमंडळ अधिकारावर आलें, तेव्हा कोठे या पदवीला सरकार-मान्यता मिळाली. तोपर्यंत ही पदवी म्हणजे शिवकालीन ‘ होना ’ सारखी होती ! त्या सोन्याच्या नाण्याचें ‘ भारत इतिहास संशोधक मंडळा’त कौतुक करावें; पण व्यवहारांत त्याचें कौतुक कोण करणार ? याचमुळे बी. ए. ची पदवी घेतल्याबरोबर मी वकिलीच्या अभ्यासाला सुरवात केली. एकीकडे शिकाऊ उमेदवार म्हणून मी केसरींतहि दर आठवड्याला कांही किरकोळ मजकूर लिहीत होतों. माझ्या मनांतला भाव तात्यांनी ओळखून माझी द्विधावृत्ति नाहीशी करण्याकरिता ते मला म्हणाले, “ केसरींत हौसेखातर लिही, त्याला हरकत नाही. पण त्यापेक्षा एकाग्र मनाने अभ्यास करून तूं वकिलीची परीक्षा प्रथम पदरांत पाडून घे. अण्णा कांही वकील होणार नाही. पण तूं पास होशील. मी केसरीला येऊन मिळालों तेव्हा टिळक व मी दोघेच होतों. आमच्यावर हक्काने वरिष्ठ कोणीच नव्हता. नोकरींत आधी आलेलीं म्हणून तुमच्यावर सीनियर किती तरी माणसें आहेत. तुम्ही कितीहि चांगलें लिहिलें तरी संपादक म्हणून केसरीवर तुमचें नांव कोण घालणार ? यापेक्षा स्वतंत्र धंदा म्हणून वकिलीची पदवी हातांत ठेवून तूं केसरींत लिहिलेंस तर त्याला स्वतंत्रपणाचें कांही तेज तरी दिसेल ! हा तात्यांचा उपदेश मला पटण्या-सारखाच होता; म्हणून केसरींत लिहिण्याचा विषय डोक्यांतून काढून मी पुढे हाय-कोर्ट वकिलीची परीक्षा दिली. एल्एल्. बी. पेक्षा ही परीक्षा अवघड होती. कारण त्यांत नियमांची बंधनें फार. पण शेवटल्या परीक्षेंत मी फर्स्ट क्लास मार्क मिळवून पास झालों. इतकेंच नव्हे तर, माझ्या परीक्षेच्या वेळीं अतिशय कडक निकाल लागून शेकडा अवघे आठ विद्यार्थी पास झाले, त्यांत मी पहिल्या वर्गांत यशस्वी झालों या गोष्टीचा मला अभिमान वाटतो.

यावेळच्या कांही गोष्टी मला अजून आठवतात. निवांतपणे एकाग्र मनाने अभ्यास करतां यावा म्हणून मी एकदा पांचगणीस एक दोन महिने जाऊन राहिलों होतों. दिवस-भर अभ्यास करावा व संध्याकाळी ‘टेबललँड’ म्हणून जवळच एक सपाट डोंगर-पठार

आहे तेथे फिरून यावें असा क्रम होता. वर्षाकाळाची एक गंमत तेथे पाहावयास मिळाली. जूनच्या पहिल्या आठवड्यांत तेथें लख्ख ऊन असतें. पण नेमकी जूनची ६ वी तारीख आली की, पाहुणा मेलगाडीने यावा त्याप्रमाणे मेघ आपला दळसंभार घेऊन येतात. आणि मग पावसाचें छत्र आठ आठ दिवस निघत नाही. धुकें इतकें जमतें की अगदी जवळचें चार हातांवरचेंहि दिसत नाही. विशेषतः टेबललँडवर गेलें म्हणजे अफाट समुद्राप्रमाणे आवती भोंवती सर्व धुकेंच दिसतें. या डोंगरपठाराची उंची साठ-सत्तर फूट असून सगळीकडे खडपे तुटलेले आहेत. एका बाजूला वर जाण्याला मोटारी-करिता प्रशस्त वाट आहे व दुसरीकडे फक्त एक बारकीशी पाऊलवाट आहे. याखेरीज त्या डोंगरावर जाण्याला किंवा उतरण्याला दुसरी वाट नाही. वर प्रशस्त सपाट मैदान आहे. याकरिता पांचगणीचीं पुष्कळ रहिवासी माणसें वर फिरावयास जातात.

एक दिवस सारखा दिवसभर पाऊस पडत होता व मीहि अभ्यास करून कंटाळलों होतों; म्हणून मी एकटाच टेबललँडवर फिरावयास गेलों. पाऊस थांबला होता आणि सूर्याचीं मावळतीं सोनेरी किरणें पश्चिम क्षितिजावर टेकलीं होतीं. समुद्रांत सूर्यबिंब बुडतांना जसें लांबट होऊन क्षीणप्रभ दिसतें तसें होऊन, सूर्यबिंब हळूहळू क्षितिजाआड झालें आणि मोठ्या माणसाची आठवणहि नाहीशी व्हावी त्याप्रमाणे, आरक्त क्षितिजा-वरील रक्तधूसर रंगहि विलीन झाला. धुक्याचे ढग मात्र स्वैरपणाने बरेच तरळत होते. एका कातळावर बसून कांही वेळ ही शोभा पाहण्यांत मी मग्न होतों. तों कांही अंतरावरून फिरावयास आलेलीं माणसें परत जातांना दिसलीं. पण गंमत अशी की धुक्यामुळे तीं स्पष्ट न दिसतां, जणुं कांही चिकाच्या पडद्यामागून अंतराळीं चालत आहेत असें भासलें. परलोक असाच असेल काय? आणि विरळ वायुरूप घेतलेले ते परलोकांतील आत्मे या सृष्टीवर असलेल्या आपल्या आप्त-माणसांभोंवती असेच वावरत असतील काय? या वासना-देहधारी आत्म्यांना दुसऱ्याशीं बोलण्याचीहि इच्छा होत असली पाहिजे. मग हे आत्मे दुसऱ्याला आपलें मनोगत कशा रीतीने व्यक्त करीत असतील?

अशा नाना विचारांत मन गर्क झालें असतां मला वेळेचें भान राहिलें नाही. परत घरीं जावें म्हणून उठलों, तों संधिप्रकाश होता. पण पांचसात पावलें चालतों तों धुकें अगदी चार हात अंतरावर आलेलें पाहून नवल वाटलें. डोक्यावरून आवतीभवतीं कोणी पांढरी चादर टाकावी तसें होऊन पलीकडे कांहीच दिसेना! त्या धुक्यांत अंदाजाने वाट चालतां चालतां डोंगराच्या कोठल्या तरि कडेला आलों. पहातों तों खाली कडा-तुटला होता. आणि धुक्यामुळे आजूबाजूचें कांहीच दिसत नव्हतें. तेव्हा संकटाची खरी कल्पना मला आली! प्रकाश कमी होत अंधेर क्रमाक्रमाने अधिक होत होता. अशा स्थितींत येथेच रात्र होऊन एखादें फुरसें किंवा जिवाणू पायाखालीं सांपडले तर कसें होईल याची मनांत धास्ती उत्पन्न होऊन, वाट शोधीत जिवाकरिता धावू लागलों. क्षणभर विचार मनांत आला की घरी आपली बायको आहे; या डोंगरावरच जर आज आपला

शेवट झाला, तर इतके कष्ट करून जो विद्याभ्यास केला त्याचें आता काय होणार ? पण हा विचार फक्त क्षणभरच टिकला; आणि नंतर जीवन-मृत्यूच्या शर्यतींत मी येथून सुटतों कसा इतकीच काळजी मनांत होती. डोंगराच्या एकदा या टोकाला, तर कांही वेळाने अगदी दुसऱ्याच टोकाला असें होई. पण खाली उतरण्याचा रस्ता कांही सांपडेना ! दैवयोगाने या क्षणीं धुकें किंचित् विरळ झालें; तों असें दिसलें की, रात्र झाली असून दूर खेड्यांतल्या झोंपड्यांतील दिवे लुकलुकत आहेत. तेव्हा मनांत अगदी निराश होऊन त्या डोंगराच्या काठाने हळूहळू चालू लागलों, कांही वेळाने, दैवयोगाचा जणुं कांही चमत्कारच होऊन, डोंगरावरून खाली उतरण्याची जी पाउलवाट होती ती एकाएकी मला आढळली ! तेव्हा पायाखाली काय सांपडेल याची पर्वाहि न करता जी तडक धाव मारली ती थेट घरी आल्यावर थांबविली ! मी जिवावरच्या संकटातून सुटल्यामुळे काकांना आनंद झाला. आणि त्यांनी मला गरम पाण्याची आंघोळ घालून बिछान्यावर निजविलें. तथापि अतिश्रमामुळें झोंप आली नाहीं. भ्रमांत दृष्टीपुढे सारखें असें दिसत होते की, मी धुक्यांतून त्या डोंगरावर धांवत आहें ! टेनिसनची 'लुसी ग्रे' ही कविता पूर्वी मी वाचली होती. पण त्या अनुभवानंतर ती पक्की स्मरणांत राहिली. असो.

वकिलीचा अभ्यास करीत असतांना मुंबईस कांही दिवस राहिलों तेथे बॅ. विठ्ठलराव करंदीकर यांची गांठ पडत असे. त्यांच्याशीं झालेलें एक संभाषण आठवतें. कराराच्या कायद्यांत खरें दडवून ठेवणें ( सजेशिओ व्हेरि ) व खोटें ध्वनित करणें ( सप्रेशिओ फॉल्सी ) या गोष्टी कराराला बाधक म्हणून अपवाद ठरविल्या आहेत. या शब्दांच्या व्याख्या पाहून माझ्या मनांत असें सहज आलें की, खऱ्याचें खोटें करणें आणि खोटयाचें खरें करणें असें वकिली धंद्याचें वर्णन सामान्य माणसें करतात तें खरें तर ! कारण अशील आपल्या तोंडानें खोटें बोलून तें किती बोलणार ? पुरावा कसा किती पुढे आणावयाचा आणि काय किती बोलावयाचें हें वकीलच त्याला पढविणार. कारण एरवी कायदेशीर रीतीने दावा पदरांत पडतों कसा ? पण यामुळें सत्यासत्याची कांहीं नैतिक गुन्हेगारीहि ईश्वराच्या घरीं वकीलाच्या नांवाने चित्रगुप्ताच्या वहींत लिहिली जात असेल, तर तीहि रास्त कां म्हणू नये ! गुन्हा हा जर 'हेतू'नेच अधिक ठरतो, तर अशिलाच्या बुद्धीपेक्षा जितकी वकिलाची बुद्धि अधिक तितका त्याचा नैतिक गुन्हाहि अधिक का ठरू नये ?

हाच युक्तिवाद मी विठ्ठलराव करंदीकर यांच्याशीं केला. पण त्याला त्यांनी अगदी अपेक्षेच्या बाहेर उत्तर दिलें. ते म्हणाले, " नारदाचा गर्व हरण करण्याकरिता श्रीविष्णूनी त्याला एका खाटकाचें घर दाखविलें. दिवसभर हत्येचा आपला नियत धंदा करून रात्रीं तो आईबापांची सेवा करीत असे. नारदाला गर्व झाला होता की ईश्वरस्मरणावांचून आपला एक क्षणहि जात नाही. पण दिवसाचें आपलें कर्तव्य करीत असतां

देवाचें नांव घेण्यालाहि त्या खाटकाला एका क्षणाची उसंत मिळत नसे. तात्पर्य, कर्तव्य मग तें कोणतेंहि असो, तें श्रेष्ठ असें जर महाभारतांत सांगितलें आहे, तर आपला वकिलीचा धंदा हा खाटकाच्या धंद्यापेक्षाहि कोणी अधिक हीन मानण्याचें काय कारण ? ”

या उत्तरानें मी निरुत्तर झालों. पण मनांतील कोडें सुटलें नाही. म्हणून एक दिवस हा प्रश्न मी तात्यांना विचारला. त्याचें त्यांनी तत्काळ असें उत्तर दिलें की, “ वकिलीचा धंदाच मुळीं दोन अर्धसत्यांचा खेळ आहे. प्रत्येक पक्षाजवळ अर्धसत्य असतें व हें दोन्ही अर्धसत्य भाग जेव्हा न्यायधिशापुढे येतात तेव्हाच खरें सत्य पूर्ण होतें. वकील अर्धसत्यच पुढे मांडतो, व तेंच संपूर्ण सत्य असें कोणताहि न्यायधीश कधीहि मानीत नाही. मग वकिलाच्या नैतिक जबाबदारीची चर्चा हवी कशाला ? सातारला प्रथमच वकिली करीत असतांना तेथील बार ॲसोसिएशनपुढे मी एक निबंध वाचला होता. त्यांत तुझ्याप्रमाणेंच मत प्रकट केलें होतें. माझा तो निबंध ऐकून आमचे दादासाहेब करंदीकर मला म्हणाले की, “ वकीलीचा धंदा तुम्ही आणखी कांहीं दिवस केल्यावर तुमचे हे सारे विचार निघून जातील ! ”

माझी वकिलीची परीक्षा पास होऊन विद्याभ्यासांतून मी मोकळा झालों यामुळें तात्यांना फार बरें वाटलें; कारण मुलगा वयांत येऊन तो ‘ हातीं लागणें ’ या गोष्टीमध्ये विक्षेप आणणारे भवितव्यतेचे कितीतरी ‘ जर–तर ’ उभे असतात. एकदा उगाच परगांवी मी बराच दिवस राहिलों, तेव्हा एका पत्रांत त्यांनी लिहिलें की, “ तुमच्या अभ्यासाकडे आणि परीक्षेकडे माझे डोळे लागलेले आहेत. हें काम पूर्ण होईल तो सुदिन ! ” १९२६ सालीं तें असेंब्लीकरिता दिल्लीस गेले असतां बापटांच्या एका पत्रांत त्यांनी लिहिलें होतें – “ चि. बापूचे पेपर बरे गेले आहेत. ते सुटल्यास ( तुमच्या ‘ मुठभर मांसा ’च्या आड न येतां ) मलाहि मूठभर मांस आल्यासारखें वाटेल. त्याच्या स्वभावामुळे त्याच्या प्रकृतीची भीतीच वाटत असते. तो अभ्यासांतून मोकळा झाला म्हणजे बरीच उपयुक्त कामगिरी करणारा होईल. माझ्या ग्रंथप्रसिद्धीचें काम त्याने इतक्या आस्थेने केलें की, त्याने ग्रंथकार म्हणून ( छपाईच्या काळ्या शाईने ) मला उजेडांत आणण्यास पुष्कळच मदत केली. आज मी काय लिहिलें, काय बोललों, याची माहिती त्यालाच कदाचित माझ्यापेक्षा अधिक आहे ! उद्या तो पास झाला व मी टिळकचरित्र लिहावयास घेतलें तर त्याचा मला उपयोग अत्यंत अत्यंत होणार आहे. पाहावें काय होतें तें. ”

हें पत्र उद्‌धृत करतांना माझ्या मनांत काय काय विचार येतात, हें सांगत येत नाही. संसाराचें रोपटें वाढविण्याकरिता ज्यांनी श्रमाकडे न पाहतां रक्ताचें पाणी केलें असेल त्यांनाच ते कळेल. माझ्या मनांत हा विचार असाच कांही कारणाने आला. गेलीं कांही वर्षें मी मुंबईस राहात असतां, बागेंत नुकतींच कांही फुलझाडें लावलीं होतीं

त्यांना रोज पाणी घालून मशागत करण्याचा माझा क्रम होता. झाडें दहाबाराच होतीं; पण तीं नीटनेटकीं ठेवणें, पालापाचोळा साफ करणें, कीड न लागण्याकरिता नवी माती व खतपाणी घालणें यांत तास–सव्वा तास जाई, व संवय नसल्यामुळें अंगांतून चांगला घाम निघत असे. दहापंधरा दिवसात ती झाडें अशीं कितीशीं मोठीं होणार! एक दिवस श्रमून असाच बसलों असतां गमतीने विचार आला की, या झाडांना सारे दहाबारा दिवस पाणी घातले तर मला कंटाळा आला, आणि तीं केव्हा मोठीं होतील म्हणून उतावीळ वाटू लागली, मग तात्यानी आणि ताईनें आज तीस चाळींस वर्षें माझें संगोपन करून मला वाढविलें, यांत त्यांना कांहीच का श्रम पडले नसतील? " हा विचार आल्यावर मला मनापासून हंसू आलें, व कांही वेळाने मी वर जाऊन दुसऱ्या उद्योगाला लागलों.

माझी वकिलीची परीक्षा पास झाल्यामुळे मी इतर उद्योग करण्याला आणि हवें तितकें लिहिण्याला मोकळा झालों. वर्तमानपत्रांत लिहिण्यालाहि कायद्याचें ज्ञान किती आवश्यक आहे हें मी वकील झाल्यावरच माझ्या लक्षांत आलें. कायद्याच्या परिभाषेंत अशी एक लकब आहे की, त्यांत निरर्थक शब्द येऊ शकत नाहीत; आणि शक्य तोंवर त्याच शब्दार्थाचा पुनरुच्चार किंवा पुनरावृत्ति नसते. कायद्यांतलें हें वैशिष्ट्य तात्यांच्या लिहिण्यांत अगदी सहज दिसून येते. किंबहुना त्यांच्या साऱ्या वाङ्मयांतलें कोणतेंहि पान काढून पाहिलें तरी त्यांत निरर्थक शब्द काढून दाखवितां येणार नाहीत! कायद्याचें ज्ञान मला झाल्यामुळे तात्यांचें लिहिणें मला वेगळ्या अर्थाने नीट समजूं लागलें. आणि त्यांच्याच लिहिण्याचा आदर्श मी पुढे ठेवला!

# १०

# टिळक-चरित्रांतील माझी उमेदवारी

तात्यांनी टिळक चरित्र लिहून पुरें केलें हा खरोखर भावी पिढीवर त्यांनी उपकार केला असें म्हटलें पाहिजे. न्या. रानडे यांचें चरित्र गोखल्यांनी लिहिण्याला हरकत नव्हती. तसेंच ना. गोखल्यांचें एखादें चांगलें चरित्र त्यांच्याच अनुयायांपैकी कोणी तरी लिहावयास पाहिजे होतें; पण तें झालें नाही हें खरें. टिळक या दोघांपेक्षा सुदैवी म्हणून तात्यांचे सारखा साक्षेपी निष्ठावंत चरित्रकार मिळाला. कृष्णार्जुनासारखे धीरोदात्त चरित्रनायक असल्यामुळे व्यासांना जसें 'महाभारत' लिहावें लागलें, त्याप्रमाणे, शतकानुशतकांत क्वचित् आढळणारा लो. टिळकांसारखा चरित्रनायक असल्यामुळे तात्यांनी दोन हजार पृष्ठांचें साधार व सविस्तर चरित्र लिहिलें. साऱ्या मराठी वाङ्मयांत इतका विस्तृत व उत्तम चरित्रग्रंथ दुर्मिळच आहे. या चरित्राचे तीन खंड त्यानी सात वर्षांत केसरीचे संपादकत्व आणि राजकरणाचे सारे व्याप सांभाळून पुरें केलें. या काळांत म. गांधींच्या तत्त्वज्ञानाविरुद्ध एका बलिष्ठ राजकीय पक्षाची स्थापना

पुण्यगांठ असेल म्हणूनच असा योग लाभला! यानंतर मीहि स्वतःचीं अशीं चार-दोन पुस्तकें लिहिलीं; पण त्याचें सारें श्रेय मी तात्यांनाच देईन. माझ्या लेखणीने तात्यांशिवाय दुसऱ्या कोणालाहि गुरु मानलें नाही. तसेंच, गेलीं पंचवीस वर्षे मीं लिहीत आहें; पण लेखणीशीं मी कधींहि प्रतारण केली नाही या गोष्टीचा मला अभिमान वाटतो.

टिळक-चरित्राच्या उत्तरार्धांत ताईमहाराज प्रकारण, चिरोल केस, राजकारणाचे मार्ग व अत्याचार, हीं प्रकरणें अत्यंत उत्कृष्ट लिहिलीं आहेत. एखादी उत्तम कलाकृति हातून घडली की, कलावन्ताच्या मनाला जसें समाधान वाटत वाटतें तसें हीं प्रकरणें लिहिल्यावर तात्यांना वाटत होतें. 'राजकारणाचे मार्ग व अत्याचार' या प्रकरणांत टिळकांच्या राजकीय धोरणाचा मी अगदी बरोबर लक्ष्यवेध केला आहे" असे त्यांनी नंतर दोनतीन वेळां उद्‌गार काढले. चिरोल केसच्या साधनसंग्रहांत चाफेकर बंधूपासून तों नाशिक केसपर्यंत अनेक साक्षीदारांच्या जबान्या होत्या. त्यामुळे मलाहि या विषयाचें संपूर्ण दर्शन घडलें. क्रांतिकारक म्हणविणारे देशभक्त म्हणजे कोणी स्वर्गातून अवतरलेले असतात, आणि टिळक, दादाभाई नौरोजी किंवा आजन्म सनदशीर चळवळ करणारीं माणसें हीं जमिनीवर चालणारीं असतात अशी कोणाचीहि कल्पना होणार नाही! क्रांतिकारकांचा स्वार्थत्याग फार मोठा असतो असें कोण मानीत असतील ते असोत; निदान मी तसें मानीत नाही. राजकारण हें नित्य व क्रांतिकारकत्व ही नैमित्तिक गोष्ट आहे. नैमित्तिक हें बोलून चालून नैमित्तिक. तें घडेल तेव्हा घडेल, किंवा वाटल्यास न घडेल! पण त्याकरिता नित्य कर्तव्याचा मामुली मार्ग कोणी त्याज्य किंवा हीन मानण्याचें काय कारण? स्वार्थत्यागाचा उदात्तपणा हा नित्य जीवितांतहि आहेच. ज्याची जळून राख झाली नाही तें तापलेंच नाही असें वाटल्यास कोणी म्हणो, पण राख न होतांहि जें कणकण जळालें ते जळलेंच नाही असें कसें होईल?

टिळकचरित्रासंबंधाने आणखी एक-दोन गोष्टी स्मरणांत आहेत त्या येथेच सांगतों. तात्या कोठलाहि वेळ अगदी फुकट घालवीत नसत. १९२५ किंवा २६ सालीं इचलकरंजीकरांनी माधवगिरी येथे तात्यांना पाहुणचाराकरितां बोलाविलें होतें. बाबासाहेब घोरपडे हे मोठे नेकीचे व दानतीचे गृहस्थ होते. प्रवासांत मीहि बरोबर होतों, व जेवणानंतर किंवा फुरसतीच्या वेळीं कांही लिहिण्याकरिता टिळकांच्या खटल्यांचीं एक-दोन पुस्तकें बरोबर नेलीं होतीं. आम्ही आजऱ्यास असतां १९०८ च्या खटल्यांतील टिळकांचें भाषण, सरकारी वकिलांचीं भाषणें वगैरे सांगून तें प्रकरण त्यांनी पुरें केलें. गंमत अशी की, प्रस्तावना लिहून देणें आणि भाषणें करणें हें शुष्ककाष्ठ प्रवासांत देखील तात्यांना सोडीत नसे. आजरें येथील आमच्या मुक्कामाची पाळत ठेवून एका कवीने आपलें काव्य पाठवून दिलें आणि कऱ्हाडच्या पांडूआण्णा शिराळकरांकडून 'कसेहि करून प्रस्तावना लिहून पाठविण्याची' भीड घातली. तात्या चरित्र लिहिण्याचें काम करणार? की कवितांचें पुस्तक वाचून प्रस्तावना लिहिणार? तेव्हा नाखुषीने, त्या कवितांच्या बुकाचें एक पान

देखील न उघडतां, सुमारें वीसपंचवीस ओळी प्रस्तावना त्यांनी मला तोंडाने सांगितली व त्या आगांतुक कामाची ब्याद टाळली ! हा मजकूर सांगतांना थट्टेने ते हंसतहि होते. तात्पर्य, ज्याला लोकसंग्रह करावयाचा त्याला हीं सगळीं सोंगें संभाळावीं लागतात. टिळकांचा जमाना असलाच होता !

आम्ही माधवगिरी येथे असतांना सरकारी मोटारींतून संध्याकाळीं एकदा फिरावयाला गेलों होतों. सृष्टिशोभा पाहण्याची महाबळेश्वर येथे जशी कांही नाकीं ( Points ) आहेत तशीं येथेहि आहेत. एका कड्याचें ठिकाण दाखविण्याकरिता म्हणून शोफरने वेगाने मोटार नेली ती कड्याच्या अलीकडे वीस हात न थांबता कड्याच्या अगदी टोकावर नेऊन थांबविली ! कडा पाहावयाला जावयाचें म्हणजे कांही थेट त्याच्या डोक्यावर वीतभरच अंतरावर मोटार नेत नाहीत ! मोटारच्या चाकांचा अर्धा फेरा अधिक होता तर त्या दिवशीं आम्ही सर्व मोटारीसकट कड्याखाली जात होतों ! या प्रकाराने तात्या अगदी सर्द झाले. मला ते इतकेंच म्हणाले की, हा शोफर जर माझा नोकर असता तर मी त्याची पाठ चाबकाखाली फोडली असती ! रात्रीं जेवतांना बाबासाहेबांना त्यांनी सूचना केली की ' हा शोफर तेवढा प्रथम बदला ! '

दुसऱ्या व तिसऱ्या खंडाचा हस्तलिखित मजकूर त्यांनी एका लोखंडी ट्रंकेंत ठेवला होता, चौदाशें छापील पृष्ठांच्या त्या हस्तलिखिताकडे पाहून एकदा ते म्हणाले, " कांही अपघाताने किंवा आग लागून हा जर मजकूर नाहीसा झाला तर मीं पुनः कांही तो लिहून काढणार नाही ! " लिहिण्याचे श्रम हे उद्‌गार काढतांना त्यांच्या तोंडावर स्पष्ट दिसत होते. ग्रंथकर्तृत्वाचे श्रम काय असतात हे त्याचा अनुभव असणारांनाच कळतील इतरांना कळणार नाहीत !

एकदां जवळच ते शिरवळला गेले होते. दुपारीं घरीं टाईम्स आला त्यांत स्वामी श्रद्धानंद यांचा दिल्लीस खून झाल्याची बातमी होती. ती पाहून मी चमकलों व अंक खुणा करून त्यांच्याकडे पाठवून दिला. त्यावेळीं अनेक हिंदुसभेच्या पुढाऱ्यांना धमकीची पत्रें येत होतीं. आणि हसन निजामीचें संकट त्यांच्या जिवाभोंवती घिरट्या घालीत होतें. तात्यांना दिल्लीस असेंब्लीच्या अधिवेशनाला जायचेंच होतें; पण ही सर्व परिस्थिति पाहून टिळक चरित्र छापण्याचें काम त्यांनी लांबणीवर टाकलें नाही. कसेंहि करून तें पुरें झालें पाहिजे, म्हणून त्यांनी ताबडतोब दोन छापखान्यांत काम सुरू केलें. दररोज बत्तीस पानाचीं जुनीं प्रुफें, आणि नवी बत्तीस पानांची प्रेसकॉपी असा जवळ जवळ चौसष्ट पानाचा मुकाबला रोज होता. त्यांची ती काम करण्याची अचाट शक्ति पाहून केसरी छापखान्यांतल्या रोलर-मशीनची मला आठवण होई; आणि इतकें असून या चरित्रांत जी सुबक प्रमाणबद्धता आणि वाङ्मयाची लज्जत आहे ती काही वेगळीच. या वेळेला त्यांच्या हाताखालीं काम करण्याची जी संधि लाभली तो माझ्या आयुष्यांतला एक पुण्यकाळ होता असें मी समजतों.

पण इतक्या श्रमाने लिहिलेल्या या ग्रंथांत भरपूर पैसे मिळवावे ही मात्र इच्छा त्यांच्या मनाला शिवली नाही. मला पक्कें आठवतें की पहिल्या खंडाचा शेवट होण्याच्या वेळीं त्यांनी बाबा विद्वांस यांच्या सल्ल्याने अवघी तीन रुपये किंमत ठरविली. तसेंच दुसऱ्या व तिसऱ्या खंडाची चौदाशें पानें असतां दोन्ही खंड मिळून त्यांनी अवघी चार रुपये किंमत ठेवली ! पांच किंवा दहा रुपये किंमत ठेवण्याची सल्ला देणारांना त्यांनी स्पष्ट सांगितलें की, टिळकचरित्रावर पैसा करण्याची मला इच्छा नाही. अलीकडे आपण पाहतों की, काळा बाजार करून कित्येक माणसें क्रोडो रुपये मिळवतात आणि दानशूरतेचा आव आणून त्यांतला दहा पांच हजारांचा तुकडा सार्वजनिक देणगी म्हणून देतात, आणि त्या देणगीची जाहिरात करून त्याचा उपयोग स्वार्थीपणाने पुनः पैसा मिळविण्याकडे करतात ! असला दांभिकपणा तात्यांनी साऱ्या जन्मांत केला नाही. आपल्या पुस्तकांच्या किंमती थोड्या चढ्या ठेवून त्यांना हजारो रुपये मिळवितां आले असते. पण हे पैसे त्यांनी मिळविले नाहीत, म्हणजे लाक्षणिक अर्थाने वाचकानांच ते अंशतः परत दिले असें कां म्हणूं नये ? हजारो रुपये मिळविणें आणि नंतर दान करणें हा राजसगुण आहे. पण संपत्ति रास्त मार्गाने मिळण्यासारखी असता ती मिळविण्याची इच्छा न करणें हा सत्त्वगुणच म्हणावा लागेल. या अबोल स्वार्थत्यागाचें स्वरूप रात्रीच्या पावसासारखें असतें. रात्रीच्या वेळीं कोणाला न कळत पडणारा पाऊसच शेतांत धनधान्याची समृद्धि करतो; आणि समाजाचा संसारहि त्यावरच चाललेला असतो !

## ११

## जुन्या पुण्यांतील नमुनेदार व्यक्ति

लो. टिळकांचे वेळेचा जुना काळ ज्यांनीं पाहिला असेल त्यांच्या नजरेसमोर नुसते टिळकच येत नाहींत; तर त्या वेळच्या अनेक प्रसिद्ध व्यक्ति डोळ्यासमोर उभ्या राहातात. त्यांची कर्तबगारी लहान मोठीं असेल; पण तत्कालीन इतिहासाची ती पार्श्वभूमि आहे. या अनेक व्यक्तीनां मी पाहिलें आहे. चाफेकर बंधूंना मात्र मी पाहिलें नव्हते, कारण त्यांचें सारें चरित्र माझ्या जन्मापूर्वीच होऊन गेलें. ज्यांनीं टिळकयुग पाहिलें आहे त्यांच्या मनावर या अनेक गोष्टींचे पडसाद उमटलेले आहेत. याकरितां माझी आत्मकथा पुढें सांगण्या-पूर्वी, त्या जुन्या काळांतील कांही प्रमुख व्यक्तींची शब्द-चित्रें या प्रकरणांत रेखाटा-वयाचे योजिले आहे.

पुण्याच्या सार्वजनिक जीवनांत ज्या कांही नमुनेदार व्यक्ति होऊन गेल्या त्यांत वासुकाका जोशी यांचें नांव अवश्य घ्यावें लागेल. बंडखोर वासुदेव बळवंतांचें वकील-पत्र घेणारे गणेश वासुदेव जोशी हे पहिले ' सार्वजनिक काका '. वासुकाका हेहि दुसरे

सार्वजनिक काकाच होते. फरक इतकाच की, पहिले काका हे सात्विक होते, तर दुसऱ्या काकांची प्रकृति त्याच्या अगदी उलट होती. सार्वजनिक कामाची हौस मात्र दोघांत जबरदस्त होती. सार्वजनिक काका हे मूर्तिमंत स्वदेशी होते. १८७० च्या दिल्ली दरबाराला खादीच्या पेहेरावांतच ते गेले होते. वासुकाका जोशीहि जन्मभर स्वदेशीचे भक्त असून अगदी साधा पोषाख करीत. वासुकाका विद्वान नव्हते. पण चार पिढ्यांतील प्रमुख सार्वजनिक कार्यकर्त्यांशीं त्यांचा संबंध आला असल्यामुळे, ते म्हणजे सत्तर वर्षांचा जिवंत इतिहास होता ! निर्व्यसनी आयुष्य, निरलस उद्योगी स्वभाव, सार्वजनिक कामांची हौस आणि इंग्रजांबद्दल पराकाष्ठेचा द्वेष, यामुळे टिळकांशीं त्यांची मैत्री जमली. आरंभींच्या उद्योगांत वासुकाकांची मदत फार असे. संमतिवयाचा वाद असो, काँग्रेस काबीज करण्याकरिता पैसे उभे करण्याचा प्रश्न असो, म्युनिसिपल निवडणूक असो, की एखाद्या क्रांतिकारकाला गुप्त मदत करण्याची बाब असो; वासुकाका सगळ्यांत असायचे. सभेंत आयत्या वेळीं हुल्लड करवून प्रतिपक्षाची फजिती कशी करावयाची किंवा कांही तरी गोंधळ माजवून सभेंत मात कशी करावयाची हें शास्त्र त्यांना उत्तम अवगत असे ! यामुळे काँग्रेसचीं सूत्रें हातीं असलेली त्या वेळची नेमस्त व सुधारक मंडळी त्यांच्यावर जळफळत; पण त्यांना वचकून असत. ही मंडळी त्यांना ( Tilak's Evil Genius ) किंवा टिळकांचे 'हस्तक' समजत. म्हणजे जें सरळ उजव्या हाताने करतां येत नाही तेंच डाव्या हाताने साधून घेतां येतें ! शाळेंतलीं पोरेंसोरें किंवा कसलींहि माणसें सभेला आणवून सभा पार पाडणें हा वासुकाकांच्या अगदी तळहातचा मळ होता. असल्या अनुयायांच्या संख्याबळावर टिळक भिस्त ठेवतात याकरिता टिळकांनाहि 'तेल्या–तांबोळ्याचे पुढारी' असें विशेषण नेमस्तानी दिलें होतें !

पहाटे चार वाजले म्हणजे वासुकाका फिरावयास घराबाहेर पडत. मग सहा साडेसहाच्या सुमारास एखाद्या रावबहादुराच्या घरीं, किंवा हरिभाऊंच्या आनंदाश्रमांत, किंवा कोणा तरी मित्राकडे फेरी मारून सात वाजतां ते चित्रशाळेंत येत. प्लेगच्या दिवसांत आम्ही झोंपडींत राहात होतों त्या वेळीं रस्त्यावरूनच मारलेली "नरसोपंडत" अशी उंच हांक ऐकू येत असे. त्रिभुवनसंचारी नारदाप्रमाणे वासुकाका म्हणजे 'जगमित्र' होते. मंडईतल्या माळणींपासून तों नामदार गोखल्यांच्या सोसायटीपर्यंत त्यांचा सर्वत्र प्रवेश आणि सर्व ठिकाणीं ओळखी. संस्थानिकापासून तों भणंगापर्यंत तसेंच अत्यंत मोठ्या विद्वानापासून तों अक्षरशत्रु मनुष्यापर्यंत त्यांच्या सर्वत्र ओळखी होत, याचें कारण मनुष्य स्वभावाची बिनचूक पारख व व्यहारचातुर्य, याशिवाय दुसरे दाखवितां येणार नाही. अंगीं काडीमात्र विद्वत्ता किंवा पोषाखाचा भपका नसताना अनेकांशी संबंध येण्यासारखा कांही विशेष गुण त्यांच्या अंगीं होता असें म्हणावे लागतें. साहस हाहि गुण त्यांच्याजवळ होता. नेपाळच्या मसलतीचें श्रेय श्रीयुत खाडिलकर यांजबरोबर वासुकाकांनाहि द्यावे लागतें. रँडच्या खुनानंतर आपण कदाचित्

धरले जाणार असें दिसतांच छत्र्यांच्या सर्कशींत शिरकाव करून काका सर्व जग फिरून आले. त्यांत अफगाणिस्तान, चीन, जपान, हाँगकाँग, कोबे, अमेरिका, असे कित्येक देश त्यांनी पाहिले. अनेकांशी ओळखी केल्या. 'परराष्ट्रीय' संबंध (?) जोडण्याच्या खटपटी केल्या. पण त्यांत कांहीएक निष्पन्न होण्यासारखें नव्हतें. केवळ परोपकाराकरिता कोणता देश हिंदुस्थानाला सहानुभूति दाखविणार ? अमेरिकेच्या प्रवासांतील अपूर्व गोष्ट म्हणजे स्वामी रामतीर्थ यांच्याशीं काकांची मैत्री झाली ! दोन अंतिम टोकें केव्हा केव्हा मिळतात अशी एक इंग्रजी म्हण आहे, त्याचेंच हें उदाहरण म्हणावयाचें. स्वामीजी परदेशांत अध्यात्मावर व्याख्यानें देत त्याचा उपयोग दिसेना. तेव्हा 'तुम्ही राजकारणांत पडा' असा काकांनी त्यांना सल्ला दिला ! याचे उलट, राजकारणाचीं हीं लफडीं सोडून देऊन 'तुम्ही आत्मशुद्धीच्या मार्गाकडे वळा' असा म. गांधींसारखा मार्ग दर्शविणारा 'साधु' त्या वेळीं वासुकाकांना कोणी भेटला नाही. पण भेटला असता तरी काय उपयोग ? स्वामी रामतीर्थ जसे हा उपदेश ऐकूनहि राजकारणांत पडले नाहीत, तसेच वासुकाकाहि सत्य व अहिंसा यांच्या उपदेशाने 'साधु' होण्याचा संभव नव्हता ! चित्ता आपल्या अंगावरचे ठिपके बदलूं शकत नाही अशी एक म्हण आहे ; तसाच आपला प्रकृतिधर्महि कोणास बदलतां येत नाही !

सर्व जग फिरल्यावर काकांची दहशतवाद व परराष्ट्रांची मदत यांच्या व्यर्थतेबद्दल जवळजवळ खात्री पटली. तथापि अनेक वेळेला इतरांना मदत करण्याकरिता अनेक खटपटी त्यांनी करविल्या. त्यांतील उद्योगाबद्दल सहजच त्यांचें कौतुक वाटतें. दारूच्या कोठारांत कोलीत घेऊन शिरण्याइतका धोका यांत उघडच होता. टिळक, वासुकाका जोशी व इतर क्रांतिकारक यांमधील परस्परसंबंधांचें श्री. देवगिरीकर यांनी यथार्थ वर्णन केलें आहे. ते म्हणतात :—

" टिळकांना उघड करतां न येणाऱ्या किती तरी गोष्टी काकांनी केल्या. अर्थात् त्या सर्व गोष्टींची प्रेरणा टिळकांकडून त्यांना मिळत असे असें मात्र नाही. स्वतःला पटतील त्याच गोष्टी ते करीत. अनेक क्रांतिकारकांना काका हे गुप्तपणाने मदत करीत. १९०८ सालीं परांजपे व टिळक तुरुंगांत गेले. पण वासुकाका कोठे सांपडले नाहीत. वासुकाका हे लेखणीबहाद्दर नव्हते किंवा वक्ते नव्हते. या दोन्ही गोष्टींपैकी एखादी त्यांच्याजवळ असती, तर त्यांचीहि रवानगी तुरुंगांत झाली असती. काकांना कुठल्या तरी गुप्त कटांत ओढावें असा कांहींचा प्रयत्न चालू होता. पण टिळक व काका या बाबतींत अत्यंत सावधगिरीने वागत. या गुप्त कटांशीं किती संबंध ठेवावयाचा, कोणाला सहानुभूति दाखवावयाची, खरा कोण व खोटा कोण हें कसें ओळखावयाचें, वगैरे बाबतींत टिळक व काका अगदी एकमताने चालत. काकांची व टिळकांची जितकी एकरूपता या काळांत झाली होती तितकी पूर्वी झाली नव्हती व पुढेहि झाली नाही. टिळक जर त्या वेळीं थोडेसे ढिले वागते व वावदूक क्रांतिकारकांच्या तावडींत सांपडते, तर त्यांचा सरकारने

काय निकाल लावला असता हें सांगवत नाही. म्हणून सावरकरांचें गुप्त कटाचें जाळें विणलें जात असतांना त्यांना टिळकांनी कोणतीहि सहानुभूति दाखविली नाही किंवा मदतहि केली नाही. त्याबद्दल सावरकरांपैकी एका बंधूंचा टिळकांवर राग होता. त्यांना शिवरामपंत आपलेसे वाटत. शिवरामपंताकडे त्यांनी तक्रार केली. पण टिळकांची आघाडी निराळी होती. त्यामुळे या नवजवानांचा रोष पत्करून व कदाचित् त्यांच्या-कडून मवाळ म्हणवून घेऊन टिळक या क्रांतीपासून अलिप्त राहिले. त्यापैकी कोणी जर त्यांच्याकडे गेला तर त्याला ते काकांकडे पाठवीत. काका त्याच्याबद्दल खात्री करून घेऊन मग मदत करावयाची असेल ती करीत. किंवा तो लुच्चा असेल तर त्याला हाक-लून देत !" (वासुकाका जोशी व त्यांचा काल', पृ. ३९१)

वासुकाका आणि खाडिलकरांचें रहस्य फार होतें. दोघेहि क्रांतिकारकच होते व दोघांचीं मतें व स्वभावहि जमल्यामुळे मैत्री अखेरपर्यंत टिकली. चित्रशाळेजवळ भाऊ-साहेब गोखल्यांच्या वाड्यांत खाडिलकर राहत. चित्रशाळेंत जातांना मीं त्यांना पुष्कळदा पाहिलें आहे. करवंदीच्या जाळींतून निघालेला वाघ जसा सावकाश, कानोसा घेत, दबकत जातो तसे खाडिलकर यांची चाल पाहून मनांत येत असे. स्वभावांतील धीमेपणा आणी तेजस्विता दोन्हीहि मुद्रेवर दिसून येत. खाडिलकरांचा केसरी सुटल्यावर त्यांची बैठक पुष्कळदा चित्रशाळेंतच असे. आणि चित्रमयजगत्च्या निमित्ताने तेथे चिंतामण-राव वैद्य, सीतारामपंत दामले, इतिहास—संशोधक राजवाडे, शिवरामपंत परांजपे, चिंचळ-कर अशी राष्ट्रीय पक्षांतील कित्येक मंडळी येत. 'काळ' पत्र बंद झाल्यामुळे, मस्तकां-तील दिव्य मणि हिरावून घेतलेल्या अश्वत्थाम्याप्रमाणे शिवरामपंतांची स्थिति झाली होती. ज्या त्यांच्या लेखणीने महाराष्ट्राला एके काळीं वेड लावलें होतें तें त्यांचें 'काळां'तील अपूर्व रत्नभांडार सरकारने जप्त केलें होतें. यामुळे पुढच्या काळांत शून्य मनाने शिवरामपंत वावरत तें पाहून वाईट वाटे. पूर्वीं हीं क्रांतिकारक माणसें आघाडी-वर होतीं. आता त्यांच्या अज्ञातवासाचा काळ आला होता. त्या दोघांपेक्षा वासुकाका जोशी अधिक प्रवृत्तिपर असल्यामुळे लिहिण्याचा कांही तरी उद्योग त्या दोघांच्या मागे लावीत. पण त्यांचें मन त्यांत फारसें रमलें नाही. इतकें कशाला, पुढे टिळक सुटून आल्यावर त्यांनी होमरूलची चळवळ देशभर केली, त्यांतहि खाडिलकर व शिवरामपंत समरस होऊं शकले नाहीत. एकांतिक टोंक गाठणाराचें असेंच होतें. त्याचें मन मी समजूं शकतों. श्री. देवगिरीकर लिहितात, "१९१४ ते १९२० या काळांत वासुकाका फारशा चळवळी करीत नव्हते. कॉंग्रेसमध्ये जावें की जाऊं नये या प्रश्नापासून टिळक-पक्षांत मतभेद सुरू झाले. टिळकांची राजनिष्ठा, बहिष्काराचा बदललेला अर्थ, वगैरे काकांना बिलकूल पसंत नव्हते. शिवरामपंत परांजपे, खाडिलकर हे होमरूलची चळ-वळ खूप उत्साहाने करीत. पण त्यांना त्या चळवळीच्या मर्यादा मान्य होत्या की नाही हें सांगवत नाही. तो काळ टिळकांच्या जुन्या जहाल पक्षीयांना अनुकूल नव्हता.

पण श्री. केळकर यांचा तो खरा काळ होता. " ( जोशी व त्याचा काल, पृ ४३५ )

वासुकाका पुस्तकी विद्वान नव्हते. तथापि नुसती 'बुद्धिमत्ता' घेतली तर शिवरामपंत किंवा खाडिलकर यांच्यापेक्षा वासुकाकांत ती सरस होती. केवळ पुस्तकी ज्ञान हेंच काहीं बुद्धिमत्तेचें गमक नाही. हीं दोन्ही नसतांहि अक्षरशत्रु मनुष्यांतहि विशेष प्रकारची बुद्धिमत्ता असूं शकतें ? वेळीं कायद्यालाहि डाका घालील असें बुद्धीचें कसब वासुकाकांजवळ होतें. आणि वयानेहि शिवरामपंत किंवा खाडिलकर यांपेक्षा वासुकाका मोठे असल्यामुळे अडचणींच्या वेळीं या दोघांना ते गागरूं देत नसत. कांही तरी मार्ग काढीत. शिवरामपंत किंवा खाडिलकर या दोघांनाही 'कायदा' या शब्दाचें वावडें होतें. 'कायदेशीर' पणांत जे अनेक शब्दश्लेष, बारकावे किंवा अडचणी समजून घ्याव्या लागत त्या बंधनांत वागणें दोघांच्या स्वभावांतच नव्हतें. त्याना वाटे, एवढी भानगड हवी कशाकरितां ? कायद्याशीं संबंध असलेल्या त्या गोष्टींशीं आपला कधी संबंधच येऊं दिला नाही म्हणजे झालें ! आपण 'स्वातंत्र्यवादी' आहों; आपल्याला काय हवें तेवढें आपण सांगावें, आणि इतर सर्व बेलाशक सोडून द्यावें ! कायदे-कौन्सिलाचें किंवा कोणत्याहि विधायक कामाचें या दोघांनाहि वावडें कां असे, त्याचें गमक या त्यांच्या स्वभावांत सांपडतें. शिवरामपंतांच्या मनाची भूमिका थेट एखाद्या कलावंताप्रमाणे होती; नित्याच्या अनेक चळवळींचा उपसर्ग त्यांना अगदी नको वाटे ! लेखणीने त्यानी एखादें रम्य काव्यचित्र उठवावें किंवा पेशवाई अंगरख्याच्या रुबाबांत एखाद्या जनसमुदायापुढे अपूर्व असें भाषण करून आपल्या विश्रांतीच्या आरामशीर दालनांत परत यावें ! शिवरामपंतांचा हा स्वभाव ओळखून त्यांचा उपयोग सामान्यपणें आपल्या चळवळीला जो होईल तो टिळकांनी करून घेतला; पण त्यांना मामुली कामाच्या व्यापांत ओढलें नाही. खाडिलकर हेहि नाटककार म्हणजे एकप्रकारें कलावंतच. खाडिलकरांचें सारें चरित्र चाळून पाहिलें तर, कोणत्याहि एखाद्या संस्थेशीं संबंध ठेवून त्याच्या दैनंदिन व्यवहारांत त्यांनी लक्ष घातलें, किंवा ती संस्था त्यांनी नांवारूपाला आणली असें आढळणार नाही ! देश म्हणजे देशांतल्या निरनिराळ्या संस्थाच, दुसरें काय ! त्या उदयाला येतील तरच देशाचा भाग्योदय होईल. या संस्थांच्या संसाराची काळजी वाहणें याचाच अर्थ 'विधायक कार्य' आणि तें या दोघांनी केलें नाही असें 'गतगोष्टी'त लिहितांना तात्यांना दोघांचा दोष काढावयाचा नव्हता; त्यांना फक्त स्वभावदर्शन अभिप्रेत होतें.

तात्यांनी 'काळ' पत्रांत किंवा शिवरामपंतांनी केसरी-मराठ्यांत एकहि लेख लिहिलेला सहसा आढळत नाही. नाही म्हणायला 'अधिकार विभागणी' कमिशनपुढे १९०८ सालीं शिवरामपंतांनी साक्ष दिली त्या वेळीं एक लेख त्यांनी सहीनिशी मराठ्यांत लिहिला. मतभेद ठेवूनहि अशा गोष्टी परस्परांत चालू असणें याबद्दल तात्यांना कौतुक होतें. हायकोर्टांत शिवरामपंतांनी स्वतः भाषण करून आपला बचाव केला ही

गोष्ट तात्यांना फारच आवडली! मराठ्यांत स्फुट लेख लिहून शिवरामपंतांचें त्यांनीं अभिनंदन केलें होतें. शिवरामपंतांच्या चरित्रांत न आलेली व आज विस्मृतींत गेलेली एक गोष्ट येथे मुद्दाम सांगतोः—

काळकर्ते परांजपे हे तुरुंगात गेल्यावर संपादक म्हणून पत्रावर नांव कोणी घालावयाचें हा प्रश्न येऊन पडला. ना. दाजीसाहेब खरे यांचे पुतणे पुरुषोत्तम बापुजी खरे यांचा ओढा जहालपक्षाकडे असल्यामुळे त्यांनीं संपादक म्हणून पत्रावर नांव घातलें. पुढे त्यांनाहि तुरुंगांत जाण्याची पाळी आली तेव्हां त्यांना जामिनावर सोडवून आणण्याकरिता तात्यांनीच कोर्टांत वकीलपत्र दाखल करून काम चालविलें होतें. श्री. ल. ब. भोपटकर हे त्या वेळीं वकिलीची परीक्षा नुकतेच दिलेले तरुण असून तात्यांच्या हाताखाली ज्यूनियर असिस्टंट होते. वाचकांनीं गमतीने हें दृश्य डोळ्यांसमोर आणण्यासारखें आहे!

शिवरामपंतांच्याप्रमाणेंच श्रीयुत खाडिलकर यांच्याबद्दलहि माझ्या मनांत आदर आहे म्हणून त्यांच्याबद्दल एखादा शब्द लिहितांना माझी लेखणी थबकतेच. खाडिलकर व तात्या या दोघांमध्यें केसरीसंबंधी वाद होता; पण १९०९ अखेर सर्व बाजूंनी परिस्थितीच अशी जमून आली की, त्यानंतर केसरीवर आपलें नांव ठेवणें हें कृष्णाजीपंतांना शक्य नव्हतें. ते आपसांतील वादाचा निमित्त म्हणून तोंडाने उच्चार करोत. पण त्यांना खरें नडलें तें नेपाळ प्रकरणच. ही गोष्ट त्यांना मनोमन माहीत होती! या नेपाळ प्रकरणांतला दामु जोशी कोल्हापुरास अटकेंत असून, त्याच्या पुराव्याने श्री. गंगाधरराव देशपांडे, कृष्णाजीपंत खाडिलकर यांच्यावर खटला भरण्याविषयी कोल्हापूरकर छत्रपति यांचे कसे प्रयत्न सुरू होते हें टिळकचरित्रांत दामु जोशी याचें एक गुप्त पत्र छापलें आहे यावरून दिसून येईल. अर्थात खाडिलकरांवर खटला म्हणजे तो केसरीवर खटला हें ओघानेच आलें! म्हणून कसेंहि करून केसरीचा बचाव करण्याकरिता, या वेळीं संपादकांत खांदेबदल होणें ही गोष्ट अगदी क्रमप्राप्त आणि केसरीच्या दृष्टीने वाजवी होती. एखाद्या देशाच्या प्रधानमंडळांत राजकीय धोरणाच्या मुद्दयावर फेरबदल होतात तोच दाखला वर्तमानपत्रांत संपादकांच्या फेरबदलास लावावयास हवा! यापेक्षा अन्य दृष्टीने म्हणजे पात्रापात्रता किंवा खाजगी भाउबंदकीच्या दृष्टीने त्याकडे पाहिलें जातें; इतकेंच नव्हे तर, ज्यांचा त्यांत काडीमात्र संबंध नाही अशीं वरेरकर, न. र. फाटक, देवगिरीकर यांच्यासारखीं माणसें कारण नसतांना टीका करण्याची संधि साधून घेतात, हें पाहिलें म्हणजे खरी राजकीय दृष्टि आपणांस बिलकूल कळत नाही असें म्हणणें प्राप्त होतें! श्रीयुत देवगिरीकर यानी खुद्द टिळकांना या बाबतींत दोष दिला आहे. याहून बेजबाबदार टीका दुसरी कोणती असेल! भिन्न प्रसंगीं या दोघांचाहि उपयोग टिळकांनीं केसरीकडे केला नव्हता काय? मनुष्याने हवें तें करावें किंवा वाटल्यास न करावें. पण त्याने आपलें घर शाबूत ठेवावें. तें असेल तर अडचणीच्या

वेळी उभे राहण्याला निवाऱ्याची जागा तरी राहील. संकटाच्या वेळीं ही संरक्षणाची बुद्धि सामान्य मनुष्याला देखील सुचते! क्रांतिकारकांच्या उद्योगांचा उपसर्ग स्वतःला न बाधावा म्हणून टिळक व वासुकाका जोशी किती खबरदारी घेत याचें वर्णन देवगिरीकरांनीच केलेलें वर या लेखांत दिलें आहे. मग तीच सावधगिरी घेण्याची बुद्धि या वेळी केसरीच्या चालकांना झाली तर त्यांची प्रशंसा राहोच, पण त्यांना दोष कां द्यावा ?

तथापि झालें तेंहि एका अर्थानें आपल्या बऱ्याकरितांच, अशी म्हणजे वाईटांतून चांगलें पाहण्याची दृष्टि ठेवून कृष्णाजीपंतांनी रंगभूमीकडे लक्ष देण्याचें ठरविलें. टिळकांनी अज्ञातवासांत 'गीतारहस्य' लिहिलें त्याप्रमाणे खाडिलकरांच्या विद्याहरण, मानापमान इत्यादि अमर नाट्यकृति या अज्ञातवासाच्या काळांतच जन्म पावल्या आहेत. राष्ट्रीय क्लबाच्या बैठकींत आमच्या घरीं ते नेहमीं येत. एकदां मानापमानाच्या चौथ्या अंकाचें वाचन आमच्या घरींच झालें होतें. सामान्य मनुष्याप्रमाणे मोठ्या लोकांतहि वाद असतात. पण दोहोंत एक फरक फार मोठा आहे. मोठीं माणसें एकमेकांच्या अपरोक्ष स्वतः त्यांची निंदा करीत तर नाहीतच, पण दुसऱ्यानें केलेलीहि सहन करीत नाहीत. एकदां एका नाटक-कंपनींत कोणी केळकरांबद्दल निंदेचा उद्गार काढला असतांना 'जेथें नरसोपंतांबद्दल निंदा होते तेथे एक क्षणभर देखील मी बसणार नाही' असें म्हणून खाडिलकर कसे उठून गेले; तसेंच मामा वरेकर यांनी मायावीपणानें श्री. खाडिलकर यांजकडे जाऊन 'गतगोष्टीं'तील विधानांना उत्तर द्यावें असा परोपरीनें आग्रह चालविला असतांना, "त्याची कांही एक जरूरी नाही. या आता!" असें म्हणून स्वतःच त्यांना नमस्कार करून कसें वाटेला लावलें; प्रतिसहकारपक्षाविरुद्ध प्रचार करण्याकरिता मदत म्हणून मोतिलाल नेहरू यांनी वीस हजारांचा चेक दिला असता तो त्यानी कसा साभार परत दिला, तसेंच तात्यासाहेब केळकर यांच्या मृत्यूची बातमी ऐकतांच क्षणभर स्तब्ध होऊन "आता आमची पाळी" हे उद्गार त्यांच्या तोंडून कसे निघाले; शरीर जराजर्जर झालें असतांहि शेवटपर्यंत त्यांचा स्वाध्याय आणि वर्तमानपत्राच्या योगक्षेमाची आस्था ही कशी अविरत होती; यांचें उत्कृष्ट शब्दचित्र खाडिलकरांच्या 'स्मरणीं'त ठिकठिकाणीं आढळतें. तें पाहून कोणाचेंहि मस्तक त्यांच्यापुढे विनम्रभावानें नत झाल्याशिवाय राहणार नाही. जीर्णावस्था प्राप्त झाली तरी एकांतवासांत राहणाऱ्या शमीवृक्षाची आठवण मला खाडिलकरांकडें पाहून होत असे. तो कितीहि जीर्ण होवो, अभिमानाचा अग्निस्फुलिंग त्याच्या पोटांत असतोच. म्हणून सहसा त्याच्या वाटेला कोणी जात नाही. १९४५ सालीं ते पुण्यांत विकलांग स्थितींत असतांना मी मुद्दाम त्यांना भेटावयास गेलों होतों. माझ्याशीं ते अगत्यानें, प्रेमळपणानें बोलले. घरीं आल्यावर, संध्याकाळी बाहेर बांकावर तात्या स्वस्थपणें विश्रांति घेत बसलेले असत त्यांनाहि ही गोष्ट मी सांगितली. ते कांहि बोलले नाहीत.

पण त्यांना काय वाटलें असेल याचा नक्की पडताळा श्री. गजाननराव माडखोलकर यांच्या 'स्मरणीं'तील आठवणींत आढळतो. म्हणून त्यांतील कांही भाग येथे देतों. श्री माडखोलकर लिहितात – "खाडिलकरांबद्दल केळकरांनी बोलण्याचा तिसरा प्रसंग १९४४ च्या मे मधला. मी संध्याकाळच्या सुमारास कै. तात्यासाहेब केळकरांना भेटावयाला गेलों होतों. त्यांची प्रकृति थोडीशी अस्वस्थ असल्याकारणाने ते उपरणें पांघरून आरामखुर्चीवर लेटले होते. स्वतःच्या गतजीवनाविषयी बोलणें त्यांना फारसें आवडत नसे. पण, मन उदास असल्यामुळेंच की काय त्या दिवशीं कोल्हटकरांवरून बोलतां बोलतां ते एकदम स्वतःच्या गतजीवनाकडे वळून म्हणाले, 'माणसांच्या विशिष्ट प्रकृतींमुळे त्यांच्या आयुष्याला किती भिन्न वळण लागतें याची कोल्हटकर, मी व कृष्णाजीपंत हीं तीन उदाहरणें आहेत. कोल्हटकर एल. एल. बी. झाल्यावर वकिलीला लागल्यामुळे त्यांच्या आणि आमच्या आयुष्याक्रमांत अंतर पडलें याचें मला नवल वाटत नाही. पण मी आणि कृष्णाजीपंत चोवीस वर्षें एका पक्षांत आणि एकाच पत्राच्या कचेरींत काढूनहि अखेर आयुष्याच्या उतरत्या दिवसांत निराळ्या मार्गाला लागलों, यांत भिन्न प्रकृतिधर्माशिवाय दुसरें कोणतें कारण सांगतां येईल ?"

त्यावर मीं त्यांना सहजच विचारलें, "हा प्रकृतिभेद टिळकांच्या हयातींत कधींच नडला नाही का ?"

"नाही कसा ? हरएक बाबतींत तो नडत असे व टिळकांना काळ्यापाण्याची शिक्षा झाल्यावर दोन वर्षांनी कृष्णाजीपंतांना जो केसरी सोडावा लागला, त्याला कारणहि आम्हा दोघांची प्रकृति अगदी भिन्न ठरली हेंच होय !" ते किंचित् विनोदाने उद्गारले.

त्यांचें हें विधान ऐकतांच मला त्यांनी 'गतगोष्टी'त खाडिलकरांविषयी केलेल्या विधानांची आठवण झाली; व मीं त्यांना विचारलें,

"या प्रकृतिभेदामुळेच ते टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीजींचे अनुयायी झाले, नव्हे का ?"

"हो, तसेंच म्हटलें पाहिजे. आमच्या राष्ट्रीय पक्षांत खाडिलकर हे प्रथमपासूनच 'मिस्टिक,' गूढतेचें आकर्षण असलेले, अध्यात्मवादी. आणि 'मिस्टिक' म्हणूनच विभूतिपूजकहि ! "यद्यद्विभूतिमत्सत्त्वं" या गीतावचनाच्या दृष्टीने पुढाऱ्याकडे पाहणारे. टिळक हे अगदी रुक्ष, तर्ककर्कश बुद्धीच्या कसोटीवर साऱ्या गोष्टी पारखून पाऊल टाकणारे; त्यांच्यांत 'मिस्टीसिझम' अगदी नव्हता. आमच्या पक्षांतले 'मिस्टिक' म्हणजे डॉ. अण्णासाहेब पटवर्धन ! पण टिळक 'मिस्टिक' नसूनहि खाडिलकरांची जी त्यांच्यावर अनन्यभक्ति होती ती टिळक हे त्या काळांतील अद्वितीय विभूति होते म्हणूनच ! खाडिलकरांच्या 'केसरीं'तील संपादकीय लेखनाला विभूतिपूजेच्या प्रतिपादनापासून प्रारंभ झाला, ही गोष्टहि त्यांच्या या प्रकृतीचीच निदर्शक आहे.

ही त्यांची प्रकृति लक्षांत घेऊनच टिळकांनीहि त्यांना नेपाळांत पाठविलें होते. टिळक वारल्यानंतर आमच्या पक्षांत आकर्षक असें विभूतिमत्त्व अजिबात उरलें नाही. आमच्या राजकारणाची बैठकहि आध्यात्मिक नव्हती. टिळकांच्या धोरणानुसार आम्ही प्रत्येक तत्त्व आणि प्रत्येक कार्यक्रम व्यवहार-बुद्धीने तपासून पाहणारे. उलट गांधी हे महंतांचे मेरुमणि. त्यांनी राजकारणांत इतका ' मिस्टिसिझम ' आणला की, तितका भक्तिमार्गांत-सुद्धा कोणा संतमहंताने कधी आणला नसेल! त्यांच्या या गूढ आध्यात्मिक राज-कारणाच्या प्रभावामुळे कृष्णाजीपंत त्यांच्याकडे आकर्षिले गेले. पक्षाच्या किंवा परंपरेच्या निष्ठेपेक्षा प्रकृतिधर्मच अखेर प्रबळ ठरला!"

"पण कोल्हटकर आणि खाडिलकर यांच्यापेक्षा आपलें जीवन मला अधिक समृद्ध, अधिक यशस्वी वाटतें–"

"माझें हें विधान ऐकून ते कांही क्षण स्तब्ध होते. नंतर खुर्चीवरून एकदम उठून ते म्हणाले–"व्यावहारिकदृष्ट्या तुम्ही म्हणतां तें खरें आहे. पण समृद्धि आणि यश यांच्याविषयींच्या कल्पना वेगवेगळ्या असूं शकतात. लोकांनी मला 'साहित्य-सम्राट्' ही पदवी देऊन गौरविलें, कारण मीं सर्व प्रकारचें वाङ्मय पुष्कळ लिहिलें आणि तें लोकाभिरुचीच्या कसोटीला उतरलें. इतकेंच नव्हे तर, त्या त्या विषयाच्या जाणकारांनाहि तें मान्य झालें. माझ्यावर मानसन्मानांचा वर्षावहि झाला. तरीसुद्धा कांही बाबतींत कोल्हटकर आणि खाडिलकर हे माझ्यापेक्षा अधिक पराक्रमी आणि दैववान् ठरतात, असें मी मानतों. कोल्हटकरांचें गुरुपीठ त्यांच्या डोळ्यादेखत निर्माण झालें व विनोदाचे प्रवर्तक, आचार्य म्हणूनहि त्यांचें स्थान पहिलेंच राहील. तसेंच नाट-कांच्याहि एका विशिष्ट संप्रदायाचे जनक म्हणून ते गणले जातील. तीच गोष्ट खाडिल-करांची. मराठी नाटकांतील त्यांचा संप्रदाय स्वतंत्र असून देवल, कोल्हटकर, गडकरी यांच्यासारख्या समकालीन थोर नाटककारांवर मात करून त्यांनी मराठी रंगभूमीवर वर्चस्व गाजविलें. महाराष्ट्रांतील नाटककार आणि नट हे दोघेहि किर्लोस्करांच्या खालोखाल त्यांचें रंगभूमीवरील गुरुपीठ मानतात. 'लोकमान्य' 'नवा काळ' हीं दोन दैनिकें चालवून त्यांनी पत्रकार म्हणूनहि अगदी निराळ्या प्रकारचा लौकिक संपादन केला व मराठी वृत्तव्यवसायाला आधुनिक नवीन वळण लावलें."

बोलतां बोलतां ते एकदम थांबले आणि खाकरून उद्गारले, "एका बाबतींत तर मी खाडिलकरांना आम्हां दोघांपेक्षाहि दैववान् समजतों. आपलें गुरुपीठ, आपली परंपरा किंवा आपला वारसा पुढे चालविणारा पुत्र आपल्या पोटीं येणें व त्याच्यावर आपली कार्यधुरा सोपवून उतारवयांत निवृत्त होतां येणें, हें भाग्य टिळकांना सुद्धा लाभलें नाही. खाडिलकरांच्या वाट्याला तें भाग्य आलें आणि आपला मुलगा कर्तबगार संपादक निघा-लेला त्यांनी पाहिला, यांत माझ्या समजुतीने जीविताचें सारें साफल्य आणि सारी समृद्धि त्यांनी साधली!—"

"खाडिलकरांविषयी व्यक्तिशः मला इतकें आकर्षण प्रथमपासून का वाटतें याचा जेव्हा मीं विचार करतो, तेव्हा कै. तात्यासाहेब केळकर यानीं केलेली त्यांच्या मनोवृत्तीची ही मीमांसा मला आठवते."

टिळकांच्या वेळीं वावरणाऱ्या कांहीं ठळक व्यक्तींचीं शब्दचित्रें पार्श्वभूमि म्हणून टीळकचरित्रांत घालण्याची तात्यांच्या मनांत इच्छा होती. पण ती गोष्ट त्यांनी सहेतुक सोडून दिली हें मला माहीत आहे. न्यायमूर्ति रानडे, ना. गोखले, फेरोजशहा मेहता, श्रीधर विठ्ठल दाते अशा कांही थोड्या व्यक्तींचीं शब्दचित्रें त्यांनी दिलीं; पण समकालीन व्यक्तींचीं शब्दचित्रें – उदाहरणार्थ, गंगाधरराव देशपांडे, वासुकाका जोशी, खाडिलकर, शिवरामपंत परांजपे, वगैरे–देण्याला एक तर सदभिरुचीचें बंधन होतें; व दुसरें म्हणजे टिळकांच्या मृत्यूनंतर टिळकपक्षच दुभंग होऊन त्यांतील कित्येक अतिरथी विरुद्ध पक्षाच्या निशाणाखाली जमा झाले, त्यामुळें टिळकचरित्रांत या लोकांचें शब्द-चित्र काढणें त्या वेळीं समेटाच्या दृष्टीने कार्यसाधक नव्हतें. वासुकाका, गंगाधरराव देशपांडे ही मंडळी तर राहोतच, पण दादासाहेब खापर्डे, दादासाहेब करंदीकर, बाप्टिस्टा ही जवळची मंडळी देखील केसरीवर नाराज झाली होती. अच्युतराव कोल्हटकर, महादेव राजाराम बोडस ही मंडळी तर उघडपणें शत्रुत्व करीत होती. अशा स्थितींत इतिहास म्हणून कां होईना, कोणाहि समकालीन व्यक्तीचें स्वभाव-वर्णन टिळकचरित्रांत करण्याला एक प्रकारें अडचण होती. मृताचें चरित्र कसेंहि लिहिलें गेलें तरी नंतर त्याला तें पसंत पडेल की नाही हा प्रश्नच नसतो. पण जित्यांचीं शब्द-चित्रेंहि तुम्ही त्या इतिहासांत काढणार हें कोण मानील? यांत सदभिरुचीचें बंधन सहजच येतें. या कारणाने आलेली अपूर्णतेची जाणीव तात्यांनाहि होती म्हणून "ज्याने देऊळ बांधलें त्यानेच शिखर बांधू नये, तें काम इतर कोणाकरिता शिल्लक ठेवावे" असे विनयाचे सहेतुक उद्गार टिळक-चरित्राच्या प्रस्तावनेंत त्यांनी काढले होते. त्या वेळच्या अनेक समकालीन थोर व्यक्तींचीं चरित्रें त्यांच्या नातेवाईकांनी आता प्रसिद्ध केलीं आहेत, ही गोष्ट एकपरीने बरी झाली आहे. पण त्या सर्वांवरून त्या काळाचें यथार्थ चित्र मनापुढे उभें करणें हें काम मात्र ज्याचें त्यालाच करावें लागणार! इतिहासांतलें शहाणपण ज्याला म्हणतात ती गोष्ट येथेच उत्पन्न होते. कोणाहि चरित्रकारावर किंवा लेखकावर मी टीका करूं इच्छीत नाही. त्यांचें काम त्यांनी प्रामाणिकपणाने केलें आहे. पण जसजसा अधिक काळ जाईल तसतसें टिळकचरित्र आणि त्यांत लेखक म्हणून तात्यांनी प्रकट केलेले गुण हे अधिकाधिक मान्यता पावतील असें मला निश्चित वाटतें.

सुरतेच्या कॉंग्रेसनंतरचा काळ यथार्थ रीतीने लक्षांत आणावयाचा तर नुसतीं क्रांतिकारकांचीं चित्रेंच मनापुढे आणून भागणार नाही. दुसऱ्याहि कांही व्यक्ति डोळ्यापुढे आणाव्या लागतील. उदाहरणार्थ, महर्षि अण्णासाहेब पटवर्धन हे त्या वेळीं

केवळ साक्षीभूत होऊन टिळकांच्या राजकारणाकडे पाहात होते. पूर्वी त्यांचें आयुष्य जळजळीत क्रांतिकारकासारखें होतें. आता तें सर्व सोडून देऊन महर्षि अरविंद घोष यांच्याप्रमाणे त्यांनी निवृत्तिमार्ग पत्करला होता. कै. गणेश व्यंकटेश जोशी हे दुसरे एक वृद्ध गृहस्थ राष्ट्रीय पक्षाकडे वळले होते. गोखले नेमस्त पक्षाकडे तर प्रत्यक्ष त्यांचे गुरु गणपतराव जोशी राष्ट्रीय पक्षाकडे, हें दृश्य खरोखरीच विलोभनीय होतें. नेव्हिनसन याने आपल्या पुस्तकांत त्यांचें विनोदी शब्दचित्र काढलें आहे–

"जोशीबुवांची अभ्यासाची खोली पाहिली तर जिकडे तिकडे बुकें पसरलीं आहेत, शेंकडों सरकारी रिपोर्टाचे ढीग अस्ताव्यस्त पडले आहेत, अशी होती. जणूं कांही असे दिसे की, इंग्रजी अमदानीला सुरुवात झाल्यापासून आंकडेशास्त्राचें व अर्थशास्त्राचें प्रत्येक बारीकसारीक पुस्तक जमवून त्यांनी आपल्या मनामध्यें त्यांतील माहिती गोळा करून ठेवलेली होती. कुठलेहि आंकडे समोर आले तरी त्याचें सर्वसाधारण प्रमाण–ॲव्हरेज – काय बसतें हें ठरविण्यांत त्यांचा हातखंडा होता. यालाच अर्थशास्त्राची उपजत बुद्धि असें म्हणतात. स्त्रिया व मुलें म्हटलें तरी गणितशास्त्राच्या भाषेंत 'बेरीज' एवढेंच त्यांना समजे. रस्त्यांत मनुष्य जातांना दिसला तरी संख्या किंवा आंकडे इतकेंच बहुधा त्यांना ज्ञान होई. सृष्ट पदार्थांच्या सौंदर्यरेखा चित्रकाराच्या बुद्धीला जशा उपजत लक्षांत येतात त्याचप्रमाणें जमाखर्च, लोकसंख्या व सरकारी महसूल यांबद्दल सरकारी रिपोर्टांच्या नकाशांत दिलेल्या चढउताराच्या रेखा ( कर्व्हज ) त्यांना चित्तवेधक वाटत. मुलांना शाळेंत रॉबिन्सन क्रूसोचें चरित्र पढविणाऱ्या या शिक्षकांचा 'स्वाध्याय'–वेद म्हणजे सरकारने प्रसिद्ध केलेलें स्टॅटिस्टिकल ॲबस्ट्रॅक्टचें पुस्तक. जोशीबुवांना तें कवितेइतकें रम्य वाटे. व त्यांतहि फायनान्स हा विषय आला की, त्यावर त्यांच्या मनाची हर्षानें उडी पडे ! तात्पर्य, हिंदी राज्यकारभाराच्या आर्थिक व्यवस्थेचा कोणताहि विषय घ्या, त्यावर अधिकृत मुद्देसूद व प्रमाणबद्ध मत देण्यांत जोशीबुवांचा हातखंडा अगदी अवर्णनीय होंता." १९०९ सालीं साम्राज्यांतील निरनिराळ्या देशांना स्वातंत्र्य-प्राप्ती कशी झाली या विषयावर सार्वजनिक सभेच्या हॉलमध्ये जोशीबुवांनी अतिशय विद्वत्तापूर्ण अशी चार-पांच व्याख्यानें तात्यांच्या अध्यक्षतेखाली दिलीं होतीं. ती ऐक-ण्याला मोठमोठी नामांकित विद्वान मंडळी येत असत.

साताराचे प्रसिद्ध वकील दादासाहेब करंदीकर यांचाहि उल्लेख तत्कालीन ठळक व्यक्तींत केला पाहिजे. टिळकांची शिक्षा अपिलांत रद्द व्हावी म्हणून दादासाहेब खापर्डे यांजबरोबर विलायतेस जाऊन दादासाहेब करंदीकरांनी खटपट केली. पण त्यांत यश आलें नाही. त्यांची बुद्धि कार्यसाधक व वकीली शहाणपण इतकें होतें कीं तशीं माणसें साऱ्या हिंदुस्थानांत चार दोनहि सांपडलीं नसतीं ! आपण वकील म्हणजे एक स्वतंत्र व्यक्ति आहों ही भूमिका त्यांनी अखेरपर्यंत टिकविली. त्यांच्या स्वभावांत लकबी इतक्या होत्या की त्यांचें स्वभाववर्णन चार दोन पानांत करतां येणार नाही. कोणी दोनशें पानांची

कादंबरी लिहील तरच तें शक्य होईल! विलायतेला ते गेले तेव्हा नुसतें खटल्याचें काम करून ते परत आले नाहीत. मोर्लेच्या सुधारणांचें काम कोठपर्यंत आलें आहे; सर लॉरेन्स जेंकिन्स यांचें जर गोखले आणि मोर्ले यांजपाशी वजन आहे, तर जेंकिन्स याज पाशी राजकीय चर्चा न करून कसें चालेल? तीहि केली पाहिजे. 'इंडिया हाऊस'मध्यें अनेक तरुण विद्यार्थी बॅरिस्टर होण्याकरिता आले आहेत. वयाने नसले तरी मनाने तरुण असणाऱ्या दादासाहेबांना त्यांचें केवढें कौतुक! एक दिवस पहाटे मुद्दाम फिरण्याकरिता त्यांनी इंडिया हाऊसकडे जाऊन या विद्यार्थ्यांत मिसळून चहाकॉफी घ्यावी; गप्पा माराव्या; आणि आपलें पागोटें क्षणभर खाली काढून ठेवून तंबोऱ्यावर सकाळचा भैरव राग त्यांना सुनवावा. खाण्यापिण्यांत हीं मुलें स्वैर झालीं आहेत, पण देशाचें स्वातंत्र्य तीं मिळवणार तेव्हा वर्तनांत काय काय करतील तें खरे! आणि आपणच नाही का त्यांच्यावर विसंबून त्यांना परदेशांत पाठविलें. अर्थात् त्यांच्या दोषाचे आपण कोठें भागीदार नाही? असा त्यांच्या बोलण्यांत एखादा सूक्ष्म रेशमी चिमटा असे. मनुष्य शहाणा असेल तर तो ज्याचा त्यालाच कळत असे! त्यांचीं 'विलायतची बातमीपत्रें' या दृष्टीने वाचण्यासारखीं आहेत. कोणीहि मनुष्य तो केवढाहि बृहस्पति असो, दादासाहेबांसमोर आल्यावर त्याला चांचरल्यासारखे किंवा लाजल्यासारखें होत असे. टिळकपक्षांत त्या वेळीं पुष्कळ माणसें होतीं. पण दादासाहेबांच्याकडून शहाणपणाचें सर्टिफिकेट मिळवून गेले असे आमचे तात्याच! ज्या चातुर्याने टिळकांच्या गैरहजेरींत तात्यांनी केसरी चालविला, त्याबद्दल दादासाहेबांना केवढें कौतुक वाटत असे! अशीं एक एक लोकोत्तर माणसें त्या वेळीं होऊन गेलीं. एकादा दुसरा बुद्धिमान् मनुष्य सध्याहि दिसत नाही असें नाही. पण एकाच वेळीं दिग्गजांप्रमाणे अनेक बुद्धिमान् माणसें डोळ्यासमोर दिसणें हेंहि वैभव आहे! या दृष्टीने पाहतां तो वैभवशाली काळ होता असें म्हणावें लागतें.

१२

# मी पाहिलेले लो. टिळक

आषाढाच्या महिन्यांत आकाश मेघाक्रांत झालेलें पाहिलें म्हणजे लोकमान्य टिळकांना पाहिल्याची मला वारंवार आठवण होते. मेघाचे स्तरांवर स्तर आकाशांत भरगच्च जमा झालेले असतात. पाऊस संपूर्ण थांबलेला नसतो, पण निथळत असतो आणि क्वचित् चमकून जाणारी वीज त्या घनदाट आवरणांतून आपलें अस्तित्व प्रत्ययाला आणीत असतें. तेंच टिळकांचें दर्शन! मेघासारखाच त्यांचा वर्णहि श्यामशबल होता आणि 'घनगर्जित' असें ज्याला सार्थपणाने म्हणतां येईल असाच त्यांचा आवाज देखील गंभीर होता. तो आवाज अद्यापीहि माझ्या कानांत केव्हा केव्हा घुमत असतो. त्या आवाजानें हिंदुस्थानांतील सहस्रावधि, लक्षावधि माणसांना मोहिनी पाडली होती. सिंहानें जमिनीपाशीं तोंड आणून हुंकार केला कीं, त्याचा ध्वनि साऱ्या अरण्यांत नि दऱ्या खोऱ्यांत निनादत जातो, त्याप्रमाणे टिळक सभेंत बोलूं लागले की, त्यांच्या हृदय कापीत जाणाऱ्या आवाजामुळे श्रोत्यांच्या अंगावर रोमांच

उभे राहत. लो. टिळकांच्या अंगांतील तो शुभ्र पेशवाई अंगरखा, लालभडक पगडी व त्याखाली तो विस्तीर्ण ललाट प्रदेश, डोळ्यांतील लालसर झांक, आणि सावकाश पण ठासून बोलण्याची पद्धति, व्यायामाने घटविलेलें शरीर व चापल्ययुक्त हावभाव हीं ज्यांनी पाहिलीं असतील त्यांना मनोमन वाटे की, असा मनुष्य लाखांत देखील पाहावयास मिळणार नाही ! आणि हेंच मला आजहि वाटतें. त्यांना पाहिल्याला आज चाळिसावर वर्षे लोटलीं. पुष्कळ लोकप्रिय पुढारी जनतेच्या नजरेसमोरून गेले. महात्मा गांधी, श्रद्धानंद, मालवीय, मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय, किंवा तुम्ही हवें तें नांव घ्या. पण लोकमान्य टिळक ते लोकमान्य टिळकच. त्यांच्यासारखा मनुष्य झाला नाही आणि पुढे होणार नाही. आजची तरुण पिढीच काय, पण जीं माणसें चाळीस बेचाळीस वर्षांचीं असतील त्यांनी देखील टिळकांना पाहिलें असल्याचा संभव नाही. कारण लो. टिळक १९२० सालींच स्वर्गवासी झाले; पण आज जीं माणसें साठींत अगर सत्तरींत असतील त्यांपैकी अनेकांनी टिळकांना पाहिलें आहे. त्या अनेक भाग्यवानांपैकी मीहि एक आहें असें नम्रपणाने म्हणावेंसें वाटतें.

टिळक–जीवनरहस्यांतील चाफेकर बंधूंचें प्रकरण हें एखाद्या अद्‌भुतरसपरिपूर्ण कादंबरीसहि मागें सारील असें रहस्यमय होतें. नुसता दामोदर चाफेकरच काय, पण त्याचे धाकटे बंधु बाळकृष्ण व वासुदेव हीं सर्वच माणसें स्वार्थत्यागी व वीर होतीं. गणेश द्रविडाने चहाडी करून पोलिसांना दामोदराचें नांव सांगितलें, त्यावरून वासुदेवाने रात्रीं खुन्या मुरलीधराच्या भर चौकांत गणेश द्रविडाचा खून करून त्याला विश्वासघाताचें प्रायश्चित्त दिलें! या एका कृत्याने चाफेकर बंधूंनी महाराष्ट्रांत किती तरी क्रांतिकारक निर्माण केले असतील ! पुढे नाशिकच्या अभिनव भारत क्रांतिसंस्थेचा जन्म झाला त्याला स्फूर्ति चाफेकरांच्या उदाहरणानेच मिळाली होती. याच सुमारास शिवरामपंत परांजपे यांचें ' काळ ' पत्र निघालें. आणि स्वातंत्र्याच्या प्रचाराला त्यांनी आपल्या अपूर्व काव्यमय वाणीने सुरुवात केली. काळांतील शिवराममंताचे त्या वेळचे लेख म्हणजे अमोल रत्नभांडारच आहे. या पुढील काळांत लॉर्ड कर्झन हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय झाले. आणि त्यांनी बंगालची फाळणी केल्यामुळे देशभर लोकक्षोभ उत्पन्न केला; या कर्झनशाहीविरुद्ध स्वदेशी व बहिष्काराची चळवळ टिळकांनीं उप्तन्न केली. त्या काळांतील टिळक-परांजपे यांचे लेख व्याख्यानें म्हणजे ठासलेली जोडनळीची बंदूक वाटे. त्या व्याख्यानांनी लोकांना अक्षरशः वेडे केलें होतें.

१९०५ सालीं ब्रिटिश युवराज हिंदुस्थानांत आले त्या वेळीं त्यांच्यावर बहिष्कार पुकारण्याची कल्पना निघाली. त्या वेळीं ' बहिष्कार ' हा विलायती कापडापुरताच नाही, व्यापक आहे हें दर्शविण्याकरितां " राष्ट्रीय बहिष्कार " हा लेख टिळकांनी केसरींत लिहिला. आणि हा बहिष्कार विदेशी शिक्षण, कापड, चहा, साखर, न्यायकोर्टें वगैरे अनेक गोष्टींना स्पर्श करणारा होता; हें पाहिलें म्हणजे पुढे महात्मा

गांधी यांनी १९२० सालीं जी असहकारितेची किंवा राष्ट्रीय बहिष्काराची व्यापक चळवळ केली तिचे खरे आद्यजनक टिळकच होते हें लक्षांत येईल. या सर्व भावना "**स्वराज्य**" या शब्दांत एकत्रित होत होत्या आणि तो ध्येयाचा शब्द दादाभाई नौरोजी यांनी प्रथम १९०६ सालीं कलकत्ता कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून घोषित केला. ज्या भावनांना आजपर्यंत कांही थोड्या तुरळक व्यक्तींच्या जीवनांत स्थान होतें तें एकदम राष्ट्रीय ध्येयाच्या रूपाने साकार झालें. आणि त्याला राष्ट्रीय मान्यता मिळाली.

सरकारी दडपशाही जसजशी वाढत होती तसतसा तरुणपिढीचा कल क्रांतिकारक मार्गाकडे झुकत होता. रशियांत झारशाहीविरुद्ध बंडाची ठिणगी पडली त्यांत एकाने बॉंबचा प्रयोग केला होता. त्यापूर्वी तोफा, बंदुका, पिस्तुलें हीं शस्त्रें सर्वांना माहीत होतीं. पण 'बॉंब' चें शस्त्र पाश्चात्त्यानाहि त्या वेळीं अगदीं नवीन होतें. त्याला सामग्रीहि फारशी लागत नसे. आणि दोन खणाच्या खोलींत किंवा एखाद्या झोपडींत बॉंबचा सर्व कारखाना सामावून शेकडों बॉंब तयार करितां येत. कोटाच्या खिशांत तो मावे. आणि तों फेकला की पांचपन्नास माणसें जखमी होत! तें शस्त्र नव्हतेंच, अस्त्र होतें! श्री. खाडिलकरांनी केसरीच्या एका लेखांत त्याचें समर्पक वर्णन केलें होतें. "बॉंब हा मंत्र आहे. हा जादूटोणा आहे. हा केवळ चुटक्यांचा मांडव आहे. चुटक्यांसरशीं तो उभारतां येतो व चुटक्यासरशी आवरता येतो." या बॉंबने येथील कांही कल्पक क्रांतिकारकांचें लक्ष वेधलें. आणि नवल असें की पुण्यांतील एक रसायनशास्त्रज्ञ श्रीयुत गोविंद बापट यांनी केवळ वर्तमानपत्रांत आलेल्या वर्णनावरून खरोखरच तसा एक बॉंब तयार करून टिळकांच्या घरीं त्यांना नेऊन दाखविला! टिळक कोणत्याहि विद्येचे म्हणजे संशोधनाचे कौतुक करणारे व मनुष्याचा गुण घेणारे होते. या साधनांचा उपयोग देशाला आज नसेल, पण पुढेमागे तो केव्हाच होणार नाही कशावरून? काडीचा उपयोग जसा चूल पेटविण्याकडे तसाच दुसऱ्याचीं घरें जाळण्याकडेहि होतो. युद्धाच्या काळीं नांगरांच्या तरवारी होतात; शांततेच्या काळांत त्या तरवारींचे पुनः नांगर करतां येतात. म्हणून ज्याला राष्ट्र पुढे न्यावयाचें आहे त्याला, कोणी शस्त्रास्त्रांची विद्या संपादन केली तर ती निषिद्ध मानतां येत नाही! तीहि एक विद्याच आहे! टिळक हें सर्व जाणत होते. त्यांनी गोविंद बापटांच्या संशोधनाची आस्थेवाईक रीतीने चौकशी केली; आणि 'तुम्हांला काही माझ्याकडून होण्यासारखी मदत लागली तर सांगा' असेंहि म्हटलें. त्यावर गोविंद बापट म्हणाले की, "आम्हांला स्फोटकांविषयी हवीं तीं सगळीं पुस्तकें मिळत नाहीत. कारण त्यांच्या किंमतीच जबर आहेत." त्यावर, फूलशॅमच्या कॅटलागमधील बापट यांना हव्या असलेल्या पुस्तकांचीं नांवें टिळकांनी एका कोऱ्या कार्डावर उतरून घेतलीं व बापटांना रजा दिली!

श्री. बापट मधून मधून टिळकांना भेटत असत व आपलें संशोधन किती प्रगत झालें याची माहिती देत. सुरतेच्या कॉंग्रेसनंतर एकदा अरविंद घोष टिळकांकडे आले

असतांना (जानेवारी १९०८) सहज बापट तेथे गेले होते. बंगाल्यांतील कांही तरुणांनी बॉंब तयार केले होते. त्याना बॉंबचें कवच साधें; पण आंतील रसायनाला धक्का देणारा खटका त्यांना साधत नसे. अरविंद घोष यांनी विचारल्यावरून तोहि आपण कसा तयार केला हें समक्ष गोविंद बापट यांनी दाखविलें. अर्थात् यावेळीं त्यांच्या हातांत बॉंबचें फक्त कवच होतें. त्यांत रसायनें किंवा दारू नव्हती. अरविंद घोष यांनी बापट यांजकडून तें कवच बंगालमधील वीरेंद्र वगैरे क्रांतिकारकांना दाखविण्याकरितां मागून घेतलें व आपणांबरोबर नेलेंहि. सेनापति पां. म. बापट हे त्या वेळीं विलायतेंत होते, त्यांनी अशीच बॉंब तयार करण्याची कृति प्रयत्नाने मिळविली होती. टिळकांनी होतीलाल वर्माबरोबर निरोप पाठवून ही बॉंबपोथी गोविंद बापट यांना मिळवून दिली. त्याप्रमाणे पुण्यांत पांच पन्नास बॉंब तयार झाले, आणि अनेक तरुण या उद्योगांत आहेत ही गोष्ट टिळकांना माहीत होती. पण त्यांनी कोणाचा निषेध केला नाही; कारण शस्त्राचार टिळकांनी केव्हाहि निषिद्ध मानला नव्हता. क्रांतिकारकांशी संबंध ठेवण्याला टिळकांनी संकोच बाळगला नाही. कारण टिळक स्वतः वीरवृत्तीचे होते आणि देशांत वीरवृत्तीची जोपासना व्हावी ही गोष्ट त्यांना केव्हाहि मान्यच होती. पण याचा अर्थ, १९०८ सालीं प्रत्यक्ष एखाद्या क्रांतिकारक कटाची उभारणी करावयाची असें त्यांच्या मनांत होतें काय ? या प्रश्नाला निखालसपणाने 'नाही' असेंच उत्तर द्यावयास पाहिजे. १९०८ सालच्या खटल्यांत किंवा चिरोल केसमधील युक्तिवादांत टिळकांची हीच भूमिका होती. टिळक हव्या त्या जहाल क्रांतिकारक लोकांशी बोलत असले, त्यांचीं सुखदुःखें समजावून घेत असले किंवा त्यांच्या क्रांतिकारक कृत्यांपूर्वी किंवा नंतरहि त्यांना योग्य तितकी मदत करीत असले तरी, प्रत्यक्ष एकाद्या कटाची त्यांनी उभारणी केली किंवा त्यांत त्यांचें अंग होतें ही गोष्ट कधींहि पुराव्याने शाबीत झाली नाही. किंवा अमुक कटांत टिळकांचें अंग होतें ही गोष्ट इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांतून गेल्यावरहि कोणी क्रांतिकारक गेल्या पंधरा वर्षांत शपथेवर सांगू शकला नाही !

या गोष्टीबद्दल अनेकांशीं बोलून समक्ष शहानिशा मीं पुष्कळ केली आहे. आणि वर जी गोविंद बापटांच्या बॉंबसंबंधी हकीगत दिली आहे ती त्यांना समक्ष विचारूनच दिली आहे. ही हकीगत मी मुद्दाम नांवनिशीवार सांगतो याचें कारण असें कीं टिळक "क्रांतिकारक" होते असा कित्येकांच्या डोक्यांत भ्रम आहे ! याबाबत श्री. गोविंद बापट यांनीं मजजवळ असे स्पष्टपणानें उद्गार काढले कीं, "टिळकांना क्रांतिकारक म्हणणें म्हणजे त्यांना खरोखर कमीपणा देण्यासारखेंच आहे ! टिळक याहून कितीतरी मोठे होते. त्यांच्या कार्याचें स्वरूप व्यापक होते. हीं कामे आम्हासारख्यांची ! एकदां आमच्यावर एक संकट आलें तेव्हा पांच मिनिटांतच त्यांनी आम्हांला बोलावून सर्व घेऊन चौकशी केली. Father of Indian Unrest असें चिरोलसाहेबाने जें त्यांचें वर्णन केलें आहे तें अक्षरशः खरें आहे. पित्याप्रमाणे टिळ-

कांनीहि आमच्या बऱ्यावाईट कृत्यावर पांघरूण घातले."

सुरतेच्या कॉंग्रेसनंतर तेथे बंगाल व महाराष्ट्रांतील क्रांतिकारकांचें एक गुप्त संमेलन भरलें होतें; त्याच्या प्रयत्नांचे तसेंच टिळकांना 'गुरुस्थानी' मानणाऱ्या तरुणांचे काय उद्योग चालले आहेत याची सरकारी चित्रगुप्ताच्या वहींत खडान् खडा नोंद होत होती. पण त्याचा कोणी टिळकांशीं प्रत्यक्ष संबंध जोडला नाही याचें कारण टिळकांना मनांतून चाहणारे, किंबहुना त्यांच्याच हाताखाली शाळेंत शिक्षण घेतलेले लोक पोलिस खात्यांत होते हें होय. किंबहुना सरकारला या गोष्टींची दखल आहे अशी सूचना हस्तें परहस्तें टिळकांच्या कानावर जाईल असें एकाने केलेंहि. तितक्या वेळेपुरती ती गोष्ट दबली. पण कालचक्र थांबलें नव्हतें. आणि बंगाल्यांत खुदीराम बोस याने बॉंब उडविल्यामुळे क्रांतिकारक चळवळीस महाराष्ट्रांत वाचा फुटावयाची ती बंगाल्यांत फुटली; आणि यापुढे टिळकांची गय करावयाची नाही असें ठरवून सरकारने टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला. त्यांत खाडिलकरांनी लिहिलेल्या केसरींतील लेखाबरोबरच गोविंद बापटांच्या संभाषणांत स्फोटकांच्या पुस्तकांचीं नावें लिहिलेलें टिळकांच्या हस्ताक्षरांतील कार्डहि पुराव्यांत गोविलें गेलें.

हायकोर्टांत टिळकांनी ज्यूरीला उद्देशून जें आपल्या बचावाचें भाषण केलें तें अगदी अपूर्व होतें. सतत पांच दिवस त्यांची गर्जना हायकोर्टाच्या इमारतींत आणि नंतर देशभर निनादत होती. त्यांत उत्कृष्ट वकिली कौशल्य आणि वर्तमानपत्रांच्या हक्कांचें समर्थन होतें. हिंदी वर्तमानपत्रांच्या लढ्यांत हें भाषण अजरामर झालेलें आहे. विशेषतः 'हेतु' 'कृत्य' आणि 'प्रयत्न' या शब्दांचें त्यांनी केलेलें पृथक्करण व विश्लेषण फार मार्मिक होतें. तुमचा हेतु कितीहि राजद्रोहकारक असेल, इंग्लंडच्या बादशहाचा मुकुट वितळवून टांकसाळींत घालावा असेंहि मोर्लेप्रमाणें तुम्ही विधान करू शकतां; कारण नुसत्या हेतूला ( Intention ) पीनल कोडांत कसलीहि शिक्षा नाही ! गुन्हा घडण्याला त्या हेतूच्या सिद्ध्यर्थ कांही तरी 'कृत्य' ( Act ) घडावें लागतें. 'प्रयत्न' ( Attempt ) या शब्दांतहि प्रत्यक्ष गुन्हयाचें कृत्य ( Final act ) घडलें नाही, त्या कृत्याच्या सिद्धीमध्ये कांहीतरी कमी पडलें, असाच ध्वनि निघतो. समजा, एक मनुष्य दुसऱ्याच्या मागोमाग हातांत कुऱ्हाड घेऊन जात आहे. त्याला मारण्याचा त्याचा कदाचित् हेतु ( Intention ) असेलहि पण इतकीच गोष्ट गुन्हा घडला असें मानण्यास पुरेशी नाही. गुन्हयाचें कृत्य करण्याचा त्याने 'प्रयत्न' ( Attempt ) केला असेंहि म्हणता येणार नाही ! कारण चार पावले चालून गेल्यावर त्याचे मन कदाचित् बदललेहि असतें ! त्याचप्रमाणे नुसते केसरींतील माझे लेख हा गुन्हयाचा पुरावा कसा म्हणता येईल ? त्याशिवाय आणखी एखादें प्रत्यक्ष कृत्य माझ्या हातून घडलें असें दाखवावयास नको काय ?" वगैरे वगैरे. हीं वाक्यें असें बोलत असतांना, स्फोटकांचीं नांवें लिहिलेलें कार्ड आणि

गोविंद बापट यांना आपण मिळवून दिलेली बाँबपोथी हीच अप्रत्यक्षपणें टिळकांच्या नजरेसमोर असतील काय ? " होय. इतक्या गोष्टी मी केल्या असतील, पण बंड करण्याची देशाची आजची स्थिति नाही असें मी त्यांना सागितलें नसतें कशावरून ? कोणत्याहि कटांत मी सामील नव्हतें, किंवा कट करून अमूक ' कृत्य ' करावयाचें ठरलें होतें असें कोणीहि माझ्याविषयी सांगू शकणार नाही; असेंच यावरून टिळकांना म्हणावयाचें असेल काय ? ज्यूरी व न्यायधीश यांच्या मनांत हा सूक्ष्म श्लेष आलाहि नाही. त्यांना तरी तंतोतंत कायदेशीर न्यायाची जाणीव कोठे होती ?

टिळकांचें न्यायासनासमोरील भाषण जितकें अपूर्व होतें त्याहिपेक्षा तें ज्या परिस्थितीमध्यें त्यांनी तयार केलें ती त्याहिपेक्षा आश्चर्यजनक होती. एका अरुंद तुरुंगाच्या कोठडींत लहानशा टेबलावर पुस्तकांचा भारा रचलेला आहे; तेथे टेबलावर एक दिवा जळत असून त्याने ती तुरुंगाची कोठी जास्तच भीषण दिसत आहे; दारांतच दोन गोरे सार्जंट हातात संगिनी घेऊन सक्त पहारा करीत आहेत; अशा स्थितींत टेबलावरील एक पुस्तक घ्यावें, वाचावें, फेऱ्या मारीत विचार केल्यावर त्यांत खूण घालून ठेवून द्यावें; नंतर दुसरें पुस्तक घेऊन त्याचें पान उघडावें. थोडें वाचावें, त्यांत खूण घालून ठेवावी; पुनः तिसरें पुस्तक घ्यावें. अशी किती तरी पुस्तकें टिळकांनी संपविलीं. कोर्टांतील भाषणाचें अनुसंधान आणि त्या पुस्तकांतील उताऱ्यांचा क्रम यांची मनांत जुळणी होत होती. जवळपास शंभर ग्रंथकारांचे आधार टिळकांनी उद्धृत केले असतील. रात्रीं बारा वाजले, एक वाजला, दोन वाजले, तेव्हा पहाऱ्यावरील सार्जंटनें कंटाळून " आता किती काम राहिलें आहे ? " असें विचारले तेव्हा टिळकांनी त्याला सागितलें " बाबारे ! तूं खुशाल झोप घे ! माझें काम संपल्यावर मी तुला हांक मारीन ! " तेव्हा सार्जंट झोपी गेला. इकडे टिळक आपल्या कामांत मग्न होते. तीन वाजले, चार वाजले, पहाटे पांच वाजले, तेव्हा टिळकांनी सार्जंटला हांक मारून जागें केलें आणि आपण तासभर झोपेची विश्रांति घेतली. खटला सर्व दिवसभर चाले आणि पुराव्याचीं पुस्तकें संध्याकाळीं मिळालीं कीं तीं वाचून रात्रीं बचावाच्या भाषणाची तयारी करावी लागे; असे हे दिवसरात्र अचाट परिश्रम एक आठवडाभर चालू होते. राजद्रोहाचा कोणताहि खटला त्या काळीं इतके दिवस लांबला नसेल, व गाजलाहि नसेल ! या प्रसंगाचे ऐतिहासिक इतके मोठें होतें कीं, साऱ्या देशभर लोकांचे डोळे टिळकांच्या खटल्याकडे उत्सुकतेने लागलेले होतें. आणि ज्यांनी टिळकांना हायकोर्टांत भाषण करतांना समक्ष पाहिलें त्यांना तो प्रसंग जन्मभर स्मरणांत राहिला असेल !

टिळकांच्या या खटल्यानंतर सार्वजनिक जीवन शून्य होऊन त्याची कशी वाताहात झाली होती याचें चित्र आज पन्नास वर्षांनंतर माझ्या नजरेसमोर आहे. बाहेर वादळाला सुरुवात झाली, व त्यांतच पावसाने झोडपण्यास सुरुवात केली म्हणजे पक्षांचीं लहान पिलें वृक्षाच्या ढोलींतून तोंड देखील बाहेर काढीत नाहीत. काळ्याकुट्ट

मेघांच्या आडून वीजहि आपलें अस्तित्व मधून मधून दाखवीत असते आणि सारें चराचर स्तब्ध झाल्यासारखें वाटतें. अशी त्या वेळीं लोकांची करुणाजनक दीन स्थिति झाली होती. अत्याचारी चळवळीचा पुरा पत्ता मुद्दा लावून सरकारनें ती चळवळ खणून काढलीच; पण मामुली सनदशीर चळवळ किंवा शिक्षणविषयक संस्था चालविणें अशक्य होऊन बसलें. गोविंदाग्रज गडकरी मजजवळ एकदा विनोदाने म्हणाले कीं, 'ज्याला पाहून हातांतली जळती विडी खाली टाकावी असा त्या वेळीं पुण्यांत एक देखील मनुष्य उरला नाही!' अनेकजण राजद्रोहाच्या कायद्याखालीं शिक्षा भोगून परत आले होते, ते स्वस्थ होते. काहींनी कायमचा देशत्याग केला होता. आणि त्या सर्वांचे मुकुटमणि, मंडालेच्या तुरुंगांत दूरवर कारागृहवास भोगीत असलेले टिळक पुनः आपणांस सुखरूप कसे दिसतील यांकडे सर्वांचे डोळे लागले होते. टिळकांच्या शिक्षेचीं सहा वर्षें म्हणजे एक महान् काळरात्रच होती आणि टिळकांच्या पुस्तकांतील उपमेनेच बोलावयाचें तर, उत्तर ध्रुवापाशीं जसा सहा महिने रात्र व सहा महिने दिवस हा अनुभव येतो त्याप्रमाणे, हीं सहा वर्षें म्हणजे मोठी प्रदीर्घ रात्रच होती असा लोकांना अनुभव आला!

पण रात्र म्हटली तरी ती केव्हा तरी संपावयाचीच असते. मनुष्याची कितीहि दुर्गति झाली तरी त्यालाहि शेवट असतोच. अशोक वनांत रामचंद्राची आठवण करीत दिवस कंठणाऱ्या सीतेने असे उद्गार काढले आहेत कीं, "मनुष्य जर सतत आशा मनांत ठेवील तर शंभर वर्षांनी का होईना त्याला एक तरी सोन्याचा दिवस दिसल्याखेरीज राहणार नाही!" आणि तसेंच राष्ट्रीय जीवनांत घडून आलें. एक दिवस अचानक टिळकांची सुटका झाली व पुण्यात, महाराष्ट्रांत किंबहुना देशभर आनंदाचे आणि आशेचे वारे वाहू लागले. तो आनंद कसा व किती होता याचे शब्दांनी वर्णन करताच येणार नाही! सरकारने टिळकांना अपरात्री सोडले; तरीहि रातोरात ती बातमी गांवभर पसरली आणि शेकडों लोकांनी गायकवाड वाड्यांत येऊन आपल्या अंतःकरणांतील त्या आवडत्या, सावळ्या परब्रह्माचें दर्शन घेतलें!

मधल्या कठीण काळांत श्री. केळकर यांनी केसरी मोठ्या कौशल्याने चालवून टिकविला. याबद्दल टिळकांनी असे कृतज्ञतापूर्वक उद्गार काढले कीं, "तात्या होते म्हणून येथे उभे तरी राहाण्याला जागा राहिली!" अत्याचारी चळवळींत पडलेल्या कोणाबद्दलहि टिळकांनी अनुदार उद्गार काढले नाहीत, अगर त्यांना दूर लोटलें नाही. उलट त्यांना निरोप पाठवून त्यांची विचारपूस केली. देशप्रेमाखातर वेडावलेल्या आणि भावनावश होऊन साहसाला प्रवृत्त होणाऱ्या तरुणांबद्दल टिळकांच्या मनांत खरेखुरें प्रेम होतें. मग ते त्यांचा निषेध कां करतील? सुरतेस जो नवा पक्ष त्यांनी निर्माण केला त्यांत हींच माणसें नव्हती काय? आणि त्यांच्याच बळावर पुढील चळवळीचा ओनामा त्यांना करावयाचा नव्हता काय? टिळकांच्या अनुयायांनीहि मनोमन असें ठरविलें कीं,

आतां टिळक जें धोरण ठरवतील त्याला पाठिंबा द्यावयाचा. आपणांइतकाच ज्याने स्वार्थत्याग केला आहे आणि ज्याच्या राजकीय शहाणपणावर खुशाल विसंबून राहावें असा बुद्धिवान्, तेजस्वी पुढारी त्यांच्यावाचून दुसरा कोण आहे? यामुळे १९१४ सालानंतर जो टिळकपक्ष जागेवर आला त्यांत, सनदशीर आणि बिनसनदशीर या दोन्ही गटांचें तेज एकत्रित होऊन गंगायमुनांचा संगम व्हावा असें मनोहर स्वरूप त्याला प्राप्त झालें.

टिळकांच्या सुटकेनंतर सहाच महिन्यांत पहिल्या महायुद्धाला सुरुवात होऊन सरकार अडचणीत आलें. हें महायुद्ध सहा महिने आधी सुरू होतें तर त्या सबबीवर सरकार टिळकांना बंधमुक्त करण्याची आशाहि नव्हती. 'दैवाचा हात' म्हणतात तें यालाच. म्हणून काळ वेळ ओळखून टिळकांनी आपल्या धोरणांत बदल करून होमरूलची चळवळ सुरू केली. विधायक राजकीय चळवळ कशी नमुनेदार करावी याची टिळकांची होमरूल चळवळ म्हणजे प्रात्यक्षिक होतें! यापूर्वी टिळकांचे कित्येक शत्रु त्यांच्या प्रत्येक चळवळीस 'विध्वंसक' असें नांव ठेवून निंदा करीत. पण टिळकांनी जी स्वराज्याची चळवळ केली त्याच्या इतकें विधायक दुसरें काय असूं शकेल? १९०६ सालीं दादाभाई नौरोजी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांत 'स्वराज्य' या शब्दाचा फक्त उच्चार केला होता. ती स्वराज्याची मागणी लखनौ काँग्रेसमध्ये टिळकांनी ठरावाच्या रूपाने मंजूर करून घेतली, हा त्यांच्या तत्त्वाचा आणि मुत्सद्दिगिरीचा केवढा विजय! आणि हें सर्व इंग्रज सरकार महायुद्धाच्या अडचणींत सांपडलेलें असतांना!! लखनौला जाण्याकरितां जी होमरूल स्पेशल निघाली ती जणू कांही टिळकांच्या विजयरथाचीच मिरवणूक होती! आणि तो रथ ओढून नेण्याला सनदशीर चळवळ करणारेच काय, पण पूर्वीच्या क्रांतिकारक चळवळींत असलेले लोकहि सहभागी झालेले होते हें लक्षांत घेतलें म्हणजे टिळकांच्या लोकप्रियतेचें खरें मर्म लक्षांत येईल.

यानंतर विलायतेस डेप्युटेशन नेऊन टिळकांनी स्वराज्याची मागणी खुद्द पार्लमेंटच्या वेशीवर टांगली व स्वराज्याचे पहिले हक्क मिळवले. म. गांधी यांनी पुढे जी राजकीय चळवळ केली त्याचा पाया टिळकांच्या होमरूलच्या चळवळीनेच घातला गेला असें पट्टाभिसीतारामय्या यांनी लिहिलें आहे तें कोणी विसरूं नये! लो. टिळकांच्या मृत्यूनंतर ज्या एका व्यक्तीच्या हातीं देशाचें पुढारीपण गेलें त्या वेळेपासून, आणि विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक पुढाऱ्यांची नांवें कर्तबगारीच्या दृष्टीने लोकांच्या कानीं सतत येत असतात. पण राजकीय सत्तेचें पाठबळ नसतें तर त्यांची कीर्ति किती राहती, किंवा त्यांची योग्यता काय मोजमापाने मोजली जाती हा एक विचार करण्यासारखाच प्रश्न ठरेल! म्हणून मला वाटतें, कोणताहि प्रचार न करितां ज्याचे नांव व कीर्ति शिल्लक राहील त्याचेंच मोठेपण खरें!

लो. टिळकांचें सगळें आयुष्य मी पाहिलें नाही. त्यांचें पुष्कळसे राजकीय जीवन

माझ्या जन्माआधीच होऊन गेलें. पण त्यांच्या आयुष्याचीं शेवटची बारा वर्षें मी पाहिलीं. तोच त्यांच्या परिणत आयुष्यांतील कळसाध्याय होता. या काळांतील संस्कार टेप रेकॉर्डिंगप्रमाणें माझ्या अंतःकरणांत मी जतन केले आहेत. आणि पुढे ती.तात्यासाहेबांनी टिळकचरित्र लिहिलें त्या वेळीं समग्र कागदपत्रें डोळ्याखाली घालून टिळकचरित्राचें मनन करण्याची संधि मला लाभली, हें माझें कांही पूर्वसुकृत किंवा परमभाग्यच नव्हे काय ? आमच्या घरीं कारणपरत्वें आलेलीं पुष्कळ माणसें मीं पाहिलीं. त्यांत म. गांधी, मोतीलाल नेहरू, श्रद्धानंद, लजपतराय, चितरंजन दास वगैरे अनेक होते. पण लोकमान्य टिळकांना पाहून जसें अंतःकरण हललें, किंवा जो ठसा उमटला तसें इतर कोणाच्याहि बाबतींत घडलें नाही. हीं माणसें निःसंशय मोठीं होतीं. पण टिळकांचें मोठेपण कांही विशेषच होतें ! अनेक गंगौघ ज्याला मिळतात असें टिळकांचें मोठेंपण समृद्ध होतें. सागराचीच उपमा त्याला शोभेल ! असा पुरुष युगायुगांत एकेकदाच जन्म घेतो. म्हणून ज्यांना तो डोळ्यांनी पाहावयास मिळाला त्यांना धन्यता कां वाटू नये ?

मराठी ग्रंथ सं...य. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...३६२१५ वि: ...प्रारेम...
...२१८८... नों दि ...९/४/६८

# १३

# कांहीं निवडक पत्रे

या आत्मकथेचा पूर्वार्ध संपविण्यापूर्वी या कालखंडांतील कांही महत्त्वाची पत्रें या प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे. मागील वृत्तांतांत अनेक सार्वजनिक हकीगतींचा व व्यक्तींचा उल्लेख आला आहे. त्यापैकींच काहीं सुप्रसिद्ध व्यक्तीनीं हीं पत्रें लिहिली असल्यामुळे वाचकांना मनोरंजक वाटतील. हीं पत्रें यापूर्वी कोणत्याहि चरित्र-ग्रंथांत आलेली नाहीत. अशा अस्सल पत्रांना इतिहासाच्या दृष्टीनेहि स्वतःसिद्ध प्रामाण्य असतें. आणि ही पत्रें आजूबाजूच्या अनेक हकिगतीवर प्रकाश टाकणारी असल्यामुळें इतकी बोलकी असतात कीं, स्वतः लेखकानें त्याबद्दल वेगळे सांगण्याचे उरत नाहीं !

हीं पत्रें कोणी कोणत्या प्रसंगानें लिहिलीं हें त्या त्या पत्रांचे आरंभी देऊन पुढे ती पत्रें दिली आहेत. या पत्रांत ( १ ) लो. टिळक यांनीं मंडालेच्या कारागृहांतून पाठविलेले पत्र; ( २ ) म. गांधी यांनीं १९१८ सालीं टिळकांना लिहिलेले पत्र ( ३ ) ती. न. चिं. केळकर यांनीं विलायतेहून पाठविलेली पांच पत्रें,

( ४ ) म. गांधींचे चिटणीस श्री. महादेवभाई देसाई यांनीं टिळक चरित्रांच्या भाषांतराबद्दल श्री. केळकर याना लिहिलेलें पत्र. तसेंच नारायणराव ( बालगंधर्व ) यांचे पत्र. आणि शेवटीं, ( ५ ) " टिळक क्रांतिकारक होते काय ? " या वादाबद्दल श्री. नारायणराव बामणनांवकर, व बॅ. जमनादास मेहेता यांनी मला लिहिलेली पत्रें आहेत. ती वाचकांना उद्बोधक वाटतील.

## लो. टिळकांचे मंडालेच्या तुरुंगांतून लिहिलेलें पत्र

सदर पत्र टिळकांनीं दादासाहेब खापर्डे यांना लिहिलें आहे. यावेळीं टिळकांच्या सुटकेकरितां कांही अटी सुचविल्या जाणार असा प्रवाद विलायतेंत होता. तो लंडनहून खापर्डे यांनी टिळकांना कळविला. त्याला टिळकांचे हें उत्तर आहे. सुटकेकरितां भलत्या अटी पत्करणारे टिळक नव्हते हे १८९८ सालीं दिसून आलेंच होतें. त्याचप्रमाणें तें याही पत्रावरून दिसून येईल. हे पत्र तात्यांच्या संग्रहीं असतां तें नजरचुकीनें टिळक-चरित्रांत घालावयाचें राहून गेलें या करितां तें समग्र येथें देत आहे. मूळ पत्र इंग्रजी असून भाषांतर मी केलें आहे.

**का. न. केळकर**

( १ )

मंडाले, ता. २९ मे १९०९

**श्री. दादासाहेब यांस—**

तुमचें ता. ६ चें पत्र काल पोचलें. माझ्या सुटकेकरितां जर सरकारकडून कांही अटी व बंधनें सुचविण्यांत आली तर तीं मी पत्करीन किंवा नाही हा प्रश्न कांहीसा चमत्कारिक आहे. हा प्रश्न माझ्यापेक्षा माझ्या मित्रांनीच सोडवून त्याचे उत्तर दिलें असतें तर तें अधिक बरें झालें असतें. तथापि तुम्ही हा प्रश्न मलाच विचारता म्हणून नाइलाजानें व कांहीसें नाखुषीनें मी माझें मत सांगतो.

माझ्या सुटकेकरिता, ( १ ) कायदेशीर मार्गानें ( २ ) इक्विटीच्या मार्गानें व ( ३ ) सामान्य भूतदयेच्या मार्गानें, असा तीन मार्गांनी प्रयत्न करून पहाता येईल. रीतसर मार्गाने या तीनहि गोष्टी संपल्या म्हणजे मग या बाबतींत आपण एक पाऊलहि पुढें जाऊं नये.

( १ ) कायदेशीर मार्गाचा प्रयत्न तुम्ही करून पाहिलाच आहे. माझ्या खटल्यांत जी अनेक दोषस्थळें राहिलीं आहेत ती पाहतां खटल्याची फेरचौकशी व्हावी असा निर्णय प्रिव्ही कौन्सिल देईल अशी सर्वांची अपेक्षा होती. पण त्या बाबतींत अपयश आल्यानें कायदेशीर प्रयत्नांचा अखेरचा मार्गहि संपला आहे.

( २ ) इक्विटीच्या दृष्टीने पहातां माझी चौकशी हिंदी ज्यूरीकडून व्हावयास पाहिजे होती. सध्याच्या कायद्याप्रमाणे मला तसा हक्क मिळू शकत नाही म्हणून सिव्हिल राईट्स कमिटी माझी बाजू घेऊं शकेल. मला जर हिंदी ज्यूरी मिळती तर मी खात्रीने सुटलो असतो. राजद्रोहासारख्या स्टेटविरुद्ध गुन्ह्यांत तुमची चौकशी तुमच्याच देशबांधवांच्या ज्यूरीकडून झाली पाहिजे, हा एक 'हेबियस कॉर्पस' इतकाच महत्त्वाचा सनदशीर हक्क आहे. 'स्टार' वगैरे इंग्रज पत्रांनी देखील असेंच मत दिलें आहे. पार्लमेंटरी कमिटीकडे न जातां सिव्हिल-राइट्स कमिटीच्या अध्यक्षांची तुम्ही गांठ घेतली हें बरें झालें.

( ३ ) मला झालेली शिक्षा फार जबर आहे, गुन्ह्याच्या प्रमाणाबाहेर आहे, या मुद्द्यावर भूतदयेच्या दृष्टीने प्रयत्न करितां येईल. कायदेशीर मुद्यांच्या सर्व गोष्टी बाजूस ठेवल्या तरी, केवळ एकदोन लेख मी वर्तमानपत्रांत लिहिले याखेरीज इतर कोणतेहि अपकृत अगर आक्षेपार्ह गोष्ट माझे हातून घडली असें दाखवितां आले नाही. एवढ्या गुन्ह्याकरितां सहा वर्षांच्या कैदेची शिक्षा ठोठावणें हे खरोखरच रानटीपणाचें कृत्य आहे. इंग्लंडमध्ये कोणालाहि आज अशी शिक्षा मिळती ना! सरकाराने मेहेरबानीने ही शिक्षा सक्तमजुरीची न करिता साध्या कैदेची केली हें खरें, तरीहि माझें आजचें वय, समाजांतील दर्जा व मी लिहिलेला लेख या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन, कोणीहि मला झालेली शिक्षा जबर आहे असेंच म्हणेल. मग न्या. दावर यांचें मत कांहीहि असो! या मुद्द्यावर अपील करणारांनीं दयेचा अर्ज पूर्वी मॅक्समुल्लर किंवा सर वुइलियम हंटर यांनी जसा केला होता त्या धर्तीवर अगदीं थोडक्यांत करावा. त्यांत इतर गोष्टी असूं नयेत. त्यावर वजनदार गृहस्थांच्या सह्या असल्या तर आज ना उद्यां त्याचा थोडाबहुत तरी उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही. माझ्या सुटकेकरितां सरकार कोणत्या अटी घालील व मी कोणतीं बंधनें मान्य करूं शकेन याचा विचार हें अपील करणारांनी करूं नये. ती सरकार व माझ्यामधील गोष्ट आहे. त्या बाबतींत योग्यायोग्य पाहून काय करावयाचें ते आमचें आम्ही पाहून घेऊ.

आता यानंतर सरकारच्या शर्ती पत्करावयाच्या कीं नाही याबद्दल माझें खरें मत काय आहे तें तुम्हास सांगतो. पूर्वी १८९८ सालीं जशा प्रकारचीं बंधनें मजवर घालण्यांत आलीं ( खटल्याचें पुस्तक पृ. १४ पहा ) तसलींच हींहि असतील तर तीं पत्करण्याला माझी हरकत नाही. माझा सन्मान लोकांनी करू नये, मिरवणूक काढू नये या गोष्टींना मी आनंदाने संमति देईन. पण ज्या मुख्य गोष्टीकरिता माझा आग्रह आहे ती ही कीं, तुरुंगाबाहेर माझें पाऊल पडल्यानंतर स्वतंत्र नागरिकाला जे जे **कायदेशीर हक्क असतात ते सर्व मला मिळाले पाहिजेत. हे माझे हक्क अबाधित राहिले म्हणूनच पूर्वी १८९८ सालीं सरकारने घातलेल्या इतर किरकोळ अटींना मी मान्यता** दिली. आतां तसल्या अटींवर सरकार मला सोडणार नाही; अधिक कठिण व जाचक बंधनें घालू पाहील व तीं मला स्वीकारतां येणार नाहीत हें उघड आहे.

[illegible] दा. क्र. २३१६३



माझ्या शिक्षेचें एक वर्ष संपत आलें. आणखी पांच वर्षें कैदेचीं उरलीं. त्यानंतर मी फिरून तुमच्यामध्यें येईन आणि स्वातंत्र्याचे हक्क भोगू शकेन अशी मी आशा करतों. ही आशा फारच दूरची आहे हें खरें; तथापि कालांतराने कां होईना पण फिरून मी तुमच्यांत येऊन राजकीय व सार्वजनिक काम करूं शकेन, हा संभव मी सरकारच्या भलत्याच अटी पत्करून आपल्या हाताने कायमचा कसा खुडून टाकूं? येत्या जुलैत माझ्या वयाला ५३ वर्षें संपून चोपन्नावें वर्ष लागणार. माझी शरीरप्रकृति, आनुवंशिक गुण, आणि मनुष्याचें साधारण वयोमान या गोष्टी लक्षांत घेतां मी दहा वर्षांवर अधिक जगणार नाही. या दहांतलीं पांच वर्षें तुरुंगांत गेलीं असें समजा. निदान राहिलेलीं पांच वर्षें तरी मला अनिर्बंध रीतीने सार्वजनिक काम करण्यास मिळतील. **पण भलत्या अटींना मी मान्यता दिली तर तो माझा राजकीय अगर सार्वजनिक आयुष्यांतील मृत्युच म्हणावयाचा! असलें मेलेलें जिणें जगण्यांत अर्थ काय? ती गोष्ट मला साफ नाकबूल आहे.** यापेक्षां जास्त लिहीत नाही. राजकीय चळवळ सोडली तरी वाङ्मयविषयक, संशोधनात्मक वगैरे इतर कार्य मी करूं शकेन, याहि म्हणण्याचा मी विचार केला. विचारांतीं माझें असें ठाम मत आहे कीं ती गोष्ट केवळ अशक्य आहे; इतकेंच नव्हे तर माझ्या सर्व पूर्वायुष्याशीं विसंगत आहे. सर्व आयुष्यभर खपून मी जें केलें त्यावर याने पाणी ओतल्यासारखें होणार आहे. माझें खासगी असें आयुष्य काय आहे? सार्वजनिक आयुष्य हेंच माझें जीवन; तेंच काम मी आजवर हौसेने केलें **तुरुंगाच्या शिक्षेंतून केवळ कांही वर्षांची सवलत मिळावी म्हणून मी माझें सर्व सार्वजनिक आयुष्य पुसून टाकण्याला तयार झालों तर, देशावर याचा नैतिक परिणाम काय होईल याचा थोडा विचार करा!** मुलांच्या शिक्षणाची माझ्यावर जबाबदारी आहे. पण ती काळजी माझ्या गैरहजेरींत तुमच्यासारख्या मित्रांवर सोपवितां येईल. लहानपणीं मी अवघा पंधरा वर्षांचा असतांना माझे आईबाप वारले. त्यापेक्षां माझ्या मुलांची स्थिति बरी आहे. कदाचित् माझ्या वरील लिहिण्याने तुमचा असा समज व्हावयाचा कीं, कांही थोडा काळ म्हणजे निदान वर्ष सहा महिन्यांचें बंधन सरकारने घातलें तर मी कदाचित् तें पत्करीन. पण मी तुम्हांला एकवार स्वच्छच सांगतों कीं, मी खुषीने तितका काळ तुरुंगांत राहीन, पण **शिक्षा भोगून माझी सुटका झाल्यावर मी माझ्यावर कोणाला कसलीहि बंधनें घालूं देणार नाही.**

दादासाहेब! तुम्ही थिऑसफिस्ट आहांत; परमेश्वराच्या नियतिचक्राचे जे अतींद्रिय आणि गहन मार्ग आहेत त्यावर तुमचा विश्वास आहे. माझ्याप्रमाणेंच तुमच्याहि मनांत असें येत नाही का? कीं न जाणो, या आगामी पांच वर्षांत अशा कांही गोष्टी घडून येतील कीं दैवयोगाने माझी अकल्पित सुटका होण्याची वेळ येईल! तें न घडलें आणि कदाचित् तुरुंगांतच मला मरण यावयाचें असलें तर नाही म्हणून काय होणार? आपली तयारी ठेवलीच पाहिजे! कायदेशीर किंवा इक्विटीच्या अगर सामान्य भूतदयेच्या दृष्टीने अपील करणें

हे जे तीन मार्ग पत्रारंभीं सांगितले त्यांनी जें होईल तें करून पाहा. आणि या उपायांनी कांहीच होण्यासारखें नसलें तर तो मार्ग सोडून द्या. कसेंहि करून म्हणजे सरकारच्या हव्या त्या अटी मान्य करून सुटका करून घेण्याची माझी इच्छा नाहीं. आणि तुम्ही माझे मित्र झाला तरी, जें पाऊल वाजवी नाही त्या पलीकडे तुम्हीहि आपल्या मैत्रीचा जिव्हाळा जाऊं देऊं नये! या खटपटीकरिता आणखी एकदोन महिने, तुम्हांला विलायतेंत राहावें लागेल. त्यानंतर तुम्ही लगेच हिंदुस्थानास परत जावें. मग यश येवो कीं न येवो! जें करावयाचें तें केल्यावर मित्रऋणांतून तुम्ही मुक्त झाला. गीतेच्या उपदेशाप्रमाणें माणसाने फक्त कर्म करावें. फलावर म्हणजे यश येईल कीं अपयश येईल यावर त्याने आसक्ति ठेवूं नये; कारण ती गोष्ट त्याच्या हातची नाही, ती दैवाच्या हातीं आहे! माझ्यापूर्वी किती तरी लोकांनी प्रामाणिक मतें बोलण्याबद्दल शिक्षा भोगली आहे. आज मलाहि तशीच शिक्षा भोगावयाची असेल तर उपाय काय? पार्लमेंटमध्ये वेळोवेळीं प्रश्न विचारण्याची खटपट करून माझ्या सुटकेचा प्रश्न सरकारचे व लोकांचे डोळ्यांपुढे सतत जागता ठेवावा. मला त्याचा उपयोग न झाला तरी सर्वसाधारण रीतीने या चळवळीचा देशाला उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही.

मंडालेची हवा नागपूरइतकीच उष्ण आहे. या वर्षी एप्रिल व मे महिन्यांत सुदैवाने पावसाच्या एक दोन सरी पडल्या. त्याने हवेंत थोडा थंडावा येऊन, उन्हाळा कसाबसा निभावला. तुरुंगाच्या मानाने माझी प्रकृति बरी आहे. मला पाहिजे तीं सर्व पुस्तकें येथे मिळाल्यामुळे, कित्येक वर्षांपूर्वीपासून संकल्पिलेले माझे ग्रंथ मी येथे स्वस्थपणाने लिहून काढणार आहे.

**बाळ गंगाधर टिळक**

(२)

## म. गांधींचे लो. टिळकांस पत्र

[या पुस्तकांत हिंदी राजकारणांत नव्यानें उदय पावणाऱ्या म. गांधींचे वर्णन "उदयास्त" या प्रकरणांत आलें आहे त्याला धरून हें पत्र आहे. ह्या पत्रावर तारीख मिति नाहीं, पण तें साल १९१८ असावें. त्यावेळीं नेमस्त किंवा राष्ट्रीय कोणत्याच पक्षांत गांधी मिळूं इच्छित नव्हते. या पत्रावरून दोन गोष्टी दिसून येतात. गांधीजी हे मनानें व तत्वानें प्रतिसहकारवादी आहेत. मात्र आपलें उद्दिष्ट साधण्यासंबंधानें इतर साधनापेक्षां सत्याग्रहावरच म. गांधी यांचा अधिक विश्वास असतो. (त्याचा अर्थ असहकारितेवरच असा मात्र नव्हे) टिळकचरित्रांत हें पत्र आलेलें नाहीं; पण तें महत्वाचें असल्यामुळें येथें दिले आहे. "सैन्यांत हिंदी लोकांनीं लाखोनीं भरती झाल्यानेंच स्वराज्याचें उद्दिष्ट जवळ येईल" हा पत्रांतील उल्लेख मात्र वाचकांचे लक्षांत राहण्यासारखा आहे!]

अहमदाबाद श्रावण कृष्ण २

लोकमान्य टिळक महाराज

आपका खत मिला है. आपकी दिल मोझीसे मे अनुग्रहीत हुआ हुं. मेरे स्वास्थ्यके लिये आप क्यो चिंतित न होगे ? ईश्वर कृपासे मेरी तबिअत अब ठीक है. बिछाना तो मै थोडे रोजतक नहि छोड सकुंगा. बडा दर्द रहा था वह अभी शांत हुआ.

कॉंग्रेसमे मेरा आनेका बिलकुल इरादा है नहि, नरम दलकी संमेलनमेभी जानेका इरादा है नहि. मै देखता हूं मेरा अभिप्राय दोनीसे विचित्र. आपको मैने बतला दिया है. मेरा मंतव्य है इस समय युद्ध की भरती मे हम अब जानेसे, लाखोंको लेजानेसे, हिंदुस्थान की बडी भारी सेवा कर सकते है, और हमारा साध्य–जो स्वराज्य है– उसकी प्राप्ती हम एकदम कर सकते है. मेरी इस राय में आप और मिसीस बेझंट संमिलित नहि है, मै जानता हूं नरम दलवाले भी इस कार्य में तीव्रतासे मषगुल नहि होगे. यह तो एक बात रहि. मेरी दुसरी राय है मॉंटेग्यू चेम्सफर्ड योजना का तत्व का ग्रहण करना और उस मे जो कुछ सुधारा हम चाहते हैं वह सुधारा साफ साफ बतादेना. और जो सुधारा हम बतालावेंगा उसका स्वीकार करने के लिये मरणपर्यंत लढना इस सूत्र का नरम दल स्वीकार नहि करेंगे यह तो स्पष्ट है. यदि आप और मिसीस बेझंट स्वीकार करेंगे तोभि जिस तरहसें मैं लढना चाहता हूं वैसा तो आप नहि लडोगे. मिसीझ बेझंटने कह दिया है की वह सत्याग्रही नहि है. आपने एक दुर्बलो कां हथियार सत्याग्रह का स्वीकार किया है. इस भ्रमणमे मैं पडना नहि चाहता हूं. और आप दोनोसे विमुख होकर कॉंग्रेस में आंदोलन करना नहि चाहता हूं. मेरे सूत्रपर मेरा आत्यंतिक विश्वास है, और मेरा यहभी मंतव्य है की यदि मेरी तपश्चर्या संपूर्ण होगी तो आप और मिसीझ बेझंट भी मेरा सूत्र कां स्वीकार करेंगे. मै धैर्य रख सकता हूं.

नरम और गरम दल उस की थोडी बातो को छोडकर संमिलित हो जाने की चेष्टा करे यह मुझ को बिलकूल पसंद नहि है. देश मे दो पक्ष है. दोनो पक्षो की राय साफ साफ प्रजा को और राजा को बताने में कुछभी हानी होगी ऐसा मे मानता नहि हूं. गरम दल और नरम दलको मिलने की चेष्टा करना मुझ को बिलकुल पसंत नहि है. दोनो पक्ष दृढतासे उनकी राय राजा प्रजा की समक्ष रखेंगे तो बडा फायदा पोहुचेगा.

आपके कार्य में प्रभु आपको साहाय्य हो.

मोहनदास गांधी

( ३ )

## न. चिं. केळकर यांची पत्रें

[ या पुस्तकांतील "तात्यांची विलायत-यात्रा" या प्रकरणाला अनुसरून ती. न. चिं. केळकर यांनीं लिहिलेली पांच पत्रें पुढे दिली आहेत. सदर पत्रें श्रीयुत दा. वि. गोखले यानां त्यांनीं विलायतेहून लिहिलीं असली तरी, केसरी ऑफिसांतील सर्वांनीं तसेंच इतर संबंधितांनीहि तीं वाचावी अशीच अपेक्षा होती. या पत्रांतून चिरोल केस, पर्सफंड, मॉंटेग्यू सुधारणा कमिटीपुढील साक्षी, संदेशकार अच्युतराव कोल्हटकर तसेंच, महादेव राजाराम बोडस यांच्या टीकेबद्दल त्यांचें मत व वृत्तपत्रीय धोरण यांचे उल्लेख आले आहेत. ]

( १ )

लंडन ता. –

रा. बाबुराव गोखले यांस—सा. न. वि. वि.

कमिटीचे कामाची कांहीं छापील बुकें या टपालानें पाठवीत आहें. साक्षीचें मुख्य मुद्दे व समक्ष पाहून ऐकून झालेला ग्रह हा मी आमच्या दर आठवड्याचें पत्रांत देत असतोच. परंतु छापील जबानी वाचून तुम्हांस केसरी मराठ्यांत आणखी काय मुद्दे घालावेसे वाटतील तें स्वतंत्र रीतीनें घालीत जावें. सर्व साक्षीचें मिळून एखादे विषयवार पृथक्करण मग छापलेंत तर अधिक चांगलें. तथापि करंदीकर व भट यांचे विचारास येईल तसें करावें.

पर्स फंडाचें काम बरेंच समाधानकारक झाले आहें. तथापि आवरतें घेतल्यास बरें. रा. बोडस यांनी टिळकांस असें लिहून कळविलें आहे कीं, तुम्ही Beggar Leader झाला आहां ! बोडस यांचें मत कितपत ग्राह्य मानावयाचें हें मला माहीत आहें. पण चालू गोष्टींसंबंधानें कुत्सित मनुष्यें काय म्हणत असतील याची त्यावरुन कल्पना खास येईल. 'लोकसंग्रह' व 'संदेश' यांचा वाद बहुधा थांबलाच असेल. केसरीचें एका स्फुटांत त्याचा थोडासा ध्वनी आढळला, पण आपल्या पत्रांत या वादास जागा मिळत नाहीं हेंच फार चांगलें आहे.

न. चिं. केळकर

लंडन, ता. २८।७।१९

( २ )

खासगी—

सा. नमस्कार विनंती वि. —

तुमचें सविस्तर पत्र पोंचलें. तुम्ही पाठविलेले दोन हजार पौंड येथें पोचलें. चिरोलचे सॉलिसिटरकडून अद्यापि खर्चाची मागणी आली नाहीं. आल्यावर कळेल. तूर्त इकडे पैसे पुरे आहेत. 'संदेश' पत्राबद्दल लिहिलें तें कळलें. असें होण्याचे भविष्यच केलें होतें! पण फिरून एकवार लिहितों कीं, त्यांच्याशीं वाद करावयाच्या भानगडींत पडाल तर फसाल. कारण वादांत तें किती खालीं जातील तितकें तुमच्यानें जाववेल काय? शिवाय त्यांचा 'संदेश' काढावयाचा हेतू व तुमचा 'लोकसंग्रह' काढण्याचा हेतू एक नाहीं; असें पराडकर यांस सांगावें. त्यांना जितके कुत्सित लिहिता येईल तितकें तुम्ही लिहूं शकाल काय? वाचकांकडून चिथावणींची पत्रें येतील त्यांनीं आपला निश्चय ढळू देऊं नका. जुनी वर्तमानपत्रें आहेत त्यांचें रेकॉर्ड जुनें आहे. तें कोणास बदलतां यावयाचें नाहीं. पण आजच्या घटकेस नवीन तत्त्वाकरितां निघणाऱ्या वर्तमानपत्रानें तरी नवीन उदाहरण घालून देण्याची महत्त्वाकांक्षा कां धरूं नये? ज्या दिवशी पराडकर यांस वर्तमानपत्रांतून शिव्या दिल्याशिवाय पोट भरतां येणार नाहीं असें वाटेल त्या दिवशी त्यांना तो मार्ग मोकळा आहे. पण त्यांनी हें पत्र पोट भरण्याकरितां काढलेलें नाहीं हें मीं जाणतों. नुकसानहि सोसायचे व Ideal हि गमवायचें हा दुहेरी तोटा काय म्हणून? सार्वजनिक टीकेला किती मर्यादा आहे हें एक तत्व लोकसंग्रहानें व्यवहारी करून दाखविल्यास त्यानें आपलें काम केलें असें मी समजेन. स्वतःच्या महत्वावर म्हणजे लेखांवर व बातमी देण्याच्या कुशलतेवर लोकसंग्रहानें जगलें पाहिजे. हें एक वर्षांत न साधलें तर पत्र बंद करावें. पण अच्युतरावांशीं सामना करण्याची हांव किंवा प्रतिकारबुद्धि धरूं नये. **या वादानें आपल्या पक्षाचें धिंडवडे होतील!** कलहाचा वाद हे सामर्थ्य नाहीं. तत्वाचा वाद हें अखंड सामर्थ्य आहे! हें लिहिणें मवाळपणाचें आहे, पण ईश्वरानें मला दुसरा गुणच दिला नसल्यास मी तरी काय करणार? पण 'लोकसंग्रह' हा नांवाप्रमाणें केवळ आपल्या गुणानें लोकसंग्रह करणारा असावा. विग्रहाकडे ढुंकुनहि पाहूं नये. पराडकर यांस माझें मत समजण्याची इच्छा आहे म्हणून इतकें तपशीलवार लिहिलें. अभद्र शब्द लिहिल्यानें पेपर टिकतो असें नाहीं हें संदेशचेंच उदाहरण. अभद्र शब्द न लिहितांहि पेपर टिकतो याचीं उदाहरणेंहि तुमच्या डोळयापुढे असतीलच. फिरून एकदा सांगतो, एकदां सामन्यास सुरुवात केलींत म्हणजे अनवस्था होईल, व Ideal बिघडून दररोज पाय अधिक खोलांत जाईल. संदेशास शिव्या देण्याची हौस असेल तितकी तो फेडून घेऊं दे. चार सहा महिन्यांनी

भक्ष्य नाहीं म्हणून त्याचें तोंड आपोआप बंद पडेल. तुम्ही वादांत कां पडत नाही असें विचारणारी माणसें आहेत त्याप्रमाणेंच, वादांत पडून घाण उडवीत नाहीं तें चांगलें म्हणणारी माणसेंहि आहेत हें विसरूं नका, असें पराडकरांस सांगा. असो. लिहिण्याचा कंटाळा आला आहे व लिहिणें आवरत नाहीं. येथें सर्व ठीक आहे. कळावें.

**नरसिंह चिं. केळकर**

( ३ )

लंडन, १०-८-१९१९

**श्री. बाबुराव गोखले यांस —**

सोबत टपालानें सिलेक्ट कमिटीच्या कामकाजाचें छापील पत्रक पाठवीत आहे. कमिटीपुढें साक्ष देतांना पटेल यांनी कॉंग्रेसचें मत खणखणीतपणानें मांडले. पण ज्या पद्धतीनें त्यांनी आपली साक्ष दिली ती मात्र तितकीशी योग्य नव्हती. दि. ब. माधवराव यांची लेखी जबानी खंबीर होती. पण उलट तपासणींत ते तितके टिकले नाहींत. टिळकांनीं आपल्या लेखी जबानीनंतर सुमारें १५–२० मिनिटांत आपलें म्हणणें तोंडी मुद्देसूद रीतीनें मांडले. पण कमिटीनें त्यांची उलट तपासणी घेतली नाहीं !

कमिटीपुढें मला स्वतः साक्ष देतां आली असती तर फारच आवडले असतें. पण तसा आग्रह मी धरला नाहीं. याचें कारण असें कीं, माधवराव हे वरिष्ठ, तसेंच पटेल हे जनरल सेक्रेटरी व कायदे कौन्सिलचे सभासद, शिवाय डेप्युटेशनवर असलेले एकच गुजराथी. त्यांना वगळून टिळक व मी दोघे साक्ष देतो तर महाराष्ट्रीय गटांतलेच सर्व साक्षीदार मुद्दाम घातले असे दिसले असतें. आपसांतच बोलावयाचें तर, पटेल किंवा माधवराव यांचेपेक्षां अधिक परिणामकारक रीतीनें मी आपली साक्ष दिली असती यांत शंकाच नाहीं. तुम्हांपुढें ही गोष्ट सांगण्याला मला संकोच बाळगण्याचे कारण नाहीं. मला ही गोष्ट अगदीं उघड उघड दिसत होती. पण या बाबतींत मला व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा नव्हती. त्यामुळें झालें हें एक परीनें ठीकच म्हणावयाचें.

‘ इंडिया ’ पत्राच्या पुनर्घटनेचा प्रश्न आता आमचेपुढें आहे. तो कसा काय सोडविता येतो हें पहावयाचें.

येथें तोंडानें मजकूर सांगून लिहून घेण्याला एक देखील मनुष्य हाताशीं नाहीं ! लिहिण्याचें काम खूप असतें. व तें सगळें मलाच करावें लागते. लिहून लिहून हाताचीं बोटें दुखावयास लागलीं आहेत ! यामुळें तिकडे तुम्हांला लांबलचक पत्रें लिहितां येत नाहींत. आणि दुसरें असें कीं, सगळ्याच हकिकती पत्रांत लिहिल्या तर तिकडे आल्या वर बोलावयाला काय शिल्लक उरणार ? असो. श्री. खाडिलकर, करंदीकर, भट यांना क्षेमसमाचार कळवा.

**न. चिं. केळकर**

(४)

लंडन, ४।९।१९

सा. नमस्कार विनंति वि:—तुमचें पत्र व हिशोबाचा तक्ता पोंचला. चिरोलचें बिलाकरितां तुम्ही पाठविलेले दोन हजार पौंड तसेंच ठेऊन दिलें आहेत.

ऑफिसचा खर्च कसा कमी करावा हें पाहा. नवीन पैसा मिळणें तूर्त अशक्य आहे. प्रॉमिसरी नोटांबद्दल तुम्ही लिहिले तें समजलें. तोच मजकूर नेने यांस सांगून पाहा. त्यांच्या संमतीनें व वर्किंग कमिटीच्या खाजगी विचारानें योग्य दिसेल तें करा. त्यास आमचा असा आग्रह नाहीं. पण नेने यांचे नांवे करून दिल्यास आमची हरकत नाहीं.

'लोकसंग्रहा'संबंधी टिळकांस तुमचें पत्र आलें तें वाचलें. ठीक आहे. त्या बाबतीत येथें त्यांचा माझा थोडासा वाद झाला. पण कोणचीहि गोष्ट डोक्यांत आली असतां तोडून लिहिण्याची त्यांची पद्धत आहे. त्याप्रमाणेंच त्यांचें हें लिहिणें आहें. असो. 'संदेश' मला वाचायला मिळत नाही. व हल्लीच्या स्थितीवरून तो वाचून वाईट वाटण्यापेक्षां तो न वाचावयास मिळाला तर बरें. पण Servant of India दर आठवड्यास मजकरितां पाठवीत जावा. तसेंच केसरी–मराठा एक एक प्रत माझें नांवें वेगळी पाठवावी. कारण येथें ते कोणाच्या वाट्यांस फारसे येत नाहींत. मागणी फार असते. Tilak case of 1908 त्याचप्रमाणे Tilak case of 1917 च्या दोन प्रति येत्याच टपालानें जरूर पाठवा. येथील इंडीया ऑफिसमध्यें त्या ठेवावयाच्या आहेत. Case for Home Rule ची आवृत्ती येथे कोणी प्रकाशक काढतो कां विचारणार आहें. हिंदुस्थानांतून दर आठवड्यास India पत्राकरितां News letter थोडक्यांत सर्व देऊन कोणीं पाठवूं शकेल तर हवें आहें.

दोनतीन आठवडे पाहून येथील मंडळींस पसंत पडल्यास त्याकरिता मोबदला ठरवितां येईल. 'इंडिया' पत्राचा आवाज पूर्वींपेक्षां जरा चढा लागला आहे असें लोक म्हणतात; तुम्हां वाचकांस प्रामाणिकपणें कसें वाटतें ? कळावें.

तात्या केळकर

(५)

'संदेश 'कार अच्युतराव कोल्हटकर यांचेसंबंधी हें पत्र भाषांतर न करितां जसेंच्या तसेंच पुढें दिलें आहे :-

London, 23/9/1919

My Dear Baburao,

Received your letter & Mr. Paradkar's letter. Mr. Tilak has returned Achutrao's cheque. This will tempt you to reopen the controversy. But I think the better plan will be to wait and let Sandesh itself proclaim the news as he is sure to do. The people will appreciate your self restraint, and the fact that you had the news in hand but did not use it will be put to your credit and readers will realise that you really wanted to stop the controversy. Even if the Sandesh does not publish the news, it cannot remain a secret; it is sure to be talked about. And you will have a whip-hand which you could use at any time after with equal effect. It would be more artistic to see Sandesh proclaim its own repudiation by Mr. Tilak.

We have applied for passages & will return in December before the Congress. ........

Yours Sincerely,
N. C. Kelkar.

## टिळक चरित्राबाबत पत्रें

लो. टिळक-चरित्राचा पहिला खंड १९२४ साली म. गांधी यांना मी नजर केला. त्यावेळीं ससून हॉस्पिटलमध्यें त्यांचे अॅपेंडिक्सचे ऑपरेशन झाले होते. सदर खंड त्यांनीं मोठ्या आदरानें हातांत घेतला आणि "हें पुस्तक मला हवें होतें" असेंहि फार अगत्यानें उद्गार काढले. सदर पुस्तकाचे गुजराथी भाषांतर व्हावे अशी त्यांची इच्छा होती. म. गांधीच्याच सांगण्यावरूनच महादेवभाई देसाई यांनीं ती० तात्यांना पत्र लिहिलें, तें पुढें दिलें आहे :—

( १ )

## महादेवभाई देसाई यांचें केळकर यांस पत्र

Ahmedabad,
19 July 1924,

My dear Mr. Kelkar,

I have just seen the first Volume of your Life of Lokamanya. I wonder if you have made any arrangement for its translation into Gujarathi. Even if you have, I may be permitted to bring to your notice that we have a very efficient Publishing Department which is ready to undertake the work. There are some men on the staff whose command over Marathi is equal to their command over own vernacular.

I may also say that Mr. Uttamlal Trivedi's translation of Gita Rahasya is defective in many respects, and there are men here who can easily improve on it. I want you therefore to permit us *to* translate your work. We shall be prepared to abide by whatever conditions you lay down. I make this request solely with the view that a **Really Good** translation of what will be a classic, should be give to Gujarat. With best regards,

Yours sincerely,
Mahadeo Desai

( २ )

मुंबई ता. २४-८-२३

कृ. सा. नमस्कार वि. वि.

आपल्याकडून लोकमान्य बळवंतराव यांचे चरित्र आले ते मला मिळालें. आपण आठवण ठेऊन मला चरित्र पाठविले याबद्दल मी आपला आभारी आहे. अलिकडे आम्हीं पुण्यांला अजुनी आलो नसल्यामुळें आपल्या आमच्या गांठीं पडत नाहींत. याला कारण आम्हींच आहोंत. आमची कंपनी पुण्याला अद्यापि आली नाहीं. मुंबईशिवाय दुसऱ्या कोणत्या गावी न जाण्याचे कारण, आम्हाला कर्ज असल्यामुळें, त्या लोकांच्या समोर आम्ही असलो म्हणजे त्यांना तितका धीर असतो. माझ्या मनांतून आपल्याकडून मला चरित्र मिळायला पाहिजे असे होते व ते मिळाले. आपल्याजवळ मागायला मला आधार आहे व हक्कहि आहे. शिवाय लोकमान्य बळवंतराव यांचा माझा संबंध " समर्थांच्या घरचे श्वान, त्यास लोक देती मान. " याप्रमाणे जर त्याची पुण्याई तर, माझा त्यांचा संबंध खात्रीने याच्याहीपेक्षा जास्ती होता. असो. लोभ असावा.

आपला—**नारायण ( बालगंधर्व )**

## लो. टिळक व क्रांतिकारक

प्रकरण १२ मध्यें तसेंच पूर्वीहि 'लो. टिळक व क्रांतिकारक' यांचे संबंधी अनेक उल्लेख आले आहेत. त्याला धरून दोनतीन पत्रें पुढें दिली आहेत. ती तात्यांनीं टिळक-चरित्रांत 'राजकारणाचे मार्ग व अत्याचार' या प्रकरणांत या विषयाचें यथार्थ व उत्कृष्ट विवेचन केलें आहे. यामुळें वास्तविक या विषयावर आतां मतभेद राहू नये. पण अलीकडे 'नवी साधनें' उजेडांत आणून 'नवा इतिहास' लिहिण्याची महत्त्वाकांक्षा कांहीं लेखकांना उत्पन्न झाली त्यांत (१) रँडचा खून करण्याला टिळकांची चाफेकरानें 'अनुज्ञा' घेतली (२) टिळक हे वासुदेव बळवंताचे-शिष्य होते! (३) टिळकांनीं स्वतः एक बाँब तयार केला होता; आणि सर्वांत आश्चर्य म्हणजे (४) 'टिळक हे क्रांतिकारकांचे गुरु होते,' अशी अपूर्व विधाने केसरींतील अग्रलेखांत व इतर लेखांत केलेली होती! लो. टिळकांनीं चिरोलवर बदनामीची कां फिर्याद केली व त्याकरितां राहता गायकवाड वाडा कां गहाण टाकला, याचेंहि भान वरील लेख लिहितांना त्या लेखकांना राहिले नाही. या करितां मीहि 'सह्याद्री'तून त्या वादाचा प्रतिवाद केला. टिळकचरित्राचा मी केवळ साक्षीदारच नव्हे तर, चाफेकरांची जबानी, कोल्हापूरचा दामू जोशी याची जबानी, नाशीक-केसमधील अनेक साक्षी व जबान्या, सावरकर बंधूंनी आपल्या राजकीय मनःस्थितींत पालट झाल्याबद्दल १९१९ सालीं सरकारला जें पत्र लिहिलें त्याची नक्कल, असे शेंकडों कागदपत्र त्यावेळीं माझे नजरेखालून गेलेले आहेत. तो वाद आतां शिल्लक राहिलेला नाहीं. तथापि, टिळक 'क्रांतिकारक' होते किंवा नाहीं, याबद्दल तिऱ्हाईत जबाबदार लोकांचें मत केव्हांहि ग्राह्य ठरेल. याकरितां यापुढें श्री बापूजी अणे, 'उदय'चे संपादक श्री. बामणगावकर, व बॅ. जमनादास मेहेता यांची मला आलेली पत्रें पुढें दिली आहेत.

**का. न. केळकर**

(१)

उदय ऑफिस, अमरावती
ता. ७।१०।५३

**श्री. काशिनाथपंत यांसी—**सा. न. वि. वि.

आपलें पत्र मिळालें. आनंद झाला. 'वाळवंटांतील पाउलें' हा लेख यापूर्वीच मी वाचला. तो मला तंतोतंत पटला. आपण प्रतिपादलेलें समतोल मत कै. लोकमान्यांचें होते, व कै. तात्यासाहेबांचेहि. त्यांचेशी (क्रांतिकारकाशी) त्यांची वागणूक तशीच होती. बापूजी अणेसुद्धा खासगी चर्चेत हेच बोलत. कै. दादासाहेब खापर्डे क्रांतिकार-कांना भेटले पण त्यांचेशी ते कधीच समरस झाले नाहींत. पण त्यांचा त्याग व धाडस

राष्ट्रोपयोगी नाहींच असें कोणी म्हणत नव्हते. त्यांना शक्यते साह्य करीत. बचावा-लाहि मदत करीत. तात्यासाहेब तेच आचरले. टिळकांची वृत्ति क्रांतिकारकाची नव्हती. पण साधल्यास मी सनदशीर बंड करील असें बोलावयास भीत नसत. कै. म. गांधी मॉंटेग्यूजवळ असेंच टिळकांविषयी बोलले, व तें टिळकांना येऊन त्यांनी सांगितले. तेव्हा त्यांना ' उत्तम केलें ' असें टिळकांनीं उत्तर केलें, असें आम्ही त्याचवेळी ऐकत होतो. म्हणून तुमची मीमांसा मला अत्यंत योग्य वाटते. यांत कोणाहि क्रांतिकारकांचा अपमान नाहीं. आणि आजच्या अहिंसकांचा त्यांत नादानपणाहि नाही.

मी यापूर्वींचे लेख वाचले असे आठवत नाही पण टिळक, केळकर, क्रांतिकारक वगैरे नांवे वाचतांच मी हाच लेख प्रथम वाचला आणि प्रसन्न झालो. सदर विषयावर लिहिण्याचा मला प्रसंगच आला तर आपला उल्लेख मी करीन. कळावे हे विज्ञापना.

**ना. रा. बामणगांवकर**

( २ )

पुणें–ता. १४-१०-५३

तुमचा लेख मीं हॉस्पिटलमध्यें येण्यापूर्वी वाचला होता. तुमच्या लेखांत जी तत्कालीन वस्तुस्थितीं तुम्हीं दर्शविली आहे ती बरोबर आहे असे वाटतें. आणि सामान्यतः तुमच्या लेखाला माझी मान्यता आहे. पण मीं तुम्हांला एक सांगतो या वादाचा कधीहि निकाल लागणार नाही. आणि सरतेशेंवटी ते सर्व विसरले जाऊन ' टिळक-चरित्र ' एवढेंच शिल्लक राहील— कळावे,

**प्रा. श्री. अणे**

( ३ )

मलबार हिल मुंबई

**श्री. कांशिनाथ यांस**—न. वि. वि. ता. ८ नोव्हेंबर १९६३

आपलें पत्र पावलें. आपला लेख मी समग्र एकदां नव्हे तर दोनदां काळजीपूर्वक वाचला. कारण त्यांतील भाषेचा बारकावा नीट लक्षांत येण्यास अडचण पडूं नये. तुमच्या उत्कृष्ट लेखाबद्दल मी तुमचें मनःपूर्वक अभिनंदन करतो. पिता पुत्र बंधु अशा-सारख्या जवळच्या नातेवाईकांचा संबंध आल्यावर लेखांत मन निर्विकार राहणें सोपें काम नाहीं. असें असतांहि लेखांत तुम्ही जो संयम दाखविला त्यामुळेंच हा लेख तुम्ही उत्तम रीतीनें लिहू शकला यांत शंका नाहीं.

लो. टिळक व तात्यासाहेबांचे यांचें कित्येक वर्षे गुरु-शिष्याप्रमाणें इतके निकटचे संबंध होते कीं, त्यांच्या जीवन चरित्राची एकमेकांपासून फारकत करतां येणार नाहीं. लो. टिळकांच्या राजकारणाचें तुम्ही केलेलें विवेचन माझ्या मतें बिनचूक

व वस्तुस्थितीवर आधारलेलें आहे. माझ्या मतें लो. टिळक हे 'युगपुरुष' होते. योग्या-प्रमाणें निर्विकार व अंतर्मुख व तितकीच स्फोटक प्रवृति असलेल्या मनुष्याचे अंतरंग कळणें ही गोष्ट दीर्घ साहचर्य, मार्मिक दृष्टी आणि निकोप प्रामाणिकपणा अंगी असणाराशिवाय इतरांना कळणें दुर्घटच आहे ! तात्यासाहेबांना ती कळूं शकली. त्यांच्या तत्वज्ञानाची मी चर्चा करीत नाही. पण (१) "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" व (२) ये यथा मां प्रपद्यन्ते– जशास तसें– या दोन सूत्रमय वाक्यांत त्यांचे सर्व राजकीय शहाणपण आणि ध्येयवाद सामावला आहे असें मला वाटतें. 'जशास तसें' वागणें यांत उच्च नैतिक अधिष्ठान राहात नाहीं असा कित्येकांचा दावा आहे. पण एका गाल-फडांत मारली कीं दुसरा गाल पुढें करणें हेंहि नामर्दपणाचें आहे. जे महात्मे आहेत त्यांना हे वर्तन शोभत असेल; सामान्य मनुष्याला हें उपयोगी नाहीं. रोजच्या धका-धकीमध्यें आत्मसंरक्षणाचा प्रश्न हरघडी येतो. तेथें 'जशास तसें' हेंच तत्त्व उपयोगी पडेल. याचा अर्थ, टिळक उठल्या सुठल्या लोकांना वर्दळीवर यावयाला सांगत होते असा नव्हे. तुम्हीं आपल्या लेखांत हें मार्मिक रीतीनें विशद केलें आहे. केवळ बॉंब तयार करण्याला टिळकांची हरकत नव्हती. प्रत्यक्ष बॉंब फेकणें हें बरोबर किंवा चूक हें त्यावेळच्या परिस्थितीवर अवलंबून राहील असेंच त्याचे मत होते. अत्याचारी लोकांतहि देशभक्त आढळतात; याकरितां बाणेदारपणा दाखविलेल्या अत्याचारी लोकांचा टिळक निषेध करीत नसत. राष्ट्रीय प्रश्नाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि व्यापक होती. तात्या-साहेब केळकर यांनीहि कायावाचामनें तंतोतंत तेंच धोरण चालविलें. मग सरकार किंवा कॉंग्रेसवाले कितीहि शिव्याशाप देवोत. टिळकांच्या पहिल्या पुण्यतिथीचे दिवशीं तुमच्या घरीं महात्मा गांधी आले असतां झालेली चर्चा ऐकण्यास मी हजर होतो. स्वराज्य मिळविण्याकरितां गांधीजीनीं खादीचा उल्लेख करतांच तात्यासाहेब हंसून म्हणाले "शंभर वर्षांपूर्वीं गिरण्या अस्तित्वांत नव्हत्या, तेव्हां आम्ही खादीच वापरत होतो ! मग आमचे स्वराज्य गेले कां ?" महात्मा गांधी या प्रश्नानें निरुत्तर झाले. पण त्यांनीं अशी खूणगांठ बांधली कीं टिळकांच्या सर्व अनुयायांत जर कोणी अत्यंत बुद्धिमान व निष्ठावंत अनुयायी असेल तर ते तात्यासाहेब केळकर हेच होत !

जमनादास मेहेता

**पूर्वार्ध समाप्त**

( उत्तरार्ध )

१

# सार्वजनिक जीवनाचा ओनामा

फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवर नित्य येऊन तेथें एक शिलाखंडावर बसण्याचा माझा परिपाठ आहे. त्यावेळीं जो सुखस्पर्श वायु वाहात असतो त्याने माझ्या मनांत अनेक आठवणी जागृत होतात. पन्नास वर्षें मी या टेकडीवर येत आहे आणि या सृष्टीबरोबरच वाढलो आहे. या जागेवर उभे असतांना भोंवताली सिंहगड रायगड येथपर्यंत जें डोंगराचे कडे पडलेलें दिसतें तेथपर्यंत सर्व टापू पायीं चालून माझ्या माहितीचा आहे. फर्ग्युसन कॉलेजांत माझे शिक्षण झालें, तेव्हापासून या टेकडीखालचा टापू इतका परिचयाचा आणि पायाखालचा आहे की, डोळे बांधूनहि या जागेंत मी फिरून येईन. टेकडीवरून खालीं फर्ग्युसन कॉलेजचें क्रीडांगण आणि त्यावर संचलन करीत असलेलीं तरुण मुलें व मुलीं दिसतात. आरक्त उदयाचलाप्रमाणे त्यांचे सतेज चेहरे पाहिले की, माझें मन पुनः तरुण होतें ! ती कॉलेजची वास्तु आणि मी शिकत असलेला ॲफी थिएटर नजीकचा क्लास हीं आजहि जशींच्या तशींच आहेत. तें पाहिलें की,

आपण आजहि त्या क्लासमध्यें विद्यार्थी आहों असा क्षणभर मनाला भास होतो. या क्रीडांगणावर येणारीं कित्येक तरुण मुलें हेच माझे मित्र आहेत असें मी समजतो. मला प्रौढ वयस्कर माणसांत मिसळावें असें वाटत नाहीं.

येथील टेंकड्यांचा परिसर मनानें मला इतका प्रिय आहे की, संवत्सरांतील प्रत्येक ऋतूमध्ये व प्रत्येक काळीं मी या टेकडीवर येऊन वेळ घालविलेला आहे. केव्हा अगदीं पहाटें येऊन धुक्यांतून झालेला सूर्योदय पहावा, केव्हा संध्याकाळ होउन अंधार पडल्यावर पूर्वक्षितिजावर आलेलें आरक्त चंद्रबिंब पाहून प्रसन्न व्हावें; वर्षाऋतूंत पावसाची झड पडत असतां व डोंगरावरून पाण्याचे प्रपात खळखळ वहात असतां तें निसर्गसंगीत ऐकावें; तसेंच अश्विनाच्या महिन्यांत सृष्टी आर्द्र व प्रसन्न झाली असतां त्याची शोभा अवलोकन करावी, हें सर्व मी मनमुराद केलें आहे. या निसर्गसृष्टींत आलो की माझें मन बोलकें होतें ! हिरव्यागार पुष्पपर्णांनीं नटलेली सृष्टी पाहून या जगांत वार्धक्य हा पदार्थ आहे असें मला वाटतच नाहीं ! शिशिर ऋतूंत वृक्षांचीं पाने गळून पडतात, पण त्यांतूनच जीवनरसाचें परिपोषण होऊन वसंतऋतूमध्ये पुन; त्याला हिरवी पालवी फुटते. ही गोष्ट जर मी पाहतो तर वार्धक्यावर मी काय म्हणून विश्वास ठेवावा ? आकाशांत असंख्य तारे लखलखत असतात. त्यांचा तो क्रम आज हजारों वर्षें चालूच आहे. त्यांचें तेज व सौंदर्य कमी झालें आहें काय ? मनुष्य जर मनांत आणील तर त्यालाहि तसें होणें अशक्य आहे काय ?

म्हणूनच माझे सहचर सर्व तरुण माणसेंच मी निवडलीं आहेत. त्यांच्यापासून शिकण्यासारखें मला पुष्कळच आहें व तें मी शिकलोंहि आहे. स्वतःच्या आयुष्यांतील सुखदुःखें मला ते जर मोकळ्या मनाने सांगतात तर मीहि माझ्या आयुष्यांतील कांही गोष्टी तितक्याच प्रांजलपणानें त्यांचेशी बोलूं नयेत काय ? इतरांना उपयोग व्हावा असें माझ्या आयुष्यांत सांगण्यासारखें कांही थोडे असेलहि. माझें सर्व आयुष्य कांही फुकट गेलेलें नाही. मातापितरांचें छत्र ईश्वरकृपेने मला पन्नास वर्षें लाभलें ! पूर्वसुकृतामुळे संगतहि बरी मिळाली आणि फार मोठ्या व्यक्तीच्या कुळांत जन्म झाल्यामुळे अनेक थोर व्यक्तीचें दर्शन व सार्वजनिक जीवनाचा अनुभव जग न फिरताहि आपोआप मिळाला. हा अनुभव मी इतरांना सांगणें माझें कर्तव्य नाही काय ? केवळ याच विचाराने यापूर्वीं येऊन गेलेल्या हकीगती मी सांगितल्या. व ज्या थोड्या राहिल्या असतील त्या यापुढें सांगणार आहे. त्यांत घेण्यासारखें कांही असेल किंवा नसेलहि, पण त्याने कोणाची जरी घटकाभर करमणूक झाली तरी माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मी मानीन !

प्रथमच हें सांगून टाकतो की, माझें सर्व जीवन सार्वजनिक कामाला वाहून घ्यावें किंवा मी ‘ पुढारी ’ व्हावे अशी इच्छा साऱ्या जन्मांत मला कधी झाली नाही. पुढारीपणाचीं दुःखें काय असतात हें मी डोळ्यांनी पाहिलेलें आहे. स्वतःची योग्यता काडी-

मात्र नसतांना जे लोक पुढारीपण घेऊन लोकप्रियतेच्या मागें लागतात त्यांची फजिती कशी होते हेंहि मी पाहिलेलें आहे. यास्तव प्रथमपासूनच माझ्या आयुष्याचें ध्येय मी अगदीं मर्यादित ठेवलें होतें. एकाद्या वर्तमानपत्राचें संपादकत्व लाभतें तर अधिक सार्वजनिक काम माझें हातून झालें असतें. पण तें नशिबी नव्हतें. आणि त्यांतूनच वयाच्या बत्तिसाव्या वर्षी कानाला बहिरेपण प्राप्त झाल्यामुळें माझ्या सार्वजनिक आयुष्याला तेंहि गंडातरच ठरलें. राहतां राहिला लेखणीचा उद्योग व प्रकाशकाचा व्यवसाय. तो मात्र मला गेल्या चाळीस वर्षांत भरपूर करतां आला. मी स्वतः सात आठ पुस्तकें लिहिलीं, ती. तात्यांच्या अनेक पुस्तकांचें संपादन व प्रकाशन केलें व तेंहि इतक्या चिकाटीने व निष्ठेने कीं, ती. तात्यांनीं 'आत्मचरित्रासुद्धां आपल्या समग्र–वाङ्मयाचे कॉपीराईट हक्क' मला बक्षीस देऊन वर शाबासकीहि दिली ! त्यांच्या साहचर्यामुळे कांही सार्वजनिक कामहि माझे हातून घडलें. माझ्या लेखणींत कांही गुण सोन्याचा, तर कांही सोनाराचा असें घडलें आहे. पण लेखक होण्याची माझ्यांतच कांही जन्मसिद्ध पात्रता किंवा महत्त्वाकांक्षा नसती तर, लेखनाची स्फूर्ति दुसरा कोणीहि माझ्यांत उत्पन्न करू शकला नसता. याचा अर्थ मी इतकाच समजतो की, वाङ्मयाची आवड माझ्यांत निसर्गसिद्ध होती आणि तात्यांचे साहचर्याने त्या गुणाला वळण लागून त्याचा विकास झाला. पण हें पुढचें सर्व आधींच न सांगता, क्रमानेच माझी हकिगत सांगतो.

माझा पहिला लेख मी वयाच्या अठराव्या वर्षी लिहिला; आणि मुंबईच्या नवयुग मासिकाचीं छापील बारा पानें होतील इतका तो विस्तृत होता. "हाच रामचंद्र तुम्ही आदर्शभूत मानला आहे काय ?" असें त्याचें शीर्षक असून, आसन्नप्रसव निरपराध सीतेचा रामाने त्याग केला, धर्मयुद्धाचा नियम मोडून वालीचा अन्यायानें वध केला, वगैरे मुद्यांवर त्यांत टीका केली होती. हा लेख 'रामदास' या टोपण नावाने मी लिहिला होता. पण साधकबाधक विचार आणि युक्तिवाद मला करितां येतो हें पाहून केवळ प्रोत्साहन देण्याकरितांच ती. तात्यांनीं तो नवयुगाकडे पाठविण्याला संमति दिली होती. आमच्या घरीं रामोपासना गेलीं पन्नास वर्षे परंपरागत आहे. यामुळे मी असला विचित्र लेख लिहिला हें आईला ( ती. ताई ) मात्र बरें वाटलें नाही. तिची धार्मिक भावना खचितच दुखावली गेली. ती मला विशेष कांही बोलली नाही, पण तिने इतकेंच दर्शविलें की हा मुलगा 'शहाणा' म्हणजे लेखक झाला. त्याला कोण काय सांगणार ? त्याच्याच डोक्यांत केव्हा प्रकाश पडेल तो खरा !"

कांही दिवसांनी हाच विषय मी शाळेंतल्या वादसभेपुढे व्याख्यान देऊन मांडला. हें व्याख्यान म्हणजे शब्दशः पाठ म्हटलेला माझा लेखच होता. बारा छापील पानें होतील एवढा मोठा लेख मी तोंडपाठ म्हणू शकलों, या माझ्या शक्तीचें आज नवल वाटतें. कारण आज ती पाठांतर शक्ति राहिलेली नाही ! माझें व्याख्यान परिणामकारक झालें असावें. कारण अध्यक्षस्थानीं प्रो. वि. ब. नाईक होते. त्यांच्यासारख्या

सात्विक आणि सत्वस्थ मनुष्यालाहि राग आला. कुमारसंभवांत पार्वती तपश्चर्या करीत असतां, शंकर तिची परीक्षा पाहण्याकरितां कपटवेषाने येऊन शिवाची निंदा करतो असा एक प्रसंग आहे. त्यावेळीं पार्वती त्याला निक्षून सांगते कीं, जीं माणसें आपणाला प्रिय आहेत त्यांची मुद्दाम बुद्धिभेद करण्याचे हेतूने जर कोणी निंदा करूं लागला तर ती कानानीं ऐकूं देखील नये ! म्हणून माझ्या समोरून तूं चालता हो ! " हे शब्द बोलत असतां प्रो. नाईकांसारख्या प्रसन्न व शांतिब्रह्म मनुष्याचीहि शांति ढळली आणि मन प्रक्षुब्ध झालें होतें असें मला दिसून आलें. पुढे माझा लेख नवयुग मासिकांत छापून आला आणि अकल्पित रीतीने माझ्या मताला कलाटणी मिळण्याचा प्रसंग घडून आला तो असा---

त्या वेळीं लो. टिळकांनी 'होमरूल' ची चळवळ सुरू केली असून बहुतेक सर्व महत्त्वाच्या सभा किर्लोस्कर थिएटरमध्येच भरत. एक दिवस तेथे कांही तरी राजकीय विषयावरच टिळक भाषण करीत होते. श्रोत्यांनी थिएटर अगदी चिकार भरलें होतें, आणि मी गॅलरींत तें व्याख्यान ऐकण्यास हजर होतो. व्याख्यान देत असतां, सहज उदाहरण देण्याचे उद्देशाने टिळक म्हणाले– "रामाने सीता कां टाकली हें तुला तरी काय माहीत ? आणि मला तरी काय माहीत ?" हें ओझरतें एकच वाक्य व्याख्यानाच्या ओघांत ते सहज बोलले. पण नेमकें अंतःकरणावर बोट ठेवावें असें होऊन मी चपापलों आणि निमूटपणें घरीं आलों. परत येतांना विचारचक्राला उलट गति मिळाली होती. खरेंच पाहा कीं, माझें ज्ञान तें किती, वय किती, अनुभव किती आणि टीका एकदम कोणावर ? हा विचार मनांत येऊन माझी मलाच लाज वाटली.

दुसऱ्या दिवशी आमच्या मित्रमंडळाच्या सभेकरितां श्रीयुत हरिभाऊ फाटक यांचे घरी मी गेलों असतांना हरिभाऊ मला म्हणाले, "बापुराव ! काल लोकमान्यांनी व्याख्यानांत तुमच्या लेखाला उद्देशून उल्लेख केला !" मी लज्जेने आधीच चूर झालों होतो म्हणून कांहीच बोललों नाही. मग मनांत आलें की आपलें पाप आपणच निस्तरावें ! व तें अगदी सोपें होतें. नवयुगमधील माझ्या लेखावर मी टोपण नांव घातलें होते. तेव्हा दुसरें टोपणनांव घेऊन माझा लेख मीच खोडून काढण्यास हरकत कोणती ? हा सर्व प्रकार अगदी गुप्त ठेवला म्हणजे झालें ! ही हिकमत मला सुचली तेव्हा माझी मलाच मौज वाटली. मग थोड्याच दिवसांत दुसरा लेख तयार केला आणि "एक अभ्यासक" या सहीने तो पुण्याच्या 'आत्मोद्धार' मासिकाकडे पाठवून दिला. आत्मोद्धारचे संपादक श्री. पिंपुटकर हे 'राष्ट्रीय' विचारसरणीचे असल्यामुळे, साहजिकच माझा लेख त्यांना आवडला व तो प्रसिद्धहि आला. मासिकाचा अंक आणण्याकरितां मी त्यांचेकडे गेलों असतांना 'तुमचें लहान वय पाहून तुमचे विचार इतके प्रौढ असतील असें वाटलें नव्हतें !" असें म्हणून त्यांनी माझें अभिनंदन केलें तेव्हां मला फार मौज वाटली. कारण टोपण नांवाखालीं उलट सुलट लेख लिहून वादाचा आभास उत्पन्न

करणारी व्यक्ति मुळांत एकच होती, ही गोष्ट त्यांना त्यावेळींच काय पण पुढे कित्येक वर्षे माहित नव्हती ! नंतर वीस वर्षांनी साधूच्या वेषात मुंबईत एके ठिकाणीं पिंपुटकर यांची व माझी गांठ पडली तेव्हा 'आत्मोद्धार' मधील लेखाचें स्मरण देऊन त्यांतलें टोपण नांवाचें 'गौप्य' मी प्रकट केलें. तेव्हा त्यांनाहि मोठी मौज वाटली !

१९१९ साल म्हणजे स्वराज्याच्या चळवळीच्या ऐन उत्कर्षाचें साल होतें. लोकमान्य टिळकांबरोबर तात्या विलायतेला डेप्युटेशनवर गेलेले होते. केसरींत त्यांची "विलायतचीं बातमीपत्रें" प्रसिद्ध होत तीं अगदी अपूर्व असत. केसरी निघाला की त्याचेवर लोकांच्या उड्या पडत. त्यानंतर असहकारितेचें युग सुरू झालें. या काळांत तात्यांचीं जीं पुण्यांत व्याख्यानें होत तीं सरस असत. टांकसाळीचा दाब घेऊन घाटदार कोरें करकरीत नाणें बाहेर पडावें त्याप्रमाणे त्यांच्या धगधगीत विचारांचा छाप माझे मनावर कायमचा उठला. त्यांचे कोठेहि व्याख्यान झालें की चटकन तें लिहून काढून त्यांच्या टेबलावर ठेवण्याचा माझा परिपाठ पडला. आणि तें व्याख्यान दुसरे दिवशीं केसरींत प्रसिद्ध झालेलें पाहून त्या वयांत किती उत्साह वाटत असेल तें शब्दांनी सांगतां येणार नाही. तात्यांचे साहचर्यामुळे केसरींत लिहिण्याची चटकच उत्पन्न झाली. केसरींत आजवर मी स्वतंत्र लेख लिहिला नव्हता. पण नेपोलियनच्या मृत्युशताब्दीचे निमितानें त्यांनीं माझेकडून मुद्दाम लेख लिहवून घेऊन तो केसरींत प्रसिद्ध केला. हाच माझा केसरींत सहीनिशी लिहिलेला पहिला लेख !

या लेखापाठीमागे पुष्कळ वाचन व परिश्रम असल्यामुळे हा लेख पुष्कळांच्या नजरेंत भरला आणि त्याची प्रशंसा झाली. श्री. माडखोलकरांची आयर्लंडवरील लेख-माला पुढच्याच महिन्यांत केसरींत आली. ते आणि मी एकाच वयाचे व समव्यवसायी होतो, तसेंच गुरुबधूंहि होतों असें मला रास्त अभिमानाने म्हणतां येईल. कांहीहि असो, केसरींतील माझ्या पहिल्या लेखाने मला 'आत्मदर्शन' घडले आणि माझ्या लेखणीला महत्त्वाकांक्षेचे पंख फुटले आहेत असें मला दिसून आलें !

१९२० सालीं मी असहकारितेच्या चळवळीमध्ये कॉलेज सोडलें आणि १९२२ मध्ये टिळक विद्यापीठाची बी. ए. ही पदवी घेतली. पुढे वकिलीच्या अभ्यासाला सुरुवात करून १९२५ मध्यें अखेर ॲडव्होकेट झालों. तथापि हीं पांच वर्षें केसरीच्या व तात्यांच्याहि आयुष्यांत इतकी आणीबाणीचीं होतीं कीं तात्या कांही एका संकट-काळांतून जात आहेत अशी आमची भावना होती. असहकारितेच्या पहिल्या वर्षी म. गांधी यांनी साऱ्या हिंदुस्थानला भारलें होतें व त्या लोकमताच्या महापुरांत अनेक महनीय माणसें वांकत होतीं किंवा स्वत्व सोडून वाहून जात होती. कलकत्ता कॉंग्रेसचा ठराव विरुद्ध गेल्यावर केसरीने कांही काळ नमतें घेतलें, पण अवघ्या दोन वर्षांत केळकरांनी दास-नेहरु यांचे सहकार्याने स्वराज्यपक्ष स्थापला आणि कौन्सिल निवड-णुकी जिंकून विजयाचें पारडें आपलें बाजूला फिरविलें ! म. गांधींसारखी लोकोत्तर

व्यक्ति प्रतिपक्षांत असतां आणि लाखों माणसें त्यांचा शब्द झेलण्यास तत्पर असतांना, स्वमताचें प्रतिपादन ईर्षेने करून लोकमताचें तोंड आपल्या बाजूला फिरविणें ही कामगिरी कांहीं लहान सहान नव्हे. या काळांत तात्यांच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांनी व खासगी शत्रूंनी आपलें बळ एकवटून त्यांचेवर सर्व बाजूंनी उठाव केला होता. पण अनेकांच्या वादाची गांठ एकत्र न घालतां मोठ्या चातुर्याने आणि शहामतीने वागून केसरीची नाव त्यांनी शीरसलामत पुढे हाकारली ! असें दृष्य मी तरी कोठें पाहिलें नव्हतें. महाराष्ट्राच्या या भूमीत जातिवंत राजकारण जाणणारीं आणि तें जगविण्याचें सामर्थ्य असलेली माणसें निर्माण होतात याचें हें एक उदाहरण आहे. असहकारितेचें निष्क्रिय राजकारण संपून टिळकांचे वेळेच्या खऱ्या राजकारणाचें वारें पुनः महाराष्ट्रांत वाहूं लागल्यावर अच्युतराव कोल्हटकर यांनीहि मान डोलाविली. एकदां ते म्हणाले, “ स्वराज्य पक्ष स्थापन करण्यांत देशबंधु दास यांनी धैर्य दाखविलें, मोतीलाल नेहरू यांनी आपली हुशारी प्रत्ययाला आणली; पण त्या दोघांपेक्षाहि नरसोपंतांनी अधिक चातुर्य दाखविलें ! ” संदेशकारांनी यापूर्वी केळकरांचें शत्रुत्व कांही थोडेथोडके केलें नव्हतें. पण केसरीच्या पराक्रमामुळें महाराष्ट्राचा हिंदी राजकारणांत जो बोलबाला सुरू झाला त्याचा प्रभाव अच्युतरावांचे मनावर किती पडला होता हें वरील उद्गारावरून सहज दिसतें.

या काळांत ज्या अनेक गोष्टी मी पाहिल्या त्यांचा उल्लेख करण्याचा मोह मी सोडून देतों. कारण एक तर तो तात्यांच्या विस्तृत चरित्राचा भाग आहे. आणि दुसरी मुख्य गोष्ट अशी की, त्या काळांत तात्यांनीं जे कार्य केलें तें जवळ जवळ शब्दशः ‘ गेलीं पांच वर्षें ’ ‘ शिक्षणविषयक लेख ’ ‘ संस्थानी राजकरण ’ ‘ केसरीवरील खटला ’ हीं त्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध करून मी केलेलें आहे. या काळांतील अनेक हर्षामर्षाचे प्रसंग घडत असतांना तात्यांची योग्यता ऐतिहासिक आहे याची जाणीव त्या काळीं मला होती हें मी सुदैव समजतों. आणि त्याला धरूनच या वाङमयप्रकाशनाचा जो उद्योग मी केला त्यामुळे त्यांना तर समाधान वाटलेंच पण माझ्याहि उद्योगाचें सार्थक होऊन आपोआप वाङमयसेवाहि घडल्याचें श्रेय मला मिळालें.

ईश्वराच्या नवविधा भक्तीप्रमाणेच वाङमयाचीहि भक्ति नवविधा असूं शकते. ग्रंथसंपादन व प्रकाशन करणें हा त्याचाच एक प्रकार आहे. तात्यांची किती पुस्तकें मीं प्रसिद्ध केलीं याची यादी येथे देण्यांत अर्थ नाही, तीं सर्व प्रसिद्ध आहेत. त्यापैकी कांही पुस्तकें मी अंगावर काढलीं, कांहींना प्रकाशक लाभले, अशी मुख्य उद्दिष्टाची गांठ घालून त्या बारा वर्षांत मी तात्यांच्या वाङमयाचीं आठ हजार पृष्ठें प्रसिद्ध केलीं ! तात्यांच्या पुस्तकांना प्रकाशक कसा मिळेल ही विवंचना मला कधीं पडलीच नाही. माझा उद्योग फक्त हातात कात्री घेऊन विषयवार कात्रणें एकत्र करण्याचा ! कारण हाच पुस्तकाचा मालमसाला. या कात्रणांनीं दोन मोठ्या ट्रंका भरल्या होत्या. १९३२

सालीं प्रकाशनांत मी थोडा हात आखडता घेतल्यावर माझ्या या कात्रणांचे सामग्रीचा उपयोग पहिल्या ज्युबिलीचे वेळीं जो केळकर-ग्रंथ निघाला त्याचे संपादकांना झाला. आणि पुढे १९३८ सालीं समग्र-केळकर-वाङ्मय बारा खंडांत निघाले त्यावेळीं, तसेच तात्यांचे आत्मचरित्रातील उताऱ्यानांहि याचाच उपयोग झाला.

अननुभवी तरुणांत स्फूर्ति उत्पन्न करण्याचा गुण ती. तात्यांच्यामध्यें फार होता. ते कोणालाहि नाउमेद करीत नसत. अनेक नवशिक्या लेखकांना प्रोत्साहन देऊन त्यांनी पुढे आणलें. आज नामवंत असलेले कित्येक लेखक त्यांचे हें ऋण आनंदाने कबूल करतील. तरुण उपवर मुलींचा बाप अनेक तरुणांचे चेहेऱ्याकडे ' हा मुलगा माझा जांवई होण्याला योग्य आहे काय ? ' अशा आशेने पाहात असतो, त्याचप्रमाणे कोणताहि लेखक दिसला की याचा केसरीकडे उपयोग होईल काय अशी त्यांची दृष्टी होती. एकदां नूतन मराठी विद्यालयाच्या प्रशाळेंत त्यांचें व्याख्यान झालें तेव्हा विद्यार्थ्यांपुढें बोलतांना त्यांनीं सांगितलें की, विद्वत्ता ही कांही अशी अजब दुर्मिळ चीज नाहीं कीं जी तुम्हाला प्राप्त होणार नाही. मनांत आणलेंत तर तुम्हीहि एखादें पुस्तक लिहूं शकाल ! याची गमतीदार उदाहरणें सांगण्यासारखीं आहेत. Diary of Samual Pepes हें पुस्तक म्हणजे सॅम्युअल पेप्सची रोजनिशी, इंग्लंडांत दुसऱ्या चार्लसच्या कारकीर्दीत हा सॅम्युअल पेप्स कोर्टांत शिरस्तेदार कारकून होता. लोकांचें लक्ष वेधून घेणारे अनेक भानगडींचे खटले त्यावेळीं कोर्टांत येत. म्हणून रोजनिशीचे रूपाने त्याने त्यांची आस्थेवाईपणानें नोंद केली. दिसण्यांत ही गोष्ट अगदीं किरकोळ वाटते. पण पुढे याच पुस्तकाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें ! मराठीतील पुस्तकांमध्ये श्रीमती रमाबाई रानडे यांच्या आठवणीचें पुस्तक किंवा लो. टिळकांच्या आठवणीचें पुस्तक असेंच आहे. आठवण नीटपणाने लिहून काढली तर अवघ्या दहा पंधरा ओळींत संपतें. पण अशा अनेक आठवणींचा कल्पकतेनें कोणी संग्रह केला तर तें पुस्तक वाङ्मयांत जमा झालें असें तुम्ही म्हणाल की नाही ? चरित्र-लेखकाला किंवा इतिहासकाराला अशीं पुस्तकें म्हणजे केवढें बहुमोल साधन आहे ! श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं । स्पर्शनं अर्चनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम् ।। असें ईश्वराच्या नवविधा भक्तीचें कवीने वर्णन केलें आहे. ईश्वराशीं ' सख्य ' जोडणाऱ्या भगवद्भक्तापासून नुसतें कीर्तन श्रवण करणारा-पर्यंत त्यांत सगळे प्रकार आहेत. तुम्ही स्वतः एखादा ग्रंथ लिहूं शकला नाही तरी ग्रंथसंग्रह करणें, तो वाचवून घेणें, त्यावर चर्चा टीका करणें, एखाद्या पुस्तकाच्या प्रकाशनाला मदत करणें हें सर्व वाङ्मयाच्या नवविधा भक्तींतच जमा होतें.

माझ्या विसाव्या वर्षीं मी ज्या सार्वजनिक कामांत पडलो, तें काम फर्ग्युसन कॉलेजांत टिळकांचा पुतळा उभारण्याचें होतें. टिळकांच्या नांवाचा ग्रहयोगच असा आहे कीं, त्या कामांत वाद विरोध उत्पन्न झाल्याशिवाय तें

तडीस जाऊंच नये, व तसेंच येथे होऊन त्याला सार्वजनिक स्वरूप प्राप्त झालें व तो वाद मला पांच वर्षें पुरला ! आज कोणालाहि असें वाटेल की टिळकांसारख्या जगप्रसिद्ध व्यक्तीच्या स्मारकाला स्वतः त्यांनींच स्थापन केलेल्या कॉलेजांत खळखळ का व्हावी ? आणि वादाची वेळ का यावी ? आम्हा मुलांना हेंच वाटत होतें, पण त्या वेळच्या कॉलेजच्या अधिकाऱ्यांना असें वाटत नव्हते म्हणून वाद झाला. प्रिन्सिपॉल कानिटकर आणि इतर प्रोफेसर यांना वाटे आम्ही म्हणजेच 'कॉलेज.' मुलांना वाटे की कॉलेज-मधलीं मुलें आणि त्यांची राष्ट्रीय भावना हीं दोन्हीं काढून घेतली तर जागेवर शिल्लक काय राहतें ? पूर्वी केव्हा तरी टिळक आगरकरांचे झाले असतील वाद, आणि सोसायटीं-तील भांडणांत त्यापैकीं बरोबर किंवा चूक कोणीहि असेल. पण त्याचे आता काय ! पंचवीस वर्षांत जग पुढे गेलें नाही काय ? रँग्लर परांजपे यांना मुलांची भावना कळत होती. आणि ते प्रिन्सिपॉल असतांना, सौजन्याने स्मारकाला त्यांनी परवानगी दिलीहि पण त्यांचेनंतर तें पद ज्यांचेकडे आले त्यांना या टिळकस्मारकाबद्दल फार मळमळ उत्पन्न झाली. त्यांना वाटूं लागलें की टिळकांचा व नेमस्तांचा जन्मभर विरोध असतां जर टिळकांचा पुतळा फर्ग्युसन कॉलेजांत उभारूं दिला तर आपला नेमस्तपणा तो काय उरला ? आणि यापेक्षा नामुष्कीची गोष्ट कोणती ?

असहकारितेच्या चळवळींत कॉलेजवरील बहिष्काराचीहि बरीच धामधूम झाली, त्यांतच कोणी अविवेकी विद्यार्थ्यांनी पत्रक काढून असें प्रसिद्ध केलें कीं फर्ग्युसन कॉले-जांत टिळकांचा पुतळा बसवूं नये ! पत्रक काढणारे विद्यार्थी कार्यकारी मंडळापैकीं कोणी नव्हते. ते वर्गणीदार देखील नसतील. पण या गोष्टीचा फायदा घेऊन प्रि. कानिटकर यांनी ठरविलें कीं ही बरी संधि सांपडली. बघूच या आता फर्ग्युसन कॉलेजांत टिळकांचें स्मारक कसें होतें तें ! आम्ही द्वाड नालायक माणसें आहोंत नव्हे काय ? मग हा पुतळा फर्ग्युसन कॉलेजांत बसविण्याचें तरी काय कारण ? तो बाहेरच कोठे तरी बसलेला चांगला !

पण अशा ओढाताणींत आम्ही कार्यकारी मंडळांतील लोकांनी काय करावयाचें ? पुतळा तयार झाला होता. त्याचा खर्च करून आम्हीं चुकलों होतों. आणि ज्या अनेक लोकांनी फर्ग्युसन कॉलेजांत हा पुतळा ठेवण्याला वर्गणी दिली होती त्यांच्या इच्छे-विरुद्ध तो पुतळा बाहेर कोठे बसविणें यांत औचित्य कोणतें ? आणि कॉलेजचे अधि-कारी आमच्यांतल्या मतभेदाचीच सबब सांगून पुतळ्याचा स्वीकार करीनात. यामुळे काय करावें असें कोडे उत्पन्न झालें !

एके दिवशीं रात्री नऊ वाजतां मी आणि कार्यकारीं मंडळाचे एक सभासद तबीब हे प्रि. कानिटकर यांचे बंगल्यावर वाटाघाटीने कांही तरी मार्ग काढावा म्हणून गेलो असतां, कोठलें तरी जुनें भांडण काढून त्यांनी तबीब यांना हाकून दिलें ! हा प्रकार पाहून मी चकित झालों ! आणि धोरण पाहून मीहि आमच्या कामासंबंधाने एक

अक्षर न बोलतां परत आलों. सर फेरोजशहा मेहता यांनी पूर्वी डॉ. मुंजे यांना आपल्या बंगल्यावरून घालवून दिलें होतें त्या गोष्टीची आठवण मला परत येतांना झाली ! आणि हें प्रकारण किती अवघड आहे याची कल्पना आली.

पण याहीपेक्षा एक गोष्ट अगदी सुमार झाली. पुतळा ही नाजूक वस्तु, ती खाजगी रीतीने कोणाकडे ठेवण्यापेक्षा, फर्ग्युसन कॉलेजच्या आवारांत सुरक्षिततेसाठीं एका प्रोफेसरांच्या घरींच आम्हीं पुतळ्याच्या बंद पेट्या ठेवल्या होत्या. त्या प्रोफेसरांची दुसरीकडे बदली झाल्यावर त्या पेट्या टिळकांच्या पुतळ्याच्या आहेत हें प्रि. कानिटकर यांचे नजरेस आलें ! मग काय विचारतां ? त्यांनी तावातावाने मला पत्र लिहून जाब विचारला की, "कोणाच्या परवानगीने फर्ग्युसनच्या आवारांत मी या पुतळ्याच्या पेट्या ठेवल्या ? त्या मी ताबडतोब चोवीस तासांत दुसरीकडे हलवाव्या !" मी आजारी असल्यामुळे त्या दिवशीं कांहीच करू शकलों नाही. पण ते कांही एक न ऐकतां प्रि. कानिटकरांनी त्या पेट्या माझे घरीं रवाना केल्या आणि छकडेवाल्यानेंहि आंतील वस्तूची कल्पना नसल्यामुळे त्या पेट्या रस्त्यावर धडाधड लोटून दिल्या !! या अत्याचारामुळे पेटींतील पुतळ्याची मोडतोड होऊन आमच्या स्मारकाची इतिश्रीच झाली असेल; हें माझें पहिलें सार्वजनिक काम; त्यांत लो. टिळकांच्या स्मारकाचा संबंध, त्यांत अपशय येणार हें पाहून फार वाईट वाटलें. त्या पेट्या उघडून पाहण्याला कांही मन धजावेना. अखेर प्रो. नाईक, लिमये व जोशी ही त्रिवर्ग मंडळी सल्लागार मंडळांत होती त्यांचे समक्ष पेट्या उघडून पुतळा शाबूत आहे असें पहिलें तेव्हा माझा जीव खाली पडला !

नंतर प्रो. नाईकांनी आम्हांला सांगितलें, तुम्ही कानिटकरांच्या घरीं जाऊ नका; किंवा समक्ष त्यांच्याशी बोलण्याच्या भानगडींत पडू नका ! कांहीतरी बोलून ते हें प्रकरण तुमच्याच गळ्यांत अडकवतील ! त्यांचेशी फक्त लेखीं पत्रव्यवहारानेंच बोला. सारीं पत्रें म्हणजे त्यांतील मजकूर प्रो. नाईक मला पाटीवर लिहून दाखवीत आणि आणि नंतर पुसून टाकीत असत ! अशा अवघड स्थितीत तीन वर्षें जाऊन हें काम एक तसूभर देखील पुढे सरकलें नाही.

यानंतर प्रि. परांजपे दिवाणगिरी संपवून पुन्हा प्रिन्सिपॉलच्या जागेवर आले. आणि कानिटकर यांचा हंगामी अधिकार संपला तेव्हा माझ्या उद्योगाला पुन्हा जोर आला. वर्गणीदारांत मतभेद असला तरी पुनः कशा रीतीने मतें घ्यावयाची हें त्यांनी मला लेखीं दिलें. आणि त्याप्रमाणे मतें मागावून मताधिक्य झाल्यावर त्यांनी पुतळ्याचा रीतसर स्वीकारहि केला. योगायोगाची गंमत अशी की, प्रि. परांजपे यांनी थोड्या दिवसांनी ती जागा सोडल्यावर पुनः कानिटकर प्रिन्सिपॉल झाले. आणि ज्या पुतळ्याला त्यांनीं कसून विरोध केला त्याचा अनावरण समारंभ करणें मात्र त्यांच्या नशिबी आलें ! तटस्थ प्रेक्षकांत बसून या समारंभाची मौज पाहण्याला मी हजर होतों

आणि मनांत हंसत होतों ! मी भोगलेल्या आशा निराशा आणि अपमान यांची त्या दिवशीं भरपाई झाली असें मला वाटलें. तात्यांची या सर्व प्रकरणांत मला मदत व सहानुभूति होती हें सांगावयाला नकोच. हें माझें पहिलें सार्वजनिक काम. वाट पाहाणें, धीर धरणें, चिकाटी न सोडणें या गुणांचा सार्वजनिक कामांत केवढा उपयोग आहे हें माझ्या लक्षात आलें.

या पुतळा प्रकरणांत प्रो. नाईक व प्रो. प. म. लिमये यांची मदत फार झाली. प्रो. लिमये यांनी खजीनदार व हिशेबनवीस ही जबाबदारी अखेरपर्यंत पत्करली होती आणि प्रो. नाईक यांनी अंतस्थपणें मार्गदर्शन केलें, त्यामुळेच ही जबाबदारी मी पार पाडूं शकलों. रे मार्केटमधील लो. टिळकांच्या पुतळ्याचा समारंभ याच सुमाराला झाला. तात्या त्यावेळीं म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होते. त्यांच्या कणखरपणामुळेच टिळकांचें तें स्मारक यशस्वी झालें, त्यांच्याप्रमाणे मीहि टिळकांचा एक पुतळा पुण्यांत उभारला, या गोष्टीला 'लहान माणसाचा पराक्रम' असें कोणी नांव दिलें तरी तें शोभेल. पण मीहि त्यांच्याच स्फूर्तीने काम करीत होतों ही गोष्ट खरीच होती.

माझ्या अभ्यासाच्या कामांत पुस्तक-प्रकाशन किंवा पुतळा प्रकरणाचा वाद या गोष्टी फारशा आल्या नाहीत. एक तर सर्व वेळ त्याकरता खर्च करावा लागत नाही. काम थोडें असतें. फक्त वेळच्यावेळीं टीप ठेवून तें अवधानाने केलें म्हणजे काम भागतें. वकिलीचा अभ्यास पाठीमागे असतां सभा संमेलनाचे निमित्ताने तात्यांचे बरोबर मी बाहेरगावीं फारसा कोठें गेलों नाही. फक्त एकदा कोकण पाहण्याच्या निमित्तानें पेण व रत्नागिरी येथील परिषदांना, तसेंच १९२५ सालीं रायगडच्या उत्सवाला गेलों होतों. बसल्या बसल्या तेथें केसरीच्या वार्ताहराचें काम केलें पण भोंवतालच्या वातावरणांत एकाग्रपणाने अभ्यास होत नाही असें पाहून सहा महिने मुंबईस जाऊन राहिलों. तेव्हा मी जे परिश्रम केले त्याची आठवण आणि अभिमान मला अजून वाटतो. अभ्यासाशिवाय दुसरें मला कांहीहि दिसत नव्हतें ! मनुष्य एकाग्र मनाने सतत किती परिश्रम करूं शकेल याचा स्वतःशी केव्हा तरी मनुष्याने प्रत्यय घ्यावाच लागतो. याचेंच नांव परीक्षा. आणि ती स्वतःची स्वतःजवळच द्यावयाची असते ! या परीक्षेंत तुम्ही पास झाला म्हणजे जगांत कोणचीहि परीक्षा देणें तुम्हाला अवघड नाही. आणि यांत नापास झालात तर आयुष्यांत तुम्ही यशस्वी व्हालच अशी खात्री देता येणार नाही ! वकिलीच्या परीक्षेंत मी पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालों या एका गोष्टीने माझी बुद्धि आणि परिश्रम करण्याची शक्ति यांबद्दल मला आत्मविश्वास उत्पन्न झाला. आणि मला जें हवें होतें तें शस्त्र माझे हातीं येऊन माझ्या मनांत महत्त्वाकांक्षेचा उदय झाला.

वकिलीची परीक्षा पास झाल्यावर हायकोर्टाची सनद काढून मी राहत्या घरी

ऑफिस थाटलें. त्यावेळीं आम्ही सदाशिव पेठेंत गायआळींत राहात होतों. १९०८ पासून १९३२ सालपर्यंत चोवीस वर्षें आम्ही त्या घरांत राहिलों आणि तात्यांचा सारा भाग्योदय त्याच घरांत झाला. तात्यांच्या चार तपांच्या सार्वजनिक आयुष्यांत पहिल्या बारा वर्षांत त्यांना सत्तेचे घर नव्हतें. शेवटच्या बारा वर्षांत सार्वजनिक आयुष्यांतून ते निवृत्त झाले होतें; आणि डेक्कन जिमखान्यावरील घरांत राहात होते. पण मधलीं दोन तपें त्यांचें वास्तव्य या गायआळींतील घरांत होतें. त्यांची कीर्ति साऱ्या हिंदुस्थानभर गाजली असें तें यशस्वी घर होसें. हिंदुस्थानांतला असा एकहि मोठा मनुष्य नसेल कीं, तो त्या घरांत येऊन गेला नाही. शेकडों पाहुण्यांची ये जा, आणि नित्य भेटावयाला येणारांची गर्दी आणि शेंकडो सत्कार समारंभ घडावे असें त्या वास्तूला वरदान होतें. पाहुण्यांचा सगळा व्याप ताईला संभाळावा लागत असे पण तें सर्व ती आनंदाने करीत असे. तात्यांची आई १९२६ पर्यंत त्या घरांत होती आणि तात्यांचा उत्कर्ष तिने डोळ्यांनी पाहिला. आपणाला आजवर जी कौटुंबिक स्थिति लाभली व आपला उत्कर्ष झाला त्याचें श्रेय ताईच्या पायगुणाकडे आहे असें तात्यांनीं आत्मचरित्रांत म्हटले आहे, ते अगदी खरें आहे. या सत्तेच्या घरांत वावरतांना तात्यांच्या चेहेऱ्यावर कांही एक तेज आणि उमदेपणाची झांक दिसत असे. त्यांची देहयष्टि सडपातळ आणि अंगकांति नागासारखी सतेज होती. स्वभावहि तसाच करारी व स्वाभिमानी. आपण होऊन कोणाच्या वाटेला न जाणारा, पण कोणी डिवचलें किंवा अपकार करण्याची बुद्धि धरली तर त्याची शंभर वर्षे भरलीच समजावें ! त्यांचा शब्द तरवारीच्या धारेसारखा खणखणीत असे. गरीब, पापभीरू माणसांना त्यांच्यासारखा उपकारकर्ता नव्हता, पण त्यांच्याशी कपट किंवा प्रतारणा कोणी केली, अगर तसें दिसलें तर त्यांचा स्वर एकदम चढत असे. मग त्यांचेपुढे उभे राहण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती !

तात्यांनी लोकसंग्रह केला तसा फारच थोड्या पुढाऱ्यांत पाहावयास सांपडेल. संस्थानिकांपासून तों निष्कांचन मनुष्यापर्यंत शेंकडो माणसें त्यांचीं ऋणानुबंधी होतीं. आणि कित्येक तर अशीं होतीं कीं त्यांचे कसलेंहि लहान मोठें काम करण्यांत तीं आनंद मानीत असत. अशीं माणसें तात्यांचे भोंवती सर्वत्र असल्यामुळे त्यांना कधीं 'शरीररक्षक' बाळगावा लागला नाही. ते निर्भयपणाने कोंठेहि जात असत. त्यांचे हितचिंतक येऊन प्रतिस्पर्ध्यांची बोलणी आणि हालचाली कानावर घालीत. कित्येकदां पक्षांतील मंडळी जमली म्हणजे राजकीय चर्चा होत असे, आणि त्यावेळच्यीं संभाषणें कोट्या आणि विनोद इतका मार्मिक असे की सामान्य मनुष्यालाहि बहुश्रुतता व ज्ञान प्राप्त व्हावे. तीं संभाषणें सर्वच्या सर्व आज आठवत नाहींत. पण अशी महत्वाची दहापांच संभाषणें जरी मी त्यावेळीं लिहून ठेवलीं असतीं तरी आज तीं अतिशय मनोरंजक वाटलीं असतीं.

जेवतांना तात्या सहसा कधीहि रागावत नसत. हंसत खेळत आणि गप्पागोष्टी

करीत जेवणाचा कार्यक्रम चाले. संभाषणाच्या ओघांत सार्वजनिक आयुष्यांतील गमतीदार हकिकती ते सांगत. राजकारणांत महाराष्ट्राबद्दल परप्रांतीय लोकांचा पूर्वग्रह किंवा अढी होती. मोतिलाल नेहरूहि त्याला अपवाद कसे नव्हते याबद्दल एक गोष्ट तात्यांनी सांगितली ती अशी. १९२७ सालीं महाराष्ट्रांत शिवजन्माबद्दल त्रिशतसंवत्सरिक उत्सव झाला, त्यावेळीं अखिल भारतीय पुढाऱ्यांनी एक पत्रक काढून शिवाजीच्या थोरपणाला मान्यता द्यावी असें इकडे कांही लोकांचे मनांत आलें, आणि तसें पत्रक तयार करून त्यावर असेंब्लींतील पुढाऱ्यांच्या सह्या घेण्याचें काम तात्यांचेवर सोंपविण्यांत आलें. दिसतांना ही गोष्ट साधी वाटते पण तितकी सोपी नव्हती. लाला लजपतराय, हरबिलास सारदा, मदन मोहन मालवीय यांनीं त्या पत्रकावर बिनतक्रार सही केली. पण नेहरू वगैरे इतरांबद्दल थोडी शंका होती ! याकरितां पत्रक लिहितांनाच तात्यांनी असें योजलें की, इतर प्रांतांतल्या श्रेष्ठ विभूतींचीं नावें मुद्दाम पत्रकांत वर घालावी व शेवटीं शिवाजीचें नांव घालावें ! उदाहरणार्थ, " जसा मेवाडचा राणा प्रताप सिंह, पंजाबचा गुरु गोविंद किंवा रणजितसिंह, गुजराथचा अनहिल, तसें दर प्रांतानें आपआपल्या विभूतीचें नांव घालून, 'तसा महाराष्ट्राचा शिवाजी' असें पुढें लिहण्यास हरकत नाही " असें त्यांनीं सोबतच्या पत्रांत सुचविलें होतें. शेवटी गंमत व्हायची ती झालीच. कित्येक पुढाऱ्यांना आठवण करकरून आपल्या प्रांतांतलें नांव आठवेना. कारण मद्रास, बंगाल, बिहार, अलाहाबाद हे कांही प्रांत असे आहेत की, शेंकडों वर्षांत इतिहासांत नांव घेण्यासारखी वीर विभूति त्यांच्या प्रांतांत झालीच नाहीं ! याला कोणी काय करावे ? मोतिलाल नेहरू यांच्या ही गोष्ट लक्षांत आली ! पण तक्रार न करतां निमूटपणाने त्यांनी व इतरांनीहि पत्रकावर सह्या केल्या ! ही तीस वर्षांपूर्वीची गोष्ट. आजहि शिवाजीला अखिल-भारतीय-विभूति म्हणण्याला परप्रांतीय लोक किती खळखळ करतात, तो नुकताच घडलेला इतिहास सर्वांना माहीत आहेच ! अशा आणखी कित्येक गमतीदार हकिगती आहेत. पण त्या पुढें सांगेन.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२१५ वि: चारेग
क्रमांक ११४९ नों: दि: ९।४।६४

# २

# वकीली धंद्यांतील अनुभव

गेल्या प्रकरणांत वाचकांना अभिवचन दिल्याप्रमाणें माझ्या आयुष्यांतील आठवणींचा पुढचा हप्ता मी वाचकांपुढे ठेवीत आहें. या आठवणी सांगतांना मनाला संकोच उत्पन्न होतो आणि त्यापेक्षा दुसरें अवघड काम कोणतेंहि नसेल असेंहि वाटतें! या आठवणींत न सांगण्यासारखें कांही आहे म्हणून मनाला संकोच वाटतो असे नाही. तसें मी कांही लिहिणारहि नाही; पण मनांत असें येते की, या आठवणी सांगण्याचा उपयोग काय? माझ्या स्वतःच्या आयुष्याला त्याचा उपयोग आहे काय? नाही. दुसऱ्याच्या आयुष्याला त्याचा काही उपयोग होण्यासारखा आहे काय? त्याचीहि खात्री नाहीं. मग या आठवणी लिहिण्याचा उपयोग काय? आयुष्य हें नाटक आहे. एकेक अंकानें तें उलगडत असतें. चौथा अंक संपला की पांचव्याला सुरवात होते. पण चौथा अंक कितीहि हृदयंगम असला तरी तोच पुनः करून दाखवीत नाहीत! तसें कोणीं केलें तर त्यासारखा अप्रयोजकपणा दुसरा नाही असें तुम्हीं म्हणाल! माझ्या

आयुष्याचा पांचवाच काय, सहावा अंकहि संपला. सातव्या अंकाचेहि पहिले एक दोन प्रवेश संपले. आता हें 'रामराज्यवियोग' नाटक लवकरच समाप्त होणार आहे. याकरितां या जुन्या गोष्टी सांगणें म्हणजे मनाला थोडा शीण वाटतो. पण वाचकांना जो शब्द आपण दिला त्याचें काय ? अर्थात, तो शब्द पुरा केला पाहिजे. याकरितांच आणखी कांही आठवणी सांगत आहें.

वकिलीची परीक्षा पास झाल्यावर हव्या त्या सार्वजनिक कामांत पडण्याला मी मोकळा झालों. मनुष्याने सार्वजनिक कामांत पडण्यापूर्वी त्याने आपला विद्याभ्यास पुरा करून स्वावलंबी होण्याकरितां चरितार्थाचें साधन हातीं आणलें पाहिजे, असें ती. तात्यांचें प्रत्येक तरुणाला निक्षून सांगणें असें व तें सर्वस्वी खरें होतें. ज्याला स्वतःचा चरितार्थहि चालवितां येत नाही तो मनुष्य सार्वजनिक कामांत पडण्यास अपात्र आहे. विद्याभ्यास पुरा करून कोणतीहि पदवी तुम्ही मिळवा. मग नंतर सार्वजनिक काम तुम्ही कराल तितकें थोडें आहे, असें ते सांगत असत. असा बहुमोल पण खरा उपदेश त्यांचेशिवाय करणारा त्या वेळीं दुसरा कोणीहि पुढारी नव्हता. विद्यार्थ्यांचा भावनावश स्वभाव लक्षांत घेऊन, 'देशाकरितां स्वार्थत्याग करा' असा उपदेश करणारे बेजबाबदार पुढारी त्या वेळीं हवे तितके होते. तात्यांचा हा उपदेश मनांत पक्का ठसलेला असल्यामुळें माझे आयुष्य मी फुकट घालविलें नाही. इतकेंच काय, पण रामायणावर एक पुस्तक लिहिण्याइतकें माझें वाचन झालेलें असतांहि ती गोष्ट वकिलीच्या परिक्षेचे आड येणार असें दिसतांच, ग्रंथालयांतून आणलेले सर्व संदर्भ-ग्रंथ परत करून तो विषय मीं दृष्टिआड केला. पण आतां परीक्षा संपल्यावर केसरींत हवें तितकें लिहिण्याला व इतर सार्वजनिक काम करण्याला मी मोकळा झालों. पदवीच्या शिक्क्याचें पाठबळ असल्यामुळे माझ्या लिहिण्याला साहजिकच किंमत आली होती !

आयुष्यांत मनुष्य कोणत्या वयांत सुंदर दिसतो ? असें जर विचारलें तर मला वाटतें की, ज्या वेळीं मनुष्य स्वावलंबी होऊन ईर्षेने आयुष्याला सुरवात करतो त्या वेळीं त्याचें रूप पाहण्यासारखे असेल. महत्त्वाकांक्षेसारखें या जगांत दुसरें काय आहे ? आणि उदयरागाप्रमाणें ज्या वेळीं तरुणांच्या चेहऱ्यावर ती महत्त्वाकांक्षा दिसते त्या वेळीं त्यांचें रूप पाहण्यासारखेंच नसेल काय ? हे विचार आज माझ्या मनांत येतात. पण ज्यावेळीं मी कोर्टांत जाण्याकरितां पगडी व उपरणें घालून आरशांत माझे रूप पाहिलें तेव्हा मला थोडें संकोचल्यासारखें झालें. कारण पगडी घालून रस्त्यांतून जाण्याला तशी विद्वत्ताहि अंगांत पाहिजे ! तथापि, पगडी घालून कोर्टांत जाणें हाच सर्व वकिलांचा त्या-वेळीं पोषाख असल्यामुळे मला संकोच वाटण्याचें कारण नव्हतें. मी 'वकील' नव्हतों थोडाच ? तथापि, फक्त कोर्टांत जाण्यापुरताच कांही दिवस मी पगडीचा वापर केला. इतरत्र केला नाही.

१९२७ सालीं पुण्यास श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे अध्यक्षतेखालीं साहित्य-

संमेलन भरलें होतें. त्यांत मी अश्लीलतेच्या ठरावावर भाषण केलें. हें माझें ( Maiden Speech ) पहिलें भाषण म्हणावयाचें. ‘ अश्लीलता ’ कशाला म्हणावयाचें याबद्दल त्यावेळीं विद्वान लोकांतच फार वाद माजला होता. आणि अश्लीलतेची अगदी कांटेकोर शब्दांत व्याख्या करणें ही गोष्टहि तितकीच अवघड होती. विलायतेंत ज्यूरींतील बारा माणसें ज्याला राजद्रोह म्हणतील तो ‘ राजद्रोह ’ हें जसें कायद्यांत गमक मानलें आहे त्याप्रमाणे, समाजांत बारा समजूतदार प्रौढ माणसें ज्याला अश्लील समजतील तें वाङ्मय अश्लील समजण्याला हरकत नाही असा माझ्या भाषणांत मीं मुद्दा मांडला होता. माझें भाषण मीं पांचसात मिनिटेंच केलें. पण धीटपणानें बोललों, कचरलों नाहीं. कारण किर्लोस्कर थिएटरमधील हें संमेलन म्हणजे एक नामांकित विद्वत्–परिषदच होती. तात्यासाहेब केळकर स्वागताध्यक्ष, श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर अध्यक्ष; नुसत्या महाराष्ट्रांतीलच नव्हे तर बडोदे, ग्वाल्हेर, इंदूर इत्यादि दूर ठिकाणांहून अनेक विद्वद्रत्नें या संमेलनाला हजर होतीं. कवि माधवराव पटवर्धन, गिरीश, यशवंत, कवि मायदेव, प्र. के. अत्रे इत्यादिकांचें कवितागायन गाजलें. आणि सर्व संमेलन इतक्या यशस्वी रीतीने पार पडलें की, साहित्य संमेलनाच्या इतिहासात इतकी उत्तम संमेलनें झालेलीं दोनचार उदाहरणेंहि आढळणार नाहींत. अच्युतराव कोल्हटकर यांनी “ हे तात्या व ते तात्या ” असा उत्कृष्ट अग्रलेख त्या वेळीं वर्तमानपत्रांत लिहिला होता. या संमेलनांत इंदूरचे सरदार माधवराव किबे व त्यांच्या पत्नी श्री. सौ. कमलाबाई किबे यांचींहि भाषणें झालीं, त्याला अनुलक्षून तात्यांनी समारोपाच्या भाषणांत विनोदी कोटी केली होती. “ श्री. माधवराव किबे यानीं या संमेलनांत येऊन भाषण केलें तें चांगलेंच होतें; पण त्यापेक्षा वहिनीसाहेबांनी जें भाषण केलें तें ‘ कांकणभर ’ अधिक सरस म्हटलें पाहिजे ! ” यातील ‘ कांकणभर सरस ’ या कोटींतील नाजूक विनोद पुष्कळ दिवस अनेकांचे स्मरणांत राहिला.

त्याच सालच्या गणेश–उत्सवांत व्याख्यान देण्याची संधि तात्यांनीच मला आणून दिली. त्यांनी जेवतांना युक्तीने हा विषय काढला. मी, अण्णा, विठ्ठल, भाऊ वगैरे मुलें त्यांचेबरोबरच जेवत असतां प्रथम मोघमपणानेच त्यांनी विचारलें कीं, “ आज एक काम आहे. त्याकरिता तुमच्यापैकी कुणींतरी स्वयंसेवक हवा आहे. ” भाऊने विचारलें की, “ कोणतें काम आहे ? ” तेव्हा ते म्हणाले, “ आज गणपत्युत्सवांत माझेऐवजीं व्याख्यान द्यावयाचें ! ” मग त्यांनी प्रत्येकाचा अदमास पाहण्याकरिता प्रथम भाऊला, मग विठ्ठल, मग अण्णा यांपैकीं प्रत्येकाला विचारलें. तेव्हा त्या सर्वांनी ‘ तें आपणाला जमणार नाही ’ म्हणून नकार दिला. त्यांनी मुद्दामच मला शेवटीं विचारलें. तेव्हा मी होकार दिला. आणि सर्व दिवसभर व्याख्यानाची तयारी करून ‘ मनुस्मृति व समता ’ या विषयावर शनवारांतील नातूंचे गणपतीसमोर भाषण केलें. मी सुमारें तासभर बसलों असेन. व्याख्यान चांगलें रंगलें होतें. या व्याख्यानाला

न. वि. गाडगीळ तात्यांचे शेजारींच बसून ऐकत होते व मधून मधून विनोद करीत होते. मनुस्मृति जाळून जातिभेद हा ब्राह्मणांनीच उत्पन्न केला, अशी डॉ. आंबेडकर यांनी मोहीम आरंभली होती. त्यावर मी व्याख्यानांत साधार टीका केली होती. “ जातिभेद केवळ ब्राह्मणांनीच निर्माण केला याला ऐतिहासिक पुरावा काय ? हजारों वर्षांच्या सामाजिक स्थित्यंतरांत तो होत होत आला. आज तुम्हांला तो नाहींसा करतां येत असेल किंवा शिथिल करावयाचा असेल तर जरूर करा. पण तें कांहीहि न करितां केवळ ब्राह्मणांना शिव्या देणें हा अन्याय आहे. यांत सामाजिक हित कोणतें साधणार ? ” वगैरे युक्तिवाद मीं केला. माझ्या भाषणानंतर ती. तात्यांनीहि अर्धा तास भाषण केलें. “ जातिभेद राष्ट्रीयत्वाचे आड आला असा इतिहासांत दाखला नाही. शंभर वर्षांपूर्वी ज्या मराठ्यांनी रणांगणांत आपलें रक्त सांडलें त्यांनी आपण ‘ ब्राह्मण ’ किंवा ‘ मराठे ’ असा जातिभेद मनांत आणला होता काय ? ” असा प्रश्न विरोधकांना त्यानी विचारला. या वेळेला ब्राह्मणेतर व सत्यशोधक यांची चळवळ जोरांत सुरू होती आणि ब्राह्मणांविरुद्ध सुष्टदुष्ट हवा तितका प्रचार सुरू होता. त्यांतून देवदेवतांची निंदा किंवा धर्मग्रंथहि सुटले नव्हते. याच निमित्ताने मीहि मनुस्मृतीचा अभ्यास करीत होतों; तो माझा अभ्यास या व्याख्यानाकरिता आयताच उपयोगी पडला. पुढे मी “ नव्या स्मृतीची आवश्यकता ” हें पुस्तक लिहिलें त्याचा हें व्याख्यान म्हणजे उगम होय.

तात्पर्य, सार्वजनिक रीतीनें व्याख्यानें देण्याला व लिहिण्याला या वेळेपासून माझी सुरवात झाली. १९२८ साली मी वसंत-व्याख्यान मालेचा सेक्रेटरी झालों. त्यांतहि मनांत असा संकेत व ईर्षा होती कीं, कार्यक्रमांपैकीं जर एखादा व्याख्याता ऐनवेळी येऊं शकला नाहीं तर त्याचे ऐवजीं स्वतः उभे राहून व्याख्यान देण्याची आपली तयारी हवी. तसें त्यावर्षी घडलेंहि. आणि दुसऱ्याकरिता व्याख्यान देऊन मालेंतील तो दिवस मला साजरा करावा लागला ! अंगावर पडलें म्हणजे सर्व येतें. व्याख्यान देणें म्हणजे कांहीं अवघड, अशक्य गोष्ट नाहीं. तोंडानें सांगून लेख लिहविणें आणि व्याख्यान देणें दोन्ही सारखेंच आहे. मनाशीं विषयाचें अवधान आणि बोलण्यांत तारतम्य ठेवलें म्हणजे सामान्य व्याख्यानाचा कार्यक्रम कोठेंहि पार पाडता येतो. हें लक्षांत आल्यावर लेख ‘डिक्टेट’ करून लिहिण्याचा मी सराव करूं लागलों. प्रथम वकिलींत काम फारसें नसेच; आणि हाताशीं कारकून होता तोहि माझ्याप्रमाणेंच बेकार होता. त्यालाच हाताशीं घेऊन ‘केसरीं’तील लेख त्याला भराभर तोंडानें सांगत असें. याच वेळेला ‘चिपळूणकर आणि मंडळी’ नें ‘रामायणाचा उपसंहार’ हें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. माझा या विषयाचा अभ्यास असल्यामुळें या पुस्तकावर ‘केसरी’चे दहा कॉलम होईल एवढा मोठा परीक्षणात्मक लेख मीं लिहिला. माझ्या अनेक उत्तम लेखांपैकीं हा लेख असून अथपासून इतिपर्यंत एकाच बैठकींत हा सर्व लेख मी तोंडानें

डिक्टेट करून लिहविला होता. हा लेख भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांना मीं वाचून दाखविला व त्यांनींहि तो चांगला असल्याबद्दल मत दिलें. रामायणावर स्वतंत्र पुस्तक लिहिण्याला मला वेळ नव्हता. पण वेळोवेळीं अभ्यास करुन मीं अनेक लेख लिहिले होते. सुदैवानें एक प्रकाशक मिळाल्यामुळें हे सर्व लेख मीं एकत्र केले आणि 'रामायणावरील कांही विचार' हें शंभर पानांचें पुस्तक प्रसिद्ध केलें. हें माझें पहिलें पुस्तक. तें शंभर पानांचें म्हणजे लहानसेंच असलें तरी, शंभर पानांइतका विस्तृत विचार आपण आपल्या बुद्धींत सामावूं शकतों याचा आत्मप्रत्यय आला. आणि प्रारंभीं भीत भीत का होईना, पण ग्रंथकर्त्यांच्या प्रांगणांत मीं पाऊल घातलें.

वकिलीचा धंदा असा मी पांचसहा वर्षेंच केला. म्हणून माझा अनुभव येथे थोडक्यांत सांगतों. मी तात्यांचे पांचशें रुपये सनदेंत घालविले. स्वतःचे सुमारें पांचशें रुपये कायद्याचीं पुस्तकें विकत घेण्यांत घालविले. पण सगळ्या वकिलींत हे हजार रुपये मीं मिळविले असतील कीं नाहीं याची खात्री देतां येत नाहीं. कायद्याचें ज्ञान आणि वकिली धंदा या दोहोंबद्दल मला अतिशय आदर आहे. मनुष्याचा व्यवहारांत ठिकठिकाणीं कायद्याशीं संबंध येतो, मग तें ज्ञान आपणाला कां नसावें ? म्हणूनच मीं वकीलीची परीक्षा दिली. पण नुसता कायदा माहीत होणें ही फार थोडी बाब आहे. ज्याला स्वार्थ कसा साधावा हें कळत नाहीं, किंवा ज्याच्या स्वभावांतच वकिलाचा गुण नाहीं तो या धंद्यांत यशस्वी होणें दुरापास्त आहे असें मला आढळून आलें. वकिलीचा धंदा यशस्वी होण्याला धिमेपणा, चिकाटी, हवें तें करण्याचा बेडरपणा, किंवा सर्व करूनहि न केल्याचा देखावा करण्याचा कोडगेपणा लागतो. तोंडावर शिव्या दिल्या असतांहि ज्याच्या चेहेऱ्यावर एखाद्या रेषेची हालचाल होत नाहीं असे वकील मीं पाहिले आहेत. ही निंदा नव्हे, हाहि एक गुण आहे ! भावनावश होणें हें वकिलींत वैगुण्य मानलें आहे. ज्याचें अंतःकरण कातळासारखें थंड, बैठक घोरपडीसारखी मजबूत आणि नजर घारीसारखी तीक्ष्ण किंवा चंचल, ते अगदीं शंभर टक्के वकील समजावयाला हरकत नाहीं. असे वकील कांहीं पैशापासरी मिळत नाहींत. पण वकिलीचे स्वभावसिद्ध गुण असून उद्योगीपणा असेल त्याचें तेज पडल्याशिवाय राहत नाहीं. असें उदाहरण एक दादासाहेब करंदीकर व दुसरें ल. रा. गोखले यांचें पाहिलें. इतरहि पाहिलीं पण तीं सगळीं येथें सांगत नाहीं.

वकिलीच्या धंद्यांत कसब कशांत आहे तें सांगून समजणार नाहीं. तें फक्त पाहून समजेल. बुद्धिबळाचा डाव अडला म्हणजे तो कां अडला हें इतरांना कळत नाहीं. त्यांना वाटतें हे उगाच कशाकरितां घुमत बसले आहेत ? किंवा कुस्तींत एक गडी खालीं येऊन दुसऱ्याची दमछाक करूं लागल्यावर, पुढला डाव कसा होणार किंवा कुस्ती कशी संपणार हें तिऱ्हाइताचे लक्षांत येत नाहीं. पण त्या डावांत कंटाळून कोणाची केव्हां चूक होईल, आणि दुसरा त्याचा नेमका फायदा कसा घेईल हें सांगतां

येण्यासारखें नसतें. वकीलींत हेंच घडतें. आणि दुसऱ्याच्या चुकीचा नेमका फायदा घेऊन डाव उलटवितां आला कीं साऱ्या श्रमांचें सार्थक झाल्याचा आनंद होतो. माझ्या कोणत्याहि दाव्यांत असलें कसब दाखविण्याची संधि मला मिळाली नाहीं. पण उलट-तपासणीच्या अशा पुष्कळ केसेस मीं लक्षपूर्वक पाहिल्या आणि अशा विषयाचीं पुस्तकेंहि निरनिराळ्या खटल्यासंबंधीं मीं पुष्कळ वाचलीं. लाहोरच्या क्रांतिकारक खटल्यांतील भगतसिंग आणि राजगुरु यांचे साथीदार सांवरगांवकर यांचें अपील डिस्ट्रिक्ट कोर्टांत मीं चांगलें चालविलें. त्याबद्दल बारमध्यें माझी प्रशंसा झाली. दुसरा एक बेअब्रूचा दिवाणी दावा ' संग्राम ' पत्राविरुद्ध होता. तो जिंकल्यावर आण्णासाहेब भोपटकरांना आपल्या अशिलातर्फे माझ्या अशिलाला माफी लिहून द्यावी लागली. अशींच इतर किरकोळ कामें पुष्कळ केली. पण त्याबद्दल न सांगतां फक्त सांवरगांवकर यांची हकिगत सांगतों. कारण या खटल्याला राजकीय अंग होतें आणि या अशिलाची केस लोकनायक बापूजी अणे यांनीं माझेकडे पाठविली होती.

श्रीराम सांवरगांवकर हा मुलगा लाहोर कटाचे खटल्यांतील राजगुरु याचा मित्र असून दोघेहि टिळकरोडवर एका खोलींत राहात असत. राजगुरु यानें सॉंडर्स याचा खून केल्यावर सांवरगांवकर यालाहि पकडण्यांत आलें. त्याच्या खोलींत ट्रंकेंत एक पिस्तुल आणि ' सांवरगांवकर ' असें वर नांव असलेलें मोकळें पाकीट सांपडलें. त्यांत पत्र नव्हतें. आरोपीला पकडून नेलें तेव्हां ' साम्राज्यशाहीचा धिक्कार असो ' वगैरे आरोळ्या आरोपी मारीत होता. आरोपीला लाहोर येथें नेले तेव्हां लाहोर कटाशीं आरोपीचा कोणताहि संबंध शाबीत झाला नाहीं. यामुळें कोर्टानें त्याला निर्दोषी म्हणून सोडून दिलें. एवढ्यावरूनच पोलीस चिडले व त्यांनीं १०९ कलमाखालीं जामीन व जातमुचलका अशी एकोणीस हजारांची रक्कम त्याजपाशीं मागितली. एवढा जबर जामीन भरणेंहि शक्य नसल्यामुळें आरोपीनें तीन महिने सक्तमजुरी भोगलीहि. त्याला सोडविण्याकरितां हें अपील होतें.

राजकीय कटाच्या खटल्यांत आरोपीना एक गुरुमंत्र मिळालेला असतो. तो हा कीं कांहींहि बोलावयाचें नाहीं! तोंडाला अगदीं कुलूप घालावयाचें. सामान्यतः हें मत बरोबर आहे. कारण आरोप शाबीत करण्याची सर्व जबाबदारी सरकारी पक्षावरच असते. पण पुष्कळदां आरोपीच्या अज्ञानाचा फायदा सरकारच घेतें. आणि कोणतेंहि कलम लावून त्याला अटकेंत डांबून ठेवतें. १०९ कलमाचा सरकारनें यावेळीं असाच दुरुपयोग केला होता. आरोपी द्याल ती शिक्षा भोगण्याला कबूल होता आणि कोणताहि डिफेन्स देण्याचें त्याचे मनांत नव्हतें. अखेर येरवड्याचे तुरुंगांत जाऊन मी त्याची भेट घेतली. मुख्य दरवाजावर असलेल्या खोलींत युरोपियन जेलरच्या समक्षच आमचें बोलणें झालें. " तुमच्या राजकीय भावना मी जाणतों. पण तुम्ही बेकायदा तुरुंगांत कां बसतां ? अन्याय वेशीवर कां टांगीत नाहीं ? तुमच्या राजकीय मताना

कोणताहि धक्का न लावतां मी तुमचा डिफेन्स देतो की नाहीं तें पाहा " अशी त्याची खातरजमा केल्यानंतरच त्यानें वकीलपत्रावर सही केली व ती देखील असें जाणून कीं, हा राजकीय खटला असल्यामुळें त्यांत यश येईलच ही आशा आपण ठेवूं नये !

मग रीतीप्रमाणें अपील सुनावणीस निघालें. तेव्हां ठिकठिकाणी मुंबई, अलाहाबाद, लाहोर इत्यादि हायकोर्टांच्या निकालांचे आधार दाखवून त्या दिवशीं मीं अगदीं सडेतोडपणानें भाषण केलें. कोणतीहि भीडभाड ठेवली नाहीं. प्रीव्हि कौन्सिलचे जस्टिस महमूद यांनीं म्हटलें आहे कीं, " स्वातंत्र्य भोगणारापेक्षां दुसऱ्याचें स्वातंत्र्य हिरावून घेणारावरच ' कारण ' दाखविण्याची जबाबदारी आहे. Show Cause अशा अर्थाची नोटीस काढून वाटेल त्या मनुष्याच्या स्वातंत्र्यावर घाला घालतां येत नाहीं ! संशयाचा फायदा आरोपीला मिळाला पाहिजे. फिर्यादीपक्षानें आपलें म्हणणें अगदीं निःसंदिग्ध संशयातीत रीतीनें शाबीत केलें पाहिजे. दोहों बाजूंचा पुरावा सारख्याच वजनाचा वाटला तरीहि आरोपीची मुक्तता केली पाहिजे. जामीनकीच्या नांवाखाली आरोपीविरुद्ध द्वेष आणि सूड उगविण्याची पोलिसांना संधि मिळणें हें गैर आहे " असे जस्टिस रॉय यानीं म्हटलें आहे. आरोपीच्या घरीं कम्युनिस्ट वाङ्मय सांपडले आणि क्रांतीचा विजय असो अशा आरोळ्या आरोपी मारीत असेल. पण हीं मतें आहेत. केवळ मतें आणि हेतु यांना पीनल कोडांत शिक्षा नाहीं ! Long Live The King किंवा ' साम्राज्यशाहीचा विजय असो ' हें तरी केवळ मत किंवा डॉग्मा नव्हे काय ? मताला मताइतकीच किंमत, त्याहून अधिक नाहीं ! आरोपीची वागणूक कांहीहि असली तरी १०९ कलमाखालीं त्याचेवर कोणताहि गुन्हा शाबीत होत नाहीं. आरोपीनें तुमच्या मतें ' कांहींतरी ' केलें; पण कायद्यांत कांटेकोरपणें वागणारे तुम्ही असें ' कांहीतरी ' करून कसें चालेल ? राजगुरूवर अजून गुन्हा शाबीत व्हावयाचा आहे; झालेला नाहीं हें विसरू नका ! ' असें भाषण मी सुमारें तासभर केलें. अपिलाचा निकाल माझ्याविरुद्ध लागणार हें मला माहीत होतें. मग माझीं स्वतःची व आरोपीची मतें खणखणीतपणें कां न बोला ? असें मी ठरविलें. आरोपी सांवरगांवकर यांनीं माझ्या भाषणाबद्दल संतुष्ट होऊन मला धन्यवाद दिले. त्यानें मला जितकें बरें वाटलें तितकें इतरांच्या स्तुतीनें वाटलें नसतें !

याचा अर्थच असा कीं, राजकीय खटल्यांत वकिलानें डिफेन्स देताना आरोपीचें चारित्र्य म्हणजे त्याची राजकीय मतें लक्षांत घेणें ही फार महत्त्वाची बाब आहे. इतर वैयक्तिक खुनाच्या खटल्यांत तुम्ही हवा तो डिफेन्स देऊ शकाल. त्यांत कल्पकतेला वाव आहे. पण राजकीय खटल्यांत आरोपीचीं मतें व भावना म्हणजे त्याची अब्रू आहे ! ती नाहींशीं करून टाकतां येत नाही. तसें करणें म्हणजे त्याच्या सर्वस्वावर घाला घालण्यासारखे आहे ! केवळ खटला जिंकणें एवढ्यालाच महत्त्व नाहीं. आणि कांहींतरी करून तो नेहेमीं जिंकतां येतो असेंहि नाहीं ! या बाबतींत हॉटसन–

गोगटे केसचें प्रसिद्ध उदाहरण देण्यासारखें आहे. कारण ही केस पाहण्याला कोर्टांत अथपासून इतिपर्यंत मी हजर होतों.

१९३० सालीं साऱ्या हिंदुस्थानांत गांधींची कायदेभंगाची मोहीम, सोलापूरचा मार्शल लॉ, भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांचें बलिदान इत्यादि गोष्टी गाजत होत्या. सोलापूरच्या मार्शल लॉ प्रकरणांत लोकांचा छळ झालाच; पण सर्वथैव निरपराधी असलेले सोलापूरचे चार प्रतिष्ठित नागरिक म्हणजे मल्लाप्पा धनशेटी, चांदकिरण सारडा कुरबान हुसेन व शिंदे यांना सरकारनें जेव्हां येरवड्याचे तुरुंगांत फाशीं दिले तेव्हां हजारो लोकांच्या मनाची मोठी तळमळ झाली. या सर्व गोष्टींना त्यावेळचे गव्हर्नर हॉटसन हेच जबाबदार आहेत असें वा. ब. गोगटे या फर्ग्युसन कॉलेजांतील तरुणाचे मनानें घेतलें. बुधवार ता. २२ जुलै १९३१ रोजीं हॉटसन साहेब फर्ग्युसन कॉलेज पहावयास येण्याचा योग आला. हॉटसन हे बहुधा वाडिया लायब्ररींत येतील अशा अंदाजाने गोगटे हे दोन्ही खिशांत दोन पिस्तुलें घेऊन तेथें वाचीत बसले होते. अंदाजाप्रमाणें हॉटसन साहेब, त्याचा बॉडीगार्ड पेट्रो, प्रि. महाजनी वगैरे मंडळी लायब्ररींत आली व सर्वांची नजर क्षणभर भिंतीवरील चित्रें पाहण्यांत गुंतली असतांना अवघ्या चार हातांवरून गोगटे यांनीं हॉटसनवर गोळी झाडली ! अकस्मात् हा प्रकार झाल्यामुळें कोणी गोळी झाडली हें प्रथम कोणाच्या लक्षांत आलें नाहीं. पण दुसरी गोळी झाडण्याच्या सुमारास हॉटसन यांनींच गोगटे यांना लोटून देऊन खाली पाडलें व ते त्याच्या छातींवर बसले. इतक्यांत पेट्रोहि धावत येऊन त्यानें आपल्या तरवारीचें टोंक गोगटे यांच्या गळ्यावर रोखून धरलें. हातांतले आणि खिशांतलें पिस्तुल काढून घेतलें, आणि त्यांना गिरफदार करण्यांत आलें. गोगटे यांना या कृत्यांत कोणीहि साथीदार नव्हता व हा प्रकार होतांच लायब्ररींतील सर्व मुलें भराभर खालीं निघून गेली !

प्रत्यक्ष हातांत पिस्तुल असतांना गोगटे हे पकडले गेले असल्यामुळें या प्रकरणांत सरळ कबुली जबाबाशिवाय कसलाहि इतर बचाव शक्य नाहीं हें कोणालाहि कळण्यासारखें होतें. प्राथमिक चौकशीत आपण गव्हर्नरवर गोळ्या झाडल्याचें गोगटे यानीं कबूल केलें. पण सेशन कोर्टांत त्यांनीं जी जबानी दिली ती पूर्वीच्या अगदी उलट आणि कोणालाहि आश्चर्यकित करण्यासारखी होती ! त्यानें या खटल्याचें सारें स्वारस्य नाहींसें झालें. फिर्यादी पक्षाचा सर्व साक्षीपुरावा संपल्यानंतर कोर्टानें गोगटे यांना पुढील प्रश्न विचारले :—

" हीं पिस्तुलें तुमचीं आहेत काय ? "

" नाहींत. "

" हीं दोन पिस्तुलें तुमच्याजवळ सांपडलीं काय ? "

" होय. पण तीं माझीं नाहींत. एक माझ्या मित्राचे हातून मीं हिसकावून घेतलें. एक पिस्तुल त्याच्या खिशांतून काढून घेतलें. "

" तूं गव्हर्नरवर गोळ्या झाडल्यास काय ? "

" नाहीं "

" गव्हर्नर साहेबांचा फोटो झडतींत तुझ्याजवळ सांपडला ना ? "

" होय. पण तो माझा नव्हे. मित्राजवळून मी हिसकावून घेतला. "

" त्या मित्राचें नांव काय ? "

" सांगू इच्छित नाही. "

" तुम्ही गुन्हा केला आहे काय ? "

" मी गुन्हा केला नाहीं. एका मित्राचे हातून हीं पिस्तुलें मीं घेतलीं व त्याच्यावरील संकट टळावें म्हणून आपलेवर ओढवून घेतलें ! "

या जबाबांत कसलेहि धैर्य नाही, किंवा खरेपणा नाहीं; आणि त्याचा कोणावरहि परिणाम होण्यासारखा नसल्यामुळें, ज्यूरीनें एकमतानें " आरोपी दोषी आहे " असाच निकाल दिला. ॲसेसरांचे प्रमुख फोरमन केसरी ऑफिसांतील भावे होते. आरोपीनें हा जबाब स्वतःच्या बुद्धीनें दिलेला असो किंवा इतर कोणा वकिलानें त्याला पढविल्यामुळें असो, त्याच्या कृत्यावर पाणी पडलें इतके मात्र निश्चित. संध्याकाळीं घरीं आल्यावर आरोपीचा जबाब आणि भोपटकरांचें बचावाचें भाषण यांची हकीगत मी तात्यांना सांगितली. ती ऐकून तेहि नाराज झाले. गोगटे पकडले गेल्यावर कच्च्या कैदेंत असतांना दुसऱ्याच दिवशीं सेनापति बापट यांनीं त्यांना पत्र लिहून कळविलें कीं, " आदल्या दिवशीं तुमची व माझी गांठ पडली त्यावेळीं तुम्ही आपल्या मनांत घोळत असलेला उद्देश मला सांगितला असतात तर या कृत्यापासून मी तुम्हाला परावृत्त केलें असतें. उलट, तुम्ही माझी खात्री पटविली असलीत तर तुमच्याबरोबर मीहि हॉटसनवर गोळी झाडली असती ! हे कृत्य तुम्ही केलें आहे, याविषयीं माझी खात्री आहे. तुमच्या जबाबांत तुम्हीं ही गोष्ट नाकबूल केली आहे. पण उद्यां कोर्टांत जाल तेव्हां ही गोष्ट छातीठोकपणानें कबूल करण्यांतच सच्चेपणा आहे. "

सेनापति बापट यांचें वरील पत्र श्री. वा. ब. गोगटे यांनींच आपल्या आत्मचरित्रांत स्वतः होऊनच प्रसिद्ध केलें आहे. यामुळें अशा प्रश्नावर मत देण्याचे इतरांचे श्रम त्यांनीं वाचविले आहेत इतकेंच मी म्हणतो.

राजकीय प्रकरणाशिवायहि कित्येक दावे कोर्टापुढें असे येत कीं, ते नुसते ऐकत बसणेंहि मनोरंजक असे. खेडेगावांत कोंबड्यांची झुंज पाहाण्याची करमणूक असते. पण कोर्टांत दोन पक्षकारांची झुंज चाललेला प्रकार आम्हांला रोजच पहावयास सांपडत असे. त्यांत कोणाची अब्रू गेली काय, आणि राहिली काय, आम्हांला त्याचें सोयरसुतक कांहींच नव्हतें. कारण हा विचार कोर्टांत पाऊल घालण्यापूर्वी ज्याचा त्यानें करावा ! वकिलाला त्या गोष्टीबद्दल विधिनिषेध बाळगण्याचें काय कारण ? कोर्ट ही चावडी आहे. त्यांत अनेकांच्या हजारो भानगडी चवाठ्यावर येत असतात. त्यांतल्या खऱ्या खोट्याचा

निर्णय अखेर कांहीहि असो, पण त्या पाहून आणि ऐकून कोणाचेंहि मन चतुर व चौकस होईल. कारण वकील लोकांत अनेकजण जो थट्टाविनोद एकमेकांत बोलतांना करीत त्यामुळें मनुष्यस्वभावाचे अनेक नमुने पहावयास सांपडत.

पण ही सगळी गंमत जोपर्यंत पक्षकार होण्याची पाळी तुमच्यावर आली नाहीं तेथपर्यंत ! आणि जेव्हा दुर्दैवानें तशी पाळी येईल त्या वेळेसारखें दुःख नाहीं ! कोर्टाची पायरी कधीं चढूं नये हें शहाणपण प्रारंभी सगळ्यांनाच असतें. पण पुष्कळदा अपरिहार्य प्रसंग येऊन मनुष्याला फिर्यादी अगर प्रतिवादी होण्याचा प्रसंग येतो व तो टाळण्यासारखा नसतो. त्यावेळी मानहानी म्हणजे काय, मनस्ताप म्हणजे काय, आशा-निराशा कशी जाणवते, निंदा कशी बोचते हें सारें अनुभवाला येतें. केसरी विरुद्ध टिळकबंधूंचे दावे यावेळीं कोर्टात हिरीरीनें भांडले जात होते, तेव्हां ही गोष्ट मी समक्ष पाहिलेली व अनुभवलेली आहे. अनंत फंदी किंवा कोणा जुन्या कवीचा फटका आहे :—

विडा पैजेचा उचलूं नको
उणी तराजू तोलूं नको
गहाण कुणाचें बुडवूं नको
आल्या अतिथा मूठभर द्याया मागें पुढती पाहूं नको ॥

मनुष्यानें काय काय करूं नये, या कवीनें वर्णन केलेल्या यादींत आपल्या विनोदी भालाकार भोपटकरांनीं 'कोणाचा ट्रस्टी होऊं नको' ही गोष्ट घातली होती ! ट्रस्टी होणारांचा अनुभव जगभर इथून तिथून सारखाच आहे. ते केवळ निंदा आणि मनःस्ताप यांचे धनि ! ताईमहाराज केसमध्यें लो. टिळकांना जो अनुभव आला तोच केसरीचे ट्रस्टी या नात्यानें तात्या व बाबा विद्वांस यांना आला. त्या दिवसांत लोक काय हवें तें बोलत ! तात्यांच्या खाजगी शत्रूंनीं तसेंच सर्व राजकीय प्रतिस्पर्ध्यांनीं बरी ही उत्तम संधि सांपडली असें समजून आपलें सर्व बळ एकवटलें होतें. अखेर दहा वर्षांनीं जेव्हां हायकोर्टानें 'केसरी'च्या बाजूनें शंभर टक्के निकाल दिला तेव्हां ट्रस्टींचें तोंड उजळ झालें. पण तोंपर्यंत निंदेचा केवढा ताण त्यांना सहन करावा लागला असेल याची इतरांना कल्पना येणें कठीण आहे !

तात्यांचे बाबतींत निंदा व स्तुति यांची मीं अगदीं दोन टोकें पाहिलीं. वर्षाऋतूमध्यें आकाश सर्व बाजूंनीं ढगांनीं भरून यावें असा त्यांचेवर निंदेचा वर्षाव होत असलेला मीं पाहिला. त्याप्रमाणेंच निरभ्र अशा शरदृऋतूंत अंगावर चंद्रकिरण पडावेत असें त्यांच्या मान्यतेचे आणि लोकप्रियतेचेहि दिवस मीं पाहिले. तथापि स्तुति किंवा निंदा होत असतांनाहि, त्या दोहोंना मनानें संक्षेप देणारें जें त्यांचें निर्विकार आणि धीरगंभीर चारित्र्य होतें, तेंच अधिक आकर्षक होतें. असा काळच मला आठवत नाहीं कीं ज्या वेळीं त्यांना एकादा जबरदस्त शत्रु नव्हता, आणि निंदेचें वादळ त्यांचे

भोंवतीं जमत नव्हतें; पण कोणाच्याहि स्तुतिनिंदेची पर्वा न करता एखाद्या चिलखती 'ड्रेडनॉट' जहाजाप्रमाणें संथपणानें आणि खंबीरपणानें ते जो मार्ग आक्रमण करीत होते त्याचें मनांतून फार कौतुक वाटे. ज्याच्या अंगीं हा गुण नसेल त्याचा राजकारणाच्या धकाधकींत निभाव लागणें कठीण आहे. त्यांच्या राजकारणांत माझा उपयोग नव्हता. कारण, एक तर तितकी माझ्यांत अद्याप पात्रता नव्हती. आणि दुसरें म्हणजे अभ्यासाशिवाय राजकारणांत पडावयाचें नाहीं असें मीहि ठरविलें होतें. पण त्याशिवाय इतर कित्येक उपयुक्त गोष्टी मला करता येण्यासारख्या होत्या. म्हणून मी तिकडेच लक्ष द्यावयाचें ठरविलें. मी स्वतः विद्वान होईन, फार तर एकाद्या वर्तमानपत्राचा संपादक होईन येथपर्यंत माझ्या कल्पनेची मजल जात असे. पण मी राजकीय पुढारी होईन असें त्यावेळीच काय पण कधींहि माझ्या मनांत आलें नाही. एकदां आम्ही सर्वजण जेवीत असतां बोलतांना हाच विषय निघाला होता. राजकारणांत मी कोण होईन किंवा मला काय व्हावेसें वाटतें तें मी सांगत होतों. मीं तात्यांना म्हटलें कीं, "राजकारणांत जो नित्य हमामा चालतो आणि लोकनिंदेला तोंड द्यावें लागतें तें माझ्या प्रकृतीला झेपणार नाहीं. यापेक्षां अभ्यासकाची भूमिका घेऊन राजकारणी लेखक, म्हणजे Thinker Politician होणें मला आवडेल." यावर समाधानपूर्वक मान्यता दर्शवून ते म्हणाले, "चांगलें आहे. Thinker Poliitcian होणेंहि कांहीं वाईट नाहीं!"

विधायक काम करणाराला तात्यांचे हाताखाली भरपूर वाव होता आणि त्यांच्या लेखसंग्रहाच्या प्रकाशनाचें कामहि असें होतें कीं तें त्यांना आवडावें. बिचारे विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर यांनीं आपल्या लेखांनीं विचारांची 'नवी सृष्टि' उत्पन्न केली; पण त्यांना आपल्या हयातींत आपण जन्मभर खपून लिहिलेल्या लेखांचें छापील पुस्तक कांहीं पहावयास मिळालें नाहीं! त्यांचेहि लेखसंग्रह निघाले; पण मरणोत्तर त्यांचें 'स्मारक' म्हणून! वाङ्मयाच्या बाबतींत इतका बेवारशीपणा असावा याचें मला बरें वाटत नसे. मग एक दिवस ही मनांतली रुखरुख मी त्यांचेजवळ बोललों. मी त्यांना म्हटलें, "पुढें मागें तुमचें हें समग्र वाङ्मय प्रसिद्ध करण्याची जबाबदारी ओघानें आमच्यावरच पडणार. जी गोष्ट पुढेंमागें केल्यावांचून सुटका नाहीं, ती आजच कां करूं नये? तितकाच भार हलका होईल. निदान, हें वाङ्मय तुमच्या हयातींत प्रसिद्ध केल्यास तुमचें मार्गदर्शन तरी मला लाभेल!"

माझें हें बोलणें तात्यांना फारच आवडलें. त्यांचें नांव हिंदुस्थानांत सर्वत्र दुमदुमत असल्यामुळें त्यांच्या पुस्तकाला प्रकाशक मिळण्याची कधीं अडचण पडली नाहीं. मीं पुस्तक तयार केलें कीं त्याला ते सुटसुटीत नांव सुचवीत, व चार ओळी प्रस्तावनाहि लिहीत. त्यांचे शिक्षणविषयक लेख मीं प्रसिद्ध केले, त्यांत साठ पानें व्याख्यानें मी स्वतः लिहून काढलीं आहेत! म्हणजे हें केवळ बिनश्रमाचें, नुसती कात्रणें एकत्र करून छापण्याचें काम नव्हतें! टिळकचरित्राचा पहिला खंड १९२३ सालीं प्रसिद्ध

झाला. पण पुढचे खंड लवकर होण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां १८९६ पासून चोवीस वर्षांच्या मराठ्याच्या फायली चाळून Landmarks in Lokamanya's Life हें तात्यांचें छोटें इंग्रजी टिळकचरित्र मीं प्रसिद्ध केलें. लो. टिळकांच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या प्रसंगीं त्यांनीं मराठ्यांत जे अग्रलेख लिहिले त्यांचें हें पुस्तक आहे. हल्लीं कित्येक लेखकांनीं टिळकांचीं इंग्रजी चरित्रें प्रसिद्ध केलीं आहेत; पण तात्यांच्या या छोट्या पुस्तकाचा विशेष असा आहे कीं, यांतील सर्व लेख टिळकांच्या हयातींतच लिहिले गेले. यामुळें **स्वतः टिळकांच्या मान्यतेचा आणि पसंतीचा जो अधिकृत छाप** या पुस्तकाला लाभला आहे तो इतर कोणत्याहि इंग्रजी चरित्राला नाहीं !

लो. टिळकांच्या चरित्राचा पहिला खंड मी मुद्दाम म. गांधी यांना नजर केला. त्या वेळीं अपेंडिक्सच्या शस्त्रक्रियेनंतर ते ससून हॉस्पिटलमध्ये आजारी होते. त्यांनीं तें पुस्तक मोठ्या आस्थेनें व आदरानें हातांत घेतलें आणि " हें पुस्तक मला हवें होतें " असे उद्गार काढले. या पुस्तकाचें गुजराथी भाषांतर व्हावें अशीहि त्यांनीं इच्छा दर्शविली. महादेवभाई देसाई यांनीं ती तात्यांना जें पत्र लिहिलें ( पृ. १०९ पाहा. ) तें म. गांधी यांच्या सांगण्यावरूनच लिहिले आहे.

यानंतर दोन तीन वर्षांनीं टिळकचरित्राचा उत्तरार्ध तात्यांनीं दोन खंडांत लिहून प्रसिद्ध केला. त्याचींच चौदाशें पृष्टें आहेत ! त्याची हकीगत पूर्वार्धांत येऊन गेलीच आहे. टिळकांच्या मृत्युपूर्वीं इतर लेखकांनीं लिहिलेलीं त्यांचीं एकदोन चरित्रें प्रसिद्ध झालीं होतीं. पण तीं अगदींच क्षुद्र, शंभर पानेंहि नसतील ! लो. टिळक वारल्यानंतर श्री. खाडिलकर, अच्युतराव कोल्हटकर, ना. सी. फडके यांनींहि टिळक चरित्र लिहिण्याचा मनोदय प्रकट केला होता. पण तात्यांनीं आपलें नांव 'केसरीं'त प्रसिद्ध केल्यावर इतर कोणीहि त्या कामाला हात घातला नाहीं. इतकी तात्यांची या बाबतीं-तली योग्यता सर्वमान्य होती. टिळक-शताब्दीचे निमित्तानें अलीकडे सात आठ इंग्रजी चरित्रें प्रसिद्ध झाली आहेत. खरें म्हटलें तर, तात्यांनी लिहिलेलें टिळक चरित्रच या प्रत्येकाला आधारभूत झालेलें आहे. पण नवल असें कीं या ऋणाचा एकाहि ग्रंथकारानें उल्लेख केला नाहीं. ( आणि त्यांत ' केसरी 'चे द. वि. ताम्हणकर हेहि येतात ! ) वास्तविक ऋणनिर्देश ही मामुली गोष्ट आहे. त्यामुळें कमीपणा येईल असेंहि लेखकाला वाटण्याचें कारण नाही. पण ही गोष्ट घडली ' याचेच नांव जग ' इतकेंच मी म्हणतो. तें कांहीहि असलें तरी तात्यांचे मोठेपणाला त्यामुळें बाध येऊं शकत नाहीं.

१९३० च्या मार्च अखेर तात्यांनीं असेंब्लीचा राजीनामा दिला. यापूर्वी नेहरू-रिपोर्ट, सर्वपक्षीय परीषदेचे ठराव, लाहोर काँग्रेसनें केलेला स्वातंत्र्याचा ठराव या सर्व गोष्टी झाल्या होत्या. सनदशीर चळवळीला याप्रमाणें निराशेचें फळ आल्यानंतर देशांत कायदेभंगाची चळवळ सुरू न व्हावी तर काय व्हावें ? त्याप्रमाणें महाराष्ट्रांत अनेक

ठिकाणीं ही चळवळ सुरू झाली आणि त्यांत सोलापूर, चिरनेर पनवेल इत्यादि ठिकाणीं गोळीबार होऊन प्रकरण चिघळले. त्या चळवळींत हजारों लोक निर्भयपणानें तुरुंगांत गेल्यामुळें लोकक्षोभाला रौद्ररम्य स्वरूप आले होते. केसरीच्या दर अंकांत या हकीगती भरभरून येत. सोलापुरांत कारण नसतांना सरकारने मार्शल लॉ पुकारून केवळ दहशत बसविण्याकरितां जी पांखरासारखी निरपराधी माणसें मारलीं, त्या अत्याचाराला साऱ्या इतिहासांत दाखला सांपडणार नाहीं ! आणि या सर्वांवर कळस म्हणजे शांततामय चळवळींत भाग घेणारे सोलापूरचे चार प्रमुख नागरिक म्हणजे, मलाप्पा धनशेटी, चांदकिरण सारडा, कुरबान हुसेन व शिंदे यांना मार्शल लॉखालीं फांशीची शिक्षा ठोठावली ! सोलापूर येथील कायदेभंगाच्या चळवळींत पहिल्या दिवशीं कांहीं मवाली लोकांनीं अत्याचार केले हें खरें; पण वरील पुढाऱ्यांचा त्या गोष्टीशी कसलाहि संबंध नव्हता. असें असतां धडधडीत निरपराधी माणसांना जेव्हा सरकारनें फांशी द्यावयास काढले तें पाहून लोकांच्या अंगावर शहारेच आले ! सोलापुरांत सहा महिने जें रावण-राज्य चालू होते त्याविरुद्ध तात्यांनीं केसरींत लागोपाठ इतके झणझणीत लेख लिहिले कीं, १८९७ सालीं टिळकांनीं रँडशाहींत लिहिलेल्या लेखांचीच लोकांना आठवण व्हावी ! इतके कडक लेख साऱ्या हिंदुस्थानांत त्यावेळीं कोणत्याहि वर्तमानपत्रांत आले नाहींत ! त्यामुळें केसरीवर खटला होणार ही गोष्ट ते निश्चितपणें धरूनच चालले होते. पण त्यावेळीं तो झाला नाहीं इतकें खरें.

एकीकडे सोलापूर–प्रकरणावर लेख लिहून जनतेच्या दुःखाला वाचा फोडीत असतां, सोलापूरच्या ज्या चार निरपराधी लोकांना फांशीची शिक्षा झाली होती त्यांचा गळफांस सुटावा म्हणून तात्यांनीं श्रमांची व प्रयत्नाची पराकाष्ठा करण्यांत कोणतीहि बाकी ठेवली नाहीं. पण सरकारहि हट्टालाच पेटले असल्यामुळें त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाहीं. फांशीच्या आदल्या दिवशीं मल्लाप्पा धनशेटी वगैरे चारहि दुर्दैवी जीवांची त्यांनीं येरवड्याच्या तुरुंगांत जाऊन भेट घेतली, त्याची करुण हकीगत श्रीयुत अंदुरकर यांच्या पुस्तकांत उपलब्ध आहे ती त्यांच्याच शब्दांत पुढें देतोः—

“ दे. तात्यासाहेब केळकर यांनी या चार दुर्दैवी जीवांना वाचविण्यासाठीं खूपच परिश्रम घेतले होते. त्यांनी गोलमेज परीषदेला गेलेल्या हिंदी पुढाऱ्यांना लंडनमध्ये तारा केल्या. नारायणराव गुंजाळ प्रभृतीमार्फत कायदेमंडळांतून प्रयत्न केला. भारतीय आंदोलनाची उठावणी तर त्यांच्याच प्रयत्नांनी झाली होती. केसरींतून या प्रकरणाला त्यांनीं सतत तेवत ठेवलें होतें. पण अशा तऱ्हेचे भगीरथ प्रयत्न करूनहि ते जेव्हा वाया गेले तेव्हा ते अतिशय निराश झाले. सरकार आता जणू कांही हट्टालाच पेटलें असून तें सूडाची परमावधि करून एखाद्या वेळी गुप्तपणें सुद्धा फाशी द्यावयाला कमी करणार नाही; तेव्हा एकदा या चार दुर्दैवी जीवांची शेवटची भेट तरी घ्यावी, त्यांची अखेरची इच्छा तरी समजून घ्यावी, आणि ती आपणांस पूर्ण करतां आली

तर दुःखातहि तेवढेंच समाधान असा विचार करून त्यांनी या चार दुर्दैवी जीवांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. शेठ वालचंद हिराचंद यांना त्यांनी तार करून पुण्यास बोलावून घेतलें आणि त्यांना आपला विचार सांगून भेटीची परवानगी मिळविली. ता. ११ जानेवारी १९३१ रोजीं दुपारीं भेटीची परवानगी मिळतांच ते शेठ वालचंद हिराचंद यांच्यासह येरवड्यास भेटीसाठी गेले. दोघांचीहि मनःस्थिति निराशेने व्यापून गेलेली होती.

कारागृहांत पाय ठेवतांच समोरच असलेल्या जेल सुपरिंटेंडेंटनें त्यांचें स्वागत केलें आणि त्या कैद्यांना उद्याच फाशी दिले जाणार असल्याचें सांगितलें. तुरुंगाधिकाऱ्यांच्या तोंडून ती वार्ता बाहेर पडते न पडते तोंच श्री. तात्यासाहेबांच्या डोळ्यांत अश्रु तरळूं लागले. सर्वांग थरथरूं लागलें. तोंडांतून शब्दहि निघेनासा झाला. त्यांची ती शोचनीय अवस्था पाहून तुरुंगाधिकारीच म्हणाले– "शेवटची भेट व्हावी असाच ईश्वरी संकेत होता, हें तरी तुमचें भाग्यच म्हणायचें !"

आणि थोड्याच वेळांत श्री. मल्लाप्पा धनशेटी, जगन्नाथ शिंदे, ए. कुर्बान हुसेन आणि चांदकिसन सारडा यांना कार्यालयांत आणण्याची व्यवस्था केली गेली. तात्यासाहेब आणि वालचंद यांना पाहतांच चौघांनीहि दोघांना नमस्कार केला. तात्यासाहेब व श्री. वालचंद यांनी उठून त्यांच्या नमस्काराचा स्वीकार करून त्यांनी त्यांच्याविषयीचा आपला आदरभाव प्रकट केला. त्या चार दुर्दैवी जीवांना पाहतांक्षणींच तात्यासाहेबांच्या अंतःकरणांत केवढी कालवाकालव होत होती ही त्यांची त्यांनाच ठाऊक ! त्यांनी चटकन् खाली मान घातली आणि डोळ्यांतून ओघळणारे अश्रु आपल्या उपरण्याने टिपून घेतले.

"मल्लाप्पा, शिंदे –" तात्यासाहेबांच्या तोंडून एवढेच शब्द बाहेर पडले. तात्यासाहेबांसारख्या धीरोदात्त पुढाऱ्याची ही अवस्था पाहून मल्लाप्पांना गहिवरून आलें. त्यांच्याहि डोळ्यांत अश्रु चमकूं लागले. मल्लाप्पा म्हणाले, "तात्यासाहेब वाईट वाटून घेऊं नका. तुम्ही तुमच्या परीने खूप कष्ट उचललेत. शेठजींनीहि प्रयत्नांची पराकाष्ठा केली, त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोंत."

"मल्लाप्पा, मी तुमच्याकडून आभार मानून घ्यायला आलों नाही. तुमची क्षमा मागायला आलों आहें –"

"छे, छे, तात्यासाहेब आम्हीच आपली क्षमा मागितली पाहिजे, यःकिंश्चित् आम्ही कार्यकर्ते – आमचें भाग्य थोर म्हणून तुमच्यासारखे थोर –"

जगन्नाथांचें बोलणें संपण्याआधीच तात्यासाहेब म्हणाले – "मी अभागी आहें, जगन्नाथ, दुर्दैवी आहें मी ! अपयशी म्हटलें तरी चालेल. मी तुम्हांला वांचवूं शकलों नाही."

"असें कसें म्हणतां तात्यासाहेब ? हा आमच्या नशिबाचा योग आहे. तेहतीस

कोटि जनतेलाहि यश आलें नाही. त्याला तुमचा काय दोष?" जगन्नाथ शिंदे म्हणाले.

"जाऊं द्या – आता एकच विचारणें–काय प्रसंग ओढवला आहे माझ्यावर –" एवढें म्हणून तात्यासाहेब थांबले. त्यांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहत होते. तें दृश्य अंतःकरणाचे लचके तोडणारे होते. साऱ्यांच्याच डोळ्यांत अश्रूंनी गर्दी करून सोडली. क्षणभर निःस्तब्ध शांतता पसरली होती. इतक्यांत तात्यासाहेब म्हणाले – "आता तुमची अखेरची इच्छा –" तात्यासाहेबांनी हें वाक्य किती यातनामय परिस्थितींत उच्चारलें याची साक्ष त्यांच्या चेहऱ्यावरून पटत होती.

"अखेरची इच्छा? उद्या आम्हांला फांसावर चढावयाचें आहे; आणि एवढ्यांत आमची अखेरची ईच्छा?" मल्लाप्पांनीं आपल्या मुखाने आपल्या फाशीची वार्ता निवेदन करतांच तात्यासाहेबांना विजेचा धक्का बसल्याप्रमाणें झालें. त्यांनी सहेतुक हे निवेदन करण्याचें टाळलें होतें.

"सरकार आमची अखेरची इच्छा पूर्ण करील असें वाटतें तुम्हांला?" मल्लप्पांनी विचारलें.

"तशी अपेक्षा आम्ही बाळगणें व्यर्थच आहे. तथापि आतां तुम्ही विचारतांच आम्हांत म्हणून सांगतों–आमची अखेरची इच्छा एवढीच की, म. गांधींची एकदा भेट व्हावी–" जगन्नाथ शिंदे म्हणाले.

"आणि उद्या आह्मांला फाशीं दिल्यावर आमची प्रेतें तुम्हीं आपल्या ताब्यांत घेऊन त्यांचा अंत्यविधि करण्याची मात्र खटपट करा–" मल्लाप्पा म्हणाले.

इतका वेळपर्यंत सर्वांचें बोलणें ऐकत असलेला ए. कुर्बान हुसेन एकदम म्हणाला– "जाने दो जी, मरनेके बाद दुनिया डुब गई. इस मामुली बातोंके लिये तात्यासाब को क्यों तकलिफ देना चाहते हो. तात्यासाब, सरकार इतना खुनशी और सैतानी है कि वोह आपको कोनसी भी बात मंजूर नहि करेगी. खाली अपना अपमान–"

"कसला अपमान? तुमच्या इच्छा पूर्ण होत असतील तर होऊ द्या माझा अपमान. मी सहन करायला तयार आहें. आता, गांधीजींची भेट घडवून आणणें एक वेळ शक्य होईल, पण–?" तात्यासाहेबांनी शंका व्यक्त केली.

"आमच्या प्रेतांचा प्रश्न ना, द्या सोडून!" मल्लाप्पा म्हणाले.

"खटपट करतों. खटपट करणें एवढेंच माझ्या हाती आहे. आणि वेळहि अगदी थोडा आहे –"

"सहज शक्य असेल तर पाहा; त्यासाठी अधिक त्रास घेण्याची आवश्यकता नाही." जगन्नाथ शिंदे म्हणाले.

"दोन्हीं गोष्टीसाठी प्रयत्न करतों. दोन्ही साधल्या तर ठीकच, निदान गांधीजींची तरी भेट–" तात्यासाहेबांनी प्रयत्नाविषयी आश्वासन दिलें.

"पाहा जमलें तर–" तिघांनीहि एक सुरांत म्हटलें.

आणि मग अवांतर गोष्टी बोलून बाहेर पडतांना, "आता आपली हीच तात्यासाहेब शेवटची भेट बरं कां !" हंसत हंसत जगन्नाथांनी म्हटलें, तेव्हा सर्वांच्या अंगावर शहारे आले. काळीज थर्रर झालें. तात्यासाहेबांना नमस्कार करून त्यांनी निरोप दिला. तात्यासाहेब आणि शेठ वालचंद हिराचंद जड अंतःकरणाने तेथून बाहेर पडले.

कारागृहांतून केसरी कचेरींत आल्यावर श्री. केळकर यांनीं शेठ वालचंद यांना ताबडतोब मुंबईस गृहमंत्रि हॉटसन यांचेकडे पाठविले. पण योगायोगाने हॉटसनसाहेब यावेळीं पुण्यांतच आहेत असें कळल्यामुळें, गव्हर्मेंट हाऊसवर जाऊन त्यांनीं त्यांची निकडीनें गांठ घेतली व त्या चारहि दुर्दैवी जीवांची शेंवटची इच्छा त्यांचे कानावर घातली; आणि फांशीनंतर अंत्यविधीसाठीं प्रेतें आपल्या ताब्यांत मिळावी अशी परोपरीनें विनंति केली. पण दोन्ही गोष्टींनां हॉटसनसाहेबांनीं स्पष्ट नकार दिला. "हीं प्रेतें कांहीं सामान्य व्यक्तींची नाहींत ! अत्यंविधीपूर्वी भावनावश होऊन लोक त्यांची मिरवणूक काढतील. मग दंगाधोपा होऊन गोळीबारापर्यंत मजल येईल ! त्या गोष्टी वेळींच टाळलेल्या बऱ्या. आणि गांधींच्या भेटीविषयीं म्हणाल तर, सरकारचें कांहीं विशिष्ठ धोरण ठरले आहे, त्यामुळें गांधींची भेट होणें अशक्य आहे !"

तात्यासाहेबांनीं ना. हॉसटन यांचे म्हणणें शांतपणें ऐकून घेतलें, त्यांची परोपरीनें समजूत पटविण्याचा प्रयत्न केला ; प्रेतांचा अंत्यविधी निमूटपणें होईल हें जवळ जवळ अशक्य दिसत असतांहि त्या दुर्दैवी जीवांच्या शेवटच्या इच्छापूर्तीकरितां तशी हमी घेण्यास देखील ते तयार झाले. पण हॉटसन साहेबांना त्यांचे म्हणणें पटलें नाहीं, व पुनः स्पष्ट शब्दांनीं त्यांनीं नकार दिला. तेव्हां नाईलाजाने जड अंतःकरणानें त्यांनी हॉटसनसाहेबांचा निरोप घेतला. यानंतर त्यांनीं व्हाईसरॉय यांना निकडीची तार पाठवून कैद्यांची शेवटची इच्छा मान्य व्हावी म्हणून विनंति केली. पण त्या तारेचे कधीहि उत्तर आले नाही ! सरकारने आपल्या सूडबुद्धीचा उपशम याप्रमाणें चार निरपराधी जीवांचा बळी घेऊन केला.

मार्शल लॉ खाली सोलापुरांत कांहीं जणांनां दहा दहा वर्षांच्या शिक्षा झाल्या होत्या. त्यांत 'कर्मयोगी'चे रामभाऊ राजवाडे, डॉ. अंत्रोळीकर, कवि कुंजबिहारी वगैरे मंडळी होती. सहा महिन्यानंतर गांधी–आयर्विन करारामुळें त्यांची सुटका झाली. त्यावेळीं शिवाजी मंदिरांत केळकर यांचे अध्यक्षतेखाली त्या लोकांच्या सत्कारकरितां जी भव्य सभा झाली ती अनेकांचे स्मरणांत असेल. त्या वेळचें तात्यासाहेबांचे सरकारला आव्हान दिलेलें भाषण अत्यंत तेजस्वी असें होतें ! त्यांचा मनोपिंड व्यवहारतः तडजोडवादी असला तरी, तत्त्वाच्या बाबतींत तो किती कणखर होता याची साक्ष सर्वांना मनोमन पटल्याशिवाय राहिली नाही.

तात्यांचे भोंवतीं संकटाचे ढग जमा होऊं लागले म्हणजे माझें सारें लक्ष त्यांचेकडे वेधलेलें असें. त्यांचीं कामें मी अधिक दक्षतेनें करी. म्हणजे सांगितलेलीं कामें करीत होतोच. पण न सांगितलेलीं कामेंहि करीत असें. या वेळीं मी 'केसरी'त पुष्कळ लिहीत होतों. पूर्वीं फर्ग्युसन कॉलजांत टिळकांचा पुतळा बसविण्याचें काम मी केलें त्या स्मारकाचे अखेरचे हिशेब केसरींत प्रसिद्ध केले. केसरीच्या सारसंग्रहाचें पुस्तक प्रसिद्ध करण्याची कल्पना माझीच होती. अर्थात् तें संपादन करण्याचें काम तात्यांनी माझेकडेच दिलें. टिळकांच्या लेखसंग्रहाच्या चवथ्या खंडांतील लेख मीच निवडून दिले असल्या-मुळें त्या खंडाचें समालोचन करण्याकरितां एक लेखमाला मी केसरींत लिहिलीं. हीं सर्व कामें मी अशा बुद्धीनें करीत होतों कीं तात्यांना माझा उपयोग व्हावा. कायदे-भंगाचे चळवळींत केसरींतील पुष्कळ उपसंपादक तुरुंगांत गेले व आणखी कोणाचें मनांत ती गोष्ट येईल याची शाश्वती नव्हती. अर्थात् जागेवरचीं माणसें एकदम कमी झालीं तर वर्तमानपत्राच्या नित्याच्या कामांत फार गैरसोय व अडचण उत्पन्न होणार; याकरितां 'केसरींत तुला घेण्याची वेळ आली तर येशील ना?' असें त्यांनी मला विचारून ठेवलें. त्यावर, "तुम्हीं सांगाल त्या वेळीं मी येईन," असें मीहि त्यांना आश्वासन दिलें होतें. तात्या स्वतः जागेवर असतां केसरींत मजकुराचा प्रश्नच नव्हता. पण न जाणों, कदाचित् आपणहि जाग्यावर राहिलो नाहीं तर काय? अशा कल्पनेनें त्यांची नजर नेहेमीं माणसाच्या शोधांत असे.

राजकारणांत या वेळी फार मोठ्या गोष्टी घडून येत होत्या. त्यामुळें ज्याच्या मनांत देशभक्ति असेल त्याचें मन अस्थिर झाल्यास नवल नाहीं. ज्या दिवशीं राज-गुरु आणि भगतसिंग यांना फांशी दिलें त्या दिवशी मला झोंप आली नाहीं व अन्नहि गोड लागलें नाहीं. सेनापती बापट यांनीं सशस्त्र सत्याग्रह केल्यावरून त्यांचेवर खटला झाला, त्या वेळीं कोर्टांत त्यांचे वतीनें भोपटकरांबरोबर माझेंहि वकीलपत्र दाखल होतें. क्षणभर त्यावेळीं असें मनांत आलें कीं हे वकीलपत्र टाकून देऊन त्यांचेबरोबर आप-णहि आरोपी म्हणून तुरुंगांत जावें! पण असा विचार करणें शुद्ध वेडेपणाचें आहे. होय, भगतसिंग व राजगुरु फांशी गेले; त्यांच्याबरोबर तुम्ही जाणार आहांत काय? मग त्याविषयी विचार करण्यांत अर्थ कोणता? प्रत्येक मनुष्याचें शिक्षण, पात्रता व परि-स्थिति वेगवेगळी असते व हें लक्षांत घेऊन तो जो उद्योग निःस्वार्थीपणानें करील तो देशभक्तींतच जमा होईल. लॉर्ड वेव्हेल यांनी 'वॉर एफर्ट'ची व्याख्या एकदां सांगितली होती त्याची या वेळी आठवण होते. 'युद्ध-प्रयत्नाला तुम्हीं मदत करावयाची याचा अर्थ, हिंदुस्थानांतल्या तीस कोटी लोकांनीं दारूगोळा निर्माण करावयाचा असा नव्हे! इतका दारूगोळा आम्हांला नकोहि आहे! फक्त इतकेंच करा कीं, जें काम तुम्हीं करील असाल तेंच अधिक मन लावून करा. तुम्हीं सात वाजतां उठत असाल तर सहा वाजतां उठा! याचेंच नांव वॉर एफर्ट. War-Effort म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं!"

हीच व्याख्या देशभक्तीला लावतां येते. तुम्हीं लेखक असला तर अधिक अभ्यास-पूर्वक लिहा. वकील असला तर अधिक कसोशीनें आणि प्रामाणिकपणानें काम करा. सार्वजनिक कार्यकर्ते असला तर अधिक आस्थेनें दुसऱ्यास मदत करा. हें तुम्हीं केलेंत म्हणजे ती देशभक्तीच आहे !" तरुणांना देशकार्याविषयीं तात्या जो नेहमीं उपदेश करीत त्याचें तात्पर्य याहून वेगळें नव्हतें !

३

# शारदा-बिल व इतर चळवळी

मनुष्याच्या मनांत महत्त्वाकांक्षा असणें यासारखें सुख नाहीं; आणि ती सफल न होणें यासारखें दुःख नाहीं. मनुष्याच्या मनांत महत्त्वाकांक्षेचा उदय होणें हें त्याच्या अंगीं कर्तबगारी असल्याचें लक्षण आहे. पण ही कर्तबगारी योग्य कारणी लागून सफल होण्याची त्याला संधि मिळणें ही गोष्टी मात्र त्याच्या हातची नाहीं. ती सर्वस्वी दुसऱ्याच्या इच्छेवर अवलंबून असणारी गोष्ट आहे. त्याला तुम्हीं काय करणार ? माझ्या आयुष्याचें असेंच झालें. संधि चालून आली आणि मी ती दवडली असें माझ्या हातून घडलें नाहीं ! मला हवी असलेली संधि मिळती तर माझ्या गुणांचा अधिक प्रकाश पडता असें मला वाटतें. पण जाऊं द्या कीं, असें प्रत्येकालाच वाटत असतें ! मग मी माझ्याच मानाचे समाधान करतो. होय, समजा तुला हवी ती संधि मिळाली असती; तर काय झालें असतें ? इकडचें जग तिकडे झालें असतें काय ?—इकडचें जग तिकडे नसतें झालें. त्याला नेपोलियन किंवा हिटलरच लागतो. सगळींच

"पाहा जमलें तर–" तिघांनीहि एक सुरांत म्हटलें.

आणि मग अवांतर गोष्टी बोलून बाहेर पडतांना, "आता आपली हीच तात्यासाहेब शेवटची भेट बरं कां!" हंसत हंसत जगन्नाथांनी म्हटलें, तेव्हा सर्वांच्या अंगावर शहारे आले. काळीज थर्रर झालें. तात्यासाहेबांना नमस्कार करून त्यांनी निरोप दिला. तात्यासाहेब आणि शेठ वालचंद हिराचंद जड अंतःकरणाने तेथून बाहेर पडले.

कारागृहांतून केसरी कचेरींत आल्यावर श्री. केळकर यांनीं शेठ वालचंद यांना ताबडतोब मुंबईस गृहमंत्रि हॉटसन यांचेकडे पाठविले. पण योगायोगाने हॉटसनसाहेब यावेळीं पुण्यांतच आहेत असें कळल्यामुळें, गव्हर्मेंट हाऊसवर जाऊन त्यांनीं त्यांची निकडीनें गांठ घेतली व त्या चारहि दुर्दैवी जीवांची शेवटची इच्छा त्यांचे कानावर घातली; आणि फांशीनंतर अंत्यविधीसाठीं प्रेतें आपल्या ताब्यांत मिळावी अशी परोपरीनें विनंति केली. पण दोन्ही गोष्टींनां हॉटसनसाहेबांनीं स्पष्ट नकार दिला. "हीं प्रेतें कांहीं सामान्य व्यक्तींची नाहींत! अत्यंविधीपूर्वी भावनावश होऊन लोक त्यांची मिरवणूक काढतील. मग दंगाधोपा होऊन गोळीबारापर्यंत मजल येईल! त्या गोष्टी वेळींच टाळलेल्या बऱ्या. आणि गांधींच्या भेटीविषयीं म्हणाल तर, सरकारचें कांहीं विशिष्ठ धोरण ठरले आहे. त्यामुळें गांधींची भेट होणें अशक्य आहे!"

तात्यासाहेबांनीं ना. हॉसटन यांचे म्हणणें शांतपणें ऐकून घेतलें, त्यांची परोपरीनें समजूत पटविण्याचा प्रयत्न केला; प्रेतांचा अंत्यविधी निमूटपणें होईल हें जवळ जवळ अशक्य दिसत असतांहि त्या दुर्दैवी जीवांच्या शेवटच्या इच्छापूर्तीकरितां तशी हमी घेण्यास देखील ते तयार झाले. पण हॉटसन साहेबांना त्यांचे म्हणणें पटलें नाहीं, व पुनः स्पष्ट शब्दांनीं त्यांनीं नकार दिला. तेव्हां नाईलाजाने जड अंतःकरणानें त्यांनी हॉटसनसाहेबांचा निरोप घेतला. यानंतर त्यांनीं व्हाईसरॉय यांना निकडीची तार पाठवून कैद्यांची शेवटची इच्छा मान्य व्हावी म्हणून विनंति केली. पण त्या तारेचे कधीहि उत्तर आले नाही! सरकारने आपल्या सूडबुद्धीचा उपशम याप्रमाणें चार निरपराधी जीवांचा बळी घेऊन केला.

मार्शल लॉ खाली सोलापुरांत कांहीं जणांनां दहा दहा वर्षांच्या शिक्षा झाल्या होत्या. त्यांत 'कर्मयोगी'चे रामभाऊ राजवाडे, डॉ. अंत्रोळीकर, कवि कुंजविहारी वगैरे मंडळी होती. सहा महिन्यानंतर गांधी–आयर्विन करारामुळें त्यांची सुटका झाली. त्यावेळीं शिवाजी मंदिरांत केळकर यांचे अध्यक्षतेखाली त्या लोकांच्या सत्कारकरितां जी भव्य सभा झाली ती अनेकांचे स्मरणांत असेल. त्या वेळचें तात्यासाहेबांचे सरकारला आव्हान दिलेलें भाषण अत्यंत तेजस्वी असें होतें! त्यांचा मनोपिंड व्यवहारतः तडजोडवादी असला तरी, तत्त्वाच्या बाबतींत तो किती कणखर होता याची साक्ष सर्वांना मनोमन पटल्याशिवाय राहिली नाही.

तात्यांचे भोंवतीं संकटाचे ढग जमा होऊं लागले म्हणजे माझें सारें लक्ष त्यांचेकडे वेधलेलें असें. त्यांचीं कामें मी अधिक दक्षतेनें करी. म्हणजे सांगितलेलीं कामें करीत होतोच. पण न सांगितलेलीं कामेंहि करीत असें. या वेळीं मी 'केसरी'त पुष्कळ लिहीत होतों. पूर्वीं फर्ग्युसन कॉलजांत टिळकांचा पुतळा बसविण्याचें काम मी केलें त्या स्मारकाचे अखेरचे हिशेब केसरींत प्रसिद्ध केले. केसरीच्या सारसंग्रहाचें पुस्तक प्रसिद्ध करण्याची कल्पना माझीच होती. अर्थात् तें संपादन करण्याचें काम तात्यांनी माझेकडेच दिलें. टिळकांच्या लेखसंग्रहाच्या चवथ्या खंडांतील लेख मीच निवडून दिले असल्या-मुळें त्या खंडाचें समालोचन करण्याकरितां एक लेखमाला मी केसरींत लिहिलीं. हीं सर्व कामें मी अशा बुद्धीनें करीत होतों कीं तात्यांना माझा उपयोग व्हावा. कायदे-भंगाचे चळवळींत केसरींतील पुष्कळ उपसंपादक तुरुंगांत गेले व आणखी कोणाचें मनांत ती गोष्ट येईल याची शाश्वती नव्हती. अर्थात् जागेवरचीं माणसें एकदम कमी झालीं तर वर्तमानपत्राच्या नित्याच्या कामांत फार गैरसोय व अडचण उत्पन्न होणार; याकरितां 'केसरींत तुला घेण्याची वेळ आली तर येशील ना?' असें त्यांनी मला विचारून ठेवलें. त्यावर, "तुम्हीं सांगाल त्या वेळीं मी येईन," असें मीहि त्यांना आश्वासन दिलें होतें. तात्या स्वतः जागेवर असतां केसरींत मजकुराचा प्रश्नच नव्हता. पण न जाणों, कदाचित् आपणहि जाग्यावर राहिलो नाहीं तर काय? अशा कल्पनेनें त्यांची नजर नेहेमीं माणसाच्या शोधांत असे.

राजकारणांत या वेळी फार मोठ्या गोष्टी घडून येत होत्या. त्यामुळें ज्याच्या मनांत देशभक्ति असेल त्याचें मन अस्थिर झाल्यास नवल नाहीं. ज्या दिवशीं राज-गुरु आणि भगतसिंग यांना फांशी दिलें त्या दिवशी मला झोंप आली नाहीं व अन्नहि गोड लागलें नाहीं. सेनापती बापट यांनीं सशस्त्र सत्याग्रह केल्यावरून त्यांचेवर खटला झाला, त्या वेळीं कोर्टांत त्यांचे वतीनें भोपटकरांबरोबर माझेंहि वकीलपत्र दाखल होतें. क्षणभर त्यावेळीं असें मनांत आलें कीं हे वकीलपत्र टाकून देऊन त्यांचेबरोबर आप-णहि आरोपी म्हणून तुरुंगांत जावें! पण असा विचार करणें शुद्ध वेडेपणाचें आहे. होय, भगतसिंग व राजगुरु फांशी गेले; त्यांच्याबरोबर तुम्ही जाणार आहांत काय? मग त्याविषयी विचार करण्यांत अर्थ कोणता? प्रत्येक मनुष्याचें शिक्षण, पात्रता व परि-स्थिति वेगवेगळी असते व हें लक्षांत घेऊन तो जो उद्योग निःस्वार्थीपणानें करील तो देशभक्तींतच जमा होईल. लॉर्ड वेव्हेल यांनी 'वॉर एफर्ट'ची व्याख्या एकदां सांगितली होती त्याची या वेळी आठवण होते. 'युद्ध-प्रयत्नाला तुम्हीं मदत करावयाची याचा अर्थ, हिंदुस्थानांतल्या तीस कोटी लोकांनीं दारूगोळा निर्माण करावयाचा असा नव्हे! इतका दारूगोळा आम्हांला नकोहि आहे! फक्त इतकेंच करा कीं, जें काम तुम्हीं करील असाल तेंच अधिक मन लावून करा. तुम्हीं सात वाजतां उठत असाल तर सहा वाजतां उठा! याचेंच नांव वॉर एफर्ट. War-Effort म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं!"

हीच व्याख्या देशभक्तीला लावतां येते. तुम्हीं लेखक असला तर अधिक अभ्यासपूर्वक लिहा. वकील असला तर अधिक कसोशीनें आणि प्रामाणिकपणानें काम करा. सार्वजनिक कार्यकर्ते असला तर अधिक आस्थेनें दुसऱ्यास मदत करा. हें तुम्हीं केलेंत म्हणजे ती देशभक्तीच आहे!" तरुणांना देशकार्याविषयीं तात्या जो नेहमीं उपदेश करीत त्याचें तात्पर्य याहून वेगळें नव्हतें!

३

# शारदा-बिल व इतर चळवळी

मनुष्याच्या मनांत महत्त्वाकांक्षा असणें यासारखें सुख नाहीं; आणि ती सफल न होणें यासारखें दुःख नाहीं. मनुष्याच्या मनांत महत्त्वाकांक्षेचा उदय होणें हें त्याच्या अंगीं कर्तबगारी असल्याचें लक्षण आहे. पण ही कर्तबगारी योग्य कारणी लागून सफल होण्याची त्याला संधि मिळणें ही गोष्टी मात्र त्याच्या हातची नाहीं. ती सर्वस्वी दुसऱ्याच्या इच्छेवर अवलंबून असणारी गोष्ट आहे. त्याला तुम्हीं काय करणार ? माझ्या आयुष्याचें असेंच झालें. संधि चालून आली आणि मी ती दडवली असें माझ्या हातून घडलें नाहीं ! मला हवी असलेली संधि मिळती तर माझ्या गुणांचा अधिक प्रकाश पडता असें मला वाटते. पण जाऊं द्या कीं, असें प्रत्येकालाच वाटत असतें ! मग मी माझ्याच मानाचे समाधान करतो. होय, समजा तुला हवी ती संधि मिळाली असती; तर काय झालें असतें ? इकडचें जग तिकडे झालें असतें काय ?—— इकडचें जग तिकडे नसतें झालें. त्याला नेपोलियन किंवा हिटलरच लागतो. सगळींच

माणसें त्या उंचीची नसतात. माझें म्हणणें इतकेंच कीं, माझ्यांत जो गुण आहे त्याला अधिक अवसर मिळाला असता. यांत वावगें काय आहे ? स्वतःच्या कर्तबगारीबद्दल ज्याला खात्री आहे अशा माणसाला सर्व महत्त्वाकांक्षा सोडून देण्याची पाळी येणें हें दुःख कसें जाणवत असेल त्याची इतरांना कल्पना येणार नाहीं. पण या भावनेच्या गोष्टी आता मी सोडून देतो. सरळपणानें जितकी हकिगत सांगता येईल, किंवा सांगावीशी वाटेल तितकीच पुढें सांगतो.

१९२९ सालीं लाहोर काँग्रेसनें स्वातंत्र्याचा ठराव पास केला. त्यावेळी हीं भरती नुसती राजकीय प्रांतांतच राहिली नाहीं. तर धार्मिक, सामाजिक अशा समाजाच्या सर्वच क्षेत्रांत पसरत होती. परंपरागत रूढीची बंधनें कोणालाहि नको होती व त्याविरुद्ध बंडखोरी सुरू होती. पर्वती सत्याग्रह, देवालय प्रवेश, पाणवठ्याचा सत्याग्रह ही त्याची उदाहरणें होत. एकीकडे काशीच्या धर्मपीठाचे सनातनी पंडित व धर्म-परिवर्तनवादी सुधारक यांचे शिवाजी मंदिरांत वाद सुरू होते. कायदेमंडळे लोकमतानुवर्ति झाल्यामुळें डॉ. गौर यांनीं सामाजिक सुधारणेची बिले असेंब्लींत आणली होती. अशी सर्वत्र विचारजागृतींची चिन्हें दिसत होतीं. त्यांतच संमतिवय-कमिटीचा रिपोर्ट व हरबिलास शारदा यांचे मुलीच्या लग्नाचे वय कायद्यानें ठरविण्याचे बिल असेंब्लींत आले तेव्हां माझ्या मनांत एकदम ठिणगी पडली !

मनुष्याचें आयुष्यांत केव्हांतरी असा एक क्षण येतो कीं त्या वेळी त्याच्या व्यक्तिमत्वाचा उदय होतो. आणि सगळें जग विरुद्ध असले तरी आपलें मत ठांसून प्रतिपादन करण्याचें धैर्य त्याचे अंगांत उत्पन्न होते. शारदा-बिलामुळें माझ्या मनांत असेंच स्थित्यंतर घडलें आणि मी त्या चळवळींत इतक्या ईर्षेनें पडलों कीं शारदा-बिल पास न झालें तर जणूं कांहीं जग बुडेल ! त्यावेळीं मी ज्ञानप्रकाशांत लेख लिहिले, पुण्यांत हिरीरीनें व्याख्यानें दिली, प्रतिपक्षांशी वाद केले, बिलासंबंधीं विधायक सूचना करून श्री. हरबिलास शारदा यांचेशी पत्रव्यवहार केला, सर्व कांही केलें. आणि ज्यावेळीं शारदाबिल पास झालें त्यावेळीं माझें मन शांत झालें. इतकें अवसान माझ्या अंगांत त्यावेळीं कोठून आलें होतें कोणास ठाऊक. या मनःस्थितीला मी Possessed असा शब्द लावीन. कसेंहि असो, या चळवळीनें मी पुण्यांत एकदम प्रसिद्धीला आलो. आणि माझ्यातहि कांहीं तेज किंवा कर्तबगारी आहे याचा मला प्रत्यय आला. या चळवळींत मी ज्ञानप्रकाशांत लेख लिहिले एवढी एक गोष्ट सोडली तर ती. तात्यांचें व माझें मनांत कोणताहि मतभेद नव्हता. हें बिल पास झाल्यावर आहिताग्नि राजवाडे यांचें मंदिरांत ज्या अनेक सभा झाल्या त्यांत तात्यांचे प्रमाणेंच माझेंहि एक व्याख्यान झालें. यानंतर पुण्यांत हिंदु-धर्मशास्त्र-संशोधन परिषद भरली होती त्यांत, 'विवाह हा संस्कार कीं करार ?' (Tyranny of the marriage sacrament) या विषयावर एक इंग्रजी निबंध मी वाचला. तो निबंध पुष्कळांना आवडला. विशेषतः श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं

त्याबद्दल माझी प्रशंसा केली. याचवेळी पुण्यांत युवक परिषद भरली होती तिचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू होते. या माणसाला लोकप्रियतेचें वरदान ईश्वरानें कसें पहिल्या दिवसापासून दिले आहे याचे नवल व कौतुक वाटतें. त्यांच्या मिरवणुकीला हजारों माणसें होती. आणि शिवाजीमंदीर श्रोत्यांनीं कांठोकांठ भरलें असून कंपाउडंच्या भिंतीवर देखील व्याख्यान ऐकण्याला माणसें उभी होतीं. आमच्या घरावरून ही मिरवणूक गेली तेव्हां मी सहज दारांत घरगुती पोषाखातच उभा होतो. त्यावेळीं शिरू लिमये किंवा कोणीतरी पं. नेहेरूंना हे 'केळकर' असें सांगितले. तेव्हां जवाहरलाल नेहरू यांनी माझ्याशी हस्तांदोलन केले ! या गोष्टीची आठवण झाली म्हणजे फार मौज वाटते.

पंडित नेहरु यांचे व्यक्तिमत्वांत कांही तरी अलौलिक आहे यांत शंकाच नाहीं. केवळ 'बडे बापके बेटे' म्हणून ते मोठे झालेले नाहींत. लखनौच्या युवक परिषदेंत त्यानीं भाषण करून जी 'नव्या युगा'ची घोषणा केली त्यानें मीहि भारल्यासारखा झालों. "नव्या स्मृतीचीं आवश्यकता" या माझ्या पुस्तकांत त्यांच्याच भाषणांतून जें अवतरण घेतलें आहे तेंच पुढे देतो :—

" The whole world today is one vast question-mark and every country and every people is in the-melting pot. The age of faith, with the comfort and stability it brings, is passed and there is a question about every thing, however permanent or sacred it might have appeared to our forefathers. Every where there is a doubt and restlessness and the foundations of State and Soceity are in a process of transformation. We appear to be in a dissolving period of history when the world is in labour and out of her travail will give birth to a New order. "

**Jawaharlal Nehru**

यानंतर पंडित नेहेरू यांना पत्र पाठवून लखनौ परिषदेंतील त्यांच्या भाषणांशी माझे संपूर्ण ऐकमत्य आहे असें कळवून, हिंदुधर्मशास्त्र-संशोधन परिषदेंतील माझा इंग्रजी निबंध मी त्यांना पाठवून दिला, व त्याला त्यांनी तत्परतेनें उत्तरहि पाठविलें होतें. बत्तीस वर्षांपूर्वींचा हा पत्रव्यवहार असल्यामुळें, त्यांचे व माझें पत्र पुढें देतो.

Poona 19 Sept. 1929

Dear Punditji,

I very much appriciate your idea of a Demand for a 'New order of society.' In fact that is the spirit of the age we live in.

I fully cuncur with the spirit of the Lucknow-Youth-conference resolutions. I herewith send to you a paper about "The tyranny of the Hindu-marriage Sacrament."

I am of course unknown to you. But I think "comrades in arms" need not have pre-acquaintances. Wish you all success.

Yours in India's service

**Kashinath N. Kelkar**

या पत्राला पंडित नेहेरू यांनीं लहानसेंच पण ताबडतोब उत्तर पाठविलें तें पुढीलप्रमाणें--

Allahabad, Sept. 23rd, 29

Dear friend,

Thank you for the reprint of your paper which you have sent. It is very interesting and should prove helpful to those interested in the subject.

Yours sincerely

**J. Nehru**

यानंतर **'स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा'** हें पुस्तक लिहून मी प्रचार केला. त्यांत साताराचे श्री. वाग्भट देशपांडे, बडोद्याचे राजरत्न वा. वि. जोशी वकील व श्रीमती बाळूताई खरे यांची मदत झाली. या पुस्तकाची पहिली आवृत्ती पंधरा दिवसांत खलास झाली. भोर, सांगली, मिरज, औंध येथील संस्थानिकांनी या उद्योगाबद्दल अत्यंत प्रशंसापर उद्‌गार काढून स्त्रियांच्या हक्कांबाबत कमिटी नेमून आपण खटपट करूं असें आश्वासन दिलें. पण बडोदे व म्हैसूर या प्रगतिपर संस्थानांनीं केवळ आश्वासनावरच न थांबतां कमिटी नेमून इतके उत्तम रिपोर्ट लिहिले कीं ब्रिटिश हिंदुस्थाननें त्याचा कित्ता घ्यावा !

या विषयांत मी लक्ष घालण्याचें कारण असें कीं 'कायदा' या शब्दाचा निष्कारण पुष्कळांना बाऊ वाटतो. माझ्या पूर्वीहि 'मनोरंजन' मासिकांत एक दोघां वकिलांनीं हिंदु-कायद्यासंबंधीं लिखाण केलें होतें. पण तें इतकें क्लिष्ट होतें कीं सामान्य मनुष्यानें त्या विषयाची अढीच घ्यावी ! वास्तविक धर्मशास्त्र मूळ संस्कृतांत. त्यांतल्या कल्पना तुमच्या आमच्या नित्य व्यवहारांतल्या. असें असता हा विषय सोप्या, साध्या मराठी भाषेंत कां सांगतां येऊं नये ? 'स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा' या पुस्तकामुळें असें सिद्ध झाले कीं ( १ ) हिंदु कायदा लोकांना सहज समजेल असा मराठी भाषेंतहि

लिहितां येईल. (२) स्त्रियांना तो सहज समजेल. (३) त्याचा प्रचार करतां येईल. याबाबत दोघां-तिघांचे अभिप्राय पुढें देतो:—

(१) श्रीमंत बाबासाहेब पंतसचिव, भोर—

"तुमचें पुस्तक वाचून समाधान व आनंद वाटला. बहुजनसमाजाला या प्रश्नाचें शिक्षण देण्याला तुमच्या पुस्तकाचा फार उपयोग होईल. सामान्य लोकांना या बाबतींत फारच अस्पष्ट व पुसट कल्पना असतात.

(२) श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई:— "आपल्या पुस्तकांतील लेखमाला मी काळजीपूर्वक वाचली. खरोखर आपण ही फार मोठी कामगिरी करीत आहां याबद्दल मी आपलें अंतकरणपूर्वक अभिनंदन करितो. पोर्तुगीज कायद्यान्वयें येथें स्त्रियांना इस्टेटीचा समान हक्क आहे. म्हणजे मुलगा व मुलगी यांना सारखीच वाटणी आहे."

बॅरिस्टर जयकर आपल्या पत्रांत लिहितातः—

Bombay 23-8-1929

Dear Mr. Kelkar.

Thank you very much for sending me a copy on "Women's rights." I am glad you have devoted your best thought to the question discussed in your pamphlet.

I have carefully followed your criticism of the "Gains of learning Bill." I appreciate it very much. I shall make use of one or two original arguments which I have found in your criticism. I should like you to send me a clearer statement of what amendment you want to be introduced in my Bill. I shall then consider the desirability of incorporating it in the measure.

I met Tatyasaheb in my chamber last evening. I am very glad that you are being trained under his personal supervision for your future both as an editor and as a public man. I wish you all success in your efforts

Yours sincerely,

M. R. Jayakar.

माझ्या या उद्योगाची ती. तात्यांना दखल असे व मीहि वेळोवेळीं त्यांना दिल्लीस कळवीत असे. एका पत्रांत त्यांनी लिहिलें, "तुमच्या पत्रांतील मजकूर वाचून फार आनंद झाला. असेंच उमेदीनें मन नेहेमीं प्रसन्न ठेवून काम करीत जावें. म्हणजे त्याला

रूप येईल. घरच्या सर्व कामांत दक्षता ठेवावी व त्या कामांत आतां मी नाहीं असें समजून चालावें. बॅ. जयकर यांनीं तुमचें छोटें पुस्तक वाचलें. त्यांनी त्याची फार प्रशंसा केली. विद्याधनाचे बिलासंबंधीं तुमच्या उपसूचना फिरून लिहून मजकडे पाठवाव्या. कदाचित ते या खेपेस चर्चेस निघेल."

जयकर यांच्या विद्याधनाच्या बिलांत माझ्या मतें एक महत्त्वाची दुरुस्ती हवी होती. पण त्यांनीं त्या सूचनेचा स्वीकार न केल्याकारणानें विद्याधनासंबंधीं केसरींतील माझे लेख व उपसूचना मी तात्यांचेकडे दिल्लीस पाठविली. त्यांनी माझी उपसूचना असेंब्लीपुढें मांडून त्यावर भाषणहि केलें. ता. १५ फेब्रुवारी १९३० चे पत्रांत ते लिहितातः—

"तुमचें पत्र, केसरींतील उतारे वगैरे मिळाले. व त्यांचा मी जयकर यांचे बिलावरील भाषणांत भरपूर उपयोग केला. **किंबहुना तुम्हीच असेंब्लींत बोलला म्हणाना ?** मुलाकडून बापाला त्याच्या कामांत अशी मदत झाली म्हणजे बापाला किती आनंद वाटतो याचा अनुभव मला परवा आला. माझ्या भाषणाची प्रत हातीं आली म्हणजे तुमचेकडे पाठवीन. त्यावरून तुम्हांस कळून येईलच. केसरींत कोणते लेख लिहावें याचे धोरण ठेवल्यास व सोईसोईनें घेतल्यास केसरींत पुनः पूर्ववत तुमचे लेख येऊं लागतील. पण विषय थोडाथोडा बदलत जावा."

या पत्रानें मला मूठभर मांस आल्यासारखे वाटले. तात्यांनी माझी उपसूचना असेंब्लींत मांडली, त्यावर भाषण केलें, आणि "आज तुम्हींच असेंब्लींत बोलला असें म्हणाना ?" असें मला लिहिलें, याहून अधिक चांगलें प्रशस्तिपत्र तरी दुसरा कोण देऊं शकेल ?

या पत्रामुळें हिंदु कायद्यावर संशोधनात्मक उत्तम पुस्तक आपण लिहूं शकूं असा आत्मविश्वास माझे मनांत उत्पन्न झाला व किरकोळ संशोधनात्मक लेख न लिहिता पुस्तकच लिहावे ही गोष्ट मी त्याच दिवशी मनाशीं मुक्रर केली. पहाडांतून मार्ग आक्रमण करीत असतांना एकेक घाट ओलांडल्यावर नवा क्षितिजप्रांत पुढें यावा असें माझ्या बाबतींत होत होतें.

१९३० च्या मार्चमध्यें महात्मा गांधींनीं सत्याग्रहाची चळवळ सुरू केली ती सहा महिने जोरांत होती. सप्टेंबरामध्यें गांधी—आयर्विन तहाच्या वाटाघाटी फसल्या आणि राजकारणाची हवा पुनः कुंद झाली आणि इतर विषयांना महत्त्व येऊं लागले. देशांतल्या सनातनी वर्गाला म. गांधींची सामाजिक मतें मुळींच मान्य नव्हती. पण हिंदुसभेची तरी होती काय ? तीहि नव्हती. यामुळें स्वमतावर गंडातर येणार या कल्पनेनें काशीच्या धर्मवृंदांनीं, 'वर्णाश्रम-स्वराज्य-संघा'ची स्थापना केली, आणि पक्षाच्या संघटने-

करितां श्री. लक्ष्मणशास्त्री द्रविड व त्यांचे चिरंजीव राजेश्वरशास्त्री द्रविड यांनी दौरा काढला असून त्याकरितां ते पुण्यांत आले होते. तात्यांनी त्यांच्याहि प्रसिद्धी-पत्रकांना केसरींत योग्य ती जागा दिली. नाहीं म्हटलें नाहीं. अनेक ठिकाणीं त्यांचा सत्कारहि झाला. तात्यांचेबद्दल आदर असल्यामुळें उभयतां पितापुत्र शास्त्रीद्वय तात्यांना घरीं भेटण्यास आले होते. त्यावेळीं मीहि तेथेंच होतो. मला पाहून तात्यांना उद्देशून लक्ष्मणशास्त्री सौजन्यानें म्हणाले, "आम्हीं महाराष्ट्रांत पुष्कळ ठिकाणीं हिंडलों, पण तात्यासाहेबांचे सारखे पिता व यांच्यासारखे पुत्र अशी जोडी दिसली नाहीं !" यावर तात्या कांही बोलले नाहींत व मलाहि फार संकोचल्यासारखें झालें. कारण तात्यांना शोभण्यासारखा मुलगा अशी कुठें आहे माझें अंगी विद्वता किंवा योग्यता ? तथापि या प्रसंगाने ओघानेंच सनातनी पक्षांतील मंडळींनीं अशी गोष्ट सुचविली कीं, धर्म-परिवर्तनवादी पक्षातर्फे मीं एक व्याख्यान देऊन पूर्वपक्ष करावा व दुसऱ्या व्याख्यानांत पंडित राजेश्वरशास्त्री द्रवीड यांनीं त्याचा उत्तरपक्ष करावा ! या सुमारास 'नव्या स्मृतीची आवश्यकता' हें माझें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें असल्यामुळें प्रतिपक्षा-कडून आलेली व्याख्यानाची संधि मी अवश्यमेव स्वीकारली, आणि त्याप्रमाणें व्याख्यानहि दिलें. दुसरें दिवशीं राजेश्वरशास्त्री यांनीं स्वतंत्र रीतीनें उत्तरपक्ष मांडला. काशींतल्या एका प्रमुख विद्वानाबरोबर मी शास्त्रार्थाचा जाहीर रीतीनें वाद करणार याचें फार कौतुक आणि कुतूहल असल्यामुळें दोन्ही दिवशीं सभांना अतिशय गर्दी होती. सभांतून प्रश्नोत्तरांच्या चकमकी झडून ही व्याख्यानें उत्तम रंगली. माझ्या व्याख्यानाला डॉ. मुंजे हे अध्यक्ष असून श्री. संपतराव गायकवाड, प्रो. वि. ब. नाईक, बाबासाहेब पटवर्धन, चित्रावशास्त्री, भालाकार भोपटकर वगैरे अनेक विद्वान माणसें हजर होती. ती. तात्याहि समोरच बसून माझें व्याख्यान ऐकत होते. माझें व्याख्यान विद्वत्तेच्या दृष्टीनें सरस नव्हते, पण माझें म्हणणें मी साधार वकिली कौशल्यानें धीटपणें मांडूं शकलों. त्यांत मी माघार घेतली नाहीं. पण ही हकीगत माझी मीच सांगण्यापेक्षां नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्रांतील उताराच पुढें देतो :—

## 'नवी स्मृति' हवी कीं नको ?

## केळकर व काशीचे पंडित यांचेमधील वादविवाद

"उत्तर हिंदुस्थानांत काशी व दक्षिण हिंदुस्थानांत पुणें" अशी म्हणच आहे. दोन विद्वानांची तोंडें दोन विरुद्ध दिशांना असावयाचीं. त्यांतून काशी व पुणें म्हणजे उत्तर ध्रुव व दक्षिण ध्रुवाचीं टोकें. एक सनातन धर्मशास्त्राला कवटाळणार व दुसरा धर्मांत परिवर्तन होतें व केलें पाहिजे असें म्हणणार. ही दोन परस्पर विरुद्ध टोकें गेल्या आठवड्यांत एकत्र येऊन त्यांचा उत्तर–प्रत्युत्तरादाखल वाद झाला. पण तो जितका

सणसणीत तितकाच उभयपक्षीं आदरानें व प्रांजल बुद्धीनें झाल्याकारणानें परस्पर निंदेची उष्णता प्रत्ययाला न येतां, मार्मिक धर्मचर्चेचा प्रकाशच त्यांतून उत्पन्न होऊन तो श्रोत्यांच्या अनुभवास आला. ॲडव्होकेट का. न. केळकर यांचीं प्रगतिपर मतें लोकांना सुविदित व तीं काशीच्या एका पंडितासमोर तावून सुलाखून निघावयाची असल्यानें समाज भरपूर होता. त्यांत डॉ. मुंजे, भालाकार भोपटकर, पाठकशास्त्री, प्रो. नाईक, बाबासाहेब पटवर्धन, श्री. न. चिं. केळकर, श्री. संपतराव महाराज गायकवाड इत्यादि बडी मंडळी हजर होती. सनातनी लोकांच्या दृष्टीनें हिंदुमहासभा सुधारक, अर्थात् व्याख्यात्यांच्या दृष्टीनें डॉ. मुंजे हे आयत्यावेळीं अध्यक्ष लाभले हें चांगलेंच झालें.

श्री. केळकर यांनीं अस्खलितपणें दीड तास भाषण केलें. त्यांत आवेश तसेंच परानुनयाचें वकिली कौशल्यहि होतें. ते म्हणाले, "काशीचे पंडित धर्मसंचारार्थ बाहेर पडले हें काळ बदलल्याचें लक्षण. पूर्वेचा सूर्य पश्चिमेला उगवला ! पण जितके समाजांत येऊन पंडितजी अधिक बोलतील तितके ते अधिक गुंतलेच जातील. शारदा-बिलाचा हा एक उपकारच म्हटला पाहिजे. शारदा बिलाविरुद्ध सत्याग्रह करण्याचें वर्णाश्रम संघानें प्रतिज्ञा पत्रकांत घातलें आहे. पण घोडा मैदान लांब नाहीं. धर्माचा खण-खणीतपणा सनातनी लोकांत किती आहे हें तरी त्यानें दिसेल. वर्णाश्रमसंघ चातुर्वर्ण्याची संघटणा करावयाची असें तोंडानें म्हणणार. पण 'ब्राह्मणेतरांना वेदोक्ताचा अधिकार आहे कां ?' असें विचारलें तर, पांडव किती बाजेच्या खुरा इतके चार, तीन, दोन व एक अशी त्यांची स्थिति होते. श्री. संपतराव गायकवाडांना तुम्ही क्षत्रिय नाहीं असे सनातनी म्हणणार काय ? मनुस्मृतींत त्रैवर्णिकांना वेदाधिकार दिलेच आहेत. पंडितजी अस्पृश्यता मानणार; पण हिंदुस्थानांत हा पांच कोटींचा प्रश्न आहे. अस्पृश्य तुम्ही आम्ही निमेनिम वांटून घेऊं असें महंमदअल्लीनीं वेशरमपणानें म्हटलें त्याची कांहीं लाज आम्हां हिंदूंना वाटावयास हवी कीं नको ? अस्पृश्य तरी दुसरें काय मागतात ? उदक हें असें शरीराचें जीवन तसेंच देवालय व धार्मिक पूजा हें आत्म्याचें जीवन नव्हे काय ?

"धर्मांतराची तीच गोष्ट. खऱ्या वंशाचे मुसलमान सात कोटी नाहींत. मुसलमान मूळचे साठ लक्ष असतां हिंदुना बाटवून साठ लक्षांचे सात कोटी झाले ! एका पुरुषानें धर्मांतर केलें कीं नाइलाजानें त्याची बायको मुलें वगैरे सर्व कुटुंब मुसलमान होतें. हें थांबविण्याला निदान एका धर्मांतराच्या बाबतींत तरी घटस्फोटाचा हक्क हिंदु स्त्रीला हवा कीं नको ? घटस्फोटाचा मी ॲडव्होकेट नाहीं ! (हंशा) पण अपवादानेंच उलट नियम सिद्ध होत नाहीं काय ? योग्य अपवाद लग्नाच्या बाबतींत मान्य करणें हें समाजाच्या जिवंत बुद्धीचें लक्षण होय. तीस कोटी हिंदूंचे धर्मांतरानें बावीस कोटी उरले व त्यांतून पांच कोटी अस्पृश्यांना आम्ही घालवायास लागलो तर आमची बुद्धि भ्रष्ट झाली असें म्हटलें पाहिजे ! शारदा बिलाचा प्रश्न सोडून द्या. आज मी त्याला काडी-

चेहि महत्त्व देत नाहीं. पण अकरा कोटी हिंदूंचा प्रश्न कसा सोडवावयाचा ? या व्यवहाराचा चातुर्यानें कसा समन्वय करितां हे सांगा. केवळ शास्त्रवचनांचा समन्वय करण्यापेक्षां याकडे अधिक लक्ष द्यावयास पाहिजे. आम्हांलाहि थोडें बहुत शास्त्र कळतें व शास्त्राकडे पाहण्याची आमची दृष्टि वेगळी आहे. शब्दप्रामाण्याला मी महत्त्व देत नाहीं 'आचारः प्रथमो धर्मः,' तसेंच 'युक्तिहीने विचारे तु धर्महानिः प्रजायते' हें आमचें शास्त्र आहे," सरते शेवटीं तर्क–प्रामाण्याला मान देणारीं अनेक शास्त्रवचनें वाचून दाखवून श्री. का. न. केळकर यांनीं आपलें भाषण संपविलें.

यानंतर एक आर्यसमाजी गृहस्थ व श्री. बाबासाहेब पटवर्धन यांची भाषणें झाल्यावर गो. म. जोशी यांनीं "बीचमें मेरा चांदभाई" या न्यायानें आपलें वंशशास्त्राचें घोडें पुढें दामटून श्रोत्यांना हंसविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचे म्हणणें किती फोल आहे हें दाखवून विडंबनाचें शस्त्र कसें दुधारी असतें हें डॉ. मुंजे यांनीं त्यांच्या चांगलें प्रत्ययास आणलें ! काश्मीर, पेशावर, मलबार येथें मुसलमानांच्या जाचामुळें आज काय स्थिति आहे याबद्दल चक्षुर्वैसत्यं अशा कांहीं गोष्टी त्यांनीं सांगितल्या त्या खरोखरच शहारे उत्पन्न करण्यासारख्या होत्या. कित्येकांनीं मांसाशनाचा नाजूक मुद्दा डॉक्टर साहेबांपुढें काढला. डॉ. मुंजे यांचे स्वतःचें वर्तन उघडच होतें. मांसाशन आजच्या विशिष्ट परिस्थितिकरितां कोणी केले तर निषिद्ध मानूं नका, इतकेंच त्यांनीं समर्थन गेलें. चालू परिस्थितीला योग्य असें धर्मपरिवर्तन घडवून आणण्याला जुन्या शास्त्रवचनांचेच हवे तितके आधार सापडतात. हिंदुसमाज फार प्राचीन व त्यानें समाजाचीं इतकी स्थित्यंतरें पाहिली आहेत कीं, आजच्या परिस्थितीला जुना दाखला व जुनें शास्त्रवचन सांपडणार नाहीं असें बहुधा होणारच नाहीं. व नवी स्मृति करावयाची म्हणजे नव्या परिस्थित्यनुसार जुन्या वचनांचा संग्रह करून नवी ग्रंथरचना करावयाची हाच रा. केळकर यांचा अर्थ आहे असें त्यांनीं सांगितलें. यावर पंडित राजेश्वरशास्त्री यांनीं मुंजे यांनां कोटीने अडविण्याचा प्रयत्न करून विचारलें, "न सुरां पिबेत" असें शास्त्रवचन असतां "सुरां पिबेत" असें अर्धेच वचन नव्या स्मृतींत तुम्ही घ्याल का ? यावर डॉ. साहेबांनीं "न मांसभक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने । प्रवृत्तिरेषाभूतानां निवृत्तिस्तु महाफला ॥ या मनुच्या गंभीर तत्वज्ञानाचा उद्देश तारतम्यानें घ्यावयाचा असतो; तसेंच "सत्यानृतें मिथुनी कृते" याप्रमाणें जगाची रचना कशी झाली आहे तें शंकराचार्यांनीं मार्मिकपणें कसें विवेचन केलें आहे तें सांगून फार सुंदर, समतोल व तत्वज्ञरीतीनें व्याख्यानाचा समारोप केला.

दुसऱ्या दिवशीं पंडित राजेश्वर शास्त्र्यांचे पूर्वपक्षास प्रत्युत्तर असल्यानें सभेचा दिवाणखाना गर्दीनें भरून गेला. "धर्मांत बदल होत नाहीं" या पक्षाचें समर्थन म्हणून रा. नानासाहेब वैद्य अध्यक्ष होते. पंडितजींनींहि आपलें भाषण सुरेख केलें. त्यांत विद्वत्ता, प्रांजलपणा, कोटीबाजपणा असल्यानें त्यांचें भाषणहि निरपवाद झालें. इतकेंच

नव्हे तर प्रतिपक्षालाहि तें आवडण्यासारखे होतें. काशीचे पंडित स्वराज्यविन्मुख आहेत या प्रश्नाला वर्णाश्रम स्वराज्य संघातच ‘ स्वराज्य ’ हा शब्द आहे, असें त्यांनीं चोख उत्तर दिलें. पण बाकीचीं उत्तरें खात्री पटविण्यासारखीं नव्हतींच. ‘ आम्ही शास्त्रशरण, बोलून चालून पराधीन. आम्हांला प्रहार करण्यांत काय अर्थ ’? शास्त्रांत वचन असलें व समन्वय करण्याच्या शास्त्राप्रमाणें त्यांचा योग्य अर्थ होत असला तर तो आम्ही कां न मानूं ? शास्त्रवचनें असली तर ती आम्हाला दाखवा. थोडक्यांत सांगावयाचें तर, धर्मसंशोधन किंवा नव्या काळाला अनुसरून धर्मपरिवर्तन होणार असले किंवा होणें अवश्य असलें तर ते आम्ही मानूं. **पण तें सशास्त्र असेल तर !** ” ज्यांना धर्मशास्त्र यत्किंचितहि कळत असेल त्याला वरील उत्तरांत काय खोंच आहे ते कळेल. पण त्यांतहि वावगें नाहीं. पुण्यामध्यें तर्कप्रखर सुशिक्षित समाजापुढें बोलत असतां विधवाविवाह, शारदा कायदा, अस्पृश्यस्पर्श या अनेक प्रश्नांना एकदम अधार्मिक म्हणून धुडकावून न देतां आपलें म्हणणें मांडण्याला पंडितजींना फार कौशल्यानें कसरत करावी लागली. “ वेदांत बालविवाहाला निश्चित असें विधिवचन दाखवा ” असा त्यांना आदल्या दिवशीं केळकर यांनीं जाहीर रीतीनें प्रश्न विचारला होता. पण त्या प्रश्नाला त्यांनीं उत्तर दिलें नाहीं ! यावरून शास्त्राप्रामाण्याचा अभिमान धरावयाचा म्हटला तरी सनातनी लोकांच्या दुराग्रहाला वेदांचा आधार किती हेंहि लोकांना परस्पर दिसलेंच. एतावता काय, नवीन बिकट परिस्थिति काशीच्या पंडितांना कबूल, धर्मपरिर्तन व्हावयास पाहिजे हेंहि त्याना कबूल, फक्त शास्त्राप्रमाणें तें तसें करितां येतें कीं नाहीं येवढीच पंडितजीना शंका ! असो. हृदयग्रंथी एका क्षणांत उलगडत नसतात. काशीच्या पंडितांची आजवर स्थिति निष्कारण कूप-मंडुकासारखी झाली होती; संचारानें हें ग्रह पालटतील अशी आशा करण्यास जागा आहे. ”

( महाराष्ट्र–ऑक्टोबर १९३० )

पुणें ही एक वादभूमि आहे. अनेक बौद्धिक वाद तेथे हमेशा झडत असतात. स्त्री–शिक्षण ही आज एक सर्वमान्य किंवा राजमान्य गोष्ट झाली आहे ना ? पण ऐशी वर्षांपूर्वी स्त्रियांना शिक्षण देणें ही केवढी भयंकर गोष्ट समजली जात असे ! टिळक-भांडारकर यांचे वेळी संमतिवयाचा वाद, तुळशीबागेंतील सभा, क्रीडाभुवनांतील दंगे या गोष्टी पुण्यांतच झाल्या आहेत. आणि माझ्या वेळीं काळ बदलला असला तरी लोक कांहीं बदललेले नव्हते ! शारदा बिलाचे वेळीं माझेविरुद्ध अहिताग्नि राजवाडे यांच्या मंदिरांत सतत महिनाभर, तीस दिवस व्याख्यानें झालीं ! “ नव्या स्मृती ” संबंधी मी पुस्तक लिहिले त्याही वेळीं माझेविरुद्ध महिनाभर व्याख्यानें होत होती. या सगळ्या व्याख्यानांना व्यक्तिशः उत्तर देण्याच्या मी भानगडीत पडलो नाहीं. कारण तसें करणें म्हणजे वाऱ्याशी भांडण होय ! पण संधि साधून केसरींत “ नव्या स्मृतीचे टीकाकार ” या नांवानें एक झणझणींत लेख लिहून माझ्या दांभिक टीकाकारांची मी इतकी खरपूस हजेरी घेतली की त्यानंतर माझ्या कोणी वाटेस गेलें नाहीं ! माझ्या पुस्तकाबद्दल आणि

चळवळींबद्दल जाणतें लोकमत काय होतें हें दर्शविण्याकरिता कांहीं उतारे पुढें देतो: —

**श्री. सदाशिवशास्त्री भिडे** यांनीं केसरींत लिहिलें– " प्रस्तुत पुस्तकावरून विद्वान लोकांना धर्मसंस्करणाचा विचार करण्याची वेळ आली आहे असें वाटले तर या पुस्तकाचें काम झाले असें म्हणण्यास हरकत नाहीं "

श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांनी ' किर्लोस्कर'मध्यें लिहिले : –

" श्री. का. न. केळकर यांच्या पुस्तकावर बरेच अभिप्राय प्रसिद्ध झालेलें आमच्या पाहण्यांत आहेत. केसरींतील सदाशिवशास्त्री भिडे यांचेहि परिक्षण वाचलें तें आम्हांस मान्य आहे. रा. केळकरांनीं काशीच्या पंडितापुढें आपला विषय धडाडीनें मांडला, हें उत्तम केलें. आजपर्यंत कांहीं थोड्या स्मृति झालेल्या नाहींत; शेंदीडशें स्मृति झालेल्या आहेत ! मग आणखी एखादी स्मृति झाली म्हणून काय बिघडलें ? पण जुन्या पक्षाला हें मान्य नाहीं. कोणीतरी हा विषय धडाडीनें पुढें मांडावयास हवा होता. तें काम रा. का. न. केळकर यांनीं केलें याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. "

**ज्ञानप्रकाशनें लिहिलें**– " प्रगतशील माणसाच्या मनांत जे विचार वावरत असतात त्यांचेच संकलन या पुस्तकांत सुसंगत रीतीनें केलेलें आहे आणि या दृष्टीनें हें पुस्तक नवमतवादी समाजास संग्राह्य असें झालें आहे. नव्या स्मृतीच्या आवश्यकतेसंबंधी ज्यांना जुन्या शास्त्री लोकांशीं वाद करावयाचा असेल त्यांना प्रस्तुत निबंधांतलें पहिलें प्रकरण " मनुस्मृतिसार " चांगलें उपयोगी पडण्यासारखें आहे. रा. केळकर यांनीं हा निबंध परिश्रमपूर्वक लिहिलेला असून सनातन धर्माभिमानी लोकांस जसा तो निरुत्तर करणारा आहे त्याचप्रमाणें विचारप्रवर्तक व मार्गदर्शक असा आहे.

**'वैनतेय'**( सांवतवाडी )– श्री. केळकर यांची भाषा प्रौढ व अलंकृत असल्यामुळें विषयाचा रुक्षपणा कोठेहि जाणवत नाहीं. विचारस्वातंत्र्य हा मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे हें मान्य असणारांना हें पुस्तक निःसंशय आवडेल. "

रत्नागिरीच्या **'बलवंत'** पत्रानें लिहिलें, " मराठी वाचतां येणाऱ्या व समजणाऱ्या प्रत्येक हिंदूनें हें पुस्तक अवश्य मनःपूर्वक वाचावें. "

**संपादक ' हिंदु '** ( गोवा ) आपल्या अग्रलेखांत लिहितात–" श्रीयुत काशिनाथपंत केळकर यांच्या लेखनांत त्यांच्या वडिलांच्या मनोहर वाग्विलासाची इतकी झांक मारते कीं लेखनकला ही देखील वंशपरंपरागत मालमत्ता होऊं शकते कीं काय अशी शंका आल्यावाचून राहात नाहीं. प्रस्तुत पुस्तकाची पृष्ठें शंभरापेक्षां कमी असून किंमत अवघी आठ आणे आहे आणि एवढ्यावरून किंवा पुस्तकांतील मोहक भाषासरणीवरून त्यावर अभिप्राय द्यावयाचा असता तर त्याला आम्ही हें अग्रलेखाचे स्थान खात्रीनें दिलें नसतें. पण या पुस्तकाच्या रूपानें हिंदु समाजासमोर निदान महाराष्ट्रीय हिंदु समाजासमोर जो प्रश्न ग्रंथकर्त्यानें व्यवस्थितपणें आणि मार्मिकपणें आणि त्याहीपेक्षां अधिक कळवळ्यानें ठेवला आहे तो अतिशय महत्त्वाचा असल्यामुळें त्याल

हें ( अग्रलेखाचें ) स्थान न देणें म्हणजे त्या प्रश्नाच्या गंभीर स्वरूपाकडे दुर्लक्ष केल्या-सारखें झालें असतें. ”

मुंबईच्या “ **नवाकाल** पत्रानें लिहिलें:– “ महाराष्ट्रांतील एका नामवंत लेखकाचे चिरंजीव या नात्यानें श्री. केळकर यांचा व्यासंग व लेखन ही दोन्ही त्यांस भूषणावह आहेत. आजच्या काळांत योग्य अशी नवी स्मृति करण्याच्या लायकीचे बुद्धिमान पुरुष आज आहेत अशी भाषा एका लेखांत कै. आगरकरांनीं वापरलेली असून, नव्या स्मृतीच्या आवश्यकतेची कल्पना संमतिवयाच्या वादाइतकी जुनी आहे. अलीकडे मुसल-मानांस किंवा शीखांस हिंदु करून घेण्याचा प्रश्न उपस्थित झाल्यापासून नव्या स्मृतीची आवश्यकता विशेष जोरानें प्रतिपादन केली जात असते. ‘ नवी स्मृति ’ हवी म्हणणारा एक पक्ष असून दुसरा नको म्हणणारा पक्ष आहे. त्यांत चिंतामणराव वैद्यासारखे हिंदु-धर्माचें शास्त्रज्ञान व इतिहास यांत पारंगत असलेले अतिरथी महारथी आहेत. श्री. का. न. केळकर हे ‘ नवी स्मृति ’ हवी म्हणणाऱ्या पक्षातलें आहेत हें निराळे सांगावयाला नको. ”

वरील उताऱ्यांवरून माझ्या उद्योगाबद्दल जाणतें लोकमत काय होते हे दिसून येईल. विद्वत्तेकरिता महशूर असलेल्या पुण्यांत शास्त्रार्थाचा सार्वजनिक वाद करणें हें सोपें काम नाहीं ! त्यांत तुमची विद्वत्ता व कर्तबगारी या दोहोंचीहि परीक्षा होते. पण मलाहि ही परीक्षा जाहीर रीतीनें केव्हां तरी एकदां देण्याची हौस आली होती. शारदा-बिलाचा आणि ‘ नव्या स्मृती ’चा असे दोन वाद मी केल्यामुळें मला स्वतःच्या कर्तब-गारीचा प्रत्यय आलाच, पण सार्वजनिक रीतीनेंहि माझी मानमान्यता वाढली.

या सालांत मी गोव्याच्या साहित्यसंमेलनाला जाऊन आलो. तसेंच दिल्ली सिमला येथें जाऊन असेंब्लीची बैठक पाहिली व नंतर घरीं येऊन कामकाजाला लागलो. तात्या असेंब्लीला गेले म्हणजे त्यांची सगळीं कामें मी टीप ठेवून करीत असे. पत्रांतून मोजक्या एकेक शब्दांत ते काम लिहीत:–

ता. २५-१-१९३० चे पत्रांत त्यांनी लिहिले, “ तुमचे पत्र पोचलें. जी. के. भोपटकर यांच्या संबंधानें नक्की विचार मीं परत आल्यावर करीन. तोपर्यंत हे प्रकरण तसेच ठेवावे. डहाणू येथील कामांत नीट लक्ष घालून ते चालू ठेवावे. ते महत्त्वाचे काम आहे. त्यांत चूक होऊ नये. त्या प्रकरणाचें अखेर कांहीही होवो. पण यावरून, तुम्ही हायकोर्ट वकील या नात्यानें तुमची परिक्षा केली जाईल. व प्रकरण तुमच्या कारणांनीं बिघडल्यास तुमची सनद रद्द करण्यांत येईल ! घरची कामें पुण्यास येतांना विसरून आलों आहें. येथे त्याची आठवण करीत नाही. तुमचे छोटे पुस्तक वाचलें. लेख फार चांगले आहेत. ”

ता० २३ जानेवारीच्या पत्रांत केसरीत लिहिण्याविषयीं मजकूर आहे :– "तुमच्या केसरींतील नोटा वाचल्या. चांगल्या आहेत. शक्य तितकें अधिक लिहिण्याची संधि द्यावी व सहीवरहि लेख घालण्यास हरकत नाहीं. मात्र ते चांगले असले म्हणजे झाले. जाहीर रीतीनें वाचकांस परीक्षा देण्यास भीड कसली?"

दिल्ली, ५ मार्चचे पत्र :–आशीर्वाद विशेष- तुमची प्रकृती हल्लीं बरी नसते असें कळलें होतें. आतां कशी आहे? कोणतीहि गोष्ट मनाला लावून घेऊं नये. ऑफिसचे कामाबद्दल तुम्ही लिहिलें नाहीं, तें लिहावे. गोखले यांजकडून करार दुरुस्त होऊन आला किंवा नाहीं, किंवा इतक्या तुमच्या खटपटीनंतरहि तें काम बिघडणार आहे? परंतु तें बिघडले तरी तुम्ही त्याची काळजी करूं नये. आपलें काम आनंदानें करीत जावे. गोष्टीची प्रुफें अद्याप आली नाहींत. मराठी पुस्तक संपलें कीं नाहीं? माझें व्याख्यान अजून लिहून होत नाहीं. पत्रोत्तर यावें."

हिंदी टिळक चरित्राबद्दल ता. १५ चें पत्रांत त्यांनीं लिहिलें:–

"आशीर्वाद विशेष. गोखले यांस आज वेगळें पत्र घातलें आहे. त्यांजकडून करार सही होऊन आला म्हणजे कळवावें. हें काम हातावेगळें निघालें म्हणजे तुमची एक मोठी कामगिरी हातावेगळी होईल. **या कामीं मजपेक्षांहि तुम्ही अधिक आस्था व चिकाटी दाखविली आहे.** यामुळें हें काम यशस्वी व्हावें अशी इच्छा वाटतें. केसरी सोळा पानांचा झाल्यावर तुम्हांला अधिक अवसर मिळेल."

वरील पत्रांवरून हें दिसून येईल कीं, तात्यांच्या अनेक कामांत मीच जवळ जवळ त्यांचा खासगी चिटणीस होतो. त्यांचा खासगी व सार्वजनिक पत्रव्यवहार माझे नजरेखालून जात असे. त्यांच्या पुस्तकाच्या आवृत्त्या काढणें, नवी पुस्तकें प्रकाशित करणें किंवा त्याकरितां करार करणें, या सर्व गोष्टी मीं माझ्याच नांवे करीत होतो व त्याला त्यांची संमति होती. या कामांत घरांतील इतर कोणी लक्ष घालीत नसे. मी त्याबद्दल विशेष आस्था दाखवून त्यांच्या वाङ्मयाची **आठ हजार पाने** प्रसिद्ध केली. या गोष्टीनें ते इतके संतुष्ट झाले कीं, त्यांच्या प्रसिद्ध अप्रसिद्ध, लिखित अलिखित, तसेंच यापुढेंहि होणाऱ्या सर्व वाङ्मयाचा हक्कदार मला एकट्यालाच करावें ही गोष्ट त्यांनी निश्चित ठरविली होती. या सर्व वाङ्मयाचे कॉपीराईट हक्क त्यांनी मला बक्षीसपत्रानें दिले; त्यांत "हे हक्क तुम्हांस अपत्य वत्सलतेने तर दिलेच आहेत. पण तुम्ही **एकट्यानें** दहा वर्षें खपून माझ्या वाङ्मयप्रकाशनाचें काम केलें म्हणूनहि दिले आहेत" असें लिहिलें आहे! याहून माझा अधिक गौरव कोण कोणत्या शब्दांनी करूं शकेल?"

तात्यांनीं आणखी एक मोठी गोष्ट माझेकरितां या सालीं केली, ती म्हणजे गायआळींतील त्यांचे राहतें घर त्यांनीं बक्षीसपत्रानें मला बक्षीस देऊन टाकलें! गेली चोवीस वर्षें या घरांत त्यांचे वास्तव्य होतें, व याच घरांत त्यांचा राजकारणांतील सारा भाग्योदय आणि बोलबाला झाला होता. असें हें भाग्यशाली राहतें घर, मी वकील

होऊन त्यांच्या हाताशी आलो याकरितां त्यांनी मला बक्षीस दिले! यांत माझेबद्दल पुत्रवात्सल्याची त्यांचे मनांत केवढी उत्कट भावना होती तें दिसून येते. त्या घरांत एक फार मोठा अजस्त्र पिंपळाचा वृक्ष होता. तो फार उंच असून त्याचा विस्तार आजूबाजूच्या दोन तीन घरावर पसरला होता. जणूं काहीं एखादा महापुरुष अष्टौप्रहर आपल्या सावलीखाली आमचे रक्षण करीत होता. त्या वृक्षाची आठवण झाली म्हणजे मला नेहमी तात्यांची आठवण होते. तेहि एक महापुरुष होते. आणि केव्हा स्वप्नें पडली तरी त्या घरांत असतांना तात्या जसे दिसत तसेंच स्वप्नांतूनहि दिसतात. आज ते घर राहिलें नाहीं, पण माझ्या आठवणींतून तें जात नाहीं. शेंकडों पाहुण्यांची ये जा आणि कामानिमित्त इतरांची वरदळ याचें त्या घराला वरदान होतें. हिंदुस्थानांतला असा एकहि प्रसिद्ध मनुष्य नसेल कीं तो त्या घरांत येऊन गेला नाहीं. आमच्या घरी स्वयंपाकाला कोणी आचारी किंवा नोकर मनुष्य नव्हता. पण पाहुण्यांचा सर्व सोस एकट्या ताईला ( आईला ) आवरावा लागत असे; पण त्याकरितां ती कधीहि त्रासलेली किंवा वैतागलेली मी पाहिली नाहीं. सदैव अतिथि पाहुण्यांनी आपणाकडे यावे यांतच तिला गृहस्थाश्रमाची सारी धन्यता वाटत असे.

आमच्याकडे जे पाहुणे येऊन उतरत त्यांच्या स्वभावांत सर्व प्रकारचे नमुने असत. पण कित्येक असे असत कीं गृहस्थधर्मानें पाहुणचार करणाराचेंहि त्यानें सत्व घेण्याला उठावे. याबद्दल घडलेली एक गोष्ट सांगतो. एकदां कोणी एक वृद्ध संन्यासीबुवा दोन प्रहरीं आमचे घरीं आले. हे संन्यासी बहुधा गांजेकस असावेत. दाढी वाढविलेली, डोळे तारवटलेले; अंगांत जाकीट, व नेसते धोतर किंवा पंचा असा या स्वारीचा विचित्र पोषाख होता. आपण कवि ' केशवसुतां 'चे कोणी नातलग असें सांगून, सध्यां आपण संन्यास घेतलेला आहे, आणि मिळेल तसा चरितार्थ चालवितो असे त्यानें सांगितले. चहाची वेळ झाल्यामुळें, चहा घेतां कां ? असें तात्यांनी विचारले. त्यावर ' चहा घेत नाही ' असें त्यानें म्हटल्यामुळें आण्णानें कपभर दूध आणून दिले. " तूं काय शिकतोस ? " असें त्यानें आण्णाला विचारतांच " मी टिळक विद्यापीठाचा बी. ए. आहे " असें त्यानें सांगितले. नंतर बुवांना विडी ओढण्याची तल्लफ आली. तेव्हां त्यानें आण्णालाच काडी ओढून विडी पेटविण्यास सांगितले! तात्या हा प्रकार पहात होते पण बोलले नाहींत. दोन तीन काड्या फुकट गेल्या, तेव्हां तो आण्णाला बोलून गेला कीं, " अरे! तू एवढा टिळक विद्यापीठाचा बी. ए. असून माझी विडीहि तुला पेटवितां येत नाहीं ? "

झालें! तात्या जे इतका वेळ सोशीकपणानें सर्व पहात होते त्यांचा या शेवटच्या वाक्यानें तोल सुटून त्यांची तळव्याची आग मस्तकांत गेली. त्यांनीं अगदीं हडसून खडसून त्या संन्याशाला विचारलें कीं " मी तुमचें यथाशक्ति आतिथ्य केले असतां तुम्ही काय म्हणून हे शब्द त्याला म्हणालात ? तुम्ही संन्याशी झाला म्हणून साऱ्या जगाला

लाथ मारण्याचा अधिकार तुम्हाला आला काय ? म्हणे त्याला काडी पेटवितां येत नाहीं ! आणि तुम्हांला मात्र त्यावर विडी पेटवितां येते काय ? या क्षणीं येथून चालते व्हा ! पुनः माझ्या घराची पायरी चढलात तर खबरदार ! '

तात्यांचे हे जळजळींत रागांत बोललेले शब्द ऐकून संन्याशाची सारी ऐट जिरली आणि सपशेल माफी मागून त्यानें घरांतून काढता पाय घेतला.

तात्यांचे विषयीं दुसरी एक गोष्ट आठवते. एकदा तात्यांचे बरोबर मी दिल्लीहून परत येऊन पुण्याचे स्टेशनवर उतरलो; बरोबर अंतुकाका फडणीस होते. त्यावेळचे पुण्याचे स्टेशन इतके गचाळ होते कीं त्यांत सोय आणि शिस्त अशी कांहीं नव्हतीच ! उतारूंचे सामान हमाल रस्त्यावर आणून ठेवीत आणि तांगेवाले जवळ येऊ लागले कीं पोलीस आपल्या अधिकारांत त्याना जवळ जागेवर ठरू देत नसे. हे पाहून त्या पोलिसाशीं सामोपचारानें बोलण्याच्या हेतूनें हातांत वर्तमान पत्राची घडी होती त्यानें पोलीसाच्या अंगाला मी नुसता स्पर्श केला. तेव्हां एकदम चवताळून "तुम्ही माझे अंगाला काय म्हणून हात लावलात ?" असें स्वर चढवून त्यानें माझेशीं भांडण करण्यास सुरवात केली. तात्या जवळच दहा पावलावर होतें. भांडणाचा हा प्रकार पाहून ते तत्काळ माझे मदतीला धांवून आले आणि त्यांची पोलिसाशी पुष्कळ हमरीतुमरी झाली. पोलिस म्हणाला, "मी तांगा नेऊ देणार नाहीं !" तात्या म्हणाले 'मी नेणार !' असें म्हणून त्यांनी तांगेवाल्याला सांगून तो काढून नेला. मांजरीच्या पिल्लांवर कोणी हात उगारला म्हणजे तिचा जो रुद्रावतार दिसतो तसे यावेळी तात्या उग्र दिसत होते. असेंब्लीचा सभासद असणाऱ्या गृहस्थाबरोबर रस्त्यांतल्या एका भिकार शिपुड्यानें 'तुम्हाला काय समजते ?" असें म्हणून हुजत घातली याचे मला फार वाईट वाटलें व घरी गेल्यावर जेवणहि गेलें नाहीं. अशा कित्येक गोष्टी आज मनांत आल्या म्हणजे डोळ्यांत आंसवे येतात !

या काळांत म. गांधीनी मिठाचा सत्याग्रह करून कायदेभंगाची मोहीम सुरू केली, त्यांत तात्यांनीं दोन वेळा कायदेभंग केला, पण सरकारने त्यांना पकडलें नाहीं. सत्याग्रहांत ते सामील झाले, पण म. गांधीच्या आघाडीत न मिसळतां त्यांनीं आपली आघाडी स्वतंत्र ठेवली होती. कारण गांधीच्या राजकीय धोरणाच्या जंजाळात एकदां सापडले कीं त्यांची चळवळ कोणत्या मुद्यावर कशी बदलेल याची शाश्वति नव्हती व पुढें जेव्हा तहाच्या वाटाघाटी फसल्या तेव्हां तोच अनुभव आला ! तथापि दोन्ही पक्षांचा हेतू एकच असल्यामुळें, केसरींत त्यांनी या चळवळींचा पाठपुरावा केलाच, पण सर्व टिळक स्मारक मंदीराचें आवार कॉंग्रेसच्या शिबिराकरतां त्यांनी मुक्तद्वार ठेवले होतें. या सालच्या आरंभी केसरीचा सुवर्ण-महोत्सव झाला. त्याप्रसंगी त्यानीं केसरीच्या शिलकींतून तीन लाख रुपये बाजूला काढले व राजकीय कार्याच्या उपयोगाकरिता त्याचा सार्वजनिक ट्रस्ट केला. पूर्वी चिरोल केसच्या वेळीं लो. टिळकांना लोकांनी

तीन लक्ष रुपयांची पर्स अर्पण केली, त्या ऋणांतून लो. टिळकांना अनृणी करण्याकरितां ट्रस्टींनी हें तीन लक्ष रुपये लोकांचे लोकांना परत केले! त्यांत विशेष हें कीं, मुंबई, महाराष्ट्र, विदर्भ व कर्नाटक या प्रांतांना त्यांच्या राजकीय मतांना कोणतीहि अट न घालतां, त्यांना हव्या त्या कामाकरितां या रकमेचा विनियोग करण्याची मुभा होती! उदार मतवादित्वाचें असें लोकोत्तर उदाहरण साऱ्या हिंदुस्थानांत क्वचितच घडले असेल!

सत्याग्रहाच्या चळवळींत मी पडलों नाहीं. आणि कदाचित् तात्याच तुरुंगांत जाते तर नंतर त्या गोष्टीचा मी विचार केला असता! याचें कारण असें कीं माझ्या वकिली धंद्याचा अद्याप जम बसला नव्हता. आणि संधि मिळेल तर केसरींतहि शिरावें असे मन हेलकावे खात होतें. केसरी आणि टिळकबंधू यांचा वाद सुरू होता. तोंपर्यंत ट्रस्टींची मुलें कितीहि लायक असली तरी त्यांना केसरींत घेणें शक्यच नव्हतें. पण त्या वादाचा हायकोर्टांत निकाल झाल्यावर ही अडचण राहिलीं नाहीं. बाबा विद्वांस यांचे एका मुलाला केसरीत शिरण्याची विशेष इच्छा होती व त्याचा तात्यांचे मागे तगादा सुरू होता. तात्यांचा विचार असा कीं घेता आलें तर त्याला व मला असें दोघांना घ्यावें. एकालाच घेऊ नये! एक दिवस दुपारी बाबा विद्वांस घरीं आले असतां चहा घेतां घेतां बाबांचे मन पाहण्याकरितां तात्यांनीं सहज हा विषय काढला. "तुमचा ×× केसरींत आपणाला घ्यावें असें म्हणतों–" इतके शब्द तात्यांनीं उच्चारतांच, एकाच वाक्यांत बाबांनीं आपल्या मुलाबद्दल अगदीं निक्षून तिरीमिरीनें जें उद्गार काढले ते पाहून तात्यांनीं पुढें कांहींएक न बोलतां तो विषय सोडून दिला! बाबा जे शब्द बोलले ते प्रत्यक्ष येथें देण्याची इच्छा नाहीं. पण बाबांनींच आपल्या मुलाविरुद्ध मत दिल्यामुळें त्याचा विषय संपला, व त्याला न घेतां मला एकट्याला घेणें हें वाईट दिसेल म्हणून माझाहि विषय संपला! एक गोष्ट मात्र येथें मुद्दाम सांगतो ती ही कीं, केसरींत जाण्याची माझी कितीहि इच्छा असली तरी, 'मला केसरींत घ्या' अशी एका शब्दानेंहि तात्यांना मी पूर्वीं केव्हांहि गळ घातली नाहीं किंवा विनंति केली नव्हती. माझें मन त्यांना ठाऊक होतें. माझी लायकीहि त्यांना मान्य होती; आमच्या घरांत यावेळीं मला कोणी प्रतिस्पर्धी नव्हता, याकरितां अद्याप 'आपली वेळ आलेली नाहीं' इतकेंच समजून हा विषय मी सोडून दिला. कारण त्यांच्या अडचणी मला कळत होत्या. दुसरें असें की, तात्यांचे किंवा केसरीचें पुष्कळ काम मी घरीं तात्यांचे देखरेखीखाली करीतच होतों. यामुळें ही सहज आलेली संधि डावलली गेली याचें मला कांहींच वाटलें नाहीं.

या नंतर 'संस्थानी स्वराज्य' या वर्तमानपत्राचे मी संपादक व्हावे अशी इच्छा सांगलीचे गणपतराव अभ्यंकर यांनीं वामनराव पटवर्धन यांजजवळ व्यक्त केली. व तसें प्रत्यक्ष मला विचारण्यांतहि आलें होते, पण मीच त्यांना नकार दिला. कारण

मी संपादक व्हावयाचें म्हणजे कोठल्या तरी वर्तमानपत्राचें संपादक व्हावयाचे असा त्याचा अर्थ नव्हता ! संस्थानी स्वराज्याची चळवळ सुरू करणारांत तात्यांचे प्रमाणेंच वामनराव पटवर्धन हे प्रमुख होते आणि माझ्याबद्दल त्यांचे मनांत कौतुक होते. प्रजा-परिषद किंवा कोणचीहि संस्थानविषयक सभा पुण्यांत असली तर उपवक्त्यांच्या यादींत माझें नांव घालून ते मला बोलण्याची संधि देत. याच ऋणानुबंधाचा फायदा घेऊन मी विनंति करतांच 'संस्थानी राजकारण' हें तात्यांच्या लेखांचे पुस्तक त्यांनीं आर्यभूषण छापखान्यांत छापले. या पुस्तकांत 'आमचे स्वराज्यद्रोही छत्रपति,' 'इंदूरच्या राज्यावरील संकट' वगैरे कांहीं लेख फार बहारीचे आहेत.

कामानेंच काम वाढते आणि त्यांतच तुम्हांला नवे मित्र व सहकारी भेटतात असा मला अनुभव आला आहे. मी हाती घेतलेल्या सामाजिक चळवळींत मी असेच नवे मित्र जोडले. या काळांत श्री. शंकरराव किर्लोस्कर यांची विशेष ओळख झाली व मी एकदां किर्लोस्कर वाडीला जाऊन त्यांचा पाहुणचार घेऊन आलो. वाग्भट देशपांडे हे वयानें माझ्यापेक्षां सात आठ वर्षांनीं मोठे. ते नेमस्त पक्षाचे अनुयायी व अभिमानी, पण त्यांचा व माझा स्वभाव जमल्यामुळें त्यांची व माझी गट्टी जमली. भोर व औन्ध कायदेकौन्सिलांत ते सभासद होते. माझ्या मनांत एक कल्पना अशी आली कीं, ब्रिटिश हिंदुस्थानचा विस्तार पाहतां सामाजिक सुधारणांची बिलें कायदेमंडळांत पास करून घेणें फार कालावधीचें व श्रमाचें काम आहे. पण संस्थानिक जर अनुकूल असतील तर छोट्या संस्थानांच्या कायदेमंडळांतून या सुधारणा घडवून आणणें अवघड नाहीं. राजकीय सुधारणा प्रथम ब्रिटिश हिंदुस्थानांत व नंतर संस्थानांत होतात; पण प्रगतिपर सामाजिक सुधारणा प्रथम संस्थानांत व त्यांच्या अनुकरणानें नंतर ब्रिटिश हिंदुस्थानांत असें तरी कां होऊं नये ? भोरसारख्या एखाद्या जवळच्या संस्थानचा मी 'प्रजाजन' व्हावे याहि कल्पनेला वाग्भटांनीं पाठिंबा दिला होता. पण जुन्या कायदेमंडळाची मुदत संपून नवी येण्याला अवधि होता. याकरिता ती गोष्ट तितकीच राहिली. मात्र स्त्रियांचे वारसा हक्कांबद्दल भोर व शिरवळ येथें त्यांनीं एक दोन सभा केल्या त्यांत मी भाषण केलें. बडोद्यांतहि अशीच माझी व्याख्यानें झाली. या सभांना बाळूताई खरे याहि आल्या होत्या.कायद्याची भाषा लिहिण्यापेक्षां प्रचार सभांना त्यांचा उपयोग अधिक होत असे.

मग या वर्षी दुसरें कांहीं न करतां हिंदुधर्मशास्त्र सुधारणेबद्दल स्वतंत्र पुस्तकच लिहिण्याचें मी योजलें व एक वर्षभर खपून तें काम पुरें केले. या पुस्तकांत प्राचीन धर्मशास्त्र काय होतें, प्रचलित हिंदुकायदा काय आहे व त्यांत सुधारणा कोणत्या व कशा हव्यात, या तीनहि विषयांचें एकत्र, साधार व समर्पक वर्णन आढळेल. एक प्रकारें हा विषय इतका विस्तृत आहे कीं, यापैकी कोणताहि एक विषय नीट मांडावयाचा तर

त्याला चारपांचशें पृष्ठें सहज पाहिजेत. पण प्राचीन धर्मशास्त्र, कायदा, व सुधारणा हें तीनहि विषय सारखे नजरेसमोर राहतील अशी या पुस्तकाची सहेतुक रचना करून सर्व विषय मी अवघ्या पाचशें पृष्ठांत नीटपणें मांडला आहे. व तो सुद्धां सुबोध मराठी भाषेंत हाच माझ्या पुस्तकाचा विशेष होय. आजपर्यंत या विषयावर असें पुस्तक मराठी भाषेंत झाले नव्हते. ' हिंदु कोड ' १९५७ सालीं कायद्याच्या रूपानें अंमलांत आलें; पण तीस वर्षांपूर्वीं चळवळ करून व त्या विषयावर प्रत्यक्ष पांचशें पृष्ठांचा ग्रंथ लिहून मीच तें साकार केलें असें मला रास्त अभिमानानें म्हणतां येईल.

हिंदु कायद्यासंबंधानें अनेक वर्षें चिंतन केलें असल्यामुळें मला इतका आत्म-विश्वास होता कीं, शंभर पृष्ठाइतका मजकूर लिहून तयार असतांच मी तें पुस्तक छापावयास देखील सुरवात केली ! याचें तात्याना नवल वाटलें, पण नंतर ते कांहीं म्हणाले नाहींत. नंतर इतर ग्रंथ वाचून मीं एकेक प्रकरण लिहून तें छापून घेत असे. पण या पांचशें पानांत मी पूर्वीं एक लिहिलें व पुढच्या पानांत त्याचेशी विसंगत असें दुसरेंच कांहीं लिहिलें असें कोणास काढून दाखवितां येणार नाहीं ! आणि सर्व ग्रंथ एखाद्या चिरेबंद सुंदर कमानी प्रमाणें बांदेसूद व शोभिवंत झाला आहे. या ग्रंथासंबंधीं संपूर्ण कल्पना माझी स्वतःची असून बहुतेक सर्व लिखाण, ( एक दोन प्रकरणांतील पंचवीस तीस पृष्ठें सोडून ) सर्व माझ्याच हातचें आहे. चाळीस वर्षें लिहिल्यानंतर वाङ्मयांत माझ्या नांवावर काय शिल्लक राहील ? असें जर कोणी मला विचारलें तर, इतिहासांत 'शमीपूजन' आणि कायद्यात " हिंदु व्यवहारधर्मशास्त्र " या दोन पुस्त-कांची नांवे मला खात्रीनें सांगतां येतील. याबद्दल जाणत्या लोकांचे मत दर्शविणारीं कांहीं पत्रेंच पुढे देतो. कारण अखेर तिऱ्हाइताचे दृष्टीनें तुमच्या कामगिरीचें जें मोजमाप ठरेल तेंच खरें !

**श्री. चिंतामणराव वैद्य लिहितात–** " हिंदु व्यवहारधर्म-शास्त्र हें पुस्तक खोल अभ्यास आणि नवीन दृष्टि अशा दोन प्रशस्य गोष्टींचे फल आहे. मराठींत अद्याप हिंदु–व्यवहारधर्म-शास्त्र कोणी लिहिलेलें नाहीं. विषयवारी उत्तम केलीं असून प्रत्येक विषयांत ऐतिहासिक दृष्टि उपयोगांत आणली आहे. "

**श्री. ज. र. घारपुरे,** प्रिन्सिपाल लॉ कॉलेज पुणे हे लिहितातः– ' स्वतंत्र विचाराचें दृष्टीनें या पुस्तकाचे मोल विशेष आहे. हिंदु-कायद्यासंबंधीं ग्रंथकर्त्यांनीं जागजागीं आपले अभिप्राय स्पष्ट व स्वतंत्र रीतीनें व्यक्त केले आहेत हा या पुस्तकाचा विशेष असून त्याचा उद्बोधक परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. '

**राजरत्न, वासुदेव विनायक जोशी वकील लिहितात;**–हिंदु व्यवहारधर्म–शास्त्र हें पुस्तक सर्व दृष्टीनीं उत्कृष्ट असून या विषयावर लिहिलेल्या पुस्तकांत तें अपूर्व आहे. चालू कायदा कसा आहे याचें इतके सोपें, बिनचूक, साधार साद्यंत विवे-चन इतरत्र सांपडणार नाहीं. पदोपदी उत्कर्षास कुंठीत करणारें नाले ओढे अगर

खांचखळगे ओलांडून जाण्यासाठीं विधायक सूचनांचें जे पूलसांडवे संपादकांनीं जागोजागी बांधले आहेत त्यामुळे तर हा ग्रंथ अनन्यसामान्य झाला आहे. भाषेंतील लालित्य आणि समर्पक उपमांचे वैचित्र्य यांची जोड लाभल्यामुळें, कायद्यासारख्या रुक्ष विषयावरील हा ग्रंथ इतका आकर्षक झाला आहे कीं एकदा हातीं घेतला म्हणजे पुरा केल्याशिवाय खाली ठेववतच नाहीं. '

**वे. शा. सं. सदाशिवशास्त्री भिडे** :—हें पुस्तक मी समग्र वाचून पाहिलें. मराठी भाषेंत हें पुस्तक पहिलें तर आहेच पण याची बरोबरी करणारें दुसरें असें पुस्तक निघेल की नाही याची शंकाच वाटते. '

**श्री. किंजवडेकर शास्त्री,** मीमांसाविद्यालय पुणें, हे लिहितात :— ' तार्किकी व मीमांसक पद्धतीला अनुसरून या ग्रंथांत विवेचन केले असल्यामुळें मीमांसा विद्यालयातर्फे या ग्रंथाचा पुरस्कार करण्याला कोणतीहि हरकत वाटत नाही. धर्मशास्त्रावर संस्कृत टीकायुक्त ग्रंथ पुष्कळ आहेत ; परंतु आपल्या मराठी भाषेंत असा एकहि ग्रंथ नव्हता कीं जो कायद्याचा ग्रंथ वाचतांना कौतुक व आनंदहि उत्पन्न करील. '

**बॅ. मुकुंदराव जयकर लिहितात :—**

" I must congratulate you and your collaborator Miss Khare on the great skill and profundtiy with which you advocate your views. I am bound to say your book, on its merits, should stand very high in Marathi literature. "

**श्री. वाग्भट नारायण देशपांडे, वकील लिहितात :—**

"Like Mayne you have succeded in combining literary art with Law. I cangratulate you most heartily upon the book which I am sure will be the first work of its kind in Marathi Literature.

**श्री. ल. ब. भोपटकर, वकील, पुणें —**

" This nice production has supplied a longfelt want. The book contains not only a historical review of what the Hindu law was, and a correct statement of what it is at present but what is remarkable it contains bold suggestions as to what it should be. And all this is done in a language and manner which can be hardly improved upon. In fact the book contains from cover to cover, all the flavour and freshness of literary art, and that too as regards such a dry subject as law ! "

आर. एच. भालुणकर, वकील पुणें –

" Your suggestions will not only go to reform law, but would also simplify the same, with the happy result that litigations will become simple and rare. The various original texts given by you throughout the book speak well of your deep study, and I may be allowed to state, that in addition to the various constructive suggestions, the manner in which these tets are used throughout the work is by itself a glorious feature of your book. "

या पुस्तकाला ' हिंदु धर्मशास्त्र ' न म्हणा त्यांत ' व्यवहार ' हा शब्द घालावा असें ती. तात्यांनी सुचविलें व त्यांच्याच सूचनेवरून ' हिंदु - व्यवहारधर्म - शास्त्र हे नांव पुस्तकाला कायम केले. पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर एक दिवस किंजवडेकर शास्त्री तात्यांना भेटावयास घरीं आले व त्यांनी अभिप्रायाचें पाकीट माझे हातीं दिले. माझ्या पुस्तकावर शास्त्रीबोवा फार संतुष्ट झालेले होते व तसें त्यांनी तात्यांना बोलूनहि दाखविले. पण त्यांच्या पत्रांत मला माहीत नसलेली एक गोष्ट होती ती कळल्यानें मला विशेष आनंद झाला. ती अशी की " हिंदु धर्मशास्त्रावर एक ग्रंथ व्हावा असे लो. टिळकांचे मनांत फार होतें. आणि तात्यासाहेब केळकर यांनी तो ग्रंथ लिहिवा असें ते वारंवार बोलूनहि दाखवीत. ' त्यांनींच लिहावा ' असें म्हणण्याचें कारण असें कीं, श्री. केळकर यांची विचारसरणी नेहेमीं न्यायाधीशासारखी असते. पण अनेक सार्वजनिक व राजकीय कार्यव्यापृतत्वामुळें तात्यासाहेबांचें हातून ते काम झालें नाहीं. तथापि वडिलांचे उद्दिष्ट ' इंगितेन चेष्टितेन ' या न्यायानें रा. रा. काशिनाथ नरसिंह केळकर यांनीं आज पंधरा प्रकरणांचें पुस्तक हिंदु-व्यवहार धर्म-शास्त्र प्रसिद्ध केले आहे. "

तात्यांचे हांतून जें काम व्हावें अशी इतरांची अपेक्षा तें माझे हातून झाले, याहून माझ्या पुस्तकाचा अधिक गौरव किंवा प्रशंसा कोणती होऊं शकेल ?

असेच प्रशंसापर अभिप्राय ' ज्ञानप्रकाश ' व नागपुरचा ' महाराष्ट्र ' या पत्रांतून विस्तृत परीक्षणाचे रूपाने आले होतें. ज्ञानप्रकाशने तर या विषयावर अग्रलेख लिहिला होता. पण आणखी उतारे देऊन हा स्तुतीचा विषय वाढवीत नाहीं.

वर जी अनेकांच्या पत्रांतील उताऱ्यांनी माझी स्तुति मी उतरून घेतली आहे त्याबद्दल माझ्या मनाला संकोच वाटतो व त्याकरितां वाटल्यास वाचकांनीं मला क्षमा करावी. कोणी अनुकूल बोललें तरी बरेंहि वाटू नये असा विकृत स्वभावाचा मी मनुष्य आहे काय ? ही स्तुति करण्याला कोणाला मी भीड घातली होती काय ? किंवा याचना केली होती काय ? ज्यांनीं ही स्तुति केली त्यांनीं ती अवास्तव किंवा ढोंगीपणानें केली होती काय ? असेंहि मला उलट विचारतां येईल. पण ही स्तुति व्यक्तीची

नसते, त्याच्या कामाची असते हें विसरूं नये. त्याचे स्वरूपहि तात्कालिक, त्या कार्या-पुरतेंच असते. अशा प्रशंसेच्या उद्‌गारांनीं मनुष्याच्या आयुष्याचे दोन दिवसहि जात नाहींत! पण त्याचा खरा उपयोग असा कीं, ज्यावेळीं मनुष्य कांहीं कारणाने जगापुढून विस्मृतींत जातो, त्यावेळीं आपण केलेल्या कार्याचें समाधान हेंच अखेर त्याचेजवळ शिल्लक राहाते. स्वतःच्या मनाचें समाधान हेंच खरे बक्षीस नव्हे काय? वरील स्तुति-पर उद्‌गार हें मी 'मानपत्र' समजत नाहीं; तें माझे 'आत्मसमर्थन' आहे, इतकेंच वाचकानीं लक्षात ठेवावें!

४

# 'प्रभात' पत्राचें संपादकत्व

आतांपर्यंत माझ्या अर्ध्या आयुष्याची हकिगत मी सांगितली. तशीच पुढचीहि मी सांगितली पाहिजे अशी माझेवर कोणाची सक्ति किंवा बंधन नाहीं. कारण आत्मचरित्र म्हणजे कांही कोर्टांतील आरोपीची जबानी नव्हे! तथापि तीहि हकीगत थोडीबहुत पुढें सांगणार आहे. मात्र माझ्या पूर्वीच्या आयुष्यापेक्षां उत्तर आयुष्याचें चित्र वेगळें आहे! कारण १९३२ च्या अखेरीसच क्रमशः मला बहिरेपण प्राप्त होऊन वकिली सोडून द्यावी लागली. व त्याचा मनावर परिणाम होऊन माझें सार्वजनिक आयुष्य संपलें! पुणें सोडून देऊन मी मुंबईला जाऊन राहिलो. केसरी विषयींचे माझें सुखस्वप्न भंगलें. अशी पुष्कळ स्थित्यंतरें माझें आयुष्यांत झालीं. त्यावरून मला वाटतें कीं या जगांत ' दैव ' किंवा 'नियति' म्हणून कांहीं वेगळीच शक्ति प्रभावी आहे. जें तुमच्या मनांत असेल तेंच घडेल असें नाही; कांहीं वेगळेंहि घडेल. तुम्ही श्रीमंत असलात तर पुढील आयुष्यांत कदाचित् गरीब व्हाल. यशस्वी असलात तर अपयशाचे

धनी व्हाल; सुखी असाल तर दुःखीहि व्हाल. अशी स्थित्यंतरें न झालीं तर तें मानवी आयुष्य नव्हेच असें म्हणावें लागेल. आयुष्य हें 'नाटक' आहे म्हणतात तें याच अर्थानें. तुम्ही जर खरे 'कलावंत' असाल तर अपकर्षाच्या काळांत तुम्ही दुःखी होणार नाहीं. शुक्लपक्षांत चंद्राचें दर्शन सर्वांना हवेहवेसें वाटतें. पण वद्य अष्टमीचा चंद्र उत्तररात्रीं त्याकडे कोणाचेंहि लक्ष नसलें तरी, आपल्या अमृतमय प्रकाशधारांनीं सृष्टि उजळतच असतो. मनुष्याला सदोदित यश मिळणें हें चांगलें नाहीं. मनुष्याच्या मनाला अपयशानेंच पूर्णता येते. या काळांत जो आपले मोठेपण टिकवील त्याचेंच मोठेपण खरें. नेपोलियनच्या चरित्रवाचनानें माझे मनावर जर कोणती एकच एक गोष्ट बिंबली असेल तर ती हीच होय. आयुष्याच्या नाण्याच्या दोन्ही बाजू मी पारखून घेतल्या आहेत. सुखदुःख, आशानिराशा दोन्ही पाहिल्या आहेत. म्हणून माझें आयुष्याची हकिगत मी निर्विकारपणें सांगू शकतों. कित्येक चित्रकार आरशासमोर उभे राहून स्वतःचें चित्र काढतात. मीहि चित्रकारच आहे. छायाप्रकाश व रंगसंगतीचे साह्यानें माझें चित्र मला कसें काय साधतें हें मी पाहात आहें.

वकिली धंदा यशस्वी करण्यांत जो स्वभावाचा गुण लागतो तो माझ्यांत नव्हता म्हणा, किंवा मला बहिरेपण आड आले यामुळें म्हणा, हिंदु कायद्याचें पुस्तक संपताच माझ्या मनाची डळमळ सुरू झाली. पूर्वीच्या काळीं वकील फार थोडें असत व श्रीधर विठ्ठल दाते यांचेसारख्या मुखत्यार वकिलानीहि पुण्यांत मोठमोठे वाडे बांधले. त्यानंतर तिसऱ्या पिढींत माझ्या वेळीं या धंद्यांत इतकी भरती झाली होती कीं, "आठ सैपाकी आणि नऊ चुले" या म्हणीची आठवण व्हावी! इतक्या वकिलांना काम तरी कसें मिळणार? अनेकांचा धंदा दलालावर चालला होता. इतकें खालीं उतरणें माझ्या स्वभावांत नव्हतें. एक उतार वयाचा वकील काडीची प्राप्ति होत नसल्यामुळें "चार आणे देतां का?" म्हणून बाररुममध्ये हात पसरून चक्क भीक मागत असे! तेंहि पाहवत नव्हतें. कोर्टांत दररोज खेपा घालाव्या; काम नसले तर लायब्ररींत वाचीत बसावें, आणि संध्याकाळीं रिकाम्या हातानें घरीं परत यावें असें दररोज करण्याचा कंटाळा येऊं लागला. कोणाहि सीनिअर वकिलाची मला मदत नव्हती. आणि अनेक व्यापारी जरी 'आदरार्थे' तात्यांना फार मानीत तरी त्यांची कामांची वळणें इतर वकिलांकडे होती. याकरितां पुणें सोडून देऊन, सातारला वाग्भट देशपांडे यांचेकडे जाऊन वकिलीचा जम कसा काय बसतो हे पाहावें म्हणून सहा महिने मी सातारला जाऊन राहिलो. पण जेथें वाग्भटांची वकिलीच सामान्य चालत होती तेथें त्यांचा मला काय उपयोग होणार? म्हणून मनाचा निश्चय करून सरळ वकीलीच सोडून दिली; आणि चरितार्थाचा कांहीं उद्योग हवा म्हणून मुंबईच्या 'प्रभात' पत्रांत संपादकची नोकरी पत्करली. हें करितांना फार वाईट वाटलें; पण उपाय नव्हता. माझ्या सहवासाचा वाग्भटांना इतकाच उपयोग झाला कीं, न चालणारी वकिली राजरोस सोडून देऊन शिरवळला जाऊन राहण्याची त्यानांहि स्फूर्ति झाली!

‘ प्रभात ’ पत्राचे मालक श्रीयुत पांडोबा भागवत हे राजकारणांत तात्यांच्या प्रतिसहकार पक्षाचे अनुयायी असल्यामुळें संपादकत्वाची सर्व जबाबदारी माझेकडे देण्याला त्यानीं आनंदानें संमति दिली. विशेषतः एक महिन्याच्या अनुभवानंतर त्यांनीं तात्यांना पत्र लिहून कळविलें होतें कीं, “श्री. बापुराव यांना ‘प्रभात’चें कामावर आम्ही घेतलें आहे ते आपले चिरंजीव म्हणून नव्हे; तर त्यांची लायकी आहे हे जाणूनच घेतलें आहे. ” माझेपूर्वी अच्युतराव कोल्हटकर यांना तें सारा ९० रुपये पगार देत. मी पुणें सोडून मुंबईस राहणार म्हणून त्यानीं माझा पगार शंभर रुपये ठरविला तो मी आनंदानें मान्य केला. भागवत याचें पत्रांतील अच्युतराव कोल्हटकरांचें पगाराचा उल्लेख मी केला तो त्यांचेशी माझी तुलना करण्याकरिता नव्हे; लेखक व संपादक या नात्यानें त्यांची योग्यता माझेपेक्षा कितीतरी मोठी होती. पण पुढें सार्वजनिक जीवनात अधःपात झाल्यामुळें अच्युतरावाना अखेरचे दिवस फार कष्टात गेले, त्या दिवसातलें त्यांचे हे चित्र आहे ! त्यांचे कोणतेहि वर्तमानपत्र चालेना. व अखेरीस पांडोबा भागवत त्याना जो पगार देतील त्यावर त्याचा कसातरी चरितार्थ चालला होता.

‘ प्रभात ’ ऑफिसांतील संपादकीय जमाना म्हणजे अठरा धान्यांचे कडबोळे होतें. त्यात ‘ मौज ’ साप्ताहिक व छापखाना हें मिळकतीचें मुख्य साधन. ‘प्रभात’ वर्तमानपत्र हें भागवतांच्या राजकीय मताकरिता. तसेंच ‘ वसुंधरा ’ वर्तमानपत्र रांगणेकर काढीत असत. त्यालाहि केवळ धंद्याचे दृष्टीनें भागवतानी पाठिंबा दिला होता. या सर्व वर्तमानपत्राच्या संपादकाना भागवतानी पूर्ण मतस्वातंत्र्य ठेवलें होतें. याचा फायदा घेऊन रांगणेकर तात्यांची आपल्या पत्रांत नित्य हवी तशी कुचेष्टा व टवाळी करीत. एका ऑफिसात समोरासमोर असतांना अठरा महिन्यात ते माझेशी एक अक्षर बोलले नाहींत. आणि त्यांचे फाजील लिहिणें पाहून मीहि त्यांचेशी बोलण्याचं कारण नव्हते. माझे हाताखालची तरुण मुलें संपादकीय कामांत अननुभवी असलीं तरी त्याना हाताशी घेऊन दैनिकाचे काम मी आनंदानें करीत होतों.

१९३२ च्या कायदेभंगाचे चळवळीनंतर प्रेस ऑर्डिनन्सचा अंमल कडकरीतीनें जारी होता व कायदेभंगाला अनुकूल असें अक्षरहि सरकार लिहूं देत नव्हतें. क्षुल्लक वाक्याच्या संशयानेंहि वर्तमानपत्रांना दोन दोन हजार रुपयांचा भुर्दंड भरावा लागत असे ! मी संपादक असतां ‘ प्रभात ’ला जामीनकी भरावी लागली नाही, इतकीच माझ्या कामाची शिफारस मी समजतों. १९३२ सालीं निष्कारण कायदेभंगाची चळवळ गांधींनीं सुरू केली व कौन्सिल प्रवेशाला मान्यता द्यावी तेंहि गांधी करीनात. यामुळें राजकारणाची कुचंबणा झाली होती. टिळक पक्षांतले एक मातबर पुढारी बापूजी अणे यांचेवर गांधीजींनीं आपल्या मोहास्त्राचा प्रयोग केल्यामुळें, तात्यांचा बापूजींशीं केसरींतून जाहीर बेबनाव झाला होता. अशा स्थितींत आम्हीहि जें सुचेल तें लिहून मतप्रदर्शन करीत होतो. म. गांधीवर सडेतोड टीका करितांना तात्यांना कधींहि भीड वाटली नाहीं; पण

जेव्हां खुद्द टिळकपक्षांतच हें 'कृष्णार्जुन-युद्ध' जुंपलें तेव्हां मात्र तात्या रंजीस आले. बामणगांवकर, बाबासाहेब खापर्डे, नागपूरचे गोपाळराव ओगले यांनाहि बापूजी अणे गांधीजींचे 'हस्तक' बनले या गोष्टीचा अचंबा वाटत असे! एक दिवस सरदारगृहांत या त्रिवर्गाची व तात्यांची गांठ पडली असतां मी तेथें होतों. बापूजींचा विषय निघाल्या-वर बामणगांवकर यांना उद्देशून तात्या म्हणाले, "तुम्हाला जर कांहीं करतां येण्या-सारखें असेल तर, कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटींतली जागा बापूजींनीं सोडावी असें करा. कारण तेथेंच सगळा खटका आहे! बापूजींशीं आमचा मतभेद झाला याहून आतां होण्याचें कांही शिल्लक राहिलें आहे का?"

म. गांधी तुरुंगांत असतां ती. तात्यांचे बरोबर मीहि त्यांना भेटावयास गेलों होतों. यावेळी गांधींच्या सर्व राजकीय चळवळीवर बंदी घालून सरकारनें त्यांना फक्त अस्पृश्यता-निवारण्याची चळवळ करण्यास मुभा दिली होती. अस्पृश्यतानिवारणांत मंदिरप्रवेशाचेहि एक कलम होतें. पण मंदिरप्रवेश म्हणजे सभामंडपांत प्रवेश? कीं गाभाऱ्यांत प्रवेश? याबद्दल गांधींनीं कसलाहि खुलासा केला नव्हता. व "तसा सम-र्पक खुलासा ते न करतील तर, आततायीपणानें निष्कारण रक्तपाताचें प्रसंग ओढव-तील" असें मी त्यांना पत्र लिहिलें होतें. यावर म. गांधीनीं मोठ्या अगत्यानें स्वतःच्या हस्ताक्षरांत मला दोन पत्रें पाठवून उत्तरेंहि लिहिलीं होतीं. म. गांधीनीं बोलावल्यावरून चर्चेकरितां तात्या त्यांना भेटावयास गेले व अर्धापाऊण तास दोघांची मनमोकळे-पणानें चर्चा झाली. त्यांत प्रथम थोडा थट्टाविनोद, उपरोधिक भाषण हीहि गांधींच्या स्वभावाप्रमाणें होती. मंदिरप्रवेशासंबंधानें तात्यांनीं आपली कल्पना सांगतांच गांधीजी माझेकडे पाहून त्यांना विनोदानें म्हणाले– "तुमच्या काशीनाथानेंहि मला पत्रांतून हेच विचार लिहिले आहेत. मग त्यानें तुमचे विचार उचलले कीं तुम्ही त्याचेपासून उसने घेतलेत?" यावर तात्या म्हणाले, "छे छे: असें कसें होइल? मी त्याचे आधीं कित्येक वर्षें सार्वजनिक आयुष्यांत आहे. केली असली तर त्यानेंच माझ्या विचारांची उसनवारी केली असेल!"

म. गांधीशीं मी केलेला पत्रव्यवहार केसरींतहि प्रसिद्ध झाला होता. तो लहानसा असल्यानें गमतीखातर पुढें देत आहे –

## महात्मा गांधीचा खुलासा

### मंदिरप्रवेश म्हणजे गाभाऱ्यांत प्रवेश नव्हे!

सातारा ता. २० नोव्हेंबर १९३२

प्रिय महात्माजी,

अस्पृश्यता-निवारणासंबंधी अनेक पत्रलेखकांना उत्तरें लिहण्यांत आपणांस किती श्रम पडत असतील याची मला कल्पना आहे. तथापि एका महत्त्वाच्या मुद्यासंबंधी

आपणांकडून खुलासा होणें जरूर आहे. आपले मला खाजगी उत्तर न आलें तरी चालेल. आपल्या जाहीर पत्रकांतून आपण या मुद्यासंबंधी खुलासा केला तरी हरकत नाही.

सध्यांच्या देवालय-प्रवेशाच्या चळवळींत सहभोजन व मिश्रविवाह इत्यादि प्रश्नाचा अंतर्भाव होत नाही ही गोष्ट आपण स्पष्ट केलीच आहे; त्याचप्रमाणें मंदिर-प्रवेशाचें बाबतींतहि अस्पृश्यांनी देवळांत जाण्याची 'अंतिम मर्यादा' कोणती हेंहि आपण एकदा हडसून खडसून स्पष्ट केलें तर बरें होईल. आपल्या सर्वसाधारण लिहिण्यांत हा मुद्दा ध्वनित होत असला तरी निश्चित व स्पष्ट झाला नाहीं. तीर्थरूप तात्यासाहेब केळकर यांचे मताने देवळाचा गाभारा व सभामंडप यांचे मध्यें जी सीमारेषा असते तीच या बाबतींत स्पृश्यास्पृश्य अशा सर्वांना समान अशी मर्यादा समजावी व खुद्द गाभाऱ्यांत रोज देवाची प्रत्यक्ष पूजा करणाऱ्या अधिकृत इसमाखेरीज कोणी जाऊच नये. मलाहि हेंच मत मान्य आहे.

आपणांला माहीत असेलच कीं, अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाचे बाबतींत अनेक ठिकाणीं निरनिराळ्या रूढि प्रचलित आहेत. कांहीं वर्षांपूर्वी मद्रास इलाख्यांत या प्रश्ना-संबंधी भांडणें फार विकोपाला जाऊन कांहींची मजल प्रिव्ही कौन्सिलापर्यन्त गेली होती. मद्रासचे जस्टिस पॉल अप्पास्वामी यांनी आपल्या पुस्तकांत यासंबंधाने कित्येक मनो-रंजक उदाहरणें दिलीं आहेत. कोर्टें हींहि एक प्रकारें ( न्याय ) शास्त्रशरण असतात. पण जेथे त्यांना आपला विवेक अमलांत आणण्याचें स्वातंत्र्य होते तेथे त्यांनी वर निर्दिष्ट केलेली मर्यादाच अस्पृश्यांना घालून दिली हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

गाभाऱ्याचें पावित्र्य आंजपर्यन्त न्यायकोर्टांनी अबाधित पाळलें आहे. व हा मुद्दा इतका नाजूक व सामान्य जनतेच्या जिव्हाळ्याचा आहे कीं, अविवेकाने किंवा चांगल्या हेतूने देखील कोणीं या बाबतींत अतिप्रसंग केला तर हिंदुसमाजांत दुफळी होऊन क्वचित् ठिकाणीं रक्तपातापर्यंतहि मजल गेल्याशिवाय रहाणार नाहीं ! अस्पृश्य लोक यापुढें मंदिरांत प्रवेश करणार तर ते कोठपर्यन्त जावेत हा महत्त्वाचा मुद्दा आपल्या सर्वसामान्य लिखाणांतून तितकासा प्रमुख रीतीने स्पष्ट झाला नाही. माझ्या लिहिण्याने जर आपला गैरसमज होणार नसेल तर मी असेंहि म्हणतो कीं, आपल्या मतें ही मर्यादारेषा कोणती असावी याची लोकांना अद्याप तितकीशी कल्पना नाहीं ! असे पुष्कळ लोक मीं नांवें घेऊन सांगू शकेन कीं, एरवी अस्पृश्यता निवारणाचे ते कट्टे पुरस्कर्ते असताहि अस्पृश्यानी गाभाऱ्यात जाऊन मूर्तीला स्पर्श करावा ही गोष्ट त्यांना मान्य नाही व त्याकरिता एखाद्या देवळाच्या गाभाऱ्यात जाण्याचा त्यांना स्वतःला हक्क असला तरीहि प्रतिमेचें पावित्र्य अबाधित राखण्यासाठी ते स्वतः हा हक्क सोडण्यासहि तयार होतील. मंदिरप्रवेशाचा जो कार्यक्रम आपण हल्ली अंगिकारला आहे त्याच्या हिताच्याहि दृष्टीने मी असें म्हणेन कीं, मूर्तीच्या पावित्र्याबद्दल एकंदर बहुजन-

समाजाची जी एक तीव्र भावना आहे ती लक्षात घेतलीच पाहिजे !

मंदिरांचे मालकांचे 'दिवाणी हक्क' अगर ट्रस्टींच्यावर असलेल्या "कायदेशीर जबाबदाऱ्या" या गोष्टीहि आपण लक्षांत घेतल्या नाहींत असें म्हणावेंसें वाटतें. "सार्वजनिक देऊळ" किंवा "सार्वजनिक ट्रस्ट" ही कल्पना पौर्वात्य नसून बरीचशी पाश्चिमात्य आहे. इंग्रजी कायद्याच्या संसर्गानें ती आपणाकडे आलेली आहे. इतिहासकालांत किंवा अगदी प्राचीन काळापासूनहि आपल्या देशांत दातृत्व व धर्मबुद्धी यासंबंधानें अशी परंपरा आहे कीं, मनुष्यानें संपत्ति मिळवावी, पण खासगी रीतीने देवालयें, अन्नछत्रें, विहिरीं, तळीं इत्यादि बांधून त्याचा उपयोग मात्र सार्वजनिक रीतीनें होऊ द्यावा. म्हणजे ( Private Charitable Trusts or Endowments ) यासारखे त्याना स्वरूप आहे. कालिकतचे झामोरिन यानी आपणाला जाहीर उत्तर दिलें कीं "गुरुवायूरच्या देवालयासारखीच हिंदुस्थानांतील हजारो देवळांची स्थिति आहे; व ट्रस्टी या नात्यानें ट्रस्टच्या स्पष्ट शब्दानी जी बंधनें घातलीं आहेत तीं लक्षांत घेता, अस्पृश्यांच्या आकांक्षा कितीहि रास्त असल्या तरी या बाबतींत कायदेशीर सल्ला घेऊनच ट्रस्टीनीं आपलें धोरण ठरविलें पाहिजे." हें उत्तर अगदींच चूक आहे असें मला वाटत नाहीं. ट्रस्टींच्यापुढें आज दोन मार्ग आहेत--( १ ) मंदिरप्रवेशाबाबत नवा कायदा होऊन काद्याच्या स्पष्ट शब्दांनी ट्रस्टींवर जुनी रुढी कायम ठेवण्याची आज असलेली कायदेशीर जबाबदारी संपली पाहिजे; किंवा ( २ ) रेफरेंडम घेऊन लोकमतानें निःसंदिग्धपणाने ट्रस्टींना तशी अनुज्ञा दिली पाहिजे. मी स्वतः लोकशाहीचा पुरस्कर्ता असल्याकारणाने माझे असें स्पष्ट मत आहे कीं, लोकच आपल्या काळाचे मालक आहेत व रूढि बदलण्याचाहि हक्क त्यांनाच आहे. सामाजिक कायदे पास होण्यापूर्वी प्रथम लोकमत तयार झालें पाहिजे असेंहि माझे मत असल्याने, रेफरेंडमची आपली कल्पना मला फार फार पसंत आहे. लोकांनी आपणाला हवें तें ठरवावें. "अस्पृश्यतेचा कायद्याने नायनाट झाल्याशिवाय माझे कधीहि समाधान होणार नाहीं" हे आपले मागील प्रायोपवेशनाच्या वेळेचे उद्गार पाहतां कालिकतचे झामोरिन यानी स्वीकारलेलें धोरण काही अगदीच चूक नाही असेंच उलट शाबीत होत नाहीं काय ? म्हणजे कायद्याची वस्तुस्थिति आज विशिष्ट प्रकारची आहे ही गोष्टी दोघांनाहि मान्यच आहे. माझे इतकेंच म्हणणें कीं, देवालयाचे ट्रस्टी झाले तरी ते बिचारे कायद्यानें बांधलेले व एक प्रकारें परिस्थितिशरण आहेत. ते म्हणजे 'देशाचे शत्रु' आहेत असा त्याच्यावर गहजब करण्यांत येऊ नये !

तरी आपण देवालय-प्रवेशांत अस्पृश्यांची अंतिम मर्यादा किती हें आपल्या जाहीर पत्रकांत स्पष्ट कराल अशी आशा आहे.

आपला

काशीनाथ नरसिंह केळकर

## महात्मा गांधीचे उत्तर

येरवडा २१ नोव्हेंबर.

माझ्या परम स्नेह्याचे तुम्ही चिरंजीव या नात्यानें तरी तुमच्या पत्राचें उत्तर घालणें माझें कर्तव्यच आहे. गर्भागार म्हणजे प्रतिमास्थानच ( Sanctum Sanctorum ) असेल तर तें फक्त पूजाधिकाऱ्यालाच ( Ritualists ) राखून ठेवलें पाहिजे असें मीं स्पष्ट म्हटलें आहे. झामोरिन यांचेपुढें सध्या जी शृंगापत्ति उभी आहे त्या अडचणीबद्दल मलाहि सहानुभूति वाटते. जेथें कायदा हा सुधारकांचे विरुद्ध असेल तेथें त्यांनी तो बदलून घेईपर्यंत वाटच पाहिली पाहिजे. कालांतराने या प्रश्नाबद्दल मीं विशेष विस्तृत खुलासा करीनच. तोंपर्यंत शक्य त्या त्या रीतीने या सुधारणेला आपण मदत कराल अशी आशा आहे.

आपला

एम्. के. गांधी

म. गांधी तुरुंगांत असतांनाच त्यांच्या चिरंजीवांचे सी. राजगोपालचार्य यांचे मुलीशीं लग्न ठरलें असावें. हा असवर्ण विवाह होता. म्हणजे मुलगी ब्राह्मण व मुलगा वैश्य. तथापि राजाजी व महात्माजी दोघेहि व्याही समान संस्कृतीचे असल्यामुळें त्यांच्या मुलामुलीच्या विवाहाला हरकत नव्हती. हिंदुशास्त्राप्रमाणें असवर्ण विवाह होऊं शकतो. पण त्यांत वर वरिष्ठ वर्णाचा लागतो. कन्या ब्राम्हण व वर वैश्य असें चालत नाही ! याकरितां हिंदुपद्धतीप्रमाणें विवाह झाल्यावर लग्न रजिष्टरहि करणार, असें वर्तमानपत्रांत जाहीर झालें होतें. मला हिंदु कायदा चांगला कळत असल्यामुळें यांत चूक होत आहे असें वाटलें. लग्न रजिष्टरपद्धतीनें अगोदर केलें व नंतर स्वतःचे समाधानाकरितां वैदिक पद्धतीनें तुम्ही होम सप्तपदी केली तर त्यांत कोणाचीच आडकाठी नाहीं. पण आधीं वैदिक विवाह केला तर, रजिस्ट्रार याला तें लग्न रजिष्टर करतांच येत नाहीं ! कारण रजिस्ट्रेशन कायद्याप्रमाणें " "आमचे यापूर्वी कोणाशीहि लग्न झालेलें नाहीं " असें वधु आणि वर यांना शपथेवर, लेखी अफिडेविट करावें लागतें याची वाट काय ? म. गांधीचा मुलगा माझा कोणी नातलग नव्हता; त्याकरितां त्यांचें लग्न कायदेशीर किंवा बेकायदेशीर याची उठाठेव करण्याची मला गरज नव्हती ! पण तेंहि मनाला बरें वाटेना. कारण म. गांधीप्रमाणें विवाहाबाबत माझे विचार सुधारकाचेच होते. म्हणून त्या कोणालाहि पत्रे न लिहितां बापूजीं अणे यांचे मार्फत अप्रत्यक्षपणें ही गोष्ट म. गांधी यांचे कानावर घालावी असें ठरविलें. कारण यावेळीं कॉंग्रेसचे सर्वाधिकारी या नात्याने बापूजी अणे हें गांधींना फार जवळचे होते. सदर लग्नाचे कायदेशीरपणाबद्दल मी उपस्थित केलेली शंका बरोबर असल्यामुळें, बापूजींनीं ती गोष्ट मुद्दाम राजगोपालाचार्य यांना कळविली. बापूजींनी मला लिहिलेलें पत्र पुढीलप्रमाणें:—

" तुमचें ता. १९ चें पत्र मिळालें. कायदेभंगाची चळवळ स्थगित करण्यासंबंधानें 'प्रभात' मधील तुमचा लेख वाचला. नागपूरच्या 'ॲडव्हेकेट' मध्येंहि यासंबंधाने लेखकानें काही सूचना केल्या आहेत. तथापि या संबंधानें आज मी कोणतेंच मत प्रकट करू इच्छित नाहीं. डॉक्टरांचा सल्ला व म. गांधींची प्रकृति या गोष्टी विचारांत घेऊन मी योग्य दिसेल तें केलें.

दुसरी महत्वाची बाब म्हणजे म. गांधीच्या चिरंजिवांचे लग्नाची. त्याबद्दल तुम्ही आस्थेनें पाठविलेला निरोप डॉ. चिंतोपंत आठवले यांनीं मला मुंबईच्या स्टेशनावर ता. १५ रोजी कळविला. पुण्यास आल्यावर मी ताबडतोब 'पर्णकुटी' बंगल्यांत महादेवभाई देसाई यांची गांठ घेतलीं ( कारण राजगोपालाचार्य यांची गांठ पडूं शकली नाहीं ) आणि सप्तपदीनंतर जर लग्न रजिष्टर केलें तर, " आमचा विवाह पूर्वीं झाला नव्हता " असे अफिडेविट करतां येणार नाही; व लग्न बेकायदेशीर ठरेल ही अडचण त्यांना नीट समजावून सांगितली. बनारसचें श्रीप्रकाश यांनीहि लांबलचक पत्रांत ही गोष्ट राजगोपालाचार्य यांना यापूर्वींच कळविली असल्यानें, काहीं विचारविनिमय करून त्यांनीं यांतून मार्ग काढला. नक्की काय केलें तें मात्र कळलें नाहीं. तथापि आपले कर्तव्य या दृष्टीनें वेळीच ही गोष्ट मी त्यांच्या नजरेस आणली. महादेवभाई देसाई किंवा राजगोपलाचार्य या दोघांनाहि, ही सूचना करणाऱ्या तुमचें नांव कळूं नये अशी तुमची इच्छा असल्यामुळें, बोलण्यांत तुमचे नांवाचा मी उल्लेख केला नाही. कळावे. "

आपला

**मा. श्री. अणे**

राजकारणाव्यतिरिक्त कांही वाङ्मयविषयक वाद त्यावेळीं गाजत होते. त्यांत प्रो. ना. सी. फडके यांच्या 'प्रतिभासाधन' पुस्तकामुळें गाजलेला वाङ्मयचौर्याचा वाद, अश्लीलता व व्यक्तिविषयक टीकेच्या मर्यादा, यावर सांगोपांग चर्चा करून एक खास अंकच मी नागपूरच्या साहित्यसंमेलनाचे निमिताने काढला. प्रतिभासाधन कमिटीनें सदर पुस्तकाची शहानिशा करून जो निर्णय केला त्याचा सारांश प्रसिद्ध होतांच, प्रतिभा म्हणजे काय ? प्रतिभा ही परमृत असते काय ? वाङ्मयऋणाच्या मर्यादा कोणत्या ? यांवर दर अंकांत तात्त्विक चर्चा करून मी लागोपाठ पांच लेख प्रभातमध्यें लिहिले. एका इमर्सनच्या लेखांच्या पुस्तकाशिवाय हाताशीं कोणतेहि संदर्भग्रंथ नव्हते. तथापि आपल्या वाङ्मयशक्तीची परीक्षा घ्यावी त्याप्रमाणें, उत्स्फूर्तपणानें लिहिलेला हा लेख माझ्या उत्तम लेखांपैकीं आहे असें मी म्हणेन. दैनिकांत छापला गेल्यामुळें तो लेख विस्मृतींत पडला होता. पण अलिकडे **" दोन घटका मनोनरंजन "** या माझ्या निबंधांच्या पुस्तकांत मी तो पुनर्मुद्रित केला आहे.

पण मराठी दैनिकाला खरें म्हटलें तर पांडित्य किंवा विद्वत्ता यापेक्षां दुसराच कांहीं गुण अंगी असावा लागतो. ही गोष्ट आज माझे लक्षांत येते. तो गुण म्हणजे उघड्या डोळ्यांनीं जग पाहणें, त्यांत रमणें, आणि कसेंहि करून जगण्याची ईर्ष्या धरणें हा होय. दैनिकाचे जग म्हणजे धकाधकीचा मामला आहे. फाजील नाजूक प्रकृतीच्या माणसाचे तें काम नाहीं. आणि वर्तमानपत्राच्या धंद्यांत तो यशस्वीहि होणार नाहीं. माझे वर्म म्हणजे कोणी तात्यांची टवाळी किंवा निंदा करणें हें होते. आणि दुर्दैवानें त्यावेळीं मुंबईत एकहि वर्तमानपत्र असें नव्हतें कीं ज्यांत तात्यांचेबद्दल कांहीं चटोर मजकूर येत नव्हता. अशाहि विपरीत परिस्थितींत डॉ. सावरकर किंवा इतर व्यक्तींच्या ओळखी करून त्यांत बसणें उठणें, किंवा आपलाहि एक निराळा फड किंवा गट निर्माण निर्माण करणें, ही जर गोष्ट मी केली असती तर भागवत त्याला कांही नको म्हणत नव्हते! एक दिवस डॉ. सावरकर सहज प्रभात ऑफिसमध्यें आले असतां मला आपु-लकीनें म्हणाले, “ तुम्ही इथें कसे ? जो तो आपल्या ‘ स्थानावर ’ असला म्हणजे बरें असतें ! ” ‘ आपल्या स्थानावर ’ याचा अर्थ, त्यांचे मतें ‘ केसरीवर ’. पण या त्यांच्या प्रश्नाला मी काय उत्तर देणार ? मनांत मी कष्टी झालो. कारण मला केसरीवर घेण्याची बाब केवळ तात्यांचे हातची होती! घरचा ‘केसरी’ असतांना हा मुलगा तात्यांना सोडून ‘ प्रभात ’मध्यें येऊन राहिला, त्या अर्थी दोघांमध्यें क्वचित् कांहीं स्वभावभेद किंवा बेबनाव तर नसेल ना ? अशीही शंका कांहींना असेल. हा विचार मला असह्य होत असे. तात्यांचे व माझे मतांत किंवा मनांत कसलाहि भेद नाहीं, बाहेर संपादकाची नोकरी मी मिळविली तर केसरीवर त्यानी मला घेण्याला लोकांच्या दृष्टीने लायकीच्या वेगळ्या पुराव्याची जरूर नाहीं, हे माझ्या मनांतले विचार मी लोकांना कसे पटविणार ? तात्पर्य, जेथे काम करावें तेथें खरोखर मन नाहीं, आणि जेथें मन आहे तेथें संधी नाहीं, अशी मनाची द्विधा वृत्ति झाली होती ! याकरितां प्रभात पत्रांत नांव मिळवावें अशी ईर्ष्याच मनात उत्पन्न होईना !

एक दिवस अग्रलेखाचें काम आवरल्यावर कॅशिअर राजवाडे यांचे टेबलापाशीं गप्पागोष्टी मारण्यासाठीं जाऊन बसलों व त्यांना विचारलें “ आपल्या प्रभातचे वर्गणीदार किती? ” तोपर्यंत माझी कल्पना अशी कीं, केसरीप्रमाणें दैनिकाला कांही हजार वर्गणीदार तरी असलेच पाहिजेत. त्यांनीं समोरची वही उचलून माझे हातीं दिली. तो त्यांत फक्त वीस वर्गणीदार ! “ काय फक्त वीसच वर्गणीदार ? मग तुम्ही अंक तरी काढतां किती ? ” असें मी आश्चर्यानें विचारलें. त्यावर “ आम्ही पांच हजार अंक काढतों, कोठे संप किंवा दंगे असले तर दहा हजारहि खपतो. दैनिकपत्र केवळ जाहिरातीवर चालतें. त्याला वर्गणीदार असलेच पाहिजेत असें नाहीं. तो कांहीं ‘केसरी’ नव्हे, कीं आगाऊ वर्गणी भरून तो घ्यावा. असाच अग्रलेख पाहिजे अशीहि दैनिकांत अपेक्षा नसते. अग्रलेखाचे जागेत तुम्ही कांहीहि लिहिलें तरी चालतें ! कारण दैनिकाचा अग्रलेख कोणी वाचीत

नाहीं ! आमच्या पांडोबांनीं पाहिलें कीं, तुम्ही एक सज्जन मनुष्य आहां. म्हणून त्यांनीं तुम्हांला संपादक म्हणून नेमलें आहे ! ”

राजवाडे यांचे हे प्रांजळ दिलखुलास उद्‌गार ऐकून माझे डोक्यांत स्वच्छ प्रकाश पडला ! जेथें वर्तमानपत्राला वर्गणीदारच नाहींत तेथें तें वर्तमानपत्र उद्यां काढलेंच पाहिजे असें संपादकावर बंधन नाहीं; उलट, वर्गणीच भरलेली नसल्यामुळें अमुक वर्तमानपत्र मी घेईन असा वाचकाचा आग्रह नाहीं. तात्पर्य दोन्ही बाजूंनीं सुटा किंवा खुला व्यवहार ! टिळकांनीं स्वतःचा मुलगा आजारी असतांहि केसरी काढला, किंवा केसरीचा वार कधीं चुकविला नाहीं, या झाल्या पुण्यांतल्या गोष्टी ! मुंबईची दुनिया व दैनिकें ही वेगळी सृष्टि आहे ! वृत्तपत्र-व्यवहाराबद्दल इतके शहाणपण पूर्वी मी कधीं शिकलों नव्हतो ! पण राजवाडे यांनीं सांगितलेली वस्तुस्थिति अक्षरशः खरी होती. अशाच परिस्थितींत आणखी कांहीं दिवस त्या ऑफिसांत काढले आणि माझ्या स्वभावाला तें वातावरण मानवण्यासारखें नव्हतें म्हणून प्रभातची नोकरी मी सोडून दिली.

## ८

# माझें मुंबईस वास्तव्य

'प्रभात' सोडल्यानंतरहि मी चार-पांच महिने मुंबईतच होतों. कारण प्रभातमध्यें मी दीड वर्ष काम करीत असल्यामुळें मुंबईत बिऱ्हाड केलें होतें. या काळांत मित्रमंडळींच्या संगतीनें ज्योतिष पाहण्याचा मला नाद लागला. आणि ती विद्या चांगली येऊं लागली. मुंबईत मी आयता रिकामा होतो. दादरच्या हिंदु कॉलनींत बिऱ्हाड होतें. ज्योतिषाचा 'व्यवसाय' किंवा धंदा म्हणून उद्योग करण्याचे त्यावेळीं मला कसें सुचलें नाहीं याचें आतां नवल वाटतें. त्यावेळीं हें मी करतो तर तीस वर्षांत उत्तम ज्योतिषी म्हणून हवा तितका प्रख्यात झालों असतो आणि उद्योगाचीहि विवंचना आजच्याप्रमाणें पाठीमागें लागली नसती. पण 'पूर्वकर्म' आड येतें ना? मी 'वकील' आहे हा अभिनिवेश संपादकाच्या खुर्चीवर बसल्यानंतर मी विसरलों नव्हतो; आणि मी 'संपादक' आहे ही जाणीव ज्योतिषाचा धंदा करण्याला आड येत होती! हें पाहिलें म्हणजे, ज्यांना पूर्वीचें कांहींच नाहीं तीच माणसें यापेक्षां बरी नव्हेत काय? कारण कोरी पाटी

असल्यामुळें जगाच्या पाठीवर कोठेंहि बसून कोणताहि धंदा त्याला करतां येतो. आमची ताई म्हणत असे कीं "बापूच्या डोक्यांत एखादी गोष्ट शिरत नाहीं; आणि शिरली कीं नंतर निघत नाहीं," असें कांहींसे झालें होतें. बरें, मुंबईच्या बिऱ्हाडांत तरी मी स्वस्थपणें राहावें कीं नाहीं ? तात्या पाठीशी होते. मी बेकार असलों तरी विवंचना नव्हती. पुण्यापेक्षां मुंबईचें वातावरणच माझ्या प्रकृतीला मानवणारें होतें. पण याचा कांहीच विचार न करितां मी मुंबईचें बिऱ्हाड मोडलें व पुन: पुण्याला जाऊन राहिलों. मजजवळ आतां वकिली नव्हती, फक्त लेखणी होती. आणि ती लेखणी फक्त 'तात्यां'च्याच कामाला वाहिलेली आहे अशी मनांत कल्पना किंवा भावना !

पण सगळ्याच गोष्टी तुमच्या इच्छेप्रमाणें वडून येत नाहींत. हें जग तुम्ही निर्माण केलें नाही, त्याअर्थी तुमच्या इच्छेनुसार गोष्टी घडाव्या असें तरी कां व्हावें ? आणि तसेंच होणार होतें. कारण १९३४ च्या नोंव्हेंबरांत माझ्या नांवावर असलेलें गायआळींतील घर तात्यांनीं विकून टाकलें. कारण त्या जुन्या घराला सदैव रिपेअरी व दुरुस्ती करावी लागे. याकरितां एक रकमी पैसे हातीं आलें तर आपणांला हवें तसें मनाजोगे नवें घर बांधतां येईल अशी त्यांची इच्छा. त्याप्रमाणें त्या घरांतील पैसे रिकामे होतांच ते गुंतवायचे कोठें, हा नवा उद्योग माझे पाठीमागें लागला. घर विकलें त्यावेळीं माझे मनाला वाईट वाटलें. मी आळशी नव्हतो, किंवा आयत्या पिठावर रेघा काढणारा नव्हतो. तात्यांनीं मला घर बक्षीस दिल्यानंतर स्वत:चे दीड दोन हजार रुपये खर्चून त्या घरांत मी उत्तम सुधारणा केल्या होत्या. म्हणून ज्या दिवशी घर विकण्याच्या विसारपावतीवर मी सही केली त्या रात्रीं मला झोंप आली नाहीं ! पण नंतर असा विवेक मनाशी केला कीं, या भावनावशतेंत कांहीं अर्थ नाहीं. माझी भावना त्या घरांत आहे ? कीं तात्यांचे मध्यें आहे ? यांत काय खरें ? तें घर तात्यांनीं बांधलें, व त्यांना योग्य वाटलें म्हणून त्यांनीं विकलें. मी केवळ सहीचा धनीच नव्हतो काय ? याकरितां, पूर्वी ज्याप्रमाणें त्या घरच्या कामांत मी उत्साहानें भाग घेतला त्याप्रमाणें, नवें घर बांधणें हा एक नवा उद्योग समजून त्या कामाला मी उत्साहानें सुरुवात केली.

अशा कामांत माझी दृष्टि चांगली चालत असे व हाताला यशहि होतें. कारण घर विकल्यापासून अवघ्या एका महिन्यांत डेक्कन जिमखान्यावर सध्या 'पुष्करिणी' असलेली जमीन आणि शेजारचे तीनचार प्लॉट मी विकत घेतले. डेक्कन जिमखाना कॉलनीची त्यावेळीं नुकतीच सुरवात होती. विशेषत: विहिर असलेला पुष्करणीचा प्लॉट तात्यांना फार आवडला व त्यांच्या संमतीनेंच शेजारचे तीन प्लॉट मी विकत घेतले. त्यावेळीं मंदी व स्वस्ताई कमालीची होती व जमीनीचा भाव फुटाला अवघा पांच आणे होता. मग पुनः मुंबईला फेऱ्या मारूं लागलों. दादर, माटुंगा पासून सर्व उत्तर–मुंबई बिनवसाहत झालेली मोकळीच होती. त्यांतच माटुंगा

स्टेशननजीक म्युनिसिपल बागेसमोर एक उत्तम घर मला मिळालें. तात्यांची मान्यता मोठी असल्यामुळें अवघ्या पांच मिनिटांत हा व्यवहार ठरला. नंतर कायदेशीर कागद करणें व व्यवहार पुरा करणें हे काम त्यांनी माझेवर सोंपविलें. तें मी यथावकाश पुरें केलें. पुण्यासच मी राहतों तर मुंबईचें घर भाड्यानें देतां आलें असतें; आणि मुंबईसच राहावयाचें तर, पुष्करणीवर बांधलेलें घर व इतर प्लॉट तात्यांचे नांवावर करणें याशिवाय गत्यंतर नव्हतें. कारण तितके पैसेच मजजवळ नव्हते.

पण याचा निर्णय तात्यांनीच घेतला तो असा कीं, माझे ऐवजी केसरीवर त्यांनी माझा धाकटा भाऊ आण्णा याला घेतले, आणि मी मुंबईसच कायमचे राहावें असें ठरवून पुष्करणीवरील घरांत गुंतलेले माझे पैसे मुम्बईच्या घराचा व्यवहार पुरा करण्याकरितां मला दिले. या गोष्टीनें माझी भवितव्यता वेगळी आहे असें कायमचें ठरलें! केसरीवर तात्यांनी मला घेतले नाहीं ही गोष्ट मला फार जाणवली यांत शंका नाहीं. यापूर्वी बारा वर्षें केसरीशीं मी संबंध ठेवून उद्योग केला होता. माझ्या पात्रते-बद्दल परस्पर लोकांचे तोंडून कबुली वदविली होती. दैवयोगानें मला बहिरेपण आले पण लेखणी गेली नव्हती. याकरितां तरी केसरीतली नोकरी मला मिळावयास नको होती काय? मला सरकारी नोकरी मिळणार नव्हती, काँग्रेसच्या पक्षांत किंवा वर्तमानपत्रांत जाणें मीं शक्य नव्हतें व तें तात्यांनाहि मान्य झालें नसतें! व्यापारउदीम किंवा दुसरा कोणताहि धंदा मी शिकलो नव्हतो. केवळ लेखणीच कमावली व तीहि तात्यांच्या व केसरीच्या धोरणाला जुळणारी. मग ती जागा मला कां मिळूं नये? असे विचार माझे मनांत येणें गैर नव्हते. या गोष्टी तात्यांनाहि नाकबूल नव्हत्या. पण तात्यांचे पुढें इतर अनेक गोष्टींचा विचार होता तोहि येथेंच सांगणें न्यायाचें होईल. त्यांतलें पहिलें कलम असें कीं, केसरीवर आण्णा व मीं असें दोघांना घेणें शक्य नव्हतें. शक्य तोंपर्यंत ट्रस्टींनीं आपल्या मुलांपैकीं (ते लायक असले तरी) कोणालाच घेऊं नये हा उत्तम पक्ष. पण नाईलाजानें घेतले तर फारतर एकाला घेतां येईल. आण्णाहि माझेप्रमाणेंच बेकार होता. तात्यांची माझेबद्दल खात्री निदान अपेक्षा अशी कीं, माझ्यांत हालचाल करण्याची बुद्धि असल्यामुळें मी कोठेंतरी खटपट करून आपला मार्ग काढीन. आण्णामध्यें तें नस-ल्यामुळें त्याचेकडे त्यांना पाहणेंच आले! यांत कोणाच्या सरस–निरसतेचा किंवा लायकी नालायकीचा प्रश्न नाहीं. तात्यांनीं स्वतः ही गोष्ट मला सांगितली आहे व ती मी अक्षरशः खरी मानतों. त्यांत सांत्वन करण्याचा भाग नव्हता!

समजा, मी त्यांचे जागी असतो, आणि अशा प्रसंगीं निर्णय करण्याची पाळी माझेवर येती तर, मी तरी यापेक्षां दुसरें काय केलें असतें? जो चालता असेल त्याला बोट देऊं नये, रांगत्याला द्यावे असें आईबापांचे नेहमीच पाहणें असते. त्यांत चूक काय? ज्यांना या अंतर्गत गोष्टी माहीत नाहींत ते हवें तें समजेनात? अशांना उत्तर देण्याची किंवा खुलासा करण्याची जरूरी नाहीं. दुसरें असें. होय, तुमच्या दृष्टीनें मी

तुमचें नुकसान केलें. त्याची कांहीं भरपाई मी केली नाहीं काय? जन्मापासून आजतागायत जी मी तुमची सुस्थिति ठेविली किंवा तुम्हाला जें काय दिलें, ही त्या नुकसानीची भरपाई केली असें समजावें काय? मनुष्याला जें महत्त्व असतें तें स्वतःसिद्ध असतें आणि त्याच्या उद्योगावर ते अवलंबून असतें. अमुक ठिकाणीं तो आहे आहे कीं नाहीं यावर नसते!" असे विचार त्यांचें मनांत येत व ते ते बोलूनहि दाखवींत. आज त्यांच्या शब्दांची आठवण झाली म्हणजे वाईट वाटते! याबद्दल मी त्यांना दोष देत नाहीं. पण मीहि अगतिक होऊन निरुत्साह झालो होतो. केसरीवर मला घेण्याची बाब तीन वेळा पुढें आली व वेगळ्या रीतीनें निकालांत निघाली, हें पाहून आपली 'भवितव्यता' वेगळी आहे असें समजून मी मार्गाला लागलो!

तीस वर्षांपूर्वी या गोष्टीला मी जितकें महत्त्व देत होती तितकें आज देत नाहीं. आयुष्य हें नेहमीं असेंच आकस्मिक रीतीने बदलत असते. तथापि माझे पुढचे सर्व आयुष्य तात्यांचेच देखरेखीखाली गेलें व त्या आयुष्याचा सार्वजनिकपणें मी हिशेब देऊं शकतो. माझ्या भावानेहि त्याचे परीनें कांहीं उद्योग केला असेल. आमचे दोघांचेहि आजवरचें आयुष्य पाहिलें तर, कोणी आम्हांला अगदी नालायखांतच काढील असें वाटत नाही. पण आमचा उद्योग म्हणजे बोक्यानें तोंडात धरलेल्या उंदराच्या धडपडीसारखा! तात्यांचे पोटीं आपण आलों, त्याअर्थी अगदींच निर्बुद्धपणाचा 'अपवाद' कसा टळेल आणि आयुष्याच्या यात्रेंतून धड पायांनीं सहीसलामत कसें सुटूं, इतकीच काळजी आम्हीं दोघांनीहि केली आहे! जवाहरलाल नेहरूसारखा बापाचे तोंड उजळ करणारा कर्तबगार मुलगा तात्यांना लाभता तर फार बरें झालें असतें, असें मला राहून राहून वाटतें! पण ही ईश्वराची चूक म्हणावी; माझी कशी? तें कांहीहि असलें तरी, आज एक गोष्ट वारंवार मनांत येते. ती ही कीं, आम्हां सर्व भावंडांचा योगक्षेम आजतागायत तात्यांच्याच कृपेवर आणि पुण्याईवर चाललेला आहे. नाहीं तर हे कठीण दिवस गेले नसते!

मुंबईच्या घराचें वातावरण रम्य असल्यानें मला तें फार मानवलें. लोक भिन्नजातीय पण स्वभावानें सालस व सरळ. विद्येचा गर्व नाही आणि माणुसकी पुण्यापेक्षां अधिक. त्या भिन्नजातीय वस्तींतहि तात्यांचे नांव सर्वांना महशूर असल्यामुळें त्या लौकिकाला साजेल अशीच सर्वांशीं वागणूक मलाहि ठेवावी लागे. व तशी मी ठेवलीहि होती. यामुळें चांगले स्नेहसंबंध होते व माझेबद्दल सार्वत्रिक मत बरें होतें. माझ्या घराला लागून दुसरेंहि एक घर बांधलें जात होतें. माझ्या एका जवळच्या वृद्ध नातेवाईकानें तें विकत घेतलें. व सर्व व्यवहार पुरा करण्याला पुरेसे पैसे त्याजपाशीं नसल्यामुळें या व्यवहारांत भागीदार होण्याची त्यांनी मला फार गळ घातली. दुसऱ्याच्या पैशाच्या

व्यवहारांत पडण्याला मी नेहमींच नाखुष असतो व त्यांना प्रथम स्पष्टपणें नकारहि दिला. पण योगायोग असा कीं, याच वेळीं नेमकें तात्यांचें मुंबईस अवचित येणें घडलें. व त्यांनी हा व्यवहार करण्यास हरकत नाहीं असें सांगितलें म्हणूनच मी केला. सदर नातेवाईक स्वतः त्या घरांत येऊन राहण्याचा कधीहि संभव नसल्यामुळें, त्या घराचा व्यवस्थापक तसेंच त्या मिळकतीची मृत्यूनंतर जी व्यवस्था त्याना करावयाची तिचाहि व्यवस्थापक (एक्झीक्यूटर) त्यांनीं मलाच नेमले. याप्रमाणे एकाऐवजी दोन्ही घरांची व्यवस्था पाहण्याचा उद्योग माझे मागें लागला. मात्र सदर नातेवाईकाकडून, त्याच्या पैशाला हात लावण्यापूर्वी,मी सर्व कागदपत्र रजिस्टर कचेरींत नोंदवून घेतले. कारण हा व्यवहार दीर्घ कालावधीचा होणार व कदाचित् वारसांच्या अविश्वासाचाहि त्यांत संभव उत्पन्न होणार ही गोष्ट मला दिसत होती. म्हणून कायदेशीर कागदपत्र त्यांचे-कडून करविण्यांत मी कुचराई केली नाहीं. तात्या पाठीशीं असल्यावर कोणचेंहि काम अंगावर घेण्यांत मला काडीमात्र शंका वाटत नसे. दोन्ही घरांचे व्यवहार झाले होते, पण करार पुरे झाले नव्हते. त्यांत कांही अडचणी येत; पण नेमकी त्या सुमारास तात्यांची खेप मुंबईस होई व पुनः सर्व सुरळीत होत असे.

घराचे बांधकाम पुरें झाल्यानंतर ताईनें मुद्दाम पुण्याहून येऊन पुरोहितामार्फत घराची वास्तुशांति करविली. तात्यांनीं माझें नांव ‘ काशिनाथ ’ म्हणून घराचे नांवहि ‘ विश्वेश्वर-भुवन ’ ठेविलें. आतां तरी मी ‘ मुंबईकर ’ झालों, असें मला वाटावे कीं नाहीं ? पण माझे मन अद्याप पुण्यांतच रेंगाळत होतें. अर्थात् हा तात्यांचे सह-वासाचा परिणाम. ते मुंबईस आले कीं दोन दिवस आनंदांत जात. ते गेले कीं रिकामपणामुळें मन उदासीन होई. या सुमाराचें त्यांचें एक पत्र पुढें देतो : —

पुणें २८–१९–३६

आशीर्वाद विशेष. तुमचें पत्र पोचलें. लेख वाचले. ठीक आहेत. पुण्यास नव्या घराकरितां मी एक माळी ठेवला आहे. एक वर्षांत चांगला बाग तयार करणार आहे. दररोज कांहीं तास तेथें जातोंच. परंतु माझें बिऱ्हाड म्हणून घेऊन जाण्याला अनेक अडचणी आहेत. मी स्वतः दिवसाचा बहुतेक वेळ तेथें काढला तरी चालण्यासारखें आहे परंतु बिऱ्हाड उचलून तेथें जाण्याला घरच्यापैकीं कोणाचीच अनुकूलता दिसत नाहीं. तुम्ही मुंबई ऐवजीं पुण्यास आला तर चांगलेंच. पण ( १ ) पुण्यास कायमचा उद्योग व ( २ ) मुंबईच्या घराची चांगली निर्वेध व्यवस्था या दोन गोष्टी पदरांत पडेपर्यंत तुम्ही पुण्यास याल तर तुम्हालाच समाधान वाटणार नाहीं. मुंबईस राहून घरबसल्या लेखनव्यवसाय ( किंबहुना ज्योतिषाचा धंदाहि ! ) करितां आल्यास मुंबईस एक नवा ‘ सेंटर ’ निर्माण होतो. तथापि या गोष्टीचा फिरून एकदां विचार करितां येईल. तुम्ही सर्व लक्ष घालून लेखनव्यवसाय वाढविल्यास पुण्यापेक्षां मुंबईस त्याला अधिक क्षेत्र

मिळेल असें वाटतें. घरबसल्या लेखनापासून ७५ ते १०० रुपये मिळवितां आले तरी काम भागेल. पुण्यास तुमचेकरितां कायमचें काम मिळालें तर पाहातच आहे. परंतु मुंबईच्या घरांच्या व्यवस्थेचा प्रश्न मनांत येतो ! त्याबाबत तुमची सूचना काय ? तुम्ही पुण्यास राहण्यास आल्यानें आम्हांस बरें वाटेल हें काय लिहावयास पाहिजे ? परंतु कांहीं उद्योग दिसत नाहीं. तोपर्यंत पुण्यास येऊन तरी काय करणार ? तेथें निदान घरांची व्यवस्था तरी स्वतःची स्वतः पाहाल. तात्पर्य, दोन्ही बाजूंनीं अडचणी आहेत. त्यांतून निघण्याचा मार्ग सर्वच मिळून हुडकून काढण्याचा प्रयत्न करूं. कळावें.

तात्या केळकर

नंतर नेहमींप्रमाणें एका खेपेस तात्या मुंबईस आले असतां तें स्वच्छ, नीटनेटकें, सत्तेचें घर पाहून संतुष्ट झाले व मला सहेतुक म्हणाले, " बापू, हें घर झालें. यांत तूं मिळविलेलें किती ? "

त्यांच्या बोलण्याचा रोख ओळखून मी सरळपणानें म्हटलें, " तें सांगतां येईल. पण मी अमुक इतकें मिळविलें याला गमक काय ? "

" तूं सांगशील तें मी मानीन ना ! " ते विश्वासानें म्हणाले.

मी म्हटलें " माझे यांत पांच हजार आहेत. आणि ते घराची जमीन विकत घेऊन गुंतविले आहेत. "

" मला कबूल आहे. " ते प्रांजलपणें म्हणाले. " जवळचे पैसे जमिनींत गुंतविले हें वाईट नाहीं. उगाच जास्त पैसे तरी हाताशीं कशाला ठेवायचें ? "

मग त्यांच्याच शिफारशीनें तेथें नुकत्याच स्थापन झालेल्या रुईया कॉलेजांतील लायब्ररीयनची नोकरी मला मिळाली व ती मी वर्षभर केली. मीच मुख्य ग्रंथपाल असल्यामुळें हवीं तितकीं पुस्तकें मला वाचावयास मिळत, व पुष्कळ निरनिराळ्या विषयावर मी अभ्यासपूर्वक वाचन केलें. या वेळीं तात्यांनीं ' सह्याद्रि ' मासिक सुरू केलें असल्यामुळें केसरी, सह्याद्रि व मौज या नियतकालिकांत मी लेख लिहीत असे. मराठी राज्याचा उत्तरार्ध, ब्रिटिश रियासत, इग्लंडचा इतिहास, फरेंच राज्यक्रांति व नेपोलियन, १८५७ चा इतिहास, हे विषय माझ्या विशेष आवडीचे होते. मराठी कादंबऱ्यांत फक्त बंकिमचंद्र आणि तत्त्वज्ञानांत विवेकानंद मला प्रिय असत. बंकिमचंद्राच्या सर्व कादंबऱ्या मी पुनः पुनः तीस वेळां वाचून त्यांची पारायणें केली होती. एकदां मी त्यांना म्हटलें, ' माझ्या घरांत बंकिमचंद्राशिवाय कोणतीहि मराठी कादंबरी आढळणार नाहीं ! त्याच्या जोडीला बसवितां येईल अशी मराठींत एकहि कादंबरी असली तर सांगा ! "

तात्यांनीं माझें म्हणणें कबूल केलें. या आव्हानाचा इतकाच उपयोग झाला कीं, ' सह्याद्री ' करितां बंकिमचंद्रावर त्यांनीं मला लेख लिहावयास सांगितला ! याच वेळीं

बंकिमचंद्राची शताब्दि आलेली असल्यामुळें कलकत्त्याच्या शताब्दि–समितीनें तात्यांकडून इंग्रजी लेख मागितला होता. तात्यांनीं तेंहि काम माझे गळ्यांत घातलें, व माझा लेख शताब्दि–उत्सव कमिटीकडे पाठवून दिला.

मुंबईस रिकामपणा असल्यामुळें त्याचा उपयोग मी खूप फिरण्यांत केला. कुलाब्यास जेथें बॅकबेचे टोंक समुद्रांत बुडतें थेट तेथपासून सर्व दक्षिणोत्तर मुंबई, ठाण्यापलीकडे मुंब्र्यापर्यंत मी पायी फिरून पाहिली आहे. घारापुरी, अलीबाग, सासवनें हीं मुंबईजवळची समुद्र–प्रवासाची ठिकाणें, तसेंच अजिंठा, वेरूळ हीं मी पाहून आलो. १८५७ च्या इतिहासाचें संशोधन करण्याकरितां उत्तर हिंदुस्थानचा प्रवास बहिरेपणा असतांनाहि एकट्याने केला. त्यांत झांशी, कानपूर, बिठूर, ब्रम्हावर्त, दिल्ली, आग्रा, ग्वालेर हीं ठिकाणें पाहिलीं. या प्रवासांत तत्कालीन युद्धक्षेत्रांचे नकाशेहि मजबरोबर असल्यामुळें तो सर्व इतिहास माझ्या डोळ्यापुढें साक्षात सजीव झाला! परत मुंबईला आल्यावर तो इतिहास लिहिण्याचेंच डोक्यांत सारखे घोळत होतें. तात्यांशी माझी चर्चाहि वारंवार होत असे. एक दिवस माटुंग्याच्या स्टेशनवर लोकलची वाट पाहात तात्या व मी बाकावर बसलो असतांना, गाडीला थोडा अवकाश होता म्हणून कांहीं-तरी गोष्टी बोलत होतो. त्यांना मी म्हटलें, "माझ्या १८५७ च्या पुस्तकाला मी "शमीपूजन" हें नांव योजलें आहे."

"नांव चांगले आहे." ते म्हणाले. पण लगेच त्यांनीं स्पष्टीकरणार्थ दुसरें जोड-नांव सुचविलें– "अर्थात् राज्यक्रांतीचा पहिला प्रयत्न." असा तात्यांचें व माझे विचारांत जोड होता!

माझें सार्वजनिक जीवन संपल्यामुळें माझी वृत्ति साहजिकच अंतर्मुख झाली. ज्याला वर्तमान काळांत जगतां येत नाहीं त्यानें इतिहास–संशोधनाचा उद्योग पुढें ओढूं नये तर दुसरें काय करावें? इतिहास ही कांहीं तुतान खामेनच्या थडग्याप्रमाणें मृत-वस्तु नाहीं. तीहि जिवंत सृष्टीच आहे! तुमच्या मनाचें आणि सुखदुःखात्मक भावनांचें ज्यांत प्रतिबिंब आढळेल अशीं माणसें त्यांत तुम्हाला आढळणार नाहींत काय? तेच तुमचें खरे 'सहचर.' त्यांचे मनोगत समजावून घेण्यांत तुमची वर्षानुवर्षे जातील. त्यांच्या तुमच्यांत शेंकडों वर्षें गेली असली तरी, तुमच्या शेजारीं बाकावर बसून मित्राप्रमाणें ते तुमच्याशी गोष्टी बोलतील. माझ्या या मानससृष्टींत जोन ऑफ आर्क, झांशी-वाली राणी, नाना फडवणीस, तात्या टोपे, नेपोलियन बोनापार्ट या व्यक्ति सदैव वावरत असत. नेपोलियनचें वाङ्मय लहानपणापासून सतत आजतागायत मी इतकें वाचलें आहे की, येत्या १९६४ सालीं त्या अभ्यासाला बरोबर अर्धशतक पुरें होईल! केवढी ही गंमत! 'शमीपूजन' 'शंभर वर्षांपूर्वी' आणि 'नेपोलियन व हिटलर' या पुस्त-कांचा जन्म याच अभ्यासांतून झाला आहे. या पुस्तकांत मी रुक्ष इतिहास वर्णन केलेला नाही. त्यांतील नायक–नायिकांच्या सुखदुःखाशीं आणि भावनांशीं मी संपूर्णपणें

समरस झालों आहे असें आढळेल. त्यांच्यापेक्षा माझ्याच मनोमय जीवनाचा तो आरसा आहे म्हणा ना ? एखादी कलाकृति घडवावी त्याप्रमाणें, तन्मयतेनें आणि आत्मीयतेच्या अमृतसिंचनानें इतिहासांतील या महनीय व्यक्तींना मी पुनः सजीव केलें आहे !

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३५२२५..... वि. चरित्र......
क्रमांक .......२२२९........ नों. दि. .....८/७/५५

# ६

# 'अंधेरां'तील प्रकाशमय जीवन

माझ्या मनांत पुष्कळदां असें येते कीं, मला चित्रकलेची जन्मतःच आवड असतां मुंबईंत दहाबारा वर्षे राहून मी आर्ट स्कूलचा कोर्स कां पुरा केला नाही ? चित्राचे मला इतकें वेड आहे कीं, जेवण झाल्यावर कोटातील म्युझियममध्यें जाऊन नामांकित चित्रकारांची चित्रें पाहण्यांत मी पांच पांच सहासहा तास घालविलें आहेत. मी नोकरी न करिता आर्ट स्कूलमध्यें जाऊन चित्र-कलेची परीक्षा देतो तर तात्यांनीं मला नाहीं म्हटलें नसतें. त्या वेळीं हें मी केले असतें, तर आज मी नामांकित चित्रकार झालों असतो. बरे, ज्योतिषविद्या मला इतकी उत्तम येत होती कीं, कुंडली पाहून मी सांगित-लेलें भविष्य हमखास खरें ठरत असे. 'धंदा' म्हणून केला असता तर महिन्याला शें दोनशें रुपये सहज मिळाले असते. तात्यांनीं आपल्या हातानें लिहून दिलेली जाहिरात मी केसरीकडे धाडलीं नाहीं ! असें कसें घडते ? आणि कां घडते ? आयुष्यांत घडलेल्या या चुकाच म्हणावयाच्या काय ? शांतपणें विचार केला तर, मला असें वाटत

नाहीं! आपण इतिहासाची संगति लावण्याचा प्रयत्न करतो; पण आपल्याच आयुष्यांत जे घडलें, त्याची आत्मकथा सांगतांनाहि नीट संगति आपणाला कां लावतां येऊं नये? “अमुक गोष्ट त्या वेळीं कां केली नाही?” असें जें आज वाटतें तें ‘नंतर’चें वाटणें आहे! त्यांला अर्थ नाहीं. तो ‘न सफल झालेला आशावाद’ आहे. त्यावेळी इतर गोष्टी महत्त्वाच्या वांटत होत्या म्हणूनच त्या गोष्टीला तुम्ही महत्त्व दिलें नाहीं. त्यावेळीं ज्या गोष्टी घडत होत्या त्या नीट क्रमवार मांडून पाहा, म्हणजे आजचें हें वाटणें बरोबर नाहीं असें दिसून येईल!

१९३५–३६ सालीं तात्यांची राजकारणांत सद्दी जोरावर होती; लोकशाही स्वराज्य पक्षाचे ते पुढारी होते; मुंबईत त्यांची व्याख्यानें गाजत होती. वाङ्मयाच्या होसेकरितां त्यांनीं ‘सह्याद्रि’ हें नवे मासिक काढले होतें. ‘भारतीय तत्त्वज्ञान’ ‘फ्रेंच राज्यक्रांति’ ‘बलिदान’ वगैरे त्यांची पुस्तकें भराभर बाहेर पडत होती; याच सुमाराला सावरकर बंधमुक्त झाले होते व १८५७ वर व्याख्यानें देऊन प्रखर हिंदुत्व-वादाचा त्यांनी उद्घोष केला होता! एकदां जवाहरलाल नेहरू यांना तात्यांचेवर कारण नसतांना टीका करण्याची उर्मी आली. पण तात्यांनीं आपलें शस्त्र बाहेर काढतांच तात्यांची सपशेल माफी मागण्याची त्यांना पाळी आली! या सर्व गोष्टी घडत असतांना माझ्या मनांत कांहींच पडसाद उठत नसतील काय? तात्यांच्या राजकारणांत मला कांहींच कळत नव्हतें, असें तर नव्हे ना? त्यांचेकरितां मी पूर्वी कांहींच केले नव्हतें काय? पूर्वीचे एक वेळ राहो, पण मुंबईस आल्यापासून तात्यांचे आत्मचरित्रांतील पत्रांची भाषांतरे करण्याचा माझा क्रम दररोज सुरूच होता. तात्यांचे आत्मचरित्रांत माझ्या-इतकें समरस कोणीच झाले नव्हते व कोणी त्याकरितां माझ्याइतके श्रमहि केले नस-तील. हें जर खरें तर, या सर्व गोष्टीकडे पाठ फिरवून मी ‘ज्योतिषी’ कसा होऊं? किंवा चित्रकार कां होऊं? त्यांनीं जें चित्र घडविलें, त्याशी या गोष्टी विसंगत नव्हत्या काय? याही गोष्टी आयुष्यांत करून पहाण्याची एकेक वेळ असते. पण ही ती वेळ खासच नव्हती.

मी शरीरानें मुंबईस तात्यांचेपासून दूर राहात असलो तरी विचारानें त्यांचेशीं किती एकरूप होतो याची चार दोन उदाहरणे सांगतो. (१) १९३६ सालच्या फेब्रुवारींत ‘मुंबईची जुगारी दुनिया’ या विषयावर दोन लेख मी केसरींत लिहिलें ते त्यांच्याशीं चर्चा करूनच लिहिलें. विलायतेतील रॉयल-कमिशन रिपोर्टाचा या लेखांत मी आधार घेतला होता. (२) लो. टिळक-चरित्रांत न आलेले एक अत्यंत महत्त्वाचे मंडालेचे पत्र माझे संग्रहीं होते, तें मी भाषांतर करून पाठवितांच त्यांनीं तत्परतेनें ऑगस्टचे केसरीचे अंकांत प्रसिद्ध केलें व त्यावर “हे पत्र माझे संग्रहीं असतांहि पूर्वी टिळकचरित्रांत घालावयाचें नजरचुकीनें राहिलें, ते माझा मुलगा चि. काशिनाथ उर्फ बापू यानें हुडकून काढून या टिळक अंकाकरितां त्यानें त्याचें भाषांतर करून

पाठविलें आहे" असें मुद्दाम शिरोलेखांत लिहिलें होतें. (३) १९३६ चे अखेरीस सह्याद्रींत त्यांची 'फरेंच राज्यक्रांती'ची लेखमाला पुरी झाली. याच सुमाराला, सेंट हेलिनांतून नेपोलियननें आपल्या मुलाला जे अखेरचें पत्र लिहिलें आहे त्याचे मी भाषांतर करून पाठविलें. फरेंच राज्यक्रांतीच्या लेखमालेला 'जोड' लेख म्हणून हा लेख त्यांनीं सह्याद्रींत घेतला आणि पुस्तकांतहि परिशिष्ट म्हणून छापला. (४) १९३९ सालीं वसईच्या मोहिमेला दोनशें वर्षें पुरी झाली, त्यावेळीं "वसईच्या युद्धाचा हेतु राजकीय म्हणावा कीं धार्मिक?" याविषयीं केसरीच्या दोन तात्यांत जाहीर वाद झाला होता. केळकर-तात्यांचें मतें हा हेतु 'राजकीय' म्हणावा लागतो. याविरुद्ध तात्या करंदीकरांचें म्हणणें असे कीं, तो हेतु 'धार्मिक' होता. कारण बखरकारांनींच तसे लिहिले आहे ना? माझीहि बुद्धि अशा सूक्ष्म वादांत चालते. पण दोन तात्यांचे वादांत प्रत्यक्ष भाग घेण्यापेक्षा, मी आडवळणानें निराळा मार्ग काढला! ललितलेखनाचें स्वरूप माझें लेखाला देऊन सह्याद्रींत "वसईच्या युद्धाचा हेतु कोणता?" या नांवानें मी लेख लिहून या हेतुचिकित्सेचें मार्मिक पृथःकरण केलें आहे. माझ्या मतें हा लेख इतका उत्तम साधला आहे कीं, माझें नांव न घालता त्यावर तात्यांचे नांव घातलें असतें तर तें वाचकांना मुळीच ओळखू आलें नसतें! इतकी या लेखाची भाषा व विचारशैली हुबेहुब तात्यांचेसारखी आहे. याचा पडताळा परस्पर वाचकांनाहि घेता येण्यासारखा आहे. हा लेख '**दोन घटका मनोरंजन**' या पुस्तकांत मी पुर्नमुद्रित केला आहे.

पण हे सर्व विचार त्यावेळीं काय किंवा आज काय मनांत येण्याचा कसलाहि उपयोग नव्हता व नाहीं. माझे बहिरेपण जाण्यासारखे होतें काय? नाहीं. मी पुण्याला जाणें शक्य होते काय? नाहीं. मुंबईत एखाद्या वर्तमानपत्रांत मी शिरणें शक्य होतें काय? मुळीच नाहीं. कारण त्यावेळी मुंबईत असें एकहि वर्तमापत्र नव्हते कीं ज्यांत तात्यांची निंदा वा कुटाळकी येत नसे! ज्योतिषाचा धंदा मी करणार होतो काय? नाही. नेपोलियन हा माझा जन्मभर गुरु होता. दैववादाला तो कधीच शरण गेला नाही. मी चित्रकार व्हावयास पाहिजे होतें काय? त्याला हरकत नव्हती. पण ती कलासृष्टि 'निःशब्द' आहे. शब्द किंवा अक्षर याला त्यांत महत्त्व नाहीं. किंबहुना साहित्यसृष्टि जर तुम्ही विसरू शकाल तरच चित्रकलेच्या खऱ्या अंतरंगांत तुमचा प्रवेश होईल! मग मी आहे तरी कोण? कोऽहं? याचें उत्तर मला सांपडत नव्हते. तात्यांनीं जीवनाचे निरनिराळे मार्ग मला चांगल्या हेतूनेच सुचविलें. पण माझ्या मनांत प्रकाश पडत नव्हता. अरेरे! अनेकांना ज्योतिषशास्त्राचे आधारानें मी जीवनाचा मार्ग सुचवून मार्ग-दर्शन करीत होतों. पण मी कोण आणि माझा मार्ग कोणता, हें कधीतरी मला समजले काय?

बहिरेपणामुळें माझ्या आयुष्यांत फार मोठा घोटाळा उत्पन्न केला. त्यावर शस्त्र-

क्रियेपासून तों शीर्षासनापर्यंत मी सर्व उपाय केले. पण काडीचाहि उपयोग झाला नाहीं. आमच्या घराण्यांत पूर्वापार कोणीहि बहिरे नव्हतें, तसा मीहि नव्हतो. तशी शंका मला येती तर मी वकीलीची परीक्षा देऊन सार्वजनिक कामांत का पडलों असतों? पण नौका प्रवाहाच्या मध्यभागीं येऊन बुडावी त्याप्रमाणें, ऐन बत्तीसाव्या वर्षी माझें सार्वजनिक आयुष्य भरांत आलें असतां मला बहिरेपणानें गांठलें व क्रमशः ते वाढत गेले. मी संपूर्ण बहिराहि नव्हतो, पण व्यवहारांत फार अडचण येत असे. 'ईश्वराची इच्छा' इतकाच त्याचा अर्थ मी समजतो. त्याच्या मनांत आलें कीं 'सायडिंग' बदलण्याला वेळ लागत नाहीं!

बंकिमचंद्राच्या कादंबऱ्यामध्यें 'रजनी' कादंबरी माझी फार आवडती आहे. त्यांतील नायिका रजनी ही फुलें विकण्याचा धंदा करणारी एक जन्मांध कुमारिका असून आपली कहाणी सांगत आहे. ती जन्मांध व मीं बहिरा. ती स्त्री व मी पुरुष इतकाच फरक. पण अशा माणसाचें मनांत जें दुःख वावरत असतें तें रजनी इतकें कोणीहि उत्तम व्यक्त केलें नसेल. यांतील शब्दाशब्दांत जी लय आणि सौंदर्य व्यक्त झालें आहे इतकें अपूर्व सौंदर्य मी कोठें पाहिलें नसेल. या कादंबरीची मी शंभर वेळां पारायणें केली असतील. जुन्या ऐतिहासिक कालांत ज्यानें ताजमहालची शिल्पकृति निर्माण केली त्याला शहाजहान बादशहानें काय इनाम दिलें हें कोणास ठाऊक नाहीं. पण मी तसा बादशहा असतो, आणि जर बंकीमचंद्राची व माझी गांठ पडती, तर त्याच्या शब्दागणिक एकेक सोन्याची मोहोर मी त्याला बक्षीस दिली असती! हाच अभिप्राय रुईया कॉलेजमधील शेरे-पुस्तकांत पंचवीस वर्षांपूर्वी मी लिहून ठेवला आहे. रजनीला पुढे एका योग्याचें कृपेमुळें दृष्टि आली. माझ्या मनांत ती आशा सतत होती; हेंहि सदर कादंबरी मला आवडण्याचें कारण होतें. बंकीमचंद्राच्या कादंबऱ्यांत स्त्रीसृष्टीचें चित्रण इतके अपूर्व आहे कीं वास्तव जगांत अशी मनोहर स्त्रीरत्नें कोठें दिसतील काय? अशी हुरहुर मनांत उत्पन्न होते. सौंदर्य ही वस्तूच अशी आहे कीं तिचे शब्दांनी वर्णन होऊं शकत नाहीं. प्रस्तुत आपण रजनीबद्दल बोलत आहों, म्हणून तिचींच दहा-पांच वाक्य पुढे देतोः—

"त्या दिवसापासून बहुधा दररोज रामसदय बाबूंचे घरीं मी फुलें विकण्यास जाऊं लागलें. मला दिसत नव्हते तरी शब्द तरी ऐकण्यास मिळेल अशी आशा वाटे. मी कां जात्यें? याविषयीं मनांतल्या मनांत विचार करून पाहात असे. स्त्रिया पुरुषांच्या रूपाला मोहित होऊन त्याचेवर प्रेम करूं लागतात असें मी ऐकलें आहे. पण मी तर आंधळी! मी कोणाचें रूप पाहिलें आहे? मग मी कां जात्यें? शब्द ऐकण्यासाठीं? पण कोणी स्त्री केवळ शब्द ऐकून मोहित झाली आहे ही गोष्ट कधीं कोणी ऐकली आहे काय? मी तशी मोहित झाल्यें आहे काय? ही गोष्टी संभवनीय आहे काय? असेल तर वाद्यांचा ध्वनि ऐकण्यासाठीं तें वाजविणारांचें घरीं मी कां जात नाही? सतार, सारंगी, बीन, एसराज वगैरे

वाद्यांच्या सुरांपेक्षां का शचींद्रांचा कंठ मधुर आहे ? छे ही गोष्ट खोटी.

"तर मग मी त्याच्या स्पर्शासाठी जाईं ? पण मी तर फुलांच्या राशींत रात्रंदिवस लोळणारी. ती अंथरून त्यावर निजतें सुद्धां. त्या फुलांच्या स्पर्शापेक्षां का तो स्पर्श अधिक कोमल आहे ? नाहीं. तसें नाहीं तर मग काय ? तें या आंधळीला कोणी समजावून सांगू शकेल काय ?

"तुम्हाला समजत नाही. समजावूं तरी कसें ? तुम्हाला डोळे आहेत; तुम्हाला रूप दिसते आणि कळते ; मला विचाराल तर माझ्या मतें रूप हें केवळ पाहणाराच्या मनाची एक विकृति आहे. शब्द सुद्धां मनाचीच एक विकृति आहे. रूप हें रूपवान माणसांच्या ठिकाणीं नसते; तर पाहणाराच्या मनांत असते. तसें नसतें तर एकच मनुष्य सगळ्यांना सारखा रूपवान कां दिसत नाहीं ? एकाच माणसावर सगळे लोक सारखे आसक्त कां होत नाहींत ? याच रीतीनें शब्दहि पण तुमचेच मनांत असतो. रूप हें पाहणाराच्या मनाचें एक सुख आहे इतकेंच. शब्द तसाच ऐकणाराच्याहि मनाचें एक सुखच. तसाच स्पर्श. तोहि केवळ मानसिक सुख आहे. ज्याअर्थी रूपसुखाचा मार्ग मला बंद आहे, त्याअर्थी शब्द, स्पर्श, गंध इत्यादि सुखें रूपाच्या सुखाप्रमाणें माझ्या मनांत सर्वव्यापी कां होणार नाहींत ?

"शुष्क भूमीवर जलाचा वर्षाव झाल्यावर ती फलवती कशी होणार नाहीं ? वाळलेल्या शुष्क काष्ठाला अग्नि लागतांच ते का जळणार नाहीं ? रूपानें म्हणा, शब्दाने म्हणा, स्पर्शाने म्हणा, स्त्रीच्या शून्य हृदयांत पुरुषाच्या स्पर्शामुळें प्रेम कसें उत्पन्न होणार नाहीं ?

"पहा ! अंधेरांतहि फुलें उमलतात. आकाश अभ्राच्छदित असलें तरी त्यांत चंद्रमा संचार करीतच असतो. निर्जन अरण्यांतहि कोकीळ रव करीतच असतो. जेथें मनुष्याला कधीं जातां येत नाही अशा समुद्राच्या पोटांत रत्नें चमकतच असतात. आंधळ्या माणसाच्या मनांतहि प्रेम उत्पन्न होतें. मला दृष्टि नाहीं म्हणून काय हृदय प्रफुल्लित होण्याचें राहील ?

"कां नाही होणार ? होईलच. पण केवळ मला यातना करण्यासाठींच. मुक्या माणसाचें कवित्व केवळ त्याच्या यातनेला कारण होतें. बहिऱ्या माणसाची संगीताभिरुचि केवळ त्याच्या यातनेसाठीं असते. स्वतःचे गाणे त्याला स्वतःला ऐकूं येत नाहीं. तसा माझ्या अंतःकरणांतील प्रेमसंचारहि माझ्या यातनेसाठीच आहे. मी स्वतःचे रूप कधीं पाहिलें नाहीं. मग दुसऱ्याचे रूप काय पाहणार ? रूप ! रूप ! माझें रूप कसें आहे ? या भूमंडलांत रजनीनामक एक क्षुद्र बिंदु कसा दिसावा ? मला एकदां पाहिल्यावर पुनः पाहण्याची इच्छा कोणाला तरी होईल काय ? मला सुंदर म्हणण्याइतका नीच प्रकृतीचा मनुष्य या जगांत कोणी असेल काय ? डोळे नसले म्हणून काय झालें ? त्यावांचून स्त्री सुंदर होऊं शकत नाहीं थोडीच ? मला डोळे नाहींत ही गोष्ट खरी, पण कारागीर नेत्र-

हीन अशा मूर्ति घडवितात कीं नाहीं ? तर मग मी त्या मूर्तीसारखी पाषाणाची मूर्ति आहे ? असेन तर विधात्यानें त्या पाषाणाच्या मूर्तींत सुखदुःखांनीं युक्त , प्रणय-लालसेनें व्याकुळ असें हृदय तरी कां घातलें ? पाषाणाचें दुःख मला प्राप्त होतें तसें त्याचें सुखहि मला कां मिळूं नये ? या जगांत असा भेदाभेद कां असावा ? अनंत दुष्कर्मं करणाराहि डोळ्यांनीं पाहूं शकतो. मी पूर्व जन्मीं असें कोणतें पाप केलें होतें कीं त्यामुळें या डोळ्यांनीं मला कांहीच दिसू नये ! ”

“ पुष्कळ वेळां असें दृष्टोत्पत्तीस येते कीं, दुःखानें हृदय भंग पावलेलें असतें. पण कोणते दुःख आहे हें त्या माणसाला स्वतःलाच कळत नाहीं. मग दुसऱ्याला काय कळणार ? याला काय सामान्य दुःख म्हणावयाचें ? ज्या दुःखाला साऱ्या पृथ्वीवर भाषा नाहीं त्याचें ज्ञान दुसऱ्याला कसें होणार ? लहान तोंडी मोठा घांस घेणें तुम्हाला पसंत नाहीं; मग क्षुद्र भाषेनें मोठें दुःख कशा प्रकारें व्यक्त करतां येईल ? ”

नक्की हेंच माझ्या संपूर्ण मनाचें शब्दचित्र ! इतक्या उत्तम शब्दांत मीहि तें काढूं शकलों नसतो. या रजनीला एका योग्याचें कृपेमुळे पुढें दृष्टि आली. मला तसा कोणी दयासागर भेटला नाही इतकाच फरक. पण रजनीचे जीवन जसें थांबले नाहीं तसेंच माझेहि कुंठित झालें नाहीं. त्याचीच गोष्ट पुढें सांगत आहे. :—

रुईया कॉलेजमध्यें ग्रंथपाल म्हणून काम करीत असतां एक दिवस The Rani of Jhansi हें फिलिफ कॉक्स या इंग्रज ग्रंथकाराने लिहिलेलें नाटक माझें हातीं पडलें. नाटक सामान्यच आहे पण त्यांतील एका वाक्यानें माझ्या मनांत पेट घेतला आणि मनाची सर्व शांतता ढळली. खालसा झालेलें झालेलें झांशीचें राज्य वांचविण्याकरितां मेजर एलिस याची राणी विनवणी करीत असून पृष्ठ ४९ वर ग्रंथकर्त्यानें राणीच्या तोंडी पुढील वाक्य घातलें आहे.

Major Saheb, you are an unmarried man. Perhaps the soft body of an undefiled Hindu- widow may tempt you if money cannot. I live only for my Jhansi now—And for her I can sacrifice any-thing” (Pagi 49)

वरील वाक्य इतकें विषारी आहे कीं त्यापेक्षां हिंदु स्त्रीची अधिक बेअब्रू किंवा विटंबना कोणती असते ते कळत नाहीं ! फिलिप कॉक्स यांनी हिंदुस्थानात अनेक वर्षे कायदेपंडित व शिक्षणाधिकारी म्हणून काम करून विलायतेंत टॉयनबी हॉलमध्यें इतिहासावर व्याख्यानें दिली. त्यांचे नाटकाचें लिखाण सुप्रसिद्ध नाटककार बर्नार्ड शॉ यांनीं

नजरेखाली घालून सदर नाटकाला प्रस्तावना लिहिली आणि 'अलन-अनविन' या जगप्रसिद्ध प्रकाशकांनीं तें इंग्लंडमध्यें प्रसिद्ध केलें. खाल्ल्या घरचे वासे मोजणारे इंग्रज लोक हिंदुस्थानची बदनामी जगांत करण्याचा कसा पद्धतशीर प्रयत्न करतात तें यावरून दिसून येईल! हें नाटक मीं वाचलें त्या दिवशीं मला झोप आली नाहीं. आणि सहस्र विंचू डसावे अशा मनाला वेदना झाल्या. ज्या थोर स्त्रीनें आपल्या अलौकिक वर्तनानें साऱ्या भारतीय स्त्रियांचे नांव उज्वल केलें तिची अशी हलकट बदनामी एका इंग्रजानें करावी काय? इतिहास म्हणजेच त्यांतील ऐतिहासिक व्यक्तीचे शील व चारित्र्य होय! त्याचें रक्षण व समर्थन जर इतिहासमंडळांकडून न झालें तर, नुसती ऐतिहासिक कागदपत्रांची दप्तरें उराशीं बाळगण्यांत काय फायदा? असे अनेक विचार मनांत येऊन या गोष्टीला जाहीर वाचा फोडण्याचें मी ठरविलें. आणि तारीख १० नोव्हेंबर १९३६ च्या केसरींत "झांशीच्या राणीची बदनामी" हा लेख लिहिला. एक महिनाभर मी मुद्दाम वाट पाहिली. कारण सुशिक्षित स्त्रिया या गोष्टीची किती दखल घेतात हें मला पहावयाचें होतें. पण तें घडलें नाहीं! याकरितां मुंबईच्या 'चित्रा' साप्ताहिकांत स्त्रियांवरहि टीका करण्यास मी सोडलें नाहीं. कॉंग्रेसच्या प्रभातफेऱ्यांत केशरी साड्या नेसून 'झेंडा उंचा रहे हमारा' अशी नाजुक आवाजांत गीतें गाण्यांत, किंवा 'स्त्रियांच्या कायदेशीर हक्कां' करितां सभा भरविण्यांत मोठेपणानें मिरवितां येतें. पण शंभर वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या या स्त्रीची बाजू घेण्यांत त्यांना कोणत्या मोठेपणाचा लाभ होणार? असेंहि मी टोंचून लिहिलें. तेव्हां हळूहळू स्त्रियांच्या निषेधाच्या सभाहि ठिकठिकाणीं होऊ लागल्या. 'सन्डे स्टॅंडर्ड' या साप्ताहिकाचे संपादक-मंडळात श्री. पर्वते होते. हा विषय अखिल भारतीय करण्याकरितां त्यांनी सुचविल्यावरून त्या पत्रांत इंग्रजी लेख लिहिला व त्याच्या पांच पंचवीस प्रति न. वि. गाडगीळ, लोकनायक अणे, हरबिलास शारदा वगैरे सभासदांकडे पाठवून, या पुस्तकाच्या प्रसाराला सरकारनेंच बंदी करावी अशी खटपट केली. आणि शेवटची गोष्ट म्हणजे ग्रंथकर्त्यांवर कायदेशीर नोटीस देऊन फिर्याद करण्याची खटपट करणें. राणीचे नातलग नागपूरचे गोविंदराव तांबे यांचेशी पत्रव्यवहार करून तीहि गोष्ट मी केली. तात्पर्य, या थोर स्त्रीच्या अभिमानाखातर काय वाटेल तें झालें तरी या गोष्टीची तड पोंचवावयाची असें मी ठरविलें होतें. या बाबतची मला आलेली कांहीं पत्रेंच पुढें देतों–

अजमीर २१-१२-३६

"आपलें २५ नोव्हेंबरचें पत्र व छापील पत्रक मिळालें. झांशीच्या राणीसारख्या थोर स्त्रीची बदनामी ही अत्यंत भेकड व दुष्टपणाची गोष्ट आहे. कॉक्स याचे पुस्तकाच्या प्रसाराला बंदी करावी किंवा त्याचेवर कायदेशीर उपाय करावा या दोन्ही गोष्टीशी मी सहमत आहे. मी काय करावें तें आपण सुचवावें. ती गोष्ट मी अवश्य करीन.

हरबिलास सारदा

पुणें ४ नोव्हेंबर १९३६

"आपलें ता. ११ ऑक्टोबरचें पत्र मी सिमल्याहून आल्यावर मला मिळालें. आपण सुचविल्याप्रमाणें असेंब्लींत विचारण्याकरितां लेखी प्रश्न तयार करून पाठवीत आहे. या प्रश्नाकडे माझें लक्ष तुम्ही वेधलें याबद्दल आभारी आहे. सार्वजनिक कार्य करणाऱ्या स्त्रियांवर तुम्ही केलेली टीका चांगली असली तरी, ती केली नसतीत तर बरें झालें असतें असें मला वाटतें !

न. वि. गाडगीळ

यवतमाळ ९ नोव्हेंबर १९३६

आपलें ४-११-३६ चें पत्र व Rani of Jhansi हें पुस्तक पोंचलें. आपण तसदी घेऊन पुस्तक पाठविल्याबद्दल फार आभारी आहे. पुस्तक वाचून या बाबतींत मला जें करतां येण्यासारखें आहे तें मी अवश्य करीन.

मा. श्री. अणे

कामशेत २२ डिसेंबर १९३६

गेल्या महिन्यांत जदुनाथ सरकार यांची व माझी तुम्ही मुंबईत गांठ ज्याकरिता घेतलीं तें काम मी विसरलों नाहीं. आम्ही दोघे आपला प्रवासाचा दौरा संपवून, ते कलकत्त्यास रवाना झाले व मी कामशेतला आलों. 'झांशीची राणी' लिहिणाऱ्या ग्रंथ-कर्त्याला आम्ही खासगी रीतीनें पत्रच लिहिण्याचें योजलें आहे. अर्थात त्याला थोडा वेळ लागेल. तथापि या गोष्टीचा आम्ही पिच्छा सोडणार नाहीं. त्याचा निकाल काय होतो हें आपणांस कळवीनच.

गो. स. सरदेसाई

सरतेशेवटीं या सर्व उद्योगाचा, जाहीर गवगव्याचा, व डॉ. गौर यांनीं श्री. गोविंदराव तांबे यांचे तर्फे फिलिप कॉक्स याला जी कायदेशीर नोटीस दिली त्याचा उपयोग होऊन, फिलिप कॉक्स आणि प्रकाशक 'अॅलन अनविन' यांनीं जाहीर रीतीने माफी मागितली तेव्हां हें प्रकरण संपलें ! सदर माफी हिंदुस्थानांतील आठ प्रमुख वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली होती. व नाटकाच्या आक्षिप्त मजकुराच्या सर्व प्रति रद्द करण्यांत आल्या. या बाबतींत मी जी खटपट केली त्याकरितां मला मुद्दाम नागपुरास बोलावून श्रीयुत गोविंदराव तांबे यांनीं माझा जाहीर सत्कार केला.

या सर्व उद्योगांत माझे सहा महिने गेले. त्यांत १८५७ च्या इतिहासाविषयीं भारत इतिहास मंडळातील कित्येक जुनी पुस्तकें वाचली. हा इतिहास इतका रौद्ररम्य

आहे कीं त्यानें माझ्या मनाची पकड घेतली. त्यांतून सुटकाच नव्हती ! शिवाजी, चिमाजी अप्पा इत्यादि शूर ऐतिहासिक व्यक्तीविषयीं मला आदर आहे; पण अपयश आलेल्यांचाच मी पाठीराखा आहे. त्यांच्याबद्दल सहानुभूतीने माझें मन जितकें तळमळतें तितकें इतर कशानेंहि तळमळत नाहीं. १८५७ च्या इतिहासाला राजकारणाचेंहि दुसरें अंग आहे; कारण इंग्रजी राज्याशीं त्याचा साक्षात संबंध येतो. आणि कॉंग्रेसच्या जन्मापूर्वी सशस्त्र राज्यक्रांतीची हीहि एक तेजस्वी चळवळ होऊन गेली या गोष्टीचा उपमान म्हणून उपयोग करितां येतो. अशा अनेक विचारांनीं या इतिहासावर विशेष संशोधन करून पुस्तक लिहावयाचें मी ठरविलें व त्याकरितां सुद्दाम उत्तर हिंदुस्थानचा प्रवास केला.

या प्रवासांत जुने ऐतहासिक कागदपत्र मला कोणतेंच मिळाले नाहींत. मला हिंदी किंवा फारशी येत नव्हतें. व कोणाशीं ओळखदेख किंवा चिठीचपाटी घेतली नव्हती. नाहीं म्हणावयाला ग्वालेर येथें झांशीच्या राणीची कट्यार व शिक्का पहावयास मिळाला. ब्रम्हावर्तास कृष्णाजी बळवंत रिसबूड यांचेकडून पेशव्यांचे स्त्रियांचे नेपाळांतील राहणीसंबंधाचे अस्सल टिपण मिळाले. तात्या टोपे यांचे वंशजांचे घरीं नानासाहेब बंडवाले यांचे अस्सल चित्र पहावयास मिळाले. पण झांशी, ग्वालेर, कानपूर, ब्रम्हावर्त इत्यादि ऐतिहासिक ठिकाणांचे दर्शन हाच सर्वांत अधिक महत्त्वाचा ऐतिहासिक लेख आहे. तो वाचता येण्याला तुमचे अंगी जिवंत प्रतिभा आणि इतिहासाचें ज्ञान पाहिजे. ब्रम्हावर्तास गंगेच्या काठीं बसलो असतां अनेक विचार मनांत आले. कारण कानपूरच्या लढाईंत अपयश आल्यावर याच घाटावरून रात्री बायकामुलांना नांवेंत घेऊन नानासाहेब पेशव्यानें ब्रम्हावर्ताचे राजधानीचा अखेर निरोप घेतला होता. तो सर्व इतिहास तेथें बसतांच माझ्या मनापुढें साकार झाला. झांशीतील महालक्ष्मी संबंधानें एक गोष्ट स्मरणांत राहिली आहे. या महालक्ष्मीवर झांशीवाल्या राणीची नितांत श्रद्धा होती. वरसईकर गोडसे यांच्या बखरींत त्यासंबंधी फार मनोरम वर्णन आहे. ही बखर अस्सल असल्यामुळें मी अनेकदां वाचली होती व या महालक्ष्मीच्या मूर्तीचें ध्यान कसें बरें असेल ? अशी कल्पना येऊन प्रवासाला निघण्यापूर्वी मनांत कांहीं एक ध्यान साकार झालें होतें. पण ज्यावेळी सदर देवीचे दर्शन घेण्याकरिता देवळांत पाऊल ठेविले त्यावेळीं हुबेहूब माझ्याच अंतःकरणांतील तें ध्यान मूर्तीचे रूपानें तेथें असलेले पाहून मी अत्यंत आश्चर्यचकित झालो ! हा मानसशास्त्रांतील कांहीं चमत्कार आहे, किंवा १८५७ च्या इतिहासाचा माझा कांही पूर्वजन्मींचा ऋणानुबंध आहे याचा कांहींच उलगडा होईना !

या प्रवासांतील आणखी एक लक्षांत राहण्यासारखी गोष्ट म्हणजे श्रीयुत नारायणराव टोपे यांची ओळख. त्यांची व माझी पूर्वीची ओळख नसतांना केवळ योगायोगानें ब्रम्हावर्तास रस्त्यांत त्यांची गांठ पडून परिचय झाला. पण पांचच मिनिटांत मनोमन ओळख होऊन त्याचें चिरमैत्रींत रूपांतर झाले. दोन चार वाक्यें त्यांचेशीं बोलतांच असें

वाटले कीं, हा मनुष्य सुशिक्षित नसेल पण खानदानीचा आहे. तात्या टोपे यांचा पराक्रम स्मरणारा व त्यांचा अभिमान बाळगणारा आहे. प्रत्यक्ष तात्या टोपे यांचा पुतण्याच मला भेटल्यावर आणखीं दुसरें काय पाहिजे ? मीहि दुसऱ्या एका तात्यांचा मुलगाच आहे अशी ओळख पटून त्यालाहि आनंद वाटला; नानासाहेब पेशव्यांच्या वाड्याच्या उध्वस्त वास्तुवर दुपारचें ऊन झालेलें असतांहि कितीतरी वेळ बसून आम्हीं इतिहासांतील गोष्टी बोलत होतो. ब्रम्हावर्ताला शहर किंवा गांवहि म्हणता येणार नाहीं. पूर्वीं ती मोठमोठे वाडे असलेली राजधानी होती. पण १८५७ सालीं इंग्रजांनीं सर्व गांव जाळून बेचिराख केलें, इतकेंच नव्हे तर त्यावर गाढवांचा नांगर फिरविला ! आतां तेथें फक्त फरसबंदी घाट, काहीं देवळें, आणि तुरळक पांच-पन्नास घरें इतकीच राहिली आहेत. आम्ही बोलत बसलों होतों. तेथून गंगेचें पात्र स्वच्छ दिसत होतें. आरपार मैल-दीड मैल विस्तीर्ण असें तें शुभ्र गंगानदीचें पात्र पाहून गंगास्नान करण्याची मला उत्कट इच्छा झाली. प्रवासांत जवळचे पैसे हरवतील व परत येण्यास अडचण होईल अशा भीतीमुळें मी दोन–तीन दिवस स्नानहिं केलें नव्हतें. पण साक्षात् गंगातटाकीं येऊन स्नान न घडतां परत जाणारा मी अभागी किंवा पातकीच नव्हे काय ? असे मनांतले विचार बोलून दाखवितांच टोपे मला म्हणाले, "तुम्ही निःशंक मनानें आंघोळ करा. तुमच्या कपड्यांची मी राखण करतो." त्यांनी असें आश्वासन देतांच पंचा लावून घेऊन गंगेच्या पात्रांत उडी घेतली. दिसतांना पाणी संथ वाहतांना दिसतें, पण दहा हात पुढें गेल्यावर पाण्याला अतीशय जोर आहे असें लक्षात आले. म्हणून लवकरच आंघोळ आटोपून घाटावर आलो. त्या दिवशीं असें वाटलें कीं अनंत पातकांतून आज आपण मुक्त झालों आहो. हिंदु मनुष्याचे मनांतून ही भावना जाणार कशी ?

उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासाहून मी परत आल्यावर माझ्या मनाला हुरूप आला आणि उद्योगाला नवीन कार्यक्षेत्र लागल्यासारखें वाटलें. देशांत स्वातंत्र्याच्या चळवळीला जोर चढला होता त्याला हा १८५७ च्या इतिहासाचा विषय पोषकच होता. त्याकरितां १० मे १९३८ च्या केसरींत '१८५७ च्या युद्धाचें स्मरण' हा विस्तृत लेख लिहून माझ्या उद्योगाचा मी 'श्रीगणेशा' केला आणि वेळोवेळीं केसरी सह्याद्रींत लेख लिहून हा विषय मी लोकांचे नजरेसमोर ठेवला होता. या विषयावर पुस्तक लिहिण्याचें काम मात्र सोपें नव्हतें. तें बरेच भानगडीचे होतें. १८५७ च्या संघर्षांत गुंतलेल्या सर्वच व्यक्तींना सावरकरांप्रमाणें देशभक्तीचें सर्टिफिकेट देऊन मीं मोकळा होतो तर हा इतिहास लिहिण्यांत अवघड कांहींच नव्हते ! पण मला 'इतिहासा'सारखा इतिहास लिहावयाचा होता; राजकीय प्रचाराकरितां इतिहासाला राबविण्याची इच्छा नव्हती, म्हणूनच हें काम पुढें दहा वर्षे भिजत पडलें. मध्यंतरी दुसऱ्या महायुद्धाला सुरवात झाली. त्यामुळें या बंडासंबंधी कोणतीच चर्चा जाहीर रीतीनें करणें शक्य नव्हतें. तथापि सावरकरांचे पुस्तक न वाचतां, किंवा त्यांच्या प्रमेयासंबंधी कोणतीच चर्चा किंवा

टीका न करितां, ऐतिहासिक साधनांचा स्वतंत्रपणें अभ्यास करून आपणाला योग्य दिसेल तसें पुस्तक लिहावें ही गोष्ट मी प्रारंभीच निश्चित केली व अखेरपर्यंत ती कटाक्षाने पाळली. सावरकर यांच्या देशभक्तीबद्दल माझे मनांत आदर आहे. पण इतिहासाचे बाबतींत ते माझे गुरु नाहींत. आणि दुसरें असे कीं, मनुष्यानें आपल्या स्वतंत्र बुद्धीचा अभिमान बाळगून जो अल्पस्वल्प उद्योग हातून घडेल किंवा यश मिळेल त्यांतच समाधान मानावें अशी माझी प्रांजल भूमिका आहे. इंग्रज-विद्वेषी आम्ही दोघेहि होतो. पण घडलेला इतिहास समजण्याची व त्याची संगति लावण्याची आमची दोघांची पद्धति भिन्न आहे.

मनुष्य जें जें लिहितो किंवा जो उद्योग हौसेनें करतो त्यांत त्याची संपूर्ण मनोवृत्ति प्रतिबिंबित झालेली असते. १८५७ च्या राज्यक्रांतीचा अभ्यास करीत असतां 'इंग्रजांविरुद्ध बंड' याखेरीज मला ध्यानीं मनीं स्वप्नीं दुसरें कांहीहि दिसत नव्हतें. "१८५७ सालीं हिंदु मुसलमानांची एकी आटोकाट होती, फितुर झालेली इंग्रजांची देशी फौजच बंडवाल्यांना सामील झाली होती, इंग्रज सरकारचें बहुतेक गोरे सैन्य हिंदुस्थानाबाहेर परराष्ट्रीय युद्धांत गुंतले होते, अशाहि परिस्थितींत त्या बंडाला यश आलें नाहीं, मग आज हिंदु-मुसलमानांत एकी नाही, सैन्यांत शिरकाव नाहीं व दुसरें सैन्य मदतीला येण्याची आशा नाहीं; बाहेरून परचक्र येऊन इंग्रज सरकार दुसरीकडे युद्धांत गुंतलें जाण्याचा संभव नाहीं, आणि स्वराज्य मिळवावयाचें तर 'अहिंसेचे तत्त्वज्ञान आत्मसात करावें अशा गोष्टी ज्ञाते पुढारी शहाजोगपणानें शिकवीत आहेत! हे पाहिले म्हणजे मनावर निराशेची छाया येऊन गेल्याशिवाय कशी राहील?" असे उद्‌गार १० मे १९३८ च्या केसरींत या विषयावर लिहितांना मी काढले होते. पण ईश्वरालाच काळजी. त्यानंतर अवघ्या एक वर्षांतच दुसऱ्या महायुद्धाला सुरवात झाली! आणि जुन्या इतिहासावरून माझी दृष्टि निघून, नवा इतिहास घडविणारे कर्ते लोक या प्रसंगाला तोंड देऊन तो कसा काय घडवितात याकडे सगळे लक्ष लागलें!

हें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी अवघा एकच आठवडा अगोदर, पुण्यास गायकवाड वाड्यांतील गणेशोत्सवांत 'जागतेपणचें स्वप्न' या विषयावर तात्यांचे एक उत्कृष्ट व्याख्यान झाले. त्यांत त्यांनी सांगितलें "तुम्ही यापुढें जागेपणीं असें स्वप्न बघण्यास शिका कीं, आपल्या देशावर असलेलें ब्रिटिशांचे राज्य गेले, अगदी पार नाहींसें झालें! आपण अगदीं स्वतंत्र झालों! आणि नंतर काय व्यवस्था करावयाची, देशाचा कारभार कसा चालवावयाचा, हें कागदावर टिपून ठेवा. दहाजणांची दहा उत्तरें येतील. पण मनाला ही एक शिकवण आहे. हुमायूनच्या हातांत नेहमी एक आंगठी असे. त्यावर 'हेहि दिवस जातील' अशी अक्षरें खोदलेली होती. त्याचा अर्थ असा कीं, एकच स्थिति तशीच एकसारखी टिकत नसते. ती नेहमीच चंचल असते. हें लक्षांत घेऊन मी म्हणतो, नव्हे माझी अशी पक्की खात्री आहे कीं ब्रिटिशांचे राज्य आमचेवरून खास

जाणार ! हें मी आततायीपणानें अथवा सूडबुद्धीनें बोलत नसून विचारपूर्वक बोलत आहे. परमेश्वरानें जगांतील एकाहि साम्राज्याला असा ताम्रपट दिलेला नाही की, त्याचें राज्य यावच्चंद्रदिवाकरौ सतत चालावें. जुन्या इतिहास वाचा म्हणजे मी काय म्हणतो हें आपणांस पटेल. आजवर किती राज्यें, किती साम्राज्यें धुळीस मिळाली असतील याला कांही हिशेब ? रोमन साम्राज्य गेलें, ग्रीसचें राज्य गेलें, जगज्जेता अलेक्झांडर गेला, चक्रवर्ति नेपोलियन नाहीसा झाला; आपल्याकडील चंद्रगुप्ताचें, अशोकाचें साम्राज्य गेले, मौर्यांचे गेलें; गुप्तांचे गेलें; अशी एक ना दोन, किती सांगावी ? परिवर्तन हेंच काळाचे लक्षण असल्यामुळें त्यांत हीं सर्व साम्राज्यें नाहीशी झालीं. सारांश, या जगांत शाश्वत आणि चिरंजीव कांही नाहीं. ही गोष्ट आपण ओळखली पाहिजे. इंग्रजांनी मात्र हें ओळखलें आहे. तितके ते शहाणेच आहेत. इ. स. ४०९ मध्यें रोमवर बार्बेरियन लोकांनी चढाई केली, तेव्हा इंग्लंडमध्यें असलेलें सर्व रोमन सैन्य रोमकडे त्याच्या संरक्षणार्थ आणावें लागलें आणि रोमन पारतंत्र्यांतून इंग्लंड आपोआप मुक्त झाले. आज युद्धाचा संभव दिसत आहे. तेव्हा असाच प्रसंग इंग्लंडवर येणार नाही म्हणून कशावरून ? हिंदुस्थानांतील प्रत्येक गोऱ्या शिपायाला येथून उठून इंग्लंडच्या संरक्षणाकरिता जावें लागेल !"

आणि या व्याख्यानानंतर ज्यावेळीं अवघ्या सहाच महिन्यांत हिटलरने अर्धें युरोपखंड पादाक्रांत केलें तेव्हां इंग्लंडवर तीच वेळ आली नव्हती काय ? १९४२ सालीं इंग्लंडला आपण मदत करणार नाहीं म्हणून असहकारितावादी पुढाऱ्यांनीं तुरुंगाचा रस्ता धरला. त्या बिचाऱ्यांनीं तरी यापेक्षा काय करावें ? पण खरें राजकारण जाणणाऱ्या लोकशाही पक्षानें व हिंदुसभेनें सैनिकीकरणाची मोहीम काढली. सावरकर तर व्याख्यानांत उघड सांगत असत की, "पूर्वी बॉम्बगोळें व पिस्तुलें तयार केल्याबद्दल ज्या सरकारने आम्हांला जन्मठेपीची शिक्षा दिली, तेंच सरकार जर लोकांना सैन्यांत घेऊन आतां बंदुका व बॉम्बगोळे वापरण्याचें 'शिक्षण' देत आहे तर लोकांनीं या संधीचा फायदा का न घ्यावा ?"

पण काळाचे पोटांत याहिपेक्षां आश्चर्यें दडलेली होती ! हिंदुस्थानांतून अचानकपणें गुप्त झालेल्या सुभाषबाबूंची वाणी सिंगापूर रेडिओवरून ऐकू येऊं लागली ! त्यांनीं आझाद सैन्य उभारून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता 'प्रतिसरकार' स्थापलें. आणि "१८५७ चें अपयशाचा आम्ही सूड घेऊं" असें म्हणून "चलो दिल्ली" अशी त्यांनीं घोषणा केली. त्यावेळीं, १८५७ च्या युद्धाचें भव्य प्रात्यक्षिकच पुनः आपण पहात आहों असें वाटून माझे अंगावर आनंदानें रोमांच उभे राहिले ! युद्धांत अनेकजण कसे निरनिराळ्या हेतूनीं सामील होतात; त्यात बोलणारें काय करतात, न बोलणारे काय करतात हें पाहिलें. सर्वच गोष्टी होकायंत्राच्या काट्यांप्रमाणें नाजूक व चंचल झाल्या होत्या; आणि जेव्हां जपानच्या स्वारीचे संकट हिंदुस्थानच्या दारांत उभे

राहिलें, तेव्हा राजनिष्ठ म्हणविणाऱ्या संस्थानिकांचे मनाचीं कशी चलविचल झाली, या साऱ्या गोष्टी मी नीट बारकाईनें पाहात होतो. कारण आज जें घडत होते किंवा घडणार होतें तेच १८५७ सालीं घडलें असेल! कारण मनुष्यस्वभाव सर्वकाळीं सारखाच. इतिहासांत हेतुर्मीमांसाच अवघड असते. दुसऱ्या महायुद्धाच्या अभ्यासाचा अनुभव माझ्या १८५७ चे पुस्तकाला उपयोगी पडला.

दुसऱ्या महायुद्धाचें काळांत महागाईचे मान कसें भराभर चढले, आणि जीवनोपयोगी वस्तुहि 'काळ्या बाजारां'त नाहीशा होऊन रेशनिंग कसें बोकांडी बसले, या गोष्टी सर्वांच्या परिचयाच्या आहेत. पण १९४२ सालीं जपानच्या स्वारीच्या भीतीमुळें मुंबई सोडण्याची सार्वत्रिक धांवपळ सुरू झाली, आणि आकाशांतून प्रत्यक्ष बॉंब वर्षाव होण्याचे आधीच दादर, माटुंगा इत्यादि वस्तींतील सर्व रस्ते निर्मनुष्य व शून्य दिसत होते. कोणाचे मनांत असा विचार येईना कीं पळून काय होणार? आणि कुठें पळणार? पण सारीं माणसें धांवत होती! मुंबई, भायखळा, दादर इत्यादि स्टेशनावर तर मुंगीला देखील शिरतां येणार नाहीं इतकी गर्दी लोकांनीं केली होती. अशा स्थितींतहि आम्ही मुलांसुद्धा मुंबईतच राहण्याचें निश्चयानें ठरविलें. दादर–माटुंग्याच्या सर्व रस्त्यांत दिवसाहि शुकशुकाट दिसे. मग रात्रीं 'ब्लॅकआऊट'मध्यें काय स्थिति असेल? दर इमारतींत केवळ पांचसात लोक असत. कोणाला पोस्टांत तर कोणाला रेल्वेंत अशा नित्यावश्यक नोकऱ्यांमुळें ते नाईलाजामुळे तेथें अडकून पडले होते. ते नोकरीवर गेले कीं घरीं फक्त बायकापोरें असत. मी त्या वेळीं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सभासद असल्यामुळें चार मित्र जमवून त्या शून्य रस्त्यांत खुशाल फिरत असे.

एके दिवशी एका गृहस्थानें बायकामुलांचे रक्षणाकरितां दिवसा रात्रीं एखादा गुरखा पाहारेकरी नेमावा अशीं बोलतांना मला विनंति केली ती मात्र आवडली नाहीं. मी त्याला म्हटलें, "पुरुषांसारखे पुरुष आपण जिवंत असतांना तुमच्या बायकामुलांचेदेखील रक्षण गुरख्यानें करावे? अशी स्थिति असेल, तर त्यांची आशा तुम्ही आताच कां सोडत नाहीं? यांत तुमच्या मर्दपणाला किंवा पौरुषाला कोणतें भूषण आहे? या लढाईतला कायदाच असा आहे कीं, जी वस्तु तुम्ही बरोबर न्याल किंवा जिचे प्राणपणानें तुम्ही रक्षण करूं शकाल तीच तुमची. बाकीच्यावर तुमचा हक्क नाहीं! नुसती संपत्तीसारखी चीजवस्तूच काय, पण जो आपल्या स्त्रीचें रक्षण करू शकणार नाहीं त्याची स्त्री ही 'त्याची' कशी म्हणावयाची? शत्रूच्या शिपायानें ती खुशाल घेऊन जावी! हें जर पटत नसेल, तर उद्यापासून मैदानावर या! आणि कांहींतरी शरीरबळ ताजेतवानें करण्यांचा निश्चय करा. त्या झांशीवाल्या राणीनें सहा वर्षांच्या अर्भकाला पाठीशी घेऊन शंभर मैलांची दौड केली. उद्या येथें बॉंबगोळे पडूं लागले तर तुमच्या लहान मुलांना पाठीशीं घेऊन शंभर पावले तरी तुम्ही धावूं शकाल काय? याचा नीट विचार करा." असा उपदेश करून ज्यांना नोकरीचे नियमांमुळे स्थलांतर शक्यच नव्हते, अशा सुमारें दीडशें तरु-

णांना मैदानावर जमवून लाठीकाठीच्या शिक्षणाचा आम्ही उपक्रम सुरूं केला या गोष्टीचा मला अभिमान वाटतो. रणांगणावर जाणारे आम्ही शूर शिपाई नसूं, पण आणी-बाणीचे वेळीं स्वतःच्या बायकामुलांचे रक्षण करण्याला अपात्र असे आम्ही नादानहि नव्हतो !

हें सर्व मी हौसेनें केले. पण या युद्धाचे केवळ राजकीय नव्हे पण व्यापक दृष्टीने सामाजिक परिणाम साऱ्या जगभर काय काय होणार आहेत याची मला कल्पना नव्हती. नुसतें ब्रिटिश साम्राज्यच काय पण प्रत्येक श्रीमंत-गरीब मनुष्याचें जीवन कढईत टाकल्याप्रमाणें वितळत होतें आणि स्थित्यंतराच्या कालनदींत पायाखालची वाळू भराभर सरत होती. या महायुद्धामुळें माझ्याहि आयुष्यांत स्थित्यंतर होऊन मी पुनः ‘ पुणेकर ’ होणार होतों ही गोष्ट माझे त्यावेळीं लक्षांत आली नाही !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२१५ वि: चोर्डेगी
क्रमांक ११७८ नों: दि: ८।४।६८

## ७

# भवितव्यतेची लीला

जगांत कोणाचीहि स्थिति तशीच कायम टिकत नसते. कारण परिस्थिति चंचल असते. ती क्षणोक्षणीं बदलते. श्रीमंतांचे गरीब होतात; गरिबांना उर्जितावस्था येतें हें आपण नित्य पाहतो. "Life is a Ladder; You Must go up or go down" असे एक सुभाषित आहे. त्याचा अर्थ असा कीं, आयुष्य ही एक शिडी आहे. तुम्हांला वर तरी गेलें पाहिजे, किंवा खालीं तरी गेलें पाहिजे. पण मध्येंच कोठेंतरी बसूं म्हणाल तर तें मात्र करतां येणार नाहीं! थोडा विचार केला तर आयुष्यांतील रोकडा अनुभव या सुभाषितांत फार सुन्दर रीतीनें ग्रथित झालेला आढळेल. दुसऱ्या महायुद्धामुळें हेंच घडून येत होतें. जीवनमूल्यें बदलत होती. आणि समाजांतील थरांची उलथापालथ होत होती. मध्यमवर्गाला ही स्थिति जाणवण्यास वेळ लागला नाहीं.

माझेंहि तेंच झालें. दुसरें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी, कर्जवाम न करितां असलेल्या साधनांत कसें तरी जगतां येत असे. युद्धकालीन महागाईमध्यें तें कांहींच जमे-

नासें झालें. याकरितां तात्यांचेंच संमतीनें मुंबईचा सर्व संसार आवरून मी पुण्यास आलो. घर बांधण्याला श्रम पडतात; त्यांतून मोकळें होण्याला कोणतेच आयास नाहींत. फक्त एका विसार–पावतीवर सही केली कीं झाले! मग भवितव्यतेचे तुम्ही गुलाम होऊन ती जिकडे नेईल तिकडे जावयाचे! पुष्कळ विचार केला; आणि ती गोष्ट अपरिहार्य ठरल्यावर तीच उरकण्याला लागलो. शेजारच्या ज्या घराचा मी ट्रस्टी होतो ती मिळकत मी प्रथम विकून टाकली, व त्या नातेवाईकाच्या मृत्युपत्राप्रमाणें सर्व व्यवस्था नीट लावली. पण हें काम अपेक्षेप्रमाणें सुधेपणानें झालें नाहीं. कोर्टाकडून प्रोबेट मिळवावें लागलें. हें विकतश्राद्ध मला बारा वर्षें पुरलें व जगांत सर्व ट्रस्टींना जो विपरीत अनुभव येतो तोच मलाहि आला!

"अनारंभोऽहि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणं" या न्यायानें, हे काम अंगावर घेण्याला प्रारंभीच मी निग्रहानें नकार दिला असता तर बरें झालें असतें; पण तें एकदां पत्करल्यावर "प्रारब्धस्य अंतगमनं" या न्यायानें शेवटपर्यंत त्याची तड पोंचविणें आले. माझे पाठीशी सल्ला मसलतीला तात्या होते, मी स्वतः वकील कायदा जाणणारा होतो आणि हिशोबांचे बाबतींत माझे ऑडिटर मित्र श्री. वामनराव देशपांडे यांची मला अखेरपर्यंत हवी ती निरपेक्ष मदत मिळत गेली म्हणूनच त्यांतून मी मोकळा झालो. जगांत येणारा वाईट किंवा विपरीत अनुभव म्हणूनच ही गोष्ट माझें लक्षांत राहिली आहे. पण सार्वजनिक कामांत जसे तोटे असतात, तसे आनुषंगिक मित्रलाभासारखे फायदेहि असतात. श्री. वामनराव देशपांडे यांचा स्नेह ही त्यापैकींच गोष्ट आहे. त्यांची व माझी मैत्री आज २५ वर्षें टिकली आहे.

हे काम आवरल्यावर सात आठ महिन्यांनी माझेंहि घर विकून टाकून मोकळा होण्याची मला बुद्धि झाली. त्यावेळीं माझी पत्नी सौ. सुशिलाबाई फार आजारी असल्यामुळे, तिला पुण्यास पाठवून देऊन नंतर एका महिन्यांत देण्याघेण्याची सर्व निरवानिरव करून मी पुण्यास आलों. यावेळची एक दोन पत्रें पुढें देतो—

(१)

पुणें ता. ८-८-४२

आशीर्वाद विशेष, पत्र पोंचलें. त्यांत लिहिल्याप्रमाणें व्यवहार करावा. माझी संमति आहे. पण सर्व परस्पर करावे. इतर कोणाचाहि संबंध मजकडे राहू नये. तुम्हांस मृत्युपत्र, भागीदारी–करार व पुण्यास गतवर्षी झालेला करार या सर्वांमुळें घर विकण्याचा व त्यांचे पैसे देऊन टाकून स्वतंत्र होण्याचा अधिकारच आहे. विंझे हे माझे स्नेही व सरळ बुद्धीचे आहेत. तरी जरूर पडल्यास ते व तुम्हीं एकत्र मला पुण्यास येऊन भेटावे.

न. चि. केळकर.

( २ )

पुणें २०-९-४२

आशीर्वाद विशेष—घराचे व्यवहाराची हकीगत कळली. तुम्ही मृत्युपत्राचे एक्झीक्यूटर म्हणजे ट्रस्टी आहां. म्हणून हातीं आलेली रक्कम ट्रस्टीनीं व्यवहार करण्यास योग्य अशाच बँकेत ठेवावी.

मृत्युपत्राप्रमाणें या रकमेचें काय करावें लागेल ? या मृत्युपत्राची एक प्रत मजकडे पाहण्यास पाठवावी. प्रोबेटचा आधार घेऊन रक्कम सुरक्षित ठेवल्यास तुम्हांस कोणास कांहींच म्हणतां येणार नाहीं. तुम्हीं एका काळजींतून मुक्त झाला. इकडील हकीगत बापट यांचे पत्रावरून तुम्हांस सर्व कळलीच असेल.

न. चिं. केळकर

( ३ )

पुणें २६।४।४३

आशीर्वाद विशेष—तुमचें पत्र पोंचलें. घराचा व्यवहार चांगला झाला यांत शंका नाही. आतां तुम्ही दोन्ही घरांच्या भानगडीतून मुक्त झालांत तेव्हां **माझ्या योजनें-प्रमाणें तुम्हांस जुलैपासून मुंबईस राहण्याचे कारण नाहीं**. तरी पुढें कुठे राहावें हें मागाहून ठरवूं. तूर्त चि. सौ. सुशिला प्रवास झेपण्याइतकी बरी होतांच तिला घेऊन सर्वजण पुण्यास या. पुढचें पुढें. पुढील व्यवस्था कशी करावी हे अर्थात् जुलैनंतर ठरवितां येईल. तरी सुशिलाला घेऊन पुण्यास यावें हें पहिलें काम. कळावे.

तात्या केळकर

मुंबईचें बिऱ्हाड मोडून व सत्तेची भाड्याची जागा होती तीहि दुसऱ्याचें नांवावर करून देऊन मी पुण्यास आलो ही मी फार मोठी चूक केली; व त्याबद्दल पुढें मला वारंवार पश्चाताप करण्याची वेळ आली यांत शंका नाही ! सर्व नातेवाईकांपासून मी दहा हात दूर राहिलों असतो तर त्यांत मला सुख लागलें असतें. पण तात्यांचे जवळ राहावयास सांपडावें या भावनावशतेनें मी पुण्यास आलो, यांत माझा कयास अगदींच चुकला असें म्हणावें लागतें. तात्यांचे मनांत माझेविषयी प्रेमच होतें. आणि ' मी पुण्यास यावें ' असें त्यांनीहि पत्रांत मला लिहिलें होतें हेंहि खरें. पण दहा वर्षांपूर्वी तात्या केसरीचे संचालक असतां जी परिस्थिति होती ती आतां राहिली नव्हती. या काळांत इतर प्यादी पुढें सरकली होती. आणि पटावर जागा धरून होती. माझी मात्र डावाला पुनः पहिल्यापासून सुरवात होती. जें मोहरें डावातून एकदां बाद

होऊन पटाबाहेर पडले त्याला डावांत पुनः कोण घेतो ? हाच अनुभव मला पुढील सर्व आयुष्यभर आला आहे ! मी मुंबईस राहावयास गेल्यामुळे तात्यांचे ग्रंथप्रकाशन दुसऱ्यांचे हातीं गेले होतें. केसरी–सह्याद्रीत मला नोकरी मिळणार नव्हती. कारण तात्यांनीं केसरीची ट्रस्टीशिप व संपादकत्व सोडल्यावर तात्यांचा केसरींशी कसलाहि संबंध उरला नाहीं. आणि त्यांनी सह्याद्रीचे संपादकत्व सोडून दिले असते तर तें मासिकच बुडेल याकरितां नाइलाजामुळे त्याचें संपादकत्व त्यांचेकडे राहिलें होतें. अधिकारांतील हे फरक लोकांना कळत नसत. व अनेक लेखक पूर्वीप्रमाणें त्यांचेकडेच लेख पाठवित. एकाद्याचा लेख चांगला असला तर त्याला प्रोत्साहन देण्याकरितां तात्या तो लेख केसरीकडे पाठवून देत. पण तो लेख केसरीत येईलच अशी शाश्वति देतां येत नसे ! सांगलीच्या एका होतकरू लेखिकेच्या बाबतींत असेंच घडलें. तेव्हा तिनें विचारणा केल्यावरून तात्यांनीं तिला पत्र लिहिलें कीं " मी आतां केसरीचा संपादक नाहीं व ट्रस्टीहि नाहीं यांत काय तें समजावें ! " त्यांनीं स्वतः लिहिलेल्या लेखांतील शब्दांना किंवा वाक्यांना संपादकाकडून काट मिळत असे, तें पाहून तात्यांचे सारख्या मानधन व जातिवंत लेखकाला काय वाटत असेल याची वाचकांनीच कल्पना करावी ! सहीवर लिहिलेल्या लेखांची जेथें ही गोष्ट, तेथें इतर कामांत त्यांचा सल्ला कोणास नको होता ही गोष्ट सांगावयास नकोच ! केसरीच्या तिघां ट्रस्टीपैकीं एकजण देखील शेवटच्या चार वर्षांत त्यांचेकडे घरीं आलेला मी पाहिला नाहीं ! कांहीं आवश्यकता लागली तर किरकोळ चिटीचपाटीनें कामें होत. तात्पर्य, केसरीशी त्याचे संबंधहि फार नाजूक होते. " नापृष्टः कस्यचित् ब्रूयात " असे धोरण ठेवून ते आपला मान कसाबसा संभाळत असत. अमात्य–माधव नाटकांत त्यांनीं माधवाचार्यांचें जें चित्र काढलें आहे त्याची मला राहून राहून आठवण होते. तात्यांच्या अखेरच्या दिवसांचे त्यांत मूर्तिमंत शब्दचित्र आढळेल. मनुष्य एकवेळ संपत्तीचा त्याग करील पण सत्ता त्याला सोडवत नाहीं. तात्यांनीं मनांत आणल्याबरोबर एक केसरीच काय पण इतर पन्नास संस्थांतील सत्तेची जागा सोडून, एका टांकासरशीं त्यावर आपली स्वत्वनिवृत्ति केली असें उदाहरण साऱ्या हिंदुस्थानांत घडेल नसेल ! त्यांनीं सत्ता सोडणें हीच ज्यांना पुढें येण्याची संधि वाटत असेल त्यानां या गोष्टीबद्दल कौतुकहि वाटत नसेल. पण माझी स्थिति तशी नव्हती. त्यांचें मोठेपण मनोमन मी इतकें जाणत होतो कीं त्यांचें हातीं कोणतीहि सत्ता असो वा नसो, त्यांच्याच मार्गदर्शनाखालीं जें करितां येईल ते करावें असें मी ठरविलें.

अशा परिस्थितीत केसरी सह्याद्रींत केवळ आपणाला उद्योग हवा म्हणून ' नोकरी ' करावी अशी इच्छा मला कधीहि झाली नाहीं. मुंबईत राहात असतांनां ' प्रभात ' सोडल्यावर ज्या कारणाकरितां इतर कोणत्याहि वर्तमानपत्रांत मी नोकरी केली नाहीं, त्याच कारणाकरितां तात्यांनीं केसरी सोडल्यावर केसरींत जावें असें मला वाटलें नाहीं. एरवी केसरी – सह्याद्रींत लिहिण्याला मला मोकळीक होती. पण त्यांतहि तेथे आधींच

स्थायिक झालेल्या वतनदार माणसांच्या कारवाया व हेवेदावे प्रत्ययाला येत. तात्या असतानां निःस्वार्थीरीतीनें मी केसरींत लिहिण्याचें जें कौतुक होतें तेंहि आतां उरलें नाहीं. या सर्व गोष्टीना कंटाळून मी एक दिवस तात्यांना म्हटलें " केसरीशीं आमच्या-सारख्याचे संबंध म्हणजे सगळा एकतर्फी मामला झाला आहे ! केसरीचा अभिमान फक्त आम्हीच धरावयाचा. त्यांना त्याचें कांहींच नाहीं. फर्ग्युसन कॉलेजांत टिळकांचा पुतळा उभारण्यापासून आजतागायत माझे इतके श्रम केसरीकरितां खर्च झाले आहेत कीं ते श्रम जर मी दुसरीकडे खर्च केले असते तर त्याचे चीज झालें असते ! " माझ्या या उद्गारांनीं तात्यांचे अंतःकरणाला स्पर्श केला. ते इतकेंच म्हणाले, " होय, मी हे जाणतो ! "

म्हणून जे माझें मन जाणत होते त्यांच्या पायाशीं बसून त्यांचीच नोकरी करावयाची असें मी ठरविले. मला जगाशी काय कर्तव्य होते ? १९२२ सालीं बी. ए. पास झाल्यावर पोटाच्या उद्योगाकरितां आपण काय करावें असा विचार करीत असतां त्यांच्या वाङ्मय प्रकाशनाचा उद्योग मला सुचला. त्या वेळीं " मी तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणाचीहि नोकरी करणार नाहीं " असे ' खासगी पत्र ' घरच्या घरींच लिहून मी त्यांच्या टेबलावर ठेवलें होतें त्याची यावेळीं मला आठवण झाली. आणि हा उद्योग माझ्या आवडीचाहि होता. मुंबईहून पुण्यास आल्यावर, मी कात्रणें काढलेली त्यांच्या वाङ्मय-सामुग्रीची एक ट्रंक भरली होती. ती मी ताब्यांत घेतली. तसेंच सह्याद्रीचे अगदीं पहिल्या अंकापासून सर्व अंक मिळविले. मी मुंबईस राहावयास गेल्या-वर माझ्या अपरोक्ष तात्यांचे ग्रंथप्रकाशनांत इतरांचा हात घुसला होता. म्हणून माझ्या हक्काकरिता मलाहि निर्भयपणानें त्यांच्याशी थोडें भांडणच करावें लागलें. कारण या कामाला माझ्या जन्माच्या श्रमांची किंमत मी दिली होती. पण या हक्काचें बाबतींत जशी मला शंका नव्हती तशी तात्यांनाहि नव्हती. त्यांच्या सर्व वाङ्मयाचा मला एकट्यालाच वारस किंवा हक्कदार करावें हा जो विचार त्यानीं प्रथमपासून ठरविला होता तो त्यानीं कधीहि फिरविला नाहीं. याकरितां इतरांची गैर समजत दूर करण्याकरिता स्वतःच्या सहीने त्यांनीं ता. २ जानेवारी १९४५ चे केसरीत जाहिरातच दिली. त्यांत " मी ग्रंथकार या नात्याने राखून ठेवलेलें किंवा कायद्याने मजकडे येणारे **आत्मचरित्रा-सुद्धा माझ्या सर्व ग्रंथासंबंधीचे सर्व हक्क** चि. काशिनाथ नरसिंह केळकर यास दिलेलें आहेत, " असे त्यांनीं स्पष्ट निःसंदिग्ध शब्दानी जाहीर केलें. या गोष्टीने माझा पुढील मार्ग निर्वेध झाला. मुंबईहून मी पुण्यास आल्यावर माझा मुलगा अरविंद याची मुंज केली. आणि मुंबईस असतांना जसा माझ्या संसाराचा स्वतंत्र जमाना होता तसाच तात्यांच्या संमतीनें सोईकरिता येथेंहि करून राहूं लागलो. माझ्या अभ्यासाला आतां निवांतपणा मिळाला. कॉंग्रेसचे पुढारी १९४२ सालच्या चळवळीत तुरुंगांत अड-कले होते व इतर कोणत्याहि पक्षांची राजकीय चळवळ चालू राहणें युद्ध संपेपर्यंत

शक्यच नव्हते. तें युद्धहि आतां ऐन भराला आलें होते. म्हणून त्याचा निकाल काय होतो हें मीं उत्सुकतेनें पाहूं लागलो.

१९४१–४२ सालीं दुसऱ्या महायुद्धाची चढती कमान होती. तिला १९४३ सालीं उलटी कलाटणी मिळाली; आणि क्रमाक्रमानें सर्व आघाड्यांवर जर्मनीचा पाय आंत येऊं लागला. फ्रान्सचा पाडाव झाल्यानंतर १९४० सालचे जुलैमध्यें जर हिटलर इंग्लंडवर स्वारी करता तर, त्या परचक्राला तोंड देण्याला देशांत पुरेशी तयारी नव्हती असें चर्चिल यानीच म्हटलें आहे! शंभर वर्षांपूर्वी असेंच नेपोलियनच्या स्वारीचें संकट उभें राहिलें त्यावेळीं विलियम पिट यानें अप्रतिम धैर्यानें त्या संकटाला तोंड दिलें. यावेळी विन्स्टन चर्चिल यानेहि तशीच महनीय कामगिरी बजावली. हें पाहून मी वाचलेला नेपोलियनचा इतिहास माझ्या डोळ्यापुढें सजीव झाला. अखेर बर्लिनच्या वेढ्याला सुरवात झाली तेव्हां हिटलरचा या युद्धांत शेवट होणार हें उघड दिसूं लागलें. पण शेवट होणार म्हणजे काय होणार? अनेकांना शंभर वर्षांपूर्वी नेपोलियनचा इंग्लंडचे बंदिवासांत शेवट झाला त्याची आपोआप आठवण झाली; आणि एका सभासदानें चर्चिल यांना उघडपणानें पार्लमेंटात विचारलेंहि कीं, "हिटलरचा शेवट नेपोलियन-प्रमाणेंच होणार काय"? या प्रश्नांत अर्थातच खोंच होती. हिटलरची कोणी नेपोलियनशीं तुलना करावी ही गोष्ट चर्चिल यांना आवडली नाहीं. त्यानीं उत्तर दिलें, 'हिटलरसारख्या आततायी नृशंस माणसाची कोणी उठून नेपोलियन बादशहाशी तुलना करावी हें बरोबर नाहीं! असें करण्यात त्या श्रेष्ठ वीराला व विभूतीला फार फार अन्याय होतो!" इंग्लंडच्या मुख्य प्रधानानें नेपोलियनची ही मुक्त कंठानें केलेली प्रशंसा पाहून माझें मन बहरून गेलें. सेंट हेलिनाच्या बंदिवासाची अमरकथा मी वारंवार किती तरी वेळां वाचली होती. या प्रसंगानें मी ती लिहून काढली आंणि सह्याद्रीच्या दोन अंकांत प्रसिद्ध केली. याबद्दल मला अनाहूतपणें आलेलीं एकदोन पत्रें पुढें देतो —

## रियासतकार सरदेसाई यांचे पत्र

P. Kamshet, Dist Poona

I Dec. 1244.

Dear Mr. Kelkar,

Just a line to tell you how with the greatest pathos and in the midst of tears I enjoyed a half hour in going through your charming piece in the Sahyadri, describing the last days of Napoleon at

St.- Helena. I remember having read with equal zest Rosebury's Last Phase. Your description is realistic and touching.

I wonder if we Indians are destined always to enjoy tears and sorrows. Is she not to have a man like Napeleon to raise her from the abyss of misery ! !

Believe me,

yours sincerely
G. S. Sardesai.

( २ )

ता. ९–१२–४४

" सह्याद्रि मासिकांतील ' भवितव्यतेची लीला ' हा आपला लेख वाचून वाटलेला आनंद आणि समाधान व्यक्त करण्याकरितां हें पत्र लिहीत आहे. आपण ज्या पद्धतीनें एकंदर माहितीचे संकलन केलें आहे ती अत्यंत आकर्षक आहे. आपला लेख वाचीत असता Andre Maurois याच्या शेले, बायरन, Poets and Prophets इत्यादि ग्रंथांची सारखी आठवण होत होती. आपलें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. पुनः असें कधीं वाचावयास मिळेल ? कळावे हे वि. "

**गं. भा. निरंतर**

माझे मित्र श्री. रा. वि. फडतरे यांनी माझा सह्याद्रीतील लेख वाचून नेपोलियनची विश्वसनीय जन्मकुंडलीच मला मिळवून दिली. कारण मला ज्योतिषशास्त्र अवगत आहे हें त्यांना माहीत होतें. ही कुंडली हातीं आल्यावर मग काय विचारता ? शंभर वर्षांचे पंचांगाचे पुस्तक मिळवून नेपोलियनच्या चरित्रांतील अनेक घटना मी पडताळून पाहूं लागलो. त्यांत वाटर्लूची लढाई गुरु कन्या राशींत असतांना झाली येथपर्यंत आल्यावर, दुसऱ्या एका वेगळ्याच गोष्टीवर अचानक प्रकाश पडला ! ती गोष्ट अशी कीं, नेपोलियन व हिटलर या दोघांच्याहि कुंडलीत जन्मलग्न आणि दशमस्थान यांत फारच आश्चर्यकारक साम्य आहे. वाटर्लूची लढाई जर कन्येच्या गुरूंत झाली, आणि तसाच आतांहि ( १९४४ साली ) जर गुरु कन्या राशींतच आहे तर, महायुद्धाचा शेवट अगदीं जवळ आला असें निश्चित अनुमान निघतें ! माझे हें अनुमान मी तात्यांना सांगतांच मी तर्कशुद्ध बोलत आहे त्यांना वाटलें. आणि त्यांनीं हें भविष्य जाहीरपणें सहीनिशीं लिहिण्यास मला प्रवृत्त केलें.

जाहीरपणें लिहिण्यास मी थोडा संकोच दर्शविला त्यावर मला ते म्हणाले " हें भविष्यविषयक अनुमान मजजवळ तूं ' पूर्वी ' बोलला होतास असें जर ' नंतर ' तूं मागाहून लोकांना सागितलेस तर कोणीहि त्यावर विश्वास ठेवणार नाहीं ! याकरितां ज्योतिष-

शास्त्र खरें आहे असें जर सिद्ध करावयाचें असेल, तर तें भविष्य ' आगाऊ ' प्रसिद्ध करणें हा एकच मार्ग आहे ! समजा, हें भविष्य खोटें ठरलें तरी, त्यांत जगाचें नफा-नुकसान काय आहे ? कांहींच नाहीं. पण जर खरें ठरलें तर ज्योतिषशास्त्र खरें ठरेल ! पण तें ठरावयाचें तर, भविष्य आगाऊ प्रसिद्ध करणें हा एकच मार्ग त्याला आहे ! " तात्यांचा फलज्योतिषावर विश्वास नव्हता. पण त्यांच्या मनाची कोरी पाटी होती. ज्योतिषशास्त्र हें खोटे आहे असेंहि ते म्हणत नसत. त्यांच्या मतें तें शाबीत नाहीं, तसेंच नाशाबीतहि म्हणतां येणार नाहीं. Not Proved इतकेंच त्याबद्दल म्हणतां येईल. " मग मला ते म्हणाले, " हिटलर टिपूप्रमाणें धारातीर्थी मरणार ? कां तो आत्महत्या करणार ? का दोस्त राष्ट्रांचा बंदिवान होणार ? का तो जिवंत सांपडल्यावर दोस्त राष्ट्रें त्याची चौकशी करून त्याला देहांत शासन करणार ? या हिटलरचें काय व्हावयाचें ? या प्रश्नांचे निश्चित उत्तर कोणी देत असेल तर तें आज सर्वांना हवें आहे. "

यावर मी त्यांना उत्तर दिलें नाहीं, पण मनानें त्यांचें आव्हान मी पत्करलें. मग निरनिराळीं पुस्तकें वाचीत हिटलरच्या कुंडलीवर चिंतन करीत दोन आठवडे घालविले. एखाद्या गुहेंत समाधी लावावी त्याप्रमाणें त्या पंधरा दिवसांत मीं खोलीबाहेरहि आलों नसेन ! मग मनांत प्रकाश पडूं लागला व हळूहळूं अनुमानाला गति मिळून तें आपोआप पुढे सरकूं लागले. त्यांत असें स्पष्ट दिसलें कीं, नेपोलियनच्या व हिटलरच्या कुंडलीत वरवर साम्य दिसलें तरी दोघांची प्रकृति अगदीं भिन्न आहे. म्हणून हिटलरचा शेवट नेपोलियनप्रमाणें होणार नाहीं; हिटलर आत्महत्या करणार आहे ! मग मनाचा निश्चय झाल्यावर साधार लेख तयार करून तो मी ' वाङ्मयशोभा ' मासिकाकडे पाठवून दिला. त्यांत अखेरच्या वाक्यांत मी असें स्पष्ट शब्दांनी लिहिलें होतें कीं, " ज्या जर्मनीवर आपण प्राणापेक्षांहि अधिक प्रेम केलें त्याच्या चिंधड्या झालेल्या पाहून, येत्या एप्रिलांत त्याचें छप्पन्नावें वर्ष पूर्ण होण्यापूर्वी, हिटलरनें आत्महत्या केल्याची बातमी वाचकांचे कानावर येईल ! नेपोलियनचा बंदिवास हिटलरचे नशिबांत दिसत नाही ! "

तात्यांचे सर्व प्रश्नांची उत्तरे या शेवटच्या वाक्यांत मी दिली होती असें दिसेल. माझा लेख वाङ्मयशोभेंत ता. १ डिसेंबर १९४४ चे अंकात प्रसिद्ध झाला, त्याबरोबर अनेकांचे त्याकडे लक्ष वेधले व सर्वांनीं कान टवकारले. कारण हिंदुस्थानांत कोणीहि किंवा विलायतेंत रॅफेलनेंहि असें भविष्य सहीनिशीं प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें नव्हते ! त्यावेळीं ' लढाईचें काय होणार ' याबद्दल कोणास कांहींच अनुमान करितां येत नव्हतें. चर्चिलला सभासदांनी पार्लमेंटांत विचारले—" महायुद्ध केव्हां संपणार ? " तेव्हां त्यानें सांगितले कीं " ते संपावयाचे तेव्हां संपेल ! ते केव्हां संपेल याबद्दल मी कांहीहि सांगू शकत नाहीं. " प्रेसिडेंट रूझवेल्ट यानेंहि असेंच उत्तर दिलें. अशा अनिर्णीत अवस्थेंत महायुद्ध सहा महिनें चालूं राहून शेवट जवळजवळ येऊं लागला. अखेर बर्लिनची कोंडी होऊन बर्लिनच्या अपूर्व वेढ्याला सुरवात झाली. त्यांत अखेर बरोबर

ता. ३० एप्रिल रोजी हिटलरनें आत्महत्या केली, आणि माझें भविष्य अक्षरशः खरें झाले ! ज्योतिषशास्त्रांत असा नियम आहे कीं कोणाचा मृत्यु सांगू नये. मी तें केल्याचा परिणाम माझेवर असा झाला कीं माझी झोप उडाली. कारण सगळें लक्ष त्या भविष्याकडे लागलें होतें !

हिटलर विषयक माझें भविष्य बरोबर आल्यावर अनेकांनी माझें अभिनंदन केलें. त्यांत त्यांचे दृष्टीनें विशेष कौतुक हें होते कीं, मी धंदा करणारा ज्योतिषी नव्हतो पण जाहीर रीतीनें ' आगाऊ ' भविष्य वर्तवून ज्योतिषशास्त्र खरें कीं खोटें हें सिद्ध करण्याचा मान मलाच मिळाला ! ता. ८ जून १९४५ चे अंकांत केसरीनें मुद्दाम स्फुट लेख लिहून माझे जाहीर अभिनंदन केलें होतें. त्यांतील उतारा देतो–

" हिटलर मृत्यु पावला हें आतां निश्चित झाले असल्यानें सहासात महिन्या-पूर्वींच येथील ' वाङ्मय-शोभा ' मासिकाचे अंकांत श्रीयुत काशिनाथ नरसिंह केळकर यांनी " हिटलरचें पुढें काय होणार " या लेखांत हिटलरचें भविष्य वर्तविलें होतें व तें तंतोतंत बरोबर आलें याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. तो लेख सात महिन्यां-पूर्वीं लिहिला गेला त्यावेळीं जर्मनांची कोंडी झाली नव्हती, अथवा जर्मनी इतक्या लव-कर शरण येईल अशीहि चिन्हें नव्हती. अशा वेळीं नेपोलियनचे कुंडलीचे साम्यावरून केवळ फलज्योतिषाचे आधारावर एप्रिल अखेर हिटलरचा अंत होईल, तो आत्महत्या करून घेईल, नेपोलियनचा बंदिवास त्याचे नशिबी येणार नाहीं, असें ठाम अनुमान करणें आणि तें अगदी बरोबर उतरणें हें अभिनंदनीय नव्हे असें कोण म्हणेल ? श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं फलज्योतिषांना एक प्रकारें आव्हान देऊन हिटलरचें काय होणार तें त्यांनीं सांगावें असें म्हटलें होते. आणि त्यांच्या चिरंजीवांनींच त्या आव्हा-नाचें जाहीर उत्तर सात महिने आधी प्रसिद्ध करून फलज्योतिषाची बाजू राखली या-बद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. " असेंच अभिनंदनपर लेख मुंबईचा ' लोकमान्य ', नागपूरचा ' महाराष्ट्र ' इत्यादि पत्रांतून आले होते. पण त्यांतील उतारे देऊन जागा अडवीत नाहीं.

एकच गोष्ट सांगतो ती ही कीं, १९३३ सालीं प्रभात पत्राचा संपादक असतांना ज्योतिष्यविद्या मला येऊं लागली. पण त्याचवेळीं मी असा नियम केला होता कीं ज्योतिषासंबंधी लेखणीनें लेख लिहावयाचा नाहीं व कोठे त्यासंबंधानें व्याख्यान द्याव-याचे नाहीं. भविष्यज्ञान ही खरोखर पाहिलें तर अध्यात्मविद्या आहे. केवळ पुस्तकी विद्या आल्यानें भविष्य वर्तवितां येत नाही. याकरिता पैसे मिळविण्याकरितां तिचा बाजार करूं नये. किंवा त्याबद्दल जाहिरातबाजी करूं नये. अहंकारानें अध्यात्माचें तेज नाहीसे होते व विद्याहि फुकट जाते. पण केसरींत माझेविषयीं अभिनंदनपर लेख आल्यावर माझे गुपित फुटलें व माझें नांव सर्वत्र जाहीर झालें ! तथापि तोच शुभ-शकून असें समजून ज्योतिषाचा धंदा करण्याचा मी विचार केला नाहीं. कारण महा-

युद्ध संपल्यावर दिल्लीच्या लाल किल्ल्यांत सुभाषसैनिकांवर खटला सुरू झाला, कॉंग्रेस पुढाऱ्यांची बंधमुक्तता झाली, सत्ता संक्रमणाबद्दल सरकार व पुढारी यामध्यें देशभर हालचाली सुरू झाल्या. या अनेक नवलकारक हकीगतींमुळे मी ज्योतिषशास्त्रांत डोकें हरवून बसणें शक्यच नव्हतें. १८५७ च्या राज्यक्रांतीचा इतिहास मी लिहीत होतो, पण आतां त्याहूनहि फार मोठी क्रांति हिंदुस्थानांत प्रत्यक्ष घडून येणार होती. म्हणून माझे सारें लक्ष चालू राजकारणाकडेच वेधून गेले. याचें एक गमक म्हणजे १९४६ मे महिन्याच्या सह्याद्रीमध्यें "सुभाषसेनेचे बंड आणि १८५७ चें बंड" या शीर्षकाखाली तात्यांनीं व मी लिहिलेला जोड–लेख होय. यांतील प्रथमार्ध १८५७ विषयीं तात्यांनीं लिहिला व उत्तरार्ध मी लिहून तो लेख मी पुरा केला आहे.

यानंतर "**नेपोलियन व हिटलर**" हें माझें पुस्तक प्रसिद्ध झालें. या पुस्तकाला सहज प्रकाशक लाभला. कारण महायुद्धाचा विषय ताजा होता आणि या पुस्तकाचे शेवटीं हिटलरसंबंधी माझे खरें ठरलेलें भविष्य मी छापलें होतें. पण शमीपूजन पुस्तक छापलें जाण्याबाबत माझी निराशा झाली. त्या पुस्तकाला पुण्यांत कोणी प्रकाशक मिळेना तेव्हां मी फार निरुत्साह झालो. हें पुस्तक तयार करण्यांत मी दहा वर्षें श्रम केलें होतें. त्याबद्दल चळवळ व प्रचार करून तो विषयहि लोकाचे नजरेसमोर जागता ठेवला होता. असें असतां केवळ दोनशें पृष्ठांच्या पुस्तकाला प्रकाशक मिळेपर्यंत लेखणीला स्पर्श करावयाचा नाही, असें ठरवून ग्रंथशाळेंतून आणलेलीं सर्व पुस्तकें परत केली आणि चित्रकलेला सुरवात केली! मनांत असें वाईट वाटलें कीं, कशाकरितां आपण एवढा संशोधनाचा हव्यास आणि आटापीटा करतो? जो इतिहास गंगेला मिळाला तो पुनः साकार व्हावा अशी जर दैवाचीच इच्छा नसेल तर, याकरितां इतकी धडपड मी का करावी? हा इतिहास नुसत्या शाईनें नव्हे तर, रक्तानें माखलेल्या आणि अश्रुनीं भिजवलेल्या लेखणीनें मी लिहिला होता. या पुस्तकावर माझें अपत्य–निर्विशेष प्रेम होतें. पण नंतर असा विचार आला कीं आपलीं सगळी अपत्यें जगतात का? लाभतात का? आणि जर तीं न लाभलीं तर आपण देखील दुःखी मनानें त्याला नदींतच सोडून देतो ना? हा विचार मनांत आला तेव्हां माझे मलाच हंसू आले! मी इतकेंच केलें कीं, तुकारामाच्या अभंगाप्रमाणें माझे लिखाण नदींत न बुडवितां मी कपाटांत बंदिस्त ठेवलें, आणि सारा दिवसभर चित्रकला आणि ऑईल पेंटिंग्ज करण्यांत खर्च करूं लागलो!

साहित्यिकांना पुष्कळदां हें कळत नाहीं कीं कलावंत कलेंतच कां रममाण होतो? गायक तहानभूक विसरून स्वरसाधनाच कां करितो! चित्रकार रंगनिर्मिति करण्यांत आपले अंतरंग कां अर्पण करतो? कलानिर्मिति ही केवळ कलेच्या आनंदाकरितांच निर्माण होते काय? असें जर त्यांचे उत्तर असेल तर, कलावंताचें मन त्यांना समजलेंच नाहीं असें मी म्हणेन! कलेचा जन्म निराशेच्या कर्दमांत आणि मनोदुःखांत असतो

ही गोष्ट इतरांना कळत नाही! आयुष्यांत निराशेची फार मोठी किंमत कलावंताला द्यावी लागते तेव्हांच कला निर्माण होते! मात्र ती किंमत दिल्यानंतर जो 'ब्रह्मानंद' प्राप्त होतो त्याची सर कशालाच येणार नाहीं; किंवा त्याचें वर्णनहि करतां येणार नाहीं. हा आनंद मी स्वतः अनुभवला आहे. तहानभूक विसरून आणि सर्व दिवसभर आठ आठ तास चित्रकलेंत श्रम करून, माझी सारी खोली मी ऑईल-पेटिंग्जनी भरून काढली, तेव्हां माझें मलाच "आत्मदर्शन" घडल्याप्रमाणें वाटलें! मी खरोखर कोण आहे हें त्या दिवशीं मला कळले! पुनर्जन्म घेण्याला मनुष्याला प्रत्यक्ष मरावेंच लागत नाहीं. एकाच आयुष्यांत आपण कितीतरी निरनिराळे जन्म घेतलेले आपल्या अनुभवास येतात. जे आपण काल होतो तें आज नाही. किंबहुना काल असलेली आपली व्यक्ति अगदीं वेगळी होती, इतकें आपलें अवस्थांतर झालेलें आपणांस आढळेल! हा अनुभव जेव्हां आला तेव्हां मला वाटलें कीं, सर्व समाजाचे नीति-नियम कलावंताला लावणें हें केवळ अन्यायाचें आहे. तो बिचारा शरिरानें जगांत जगतो इतकेंच, पण मनानें अगदीं वेगळ्या सृष्टींत तो वावरत असतो. तात्यांनीं माझें हें चित्रकाराचें जीवन व चित्रें पाहिलीं आहेत. माझा उद्योग पाहून त्यांना समाधान वाटले. आणि माझ्या अपरोक्ष त्यांनी उद्‌गार बोलून दाखविले–" "He Has Found Himeslf"

यानंतर योगायोगानें माझ्या पुस्तकाला प्रकाशक लाभला तेव्हां पुनः माझ्या मनांत आशेची ठिणगी पडली. मग सारी चित्रकला आवरून ठेवून मी पुनः ग्रंथकाराचा पेषा चढविला. यांत मला अवघड असें कांहींच नव्हतें. चित्रकार असतां मी ब्रशाच्या लेखणीनें लिहित होतो; आतां ग्रंथकार झाल्यावर लेखणीच्या कुंचल्यानें १८५७चें शब्दमय चित्र साकार करावयाचें होतें इतकाच फरक. पण भूमिका चित्रकाराचीच; साहित्यिकाची नव्हे; हें लक्षांत ठेवून तें पुस्तक मी पुरें करण्याचें मागें लागलों. संध्याकाळीं तात्या विश्रांतिकरिता बागेंत बसले असतां राजकीय गोष्टींची चर्चा करावी व दिवसभर पुस्तक छापण्याचे कामांत घालवावे असा माझा क्रम होता.

१९४५ चे ऑगस्टांत दुसरें महायुद्ध संपले आणि १९४७ चे ऑगस्टांत हिंदुस्थान स्वतंत्र झालें. या दोन वर्षांच्या कालावधीत इतक्या मोटमोठ्या गोष्टी लागोपाठ व वेगानें घडून येत होत्या कीं तशा गेल्या दोनशें वर्षांतहि घडल्या नसतील. सुभाषचंद्र विमान अपघातांत मृत्यू पावल्यावर दिल्लीच्या लाल किल्ल्यात बंडखोर सुभाषसैनिकांवर खटला सुरू झाला. त्यांत सुभाषचंद्र बोस यांनी इंडोनेशियांत प्रतिसरकार स्थापून जें स्वातंत्र्ययुद्ध केले त्याच्या अपूर्व व नवलकारक हकिगती ऐकून सारा हिंदुस्थानदेश हालून गेला. आणि जर त्या सुभाससैनिकांच्या केंसालाहि धक्का लागता तर देशांत उघडपणें बंड झालें असतें. सैन्याचाहि सरकारवर विश्वास नव्हता. म्हणून यापुढें

हिंदुस्थान इंग्रजी अंमलाखालीं ठेवणें अशक्य आहे असें समजून राज्यकर्त्यांकडूनच सत्तासंक्रमणाच्या हालचाली सुरू झाल्या व ॲटली यांनीं पार्लमेंटांत त्याप्रमाणें घोषणाहि केली. ज्या दिवशीं टाईम्समध्यें ठळक शीर्षकाखाली ही बातमी छापून आली त्यावेळीं माझ्या डोळ्यावरहि माझा विश्वास बसेना. असें खरेंच घडणार आहे काय? इंग्रजी राजवटीचा आजपर्यंतचा विश्वासघातकी इतिहास पाहतां, "अगा जें झालेंचि नाहीं" अशा कोटीतील ही गोष्ट होती. पण त्यानुसार पुढाऱ्यांच्या ज्या हालचाली सुरू झाल्या आणि महमदअली जिना यांनी देशांत प्रत्यक्ष जें यादवी युद्ध सुरू केले त्यावरून ही गोष्ट खरी वाटूं लागली. या यादवीयुद्धांत सहा लाख लोक प्राणाला मुकले आणि रक्ताच्या नद्या वाहिल्या! प्रत्यक्ष दुसऱ्या महायुद्धांत हिंदुस्थानची जितकी हानी झाली नसेल इतकी मनुष्यहानी या यादवी युद्धांत झाली! आणि इंग्रज मात्र नामानिराळे राहून भलेपणा घेऊन गेले. हिंदुस्थान सोडून जाण्याची त्यांनी तारीखच मुक्रर केली होती! मग सत्तासंक्रमण व्हावयाचें तें हिंदु-मुसलमानांत सलोख्यानें होवो किंवा रक्तपातानें होवो!

हा सर्व इतिहास भयानक तर खराच, पण त्यांत कोणाची जबाबदारी किती हा इतिहासाचाच प्रश्न ठरेल. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून दिल्याचें सर्व श्रेय (इतिहास लिहितांनाहि) कॉंग्रेस-सरकार केवळ आपणांकडेच घेवो; पण इतिहासकार तें सर्व श्रेय त्यांना एकट्यालाच देईल असें वाटत नाहीं! ते श्रेय ८ ऑगस्टवाल्यांइतकेंच ९ ऑगस्टची चळवळ करणारांना; तसेंच सुभाषबाबूंनीं केलेल्या प्रयत्नांना, आणि इतर पक्षांनाहि यथाप्रमाण दिल्याशिवाय राहणार नाहीं. सुभाषबाबूंचा कोणचा गुण आजवर कॉंग्रेसनें घेतला? त्यांची कोणती आठवण ठेवली? आणि स्वतःची सुटका झाल्यावर, अष्टी चिमूरच्या क्रांतिकारकांच्या सुटकेकरितां कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं बोट देखील उचललें नाहीं. या गोष्टी इतिहासकार कसा विसरेल? हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें सर्व श्रेय जेव्हां कॉंग्रेस आपणांकडे घेते तेव्हां इंग्रजांबद्दल एक विनोदी गोष्ट तात्या सांगत त्याची येथें आठवण आठवण होते. ती गोष्ट अशी :—

"कांही दिवसांपूर्वी सरहद्दीच्या एका गांवावर लुटारू दरवडेखोरांनी हल्ला करून लूट जमविली. ती परत आणण्याकरितां सरकारनें जे सैन्य पाठविलें त्यांत एक इंग्लिश, एक स्कॉच व एक आयरिश अशा तीन तुकड्या होत्या. दरवडेखोरांनीं एका बळकट किल्ल्याचा आश्रय केला होता. आयरिश फौज आघाडीला होती. आयरिश माणसांना चढाऊ वीरवृत्तीची मोठी हौस, म्हणून त्यांनीच प्रथम हल्ला केला. पण बिचारे सर्व त्यांत गारद झाले! स्कॉच लोकांची देशभक्तीपेक्षां बडेजावी व बहुमान यांवर दृष्टी जास्त. त्यांची फौज मध्यें होती. आयरिश लोकानंतर त्यांनीं हल्ला करून दरवडेखोरांना कैदी करून ताब्यांत घेतलें. पण इंग्रज सैनिक फार धूर्त. त्यांची फौज पिछाडीला होती. दरोडेखोर कैद झालेले पाहतांच त्यांनीं भराभर जाऊन मेलेल्या व जखमी झालेल्य

शिपायांचे खिसे तपासले आणि लूट काबीज करून परत आणली !"

तात्पर्य, जे इतिहास घडविणारे असतात ते त्यासंबंधी कधीं बोलतहि नाहींत. आणि तो घडविल्याचें श्रेय घेणारे दुसरेंच कोणी असतात ! पण जगांत असें नेहेमींच घडतें !

तात्यांची स्थिति अशीच होती. ता. १५ ऑगस्ट रोजीं पुण्यांत स्वातंत्र्यदिना-निमित दीपोत्सव झालें व सारें शहर हालत होतें. शनवारवाडा चिराखदानांनीं उजळून गेला होता. पण महात्मा गांधीप्रमाणेंच तेहि कोणताहि समारंभ पाहण्याकरितां बाहेर गेले नाहींत. १८९६ सालीं ते केसरींत आले तेथपासून १९४७ पर्यंत, म्हणजे अर्ध-शतक त्यांनीं लेखणीनें व वाणीनें इंग्रजी साम्राज्यशाहीविरुद्ध लढा दिला. "शेवटचें लढाऊ जहाज" या गोष्टींत त्यांनीं द्रष्टेपणानें भविष्य केल्याप्रमाणें, तंतोतंत त्यांच्याच वणनाप्रमाणें ब्रिटिश लोक मुंबईस जहाजांत बसून हिंदुस्थानांतून निघून जात होते ! आपलें भाकित खरें ठरणें हा तत्त्वज्ञानी मनुष्याला मोक्षच नव्हे काय ? अशा माणसांची नंतर कोणती इच्छा राहात असेल ? आणखी कशाची त्यांना अपेक्षा असेल ? गतवर्षींच त्यांनीं 'ऐलथडीचा मोक्ष' या विषयावर व्याख्यान दिलें, त्यांतहि मोक्ष हा पैलथडीला नसून ऐलथडीचा असतो; याच देही याच डोळां तो अनुभवावयास सांपडतो, असें त्यांनीं कटाक्षानें प्रतिपादन केलें होतें. "ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात" हा सह्याद्री-करितां लिहिलेला त्यांचा लेख मी जेव्हां पाहिला, तेव्हां त्यांच्या आयुष्याचें ध्येय काय होते आणि कशाला ते मोक्ष मानीत होते याचा मला मनोमन साक्षात्कार झाला ! साहित्य ही त्यांची प्रकृति असली तरी त्यांचा जीवित–हेतु राजकीयच होता. हिंदवी स्वराज्याकरितां जन्मभर त्यांनीं किती कष्ट केले होते हें मी डोळ्यांनीं पाहिलेलें होतें. १८९६ सालापासून केसरी मराठ्यांत जें जें त्यांनीं लिहिलें तें संपूर्ण रीतीनें मला माहीत होतें. यामुळें हिंदुस्थानला स्वराज्य मिळालें या एका गोष्टीमुळें मनांत त्यांना केवढें परम समाधान वाटत असेल याची मला कल्पना होती. त्यांनीं लिहिलेल्या एखाद्या जुन्या लेखाचा बोलतांना मी उल्लेख करी, तेव्हां ते नुसतें हूं हूं म्हणत. पण स्वतः केलेल्या गोष्टींबद्दल कांहींहि बोलत नसत.

अलीकडे असे झाले होतें कीं साऱ्याच गोष्टींतून त्यांचे मन निवृत्त झालें होतें. 'होय. हें सर्व आपण केलें. पण आतां त्याचें काय ?' असें मनांत येऊन जणूं कांहीं कोणी तिऱ्हाईतानें या गोष्टी केल्या, इतक्या निर्विकारपणानें ते बोलत. त्यांची प्रकृती अलीकडे बरी नव्हती. त्यांच्या आयुष्याची संध्याकाळ झाली होती. आणि परलोकांतील अंधुक प्रकाशहि लुकलुकतांना त्यांना कदाचित् दिसत असावा ! संधिप्रकाश क्षीण होऊन दाट अंधःकार झाला असतांहि बागेंतल्या बांकावर ते एकटे निःस्तब्ध बसलेले आढळत. त्यांची ती श्रांत अवस्था पाहून वाईट वाटे. आणि मनांत हुरहूर उत्पन्न होत असे.

अशा स्थितींत दसरा संपला आणि कोजागिरी पौर्णिमेनंतर हवामानांत नित्या-प्रमाणें अत्यंत सुखस्पर्श असा बदल झाला. काळ एकेक पाऊल पुढें सरकत होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही पहिलीच दिवाळी होती. माझें 'शमीपूजन' पुस्तक दसऱ्याला निघालें नाहीं, पण अगदीं शेवटाला आलें होतें. दिपवाळीच्या दोनच दिवस आधींची गोष्ट. बागेंतील बांकावर ते नित्याप्रमाणें बसले होते. जवळच मीहि फेऱ्या मारीत होतो. त्यांनीं खुणावून मला बोलावलें आणि पुस्तक छापण्याचें काम कोठवर आलें आहे ? म्हणून मोठ्या आस्थेनें, कळकळीनें चौकशी केली. पुस्तकाची शेवटची पानें कालच रवाना केली असें सांगताच त्यांना फार समाधान वाटलें. कारण या पुस्तकाचा मी ध्यास घेतला होता हें त्यांना माहीत होतें. या पुस्तकांतला असा एकहि वादग्रस्त मुद्दा नाहीं कीं ज्यावर त्यांचें मत मी अजमावलें नव्हतें. आणि हें पुस्तक मी कसें लिहिलें असेल याची त्यांनाहि कल्पना होती. बंडांतल्या प्रमुख लोकांच्या हेतू-बद्दल पुष्कळदां चर्चा निघे. त्याबद्दल माझ्या कित्येक चुकीच्या कल्पना त्यांनीं दुरुस्त केल्या होत्या. त्यांना जसें लिहिलेलें आवडेल असेंच हें सारें पुस्तक मी लिहिलें आहे. बोलतांना मी सहज त्यांना म्हणालो- "एक गोष्ट मनाशीं मी ठरविली आहे. हें पुस्तक सावरकरांना पाठवावयाचें नाहीं व त्यांची प्रस्तावना किंवा अभिप्रायहि मागावयाचा नाहीं." यावर तत्काळ त्यांनीं आपली संमति दर्शविली. "तूं त्यांची प्रस्तावना मागू नको ना ! आपण स्वतः आपली प्रस्तावना लिहावी आणि पुस्तक खुशाल जनतेला सादर करावें. त्याची जी किंमत असेल, ती त्या पुस्तकाला मिळेल" असें त्यांनीं सांगितलें.

याचवेळीं जवाहरलाल नेहरू यांचे Discovery of India हें पुस्तक वाचीत असतां आढळलेला एक समर्पक उतारा मी त्यांचे नजरेस आणला. ८ ऑगस्ट १९४२ सालच्या बंडाबद्दल लिहितांना पंडित नेहरू यांनीं लिहिलें होतें–"१९४२ सालच्या कॉंग्रेसच्या बंडांत म. गांधींनीं सरकारला दिलेल्या अंतिमोत्तराला जर सरकारनें नीट उत्तर दिलें नाहीं, तर गांधींनीं काय करावयाचें ठरविले होतें हे आम्हालाहि माहीत नव्हतें ! त्यांचे त्यांना तरी तें माहीत होतें कीं नाही कोणास ठाऊक ?" हें वाक्य ऐकून तात्यांना हसूं आलें. मी पुढें म्हटलें, "जेथें अलीकडच्या १९४२ सालच्या बंडाची ही स्थिति, तेथें १८५७ सालांतील पुढाऱ्यांचे हेतु काय होते याची चिकित्सा कोणी काय म्हणून करावयाची ?" यावर ते म्हणाले, "नेहरूंच्या पुस्तकांतला तो मूळ उताराच काढून तुझ्या प्रस्तावनेंत दे. चारित्र्यचिकित्सा आणि हेतुसंशोधन या भानगडींत ग्रंथकर्त्यानें फारसें पडूंच नये. घडला तसा सुसंगत इतिहास लिहावा. व त्यावरून ज्यानें त्यानें हवी तीं अनुमानें काढावींत !"

खरें म्हटलें तर, १८५७ च्या बंडाचें मला जितकें महत्त्व वाटत असे तितके तात्यांना वाटत नसे. एकट्या १८५७ च्या बंडाचेंच इतकें काय अपूर्वत्व ? गेल्या शंभर

वर्षांत कित्येक राजकीय चळवळीं झाल्या. अनेक त्यागी महानुभाव देशभक्त त्यांत शांत झाले ! त्यांचा स्वार्थत्याग हा स्वातंत्र्याचाच इतिहास नव्हता काय ? सामान्य मनुष्याला जें नेत्रदीपक व ज्वलंत असतें त्याचेंच महत्त्व वाटतें; पण जें कणाकणानें जळलें तें जळलेंच नाहीं काय ? मार्मिकपणानें राजकारण पाहण्याची ज्याला दृष्टि आहे त्याला माहीत असते कीं, मुत्सद्दी आणि वीर यांचे हेतूंत मनोमन हातमिळवणी असते. ज्यावेळीं वीरांच्या तरवारी म्यानांत घोरत असतात त्यावेळीं मुत्सद्दी जें राजकारण करतात ती भावी युद्धाची सायसंगीन तयारीच असते ! आणि ज्यावेळीं युद्धाला तोंड लागतें तेव्हां मुत्सद्दी त्या गोष्टीशीं आपला संबंध नाहीं असे दाखवून अंतर्धान पावतात आणि नेमकें तहाच्या वाटाघाटीचें वेळीं डोकें वर काढतात ! गेल्या शंभर वर्षांत अनेक चळवळी झाल्या त्यांत हेंच दिसून आलें नाहीं काय ? साम, दाम, दंड, भेद हे राजकारण साधण्याचे विविध मार्ग आहेत. निरनिराळ्या वेळीं निरनिराळे मार्ग उपयोगी पडतात. " रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ? " हा कांहीं निर्णायक सिद्धांत नव्हे ! नुकतेच हिंदुस्थानला जें स्वातंत्र्य मिळालें तें देणगी म्हणून ? कीं त्यांचेशीं युद्ध करून ? 'शमीपूजन' पुस्तक लिहितांना इंग्रजांविषयी माझे मनांत निःसीम द्वेषबुद्धि होती. पण त्यांनी हिंदुस्थानावरील सत्ता सोडून देतांना जी समयज्ञता दार्खविली ती देखील त्यांच्या कर्तबगारीला शोभण्यासारखींच होती ! तात्यांशी बोलतांना या अनेक गोष्टींची मला जाणीव होती. क्रांतिकारक चळवळीप्रमाणेंच त्यांचेहि राजकारण समजण्याची माझे अंगी पात्रता होती. मी लिहीत असलेले पुस्तक हा एक इतिहासाचा व्यासंग किंवा अभ्यास होता. आणि कोणताहि अभ्यास परिश्रमपूर्वक करणाराला ते तत्परतेनें प्रोत्साहन देत.

त्या दिवशीं चर्चा करिताना अशा अनेक गोष्टी निघाल्या होत्या. तथापि यावेळीं रात्र बरीच झाल्यामुळें माडीवर जाण्याकरितां ते उठले व मीहि माझ्या कामाकरितां निघून आलो. एखादें वाङ्मयविषयक पुस्तक तात्यांचे मार्गदर्शनाखाली पुरें होत यावें याचा आनंद मनाला किती वाटतो याची कल्पना इतरांना येणार नाहीं. पण हा माझा आनंद क्षणभंगुर ठरावा असेंच दुर्दैवानें यावेळीं " विधिलिखित " होतें. हें विधिलिखित म्हणजे तीर्थरूप तात्यांचा मृत्यु होय. कोणाच्या ध्यानीं मनीं नसतांना, आकस्मिकरीतीनें, दिपवाळीच्या पहाटेस आपलें ' महाप्रस्थान ' ठेवून या जगाचा ते निरोप घेतील याची कोणाला कल्पना देखील नव्हती पण ती गोष्ट घडून आली. आणि त्यामुळें माझ्या मनांतील सर्व आशा आकांक्षा लयाला गेल्या ! हाय ! मनुष्यजीवना ! तूं किती असार आहेस !

८

# परिपूर्ति

माझ्या आयुष्याची वाटचाल करीत असतांना तीर्थरूप तात्यांचे मृत्यूपर्यंत मी आलो आहे. यावेळीं मनांत असें येतें कीं हें सर्व मी कां लिहितो ? हें मी लिहिलेंच पाहिजे काय ? दुसरी कोणतीहि दुर्घट गोष्ट मी करूं शकेन. पण त्या प्रसंगाचें वर्णन करणें हे माझ्या शक्तीबाहेरचें काम आहे ! त्यांच्या मृत्यूसंबंधीं हकीगत सर्वत्रांना माहीत आहे. याकरितां त्यांतली पुष्कळशी गाळूनच राहिलेली हकिगत पुढें सांगतो.

तीर्थरूप तात्यांचे मृत्यूनंतर कांहीं दिवस मनाच्या फार खडतर अवस्थेंत गेले. कांहीं सुचत नव्हते; व डोळ्यांचे पाणीहि खळत नव्हते. आकाश सर्व बाजूंनीं मेघांनीं अगदीं भरून यावे तसें तात्या व ताई यांनीं आमचेवर जो वात्सल्याचा वर्षाव आजवर केला त्याच्या आठवणी मनांत येऊन मन कोंदून गेलें. तात्या असलेल्या जगांत राहण्याची आम्हांला नित्य संवय झाली होती; त्यामुळें तात्या नसलेलें जग म्हणजे काय याची कल्पना नव्हती. यामुळें तो प्रसंग आल्यावर अगदीं लहान मुलाप्रमाणें

माझी अवस्था झाली ! मृत्यू म्हणजे काय आणि जगांत तो कसें स्थित्यंतर घडवून आणतो हें त्या दिवशीं मला कळलें ! मृत्यु हा वास्तविक कोणालाच प्रिय नसतो. तो हानि करतो त्याचबरोबर सृष्टींत पालटहि करतो. सृष्टींत पालट करण्याचें, जुनी सृष्टि पुसून टाकून नवी रचना अमलांत आणण्याचे विधात्याते हातीं ' मृत्यू ' हें एकच साधन आहे. त्याला कोण काय करणार? विधात्याचा हेतु काय आहे हें त्यावेळीं सहसा कोणाच्या लक्षांत येत नाहीं; कालांतरानें त्याचा उमज पडतो. तात्या गेले या गोष्टीचे प्रथम कांहीं दिवस फार दुःख वाटलें. पण तात्यांचे निर्वाणानंतर अवघ्या तीनच महिन्यांत महात्मा गांधीचा खून होऊन देशभर ज्या भयानक घटना घडल्या आणि महाराष्ट्रांत जी ब्राह्मणद्वेषाची लाट उसळली, ती पाहतां आज असें वाटतें कीं तात्या खरोखरच भाग्यवान ! अगदीं योग्य वेळीं त्यांनीं आपल्या आयुष्याचे भरतवाक्य म्हटलें. त्यांत थोडें देखील आगें-मागें झालें नाहीं ! दैवानें त्यांची विटंबना केली नाहीं, किंवा जें कार्य आपण केलें तें पुसून गेलेलें पाहण्याचेंहि त्यांच्या नशिबीं लिहिलेलें नव्हते. ते गेले ते अगदीं वैभवांत एखाद्या अनभिषिक्त राजाप्रमाणें सर्वांचा मुजरा घेत, सर्वांना आशीर्वाद देत निजधामाला गेले ! त्यांच्या अखेरच्या महायात्रेंत केवळ त्यांचे अनुयायीच नव्हे तर राजकीय प्रतिस्पर्धी देखील सामील होते. असा सर्वांकडून अलौकिक धन्यवाद संपादन करण्याचें भाग्य तुकाराम ज्ञानेश्वरासारख्या संतांना किंवा नाना फडणविसासारख्या लोकोत्तर पुरुषानाच लाभतें. " महाराष्ट्राचे महापुरुष " ही पदवी त्यांना त्या दिवशीं मिळाली, आणि तात्या किती मोठे होते ही गोष्ट त्यांच्या मृत्यूनेच लोकांच्या प्रथम लक्षांत आली !

तात्यांच्या हानीचे दुःख महाराष्ट्रांत सर्वत्र जाणवत होतें. यामुळें आमचेवर सहानुभूतीच्या तारा व पत्रें यांचा नुसता पाऊस पडत होता. तारायंत्राला देशभर खळ नव्हता. आणि महिनाभर वर्तमानपत्रांत त्याचेसंबंधींच हकिगती येत होत्या. आनंदांत भागीदार मिळाले म्हणजे तो वाढतो; दुःखांत भागीदार मिळाले म्हणजे दुःख कमी होतें, हा मनुष्यस्वभाव आहे. यामुळें अनेक नातेवाईकांनीं, ऋणानुबंधि मित्रांनीं दररोज येऊन ताईशीं बोलत बसण्याच्या प्रघात ठेवला होता. दुःख करण्याला त्यांनीं तिला उसंत किंवा अवसरच दिला नाही !

तात्या असतांना जीं माणसें नित्य येत त्यांनीं ताईला असें दिसू दिलें नाहीं कीं, तात्या गेल्यामुळें त्यांच्या नित्य कर्तव्यांत खंड पडला आहे. तात्यांच्याच जागीं त्यांनी ताईला मानले ! उदाहरणार्थ, यशवंतराव कुलकर्णी लो. टिळकांचे वेळेपासून केसरी-कचेरींत होते; ताईशीं येऊन जमिनीवर डोकें टेकून ते ढळढळां रडले तेव्हां ताईनेंच त्यांचे सांत्वन केले. तसेंच अंतुकाका फडणीस, गणपतराव देवधर आणि सदाशिवराव बापट ही मंडळी होत. रामापुढें जसा हनुमान असे तात्यांचे हे निष्ठावंत अनुचर होते. पहिले चार महिने तर नित्य येतच. पण नंतर दर आठवड्याला येण्याचा त्यांचा वार कधीहि चुकला नाहीं. त्यांचा हा क्रम ताईच्या मृत्यूपर्यंत अखंड टिकला होता.

मग जसजसे एकेक दिवस जाऊं लागले, तसतसे त्या दुःखमय काळांत मनच एकेक परिप्रश्न करून आम्हांला बोलवूं लागलें. तात्या नाहीसें झाले म्हणून तुम्ही दुःख करितां ? पण ते ' आहेत ' म्हणजे काय आणि ' नाहीत ' म्हणजे तरी काय ? ते हयात होते तेव्हां चोवीस तास तुम्हीं त्यांना पाहूं शकत होता काय ?—नाही. बरे, दिवसभर ते माडीवर कामांतच असत. फार थोडा वेळ खालीं येत हें खरें ना ? तसेंच आतांहि ते वर आपल्या कामांत आहेत, व बराच काळपर्यंत ते खालीं येणार नाहीत, असें कां समजत नाहीं ? ज्यांचेवर तुम्हीं प्रेम करितां तीं माणसें बाह्य सृष्टींत वावरत असली तरी बाह्यसृष्टींत वास करीत नाहींत ! तीं अंतःसृष्टींत, अंतःकरणांत वास करितात हें खरें कीं नाहीं ? डोळे मिटले कीं ते तत्काळ दिसतात. आणि तुम्हांला आपले मनोगत देखील सांगतात. ज्या दिवशीं डोळे मिटून म्हणजे त्यांचे स्मरण करण्याचा प्रयत्न करूनहि ते अंतःकरणांत येणार नाहीत त्याच दिवशीं ' तात्या गेले ' हे शब्द खरे ठरतील ! तात्पर्य, तात्या गेले हे खरे नाहीं. ' तात्या आहेत ' ही गोष्ट त्रिवार सत्य आहे. मग दुःख कोणाकरिता करतां ? म्हणून नित्य कर्तव्यांत खंड पाडूं नका. असें तुम्हीं केलेत तर त्यामुळें त्यांना जो आनंद होईल तो दुसऱ्या कशानेंही होणार नाहीं. "

योगवासिष्ठांत असेंच कांहीं तत्वज्ञान सांगितलें आहे. तें पुस्तक आणून वाचल्यावर माझें मन शांत झालें. पण कित्येक वेळां दुःखाचा उमाळा येत असे. चैन पडेनासें झाले कीं ताईजवळ जाऊन बसावें असें चालले होते. माझा दीनवाणा सुकलेला चेहरा पाहून ताईला फार वाईट वाटे. माझे सांत्वन करून ती म्हणाली, " तुम्हींच जर मुलांनी असें केलेंत तर मी कसे दिवस काढावयाचे ? " वरकरणीं आपले स्वतःचे दुःख विसरून आम्हांला ती धीर देई. पण केव्हां केव्हां तिला तें दुःख अनावर होई. एकदां मी तिला म्हटलें, " ताई ! तुझे मन मला समजतें ! ईश्वरानें तुमचें दोघांचेहि आयुष्य एकदमच कां संपविलें नाहीं असें तुला सारखें वाटत आहे. पण तात्या आणि तूं एकाच दिवशीं जन्माला येतां तर तुम्हांला सारखेच आयुष्य असावें असें तुझें वाटणें न्यायाचें होतें. पण तात्या आणि तूं सारख्याच वयाचे कोठें होता ? त्यांच्यांत व तुझ्यांत सहा वर्षांचे अंतर होतेच. मग तूं मागें राहिलीस यांत ईश्वराचे काय चुकले ? "

त्या पंधरा दिवसांत कोणत्याहि फोटोचे सहाय्य न घेतां केवळ स्मरणानें तात्यांची मी तीन उत्तम चित्रें काढली. तीं पाहून ताईनेंहि मला शाबासकी दिली. मी चित्रकलेला सुरवात केल्यावर तात्यांना समोर बसवून त्यांचे ऑईल पेंटिंग काढण्याचें माझें मनांत होतें, हें तात्यांना व तसेंच इतरांनाहि माहीत होते. पण तात्या अचानक गेल्यामुळें ती गोष्ट तशीच राहून गेली. पण त्यानंतर महिनाभर असा अनुभव आला कीं डोळे मिटले कीं, तात्या अगदीं स्पष्ट दिसत. नुसत्या त्यांच्या रेखाकृतीच नव्हे तर त्यावरील छायाप्रकाश देखील ! यामुळेंच हीं चित्रें तयार होऊं शकली. यांतल्या एका चित्राचें नांव '**नित्यनेम.**' यांत तात्या स्नान करून आल्यानंतर उघड्या अंगानें देव्हाऱ्यातील

देवांसमोर चौरंगावर बसले आहेत व क्षणभर ध्यानस्थ होऊन देवाला प्रणिपात करीत आहेत; देवासमोर तबकांत नीरांजन उजळलें आहे. डाव्या बाजूचे कोनाड्यांत संथपणानें समई जळत आहे. आणि देवघराच्या त्या अंधेऱ्या जागेंतहि तात्यांचे अंगकांतीचा शुभ्र प्रकाश खोलींत चोहोंकडे पसरला आहे! दुसरें चित्र असें होतें: पहाटे साडेपांचचे सुमारास नित्याप्रमाणें सैपाकरांत ताईनें चहा केला असून तो तात्या घेत आहेत. अंगांत बंडी, डोक्याला उपरण्याची टापशी आहे. आणि तात्यांना चिकटून जवळ एक आवडती मांजरी बसली आहे. तिसरें चित्र असें होतें: तात्या एकटेच संध्याकाळीं बागेंतील बांकावर उघड्या अंगानें विश्रांतिकरितां बसले आहेत. या चित्राचे नांव '**जीवनसंध्या.**' याच बाकावर मीहि त्यांचेशीं गप्पागोष्टी करण्याकरितां बसत असें! हीं चित्रें इतकीं सुरेख आली होती कीं त्यांत तात्यांची ओळख तत्काळ पटे. आणि विशेष म्हणजे ती केवळ स्मरणानें काढली होती! मनुष्याच्या मनांतील अंतःसृष्टीचें हें एक सामर्थ्य आहे. मृत्यु इहलोकांत अशी शपथ घेऊन आलेला असतो कीं, या जगांत जें जें कांहीं असेल, मग तें तुम्हाला कितीहि प्रिय असो, त्याचा मी नाश करीन! पण चित्रकाराची त्याच्या उलट प्रतिज्ञा अशी असते कीं, तूं खुशाल वस्तुजाताचा नाश कर; माझ्या स्मरणानें ती वस्तु मी पुनः सजीव साकार करीन! कारण मनुष्याचें मन हें चैतन्य आहे. मृत्यूच्या शक्तीहून त्याची शक्ति अधिक आहे! मी काढलेली तात्यांची चित्रें पाहून ताईनें माझें कौतुक केलें. तिला बरें वाटावें असें माझ्या अंगीं तरी काय होतें?

ताईमध्यें थोरपण इतकें होतें कीं, केवळ मुलांनातवंडांच्या भावी योगक्षेमाकडे पाहून तिनें आपलें दुःख आवरून घेतलें. या मनोधैर्याला उपमा फक्त तात्यांच्या मनोधैर्याचीच देतां येईल. मुलांनीं आतां जोरानें उद्योगाला लागावें; दिवस फुकट घालवूं नयेत. पूर्वीसारखें तात्या पाठीशी नाहींत ही गोष्ट विसरूं नये. नाती आतां लग्नाला झाल्या आहेत. त्यांची कार्यें आपल्या डोळ्यादेखत झाली तर बरी, म्हणून ती खटपट करी. पण एकाहि नातीचें लग्नकार्य तिचे देखत घडण्याचा दुर्दैवानें योग नव्हता. मनांत वैराग्य येऊन मनुष्य संसारांतून कितीहि निवृत्त झाला तरी जगाला उपदेश करावयाचा तो कोणीहि प्रवृत्तीपरच केला पाहिजे. त्याशिवाय जग कसें चालेल? हे लक्षांत घेऊन इतरांच्या संसाराची तिनें काळजी केली. तिचा सर्व वेळ अध्यात्मवाचनांत आणि इतरांकडून तें वाचवून घेण्यांत जाई. वारंवार तोच विषय कानीं पडलेला असल्यामुळें जुने कवि, तसेंच दासबोधादि ग्रंथ तिला उत्तम समजत. ते वाचतांना अर्थ न समजल्यामुळें मी वारंवार अडखळे, पण ताई त्या श्लोकाचा अर्थ मला अगदीं सहज समजावून सांगत असे. मी संपादक आणि मराठी भाषेंतील लेखक म्हणविणारा; पण ही माझ्या मराठी ज्ञानाची परीक्षा! हें पाहून माझी मलाच लाज वाटे. बाकी सर्व ज्ञान मी थोडेबहुत मिळविलें होतें. पण सर्व विद्यांची विद्या जें अध्यात्मज्ञान त्याला मी पारखा होतो. आणि

ताईचें असें होतें कीं, आध्यात्माचें केवळ वाचन नव्हे तर आचरण असल्यामुळें इतर पुस्तकी विद्यांना ती तितकें महत्त्वहि देत नसे. या तिच्या अध्यात्मशक्तीच्या जोरावरच तात्यांचा सर्व संसार तिनें यशस्वी रीतीनें पैलतीराला नेला. तात्यांना या गोष्टींची जाणीव होती, म्हणूनच त्या गोष्टीचा उच्चार त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत केला आहे !

तात्या व ताई या दोघांचा विचार करूं लागलें कीं आणखी कितीतरी विचार सुचतात. तात्या साक्षात् ज्ञानाचा अवतार होते; तर ताई भक्तीच्या रूपानें साकार झाली होती. व त्या दोघांनांहि वैराग्याचें अधिष्ठान होते. व्यक्त जगाला भासमान होणारें तात्यांचें जीवन तेजस्वी असलें तरी तें सगुण व व्यक्त होतें. तर अदृष्य रूपानें तेंच कार्य करणारें अव्यक्त जीवन ताईनें आपण होऊनच अंगीकारले होतें. पण अव्यक्ताची थोरवी व्यक्तापेक्षांहि अधिक नव्हे काय ? दुर्दैव इतकेंच कीं त्या दोघांचीहि खरी योग्यता त्यांच्या हयातीत आम्हाला उमजली नाहीं. एखादी गोष्ट नाहीशीं झाल्यावर त्याची किंमत कळावी असेंच घडून आलें !

तात्यांचे नंतर सहा वर्षांनीं ताईचा अंत झाला. तोहि तात्यांचे सारखाच पुण्यवान रीतीनें, अखेरीस कोणतेंहि कष्ट किंवा श्रम सायास न होतांना ! सकाळीं स्नान करीत असतांना, पहिला पाण्याचा तांब्या अंगावर ओतून घेत असतां तिला अचानक मृत्यु आला ! तोहि तात्यांच्याच तिथी वारी, मंगळवारी अमावास्येच्याच दिवशीं ! तिचे आयुष्य आणि तात्यांचे आयुष्यहि ईश्वरानें अगदीं भारंभार सारखेंच दिलें होतें हें केवढें नवल ? अशा पुण्यवान लोकांचे जीवित पाहून माझे मन भरून येतें. अशा पुण्यवान मातापितरांच्या घरांत जन्म घेण्याइतके पुण्य मी कोठें पैदा केलें होतें ? या जन्मीं तर नाहींच पण पूर्वजन्मी केले असेल तर मला ठाऊक नाहीं। आज जर मला कोणी विचारलें ' आता तात्या ताई आहेत काय ? ' मी उत्तर देईन, ' होय, तीं अमर आहेत. ' आजहि माझ्या पाठीशीं रक्षणकर्ता त्यांचाच हात आहे. मी मनांत आणले कीं ते मला दर्शन देतात; मनाला संकट–सांकडे पडलें कीं मार्गदर्शन करतात ! ते नाहीसे कसे होतील ? माझ्या मनोमय मंदिरांत, ज्याला कोणीहि स्पर्श करणार नाही व कोणीहि माझ्यापासून हिरावून घेऊं शकणार नाहीं अशा " देव्हाऱ्यांत " मी त्यांची अक्षय्य स्थापना केली आहे !

तात्यांचे पश्चात झालेल्या घरगुती व्यवस्थेंत त्यांचे अप्रकाशित लिखाण म्हणजे बहुतेक सर्व हस्तलिखितें हक्कानेंच माझेकडे आली. तें दप्तर बरेंच मोठे होतें. त्याची पानें क्रमवार लावून वाचतांना माझ्या कर्तव्याचा माझ्या मनांत आपोआप उदय झाला. ही हस्तलिखितें टाकून देण्यासारखी खासच नव्हती. त्यांच्या प्रसिद्धीची मी कांहीच

खटपट न केलीं तर तात्यांनीं आपल्या आत्मचरित्रासुद्धां प्रसिद्ध अप्रसिद्ध अशा सर्व वाङ्मयाचे हक्क मला दिलें त्यांचा उपयोग काय ? हें काम ताबडतोब होणारेंहि नव्हते. यामुळें असें मनांत आलें कीं, तात्यांनी आपणाला जन्मभर लिहिण्याला शिकविलें, त्यांचेबद्दल आपण कांहींच लिहूं नये काय ? निदान शंभर पानें तरी लिहिणें हें आपलें कर्तव्य नाहीं काय ? याच विचारानें कर्तव्यबुद्धीनें लेखणी हातांत घेतली व " वाळवंटांतील पाऊलें " या नांवानें तात्यांचे संबंधी 'सह्याद्री' मासिकांत लेखमाला लिहिली. हजारो वाचकांचे मनांत यावेळीं तात्यांचेविषयी भावना उचंबळून आल्या होत्या. यामुळें माझ्या लेखणीनें त्या भावनाना स्पर्श केला असें मला दिसून आलें. 'धनुर्धारी'चे संपादक श्रीयुत अ. सी. केळुसकर यांनी पत्रांत मला लिहिले—

"आपल्या आठवणींत भक्तिनिष्ठ आत्मीयता आहे. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाचे पडसाद आहेत. म्हणून आपणांस नम्रपणे विनंति करावीशी वाटतें कीं पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करतां येईल या दृष्टीनेंच ही लेखमाला लिहावी. "

माझे मित्र वामनराव देशपांडे यांनीं मला लिहिलें– " सह्याद्रींतील आपला लेख अतिशयच आवडला. हीच पद्धत व दृष्टि पुढील लेखांकात येणार व त्यांची मी उत्सुकतेनें वाट पाहीन. अभिनंदन करण्यासारखे आणखी एक कारण आहे तें म्हणजे लेखनप्रांतांत पुनः तुम्ही हिरीरीनें उडी घेतल्याबद्दलचा पुरावा त्यामध्यें दिसला हें ! बरीच वर्षें जवळ जवळ अज्ञातवासांत घालवून पुनः कार्यारंभ धडाडीनें करीत आहां याबद्दल मला अतिशयच आनंद वाटतों. "

पुनः ता. १८–६–१९४८ चे पत्रांत त्यांनीं लिहिलें, " तुमच्या लेखमालेंतील तिसरा लेख वाचला. तात्यांसाहेबांचे विषयीं घरगुती Homely वाङ्मय शेवटी तुमचेंच शिल्लक राहणार आहे ! व तें Homely म्हणूनच. मला स्वतःला तें अतिशयच प्यारे आहे व अशा स्वरूपाचें तुम्ही जितकें लिहाल तितकें हवेंच आहे. तुमच्या लिहिण्यांत मला तुमचा Sweep अतिशय विलोभनीय वाटतो. तुमचा लिहिण्यांत कै. वाग्भटांचे उल्लेख पुष्कळच आले आहेत. त्यामुळें ते लेख विशेष हवेहवेसे वाटतात. त्यांना वारून आज बारा वर्षें झाली; पण तुम्ही दिलेल्या संदर्भामुळें त्यांचे चित्र डोळ्यासमोर उभे राहतें ! "

याहीपेक्षा चौल अलीबाग येथील श्री. कृ. म. फडले या ६३ वर्षाच्या गृहस्थांनीं मला तारीख १४ जानेवारी १९४८ रोजी पत्र पाठवून उत्तेजन दिलें, तें विशेष स्मरणांत राहण्यासारखे आहे. पत्रांत त्यांनीं स्वतःची हकीगत देऊन लिहिलें आहे—

" मी आज वयानें ६३ वर्षांचा आहे. १९०४ सालीं मुंबईस स्मालकॉज कोर्टांत उमेदवारी धरली. ती १९१० पर्यंत केली. १९०८ सालचा टिळकांवरील खटला तसेंच नाशिक केसचा खटला हे सर्व प्रत्यक्ष कोर्टांत ऐकले. शांतारामाच्या चाळीतील सर्व मोठमोठ्या पुढाऱ्यांची भाषणें ऐकली. १९०३ पासून मी केसरीचा तसेंच सह्याद्रीचा

आरंभापासून वर्गणीदार आहे. आपला लेख वाचून फार समाधान झाले. पुढचा लेख केव्हां येतो तसेंच लेखाचे पुस्तक केव्हां हातांत पडते अशी उत्सुकता वाटत आहे. आपण लेखाचे जें धोरण ठरविलें तें मला फार पसंत पडलें व जुन्या प्रसिद्ध मोठमोठ्या व्यक्तीचें वर्णन व स्वभावचित्रें वाचल्याने आनंद वाटला. आपल्या लेखमालेबद्दल मी आपणांस धन्यवाद देतो. ''

माझ्या जवळच्या किंवा केसरी ऑफीसमधील लोकांना या लेखमालेबद्दल काय वाटत होते या गोष्टीची मी कधीं चौकशी केली नाहीं. व त्यानीहि याबद्दल मला ओळख देखील दिली नाही, ही गोष्ट नित्याप्रमाणेंच झाली ! पण या लेखांचे दूरच्या त्रयस्थ माणसांचे मनांत पडसाद उठतात हीच गोष्ट मला हवी होती व कार्यप्रवण करण्यास पुरेशी होती. मुंबईच्या श्रीमती सुशीलाबाई वाघ यांनी एका पत्रांत लिहिलें, '' काल पाठविलेले आपलें '' वाळवंटांतील पाऊलें' हें लिखाण मिळालें. खरोखरच तें इतके सुंदर आहे कीं याची आपल्यालाहि कल्पना होणार नाहीं ! शाश्वत वाङ्मय आहे हें ! आपण मला अनेक लेख पाठवून उपकृत करीत आहां हें ऋण मला या जन्मीं फेडणें शक्य नाहीं ! ''

सह्याद्रीतील माझी ही लेखमाला गांधीचें मृत्यूनें परिस्थिति बदलली त्यामुळें शेवटास गेली नाहीं. सह्याद्रीचे संपादक श्रीयुत दि. वि. काळे यांनीं ती तत्परतेने छापली; तसेंच तात्यांचे अपुरें ललित वाङ्मय देखील त्यांनीं मुद्दाम मागून हौसेनें व अभिमानानें सह्याद्रींत प्रसिद्ध केलें. पण दोन वर्षांनंतर साहजिकच इतर गोष्टींना महत्व आले. याकरतां दरवर्षी फक्त ऑक्टोबरचे अंकांत तात्यांचे विषयीं लेख न विसरतां मी लिहीत असे. तात्यांचे अपुरें वाङ्मय सह्याद्रींत क्रमशः दोन वर्षें लागोपाठ प्रसिद्ध होत होतें. यावरून त्यांच्या लेखणीचा वेग केवढा होता याचें वाचकांनाहि नवल वाटलें !

या अपुऱ्या लिखाणांत 'प्रमिला' व ' अंधारवड' या कादंबऱ्या आणि 'जंगल में मंगल' हें नाटक होतें. तात्यांचे अपुरें वाङ्मय सह्याद्रींत जशाचें तसें प्रसिद्ध केल्यावर अर्थातच माझी जबाबदारी संपली. मी त्यांचा मुलगा झालों म्हणून त्यांचें अपुरें वाङ्मय देखील मी पुरें करावें अशी कोणाचीच माझेकडून अपेक्षा नसेल. पण साऱ्या जन्मांत मी एखादें नाटक, कादंबरी, गोष्ट, किंवा कांहीहि लिहिलें नव्हतें; म्हणून केवळ गमतीचा प्रयोग किंवा करमणूक, म्हणून तात्यांनीं अपुरी सोडलेली हीं कथानकें तरी काय असतील असा कल्पनेंचा चाळा मनाशी सुरू झाला. एकप्रकारें परकायाप्रवेशाचाच तो प्रयोग होता ! पण त्यांत जितकी कल्पकता व धाडस तितकेंच कौतुकहि होतें. यामुळें मनाला हौस वाटली. आणि चार वर्षांनंतर दोन्हीं कथानकें मीं पुरी केली. त्यांत भाषा व कथानक यांचा जोड इतका उत्तम साधला आहे कीं, ' अंधारवड ' किंवा जंगल में मंगल नाटकाचे पुस्तक वाचतांना त्यांतला तात्यांचा भाग कोणता हे सहसा उमगणार नाहीं ! हें मींच म्हणतों असें नाहीं तर सह्याद्रि व मनोहर मासिक यांनीहि हा जोड

अगदी बेमालूम साधल्याबद्दल अभिप्राय प्रकट केला आहे. या पुस्तकांच्या प्रस्तावनेंत तात्यांचे लिखाण कोणतें व त्यापुढें माझें कोणतें याचा मी मुद्दाम स्पष्टपणानें उल्लेख केला आहे. या कादंबऱ्या तात्यांच्या हातून पुऱ्या होत्या तर त्या अधिक सरस होत्या हें सांगण्याचें कारण नाहीं. माझें काम केवळ सांथ देण्याचें, किंवा गायनांत खंड न पडावा अशा हेतूनें त्यांच्या सुरांत सूर मिसळून वेळ निभावून नेण्याचें होतें. पण मुख्य नायकामागे साथीला बसलेल्या माणसाचेहि तोंडून क्वचित् एखादे वेळीं जर तशीच हुबेहुब लय किंवा आलाप निघाला तर त्यालाहि श्रोत्यांकडून वाहवा मिळते !

'**जंगल में मंगल**' नाटकाबद्दल सह्याद्रि मासिकानें लिहिलें—

"डिसेंबर १९४८ आणि फेब्रुवारी १९४९ अशा सह्याद्रीच्या दोन अंकात 'जंगल में मंगल' या प्रहसनात्मक नवलिकेचे सहा प्रवेश प्रसिद्ध झालेले वाचकांना आठवत असतील.तात्यासाहेबांनी अपुरे ठेवलेलें हें प्रहसन त्यांचे चिरंजीव श्री. काशिनाथपंत यांनी आणखी पांच प्रवेश लिहून रसिकांपुढें मांडण्यासाठी पुरें करून दिलें आहे. पितापुत्र मिळून सिद्ध केलेल्या वाङ्मयाचे हे एक कौतुकास्पद उदाहरण होय. तात्यासाहेबांनी आरंभीचे निर्माण केलेलें नवलाईचें वातावरण अखेरपर्यंत टिकवून प्रारंभीच्या शोककारक घटनेतूनच तात्यांच्या संकल्पाप्रमाणेंच आनंदपर्यवसायी कथानक उभें केल्यानें हा जोड मोठा बेमालूम झाला आहे यांत शंका नाहीं !"

"**अंधारवड**" कादंबरीसंबंधी 'मनोहर' मासिकानें म्हटलें आहे—

'अंधारवड' ही कादम्बरी जितकी चित्तवेधक आहे तितकीच तिची जन्मकथाहि मनोरंजक आहे. तात्यासाहेबांनी १९१७–१८ सालीं या कादम्बरीची पहिली दोनतीन प्रकरणें लिहिली. पुढील सात–आठ प्रकरणें त्यांनीं आणखी सुमारे ३० वर्षांनीं लिहिली. पण कादम्बरी पूर्ण करण्यापूर्वीच ते दिवंगत झाले. पुढें त्यांचे चिरंजीव श्री. काशिनाथपंत यांनीं शेवटची अडीच प्रकरणें लिहून ही कादम्बरी पूर्ण केली. आपल्या या कामगिरीबद्दल श्री. काशिनाथपंतांनी कांहींसा संकोच प्रस्तावनेंत व्यक्त केला आहे. पण तसा संकोच त्यांनी मानण्याचें कारण नाही हें दोन्ही लेखण्यांतून उतरलेला मजकूर वाचून ध्यानांत येते. तात्यासाहेबांनी अत्यंत वेधकपणें मांडलेला पात्र–प्रसंगांचा पसारा त्यांच्या चिरंजिवांनी तितक्याच रंजकपणें, कौशल्यानें आणि संयमानें शेवटच्या अडीच प्रकरणांत आवरून हा लेखणीचा वारसा सार्थ करून दाखविला आहे."

माझे मित्र श्री. **वामनराव देशपांडे** ता. २० जून १९५८ चे पत्रांत लिहितात—

'अंधारवड' कादम्बरी आताच वाचून खाली ठेवली व हें पत्र लिहावयास घेतलें. वाचतां वाचतां विचार आला तो आवर्जून कळविण्यासारखा वाटतो. आपला जोड चांगला जमला आहे, पण–माफ करा, पहिल्या ११७ पानांपेक्षाही मला तो सरस वाटला. शेवटच्या तुमच्या अडीच प्रकरणांवरून बंकिमचंद्राच्या 'इंदिरा' कादम्बरीची आठवण झाली. आपण कादम्बरी प्रांतांत उतरलांत; मला वाटतें तेच तुमचें कार्यक्षेत्र

असावें. आपण तसा उद्योग कराच. सुरेख भाषा, जीवनाचा अनुभव व ज्ञान, तात्त्विक बैठक व विशुद्ध कलात्मकता यांत तुम्ही कोणालाहि हार जाणार नाही. मराठीमध्यें जरुर असलेला एक नवीन कादम्बरीकार उदयाला येईल. माझे वाचन थोडे असले तरी विशुद्ध कलात्मकतेचें दर्शन आपणच कादम्बरी मार्गानें घडवाल असा माझा तरी विश्वास आहे. व तसा उद्योग आपण कराच असा माझा आग्रह आहे."

**श्री. स. वि. बापट** ( पुणें ) ता. ४ मे १९५८ चे पत्रांत लिहितात–

"गुरुवर्य तात्यांचे राहिलेलें अपूर्ण काम आपण पूर्ण केलेंत, या आपल्या पितृसेवेबद्दल व ती सेवा यशस्वी करण्यास कारणीभूत होणाऱ्या आपल्या कार्यक्षमतेबद्दल, अर्थात पात्रतेबद्दल, जेवढें कौतुक करावें तेवढें थोडेच आहे. खरोखर अंधारवड, व जंगल में मंगल या दोन्ही कृतींची इतकी बेमालूम सांधेजोड झाली आहे कीं, आपण ती वस्तुस्थिती प्रकट केली नसती तर, ती बिनजोड एकच कृती, वस्तू आहे असेंच खास वाटलें असते ! गुरुवर्यांनीच ती कृति पूर्ण केली आहे असेंच सर्वांस वाटलें असते ! फार काय पण, गुरुवर्यांसही तसेंच वाटून त्यांनी धन्योद्‌गारपूर्वक आपल्या पाठीवरून हात फिरविला असता !"

ललित वाङ्मयापेक्षांहि माझ्या निबंधलेखनांत, विशेषतः वादप्रसंगीं माझ्या लेखणींतून पुष्कळदां तात्यांची भाषाशैली उमटते ही गोष्ट कांहीशी खरी आहे.

**प्रा अरविंद मंगळूरकर** यांनी एका पत्रांत माझ्या लेखनशैलीबद्दल अभिप्राय प्रकट केला आहे तो मार्मिक वाटल्यावरून पुढें देत आहे.

पुणें, ता २४-१०-५३

सप्रेम नमस्कार, तुमचा सह्याद्रीतील लेख वाचला. लेखांत पदोपदी दिसणारे शहाणपण, सचोटी, दिलदारी आणि पुरावा छानून काढण्याची पद्धती ही पाहून मी खरोखर गंभीर बनलो. तात्यांचे पुष्कळ गुण तुमच्यांत आहेत, असें मी म्हटलें तर तें तुम्हाला बरे वाटेल, पण मला तितके बरे वाटणार नाही; कारण तात्यांहून भिन्न असें पृथगात्म व्यक्तित्व तुमच्या ठिकाणी आहे, त्याच्या परिमलानें मी भरून येतों.

तुमचा

**अरविन्द मंगळूरकर**

"माझ्या लिहण्यानें तात्यांच्या लेखणीची आठवण होते" अशी अनेकांकडून प्रशंसा मी ऐकली आहे. त्याबद्दलहि माझा खुलासा येथेंच करतो. माझ्या लेखणीनें तात्यांचे शिवाय दुसरा गुरु मानला नाही, आणि चाळीस वर्षें तेंच वळण गिरविल्यावर क्वचित् प्रसंगी कोणाला माझ्या लिहिण्यानें तात्यांच्या लेखणीचा भास झाला तर ती गोष्ट अशक्य आहे असें मी म्हणत नाही. पण हें अनुकरण अगदीं वरवरचें, म्हणजे केवळ विचारसरणी व

भाषाशैली यापुरतेच असतें हें विसरूं नये. पण या दोहींच्या पाठीमागें त्यांच्या विशाल व व्यापक बुद्धीचा जो गुण होता तो माझ्यांत किंवा कोणांतहि कसा येईल ? अनुकरणानें तो साधेल काय ? तसें जर घडतें तर तात्या, गेल्यामुळें महाराष्ट्राची जी हानी झाली ती खोटीच म्हणावयाची ! म्हणून ‘ माझ्या लिहिण्यानें तात्यांच्या लेखणीचा भास होतो ’ या प्रशंसेचा अर्थहि समर्यादच घेतला पाहिजे. लिहिणें हीहि एक नट विद्याच आहे. तोतयाचें बंडांत नाना फडणविसाचें पात्र त्या ऐतिहासिक व्यक्तीचा जो ‘ आभास ’ उत्पन्न करतें त्याबद्दल आपण त्याचें कौतुक करतो. पण नट तो अखेर नटच ना ? नाना फडणविसाची योग्यता त्या नटाचे अंगीं कोठून येणार ? माझ्यापुरतें सांगावयाचें तर, तात्यांची भाषा मी लिहितो हें जितकें खरें आहे तितकेंच, तात्यांची सगळी भाषा मी जशीच्या तशी लिहीत नाहीं हें देखील खरेंच आहे ! याचें कारण आमच्या दोघांची प्रकृति भिन्न आहे. त्यांचेपेक्षां मी अधिक भावनाप्रधान आहे. ‘ मराठे व इंग्रज ’ पुस्तक जसें मी लिहूं शकणार नाहीं तसेंच, ‘ शमीपूजन ’ पुस्तक लिहिण्याचा विचार त्यांनी केला नसता. एकच घराणें, गायकी किंवा परंपरा यांचा अभिमान धरणें म्हणजे त्याची सहीसही नक्कल करणें नव्हे ! त्या घराण्याचा जो मूळ उत्पादक त्याच्या प्रभावी पराक्रमावांचून केवळ त्याची बाह्य नक्कल करणें हास्यास्पद होईल. परंपरा जागृत ठेवणें म्हणजे स्वतःचें वैशिष्ट्य नाहींसे करणें असेंहि नव्हे ! स्वतःचें वैशिष्ट्य कायम ठेवूनहि परंपरेचा अभिमान धरितां येतो. व त्यानेंच त्या परंपरेंत नाविन्य येऊन ती अधिक समृद्ध होते. तात्यांचे भाषेपेक्षां माझी भाषा कोणाला अधिक आवडत असेल तर वादाकरितां घटकाभर ते म्हणणें कबूल करतां येईल. पण माझी भाषा आणि तात्यांची भाषा सर्वांशीं एकच आहे हें म्हणणें कधींहि खरें ठरणार नाहीं !

माझ्या **शमीपूजन** पुस्तकाविषयी पूर्वी अनेकदां उल्लेख केलेलाच आहे. म्हणून त्याविषयी अधिक न लिहितां फक्त एक दोन अभिप्राय व खाजगी पत्रें पुढे देतो. कारण तुमच्या वाङ्मय कृतीबद्दल अखेर लोकांचे काय मत होईल तेंच खरें.

**विविधवृत्त.चा अभिप्राय—**

‘शमीपूजन’ हा श्री. का. न. केळकरांचा नवा ग्रंथ ऐतिहासिक विवेचनाचा असून त्यांत पेशवाई बुडाल्यापासून स्वातंत्र्यप्राप्तीचा पहिला उठाव होईपर्यंतच्या अर्धशतकाच्या राजकीय इतिहासाचें उद्बोधक विवरण केलें आहे. श्री. केळकरांचा हा विषय जिव्हाळ्याचा असून, दीर्घकालीन मननानें सजलेला हा कारुण्यपूर्ण इतिहास वाचीत असतां अंतःकरणांत चलबिचल होते. श्री. केळकर यांनीं आपलें विवेचन साधार मुद्देसूद केलेलें असून त्यांच्या लेखणींतील जोश आणि जिव्हाळा वर्णनीय आहे. १८५७ चें क्रांतियुद्ध ही घटनाच भारताच्या इतिहासांत अद्भूत रसपूर्ण आहे. व तिचें श्री. केळकरांनी या पुस्तकांत घडविलेलें दर्शन रौद्ररम्य आहे. ( ता. ११–४–१९४८ )

शंकार साप्ताहिकाचा अभिप्राय–

या ग्रंथांत १८५७ सालच्या बंडाचा त्रुटित किंवा विस्तृत असा वृत्तांत दिलेला नसून तें बंड कां झालें, कुणी केलें यांची मोठी उद्‌बोधक चर्चा केली आहे. बंडां-पूर्वीच्या सुमारें चाळीस वर्षांच्या घटनांचा सुसंगत अन्वयार्थ लावण्याचा यशस्वी प्रयोग केला आहे. त्या दृष्टीनें मराठींतील हें पहिलेंच पुस्तक होय असें वाटतें.

'पेशवाईची परिसमाप्ति' 'देशी राज्यावरील अरिष्ट' आणि "असंतोषाच्या दारूचें कोठार" हीं तीन प्रकरणें केवळ अश्रूंनीं लिहिलीं आहेत असें वाटतें. हीं पहिलीं सात प्रकरणें म्हणजे राज्यक्रांतीच्या कटाची पार्श्वभूमि आहे. आठव्या प्रकरणापासून प्रत्यक्ष बंडाच्या हकीकतीस सुरुवात होते. 'नानासाहेब बंडास कसे मिळाले' हें प्रकरण लेखकाच्या विवेचक बुद्धीचा एक नमुनाच आहे. पेशव्यांचा एक हस्तक अजिमुल्लाखान याचें शब्दचित्र वाचून तर अलीकडील महायुद्धांतील धाडसी हेरांची आठवण होते. सतराव्या प्रकरणांतील महंमदअल्ली ह्या गुप्तहेराची कथाहि तितकीच मनोरंजक आहे. सर्व प्रकरणांत "झाशीवालीचा वृत्तांत" हे प्रकरण फारच उत्कृष्ट उतरलें आहे. हा वृत्तांत वाचण्यासाठीं तरी वाचकानें शमीपूजन एक वेळ अवश्य वाचावें.

"हें तेवीस प्रकरणाचें पुस्तक एखाद्या कादंबरीसारखें चटकदार झालें आहे. इतिहासाचें पुस्तक म्हणून त्यांत एवढाहि रुक्षपणा नाहीं. आधार–ग्रंथांची नुसती यादी पाहिली तरी लेखकानें केवढा व्यासंग केला आहे याची चांगलीच कल्पना येते. गेलीं दहा वर्षें अनेक ग्रंथांचें नि ग्रंथींचें मनःपूर्वक परिक्षण करून 'शमीपूजन' सारखा संशोधनात्मक ग्रंथ लिहून मराठी इतिहासांत एका वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथाची भर घातली त्याबद्दल तज्ञ मंडळी त्यांचें अभिनंदन करतील. वाङ्मयीनदृष्ट्या देखील ह्या पुस्तकास चांगलें महत्व येईल असा भरंवसा वाटतो.

**प्रो. शं. दा. पेंडसे यांचे पत्र–**

नागपूर ता. २२–४–४८

आपण पाठविलेली 'शमीपूजन' आणि 'नेपोलियन व हिटलर' हीं दोन्हीं पुस्तकें पोचली. फार आभारी आहे. पुस्तकें सहज चाळण्याकरिता उघडली तो आपल्या सहज आणि मनोहर लेखनशैलीमुळें ती आरंभापासून अखेरपर्यंत वाचलीं. सुंदर आणि आकर्षक लेखनशैलीची अमूल्य देणगी कै. तात्यासाहेबांनी आपणांस दिली आहे यांत शंका नाहीं. हिटलरचें भविष्य आपण तंतोतंत बरोबर वर्तविलेलें पाहून आश्चर्य वाटलें !

भाषाशैली यापुरतेंच असतें हें विसरूं नये. पण या दोहींच्या पाठीमागें त्यांच्या विशाल व व्यापक बुद्धीचा जो गुण होता तो माझ्यांत किंवा कोणांतहि कसा येईल ? अनुकरणानें तो साधेल काय ? तसें जर घडतें तर तात्या, गेल्यामुळें महाराष्ट्राची जी हानी झाली ती खोटीच म्हणावयाची ! म्हणून 'माझ्या लिहिण्यानें तात्यांच्या लेखणीचा भास होतो' या प्रशंसेचा अर्थहि समर्यादच घेतला पाहिजे. लिहिणें हीहि एक नट विद्याच आहे. तोतयाचें बंडांत नाना फडणविसाचें पात्र त्या ऐतिहासिक व्यक्तीचा जो 'आभास' उत्पन्न करतें त्याबद्दल आपण त्याचें कौतुक करतो. पण नट तो अखेर नटच ना ? नाना फडणविसाची योग्यता त्या नटाचे अंगीं कोठून येणार ? माझ्यापुरतें सांगावयाचें तर, तात्यांची भाषा मी लिहितो हें जितकें खरें आहे तितकेंच, तात्यांची सगळी भाषा मी जशीच्या तशी लिहीत नाहीं हें देखील खरेंच आहे ! याचें कारण आमच्या दोघांची प्रकृति भिन्न आहे. त्यांचेपेक्षां मी अधिक भावनाप्रधान आहे. 'मराठे व इंग्रज' पुस्तक जसें मी लिहूं शकणार नाहीं तसेंच, 'शमीपूजन' पुस्तक लिहिण्याचा विचार त्यांनी केला नसता. एकच घराणें, गायकी किंवा परंपरा यांचा अभिमान धरणें म्हणजे त्याची सहीसही नक्कल करणें नव्हे ! त्या घराण्याचा जो मूळ उत्पादक त्याच्या प्रभावी पराक्रमावांचून केवळ त्याची बाह्य नक्कल करणें हास्यास्पद होईल. परंपरा जागृत ठेवणें म्हणजे स्वतःचें वैशिष्ट्य नाहींसे करणें असेंहि नव्हे ! स्वतःचें वैशिष्ट्य कायम ठेवूनहि परंपरेचा अभिमान धरितां येतो. व त्यानेंच त्या परंपरेंत नाविन्य येऊन ती अधिक समृद्ध होते. तात्यांचे भाषेपेक्षां माझी भाषा कोणाला अधिक आवडत असेल तर वादाकरितां घटकाभर ते म्हणणें कबूल करतां येईल. पण माझी भाषा आणि तात्यांची भाषा सर्वांशीं एकच आहे हें म्हणणें कधींहि खरें ठरणार नाहीं !

माझ्या शमीपूजन पुस्तकाविषयी पूर्वीं अनेकदां उल्लेख केलेलाच आहे. म्हणून त्याविषयी अधिक न लिहितां फक्त एक दोन अभिप्राय व खाजगी पत्रें पुढे देतो. कारण तुमच्या वाङ्मय कृतीबद्दल अखेर लोकांचे काय मत होईल तेंच खरें.

विविधवृत्ताचा अभिप्राय–

'शमीपूजन' हा श्री. का. न. केळकरांचा नवा ग्रंथ ऐतिहासिक विवेचनाचा असून त्यांत पेशवाई बुडाल्यापासून स्वातंत्र्यप्राप्तीचा पहिला उठाव होईपर्यंतच्या अर्धशतकाच्या राजकीय इतिहासाचें उद्‌बोधक विवरण केलें आहे. श्री. केळकरांचा हा विषय जिव्हाळ्याचा असून, दीर्घकालीन मननानें सजलेला हा कारुण्यपूर्ण इतिहास वाचीत असतां अंतःकरणांत चलबिचल होते. श्री. केळकर यांनीं आपलें विवेचन साधार मुद्देसूद केलेलें असून त्यांच्या लेखणींतील जोश आणि जिव्हाळा वर्णनीय आहे. १८५७ चें क्रांतियुद्ध ही घटनाच भारताच्या इतिहासांत अद्‌भूत रसपूर्ण आहे. व तिचें श्री. केळकरांनी या पुस्तकांत घडविलेलें दर्शन रौद्ररम्य आहे. (ता. ११–४–१९४८)

शंकार साप्ताहिकाचा अभिप्राय–

या ग्रंथांत १८५७ सालच्या बंडाचा त्रुटित किंवा विस्तृत असा वृत्तांत दिलेला नसून तें बंड कां झालें, कुणी केलें यांची मोठी उद्‌बोधक चर्चा केली आहे. बंडांपूर्वीच्या सुमारें चाळीस वर्षांच्या घटनांचा सुसंगत अन्वयार्थ लावण्याचा यशस्वी प्रयोग केला आहे. त्या दृष्टीनें मराठींतील हें पहिलेंच पुस्तक होय असें वाटतें.

'पेशवाईची परिसमाप्ति' 'देशी राज्यावरील अरिष्ट' आणि "असंतोषाच्या दारूचें कोठार" हीं तीन प्रकरणें केवळ अश्रूंनीं लिहिलीं आहेत असें वाटतें. हीं पहिलीं सात प्रकरणें म्हणजे राज्यक्रांतीच्या कटाची पार्श्वभूमि आहे. आठव्या प्रकरणापासून प्रत्यक्ष बंडाच्या हकीकतीस सुरुवात होते. 'नानासाहेब बंडास कसे मिळाले' हें प्रकरण लेखकाच्या विवेचक बुद्धीचा एक नमुनाच आहे. पेशव्यांचा एक हस्तक अजिमुल्लाखान याचें शब्दचित्र वाचून तर अलीकडील महायुद्धांतील धाडसी हेरांची आठवण होते. सतराव्या प्रकरणांतील महंमदअल्ली ह्या गुप्तहेराची कथाहि तितकीच मनोरंजक आहे. सर्व प्रकरणांत "झाशीवालीचा वृत्तांत" हे प्रकरण फारच उत्कृष्ट उतरलें आहे. हा वृत्तांत वाचण्यासाठीं तरी वाचकानें शमीपूजन एक वेळ अवश्य वाचावें.

"हें तेवीस प्रकरणाचें पुस्तक एखाद्या कादंबरीसारखें चटकदार झालें आहे. इतिहासाचें पुस्तक म्हणून त्यांत एवढाहि रुक्षपणा नाहीं. आधार–ग्रंथांची नुसती यादी पाहिली तरी लेखकानें केवढा व्यासंग केला आहे याची चांगलीच कल्पना येते. गेलीं दहा वर्षें अनेक ग्रंथांचें नि ग्रंथींचें मनःपूर्वक परिक्षण करून 'शमीपूजन' सारखा संशोधनात्मक ग्रंथ लिहून मराठी इतिहासांत एका वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथाची भर घातली त्याबद्दल तज्ञ मंडळी त्यांचें अभिनंदन करतील. वाङ्मयीनदृष्ट्या देखील ह्या पुस्तकास चांगलें महत्व येईल असा भरंवसा वाटतो.

**प्रो. शं. दा. पेंडसे यांचे पत्र–**

नागपूर ता. २२–४–४८

आपण पाठविलेली 'शमीपूजन' आणि 'नेपोलियन व हिटलर' हीं दोन्हीं पुस्तकें पोचली. फार आभारी आहे. पुस्तकें सहज चाळण्याकरिता उघडली तो आपल्या सहज आणि मनोहर लेखनशैलीमुळें ती आरंभापासून अखेरपर्यंत वाचलीं. सुंदर आणि आकर्षक लेखनशैलीची अमूल्य देणगी कै. तात्यासाहेबांनी आपणांस दिली आहे यांत शंका नाहीं. हिटलरचें भविष्य आपण तंतोतंत बरोबर वर्तविलेलें पाहून आश्चर्य वाटलें !

नेपोलियनच्या कांहीं प्रकरणांचा शेवट मनाला चटका लागण्यासारखा झाला आहे. मे महिन्यांत पुण्यास येईन तेव्हां आपणास भेटेन.

आपला स्नेहांकित
**शं. दा. पेंडसे.**

## श्री. रा. बा. कुलकर्णी यांचे पत्र

" आपलें शमीपूजन पुस्तक एका बैठकींतच वाचून काढलें इतका चटका त्यानें लावला ! विशेषतः राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, नानासाहेब, बहादुरशहा, यांची वर्णनें व शब्दचित्रें इतकीं परिणामकारक आपण रेखाटली आहेत कीं तीं वाचतांना खरोखरच अक्षरशः डोळ्यांतून आसवें गळालीं.

पण परिणाम–कारकतेबरोबरच अत्यंत कठीण अशी एक गोष्ट आपण पाळली आहे. ती म्हणजे समतोलपणा. शब्दांमध्यें अर्थगौरव तर आहेच पण संयमहि आहे. विचारांचा समतोलपणा, पण त्याबरोबरच मनाला पीळ पाडणारी भाषा हें अवघड समीकरण आपण मोठ्या कौशल्यानें साधलें आहे; आणि म्हणूनच आपलें हें पुस्तक सावरकरांचे पुस्तकापेक्षां जास्त मोलाचे आहे असें मला वाटतें. "

**रा. बा. कुलकर्णी**

'शमीपूजन' पुस्तकाचें प्रकाशनाला ती तात्यांचे मृत्यूमुळें वाईट वेळ लागली होती. पण १९५७ सालीं १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची शताब्दि आली त्यावेळीं मी त्याचा वचपा काढून घेतला. अवघ्या तीन महिन्यांत याच विषयावर **" शंभर वर्षांपूर्वी "** हें दुसरें पुस्तक लिहिलें व ठिकठिकाणीं व्याख्यानेंहि दिली. या पुस्तकांबद्दल प्रसिद्ध इतिहाससंशोधक व कोशकर श्री. चिं. ग. कर्वे यांचा एकच अभिप्राय पुढें देतो–

## श्री. चिं. ग. कर्वे यांचे पत्र

" शंभर वर्षांपूर्वी " हें पुस्तक समग्र वाचून पाहिले. माहिती मनोवेधक इतकेंच नव्हे तर रोमहर्षक आहे. आपण १८५७ च्या क्रांतीची कांहीं सहज उपलब्ध न होणारी साधनें प्रकाशित करून इतिहास–लेखकांवर व शिक्षकांवर उपकार केले आहेत यांत शंका नाहीं.

नवीन, आपल्याकडील विशेषतः, साधनें पुढें आली पाहिजेत. सरकारनें यासाठीं जो अवाढव्य खर्च केला त्याचें समग्र फळ जनतेच्या पदरांत पडले पाहिजे. कोणी भलतीच माणसें लावून अव्यवस्थित पहाणी व जुळणी जी केली त्यापेक्षां आपल्या-

सारखी तळमळीची व्यासंगी माणसें हाताशी धरावयास पाहिजे होती. पण सरकार आंधळे म्हणण्यापेक्षां, आपल्या लाग्याबांध्याच्या माणसाला सहेतुक तोबरा देते ! असो. पुनः आपले आभार मानतो. ''

**चिं. ग. कर्वे**

माझ्या स्वतःच्या वाङ्मयाखेरीज, ती. तात्यांच्या अप्रकाशित वाङ्मयांपैकीं दोन उत्कृष्ट ग्रंथ प्रसिद्ध करून मी त्यांचें वाङ्मयकार्य शेवटास नेलें.

"**ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात**" हा तात्यांच्या राजकीय लेखांचा उत्कृष्ट संग्रह त्यांच्या तिसऱ्या पुण्यतिथीस मी प्रसिद्ध केला. त्यांत १९३९ सालीं दुसऱ्या महायुद्धाला सुरवात झाली तेथपासून १९४७ साल अखेर आठ वर्षांतील लेख आहेत. दुसरें महायुद्ध सुरु झाल्यावर ज्या अनेक घटना हिंदुस्थानला स्वराज्य देण्याबाबत घडून आल्या त्यांचा हें पुस्तक म्हणजे चालता बोलता इतिहास आहे. त्याचें महत्त्व किती आहे हें इतिहासज्ञांस सांगण्याचें कारण नाहीं ! दर दिवशीं या घटना आपल्या डोळ्या-समोर घडून येत होत्या, यामुळें सामान्य मनुष्याला त्याचें तादृश महत्त्व लक्षांत येत नाही. पण पांचपन्नास वर्षांनीं भावी इतिहासकार जेव्हा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा इतिहास लिहिण्यास घेईल, तेव्हां या पुस्तकाला स्पर्श करून त्यांतील विधानांची दखल घेण्याशिवाय त्याला गत्यंतर राहणार नाहीं ! राजकारणांतील कांहीं साक्षेपी व्यक्तींचे या गोष्टींकडे लक्ष होतेहि. नागपूरचे डॉ. ना. भा. खरे यांनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे, "आपला लोभ आवरून जर काँग्रेसवाले श्री. केळकर यांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें गेले असते तर, पाकिस्तान न होतांहि देश स्वतंत्र झालाच असता ! "

या पुस्तकावर 'वाङ्मय–शोभा' मासिकानें मार्मिक अभिप्राय व्यक्त केला होताः—

"हा ग्रंथ वाचीत असतां पहिला विचार हा मनांत येतो कीं, देशांतील आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील मोठमोठ्या घटनांचें इतक्या समतोलपणें 'स्वायत्त तादात्म्यानें' इतक्या चिकीत्सकपणें निरीक्षण व चिंतन करणाऱ्या या व्यक्तीच्या–तात्यासाहेबांच्या कर्तृत्वाचे राष्ट्राला चीज करतां आलें नाहीं. प्रतिपक्षाविषयी असामान्य गुणग्राहकता दाखविण्याचा त्यांचा गुणहि उपेक्षिला गेला. त्यांची उपेक्षा आणि अवहेलना करणाराना हा ग्रंथ वाचतांना खात्रीनें आपल्या अहंमन्यतेबद्दल खेद वाटेल ! लालित्याचे मूळचे देणें असलेल्या व्यक्ति राजकारणांतहि किती आकर्षकता आणतात हें या ग्रंथांत पानो-पानीं दिसतें. सहज एखादा दृष्टांत, एखादी उपमा येऊन जाते आणि तिच्या समर्पकतेची जाणीव मनांत घोळत असतां वाचनाचा आनंद वाढतच जातो. तात्यासाहेबांच्या लेखांचे एका सूत्राभोंवतीं संकलन करण्यांत श्री. काशिनाथपंत केळकर यांनीं अतिशय चातुर्य दाखविलें आहे. "

तात्यांचे सह्याद्रीतील वाङ्मयविषयक लिखाण पुष्कळच म्हणजे सुमारें एक हजार

पृष्ठें असल्यामुळें तें प्रसिद्ध होण्याला सात आठ वर्षे जावी लागली. पण तेहि लिखाण "**केळकरांची निबंधमाला**" या नांवानें मी संपादन करून प्रसिद्ध केलें. हें हजार पृष्ठांचें पुस्तक काढण्याला सहजासहजी प्रकाशक मिळण्यासारखा नव्हता. माझेच एक चुलत चुलते श्री. सदुकाका केळकर यांनी प्रकाशनाचा आर्थिक भार अंगावर घेण्याला मान्यता दिल्यामुळें संपादनाच्या कामाला माझेहि अंगांत उमेद आली. "तात्यांचे हें शेवटचें काम, याकरितां 'समग्र केळकर वाङ्मया'च्या सर्व खंडापेक्षां हा खंड सरस करावयाचा असें ठरवून मीं कामाला लागलों. हें करतांना एक गोष्ट मनाशीं पक्की ठरविली होती कीं, हें पुस्तक म्हणजे तारीखवारीनें छापलेल्या लेखांचे ऐतिहासिक भारूड होऊं नये; पृष्ठसंख्येच्या दृष्टीनें लेखांत प्रमाणबद्धता असावी; दर भागांत अनुक्रम आणि उपसंहार अशी कल्पना योजून, संगीतांत ताल आणि लय यांनीं जे कार्य होतें अशीच या पुस्तकाची रचना करावी. आणि मुख्य गोष्ट म्हणजे विसंवादी सूर काढणें ही गोष्ट अभिजात कलावंत जशी वर्ज किंवा निषिद्ध मानतो त्याप्रमाणें, ज्यामुळें मनाला विषाद वाटेल किंवा खटकेल असें या ग्रंथांत कांहींहि येऊं नये असें मी ठरविलें होतें. एखादी उच्च कलाकृति करतांना मन निर्वैर करून उच्च वातावरणांत न्यावें लागतें. या दृष्टीनें राजकारणाची प्रत साहित्याच्या खालींच लागते, कारण त्यांत हर्षामर्ष, रागलोभ विसरले जात नाहींत. याकरितां तात्या हे राजकारणी असले तरी, ते उच्च प्रतीचे सिद्धांति व तत्वज्ञानी होते, अशा चित्राचा ठसा या वाङ्मय कृतींतून वाचकांचे मनावर उमटावा असें मी मनाशीं योजलें होतें." आणि हा माझा हेतु अगदीं शंभर टक्के सिद्धीस गेला असें वर्तमानपत्रांतील पुढील अभिप्रायांवरून दिसून येईल—

'सकाळ' पत्रानें लिहिलें—"श्री. काशिनाथपंत उर्फ बापूसाहेब हे एक चिकित्सक साहित्यिक असल्यामुळें त्यांनीं या पुस्तकांतील लेखांची रचना उत्कृष्ट केली असल्याचें प्रत्ययाला येते. "ज्यामुळें मनाला विषाद उत्पन्न होईल किंवा खटकेल असें कांहींहि या पुस्तकांत येऊं नये असें मी ठरविलें होतें," असें संपादक प्रस्तावनेंत म्हणतात, ते खरें करून दाखविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे."

या पुस्तकाचे परीक्षण केसरींत दहा कॉलम विस्तृत लेख लिहून श्री. ज. स. करंदीकर यांनी केलें होतें. त्यांत म्हटले आहे, "हें पुस्तक म्हणजे साहित्याची एक प्रकारें मेजवानीच आहे. श्रीयुत तात्यासाहेब केळकर हे खरेखुरे 'साहित्यसम्राट्' होते. राजकारण किंवा साहित्य यांत अनेकांना दिलेल्या पदव्या औपचारिक किंवा अतिशयोक्तीच्या दोषाला पात्र होणाऱ्या आढळतात. पण तात्यासाहेब केळकर यांची ही पदवी अतिव्याप्त नव्हती तशीच ती औपचारिकहि नव्हती. बुद्धिप्रकर्षाच्या गुरुत्वाकर्षणानें ती पदवी त्यांना येऊन चिकटली आणि आपल्या लेखणीच्या प्रभावानें ती पदवी त्यांनी अक्षरशः खरी करून दाखविली.

"साहित्यक्षेत्रांतला असा एकहि विषय नाहीं कीं ज्यांत त्यांनी आपलें बुद्धि-

वैभव गाजविलें नाहीं. १९३८ सालीं समग्र केळकर वाङ्मयाचे बारा खंड प्रसिद्ध झालें. त्यानंतरच्या काळांत त्यांनी जे शेंकडों लेख लिहिलें तें त्यांच्या परिणत बुद्धिप्रकर्षाचें फल होतें. ते लेख कोठेंतरी विस्मृतीच्या अंधारांत पडून सुकून वाया जाऊं नयेत, याकरितां त्यांच्या ज्येष्ठ चिरंजिवांनीं ही निबंधमाला प्रसिद्ध केली आहे. श्री. काशिनाथ नरसिंह उर्फ बापूसाहेब केळकर यांनीं केवळ पितृप्रेमानें, आणि पितृऋणांतून मुक्त व्हावें म्हणून दीर्घोद्योग करून, तात्यासाहेबांपासून आनुवंशिक आणि सहवासजन्य योगानें प्राप्त झालेल्या विवेचक बुद्धीची कसोटी लावून, हा एक हजार पृष्ठांचा ग्रंथ तयार केला याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तितके थोडेच आहेत! हा ग्रंथ जर प्रसिद्ध न होता तर मराठी भाषेंत ती एक मोठी उणीव राहिली असती."

'दैनिक काळ' पत्रानें 'केळकरांची निबंधमाला' या शीर्षकाखाली मुद्दाम अग्रलेखच लिहिला होता. त्यांत म्हटले आहे—

"तात्यासाहेबांच्या अप्रसिद्ध राहिलेल्या वाङ्मयाचें हें ग्रंथरूपानें प्रकाशन म्हणजे गयेस विष्णुपदावर अर्पण केलेला श्राद्धपिंडच होय. आपलें उर्वरित कार्य आपल्या चिरंजिवांनी शेवटास नेलेलें पाहून त्यांच्या आत्म्यास खचित समाधान वाटेल. श्री. ना. सि. फडके यांनीं मार्मिकपणानें म्हटल्याप्रमाणें, श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे मराठी भाषेचे पहिले निबंधकार व त्याच परंपरेंतले श्री. केळकर हे शेवटचे निबंधकार. केळकरांच्या नंतर 'निबंधकार' हें नांव आतां यापुढें संपले!' या उद्गारावरून तात्यासाहेबांच्या वाङ्मयाचा दर्जा केवढा होता व समाजावर त्याचा केवढा परिणाम घडून झाला तें दिसून येतें.

"तात्यासाहेबांचे साहित्य तयार होतांना त्याची सामुग्री जुळविण्याचें बाबतींत व त्या साहित्याचे प्रकाशन करण्याचें बाबतींत श्री. बापूराव केळकर यांनी किती महत्वपूर्ण कामगिरी बजावली व तात्यासाहेबांचा किती विश्वास संपादन केला होता हें या निबंधमालेंत प्रत्येक भागाचे शेवटीं जो निवडक पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे त्यावरून दिसून येते. तात्यासाहेबांच्या निवडक निबंधांचा व हस्तलिखितांचा संग्रह श्री. बापूराव केळकर यांनी आजपर्यंत जीव लावून जतन करून ठेवला तो या निबंधमालेच्या प्रकाशनानें कारणीं लागला आहे."

या पुस्तकाच्या रचनेंत जें संयोजन आहे तें मार्मिक वाचकांशिवाय इतरांच्या सहसा लक्षांत येणार नाहीं. हें पुस्तक करतांना मी एक 'कलकृति' घडवीत आहे किंवा ताजमहालासारखे शिल्प निर्माण करीत आहे, अशी खरोखरच माझ्या मनांत भावना वावरत होती! आपला अंतस्थ हेतु जाणणारा 'समानधर्मा' भेटला म्हणजेहि आनंद होतो. याकरितां एकच पत्र पुढें देतो—

दादरचे श्रीयुत र. वि. हेरवाडकर ता. ७ मे १९५५ चें पत्रांत लिहितात, "केळकरांची निबंधमाला या पुस्तकाचे द्वारें मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना आपण एक

मोठीच मेजवानी दिली आहे. सदर पुस्तक योजनाबद्ध असल्याचा प्रत्यय जागोजागी येतो. तात्यासाहेबांबद्दल मला नितांत आदर वाटतो. इतका चतुरस्त्र लेखक माझ्या पाहण्यांत नाहीं. तो पुढे होईल कीं नाहीं याची शंकाच वाटते!"

तात्यांचे हयातींत त्यांचे वाङ्मयाची मी **आठ हजार पृष्ठें** प्रसिद्ध केली व त्याचेनंतर **दोन हजार पृष्ठें** प्रसिद्ध केली. 'केळकरांची निबंधमाला' व 'ब्रिटिश साम्राज्याचा अध:पात' हीं दोन पुस्तकें म्हणजे चौदाशें पानें होतात. तात्यांनीं आपल्या प्रसिद्ध, अप्रसिद्ध, छापील वा हस्तलिखित अशा "सर्व ग्रंथांचे सर्व हक्क" मला एकट्याला दिले यांत आजवरच्या माझ्या सेवेचा जसा त्यांनी बहुमान केला तशीच कांही जबाबदारीहि विश्वासानें माझे अंगावर टाकली असें मी तरी समजतो. "**ब्रिटिश साम्राज्याचा अध:पात**" आणि "**केळकरांची निबंधमाला**" हीं पुस्तकें प्रसिद्ध करून ही जबाबदारी मी पार पाडली आहे असें मी नम्रपणाने म्हणतो. तात्यांच्या वाङ्मय–प्रकाशनांत पैसे मिळवावे ही माझी दृष्टि कधींच नव्हती. कसेंहि करून म्हणजे, कोणाचें ऋण न काढतां किंवा कोणाची याचना न करितां, हें काम मी शेंवटाला न्यावें इतकीच माझी इच्छा होती व ती शेंवटाला गेली याचा मनाला फार आनंद व अभिमान वाटतो.

तात्यांच्या वाङ्मयाबद्दल याहून अधिक न लिहितां फक्त एकच मुद्दा कूटप्रश्नाचे रूपानें वाचकांपुढें मी मांडणार आहे. केळकर-क्लबाची जी शंभरावी सभा झाली त्यांत भाषण करून हा मुद्दा मी मांडला होता. तात्यांना निरपवादपणें लोक 'साहित्यसम्राट्' म्हणतात, पण या विशेषणाला माझ्या मनांतून प्रतिसाद मिळत नाहीं. असें कां बरें घडतें? मनुष्याचा जो जीवितहेतु असेल, किंवा जन्मभर जें त्यानें हेतुपूर्वक केलें असेल त्याच विशेषणानें त्यांचें वर्णन व्हावें हें रास्त आहे. उदा० लो. टिळकांचे वर्णन 'भारतीय असंतोषाचे जनक' या पदवीनें केलें जातें. कारण, राजकारण हाच त्यांचा जीवितहेतु होता. पण तात्यांना 'साहित्यसम्राट' म्हणतात याचा अर्थ, त्यांनीं इतर विषयांपेक्षां साहित्य अधिक लिहिलें असा करावयाचा काय? केवळ साहित्याचीच त्यांना आवड असती तर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांप्रमाणें त्यांना विविध ज्ञानविस्तार, करमणूक किंवा मनोरंजन यांत लेख लिहून ती सहज भागविता आली असती. पण लो. टिळकांनी १८९६ सालीं केसरींत त्यांना बोलावले तेव्हां "उडी घालून ती संधि आपण घेतली" असें स्वत: त्यांनीच वर्णन केलें आहे. आणि नंतर सारा जन्म राजकारणांतच घालविला. एरवी महाराष्ट्राचे पुढारीपण त्यांना मिळालेंच नसतें! अलीकडे १९५३ सालीं केसरीनें त्यांचेबद्दल मार्मिकपणानें म्हटलें आहे, "केळकरांना केवळ साहित्यसम्राट मानणें म्हणजे, चलनी नाण्याच्या अवमूलनाप्रमाणें, केळकरांच्या कर्तृत्वाचे अवमूलन करणेंच होय." मग हें जर खरें, तर तात्यांचें वर्णन कोणत्या विशेष-

णानें करावें ? ते साहित्यसम्राट होते ? कीं राजकारणी होते ?

आणखी कांहीं उदाहरणें मी पुढें मांडतो, म्हणजे हा मुद्दा वाटतो तितका सोपा नाहीं हें लक्षांत येईल. नेपोलियन बोनापार्ट वीर होता आणि जन्मभर त्यानें लढायाच केल्या ही प्रसिद्ध गोष्ट आहे. पण त्यानें केलेल्या 'कोड-नेपोलियन' ग्रंथाविषयी त्यानें म्हटलें आहे कीं "ऑस्टरलिट्झचे लढाईपेक्षांहि या कायद्याचे ग्रंथानेंच माझी कीर्ति चिरकाल राहील!" व तें अगदीं खरें आहे. कारण नेपोलियनच्या पराभवानंतर युरोपांतील अठरा देशांत त्यानें केलेले कायदेच प्रचलित होते व हिंदुस्थानांतील मेकॉले यानें केलेल्या पीनलकोडालाहि कोड-नेपोलियनचाच आधार घेतला आहे. मग नेपोलियनला 'कायदेपंडीत' म्हणाल ? कीं 'वीर योद्धा' म्हणाल ?

विजयनगरीचा अमात्य माधवाचार्य याचें उदाहरण असेंच आहे. विजयनगरचें राज्य त्यानेंच स्थापन केलें. आणि आयुष्याच्या अखेरीस अनेक फंदफितूर मोडून राज्याची निर्वेधरीतीनें सुव्यवस्था लावल्यावर मग त्यानें संन्यास घेतला. 'पंचदशी' वगैरे ग्रंथामुळें 'विद्यारण्य' अशी त्याला श्रेष्ठ पदवी मिळाली. "सर्वज्ञः सहि माधवः" असें त्याचें वर्णन केलें जातें! मग अमात्य माधवाचार्य हा नाना फडणविसाप्रमाणें राजकारणी मुत्सद्दी म्हणाल ? कीं विद्वान पंडित म्हणाल ?

आतां टिळकांचें उदाहरण पाहा. लो. टिळक राजकारणांत पडले ते राजकारणाची आवड म्हणून नव्हे; देशाची विपरीत परिस्थिति पाहून, नाईलाज म्हणून, ही गोष्ट सहज शाबीत करितां येईल. पण याहि गजबजाटाचे पलीकडे त्यांचे विचार, दूर उत्तरध्रुव प्रदेशांतील आर्यांचे वसतिस्थानांत, किंवा हरवलेली सांख्यकारिका शोधण्यांत गुंतून गेलेले असत! त्यांच्या गीतारहस्य ग्रंथाबद्दल बडोदा येथील साहित्य-संमेलनाच्या भाषणांत तात्यांनीं म्हटलें आहे कीं, 'लखनौची कॉंग्रेस जिंकल्याचा अभिमान त्यांना अधिक वाटला असेल, किंवा गीतारहस्य ग्रंथाची बाइंडिंग होऊन आलेली पहिली प्रत पाहून ग्रन्थकर्तृत्वाचा अभिमान त्यांना अधिक वाटला असेल हा एक वादग्रस्त प्रश्नच आहे!"

यानंतर महात्मा गांधींचें उदाहरण घ्या. 'महात्मा' ही त्यांची पदवी लोक आडनांवाप्रमाणें वापरतात! पण गांधीचें 'महात्मा' हेंच विशेषण समर्पक मानावयाचें तर त्यांच्या राजकारणाचें काय करावयाचे ? लोकांनाहि हें माहीत आहे कीं, प्रतिपक्षाचें हृदय-परिवर्तन करण्याच्या आध्यात्मिक उपयोगापेक्षां, राजकारणांतल्या चलनी नाण्या-प्रमाणेंच या पदवीचा स्वतः महात्मा गांधींना अधिक उपयोग होत होता! मग म. गांधींचे वर्णन 'साधू' किंवा 'महात्मा' या विशेषणानें कराल ? कीं राजकारणी पुरुष म्हणून कराल ?

साहित्यांतलेंच आणखी एक उदाहरण नाट्याचार्य खाडिलकरांचे देतां येईल. 'नाट्याचार्य' या त्यांच्या पदवीबद्दल वाद नाहीं. पण खाडिलकरांचे खरें वर्णन या

विशेषणांत होते काय ? त्यांनी पन्नास वर्षे वर्तमानपत्राच्या धंद्यात घातली तें त्यांचे कर्तृत्व पुसून टाकतां येणार नाहीं. मग खाडिलकर 'नाटककार' होतें म्हणाल ? कीं त्यांचा जीवितहेतु राजकारण म्हणाल ?

हीच विचारसरणी पुढें चालवून तात्यांचे बद्दल मी प्रश्न विचारतो कीं तात्या खरोखर कोण होते ? त्यांचा जीवितहेतु कोणता होता? १८९६सालीं केसरींत येऊन पन्नास वर्षे त्यांनीं राजकारणांतच घालविली नाहींत काय ? ज्या ब्रिटिश राज्याविरुद्ध ते जन्मभर झगडलें त्या ब्रिटिश राज्याचा मृत्युलेख "ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात" या लेखाचे रूपानें लिहूनच त्यांनीं देह ठेवला. हें जर खरें तर तात्या हे 'राजकारणी' होते म्हणाल ? कीं त्यांना केवळ "साहित्यसम्राट" म्हणाल ? या पदव्या प्रेमानें व आदर-बुद्धीनेंच त्यांना लोकांनीं दिल्या ही गोष्ट मी नाकारीत नाहीं. पण माझी खरी तक्रार 'विशेषणांनीं' माणसाचे वर्णन करण्यावरच अधिक आहे. लांड्या किंवा आंखूड अंगरख्या-प्रमाणें ती विशेषणें नेहमी अपुरी पडतात ! मनुष्याचें कर्तृत्व आणि जीवितहेतु यांचा त्या विशेषणांत दूरान्वय घडतो. त्यांना साहित्य-सम्राट् म्हणतांना अशी ओझ-रती शंका माझ्या मनांत नेहमीं येऊन जाते. आज कूटप्रश्नाचे रूपानें मी ती पुढें मांडली आहे. त्याचे उत्तर मी स्वतः सांगत नाही. कोणी इतर विचारवंतांनी दिलें तर तें मात्र मला हवे आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६२९५ वि: चरित्र
क्रमांक ११२८ नों दि: ८।२।६४

१

## उपसंहार

वाचकहो ! असेंच जर मी यापुढें लिहीत गेलो तर आणखीं कितीतरी लिहितां येईल. पण तो मोह टाळलाच पाहिजे. ही आत्मकथा मी कां लिहितो ? ती मुळींच न सांगितली तर बरें नव्हे काय ? असा विचार माझ्या मनांत निदान शंभर वेळां येऊन गेला असेल ! बालगंधर्वांबद्दल गोविंदराव टेंबे एकदां खाजगीरीत्या म्हणाले– " नारायणराव हा फार थोर मनुष्य आहे ! तो स्वतः-विषयीं कधींच बोलत नाहीं. " या एका वाक्यांत नारायणरावांचें त्यांनीं केवढें मनोज्ञ शब्दचित्र काढलें आहे ! मलाहि जर तसेंच करतां येतें तर फार बरें झालें असतें. पण आतां ज्याअर्थीं मी लिहिलेंच, तर निदान तें थोडक्यांत पुरें करावें इतकेंच मी योजिलें आहे. मी स्वतःला साहित्यिक समजत नाहीं; व राजकारण हा माझा स्वभाव नाहीं. या दोहोंबाबत मी कोणतीच महत्वाकांक्षा मनांत ठेवली नव्हती. पण मोठ्या घरांत यदृच्छया जन्म झाल्यामुळें प्रतियोगित्वानें कांहीं लिखाण मी केलें इतकाच त्याचा अर्थ. प्रथम दैवानें मला तात्यांच्या

पोटीं जन्माला घालून, आणि नंतर बहिरेपणाचा वर देऊन माझी फजिती करण्याचें मनांत आणलें नसतें, तर या आत्मचरित्राची एक ओळ देखील मी लिहिली नसती. पण कोणी कोणतीहि मदत न करितां सर्व जग मात्र माझा तमाशा पाहणार, मग मी तरी आत्मसमर्थनार्थ माझ्या जीवनाचा हिशेब कां मांडून दाखवूं नये ? असा जर विचार माझे मनांत आला तर ती गोष्ट क्षम्य समजू नये काय ? दुसरी गोष्ट अशी कीं, एकवेळ माझी जीवनकथा मी विसरूं शकेन; त्यांत सांगण्यासारखें कांहीं नाहींहि. पण तात्यांचे व माझें जीवन जन्मभर निगडित होतें त्याचें काय ? त्याहि गोष्टीवर मी विस्मरणाचा पडदा टाकावा असें तर नव्हे ना ? किंबहुना तसें करण्याचा मला अधिकार नाहीं असें मी म्हणतो. सुदैवानें तात्यांनीं आत्मचरित्राचा मजकूर म्हणून लिहिलेला एक हस्त-लिखित कागद यावेळीं माझे समोर आहे; यांतील कांही ओळींच मी पुढें देतों. म्हणजे त्यावरून हें आत्मचरित्र लिहिण्याला मी कां प्रवृत्त झालों हें वाचकांच्या लक्षांत येईल. त्या ओळी अशा: —

" आतां कोणाची मतें प्रकट न झाली म्हणून तो अप्रामाणिक असतोच असें नाहीं. मतें प्रामाणिक असतात, व तीं प्रकट करण्याचें धैर्यहि त्याला असते. परंतु ती प्रकट करण्याला त्याला योग्य संधि मिळत नाहीं; किंवा ती मिळाली तरी तो संकोची वृत्तीचा, अबोलपणाच्या आवडीचा असेल तर मनांत म्हणेल कीं, ' जाऊं दे कीं विना-कारण मतें प्रकट करा कशाला ? त्यावांचून काय अडलें आहे ? ती प्रकट न झाल्यानें कोणाचें त्यांत अनहित आहे ? किंवा तीं प्रगट करावीं असें काय जोखीम किंवा जबाब-दारी मजवर आहे ? परंतु यावर असें म्हणतां येतें कीं, **जीवनासारख्या तात्त्विक विषयावरची कोणाचीहि मते ही त्याची खाजगी मिळकत नाही. ती सार्वजनिक माल-कीची मिळकत आहे.** आणि ती त्यानें समाजाला केव्हांतरी देऊन टाकलीच पाहिजे. कारण ती अप्रकट राहिल्यानें त्याच्या व्यक्तीसंबंधानें इतरांची गैरसमजूत होण्याचा संभव असतो. शिवाय त्याच्या मतप्रकटीकरणाने समाजाला शिक्षण मिळण्यासारखे असेल तर तें बुडते. म्हणून आपलीं मतें सर्व जन्मभरांत केव्हां प्रकट न झाली तरी, ती मृत्युपत्रानें तरी प्रकट करावी. **ती मिळकत बरोबर घेऊन जाण्याचा कोणालाहि हक्क नाही.** मृत्युपत्रानें मागें ठेवलेल्या -या मतांना त्यानें मागें ठेवलेल्या पैशापेक्षांहि कदाचित् किंमत येईल. "

तात्यांचे हे बहुमोल उद्‌गार एखाद्या आदेशासारखे त्यांच्या हस्ताक्षराचे रूपानें माझ्या डोळयांसमोर होते. म्हणून आत्मचरित्रपर थोडेंतरी लिहिल्याशिवाय सुटकाच नव्हती. पण आत्मचरित्र लिहिणें हें तरी सोपें काम आहे काय ? मला वाटतें, त्याच्या इतकें अवघड काम दुसरें कोणतेंहि नसेल! हें आत्मचरित्र लिहितांना त्याचा मी साक्षात् अनुभव घेतला आहे. १९४५ सालीं वाङ्मयशोभा मासिकांत पहिली तीन प्रकरणें लिहून तें काम मी सोडलें. पुढें १९४८ सालीं सह्याद्री मासिकांत आणखी सात लेख लिहून तें

अपुरेच राहिले. त्यानंतर पंधरा वर्षांनीं, १९६३ सालीं कथालक्ष्मी मासिकांत आणखी सात लेख लिहून हें काम मीं कसेंबसें पुरें करीत आहे ! दोनशें पानें लिहिण्याला अठरा वर्षे लागावी यावरून माझ्या लेखणीने या बाबतींत किती खळखळ केली असेल हें वाचकांच्या लक्षांत येईल ! ! आत्मचरित्र म्हणजे आरोपीची जबानी नव्हे हें खरें; पण आपल्याच लेखणीनें आत्मचरित्र लिहूं जाणाऱ्याच्या यातना काय असतील याची कल्पना इतरांना येणें दुर्घट आहे ! **आत्मचरित्र म्हणजे ज्याच्या त्यानें लिहिलेला मृत्यु-लेखच आहे.** एखादा मनुष्य मरून गेला तर चौघांच्या खांद्यावरून जाण्याइतकें तरी त्याचे श्रम वाचतात. पण आत्मचरित्र लिहिणाराला जणूं कांहीं स्वतःचीच प्रेतगाडी स्वतः ओढावी लागते ! त्या गाडींत आत्मसमर्थन, खुलासे यांचे जड दगडधोंडे आणि विस्मृत हकीगतींची बोचकीं कितीतरी ! सुळीं जाणाराला स्वतःचा सूळ खांद्यावरून न्यावा लागतो; त्याप्रमाणें आत्मचरित्र लिहिणाराला ही शिक्षाच नव्हे काय ?

पण एकदां अपरिहार्य म्हणून ही आत्मकथा लिहावयाचें ठरविल्यानंतर काय व किती लिहावयाचें याचा विवेक मीच मनाशीं केला. अवघड गोष्टी देखील करण्याची माझ्या मनाला हौस आणि संवय आहे. तात्यांचे जवळ मी हेंच शिकलो आहे ! तुम्ही भलतें कांहीं लिहूं जाल तर आत्मचरित्र लिहिण्याइतकें अवघड कांहीं नाहीं हें खरें आहे; पण भलतें तरी तुम्ही कां लिहावें ? म्हणून तात्यांना मनोमन साक्ष ठेवूनच या आत्मचरित्राची प्रत्येक ओळ मी लिहिली आहे असें वाचकांनीं समजावे. श्रोत्यांपुढें पुराण सांगतांना तेथेंच एक रिकामा पाट मांडून ठेवण्याची प्रथा आहे. अदृश्य रूपाने मारुतिराय येऊन तेथे रामकथा ऐकत बसतात, अशी भाविक लोकांची समजूत असते. माझी आत्मकथा मी प्रत्यक्ष तात्यांनांच वाचून दाखवीत आहे, किंवा पाटावर शेजारीं बसून ते ऐकत आहेत, अशीच हें आत्मचरित्र लिहितांना मी मनोमन कल्पना केली आहे. यामुळें औचित्यबुद्धीनें काय व किती लिहावयाचें हें मला कोणी सांगण्याचे कारण नाही ! वर आत्मलेखाला प्रेतगाडीची उपमा थट्टेनें मी दिली; पण आत्म-चरित्राचा जड धोंडा डोक्यावर वाहून नेण्याची कोणीहि माझेवर सक्ति केलेली नाही ! याकरितां प्रसन्न मनानें जितकें सांगतां येईल तितकेंच सांगावे आणि बाकीचे सर्व सोडून द्यावें असें मी ठरविलें.

हें करितांना मनाला संयमाचा ताण अतिशय सहन करावा लागला आहे. सांगण्यासारख्या शेंकडों चांगल्या गोष्टीहि मी सोडून दिल्या आहेत. कारण दोनशें पानांच्या या मर्यादेंत तुम्ही काय काय लिहूं शकाल ? तसेंच अनेक वाईट गोष्टीहि मी दृष्टिआड केल्या आहेत. ज्याची आठवण मी स्वतःच करूं इच्छित नाहीं ते वाचण्याची वाचकांना तसदी कां द्यावी ? या जगांत अकारण वैर, उपेक्षा आणि मनःस्ताप यांचें चटके मी थोडेथोडके भोगलेले नाहींत ! त्याचीहि आठवण या प्रसंगीं मला होत नसेल काय ? पण जें ' भोक्तृत्व ' केवळ माझ्या मरणानेंच संपणारे आहे त्याची काळजी मी

कशाला करूं ? माझ्या मृत्यूमुळें तरी ते संपेलच ना ? म्हणून ज्यांची आठवण मी स्वतःच करूं इच्छित नाहीं त्या व्यक्तींचा नामनिर्देश करून त्यांचे वैर 'अमर' करण्याची माझी इच्छा नाही ! दुसऱ्याचें वैर करून जग बुडतें तर तें आजवर कितीदां तरी बुडालें असतें ! !

यावरूनच दुसराहि एक प्रश्न सुचतो तो असा कीं, आयुष्यांत कांहीजणां-कडून अकारण वैर तुम्ही भोगले, त्याप्रमाणें अकारण प्रेमहि तुमच्यावर कधीं कोणी केलें नसेल काय ? अगदी निस्वार्थी बुद्धीनें कोणीच तुमच्या कधीहि उपयोगी पडलें नाहीं काय ? न्यायबुद्धीनें बोलावयाचें तर ही गोष्ट कोणालाहिं नाकारतां येणार नाहीं. आजवर जग जें चाललें आहे तें अशा परोपकारी व्यक्तीमुळेंच चाललेलें आहे. मला त्याची जाणीव आहे व अनेक प्रसंगी अनेकांनी जी मला आयुष्यांत निःस्वार्थीपणानें मदत केली त्यांचेबद्दलची कृतज्ञता माझे मनांतून कशी नाहीशी होईल ? त्या कोणाचा नामनिर्देश करणें त्यांनांच आवडणार नाहीं म्हणून कोणाचाच नामनिर्देश मी येथें केला नाही.

तुमच्या कुटुंबियांची गोष्टहि त्यापैकींच आहे. तुमची पत्नि, मुलेंबाळें हीं सर्व-जण संसारांत आपापलीं कामें दक्षतेनें करीत होती म्हणूनच वाङ्मय लिहिण्याला किंवा कोणताहि उद्योग करण्याला तुम्हाला मनःस्वास्थ्य लाभलें हें खरें कीं नाहीं ? त्यांच्या अबोल स्वार्थत्यागाची आठवण आपणांला कितीशी असते ? तुम्ही जन्माला आला ते 'साहित्यिक' म्हणूनच जन्माला आला नाही ! जणूं कांहीं तुमच्या घरीं पिंजऱ्यांतील शुकसारिका साहित्याचें बोल काढीत होत्या, आणि गवळणहि दुधाऐवजीं साहित्याचा रतीब घालीत होती, असें तर नव्हे ना ? तुमच्यासारख्या लहरी 'कलावंता'ला वागवून घेण्यांत तुमच्या बायकोला किती श्रम पडले असतील ? आज चाळीस वर्षे संसारांतील अनेक सुख दुःखें तिनें भोगली, आशानिराशा सहन केल्या त्या तिनें कधींतरी बाहेर दिसूं दिल्या काय ? केवळ हिंदु स्त्रीच हें दिव्य करूं जाणें ! तुमच्या आयुष्याच्या यशांत तिचाहि वांटा नाहीं काय ? हें सगळें म्हणणें मला कबूल आहे व त्याबद्दल मी कृतज्ञ आहे! एका शब्दांत मी इतकेंच सांगतो कीं, तात्या ताईचें ऋण हातून फेडण्यांत माझ्याबरोबर माझी पत्नि सौ. सुशिलाबाई हिनें मनोभावें श्रम करून, माझ्या आयुष्याचा अर्धा वांटा उचलला आहे. तात्यांची जशी मी सेवाचाकरी केली तशी सून म्हणून ताईची सेवाचाकरी करण्यांत तिनें कधीं कसूर केली नाहीं. यामुळेंच तात्या व ताई या दोघांचा आशीर्वाद आम्हांला जन्मभर लाभला. संसारांत तिची मला मदत नसती तर तात्यांचे नंतर ही सोळा वर्षे निभली नसती !

नुकतेंच मला ६४ वें वर्ष लागलें. आयुष्य सरत आलें आहे याची मला जाणीव आहे. आणखी सातआठ वर्षांनी, तारीख २४ ऑगस्ट १९७२ सालीं तात्यांची शताब्दि येईल. तेथून चार महिन्यांनीं, १४ ऑक्टोबर १९७२ रोजीं तात्यांच्या मृत्यूला पंचवीस वर्षे

होतील. काळाचा हा हिशेब खरा आहे, पण तो दिवस पाहण्याइतकें आयुष्य मला असेल असें वाटत नाही. याकरितां हें आत्मचरित्र लिहिण्याचें माझें कर्तव्य मी पुरें करीत आहे. गेल्या सोळा वर्षांत सृष्टींत इतकें स्थित्यंतर झालें आहे कीं माणुसकी ही चीजच खाजगी जीवनांतून अदृश्य झाली आहे. सार्वजनिक जीवनांत तात्यांचे हयातींत जो एक निकोपपणा होता तो पुनः डोळ्यांना दिसण्याची आशा नाही. कारण गुणावगुणांची सर्वच मूल्यें कालानुसार बदलली आहेत! जुना काळ आतां पुनः कधीहि येण्याची शक्यता नाहीं; आणि नव्या काळांत आपण समरस होऊं शकणार नाहीं; अशी माझ्या मनाची कांहीशी चमत्कारिक अवस्था झाली आहे! स्वातंत्र्यानंतर जी 'नवी सृष्टि' उत्पन्न झाली आहे त्याची मी निंदा करीत नाहीं, किंवा अहित चिंतीत नाहीं. कदाचित् पूर्वीच्या जगांत जें अस्तित्वांतहि नव्हतें असें नव्या जगांत कितीतरी असेल. पण ज्याअर्थीं मीं त्यांत समरस होऊं शकत नाहीं त्याअर्थीं 'आपलाहि काळ संपला' हें 'कालज्ञ' मनुष्यानें ओळखलें पाहिजे! म्हणून माझेंहि जीवितकार्य संपले असेंच मी धरून चालतो. त्यांत मला दुःख वाटत नाहीं.

आतां शेवटीं एकच इच्छा व विनंति आहे कीं लोकांनी मला विसरून जावें. वाङ्मयांत अमर होण्याकरितां हें चरित्र लिहिलेले नाही! माझ्या सार्वजनिक आयुष्याचा हिशेब देण्याकरिता लिहिलेलें आहे. पण ज्याचें देणें त्याच्या पदरांत टाकून 'अनृणी' झाल्यावर माझी इच्छा कोणती हें व्यक्त करण्याचा मला अधिकार नाहीं काय? ती इच्छा इतकीच कीं, लोकांनीं मला संपूर्णपणें विसरून जावें! माझ्या सर्व आयुष्यांत मी कोणाचें ऋण काढलें नाहीं, खोटें भाषण केलें नाहीं, कोणाचा पैसा बुडविला नाहीं, किंवा जाणूनबुजून कोणाला अन्यायहि केला नाहीं. पण सर्व आयुष्यांत न कळत माझे हातून कोणाचे मन दुखावलें गेलें असल्याचाहि संभव आहे. तसें कोणाचें बाबतीत घडलें असेल तर त्यांनीं माझ्या अपराधाची क्षमा करावी. ताई तात्यांना माझ्यापेक्षां अधिक कर्तृत्ववान मुलगा असता तर बरें झालें असतें, असें मला राहून राहून वाटतें. पण त्या गोष्टीला माझा उपाय नव्हता. कृष्णपक्षांत उत्तररात्रीं पडलेल्या चांदण्याप्रमाणें माझें जीवन लोकांच्या दृष्टीआड गेलें. आणि पराक्रमाची कोणतीच संधि मला मिळाली नाही. पण त्याबद्दल मला विषाद वाटत नाही. अशाच रीतीनें माझा जन्म जावयाचा होता असें मी समजतो! म्हणून प्राप्त परिस्थितींत करतां येईल तें सर्व केल्यावर, कोठेंतरी दूर दूर जावें असें मनांत येतें. जेथें कोणी तुम्हांला नांवगांव विचारणार नाहीं, जेथें ओळखीचा मनुष्य भेटणार नाहीं, जेथें कुटुंबांत माझ्याबरोबरच ज्यांनीं जन्म घेतला त्यांपैकीं कोणीहि मला दिसणार नाहीं, असें अज्ञात ठिकाण या ईश्वराच्या सृष्टींत एकहि नसेल काय? आयुष्याचा मला कंटाळा आलेला नाहीं; पण अशा दूर ठिकाणीं जाण्याची मला ओढ लागलेली आहे. मग तें ठिकाण समुद्राच्या पोटांत असो, किंवा डोंगर दऱ्यांत लपलेलें असो. असें चिरविश्रांतीचे ठिकाण जर मला लाभेल तर माझ्यासारख्या मनु-

ष्याला आणखी कशाची अपेक्षा असेल ? 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे सांगती' याहून अधिक रम्य ठिकाण संतांनीं तरी कोणतें पसंत केलें ? माझी प्रकृति त्या संतासारखी नव्हे; पण वाणीनें व्यक्त होणारें सर्व ओळखीचें जग विसरून, अबोल निसर्गसृष्टीशी एकरूप होण्याचा माझ्या कलावंत मनाला ध्यास लागला आहे ! तेथेंच मी स्वतःला विसरूं शकेन—

Full many a gem of purest ray serene,
the dark unfathomed caves of ocean bear;
Full many a flower is born to blush unseen,
And waste its fragrance on the desert air.

वरील कवितेंत माझें सर्व मनोगत उत्तम रीतीनें व्यक्त झालें आहे, इतकेंच सांगून हें आत्मचरित्र पुरें करतों.

समाप्त

# १०

# कांहीं निवडक पत्रे

या पुस्तकाच्या पूर्वार्धाप्रमाणेंच उत्तरार्धातहि मधून मधून मधून काही पत्रांचा सारांशरूपानें उपयोग केला आहे. तथापि, मी माझी हकिगत त्रोटक रीतीनें सांगितली असल्यामुळें, अनेक महत्त्वाच्या पत्रांचा त्यांत उल्लेखहि करितां आला नाहीं. याकरितां कांहीं पत्रें पुढें दिली आहेत.

यांत मी स्वतः दुसऱ्याला लिहिलेलें पत्र क्वचित् एखादेंच आढळेल. तें पत्र म्हणजे टिळक चरित्रासंबंधी मी केसरीच्या विश्वस्तांना लिहिलेलें पत्र होय. बहुतेक पत्रें इतरांनीं मला सहीवर लिहिलेलीं आहेत. पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीचें नांव पत्रारंभी घालून खालीं पत्र आहे. तसेंच, पत्रें तारीखवार क्रमानें देण्यापेक्षां, तीं थोडीच असल्यामुळे, सोईकरितां विषयवार दिलीं आहेत.

का. न. केळकर

( १ )

## श्री. हरबिलास शारदा

Simla,
15 Sept. 1929

Dear Mr. Kelkar,

I am obliged to you for your letter of the 10th September given to me by my friend Mr. N. C. Kelkar. I thank you for the suggestions made in the letter and I agree with them all. Your paper on the 'Tyranny of the marriage - Sacrament' is very interesting reading and I agree with almost all you have said in it.

You will be glad to learn that we are sure to carry the bill with 14 years as the minimum marriageable age for girls on the 19th September. This is a step - an important step - towards the emancipation of women. It will lead to girls, grown up girls, having a voice in the most important transaction of their life - a piece of bare justice to them. It will stop phisical degeneration of our race. All well - wishers of our country must and do welcome the passing of this measure. With kind regards.

Yours sincerely
Har Bilas Sarda

( २ )

## बॅ. मुकुंदराव जयकर

London
2nd October 1931

Dear Mr. Kelkar,

You must have receieved by this time the wire which I sent to the care of your father a few days ago. I have been

trying my best since I left India to get enough time to go through your book and write a preface thereto, but I much regret to say I have not so far succeeded.

Things here are taking a wrong turn in almost every direction. MR. GANDHI'S presence here is not contributing, so far to produce the results we had expected, and sometimes I feel it would perhaps have been better if he had stayed behind. He is, of course, in good spirit and health and is working very hard.

Yours sincerely
M. R. Jayakar

(३)

London
30th October 1931

Dear Mr. Kelkar,

Thank you for your card of the 13th. I am very much relieved on reading that you can wait until I am back. It has been a frightfully busy time with me here. The Moslems are obstructing everything and nothing will please them excepting a complete surrender on the part of the Hindus. Gandhi is mis-handling the situation with the result that the Moslems are more bitter than ever and he is driving all the minorities into their arms. I am trying my best to see that we achieve something in spite of these difficulties. Practically every hour of my time is engaged during the day and it has been difficult to find time for anything else. I am sorry you have to wait but I fear it is inevitable.

Yours sincerely
M. R. Jayakar

(४)

## महात्मा गांधींची पत्रे

Y. C. Prison
21-11-32

My dear Kashinath,

I must acknowledge your letter, if only because you are the son of a dear friend. If by Garbhagar is meant the 'Sanctum Sanctorum' I have clearly stated that it should remain reserved only for the ritualists. I have always sympathised with the Zamorin's position. Where the law is against the reformer he has to wait till the law is altered. I hope to develop these things as time progresses. Meanwhile I expect you to help forward the reform in every way you can.

Yours sincerely
M. K. Gandhi

(५)

Y. C. Prison
25-11-32

My dear Kashinath,

I am grateful to you for a copy of your work on Hindu Law. Apart from the reference you have given to me I shall prize the gift and hope someday to get the time to go through the whole work.

Yours sincerely
M. K. Gandhi

(६)

## न. चिं. केळकर यांची पत्रें

पुणें २१-१२-३७

आशीर्वाद विशेष. पत्र व उतारा पोंचला. ठीक आहे. कायदेशीर हक्काप्रमाणे वागल्याशिवाय याची तड पोंचावयाची नाहीं. व सुख लागावयाचें नाहीं. परंतु पुढील

चर्चा करण्याला तुमची माझी समक्ष गांठ पडावयास पाहिजे. तरी नाताळची सुटी होतांच तुम्ही निदान दोनतीन दिवसांकरितां येथें यावें. म्हणजे आपल्या स्नेही वकिलांशीं चर्चा करुन काय करावयाचें तें ठरवूं. तरी अवश्य यावे. कळावे.

तात्या केळकर

( वरील पत्र मुंबई येथील ट्रस्ट मिळकतीसंबंधी आहे. सदर मिळकतीचा मी ट्रस्टी व एक्झीक्यूटर होतो. )

(७)

पुणें २०-१-१९३८

चि. बापुराव यांस आशीर्वाद. विशेष. आज चि. श्रीधर बरोबर तुमचे कांहीं कागदपत्र पाठविलें आहेत. तसेंच सांगण्यास आनंद वाटतो कीं, दुसऱ्याहि एका ट्रंकेंत तुम्ही काढून ठेवलेलीं माझ्या लेखाची व इतर सर्व टांचणें सांपडलीं. तीं आधीं सांपडतीं तर केसरीचीं फायलें चाळण्याचें माझे श्रम कांही वाचलें असतें. आपल्या घरांतील हें असलें सामान अनेक ठिकाणीं विखुरलेलें होतें. तें इतकें कीं, त्यांतील कोणतेंच वेळेवर हुकमी सांपडणें अशक्य झालें होतें. परंतु गेले एक दोन महिने परिश्रम करून मी आतां सर्व सामान इतकें व्यवस्थित लावलें आहे कीं आत्मचरित्र लिहिण्याचें माझें काम हातीं घेण्यास उमेद वाटते. परंतु या कामाकरितां तुमची मदत मला पाहिजे आहे. यांत सारांश काढणें, छोटी कात्रणें काढणें वगैरें कामें तुम्ही करूं शकाल. आणि तें झाल्यास एक मोठा विभाग तयार होऊन माझे श्रम कमी होतील. तरी यापुढें तुम्हांला रजा सलग मिळण्यासारखी असेल तेव्हां पुण्यास येण्याचें ठरवावें, म्हणजे हें काम करूं. **तुम्ही आजपर्यंत काढून ठेवलेल्या या सामग्रीचें महत्त्व मला फार वाटते ! आणि त्यावरून तुमची मजविषयीची आस्था कळून येते.** तरी आतां या सामग्रीचा उपयोग करून आत्मचरित्राचें काम हातीं घ्यावें असें ठरविलें आहे.

तात्या केळकर

(८)

पुणें ४–६–३८

आशीर्वाद विशेष. – बंकिमचंद्र चतर्जीच्या कादंबऱ्या तुझ्या आवडत्या आहेत त्याची शतसांवत्सरिक जन्मतिथी चालू महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत आहे. तरी त्या ग्रंथकारावर एक लेख मराठींत सह्याद्रीकरितां लिही आणि एक इंग्रजींत लिहून मराठ्याकरितां पाठव. तो इंग्रजी लेख ताबडतोब मजकडे पाठविल्यास मी तो कलकत्त्यास उत्सव-कमिटीकडे पाठवीन.

न. चिं. केळकर

(९)

पुणें १७–३–४१

आशिर्वाद विशेष. – तुमची पत्रें ( भाषांतर केलेली ) पोंचलीं. ' गतगोष्टी–पत्रव्यवहार ' पुस्तकाची पाने ३६८ पर्यंत झालीं. पत्रांची संख्या ११ नोव्हेंबर १९३६ पर्यंत ९४७ झाली. १९३७-३८ ची पत्रें हुडकीत आहे. सांपडत नाहींत. बरोबर १००० पत्रसंख्या करून पुस्तक संपवावें असा विचार आहे. इंडेक्स ×× करीत आहे असे म्हणाला. त्याच्याकडून लवकर होत नाहीं असें वाटलें तर तुम्हांस कळवीन. प्रकाशक म्हणून तुमचे नांव घालीत आहे. एक हजार प्रति काढीत आहे. पुस्तकाच्या ९०० प्रतीच विकू. १०० खासगीस ठेवूं. मुंबईस सर्व प्रति कोणी घेणारा भेटल्यास बरेच.

तात्या केळकर

( या पत्रासंबंधानें थोडे सांगितलें पाहिजे. टिळकचरित्र पुरें झाल्यावर तात्यांचेहि चरित्र – **शक्य तर आत्मचरित्र** – झालें पाहिजे असें मनांत येऊन त्यांच्या पत्रव्यवहाराला मी हात घातला. म्हणजे ही १९३० सालची गोष्ट आहे. तात्यांचा पत्रव्यवहार अमूप होता. दरवर्षाला हजार पत्रांचा एक रुमाल अशी चाळीस वर्षातली निदान चाळीस हजार पत्रें मी फेरिस्त करून लावलीं. त्यांत दहा पत्रें टाकून देऊन एक ठेवावें असें करून तात्यांनीं व मी एक हजार निवडक पत्रांचे पुस्तक प्रसिद्ध केलें. हा उद्योग मला चांगला सात आठ वर्षें पुरला ! पण तात्यांच्या आत्मचरित्राला तो उपयोगी पडला यानें माझे सर्व श्रम कारणीं लागलें. ' गतगोष्टी 'त सुमारे १०० पत्रें व पुरवणी-व्यवहाराच्या पुस्तकांत सुमारे ६०० पत्रें भाषांतर किंवा उतारे घेतलेली माझ्या हातचीं आहेत. याकरितां ' संपादक ' म्हणून माझें नांव तात्यांनीं पुस्तकावर घातले आहे.)

का. न. केळकर

(१०)

**स. वि बापट**

पुणें ता. १–४–१९३८

आपलें पत्र पावलें. तें वाचून जणू माझ्याच मनांतले विचार आपण कसे अगदी तंतोतंत लिहिले याचें आश्चर्य वाटलें! होणाऱ्या क्रांतीसंबंधानें रोज कांहींना कांहीं माझें बोलणें गु. तात्यासाहेब यांच्याशीं होत आहे. कशाचाहि परिणाम म्हणा; मुख्य गोष्ट तूर्त तरी लांबणीवर पडली आहे. उद्यांचें केसरींत, केसरीची पगारी नोकरी व इतर संस्थांशीं असलेलें संबंध सोडले असल्याबद्दल मजकूर जाहीर होत आहे. मुख्य बाब— ( ट्रस्टीशिप ) बाबा कोंकणांतून आल्यावर प्रसिद्ध करूं असें ठरलें आहे! 'अशुभस्य काल हरणं' यांत तूर्त मी समाधान मानीत आहे. तुमची विचारसरणी मला किती पटली म्हणून सांगूं? आपल्या दिशेनें कार्य होण्याकरितां शक्य ते प्रयत्न बाबा आल्यावर करणार आहे. अखेर कोणालाहि असेंच म्हणावें लागणार, 'भवितव्यते! धन्य आहे तुझ्या अघटित घटना पटुत्वाची!'

( हें पत्र ती. तात्यांनीं केसरीची ट्रस्टीशिप सोडून देण्याचा विचार ठरविला होता त्यासंबंधी आहे. )

(११)

**स. वि. बापट**

पुणें २–८–३८

" तुमचें ता. ३०–७चें पत्र पोंचलें. तात्यांचे बरोबर माझाहि केसरी ऑफिसचा संबंध तुटला. महिना महिना मी केसरी ऑफिसमध्यें जात नाहीं. तेथील सर्व जग निराळेंच झालें आहे! तसेंच तात्या लिहिण्याचें कामांत गुंतल्यामुळें व प्रकृति बरी नसल्यामुळें घरीहि पूर्वीप्रमाणें जाणें होत नाहीं. तूर्त निराशेच्या लाटेंत मी सांपडलों आहे एवढें खरें.

(१२)

## राजज्योतिषी सूर्यनारायणराव व्यास, उज्जैन

एका अज्ञात व अभिनव व्यक्तींचे पत्र पाहून तुम्हांला आश्चर्य वाटेल, पण आपला सह्याद्रींतील लेख पाहून लिहीत आहे. झांशीवाली संबंधाने फार सुंदर चर्चा आपण उपस्थित केली आहे व फलज्योतिष आणि इतिहास यांची संगति घालून आपण विशिष्ट दिशेनें यत्न करून विचाराला अवसर दिला आहे, म्हणून मीहि दोन शब्द लिहितो.

आपण जी झांशीवालीची अनुमानिक कुंडली दिली आहे ती झांशीवालीच्या ऐतिहासिक अंगभूत गुणांनी अवश्य युक्त आहे असें मला वाटतें. कुंडलीतील उच्च शनी राजयोगकारक, विशेषतः शौर्याचा द्योतक आहे. बुधचंद्र युति शरीरसौंदर्य दर्शवितें. दशमस्थ नीचीचा मंगळ साधारण प्रतीच्या पित्याच्या पोटी जन्म झाला असावा असे दर्शवितो. लग्नी उच्च शनी, ही स्त्री मोठी तेजस्विनी, प्रभावशालिनी व चाणाक्ष असावी असे सुचवितो. दशमस्थ मंगळ राजभंगाला कारण आहें. अनेक आधुनिक राज्यभ्रष्ट व्यक्तींना कुंडलीतील जन्मस्थ नीचीच्या मंगळानें राज्यविहीन केलें आहे, असें त्यांच्या कुंडल्यावरून आढळते. या सर्व गोष्टीवरुन सदर कुंडली झांशीवालीचीच असावी हे अधिक संभवनीय वाटतें.

कुंडलीसंबंधीची आपली अनुमानें अधिकच निकट जातात. गुरु राहू युति स्वकीय व विदेशी शत्रू दर्शविते. आणि तृतीयेश गुरु अष्टमांत गेल्यामुळे बलवत्तर शत्रुपक्ष मृत्यूला कारण होईल असे दर्शविलें जातें. तेविसाव्या वर्षी भौमदशा अगर अंतर्दशा होती असें गणितानें निघेल तर नक्की जन्मवेळ म्हणजे इष्टघटीहि सांपडण्याचा संभव आहे. आपण जन्मनक्षत्र दिलें नसल्यानें कोणती महादशा अगर अंतर्दशा त्यावेळीं होती हें त्यामुळे काढता येत नाही. कळावे.

(१३)

## श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

नागपूर, १४-५-५३

आपल्या आदरणीय मातुश्री श्री. ताई यांना ता. १२ रोजीं देवाज्ञा झाल्याचे आज वर्तमानपत्रांत वाचलें. कै. तात्यासाहेब आणि कै. ताई या उभयतांनीं आम्हा

उभयतांवर आणि आमच्या मुलांवर अतिशय माया केली. त्यांच्या आशीर्वादानेंच आमचा उत्कर्ष झाला. आज श्री. ताईंच्या मृत्यूची बातमी पहातांच गेल्या वीस वर्षांतील अनेक प्रसंग डोळ्यासमोर उभे राहून फार वाईट वाटलें.

(१४)

## ग. त्र्यं. माडखोलकर

नागपूर, १–१२–१९५३

आपले ३१–१० चे पत्र वेळेवर पोचलें होतें. आपला सह्याद्रीतील लेख मी काल निवान्तपणें वाचला म्हणून हे पत्र आजच लिहित आहें.

आपल्या लेखांतील प्रतिपादन साम्यन्यतः मला पटले. तसेच कांही माहितीहि नवीन मिळून आनंद वाटला. अशा प्रकारच्या चिकित्सेमुळे चालू काळाच्या इतिहासाचे स्वरूप सुस्पष्ट होईल आणि कांही लोकभ्रम दूर होतील, हा मोठाच लाभ होय.

हा लेख वाचतांना एक गोष्ट मनांत आली ती लिहीत आहें. १९२० च्या नोव्हेंबरपासून तात्यासाहेबांशीं संबंध आल्यानंतर जी संभाषणें त्यांचेशी झालीत, त्या सर्वांचे विस्तृत टिपण मी त्या त्या वेळीच करून ठेवलें होतें. त्यांतील १९३६ सालपर्यंतची टिपणें त्यांनीं स्वतः पाहून तपासून मंजूर केली होती. त्यावर त्यांनीं आद्याक्षरेंहि केली होती. तीं टिपणें माझ्या गांधीवधानंतर झालेल्या घराच्या विध्वंसांत नष्ट झालीत. माझ्या समजुतीनें सुमारे १०० छापील पाने होतील, एवढा अतिशय महत्वाचा मजकूर नष्ट झाला. तथापि माझ्या आठवणींत ती संभाषणे मनांत पक्की बसली आहेत. अर्थात त्या टिपणांना तात्यासाहेबांच्या आद्याक्षरांमुळें जें प्रामाण्य होते, तें या आठवणींना नाही. त्यामुळें श्री. दिनकरराव काळे यांनी सह्याद्रीच्या दिवाळी–अंकासाठी आठवणी लिहिण्याची विनंती केली असतां मी त्यांना नकार दिला.

त्या आठवणी लिहिणे एकप्रकारचें ऋण आणि म्हणून कर्तव्य आहें, असें मात्र मनाला सारखें वाटतें.

(१५)

## ग. त्र्यं. माडखोलकर

नागपूर-ता. २७-५-५४.

आपले ता. २४ ५-५४ चे कृपापत्र पोचलें ते वाचून मला अतिशय कृतज्ञता वाटली. माझ्या लिहिण्यांत जे काय गुणांश असतील, त्याचे सर्व श्रेय कै. तात्यासाहेब कोल्हटकर आणि कै. तात्यासाहेब केळकर यांनाच आहे. विशेषतः वृत्तपत्र लेखनाची कला ही तर केळकरांच्या सान्निध्यांतच मला लाभली. आपणाला याची साक्षात जाणीव आहेच.

(१६)

## टिळक-चरित्रासंबंधी केसरीच्या विश्वस्तांस पत्र

पुणें-१-४-१९५५

श्री, **जयंतराव टिळक** यांसी, स. न. वि. वि.

पत्र लिहिण्यास कारण कीं, 'निबंधमाले'च्या प्रकाशनामुळे ती. तात्यांचेविषयींचें माझे वाङ्मयकार्य संपले आहें. यानंतर माझे हाती असलेले त्यांच्या ग्रंथांचे हक्क जो विकत घेईल त्याला राजरोस विकण्याचें मी ठरविले आहे, हे पुस्तकांतील जाहीराती-वरुन आपलें लक्षांत येईल. या पुस्तकांच्या हक्कांत टिळक-चरित्राचाहि समावेश असल्यानें टिळक चरित्राबद्दल प्रथम तुम्हांस विचारीत आहे. याचे कारण असें कीं, नंतर याबाबतीत तुमचा कोणताही शब्द माझेवर राहू नये; इतर कोणाकडेही हे हक्क जाण्यापेक्षां टिळकांचे वारस या नात्यानें व्यक्तिशः तुमच्याकडे अगर ते शक्य नसेल तर निदान केसरी संस्थेकडे हें हक्क गेलेले वाईट नाही. व टिळक-शताब्दीचा भर यापुढें येणार असल्यानें, या हक्कांचा यशस्वी उपयोग तुम्ही हवा तसा करू शकाल. निदान, एखाद्या गोष्टींत तुमचा व माझा हितसंबंधाच्या बाबतींत विरोध येण्याचे टळेल. अशा अनेक दृष्टींनीं प्रांजळ बुद्धीनें ही सूचना आपणांस केली आहे. तरी टिळक-चरित्राचे हक्क तुम्हांस विकत हवे असल्यास, ( म्हणजे व्यक्तिशः तुम्हांला किंवा केसरी संस्थेला ) तुमची मागणी कोठपर्यंत आहे याचा आंकडा आपण मला लेखी कळवावा. म्हणजे त्याबाबत विचार करता येईल. आपणाला हे हक्क नको असलें तरी तसेही कळविण्यास हरकत नाही. म्हणजे मला इतरांना विचारतां येईल. तरी या

बाबतीत नीट स्वस्थपणें विचार करून पत्राचे उत्तर द्यावे ही विनंती. कळावे, लोभ असावा,

आपला
का. न. केळकर

(१७)

## विश्वस्तांचे उत्तर

पुणें. २९–७–१९५५

श्री. का. न. केळकर, यांसी सा. न. वि. वि.

संस्थेच्या विश्वस्तांच्या दि. २८–७–५५ ला झालेल्या सभेंत आपल्या दि. १–४–८४ च्या श्री. जयंतराव टिळक यांना लिहिलेल्या पत्राचा विचार करण्यांत आला. आपण पत्रांत लिहिल्याप्रमाणें **टिळक-चरित्राचे हक्क विकत घेण्याची संस्थेला आवश्यकता वाटत नाहीं.** असा निर्णय सभेत घेण्यांत आला, तो आपणांस कळवीत आहे.

कळावे, लोभवृद्धी व्हावी ही विनंती.

आपला
ज. स. करंदीकर, (विश्वस्त)

(१८)

## श्री. पु. ल. देशपांडे

मुंबई–१९५६

काहीं दिवसांपूर्वी मी वामनराव देशपांडे यांचेबरोबर तुमच्या घरी आलो होतो. त्यावेळी श्री. विवेकानंदांच्या ग्रंथांविषयी आपण अत्यंत कळकळीनें त्यांना सांगत होता, आणि मी श्रवणभक्ति करीत बसलो होतो. त्या विचारांचे बीज माझ्या खडकाळ मेंदूत रुजेल असें त्यावेळी मला वाटले नाही. परंतु ते रुजावे असा योगायोग होता. मी स्वामीजींची पुस्तके मिळवण्याच्या नादांत होतों. परवा रत्नागिरीला सहज गेलो असतांना ते समग्र खंड मिळाले. आपल्या सूचनेप्रमाणे २ रा खंड वाचावयास सुरवात

केली आणि अकल्पितपणें त्यांत रंगलों. मनाला विलक्षण समाधान लाभलें. हा विषय मला अगदीच परका नाहीं. त्याविषयीं लक्षपूर्वक काहीं वाचले नव्हतें. वाचले होते ते आपले ओघाओघानें.

पुस्तक वाचीत असतांना येथे स्वामिजींनीं खूप आंत बुडी घेतल्याचा जागोजागी साक्षात्कार होतो. त्यांतील मुद्यांविषयीं आज कांहीही लिहिण्याची योग्यता नाही. परंतु त्या जागेकडे बोट दाखविल्याबद्दल केवळ कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं हे पत्र लिहित आहे. पहिला घोट घेतला आहे. व्यसन जडो ही इच्छा आहे. ती ज्याला पुरवावी असे वाटेल तो पुरवीलच.

(१९)

## श्री. म. दा. साठे

पुणें, दि. ८–३–६०

'साधना' साप्ताहिकाचा दि ५ मार्चच्या अंकांत 'शेजवलकरांचे लेख' भाग २ यावरील तुमचे परिक्षण वाचलें. तक्रार एवढीच कीं, फार सौम्य शब्दांत ते लिहिलें आहे. माझ्याकडे तें पुस्तक आले आहे. तुमच्यासारखेच तें वाचतांना डोकें फिरू लागलें ! असेच गरळ त्यांनीं 'निजाम आणि पेशवे' या पुस्तकांतही ओकले आहे ! 'पुरुषार्था'च्या याच महिन्याच्या अंकांत 'महाराष्ट्रातल्या गेल्या ५० वर्षांतील इतिहास संशोधन' हा माझा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत एका परिच्छेदांत शेजवलकरांविषयी माझे स्पष्ट मत मी नमूद केले आहें. शक्य असल्यास वाचावें.

भारत इ. सं. मंडळने एक व्याख्यानमाला घडवून आणावी व त्यांची बेजबाबदार व विग्रहदूषित विधानें सोडवून काढावींत. मागे एका प्रसंगी अशी व्याख्यानमाला झाली होती. प्रो. न. र. फाटक या कामाला योग्य आहेत.

(२०)

## श्रीयुत रामभाऊ दाते

इंदूर ता. १९–१–१९६

आपले पुस्तक काल एका बैठकीतच वाचले. '**दोन घटका मनोरंजन**' हे आपण विनयानें या संग्रहास नांव दिले आहें. परंतु तुमचे अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजे

तुमच्यांतला अभ्यासू लेखक व कायदेपंडित–राजकारणाचा सर्वांगीण विचार करणारा–इतिहासाकडेहि कवि-मनाच्या रोमँटिक दृष्टीनें बघणारा–तुमच्या पूज्य व अलौकिक पितृदेवतेचा खरा वारसा मिळालेला श्रद्धावान् पुत्र–कलेचा प्रेमी व कलाकार–विरुद्ध पक्षाच्या किंवा प्रतिस्पर्ध्यांच्या भूमिकेविषयी योग्य ती Really Democratic अशी सहिष्णुता बाळगणारा–open mind असलेला परंतु स्वतःची बाजू कणखरपणें व स्पष्टपणें मांडणारा—हळुवार अंतःकरणाचा—थोडक्यात म्हणजे, एक विद्वान परंतु विनयशील, हुशार पण भोळा, रसिक व कलाकार, मातृपितृभक्त, जगानें योग्यतेची पाहिजे तेवढी काय, पण जवळजवळ मुळीच दखल न घेतलेला––बव्हंशी गणुसमुच्चयाच्या मानानें उपेक्षित—तरीहि समाधानी; असे व्यक्तिमत्व मला बघावयाला मिळाले व फार फार आनंद झाला. राजा असतो तर तुमच्या प्रत्येक पैलूचे लाख लाख रुपये मोल दिले असते!

या पुस्तकासंबंधी मला जे कांहीं करतां येईल ते मी अवश्य करीन. महाराष्ट्र-साहित्य सभेचें अध्यक्षपद व धुरीणत्वही मी या वर्षीं सोडले आहे. माझे विद्वान मित्र प्राध्यापक कवीश्वर हे आता अध्यक्ष आहेत. त्यांच्याशी चर्चा करून काय ते आपणास कळवीन.

आपला स्नेहांकित

रामूभय्या

(२१)

## श्री. द. के. केळकर

माटुंगा, ता. २१–११–६१

'**दोन घटका मनोरंजन**' हे पुस्तक काल व परवा असें संपूर्ण वाचून काढले. तुझी भाषा सर्वत्रच इतकी चटकदार बठलेली आहे कीं कोणताही निबंध वाचण्यास सुरुवात केल्यावर मध्यंतरी एकही ओळ सोडून पुढें जावेसे वाटत नाही. सर्वच निबंध आकर्षक शैलीनें नटलेले आहेत. त्यांतल्या त्यांत ज्या निबंधांनीं माझें मन विशेष वेधून घेतले ते म्हणजे 'प्रतिभासाधन' व नेपोलियनच्या चरित्रावरचे चार लेख. नेपोलियनच्या चरित्राशी तूं अगदी एकरूप झालेला आहेस. 'प्रतिभासाधन' हा लेख वाचीत असता एक उत्तम प्रतिमावान लेखच डोळ्यापुढें दिसूं लागला. उपमा उत्प्रेक्षांचे तेथें नुसतें फवारेवर फवारे थयथयाट करीत आहेत. तुझ्यातला कवि व चित्रकार हे दोघे तेथें हातांत हात घालून प्रेमालाप करीत आहेत. तुझ्या लेखन-कलेंतील सर्व गुणांचा हा एक सुंदर गुच्छच तूं वाचकांचें हातीं देत आहेस. मी पुण्यास आलो तेव्हां हे पुस्तक तू दिलेस हें चांगलें झाले; नाहींतर या एका चांगल्या पुस्तकास मी मुकलों असतो.

(२२)

## श्री. अरविंद ताटके

मुंबई, ता. १३-९-१९६१

आपला व माझा व्यक्तिशः परिचय नाहीं. तरीहि पत्र लिहून त्रास देत आहें. त्याबद्दल क्षमस्व. आपला 'वाङ्मयशोभे'तला नेपोलियनवरील लेख वाचला. लेख अत्युत्तम उतरला असल्याने त्याबद्दल अगदी खुल्या दिलानें आपलें अभिनंदन करण्यासाठीं ह्या पत्राचा प्रपंच. पन्नास वर्षें नेपोलियन-ग्रंथांचा अभ्यास करणारे सांप्रत भारतांत आपण एकटेच असाल! यदुनाथ सरकारांकडे नेपोलियनविषयक सर्व उपलब्ध ग्रंथ होते असे सांगतात. मलाहि नेपोलियनविषकक ग्रंथांची आवड फार, परंतु आपल्या शतांशानेहि मी तसंबंधी ग्रंथ वाचू शकलो नाहीं. सन १९६४ सालांत आपल्या नेपोलियनच्या अभ्यासाला ५० वर्षें पूर्ण होत आहेत. तेव्हां आपण त्याचें फक्ड चरित्र लिहावे हीच सदिच्छा.

(२३)

## श्री. रा. प्र. कानिटकर

पुणें, ता. ३१-५-१९६३

आपणास भारतीय ज्योतिषशास्त्र-संस्थेतर्फे 'ज्योतिर्भूषण' ही गौरवाची पदवी मिळाली याबद्दल आपलें मनःपूर्वक अभिनंदन करतो. आपण 'ज्योतिर्विद' आहांतच; तेव्हां आपणांस या पदवीचें विशेष आभूषण नाहीं. आपण स्वयंसिद्ध आहां.

◆ ◆ ◆

83703
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२१५ वि. चारित्र
नो. दि. ३१४१६६

REFBK-0013173
REFBK-0013173